म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
२८६



जीवनरहस्य

REFBK-0007148


आचार्य शं. द. जावडेकर

जीवनरहस्य—शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	चूक	बरोबर
१०	१५	वस्तुजातीत	वस्तुजातांत
९७	२०	अस्सल सत्याग्रह	असला सत्याग्रह
१०१	१०	आत्मोनती	आत्मोन्नती
३४१	२०	चिकाटी	चिकाटीचे
३४३	२	आजचा कौल	आजचा काळ
३६४	८	संस्थानिक	संस्थानें
३६४	२४	बनू नये.	बनवूं नये.
३६६	१६	having hatchet	having burried the hatchet
३६८	२८	विधायक	विघातक
४१२	१८	सत्याग्रह निष्ठेनें	सत्याग्रह निष्ठेनें
४३१	१	I shall hold	I still hold


जीवन-रहस्य

(म. गांधी यांचें विस्तृत चरित्र)



लेखक

आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर






किंमत बारा रुपये

प्रकाशक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
१९१ शनवार, पुणें २.

सर्व हक्क य. गो. जोशी यांचे स्वाधीन
आंतील चित्र दीनानाथ दलाल यांचें आहे.

मुद्रक
श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण, पुणें २.

१९४९



प्रस्तावना

३० जानेवारी १९४८ रोजीं महात्मा गांधींचें देहावसान झालें आणि ते अमर झाले. या दुःखद घटनेचा धक्का ताजा असतांनाच श्री. य. गो. जोशी यांचें फेब्रुवारी महिन्यांत मला एक पत्र आलें. आणि त्यांत त्यांनीं गांधीजींचें चरित्र थोडक्यांत आपणांस लिहून द्यावें अशी मला विनंति केली. ही विनंति मला अशा वेळीं करण्यांत आली होती कीं, त्या वेळीं इतर कोणताही विचार न करतां मीं तात्काल ती मान्य केली. श्री. जोशी यांनीं मला पुस्तकाची जी मर्यादा प्रथम सुचविली होती त्या मर्यादेपेक्षां हें पुस्तक जवळजवळ दुप्पट झालेलें आहे. हें सर्व पुस्तक १९४८ च्या मे महिन्यांतच लिहून तयार झालें. त्यानंतर तें हस्तलिखित श्री. जोशी यांचेकडे देऊन मी पुण्याहून इस्लामपुरास येऊन राहिलों. यानंतर या पुस्तकाचे भाग 'प्रसाद' मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाले व त्यानंतर आतां तें पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहे.

हें पुस्तक भागशः प्रसिद्ध होत असतांना 'प्रसाद'च्या वाचकांपैकीं दोन व्यक्तींनीं त्यांत झालेले दोन प्रमाद मला पत्र लिहून कळविले. या दोन चुकांसंबंधीं येथें थोडा खुलासा करणें मला इष्ट वाटतें. पुस्तकाच्या ८४-८५ या पानावर महात्मा गांधींचीं अकरा व्रतें दिलेलीं आहेत. या अकरा व्रताच्या नामनिर्देशाची एक यादी आचार्य विनोबा यांनीं तयार केली आहे. त्यासंबंधीं लिहितांना 'विनोबा भावे यांचीं एकादश व्रतें' असे शब्द ८४ पानाच्या अखेरीस पडलेले आहेत. हीं व्रतें विनोबाजींनीं श्लोकरूपानें ग्रथित केलीं असलीं तरी तीं महात्मा गांधीनीं स्वतःच सांगितलीं आहेत. म्हणून त्यांना 'विनोबा भावे यांचीं एकादश व्रतें' असें न म्हणता गांधीजींचीं एकादश व्रतें असेंच

म्हणणें युक्त आहे. यासंबंधींचा खुलाचा मीं करावा अशी इच्छा मला ज्यांनीं पत्र लिहिलें त्यांची होती. ही त्यांची सूचना मला पटली म्हणून मी तसा येथें खुलासा करीत आहें. दुसऱ्या एका मुद्यासंबंधीं असाच खुलासा करणें माझें कर्तव्य आहे. पुस्तकाच्या २६३ पानाच्या अखेरीस १५ जून १९३४ रोजीं पुणें नगरपालिकेनें महात्मा गांधींना हरिजन दौरा संपवून आल्यानंतर मानपत्र देण्याचा समारंभ केला. यासंबंधीं पुस्तकांत पुढील एक वाक्य आहे : "या समारंभास ते जात असतां त्यांच्यावर सनातनी म्हणविणाऱ्या एका इसमानें हरिजन सेवेच्या त्यांच्या कामानें चिडून जाऊन एक बॉंब फेकला!" हा इसम अद्यापि पोलिसांना सांपडलेला नाहीं, हें पुढें दिलेंच आहे. तो स्वतः सनातनी म्हणविणारा असावा हा केवळ माझा तर्क आहे. पण तो इसम अद्यापि अज्ञात असल्यानें या बाबतींत माझें विधान बरोबर झालेलें नाहीं असें एका गृहस्थानें माझ्या निदर्शनास आणलें. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. पुस्तकांतील या संबंधाची शब्दरचना चुकीची झालेली आहे एवढा खुलासा येथें केला म्हणजे पुरे. हे व यांसारखे अनेक दोष पुस्तकात राहिले असतील. वाचकांनीं त्यांबद्दल मला क्षमा करावी.

महात्मा गांधी हे आजच्या युगांतील सर्वश्रेष्ठ मानव होत ही गोष्ट आतां सर्वमान्य होऊं लागली आहे. ते एक द्रष्टे संत आणि राजकीय कर्मयोगी होते. श्रीकृष्ण आणि गौतम बुद्ध हे जे भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ, त्या दोहोंच्या तत्त्वज्ञानाला व कार्याला नवी दिशा लावून त्यांचा आधुनिक कालास अनुरूप असा विकास करणारे ते एक क्रांतिकारक धर्मपुरुष होते असें माझें मत आहे. भारतांत आज जी सर्वांगीण क्रांति घडत आहे, तिला अहिंसेचें आध्यात्मिक अधिष्ठान देऊन मानवाला आपल्या खऱ्या सनातन धर्माची जाणीव सत्याग्रहाच्या रूपानें त्यांनीं करून दिली. याच सत्याग्रहाच्या अधिष्ठानावर भारतांत सुरू असलेलें राजकीय क्रांतीचें कार्य त्यांनीं यशस्वी केलें आणि भावी सामाजिक व आर्थिक क्रांतीचें साधन हीच सत्याग्रह-निष्ठा बनूं शकेल असा संदेश आधुनिक भारताला देऊन त्यांनीं ही निष्ठा भारतीयांच्या अंतःकरणांत बनावी म्हणून धर्मराजाच्या इंद्रप्रस्थ नगरींत आपल्या

प्राणाची पूर्णाहुति दिली. आजच्या मानवाला त्यांनीं त्याचा सनातन धर्म दाखवून देऊन आजच्या युगास अवश्य असणारा युगधर्म समाजवाद हाच आहे हेंही सांगितलें. "Truth and non-violence must incarnate themselves into socialism". म्हणजे सत्य व अहिंसा यांना समाजवादाचा आकार आलाच पाहिजे अशी निःसंदिग्ध घोषणा त्यांनीं हिंदी राष्ट्र स्वतंत्र होतांच केली. आपल्या देशांत जें लोकशाही राज्य स्थापन होत आहे त्या लोकशाहीला अहिंसेचें अधिष्ठान देऊन सत्याग्रही मार्गांनीं समाजवादी लोकशाहीची संस्थापना करणें हेंच आधुनिक भारताचें आजचें कर्तव्य आहे. आधुनिक भारतांत जी अध्यात्मवृत्ति व धर्मनिष्ठा लोकमान्य टिळक, नामदार गोखले, महात्मा गांधी व योगी अरविंद घोष यांनीं जागृत केली त्या अध्यात्मवृत्तींतून व धर्मनिष्ठेंतून या देशांत समाजवादी क्रांति घडून येईल असें माझें मत आहे. मात्र ही क्रांतिकारक अध्यात्मवृत्ति व क्रांतिकारक धर्मनिष्ठा म्हणजे काय व तिचें स्वरूप कसें असावें याचें ज्ञान आपण करून घेतलें पाहिजे. हें ज्ञान होण्यास महात्मा गांधींच्या चरित्राचा अभ्यास आपण केला पाहिजे. असा अभ्यास करण्याची माझी दृष्टि कोणती व गांधीजींचें जीवन-रहस्य मला कोणतें वाटतें तें मराठी वाचकांना समजावून सांगावें या दृष्टीनेंच मीं हें पुस्तक लिहिलेलें आहे. माझा हा हेतु जर थोड्या तरी प्रमाणांत यशस्वी झाला तर मला त्यांत समाधान होईल.

मला हें पुस्तक लिहिण्याची सूचना करून माझ्याकडून तें लिहून घेतलें त्याबद्दल मी श्री. य. गो. जोशी यांचा आभारी आहें. मीं हें कार्य, "सगुण चरित्रें परम पवित्रें।—सादर वर्णावीं॥ अशा भावानें लिहिलेलें आहे. वाचकांनीं तो भाव लक्षांत येऊन त्यांतील चुका मला कळवाव्यात म्हणजे त्याचा उपयोग मला यापुढें करतां येईल.

रामनवमी शके १८७१
७-४-४९
इस्लामपूर, जि. सातारा

— शं. द. जावडेकर

प्रास्ताविक

आज पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत असलेलें हें 'गांधी-जीवन-रहस्य' पहिल्यांदां 'प्रसाद' मासिकांत प्रसिद्ध झालें. माझ्या शब्दाला मान देऊन आचार्य जावडेकर यांनीं हें विस्तृत 'गांधी जीवन-रहस्य' त्वरित लिहून दिलें व तें 'प्रसाद'मध्यें प्रसिद्ध केल्यामुळें 'प्रसाद'च्याही लोकप्रियतेंत भर पडली. आचार्य जावडेकरांच्या लेखनामुळें 'प्रसाद'लाही महत्त्व आलें. आज तेंच चरित्र माझे स्नेही श्री. रा. ज. देशमुख यांनीं प्रसिद्धीकरितां घेऊन मला या पुस्तकाच्या विक्री वगैरेच्या व्यापांतून सोडविलें याबद्दल त्यांचा मी आभारी आहें. आचार्य जावडेकरांनीं माझ्या प्रकाशनसंस्थेकरितां गांधीवाद, लोकशाही हीं पुस्तकें पूर्वी लिहिलींच आहेत. गांधी-जीवन-रहस्यानें त्यांत आणखी भर पडली आहे. आचार्य जावडेकर व माझी प्रकाशनसंस्था यांचे ऋणानुबंध असेच उत्तरोत्तर वाढत जातील अशी आशा आहे.

— यशवंत गोपाळ जोशी

अनुक्रमणिका

	प्रस्तावना	१
	प्रास्ताविक	६
१	म. गांधींच्या जीवनाचें रहस्य आणि महत्त्व	१
२	जन्म, बालपण आणि शिक्षण	२०
३	कूली बॅरिस्टर आणि वर्णभेदाविरुद्ध लढा	४२
४	दक्षिण आफ्रिकेंतील अष्टवार्षिक सत्याग्रह-युद्ध	८७
५	पाहिलें महायुद्ध आणि सत्याग्रही राजकारण	१२०
६	राष्ट्रसभेचें नेतृत्व आणि सत्याग्रही स्वातंत्र्य-युद्ध (पूर्वार्ध) (उत्तरार्ध)	१६२
७	प्रांतिक स्वराज्य आणि पुन्हा स्वातंत्र्य-संग्राम	२७१
८	स्वतंत्र हिंदुस्थान-पाकिस्तान आणि हिंदु-मुसलमान ऐक्य	३३९
९	हिंदी राष्ट्रसभेचें राजकारण आणि महात्मा गांधींचें नेतृत्व	३९९
१०	महात्मा गांधींची धर्मनिष्ठा आणि मुमुक्षुवृत्ति	४३२

देशमुख आणि कंपनीनें
प्रकाशित केलेलीं कांहीं पुस्तकें

१ तेजस्वी तरुणी
महात्मा गांधी

२ गांधी-दर्शन
आचार्य कृपलानी

३ गांधी आणि गांधीवाद
पट्टाभि सीतारामय्या

४ मंगलधाम
गोपिनाथ तळवलकर





: : १ : :

म. गांधींच्या जीवनाचें रहस्य आणि महत्त्व

महात्मा गांधींच्या जीवनाकडे पाहण्याच्या अनेकांच्या अनेक दृष्टि आहेत. कोणी त्यांच्या राजकीय कर्तृत्वाला महत्त्व देतो, तर कोणी त्यांच्या सामाजिक व धार्मिक प्रवृत्तींना महत्त्व देतो. कांहींच्या मतें ते एक फार मोठे आध्यात्मिक प्रवृत्तीचे संत होते; पण राजकीय क्षेत्रात त्यांनीं जें कार्य केलें, त्यामुळें राजकारणांत बरेचसे घोंटाळे निर्माण झालेले आहेत. हा आध्यात्मिक प्रवृत्तीचा संत, राजकारणांत न पडतां, केवळ समाजसेवेंत मग्न राहून लोकाच्या सामाजिक व नैतिक सुधारणेचाच प्रयत्न करता, तर आज त्यांचो जेवढी कीर्ति झालेली आहे तेवढी कीर्ति कदाचित् तावडतोब त्यांना मिळाली नसती; तरी त्यांच्या हातून जें कार्य झालें असतें तें अधिक चिरंतन व अधिक निर्दोष होऊन, कालांतरानें त्यांचो कीर्तिही अधिक फैलावली असती असें त्याना वाटतें. राजकारणामध्यें पडल्यामुळें आज जरी त्यांचो तात्कालिक

कीर्ति अधिक झालेली दिसली, तरी त्यांच्या राजकारणामुळें घोंटाळेच अधिक झालेले आहेत, यामुळें त्यांना राजकीय कार्यामुळें मिळालेली ही कीर्ति फार काल टिकणार नाहीं असें त्यांना वाटतें. त्यांनीं आपल्या शक्तीचा व्यय राजकारणांत केला नसता, तर समाजसेवा आणि लोकांची नैतिक व आध्यात्मिक उन्नति या क्षेत्रांत त्यांना अधिक कार्य करतां आलें असतें, इतकेंच नाहीं तर राजकीय क्षेत्रांत पडल्यामुळें त्यांच्या संतपणालाही कांहीं अंशीं कमीपणा आलेला आहे असें कांहीं लोक म्हणतात. याच्या उलट, या व्यक्तीच्या अंगीं वास्तविक असामान्य आध्यात्मिक गुण असे विशेष नसतांना, ते केवळ राजकीय पुढारी असल्यामुळेंच त्यांच्या अंगच्या आध्यात्मिक संतगुणांची विशेष कीर्ति झालेली आहे असाही कांहींचा समज आहे. म. गांधींच्या जीवनाकडे पाहण्याच्या अनेकांच्या अशा अनेक दृष्टि आहेत, व त्या दृष्टींनीं त्यांचें जीवनरहस्यही अनेकांनीं अनेक प्रकारें उलगडून दाखविण्याचे प्रयत्न केलेले आहेत. या निरानिराळ्या प्रयत्नांत कितीही विविधता असली तरी प्रत्येकास हें मान्यच करावें लागतें कीं, महात्मा गांधी ही जगांतील अलौकिक विभूति होऊन गेली आणि त्यांच्या जीवनचरित्राकडे सामन्यानें पाहिलें असतां ते जगाच्या इतिहासांत अद्वितीय असेच गणले पाहिजेत. म. गांधींचें हें अलौकिकत्व व अद्वितीयत्व कशांत आहे यासंबंधीं कितीही मतभेद झाले, तरी त्यांच्या अंगचें हें अलौकिकत्व व अद्वितीयत्व, निदान आतां तरी, कोणी नाकारूं शकत नाहीं.

गांधीजींच्या चरित्राचा विचार करीत असतां, त्यांच्याकडे निरनिराळ्या दृष्टिकोनांतून पाहणारांच्या मतांचा आपण विचार केला पाहिजे हें खरें, पण त्यापेक्षां म. गांधींचा स्वतःचा आपल्या जीवनाकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोन होता तें आपण आधीं समजून घेतलें पाहिजे. त्यानंतरच इतरांनीं त्याच्या जीवनाविषयीं व कार्याविषयीं जें म्हटलें आहे त्याच्या युक्तायुक्ततेसंबधीं आपला निर्णय केला पाहिजे. सुदैवानें म. गांधींनीं आत्मचरित्र लिहून आपला स्वतःचा जीवनाकडे व जगाकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोन होता तें लिहून ठेविलें आहे. तो दृष्टिकोन आपण जर समजावून घेतला, तर ते आध्यात्मिक प्रवृत्तीचे

संत असून, ते राजकारणांत कां व कसे पडले, आणि राजकारण करीत असतांही आपल्या आत्मिक उन्नतीचें अनुसंधान त्यांनीं कां व कसें ठेविलें, याची बरोबर कल्पना आपणांला येऊं शकेल. म. गांधींच्या जीवनांतील अंतिम साध्य कोणतें होतें, आणि तें साध्य प्रात करून घेण्यासाठीं त्यानीं कोणकोणत्या साधनांनीं कसकसे प्रयत्न केले, याचें वर्णन त्यांनीं लिहिलेल्या आत्मकथेंत त्यांनींच सविस्तरपणें केलेलें आहे.

गांधीजींच्या जीवनाचें साध्य

गांधीजी आत्मकथेच्या प्रस्तावनेंत आपल्या जीवनाचें साध्य कोणतें होतें त्यासंबंधीं लिहितात : "मला जें करावयाचें आहे, ज्याच्यासाठीं आज तीस वर्षें माझी धडपड चालली आहे, तें म्हणजे आत्मदर्शन, ईश्वराचा साक्षात्कार—मोक्ष—हेंच होय. माझी सर्व हालचाल याच दृष्टीनें होत असते. माझें लेखन आणि भाषण सर्व याच दृष्टीनें चालतें, आणि राजकीय चळवळींतही मी मनोभावानें पडतों तेंही याचसाठीं."

"परमेश्वराच्या व्याख्या अगणित आहेत, कारण त्याच्या विभूतिही अगणित आहेत. या विभूति मला आश्चर्यचकित करून टाकतात, क्षणभर मुग्धही करतात; परंतु मी सत्यस्वरूपी परमेश्वराचाच पुजारी आहें. तो एकच सत्य आहे. आणि इतर सर्व मिथ्या आहे. तें सत्य मला सांपडलेलें नाहीं, मी त्याच्या शोधांत आहें. त्याच्या शोधार्थ मला सर्वांत प्रिय असलेल्या वस्तूंचाही त्याग करण्यास मी तयार आहें, या शोधरूपी यज्ञामध्यें या शरिराचाही होम करण्याची माझी तयारी आहे, आणि शक्तिही आहे, असा मला विश्वास वाटतो. परंतु जोंपर्यंत मला त्या निरपेक्ष सत्याचा साक्षात्कार झाला नाहीं, तोंपर्यंत माझ्या अंतरात्म्याला जें सत्यसें वाटतें, त्या सापेक्षसत्यालाच माझा आधार समजून, त्यालाच खुणेचा दिवा करून, त्याच्या आश्रयानें मी माझें जीवन व्यतीत करीत असतों." (सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा—प्रस्तावना.)

वरील अवतरणांवरून म. गांधींच्या जीवनाचें ध्येय आत्मदर्शन म्हणजेच मोक्ष हें होतें असें दिसून येईल. या आत्मदर्शनासाठींच ते

आपल्या जीवनांतील सर्व व्यापार करीत असत, आणि हिंदी जनतेला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठीं त्यांनीं जें राजकारण केलें तेंही स्वतःच्या मोक्षासाठींच केलें अशी त्यांची दृष्टि होती. आत्मप्राप्तीचें ध्येय पुढें ठेवणारा मोक्षार्थी संत समाजसेवेंत व राजकारणांत कां व कसा पडूं शकतो असा प्रश्न उपस्थित करून, जेव्हां आश्चर्य प्रकट करण्यांत येतें, तेव्हां आत्मोद्धार आणि जगदुद्धार यांच्यामध्यें एक काल्पनिक भेद निर्माण करण्यांत येत असतो. परंतु अध्यात्मदृष्टीनें विचार करून ज्यांनीं आत्मोद्धार आणि जगदुद्धार यांतील भेद भ्रामक आहे असें ठरविलें त्यांना आत्मोद्धार हें जगदुद्धाराचें साधन आणि जगदुद्धार हें आत्मोद्धाराचें साधन असेंच वाटतें. म्हणजे आत्मोद्धार केल्याखेरीज जगदुद्धार होणार नाहीं, आणि जगदुद्धार केल्याखेरीज आत्मोद्धार साधणार नाहीं, अशी अद्वैतदृष्टि त्यांना प्राप्त होत असते. म. गांधींच्या जीवनापासून जे अनेक बोध आपणांस घेतां येण्याजोगे आहेत त्यांपैकीं अत्यंत महत्त्वाचा असा हा पहिला बोध होय. म. गांधी हे धर्मपुरुष होते आणि त्यांच्या जीवनाचें साध्य, आत्मदर्शन अथवा मोक्षप्राप्ति हें होतें एवढें म्हटल्यानें त्यांच्या जीवनाचें खरें रहस्य आपणांस उलगडणार नाहीं. धर्म आणि मोक्ष यांसंबंधींचीं त्यांचीं मतें थोडीं तरी आपण समजून घेतल्यावांचून त्यांच्या चरित्राचा खरा उलगडा आपण करूं शकत नाहीं.

ईश्वर, मोक्ष आणि धर्म हे शब्द आपण अनेकवार उच्चारितों. मनुष्यानें धर्मानें वागावें आणि ईश्वराची उपासना करावी, शक्य तर ईश्वराचें दर्शन घेण्याचा प्रयत्न करावा, आणि आत्मदर्शन, आत्मप्राप्ति अथवा मोक्ष हें आपलें अंतिम ध्येय समजावें, असें आम्ही नेहमीं म्हणत असतों. परंतु धर्म म्हणजे काय? ईश्वर म्हणजे काय? त्याचें दर्शन कसें घ्यावयाचें आणि मोक्ष मिळवावयाचा म्हणजे काय करावयाचें? यासंबंधींचे आमचे विचार आम्ही केव्हांही स्पष्ट बनवीत नाहीं. अथवा यासंबंधीं आपले जे विचार असतील ते कितपत बराबर आहेत? आपला धर्म-म्हणजे आपण ज्या धर्मांत जन्मास आलों तो धर्म-आणि इतर धर्म यांच्यामध्यें कांहीं फरक आहे किंवा नाहीं? आणि

असल्यास त्यांपैकीं कोणता धर्म श्रेष्ठ आहे? धर्माच्या श्रेष्ठत्वाची कसोटी काय? सर्व धर्मांना सामान्य अशीं कांहीं तत्त्वें आहेत किंवा नाहींत? आणि जर असतील तर त्यांच्यामुळें आपल्या नित्याच्या व्यवहारांत कोणता फरक घडेल अथवा घडावा? या प्रश्नांचाही आपण कधीं विचार करीत नाहीं अथवा केला तरी त्यासंबंधीं आपलीं मतें निश्चित करण्याचा आपण मनःपूर्वक कधीं यत्न करीत नाहीं. सामान्यतः अशी आमची प्रवृत्ति असली तरी अमुक धर्म श्रेष्ठ आणि अमुक धर्म कनिष्ठ यासंबंधीं आम्ही चर्चा करतों, वाद करतों, आणि धर्माच्या नांवानें आपलाच धर्म श्रेष्ठ समजून, इतर धर्मांच्या लोकांशीं भांडण्यास व कित्येक प्रसंगीं एकमेकांचीं डोकीं फोडण्यासही प्रवृत्त होतों! महात्मा गांधींची धर्मनिष्ठा ही अशा प्रकारची केवळ शाब्दिक, वाचाळ, अथवा भांडखोर नव्हती. त्यांनीं आपल्या अंतःकरणांतील धर्मवृत्ति जागृत आणि प्रज्वलित करण्यासाठीं आपलें सर्व जीवित अर्पण केलेलें होतें. आपल्या जीवनांतील प्रत्येक व्यवहार करीत असतां तो व्यवहार आपल्या अंतःकरणांतील धर्मप्रवृत्तीला पोषक आणि संवर्धक आहे किंवा नाहीं, हें तपासून पाहून नंतरच ते आपले सर्व व्यवहार करीत असत. मनुष्यमात्राचा कोणताही व्यवहार धर्माच्या कक्षेंतून सुटूं शकेल असें ते मानीत नसत. पोट भरण्याचा अथवा द्रव्यसंपादनाचा व्यवसाय करीत असतां, तो धर्मप्रवृत्तीशीं सुसंगत आहे किंवा नाहीं, याचा विचार करण्याचें कारण नाहीं असें त्यांना वाटत नव्हतें. खाण्यापिण्यांत धर्म कसला? पोटाचा व्यवहार करतांना धर्म कसला? वकिली किंवा व्यापार-व्यवहार यांच्याशीं धर्माचा काय संबंध आहे? राजकारणांत धर्म आणि अधर्म यांचा विचार करून कसें चालणार? कौटुंबिक व्यवहारांत अथवा भाऊबंदांशीं वागतांना धर्माचा प्रश्न उपस्थित करण्याचें काय कारण आहे? अशी त्यांची धर्मासंबंधीं विचारसरणी नव्हती. मनुष्याचा प्रत्येक व्यवहार, मग तो कौटुंबिक असो, सामाजिक असो, व्यापार-धंद्यांतील असो, किंवा राजकारणांतील असो, त्याच्यावर आपल्या अंतःकरणांतील धर्मप्रवृत्तीचें प्रभुत्व नित्य चाललें पाहिजे असा त्यांचा

आग्रह होता. मनुष्याच्या अन्तःकरणांतील ही धर्मप्रवृत्ति म्हणजे थोडक्यात न्यायाची अथवा नीतीची प्रवृत्ति होय. हिलाच ते सत्यनिष्ठा असें म्हणतात आणि ही सत्यनिष्ठा हीच मनुष्याची आत्मप्रेरणा अथवा आध्यात्मिक वृत्ति होय. आपल्या आत्मकथेच्या प्रस्तावनेंत जेव्हां ते म्हणतात कीं, मी सत्यरूपी ईश्वराच्या विभूतीचा उपासक आहें, तेव्हां सत्यनिष्ठेलाच ते आत्मनिष्ठा अथवा ईश्वरनिष्ठा समजतात हें उघड दिसतें. आणि त्या सत्यनिष्ठेस साक्षी ठेवून आपण जीवनांतील सर्व व्यवहार करीत आहों असें म्हणण्याचा त्यांचा आशय आपल्या बरोबर ध्यानीं येतो. आपल्या आत्मकथेस त्यांनीं "सत्याचे प्रयोग" असें नांव दिलेलें आहे. त्याचा अर्थ विशद करतांना ते लिहितात, "माझ्या प्रयोगांमध्यें तरी आध्यात्मिक म्हणजे नैतिक, धर्म म्हणजे नीति, आत्म्याच्या दृष्टीनें पाळावयाची नीति तो धर्म." सारांश, नीति, धर्म आणि आध्यात्मिक प्रवृत्ति, हे शब्द ते समान अर्थाचेच समजतात. आपल्या जीवनाला अध्यात्माचें अधिष्ठान पाहिजे याचा अर्थ आपल्या जीवनांतील सर्व व्यवहार नीतीला धरून म्हणजे न्यायबुद्धीस अनुसरून चालू असले पाहिजेत. समाजाला आध्यात्मिक अधिष्ठान असावें याचाही अर्थ तोच आहे. समाजांत घडणारे सर्व व्यवहार न्यायावर आधिष्ठित झाले पाहिजेत. त्या व्यवहारांपासून सर्वांचें हित झालें पाहिजे असा त्याचा अर्थ आहे. या अर्थानें हिंदु धर्म, मुसलमान धर्म, ख्रिस्ती धर्म किंवा पारशी धर्म हे एकमेकांहून भिन्न नाहींत. मनुष्याची सत्प्रवृत्ति म्हणजेच सत्यनिष्ठा, प्रेमभावना आणि सेवावृत्ति यांची वाढ करण्याची वृत्ति. हाच सर्व धर्मांचा सर्वसाधारण असा उद्देश आहे. यासाठीं सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, इत्यादि जे नैतिक नियम ते सर्व धर्मांनीं उपदेशिलेले आहेत, आणि त्या सर्वसामान्य नीतिनियमांना अनुसरून, समाजांतील व्यवहार घडत रहावे म्हणूनच निरनिराळ्या धर्मांनीं आपआपल्या बुद्धीस अनुसरून व परिस्थितीस अनुरूप असे आचरणाचे नियम, व्रतें, उद्यापनें अथवा इतर कर्मकांडें बनविलेलीं आहेत. हें जें धर्माचें बाह्यांग आहे तें निरनिराळ्या धर्मांत वेगवेगळें दिसलें तरी सर्वांचें अंतरंग एकच आहे,

व तें म्हणजे मनुष्याची बुद्धि सर्व व्यवहार करीत असतां न्यायनिष्ठ म्हणजेच सत्यनिष्ठ असावी; त्याचें अंतःकरण शुद्ध प्रेममय असावें आणि त्याचें वर्तन सेवावृत्तीनें प्रेरित आणि तपश्चर्येनें पवित्र झालेलें असावें. मनुष्याच्या अंतःकरणांतील ही सत्प्रवृत्ति म्हणजेच त्याचा अंतरात्मा अथवा परमात्मा किंवा परमेश्वर होय. या अंतरात्म्याचा आदेश आपणांस सदसद्विवेकबुद्धीच्या रूपानें मिळत असतो; तरी आपण असत्प्रवृत्तींच्या आधीन होऊन अनेक व्यवहार करण्यास प्रवृत्त होतों. आपल्या वर्तनानें आपण दुसऱ्यावर अन्याय करीत आहों, समाजाचा घात करीत आहों, आपलें शील व बुद्धि भ्रष्ट करीत आहों, याची आम्हांस कमीअधिक प्रमाणांत जाणीव असते, पण स्वार्थानें, लोभानें, मोहानें अथवा अहंकारानें, आपण या असत्प्रवृत्तीच्या अथवा पापवृत्तीच्या अधीन होत असतों. हीच आपली बद्धावस्था होय. या पापवृत्तीपासून आपली पूर्णपणें मुक्तता होणें, केवळ कायेनेंच नव्हे तर वाचेनें व मनानेंही असत्य, अन्याय अथवा पाप करण्याकडे आपली प्रवृत्ति न होणें, आणि सदैव सत्प्रवृत्तीशीं एकरूप होऊन काया-वाचा-मनें वर्तत राहणें, हाच आपला मोक्ष होय. ही मोक्षप्राप्ति म्हणजेच आत्मदर्शन अथवा आत्मप्राप्ति होय.

म. गांधींनीं दक्षिण आफ्रिकेंत गेल्यानंतर धर्मरहस्य समजून घेण्याचा व त्या रहस्यास अनुसरून आत्मप्राप्ति करून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. त्या वेळीं त्यांनीं सर्व धर्मांचा अभ्यास केला. आणि आपल्या स्वतंत्र बुद्धीनें सर्व धर्मांचें मंथन करून धर्मरहस्य समजून घेतलें. त्यांना आत्मिक शांतीची तहान लागली होती. अंतःकरणांतील पापप्रवृत्तीपासून मुक्त होण्याचा त्यांना ध्यास लागला होता. अशा अवस्थेंत असतांना त्यांना आपआपल्या मतानें धर्माचा उपदेश करणारे अनेक लोक भेटले. कांहींनीं त्यांना ख्रिस्ती धर्माचा उपदेश करून ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचाही सल्ला दिला. "प्लीमथ ब्रदरन" या नांवाचा एक ख्रिस्ती संप्रदाय आहे. त्या संप्रदायांतील एक गृहस्थ त्यांना म्हणाले, "तुम्हांस अंतःकरणाची शांति हवी असेल तर तुम्ही आमच्या धर्माचा स्वीकार करा. तुम्हांला आपल्या हातून घडणाऱ्या चुकांबद्दल व पापांबद्दल एकसारखा विचार करावा लागतो. आपल्या

हातून घडलेलीं पापें कशीं धुऊन जातील या चिंतेनें तुमचें मन व्यथित होतें. तुम्हांला नित्य प्रायश्चित्तें घ्यावींत असें वाटतें. असल्या कर्मकांडांनीं तुम्हांला अंतःकरणाचो शांति कधींही मिळणार नाहीं. या जगांत वावरावयाचें म्हणजे हरघडीस आपल्या हातून पाप घडणारच. अशा पापांचा निरास करण्यासाठीं आपण किती प्रायश्चित्तें घेणार? त्यांना कांहीं अंतच नाहीं. आमच्या धर्मानें या पापांतून मुक्त होण्याचा अगदीं सोपा मार्ग दाखवून दिला आहे—तो म्हणजे आपण आपल्या पापाचा सर्व बोजा येशू ख्रिस्तावर सोंपवावा. तो ईश्वराचा एकुलता एक निष्पाप पुत्र आहे. त्यानें वरदान दिलेलें आहे कीं, जे त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांचीं पापें तो धुऊन टाकतो ईश्वराचें हें अगाध औदार्य आहे. येशूच्या या मुक्तीच्या योजनेचा आम्हीं स्वीकार केलेला आहे. त्यामुळें आमचीं पापें आम्हांला चिकटत नाहींत. ज्यांना त्याच्या महाबलिदानाचा स्वीकार करावयाचा असेल, त्यांनीं तसें करून शांति मिळविणें त्यांच्या हातचें आहे. तुमचो अस्वस्थता कोणीकडे आणि आमची ही शांति कोणीकडे! या जगांत पापाशिवाय पाऊल तरी टाकतां येईल काय? म्हणूनच येशूनें सर्व जगाच्या पापांचें एकाच वेळीं प्रायश्चित्त घेऊन टाकलें आहे. त्याच्यावर विश्वास ठेवा. तो तुमच्या पापांचा निरास करील."

अशा अर्थाचा त्या ख्रिस्तभक्ताचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, गांधीजींनीं नम्रतापूर्वक उत्तर दिलें, "सर्वमान्य ख्रिस्ती धर्म तो जर हाच असेल तर तो मला पटण्यासारखा नाहीं. मला पापकर्मांचीं फळें भोगण्यापासून मुक्ति नको आहे. मला जी मुक्ति हवी आहे ती पापकर्मापासून आणि पापवृत्तीपासून हवी आहे. ही पापवृत्तीपासून आणि पापकर्मापासून मुक्त होण्याची माझी मनीषा जोंपर्यंत पूर्ण झालेली नाहीं तोंपर्यंत माझ्या अंतःकरणांत जी अस्वस्थता आहे तीच मला तुमच्या शांतीपेक्षां अधिक प्रिय आहे."

वरील संवादांत ख्रिस्तभक्तानें अंतःकरणाची शांति अथवा मोक्ष मिळविण्याचा जो एक सुलभ अथवा सोपा उपाय सुचविला आहे

तो केवळ ख्रिस्ती धर्मांतच आहे असें नाहीं. प्रत्येक धर्माच्या अनेक अनुयायांत अशा प्रकारचे विचार पसरलेले आपणांस आढळतात. कोणी तोंडानें रामनामाचा जप केल्यानें मोक्ष मिळतो असें सांगतात, तर कोणी विठ्ठलाचें भजन करण्याचा उपदेश करतात. अशा प्रकारचे सुलभ आडाखे बसवून, आपल्या पापांचा सर्व बोजा परमेश्वरावर लादून, केवळ त्याच्यावर विश्वास ठेवून स्वस्थ बसल्यानें आपणास मुक्त होतां येईल, अशी वेडगळ कल्पना प्रत्येक धर्मांत कांहींची आढळून येईल, पण हें त्या धर्माचें रहस्य नव्हे. प्रत्येक प्रकारच्या पापप्रवृत्तीपासून स्वतःस मुक्त करण्याचे प्रयत्न ज्याचे त्यानेंच केले पाहिजेत. याच अर्थानें तुकारामम्हाराजांनीं म्हटलें आहे कीं, ईश्वर आपल्या हातांत मोक्षाचें गाठोडें घेऊन बसलेला आहे व त्याची भक्ति केल्यानें तें गाठोडें तुम्हांस तो आणून देणार आहे अशी कल्पना करूं नका. तुम्हांस जर मोक्ष हवा असेल तर तुम्हीं स्वतःच आपलें अंतःकरण निर्विषय बनविलें पाहिजे. अंतःकरणांतील सर्व मळ धुऊन टाकणें, कामक्रोधादि षड्-विकार जाळून टाकणें आणि मोहाचा सागर तरून जाणें, हा अंतः-करणाची शांति मिळविण्याचा खरा मार्ग आहे. अंतःकरण पूर्णपणें निष्पाप आणि निर्मळ झालें नसतांना, हरघडीस अनेक व्यवहारांत पापकर्में नित्य घडत असतांना, केवळ ईश्वराचा नामजप केल्यानें किंवा एखाद्या विभूतीस उद्देशून तीच ईश्वराचा खरा अवतार आहे किंवा ईश्वराचा ती पुत्र आहे अथवा ती ईश्वराचा पैगंबर किंवा दूत आहे, असें बुद्धीनें मान्य केलें किंवा तसा आपला विश्वास आहे असें म्हटलें, एवढ्यानें कोणासही मोक्षाची प्राप्ति होऊं शकत नाहीं, व खरें अंतःसमाधानही लाभूं शकत नाहीं. मुक्त मनुष्याची शांति ही पापपुण्यासंबंधीं बेफिकीर बनून स्वैर वर्तन करण्यानें लाभूं शकत नाहीं. तसेंच एखादा धार्मिक सिद्धान्त केवळ बुद्धीनें मान्य करणें अथवा न करणें, एखाद्या विभूतीस ईश्वरी अवतार मानणें अथवा न मानणें, शरिराची अथवा वाणीची विशिष्ट कवायत अथवा कसरत करणें किंवा न करणें, यावरही अंतःकरणाची शांति अवलंबून नसते. आपल्या कायेनें, वाचेनें व मनानें कोणासही पीडा होणार नाहीं

याबद्दल सदैव दक्ष राहणें, अन्यायानें पीडित जे असतील त्यांना प्रेमानें जवळ करून त्यांची पीडा दूर करण्यासाठीं झटत राहणें, आणि जगांतील अन्यायांविरुद्ध झगडण्यासाठींही असत्याचा व हिंसेचा आश्रय न करतां सत्यानें असत्यावर आणि प्रेमानें द्वेषावर विजय संपादन करण्याचा प्रयत्न करण्याच्या कामीं आपलें सर्व जीवन समर्पण करणें, हाच अंतःशांतीचा, आत्मदर्शनाचा किंवा मोक्षाचा खरा मार्ग आहे, व हेंच सर्व धर्मांनीं सांगितलेलें सर्वोत्तम रहस्य आहे, असा म. गांधींचा दृढनिश्चय ते दक्षिण आफ्रिकेंत गेल्यानंतर एकदोन वर्षांतच म्हणजे अदमासें १८९५ सालाच्या सुमारास झाला.

हें जें सर्व धर्मांचें रहस्य म्हणून त्यांच्या बुद्धीला व अंतःकरणाला पटलें, त्या सिद्धांतालाच ते आजन्म चिकटून राहिले. त्यालाच ते जीवनांतील व जगांतील अंतिम सत्याचें अथवा परमेश्वराचें स्वतःस समजलेलें स्वरूप असें म्हणतात. या सिद्धांताचें पूर्णपणें आचरण करण्यासाठीं त्यांनीं सत्य व अहिंसा यांच्याबरोबर ब्रह्मचर्य, अपरिग्रह, समाजसेवा, हीं व्रतें घेतलीं. सर्व भूतमात्रांत व वस्तुजातींत भरून राहिलेली अशी एक विश्वशक्ति आहे व तीच विश्वशक्ति आपल्या अंतःकरणांत सत्याच्या, अहिंसेच्या व सेवेच्या रूपानें वसत आहे, पण आपण स्वार्थानें, ममत्वानें, अहंकारानें, आसक्तीनें तिच्यापासून स्वतःला अलग करीत असतों. ती शक्ति आपणांस आपल्याजवळ ओढीत असतां आपण तिच्यापासून दूर जात असतों असा त्यांना अनुभव येऊं लागला. आपल्या या अंतरात्म्याच्या हांकेस 'ओ' देऊन तिच्याशीं समरस व एकरूप होण्याचा सतत प्रयत्न करीत, जगांतील सर्व व्यवहार सत्यानें व अहिंसेनें करीत राहणें आणि समाजाच्या सर्व व्यवहारांत आज जें असत्य, हिंसा, द्वेष, स्पर्धा, मत्सर यांचें राज्य पसरलें आहे तें नाहींसें करून त्याच्या जागीं सत्याचें, प्रेमाचें, निर्वैराचें, सहकार्याचें व सेवेचें राज्य स्थापन करणें हेंच त्यांनीं आपलें ध्येय बनविलें. ज्या वेळीं त्यांची या मतांवर श्रद्धा बसली त्या वेळीं त्यांचें वय (१८९५ सालीं) पंचवीस-सव्वीस वर्षांचें होतें. यानंतर त्यांनीं आपल्या जीवनांत क्रांति करण्यास प्रारंभ केला. या वेळेपासून तों

त्यांचें देहावसान होईपर्यंत त्यांनीं आपली ही जीवनसाधना अखंड चालविली, आणि श्रीकृष्ण व गौतमबुद्ध, येशू ख्रिस्त व महंमद पैगंबर यांनीं निरनिराळ्या शब्दांत व निरनिराळ्या भाषांत उपदेशिलेला धर्म एकच आहे व त्याचें रहस्य अहिंसेनें सत्याची उपासना करणें यांतच सांठविलेलें आहे आणि म्हणून अक्रोधानें क्रोधाला, साधुत्वानें असाधुत्वाला, औदार्यानें स्वार्थाला आणि सत्यानें असत्याला जिंकतां येतें हें सिद्ध करण्यासाठींच आपलें बलिदान पूर्ण शांतीनें केलें! सत्याची अहिंसेनें उपासना करण्याची ही जीवनसाधना ती त्यांनीं पन्नास वर्षें अखंड अनुसरली आणि त्या साधनेसाठींच अखेरीस आपल्या प्राणांची व देहाची आहुति देऊन त्यांनीं अमरपद प्राप्त करून घेतलें, जगाला आत्मोद्धाराचा मार्ग दाखविला आणि मानवसंस्कृतीला आध्यात्मिक अधिष्ठान असलें पाहिजे या म्हणण्याचा अर्थ काय तो आपल्या जीवनानें आणि मरणानें विशद करून दाखविला.

धर्म, व्यवहार आणि राजकारण

महात्मा गांधींनीं आपल्या आयुष्यांत राजकारणाचाच प्रामुख्यानें व्यवहार केला. कौटुंबिक दृष्टीनें त्यांनीं प्रथम कांहीं दिवस वकिलीचा व्यवसाय दक्षिण आफ्रिकेंत केला, आणि हा व्यवसाय करीत असतां साहजिकच त्यांचा व्यापारीवर्गाशीं संबंध आला. व्यापार, वकिली आणि राजकारण, या तीनही क्षेत्रांत सत्यानें वागणाऱ्या मनुष्याला व्यवहार करतां येणार नाहीं अशी रूढ समजूत सर्वत्र असल्याचें त्यांना आढळून आलें. त्यांना सामाजिक व्यवहारांत सर्वत्र फैलावलेल्या या असत्याचरणाची चीड आली, आणि समाजाच्या सर्व व्यवहारांत सत्याचा व अहिंसेचा अवलंब करील अशा प्रकारचा सत्यनिष्ठ समाज निर्माण करण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली. बालपणापासूनच त्यांच्या अंगीं विलक्षण सत्यनिष्ठा वसत असल्याचें दिसून येतें. हरिश्चंद्रासारख्या सत्यनिष्ठ विभूतीचा आदर्श त्यांना आकर्षित करीत असल्याचें दिसून येतें. हरिश्चंद्र आणि रामचंद्र यांच्या कथांनीं त्यांच्या एकंदर जीवनावर फार मोठा प्रभाव पाडिलेला

आहे. त्यांच्या अंगीं असामान्य अशी जर कोणती एक वृत्ति बालपणापासून अखेरपर्यंत वाढत गेलेली दिसत असेल, तर ती म्हणजे सत्यनिष्ठा ही होय. वकिलीचा धंदा करीत असतां त्यांनीं व्यवहारदृष्ट्या बरीच संपत्ति मिळविली. पण सुमारें दहाबारा वर्षें हा व्यवसाय त्यांनीं केला असला तरी तो करतांना आपण केव्हांही असत्याचा आश्रय केला नाहीं असें ते प्रतिज्ञापूर्वक सांगतात. ज्याची बाजू असत्याची असेल त्याचें वकीलपत्र मीं कधींच घेतलें नाहीं, आणि ज्या वेळीं आपण घेतलेली बाजू अन्यायाची आहे अथवा खोटी आहे असें मला समजून आलें, तेव्हां मीं तें काम अर्धवट सोडून दिलें व एकदां तर आपल्या पक्षकारांस कोर्टानें शिक्षा करावी, असें कोर्टास उघडपणें सांगितलें, असें तें आपल्या आत्मकथेंत लिहितात. यामुळें ज्यांची बाजू मुळांत खोटी असेल असे लोक आपणांकडे येतच नसत, आणि आपण नेहमीं सत्पक्षाचीच बाजू घेतों हें कोर्टास माहीत असल्यामुळें न्यायाधिशाचा विश्वास आपण संपादन करीत असूं असेंही त्यांनीं कांहीं मजेदार उदाहरणें देऊन दाखवून दिलें आहे.

आपल्या वकिलीच्या व्यवसायासंबंधीं त्यांनीं आत्मकथेंत केलेलीं पुढील विधानें फार महत्त्वाचीं व वाचनीय आहेत : "मला आठवतें त्याप्रमाणें मीं हें तर पूर्वी दर्शविलेंच आहे कीं, वकिलीच्या धंद्यांत मीं कधीं असत्याचा आश्रय केलेला नाहीं आणि वकिलीच्या पैशाचाही मोठा भाग केवळ सेवेसाठींच मीं अर्पिलेला होता व तिच्याबद्दल मी खर्चापलीकडे कांहींही घेत नसें. कित्येक वेळां खर्चही स्वतः करीत असें.....वकिलीच्या धंद्यांत खोटें बोलल्याशिवाय चालायचेंच नाहीं असें मी विद्यार्थीदशेंत असतांनाही ऐकत असें. मला तर खोटें बोलून प्रतिष्ठाही मिळवायची नव्हती किंवा धनही कमवायचें नव्हतें. त्यामुळें त्या गोष्टींचा माझ्या मनावर परिणाम होत नसे." असें सांगून नंतर त्यांनीं आपल्या वकिलीच्या अनुभवांतील कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांच्या अखेरीस ते म्हणतात : "वकिलीच्या धंद्यांतही सत्याला जागून काम होऊं शकतें ही माझी समजूत दृढ झाली." पण त्यांचें एवढ्यानेंही समाधान

झालें नाहीं. वकिलीच्या धंद्यासंबंधीं अखेरीस ते लिहितात : "मात्र वाचकानें येवढें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, धंदा म्हणून वकिली करणें हेंच मुळांत अयोग्य आहे, व सत्यपालनानें त्या दोषाचें निराकरण होऊंच शकत नाहीं." या मतांस अनुसरून पुढें त्यांनीं तो धंदा सोडून दिला आणि आपलें आयुष्य सार्वजनिक कार्यास सर्वस्वीं वाहून घेतलें.

वकिलीच्या धंद्याप्रमाणेंच व्यापारासंबंधींही त्यांचीं अशींच मतें होतीं. दक्षिण अफ्रिकेंत गेल्यानंतर सार्वजनिक कार्य अंगावर घेण्याचें त्यांनीं एक वर्षाचे आंतच ठरावल. या कार्याचा प्रारंभ म्हणून त्यांनीं जी पहिली सार्वजनिक सभा बोलावून तिच्यापुढें भाषण केलें, त्या भाषणांतच त्यांनीं प्रथमतः व्यापार आणि सत्यनिष्ठा हा मुद्दा उपस्थित केला. यासंबंधीं ते लिहितात : "हें माझ्या आयुष्यांतील पहिलेंच भाषण म्हणायचें. मला सत्यासंबंधीं बोलायचें होतें. व्यापारांत सत्य चालायचें नाहीं असें मी व्यापाऱ्यांच्या तोंडून एकत आलों होतों. ही गाष्ट मला त्या वेळींही खरी वाटत नव्हती, आजही वाटत नाहीं. व्यापार आणि सत्य यांचें परस्पर पटायचें नाहीं असें प्रतिपादणारे मित्र आजलाही आहेतच. ते व्यापाराला व्यवहार आणि सत्याला धर्म म्हणतात ; आणि पुढें युक्तिवाद असा लढवतात कीं, व्यवहार तो व्यवहार आण धर्म तो धर्म. व्यवहारांत सत्य चालायचेंच नाहीं. त्यांत यथाशक्तिच सत्य बोलतांचालतां येणार अशी समजूत. या भूमिकेचा मीं आपल्या भाषणांत चांगलाच समाचार घेतला आणि व्यापाऱ्यांना त्या दुहेरी कर्तव्याची जाणीव करून दिली. परदेशांत आल्यामुळें त्यांची जबाबदारी स्वदेशामध्यें असावी त्यापेक्षां वाढली आहे. कारण, मूठभर हिंदी लोकांच्या चालचलणुकीवरून हिंदुस्थानच्या करोडो लोकांचें माप तेथें ठरत होतें."

जो न्याय वकिलीच्या धंद्याला तोच व्यापाराला आणि तोच राजकारणालाही लागू केला पाहिजे असें त्यांचें मत होतें, आणि सुमारें पन्नास वर्षें त्यानीं राजकारणांत प्रत्यक्ष घालवून असें सिद्ध करून

दाखविलें कीं, आपण स्वतःपुरते तरी सत्यनिष्ठा व अहिंसाव्रत कठोरपणें पाळून यशस्वी राजकीय नेतृत्व करूं शकलों. हें त्यांचें असामान्य कर्तृत्व त्यांच्या अंगीं उपजत असलेल्या आणि आपलें सर्वस्व वेंचून कमावलेल्या आत्मबलाचें म्हणजेच अव्यभिचारी सत्यनिष्ठेचें फल होय. विचार करण्याची शक्ति अंगीं आल्यापासून आणि शिक्षणक्रम संपवून स्वतंत्र व्यवसायास सुरवात केल्यापासून, त्यांना जें जग सभोंवार दिसलें त्या जगांतील सर्व व्यवहार हिंसेनें, परपीडेनें आणि असत्यानें चालू असल्याचें त्यांना आढळून आलें. इतकेंच नाहीं, तर सत्यनिष्ठेनें व अहिंसावृत्तीनें कोणताही सामाजिक व्यवहार करतां येईल असा विश्वासही आजच्या जगांत उरलेला नाहीं. या असत्यनिष्ठ व हिंसक जगाविरुद्ध सत्यनिष्ठेनें व अहिंसावृत्तीनें झगडून त्यांत क्रांति करावी आणि एकंदर मानवसंस्कृतीला सत्याचें व अहिंसेचें अधिष्ठान निर्माण करून द्यावें हाच खरा धर्म होय असा त्यांच्या बुद्धीनें निर्णय केला. तशी त्यांनीं प्रतिज्ञा केली आणि ती प्रतिज्ञा पुरी करून त्यांनीं आजच्या जगाला एक नवी दृष्टि प्राप्त करून दिली आहे.

मानवांच्या सर्व व्यवहारांना नीतीचें अधिष्ठान असलें पाहिजे, आणि सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ति हाच सर्व नीतिनियमांचा अंतिम आधार आहे असें जाणून, त्यांनीं आपल्या सर्व व्यवहारांत या दोन तत्त्वांचा अवलंब करून, अंतःकरणाची परमशांति अथवा अखंड आनंद प्राप्त करून घेण्याचें ठरविलें. इतकेंच नाहीं, तर आज मानवसमाजांत जे व्यवहार चालू आहेत ते सत्यापासून व अहिंसावृत्तीपासून कोणत्या कारणामुळें ढळत आहेत तीं कारणें शोधून काढून, त्यांचें निराकरण करण्यासाठीं सतत झगडावयाचें, आणि या संस्कृतींत आमूलाग्र क्रांति घडवून आणावयाची, पण ही क्रांति आपली अहिंसानिष्ठा न ढळवितां घडवून आणावयाची अशी जीवननिष्ठा त्यांनीं धारण केली. या जीवननिष्ठेसच त्यांनीं सत्याग्रह हें नांव शोधून काढिलें. आणि सत्याग्रही क्रांतिकारक आपल्या जीवनांत व समाजांत कसा वावरतो त्याचें प्रत्यक्ष दर्शन त्यांनीं जगाला घडवून दिलें. सत्य

व अहिंसा हीं दोन सनातन धर्मतत्त्वें जरी त्यांनीं नवीन शोधून काढलेलीं नाहींत, तरी त्यांनीं सत्याग्रही जीवननिष्ठा स्वीकारून, जें सार्वजनिक व खाजगी चरित्र आचरिलें, तें अपूर्व, अलौकिक व अद्वितीय असें ठरलें याबद्दल आज कोणासही शंका उरली नाहीं. सत्याग्रहनिष्ठा हें एक आध्यात्मिक समाजक्रांतिशास्त्र आज बनूं लागलें आहे, आणि या क्रांतिशास्त्राचें ध्येय, मानवसमाजाच्या जीवनांत सर्वांगीण अंतर्बाह्य क्रांति करणें हें आहे. मानवसमाजाच्या सर्व बाह्य व्यवहारांत सर्वांगीण क्रांति घडवून आणूं म्हणणारे अनेक क्रांतिकारक विचारसांप्रदाय आज जगांत पसरलेले आहेत. अशी सर्वांगीण सामाजिक क्रांति घडवून नवें जग निर्माण करण्याची भाषा आज सर्वत्र ऐकूं येत आहे. समाजाच्या बाह्य घटनेंत व भौतिक अंगांत अशी क्रांति करून नवा मानवसमाज निर्माण करण्याचा एक प्रयोग मार्क्सवादाच्या रूपानें रशियामध्यें चालू आहेच. अशीच मार्क्सवादी क्रांति सर्व जगांत घडून यावी, असें रशियांतील बोल्शेव्हिक पक्षाचें मत असून त्या दिशेनें प्रयत्न करणारे कम्युनिस्ट पक्षाचे लोक सर्वांगीण क्रांतीची दीक्षा घेऊन जगांतील सर्व राष्ट्रांत वावरत आहेत. म. गांधींना समाजवादाचें ध्येय मान्य असलें तरी त्यांचीं साधनें व मार्ग बोल्शेव्हिक किंवा कम्युनिस्ट पक्षाच्या साधनांहून व मार्गांहून भिन्न आहेत. सत्याग्रह हें त्यांचें साधन आहे, आणि समाजाच्या बाह्यांगीण क्रांतीबरोबर अंतरंगक्रांति झाली पाहिजे, किंबहुना अंतरंगक्रांति प्रथम घडवून आणून त्या अंतरंगक्रांतीचा बाह्य आविष्कार बाह्यांगक्रांतीच्या रूपानें प्रकट व्हावा अशी त्यांची दृष्टि आहे. या सत्याग्रही दृष्टीनें नवें जग व नवा मानव निर्माण करणें हें गांधीजींच्या सर्व चरित्राचें रहस्य व अभिप्रेत फल होतें व आहे, असें म्हटल्यास तें चूक होणार नाहीं.

नराचा नारायण

म. गांधींच्या चरित्रापासून सामान्य मनुष्याला घेतां येण्याजोगा आणखी असा एक फार महत्त्वाचा बोध आहे कीं, वयाच्या

पंचविसाव्या वर्षापर्यंत त्यांना कोणींही पाहिलें असतें, तर त्यांच्या अंगीं कांहीं अलौकिक गुण किंवा असामान्य विभूतिमत्त्व असल्याचें सहसा कोणाच्याही प्रत्ययास आलें नसतें. एका अगदीं छोट्या संस्थानांतील दिवाणाच्या कुटुंबांत त्यांचा जन्म झाला. शरीरयष्टि सामान्यतः दुर्बलच. बुद्धीचें तेजही त्यांच्या सर्व शिक्षणक्रमांत फारसें चमकल्याचें कोठें आढळत नाहीं. प्रवेशपरीक्षा झाल्यानंतर, हिंदी विद्यापीठांत उच्च शिक्षणक्रम न घेतांच ते विलायतेस जाऊन बॅरिस्टर होऊन आले. स्वभाव सामान्यतः भिडस्त, किंबहुना लाजाळू असल्यामुळें वक्तृत्व असें मुळींच नव्हतें. एकंदर समाजांत मिसळून, व्यवहारज्ञान करून घेण्याकडे मूळच्या संकोचो व भीरु वृत्तीमुळें फारशी प्रवृत्ति नव्हती. अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचन करण्याचा फारसा नादही नाहीं. मनाची वृत्ति मूळची धीट नव्हे तर उलट भित्रीच वैराग्यही त्यांचा उपजत गुण नसून स्वभावप्रवृत्ति सामान्यतः विषयासक्तच. असें असून या सामान्य प्रतीच्या बॅरिस्टरानें असामान्य विभूतिमत्त्व कसें संपादन केलें, आणि अलौकिक कर्तृत्व करून आद्वतीय अवतारी पुरुषांत आपली गणना कशी करून घेतली हा एक खरोखर अद्भुत चमत्कारच वाटतो. या अद्भुत चमत्काराचें दृश्य पाहून नरानें करणी केली असतां त्याचा नारायण बनूं शकतो हें वचन प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेलें आहे अशी खात्री पटते. म. गांधींच्या अंगीं जी उपजत गुणसंपत्ति होती तो इतकी अल्प दिसते कीं, तेवढ्या भांडवलावर त्यांनीं संपादन केलेलें वैभव संपादन करणें केवळ अशक्य असेंच वाटतें; पण त्यांची बुद्धि सामान्य असली, त्यांचा स्वभाव सामान्य मनुष्यासारखा भीरु व विषयासक्त असला, तरी त्यांची सत्यनिष्ठा ही प्रथमपासूनच काहींशी असामान्य असल्याचें त्यांच्या बाळपणातील कांहीं अनुभवांवरून व घटनांवरून आपणांस दिसून येतें. त्यानीं आजच्या जगांत जी नवी सत्याग्रहनिष्ठा निर्माण करण्याचा आमरण प्रयत्न केला, त्या सत्याग्रहनिष्ठेस अधारभूत असें सत्यासंबंधींचें त्यांचें प्रेम खरोखरच असामान्य होतें. आपलें सर्व जीवन सत्यमय करणें हाच ते मोक्षप्राप्ति याचा अर्थ करीत असत; पण हा सिद्धांत बौद्धिक

दृष्टीनें आकलन होण्यापूर्वी फारच लहानपणापासून त्यांची सत्यनिष्ठा अत्यंत प्रखर असल्याचें दिसून येतें. अगदीं बालपणीं पाहिलेल्या हरिश्चंद्र नाटकाचा आपल्या मनावर फारच प्रभाव झाला आणि हरिश्चंद्रासारखें सत्यव्रत पाळण्यासाठीं आपण वाटले तो त्याग करावा अशी वृत्ति आपल्या अंतःकरणांत जागृत झाल्याचें ते आत्मकथेंत निवेदन करतात. मातृभक्त व पितृभक्त श्रावण याची कथाही ऐकून व त्यांचीं कांहीं चित्रें पाहून आपणांस विशेष स्फूर्ति झाली असेंही ते सांगतात. अगदीं बालपणापासून श्रावण आणि हरिश्चंद्र यांचे आदर्श त्यांच्या डोळ्यांपुढें उभे होते. आपली कांहीं प्रसंगीं पापवृत्ति जागृत झाली असतां, तिच्यापासून आपण कसे बचावलों अथवा मुक्त झालों याच्या ज्या हकीगती त्यांनीं लिहून ठेवल्या आहेत त्यांतही आपल्या पापप्रवृत्ति झांकण्यासाठीं आपणांस मातापित्यांशीं असत्य भाषण करावें लागतें, यामुळेंच त्यांना अत्यंत हृदयवेदना हाऊं लागल्या, व सत्यनिष्ठेमुळेंच आपण त्यापासून मुक्त झालों असें ते लिहितात. अगदीं लहानपणीं असत्य बोलण्याची अथवा गुरुजनांची वंचना करण्याची इतकी चीड फारच थोड्या मुलांत दिसून येते. विलायतेस जाण्यापूर्वी, आपण मद्यमांसास स्पर्श करणार नाहीं असें वचन त्यांनीं आपल्या मातुःश्रीस दिलें होतें. त्या वेळीं मांसाहार न करतां इंग्लंडांत दोनतीन वर्षें काढणें हें फार कष्टाचें, लोकनिंदेचें किंबहुना उपहासाचें काम होतें. आईला दिलेल्या या वचनाचा इतक्या कांटेकोरपणानें प्रतिपाळ करण्याची गरज नाहीं अशा प्रकारचा उपदेश ऐकून मोह पडल्याचीं अनेक उदाहरणें त्यांनीं दिलीं आहेत. पण ते मातुःश्रीस दिलेल्या शब्दापासून रतिभरही ढळले नाहींत. त्यांच्या अंगीं सत्यव्रत पाळण्याची ही जी कठोर वृत्ति व निष्ठा दिसून येते, त्यांतच त्यांच्या भावी असामान्य विभूतिमत्त्वाचें, अलौकिक पराक्रमाचें आणि महात्मापदप्राप्तीचें बीज होतें. या सत्यनिष्ठेच्या एका आधारावर त्यांनीं आपली शीलोन्नति इतक्या पराकोटीला नेऊन पोंचविली कीं, त्यांची आतां एका

धर्मसंस्थापक अवतारी पुरुषांत लोक गणना करूं लागले आहेत. त्यांच्या अनेक मतांसंबंधीं त्यांचे प्रतिपक्षीच काय, पण खुद्द त्यांचे अनुयायीही आपली मतभिन्नता उघडपणें प्रकट करितात. पण या त्यांच्या सत्यनिष्ठेसंबंधीं त्यांचे कट्टे प्रतिस्पर्धीही शंका प्रदर्शित करूं शकत नाहींत. ज्यांनीं ज्यांनीं त्यांच्या प्रामाणिकपणासंबंधीं यत्किंचितही शंका प्रदर्शित केली, त्या सर्वांना अखेरीस आपले आरोप मागें घ्यावे लागले असें म्हटलें तर त्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. महात्मा गांधींच्याइतका सत्यनिष्ठ पुरुष आजपर्यंत झालेला नाहीं. ज्या ज्या वेळीं आपल्या अथवा आपल्या अनुयायांच्या चुका झाल्या असें त्यांना दिसून आलें, त्या त्या वेळीं त्यांनीं उघडपणें माफी मागून त्याबद्दल प्रायश्चित्त घेतलें, आणि ही सर्व सत्यनिष्ठा, ज्या नेत्यानें पन्नास वर्षें राजकारण लढविलें, आणि तेंही मुत्सद्दीपणांत सर्व जगांत ज्यांनीं प्रथम दर्जाची कीर्ति संपादन केली त्या ब्रिटिश मुत्सद्यांविरुद्ध झगडण्याचें, अशा या नेत्यानें पाळली आहे हें लक्षांत घेतल्यास गांधीजींना युगपुरुष असें कां म्हणतात त्याचा उलगडा होऊं शकेल. हिंदी जनतेच्यावतीनें ब्रिटिश मुत्सद्यांशीं अनेक प्रसंगीं लढे देऊन, तितक्याच वेळां शिष्टाई करण्याचाही मान त्यांना मिळाला होता, पण ते लढा करीत असोत किंवा शिष्टाई करीत असोत, त्यांच्या बुद्धीवर प्रतिपक्षानें आपल्या बुद्धीनें मात केली असें केव्हांच म्हणतां येत नाहीं, आणि हें सर्व मुत्सद्दीपण आपल्या बुद्धिचातुर्यानें लढवीत असतां त्यांनीं जाणूनबुजून सत्याचा अपलाप केला किंवा दुसऱ्याची प्रतारणा केली असेंही कोणास म्हणतां येणार नाहीं. मोठमोठ्या नाणावलेल्या ब्रिटिश मुत्सद्यांशीं त्यांनीं आपल्या एकट्याच्या बुद्धीच्या जोरावर राष्ट्राच्यावतीनें अनेकवार शिष्टाई केली. ही शिष्टाई चालू असतां भ्रामक आश्वासनें देऊन त्यांना मोह पाडण्याचे अथवा आसुरी दडपशाही करण्याची दहशत देऊन त्यांना तत्त्वभ्रष्ट करण्याचे अनेक प्रयत्न झाले, पण कोणत्याही मोहाला अथवा भीतीला वश न होण्याची जी त्याची सत्यनिष्ठा, धीरवृत्ति, तिच्या आधारें ते अखेरपर्यंत तत्त्वनिष्ठच राहिले, आणि आपण केलेल्या

राजकारणापासून जेवढें मूर्तयश आपल्या राष्ट्राच्या पदरांत पडणें शक्य होतें तेवढें प्रत्यक्ष पदरांत पाडून घेण्याची व्यवहारदक्षताही त्यांनीं प्रकट केली. महात्मा गांधींच्या या असामान्य यशस्वी चरित्राचें हें महत्त्व लक्षांत घेतलें, आणि त्यांच्या अंगीं उपजत गुणसंपत्ति किती अल्प होती तिचा विचार केला म्हणजे कोणाही सामान्य मनुष्याच्या अंतःकरणांत वसत असणाऱ्या असामान्य आत्मप्रेरणेला थोडी तरी स्फूर्ति मिळाल्यावाचून राहणें शक्य नाहीं. गांधीजींच्या चरित्राचें खरें माहात्म्य यांतच आहे. सामान्यांत वसत असणारी असामान्य शक्ति त्यांनीं प्रकट करून दाखविली आणि अलौकिकता संपादन केली. नराचा नारायण बनूं शकतो हें त्यांनीं प्रत्यक्ष प्रयोगानें आजच्या जगाला दाखवून दिलें. यापासून जो बोध घ्यावयास हवा तो जर आम्हीं घेतला नाहीं तर तो दोष कोणाचा ?

: : २ : :

जन्म, बालपण आणि शिक्षण

महात्मा गांधींचा जन्म काठेवाडांतील पोरबंदर या गांवीं त्या संस्थानचे दिवाण करमचंद गांधी यांच्या पोटीं इसवी सन १८६९ च्या ऑक्टोबर महिन्यांत दोन तारखेस झाला. विक्रमसंवत् १९२५ च्या भाद्रपद वद्य द्वादशीचा हा दिवस होता. गांधी-कुटुंब हें गुजरातेंतील बनिया जातीचें म्हणजे वर्णानें वैश्य होय. महात्मा गांधी हे वैश्य वर्णांत जन्मास आले असले तरी त्यांचे आनुवंशिक आणि बालपणांतील संस्कार, वैश्य वृत्तीचे होते असें मात्र म्हणतां येणार नाहीं. त्यांचे वडील करमचंद यांचा सर्व जन्म काठेवाडांतील संस्थानांत राजकीय नोकरी करण्यांत गेला. प्रथम कांहीं काळ पोरबंदर संस्थानांत त्यांनीं कारभाऱ्याचें काम केलें. त्यानंतर कांहीं काल ते राजस्थानिक कोर्टाचे सभासद होते. नंतर राजकोटचे व वांकानेरचे दिवाण म्हणून त्यांनीं काम केलें आणि ते मेले त्या समयीं राजकोटच्या दिवाणगिरीबद्दल त्यांना पेन्शन मिळत असे. करमचंदांचे वडील म्हणजे म. गांधींचे आजे हेही पोरबंदर व जुनागड या संस्थानांत दिवाणगिरीच्या कामावर होते. अशा प्रकारें म. गांधींच्या पूर्वीच्या दोन पिढ्या संस्थानी राजकारणांत कारभारीपण किंवा दिवाणगिरी करण्यांत गेलेल्या होत्या. अशा कुटुंबांत जन्मास आलेल्या मुलावर बालपणीं वैश्य वृत्तीचे संस्कार होण्याचा मुळींच संभव नाहीं. जे संस्कार झाले असतील ते राजकारणाचे किंवा राजदरबारी मुत्सद्देगिरीचे झाले

असण्याचाच संभव आहे. त्यांच्या कुटुंबांतील कोणाही व्यक्तीच्या मनांत म. गांधींनीं म्हणजे आपल्या कुलांत जन्मलेल्या मोहनदासानें व्यापार करावा ही कल्पना केव्हांही आलेली दिसत नाहीं. मुलानें इंग्रजी शिकून आजोबांप्रमाणें किंवा वडिलांप्रमाणें एखाद्या संस्थानांत व विशेषतः राजकोटास दिवाण बनावें अशीच तिची महत्त्वाकांक्षा होती. मॅट्रिक्युलेशन झाल्यानंतर त्यांना बॅरिस्टरीचें शिक्षण देण्यासाठीं विलायतेस पाठविलें. या वेळींही त्यांचे वडील हयात नव्हते, तरी बॅरिस्टर होऊन आल्यानंतर आपल्या मुलास एखादें दिवाणपद मिळूं शकेल अशी त्यांच्या आप्तेष्टांची आकांक्षा होती. डॉक्टरीचें किंवा इंजिनीयरचें शिक्षण न घेतां, कायद्याचें शिक्षण घेण्यांतही त्यांचा हा उद्देश होता. स्वतः मोहनदासांचीही त्या वेळीं तशी आकांक्षा होती. सारांश, बालपण, कौटुंबिक वातावरण, दोन पिढ्यांचे आनुवंशिक संस्कार आणि बालपणची किंवा विद्यार्थिदशेतील भावी आयुष्यक्रम-संबंधींची कल्पना—या सर्वांचा विचार केला तरी त्यांत कोठेंही वैश्य वृत्तीच्या संस्काराचें बीज आपणांस दिसून येणार नाहीं. केवळ तें कुटुंब वैश्य वर्णाचें होतें एवढ्यावरून त्यांच्यासंबंधीं बोलतांना किंवा लिहितांना कांहीं लोक बनिया वृत्तीचा उल्लेख करतात. पण त्यांत विशेष कांहीं रहस्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं. नानासाहेब पेशवे अथवा राघोबादादा यांचा जन्म ब्राह्मण कुलांत झाला होता किंवा बाजीराव हा वर्णानें ब्राह्मण होता व पेशव्यांचें आडनांव भट होतें, हें म्हणण्यांत जितकें स्वारस्य असेल, त्याहून अधिक स्वारस्य म. गांधी हे वर्णानें वैश्य होते असें म्हणण्यांत नाहीं हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. त्यांचे कौटुंबिक व बालपणांतील संस्कार दरबारी राजकारणांत वावरलेल्या मुत्सद्यांचे होते हें म्हणणें वस्तुस्थितीस धरून असून, त्यांच्या भावी आयुष्यांतही त्यांनीं जो सार्वजनिक व्यवहार केला त्यांत त्यांची मुत्सद्दीपणाची वृत्ति भरपूर दिसून येते असें आम्हांस वाटतें.

गांधीजींचे वडील व आजोबा हे दोघेही करारी, प्रामाणिक व राजनिष्ठ अधिकारी म्हणून प्रसिद्ध होते. आजे उत्तमचंद हे "ओता गांधी" व वडील करमचंद (कर्मचंद) हे "कबा गांधी" या नांवांनीं

ओळखिले जात. आपल्या आजोबांच्या अंगच्या राजनिष्ठेसंबंधींची एक आख्यायिका म. गांधींनीं सांगितली आहे तीवरूनही त्यांच्या अंगच्या प्रामाणिक व राजनिष्ठवृत्तीचा आणि करारीपणाचा पुरावा मिळतो. ओता गांधी हे प्रथम पोरबंदर संस्थानांत दिवाण होते, पण पुढें कांहीं राजकीय भानगडींमुळें त्यांनीं तेथील नोकरी सोडून जुनागडची दिवाणगिरी पतकरिली. तरीही त्यांच्या अंगीं पोरबंदरच्या राण्यासंबंधींची स्वामिनिष्ठा इतकी जागृत होती कीं, ते जुनागडच्या नबाबांना उजव्या हातानें मुजरा न करतां डाव्याच हातानें मुजरा करीत असत. त्याचें कारण सांगतांना, "माझा उजवा हात पोरबंदरला वाहिलेला आहे" असें ते म्हणत. वडील कबा गांधी हेही राजनिष्ठ अधिकारी व चतुर मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध असल्याचें ते सांगतात. लांचलुचपतीस ते कधींही स्पर्श करीत नसत, न्यायदानांत निःपक्षपाती असत आणि लोकांचीं मनें संतुष्ट ठेवून राज्यकारभार करीत असत. "कुटुंबप्रेमी, सत्यप्रिय, धीट व रागीट पण उदार" अशा शब्दांनीं गांधीजींनीं आपल्या वडिलांचें वर्णन केलें आहे. एकदां एका इंग्रज अधिकाऱ्यानें राजकोटच्या राजासंबंधीं अवहेलनेचे अपमानकारक शब्द योजिले. तेव्हां कबा गांधींनीं त्याचा तीव्र शब्दांत निषेध केला. यावरून त्या इंग्रज अधिकाऱ्यानें त्यांना तेथल्या तेथें अटक केली व आपली माफी मागण्यास सांगितलें. कबा गांधींनीं बाणेदारपणानें व धिटाईनें माफी मागण्याचें नाकारिलें. नंतर थोड्या वेळानें साहेबमजकुरांनीं शांत होऊन माघार घेतली व कबा गांधींना सोडून दिलें. अखेरपर्यंत ते राजाला व लोकांना प्रिय असे अधिकारी होते असें गांधीजी वर्णितात. त्यांच्या अंगीं विषयासक्ति थोडी अधिक असावी असें गांधीजींना वाटतें. कारण त्यांनीं एकामागून एक असे चार विवाह केले होते व शेवटचा विवाह वयाच्या चाळिसाव्या वर्षानंतरचा होता. पहिल्या दोन पत्न्यांपासून त्यांना दोन मुली झाल्या. शेवटच्या पत्नी पुतळीबाई याच म. गांधींच्या मातुःश्री होत. त्यांना एक मुलगी व तीन मुलगे झाले. त्यांपैकीं मोहनदास सर्वांत लहान व शेवटचें अपत्य. मोहनदास सोळा वर्षांचे असतांनाच त्यांचे वडील

वारले. (इ. स. १८८५.) त्यापूर्वी अडीच-तीन वर्षे ते आजारी असून त्यांनीं पेन्शन घेतलें होतें.

वैश्य वर्णाच्या गुणांत जर संग्रहवृत्तीचा अंतर्भाव होत असेल, तर कबा गांधींनीं बरेच पैसे मिळविलेले असले तरी मरणसमयीं त्यांनीं आपल्या मुलांबाळांसाठीं किंवा कुटुंबासाठीं फारशी संपत्ति ठेवलेली नव्हती. हा त्यांच्या औदार्याचा व दानधर्म करण्याच्या प्रवृत्तीचाच परिणाम होय. त्यांचें पुस्तकी शिक्षण अगदींच थोडें होतें, पण व्यवहारज्ञान मोठें होतें. त्यांची प्रकृति धर्मशील होती. कथा-पुराणांचा त्यांना नाद होता. ते वैष्णव संप्रदायाचे होते व त्यांच्या अखेरच्या पत्नी पुतळीबाई यांचें माहेर जैन संप्रदायी होतें. हिंदु धर्मांतील गुजराती वैष्णव संप्रदाय किंवा भागवत संप्रदाय हा भूतदया, समतावृत्ति आणि सहिष्णुता यांबद्दल प्रसिद्ध असून जैन धर्मात तर अहिंसावृत्तीचा परमोच्चबिंदु गांठण्याचा आदर्श पुढें ठेविलेला असतो. गांधीजींचीं मातापितरें भक्तिमान्, श्रद्धाशील व धार्मिक वृत्तीचीं होतीं. व ही त्यांची वृत्ति म. गांधींच्या अंगीं पूर्णत्वानें उतरली असें म्हणण्यास हरकत नाहीं. वडिलांच्यापेक्षां मातुःश्री व्रतें-उद्यापनें व उपासतापास करण्यात साहजिकच अधिक दक्ष असत. त्या एक साध्वी स्त्री होत्या असें गांधीजी सांगतात. 'पितृभक्त श्रावण' आणि 'हरिश्चंद्र' या दोन कथांनीं गांधीजींचें बालमन विशेष आकर्षित झालें होतें. यांचें कारण त्यांच्या अंगीं गुरुभक्ति व सत्यनिष्ठा हे गुण उपजतच विशेष प्रकर्षानें आलेले होते हें होय. वडिलांच्यापेक्षां मातेवर त्यांचें साहजिकच अधिक प्रेम होतें आणि बालपणांतील व प्रौढ अवस्थेतील मोहापासून व व पापवृत्तीपासून त्यांचा बचाव मातृभक्तीमुळेंच व गुरुजनांसंबंधींच्या आदरामुळेंच झाला, हें मागें एकदां उल्लेखिलेंच आहे. पण त्यांना मातृसुखही पित्याच्या निधनानंतर फार काळ लाभलें नाहीं. वयाच्या अठराव्या वर्षी (१८८८ सालीं) ते बॅरिस्टर होण्यासाठीं इंग्लंडास गेले व १८९१ सालीं परत आले. ते येथें येऊन पोहोंचण्यापूर्वी थोडेच दिवस त्यांची माता त्यांना सोडून गेली होती. ही वार्ता त्यांना येथें पोहोंचल्यावर कळविण्यांत आली. या वेळीं त्यांचें वय एकवीस वर्षांचेंच

होतें. विवाह हाऊन एक अपत्य झालें होतें व शिक्षणक्रम संपला होता; तथापि संसारांत प्रवेश करून स्वतंत्र कर्तृत्वास प्रारंभ व्हावयाचा होता. यापूर्वीच मातापितरांचा कायमचा वियोग त्यांना झाला. त्यांची धर्मशील भक्तवृत्ति एवढीच आनुवांशिक संपत्ति मोहनदासांना लाभली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

दुय्यम व उच्च शिक्षण

मोहनदास गांधी यांचा जन्म इ. स. १८६९ च्या २ ऑक्टोबरला पोरबंदर येथें झाला हें मागें दिलेंच आहे. इ. स. १८७६ सालीं म्हणजे मोहनदास सात वर्षांचे असतांना करमदास गांधी हे राजकोटला येऊन राहिले आणि तेथेंच त्यांच्या मुलाचें मॉट्रिक्युलेशनपर्यंतचें म्हणजे प्राथमिक व दुय्यम शिक्षण झालें. १८८१ सालीं वयाच्या बाराव्या वर्षी मोहनदासांचें नांव तेथील हायस्कुलांत दाखल झालें व १८८३ सालीं कस्तुरबा गांधी यांच्याशीं त्यांचा विवाह झाला. १८८७ सालीं वयाच्या अठराव्या वर्षी ते मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण झाले. नंतर सहा एक महिने भावनगरच्या सामळदास कॉलेजांत ते होते, पण त्याच वर्षी (१८८८ सालीं) त्यांनीं त्या कॉलेजला रामराम ठोकला आणि बॅरिस्टर होण्यासाठीं ४ सप्टेंबरला मुंबई बंदरांतून इंग्लंडला प्रयाण केलें. १८९१ जूनच्या १० तारखेस त्यांना बॅरिस्टरची पदवी मिळाली व १२ जूनला ते हिंदुस्थानास येण्यासाठीं इंग्लंडहून परत फिरले. तात्पर्य, त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण राजकोट येथें झालें आणि त्यांचें उच्च शिक्षण इंग्लंडांत झालें. मुंबईहून इंग्लंडला गेले तेव्हां त्यांना एकोणीस वर्षें पुरीं होऊन विसावें वर्ष लागलें होतें आणि परत आले तेव्हां बाविसावें वर्ष संपत आलें होतें. वीस, एकवीस व बावीस अशीं वयाचीं तीन वर्षें त्यांचीं इंग्लंडांत गेलीं. या काळांत त्यांनीं लंडन विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिली आणि बॅरिस्टरीचा अभ्यासक्रम पुरा करून पदवी घेतली.

विद्याभ्यास या दृष्टीनें मोहनदासांची गणना सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यांतच होत होती. अगदीं मंद नाहीं व विशेष तीव्र नाहीं

अशी त्यांची बुद्धि त्या वेळीं होती. खेळ व व्यायाम इकडे विशेष लक्ष नव्हतें. फक्त फिरण्याचा व्यायाम ते घेत असत. एकंदर समाजांत मिसळणें किंवा फार मोठा मित्रपरिवार जमविणें इकडे त्यांचें लक्ष नव्हतें. भिडस्त, लाजाळू व भित्रा आणि स्वाभिमानी स्वभाव, आपण दिवाणाचे पुत्र आहों ही जाणीव आणि दरबारी मंडळींत येणेंजाणें, यामुळेंही त्यांचा मित्रपरिवार फारसा वाढला नव्हता. शिवाय घरच्या मंडळींवर व विशेषतः आईवडिलांवर विशेष प्रेम यामुळेंही घर सोडून बाहेर जाण्याकडे फारशी प्रवृत्ति नव्हती. स्वतःच शाळेंत असतांना विशेष निकटचे असे दोनच मित्र लाभले होते व त्यांपैकीं दुसऱ्या मित्राशीं दोस्ती वाढत गेली तशी पहिल्यानें दोस्ती सोडली असें ते लिहितात. हा दुसरा मित्र छंदीफंदी व दुर्व्यसनी होता व त्याची संगत धरूं नये असा इषारा आपणास मिळाला होता तरीही आपण त्याला सुधारावें या बुद्धीनें त्याची संगत सोडली नाहीं. पुढें प्रत्यक्ष प्रकार उलट होऊन त्याला सुधारण्याऐवजीं आपणच बिघडूं लागलों असा गांधीजींनीं आपला अनुभव लिहून ठेविला आहे.

सुमारें पंधरासोळा वर्षांचें वय असतांना मोहनदास हे या मित्राच्या संगतीनें चोरून मांसाहार करूं लागले. हा मांसाहार करण्याचें आपण कां व कसें कबूल केलें यासंबंधीं मोठी मजेदार हकीगत गांधीजींनीं आत्मचरित्रांत दिली आहे. १८८५-८६ चा हा काळ होता. या वेळीं देशांत राष्ट्रीय सभा नुकतीच स्थापन झाली होती. एकंदर सुशिक्षित गणलेल्या इंग्रजी शिकलेल्या वर्गांत सुधारक पक्ष आणि सामाजिक व धार्मिक सुधारणा यांसंबंधीं बरीच खळबळ चालू होती. कांहीं लोक समाजसुधारणेच्या नांवानें मद्यपान व मांसाहार यांचाही प्रचार करीत असत. ब्रिटिश लोक आपल्यावर राज्य करीत आहेत व ते मद्यमांस निषिद्ध मानीत नाहींत, तसें आपणही मानूं नये असें कांहींचें मत होतें, तर कांहीं लोक, आपले हिंदु लोक मांसाहार करूं लागल्यावांचून बळकट होणार नाहींत, असेंही उघडपणें प्रचारीत. याचीच पोरकट आवृत्ति म्हणजे ज्याला देशभक्त व्हावयाचें असेल त्यानें मांसाहार करूं लागावें हें मत होतें. मोहनदासांच्या विद्यार्थि

मित्रानें हें मत त्यांच्या मनावर बिंबवण्यास सुरवात करून, चोरून मांसाहार करण्याचा नाद त्यांना लाविला. ही गोष्ट चोरून करावी लागे आणि ती झांकण्यासाठीं आईला कांहीं खोट्या सबबी सांगून रात्रीचें जेवण टाळावें लागे. आईशीं अशी प्रतारणा करण्याचा पश्चात्ताप मोहनदासांस लवकरच होऊं लागला व त्यांनीं ती संवय सोडून दिली.

याच वयांत त्यांना आणखी एक चोरटें व्यसन लागलें होतें. तें म्हणजे बिड्या ओढण्याचें. त्यासाठीं पैसे लागूं लागले तेव्हां घरांतील नोकरांचे पैसे चोरण्याची खोड लागली. तेवढ्यानेंही काम भागेना तेव्हां ते व त्यांचे मधले बंधु या दोघांनीं आपल्या हातांतील सोन्याचें कडें तोडून, त्यांतील एक तोळाभर सोनें विकून, त्या व्यसनापायीं झालेलें कर्ज निवारण केलें! पण ही गोष्ट त्यांच्या मनास फार लागली व ती आपल्या वडिलांस कळवून माफी मागावी, ते देतील ती शिक्षा भोगण्यास तयार व्हावें, असें मोहनदासांनीं ठरविलें. पण वडिलांचा स्वभाव उग्र व रागीट असल्यानें त्यांना तोंडीं सांगण्याचें धैर्य होईना, तेव्हां हा सर्व प्रकार मोहनदासांनीं पत्रांत लिहून तें पत्र स्वतः वडिलांच्या हातीं नेऊन दिलें. वडील आपणास रागें भरतील व खरपूस मार देतील अशी त्यांना भीति होती, पण तें पत्र वाचून वडील कांहीं बोलले नाहींत, त्यांनीं तें फाडून टाकलें आणि दुःखानें विव्हळ होऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचीं दोन टिपें पडलीं! आपण खरें बोलून पश्चात्तापयुक्त मनानें क्षमा मागितली आणि प्रेमळ पित्यानें आपला क्रोध आवरून धरिला. क्रोधाचें परिवर्तन दुःखांत व करुणेंत झालें! मोहनदासांच्या बालमनावर या दुःखाचा—पित्यास आपल्यामुळें झालेल्या दुःखाचा—आघात तीव्र झाला!

या प्रसंगाचें म. गांधींनीं केलेलें वर्णन त्यांच्याच शब्दांत वाचलें पाहिजे: "त्यांनीं चिठ्ठी वाचली. डोळ्यांतून मोत्यांचे दोन बिंदु गळले. चिठ्ठी भिजली. त्यांनीं क्षणभर डोळे मिटून धरले. चिठ्ठी फाडून टाकली आणि वाचण्यासाठीं उठून बसले होते ते फिरून बिछान्यावर आडवे

झाले. ज्याला अनुभव असेल तोच हें प्रेम समजूं शकेल. 'रामबाण ज्याला लागला असेल, त्यालाच तो आघात समजूं शकेल. (रामबाण वाग्या रे होय ते जाणे.') माझ्या दृष्टीनें हा अहिंसेचा वस्तुपाठ होता. त्या वेळीं मला त्यांत पितृप्रेमापलीकडे अधिक कांहीं दिसलें नाहीं, परंतु आज मी त्याला शुद्ध अहिंसा या रूपानें ओळखूं शकतों. मी पण रडलों. वडिलांचें दुःख समजूं शकलों. मी चित्रकार असतों तर आजही तें चित्र रेखाटूं शकलों असतों; इतक्या स्पष्टपणें तें आज माझ्या डोळ्यांसमोर उभें आहे."

या वेळीं वडील शेवटच्या आजारांत आजारी होते व अंथरुणाला खिळलेले होते. अशा रुग्णावस्थेतील प्रेमळ वृद्ध पित्याला आपल्या दुर्वर्तनामुळें किती क्लेश झाले असतील याची कल्पना पितृवत्सल मोहनदासांना झाली. गांधीजी पुढें लिहितात :

"अशा तऱ्हेची शांत क्षमा वडिलांच्या स्वभावाविरुद्ध होती. ते संतापतील, बोलतील, कदाचित् डोकेंही आपटून घेतील, असें मला वाटलें होतें. परंतु त्यांनीं इतकी अपार शांति रखली याचें कारण गुन्ह्याची निखालस कबुली हेंच होय असें मला वाटतें. जो मनुष्य अधिकारी मनुष्यापाशीं स्वतःचा गुन्हा खुल्या दिलानें कबूल करतो व पुनः न करण्याची प्रतिज्ञा करतो तो सर्वश्रेष्ठ प्रायश्चित्त घेतो. मला माहीत आहे कीं, माझ्या कबुलीमुळें वडील माझ्याविषयीं निश्चिंत झाले आणि माझ्यावरील त्यांच्या अगाध प्रेमांत भरच पडली."

"मांसाहार, बिडीपान आणि चोरी याप्रमाणें व्यभिचाराचाही एक प्रसंग आपल्या दुर्व्यसनी मित्राच्या संगतीमुळें ओढवला होता. त्यानें एकदां आपणांस एका वेश्येच्या घरीं नेलें होतें. पण आपल्या भिडस्त, भित्र्या व लाजऱ्या स्वभावामुळेंच आपल्या हातून पापकर्म घडलें नाहीं." असें ते लिहितात. अशा प्रकारें मोहनदास दुय्यम शिक्षण घेत असतां सुधारकपणाच्या व देशभक्तीच्या नांवाखालीं दुर्जनसंगतींत सांपडले व वाहवत चालले होते; पण मातापित्यांसंबंधींची भक्ति आणि असत्याचरण करण्याची चीड, कोणताही व्यवहार गुप्तपणें करण्यापासून

अंतःकरणाला होणारी व्यथा, यामुळें त्यांचा पापापासून बचाव झाला आणि त्यांची सत्प्रवृत्ति जागी झाली.

या सत्प्रवृत्तीची वाढ ते उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडास गेले असतां अधिकाधिक होऊं लागली आणि त्या सत्प्रवृत्तीच्या वाढीस मातृभक्तीचा जो आधार मिळाला होता तो मातेच्या निधनानें तुटून गेल्यानंतर, धर्मनिष्ठा आणि ईशभक्ति यांचा आधार त्यांना या कार्मी मिळूं लागला. इंग्लंडास जाण्यापूर्वी मद्य, मांस आणि परस्त्री यांना स्पर्श न करण्याचें वचन गांधीजींनीं आपल्या मातुःश्रीस दिलें होतें. तें वचन त्यांनीं कांटेकोरपणानें पाळलें. आणि परदेशांत असतांना, या तीन गोष्टींबद्दलचा मोह निर्माण होण्याचे अनेक प्रसंग आले असतां त्या मोहास ते बळी पडले नाहींत. मद्यमांसनिवृत्त अशा प्रकारचें जीवन ब्रिटनमध्यें तीन वर्षें काढीत असतांना त्यांना अनेक मित्रांशीं या विषयासंबंधीं गंभीरपणें चर्चा करण्याचे प्रसंग आले, आणि ही चर्चा करीत असतां त्यांची धर्मजिज्ञासा विशेषत्वानें जागृत झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या देशांत, आपल्या समाजांत व आपल्या घरीं असतांना सतरा-अठरा वर्षांचें वय होण्यापूर्वी जे मोहनदास मांसाहार, चोरी अथवा व्यभिचार, अशा पापांकडे ओढले जात होते, ते विलायतेंत परधर्मीय आणि परदेशीय समाजांत आपल्या आईबापांपासून व कुटुंबापासून दूर असतांना, तारुण्याच्या ऐन उमेदींत वावरत असतां, आपल्या मातेस दिलेल्या वचनाच्या बंधनामुळें सर्व पापप्रवृत्तींपासून मुक्त राहिले. इतकेंच नाही, तर त्यांची धर्मजिज्ञासा जागृत होऊन, ते विलासी राहणी सोडून देऊन, साध्या राहणीचे भक्त बनूं लागले. आपल्या धर्माची सुधारणा करण्यासाठीं ज्यांच्या थोर बुद्धीला मांसाहार करणें योग्य वाटलें होतें, तेच मोहनदास मांसाहार करणाऱ्या ब्रिटिश समाजांत जाऊन राहिल्यानंतर मांसनिवृत्त शाकाहारी संस्थेचे सभासद बनले. आणि ख्रिस्ती धर्माची व आपल्या धर्माची तुलना करावी, आपल्या धर्माचा खोल अभ्यास करावा आणि त्याचें रहस्य समजून घेऊन आपला उद्धार करावा, अशी वृत्ति त्यांच्या अंतःकरणांत बळावूं लागली. आपण परदेशांत येऊन शिक्षण घेत आहोंत आणि परत आपल्या देशीं

गेल्यानंतर आपल्या कुटुंबाची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर येऊन पडणार आहे, या वस्तुस्थितीची जाणीव होऊं लागतांच त्यांनीं आपल्या राहणींत फेरफार करण्यास सुरवात केली. काटकसर आणि मितव्यय यांचा ताबडतोब अवलंब करून आपल्या राहणीचें मान आपल्या परिस्थितीशीं जुळतें करून घेण्याचा निश्चय केला व तो अमलांतही आणला. मोहनदासांच्या वृत्तींतील हा पालट त्यांच्या वाढत्या धर्मजिज्ञासेचें एक बाह्य स्वरूप होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. इंग्लंडांतील शिक्षणक्रम चालू असतां त्यांनीं अनेक धर्ममतांच्या व्यक्तींशीं धर्मचर्चा केली आणि धर्माचें रहस्य आपल्या बुद्धीनें समजून घेण्यास आरंभ केला. भगवद्गीता आणि बुद्धचरित्र या विषयांचा गांधीजींचा अभ्यास प्रथमतः इंग्लंडांत सुरू झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडांत जाईपर्यंत त्यांच्या अंगीं सत्यनिष्ठा आणि मातृभक्ति या दोन रूपानींच ही धर्मबुद्धि वास करीत होती. हळूहळू मातृभक्तीचें रूपांतर ईशभक्तींत झालें आणि सत्यनिष्ठेचें रूपांतर आत्मदर्शनाच्या आणि मानवसेवेच्या स्वरूपांत होऊं लागलें.

धार्मिक संस्कार आणि धर्मजागृति

गांधीजी हे आजच्या जगांत एक क्रांतिकारक धर्मपुरुष म्हणून ओळखले जातात. कांहीं लोक त्यांची तुलना रूसो व कार्ल मार्क्स यांसारख्या क्रांतिकारक वृत्तीच्या द्रष्ट्यांशीं करतात, तर बरेच लोक त्यांची तुलना श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, येशू ख्रिस्त किंवा महंमद पैगंबर, यांसारख्या धर्मपुरुषांशीं करीत असतात. त्यांच्या अंगीं क्रांतिकारक वृत्ति आणि धर्मनिष्ठा यांचा एक अपूर्व संगम झाल्याचें दिसून येतें. विसाव्या शतकांत परमेश्वरभक्ति आणि धर्मनिष्ठ जीवन यांना मानवसंस्कृतींत स्थान उरलेलें नाहीं असें मत सुशिक्षित वर्गांत वायुवेगानें प्रसार पावत असतांना, ज्याच्याकडे मानवसंस्कृतीच्या सर्व भक्तांनीं मानवाचा आदर्श म्हणून पहावें असा हा आदर्श मानव खऱ्या अर्थानें धर्मनिष्ठ पुरुष म्हणून गणला जातो. जे क्रांतिकारक सर्व धर्मसंस्थांना व धर्मभावनांना अतिक्रांतिकारक समजून त्यांचें उन्मूलन करण्यास पुढें

सरसावले आहेत त्यांनाही या असामान्य धर्मपुरुषाची अलौकिक क्रांतिकारक वृत्ति मान्य करावी लागते, आणि खऱ्या धर्मनिष्ठेत कोठें तरी जीवनांत अंतर्बाह्य क्रांति घडवून आणणारी क्रांतिनिष्ठा लपलेली आहे असें गांधीजींच्या चरित्राकडे पाहून त्यांना मान्य करावें लागतें. धर्मनिष्ठा आणि क्रांतिनिष्ठा यांचा अपूर्व संगम ज्यांच्या जीवनांत झालेला दिसतो असा हा धर्मपुरुष स्वतःस केवळ हिंदु धर्माभिमानी एवढें म्हणूनच न थांबतां, मी सनातनी हिंदु आहें असें आग्रहपूर्वक प्रतिपादीत असल्याचेंही दिसून येतें. हीं सर्व विरोधी दृश्यें पाहून मोठ-मोठ्या विचारवंतांचीही मति गुंग होऊन जाते आणि गांधीजींच्या जीवनाचें रहस्य, बुद्धीनें उलगडण्याचा प्रयत्न करणें हाच एक प्रमाद आहे असं समजून हें गूढ कोडें उलगडण्याचे प्रयत्न ते सोडून देतात; पण असें केलें तरी जगामध्यें एवढी मोठी विभूति होऊन जाऊन तिनें एक प्रचंड घडामोड घडवून आणली असतां व सर्वांच्या बुद्धीला एक असामान्य धक्का देऊन जीवनाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मानवाला उपलब्ध करून दिला असतां, त्याच्या जीवनाचें कोडें गूढ आहे म्हणून स्वस्थ बसणें हेंही कोणा बुद्धिवंतास समाधानकारक वाटत नाहीं. अर्थात् आपापल्या बुद्धीप्रमाणें त्यांच्या जीवनग्रंथाची मीमांसा करून तीपासून योग्य तो बोध घेणें हें प्रत्येक सुशिक्षितांचें आद्यकर्तव्य आहे. या दृष्टीनें गांधीजींच्या अंतःकरणांत वास्तव्य करणारी क्रांतिनिष्ठा व धर्मनिष्ठा जन्मापासून निधनापर्यंत कसकशी वाढत गेली व तिच्यावर कोणकोणते संस्कार घडून तिचा आविष्कार कसा होत गेला व अखेरीस तिला कोणचा आकार प्राप्त झाला, हा विचार आपणांस या पुस्तकाच्या अखेरीस शक्य तितका केला पाहिजे.

गांधीकुटुंब हें एकंदरींत धर्मशीलवृत्तीचेंच कुटुंब होतें. वडील वैष्णव सांप्रदायाचे व आईचें माहेर जैन सांप्रदायाचें असल्यानें सामान्यतः अहिंसावृत्ति, समत्वबुद्धि आणि सहिष्णुता या गुणांच्या वाढीस अनुकूल असें कौटुंबिक वातावरण होतें. देवदर्शन, कथा-कीर्तन, पुराणश्रवण आणि व्रतवैकल्यें हीं धर्मसंस्काराचीं साधनें गणलीं जात असलीं तरी वैदिक किंवा शास्त्री-पंडित ब्राह्मण घराण्यांत ज्या प्रकारची

वर्णाहंकाराची वृत्ति पोसली जाते तशी वृत्ति पोसली जाणारें वातावरण तेथें नव्हतें. भागवत धर्मांतील भक्तिभावाची भोळी श्रद्धा आणि प्रेमळ वृत्ति त्या कुटुंबांत होती. मातुःश्रीप्रमाणें गांधीजींच्या वडिलांसही धर्मजिज्ञासा होती व त्यांच्याकडे हिंदु, जैन, पारशी, मुसलमान या सर्व धर्मांतील विद्वान् लोक भेटीस येत व आपापल्या धर्मांसंबंधीं माहिती सांगून चर्चा करीत. ही धर्मचर्चा ऐकत बसण्यांत मोहनदासांस गोडी वाटे आणि या निरनिराळ्या धर्मांतील तत्त्वें सारखींच वंद्य व पूज्य आहेत अशी भावना ती चर्चा ऐकतांना मनांत जागृत होई. नाहीं म्हणावयास हिंदु, जैन, पार्शी, मुसलमान या धर्मांप्रमाणें मात्र ख्रिस्ती धर्माचे कोणी पाहुणे आपल्या घरीं येत नसत आणि ख्रिती धर्म हा परकीय राज्यकर्त्यांचा धर्म व त्याचे पाद्री लोक आपल्या धर्माची हेटाळणी करतात हें पाहून आपणांस ख्रिस्ती धर्मांसंबंधीं एक प्रकारचा अनादर या वेळीं वाटत असे असें गांधीजी लिहितात. पण या वेळीं त्यांना ख्रिस्ती धर्माची माहिती अशी मुळींच नव्हती. पुढें इंग्लंडांत व दक्षिण आफ्रिकेंत त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा चांगलाच अभ्यास केला व आपल्या चारित्र्यावर भगवद्गीतेच्या खालोखाल बायबलचा, विशेषतः त्यांतील गिरिप्रवचनाचा (Sermon on the Mount), परिणाम झालेला आहे असें त्यांनीं लिहिलें आहे. सारांश, सर्व-धर्म-समभावाचें शिक्षण त्यांना मातापित्यांकडूनच बाल्यांतील संस्काररूपानें मिळालें असें म्हणतां येईल.

पूज्य धर्मग्रंथ या दृष्टीनें भगवद्गीता आणि रामायण यांच्याकडे त्यांचें लक्ष लहानपणापासूनच वेधलें गेलें होतें. वडील आजारी असतांना कांहीं दिवस ते पोरबंदरला जाऊन राहिले होते. तेथील देवालयांत बिलेश्वर लाधा या नांवाचे एक पुराणिक वा सत्पुरुष रामायण सांगत असत. त्यांच्या पुराणास आपल्या वडिलांबरोबर मोहनदास जात असत. त्या वेळीं त्यांचें वय तेरा वर्षांचें होतें. या वेळेपासून त्यांना रामायणांतील कथांत फार गोडी वाटूं लागली व पुढें मोठें झाल्यावर तुलसीदासांच्या रामायणाचे ते भक्त बनले. तुलसीदासांचें रामायण हा भक्तिसांप्रदायांतील एक क्रांतिकारक धर्मग्रंथ गणला पाहिजे. महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरीला

जें स्थान आहे, तेंच स्थान मध्य व उत्तर हिंदुस्थानांत तुलसीदासांच्या रामायणाला आहे. गांधीजींचा जन्म पोरबंदरास ज्या घरामध्यें झाला व जेथें त्यांची कुटुंबांतील मंडळी राहत असत त्या घराच्या एका बाजूस रामाचें व दुसऱ्या बाजूस श्रीकृष्णाचें देवालय होतें. या दोनही अवतारी पुरुषांच्या चरित्राचा प्रभाव गांधीजींच्या जीवनावर विलक्षण पडलेला दिसतो. रामनाम हें त्यांचें ईश्वरप्राप्तीचें, आत्मदर्शनाचें अथवा पाप-वृत्तीपासून मुक्त बनण्याचें एक प्रधान साधन त्यांनीं बनविलें होतें आणि भगवद्गीता हीला तर त्यांनीं आपला धर्मकोशच बनविला होता. कोणत्याही शब्दाचा अर्थ अडला तर आपण ज्याप्रमाणें कोशाचा उपयोग करून तो समजून घेतों, तद्वत् कार्याकार्यासंबंधीं किंवा कर्तव्याकर्तव्यासंबंधीं आपणास केव्हांही संदेह उत्पन्न झाला तर त्या संशयाची निवृत्ति करतांना आपण भगवद्गीतेचा उपयोग करतों असें गांधीजी म्हणत असत. अशा प्रकारें रामायण व भगवद्गीता या धर्म-ग्रंथांची महती मनावर ठसण्याचा प्रारंभ बालपणच्या या संस्कारांत आहे असें गांधीजींनींच आत्मकथेंत म्हटलें आहे.

पण या बालवयांतही मातापित्यांकडून जसे धर्मसंस्कार होत होते, त्याचप्रमाणें परंपरागत रूढींतील न्याय-अन्याय यांचा विवेक करण्याची बुद्धिही मोहनदासांच्या अंतःकरणांत जागृत होत होती, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, आपल्या घरीं संडास साफ करणाऱ्या भंग्यास अस्पृश्य मानण्यांत येत होतें हें पाहून आपणास या प्रथाता-बद्दल चीड येत असे असें गांधीजी लिहितात. सर्व धर्मांकडे आदरानें पाहण्याचें शिक्षण बाह्य परिस्थितीच्या संस्कारांपासून मिळत होतें हें खरें असलें तरी सर्व मानवांकडे समदृष्टीनें पाहण्याची वृत्ति मोहनदासांपाशीं मूळचीच प्रबल होती असें या उदाहरणापासून आपल्यास दिसून येईल. केवळ पितृपरंपरागत संस्कारांच्या अधीन असणाऱ्या बालमनांत रूढ सामाजिक आचारांतील अन्यायाची चीड सहसा उत्पन्न होणार नाहीं. जन्मजात उच्चनीच भाव हिंदु संस्कृतींत इतका मुरून गेलेला होता कीं, परंपरागत धर्मासंबंधीं आदर असणाऱ्या मुलाच्या बुद्धीला अस्पृश्यता हें पाप आहे असा विचार सुचणें त्या काळीं जवळजवळ

अशक्य होतें. पण मोहनदासांची बुद्धि धर्माधर्मनिर्णयाच्या बाबतींत प्रथमपासूनच सारग्राही किंवा सूक्ष्मदर्शी असल्याचें आपणांस दिसून येतें. उदाहरणार्थ, या बालवयांतही सर्व जगाचा आधार नीति हा आहे, व सर्व नीतीचा आधार 'सत्य' हा आहे, असें आपणास दुर्ज्ञेय शिक्षण घेत असतांनाच वाटत असल्याचें गांधीजी लिहितात. ईश्वराच्या अस्तित्वासंबंधीं या वेळीं आपणास विशेष निष्ठा वाटत नव्हती, पण नीति व सत्य यांसंबंधीं मात्र आपली निष्ठा अविचल असल्याचें ते सांगतात. पुढें त्यांची ईश्वरावरील श्रद्धा दृढ झाली आणि प्रार्थनेला त्यांच्या जीवनांत आद्यस्थान प्राप्त झालें तरीही आपण नीतीपासून ढळूं नये आणि सत्याला चिकटून राहतांना लोभ, मोह व भीति यांच्यापासून आपलें निवारण व्हावें यासाठींच ते ईश्वराची प्रार्थना करीत असत व त्या कामीं लागणारें धैर्य आपणास ईश्वरापासूनच लाभतें अशी त्यांची दृढ निष्ठा होती. ही आपली निष्ठा, प्रयोग व अनुभव यांवर आधारलेली आहे असें ते म्हणत. ईश्वरासंबंधीं अश्रद्धा बाळगणारे लोक असूं शकतील, पण सत्यावर श्रद्धा नसणारे लोक आढळणार नाहींत, म्हणून ईश्वर हा सत्यस्वरूप आहे असें म्हणण्याऐवजीं "सत्य हाच ईश्वर" असें आपण मानतों असें ते सांगत. तात्पर्य, ईश्वरावरील त्यांची श्रद्धा कांहीं काळ डळमळली असली तरी सत्यावरील व नीतीवरील त्यांची निष्ठा केव्हांच डळमळली नाहीं, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. त्यांच्या सत्याग्रही निष्ठेचें हें बीज असून या सत्यनिष्ठेतच त्यांच्या क्रांतिकारक वृत्तीचें बीज आहे. सत्यावरील श्रद्धा ही अंधश्रद्धा होऊंच शकत नाहीं, कारण सत्य म्हणजेच ज्ञान, विवेक किंवा प्रकाश होय. इतर साधुसंत प्रेमभावनेला किंवा अहिंसावृत्तीला आद्यस्थान देतात आणि गांधीजी सत्यनिष्ठेला आद्यस्थान देऊन अहिंसावृत्ति किंवा प्रेमभावना हीं त्या सत्याचें साधन मानतात. हा सूक्ष्म भेद लक्षांत घेतल्यास गांधीजी हे निष्ठावंत संत असूनही इतर संतांहून अधिक डोळस व क्रांतिकारक कां व कसे बनले याचा उलगडा होऊं शकेल असें आम्हांस वाटतें.

सत्यनिष्ठेला गांधीजींच्या जीवनांत अशा प्रकारें आद्यस्थान दिलेलें असलें तरी त्याची अहिंसावृत्तिही प्रथमपासून तितकीच प्रभावी होती यांत शंका नाहीं. अगदीं लहाणपणीं त्यांच्या मनावर खोल ठसा उमटविणारा असा एक गुजराती श्लोक त्यांनीं दिलेला आहे. त्याचा सारांश पुढीलप्रमाणें आहे :—

"दुसऱ्यानें आपणास पाणी पिण्यास दिल तर त्याचा मोबदला आपण त्यास जेवण घालावें. दुसऱ्यानें आपणापुढें मस्तक नमविलें तर आपण त्यास साष्टांग नमस्कार घालावा. दुसऱ्यानें आपणासाठीं एक पैशाची झींज सोसली तर आपण त्याचा मोबदला म्हणून अनेक मोहरा देऊन त्याचें ऋण फेडावें. दुसऱ्यानें आपला प्राण वांचविला तर आपण त्याचें दुःख निवारण करण्याचे कार्मी आपले प्राण अर्पण करावे. एका उपकाराची फेड दहा उपकार करून करावी, इतकेंच नाहीं, तर जो अपकाराची फेडही उपकार करूनच करतो तो सर्वश्रेष्ठ होय." या श्लोकांतील तत्त्व, हेंच अहिंसावृत्तीचें बीज होय. हें बीज गांधीजींच्या प्रकृतींत मूळपासूनच रुजलेलें असल्यानें ते संत बनले. परंतु सत्यनिष्ठेचें बीज त्याहूनही अधिक खोल व जीवनास आधारभूत असें असल्यामुळें ते क्रांतिकारक बनले. केवळ भक्त हा कित्येक वेळां अंधश्रद्धाशील होण्याचा धोका असतो म्हणूनच ज्ञानी भक्त हा सर्वश्रेष्ठ गणला जातो. सत्याग्रहनिष्ठेंत केवळ भक्तवृत्तीला सर्वश्रेष्ठत्व दिलेलें नसून ज्ञानी भक्त हाच सर्वश्रेष्ठ गणला गेला आहे. यामुळें भक्तिसांप्रदायांतील अंधश्रद्धा जशी नष्ट होते तशीच अविवेकी, संकुचित वृत्तिही टिकूं शकत नाहीं. आपलाच धर्म अथवा आपणास प्रिय असणारी ईश्वराची विभूति हींच सर्वश्रेष्ठ असें मानणारे अविवेकी भक्त असहिष्णु व हिंसक बनूं शकतात, पण सत्यनिष्ठ, विवेकी भक्त हा इतर धर्मांसंबंधीं अथवा इतरांच्या निष्ठेसंबंधीं सहिष्णु वृत्ति धारण करूं शकतो.

गांधीजी इंग्लंडांत गेल्यानंतर ते धर्मासंबंधीं निरनिराळ्या मतांचा व विचारांचा अभ्यास करूं लागले. त्या वेळीं म्हणजे इसवी सन १८९० चे सुमारास इंग्लंडांत सुशिक्षित वर्गांत ईश्वरवाद व निरीश्वरवाद यांसंबंधीं बरीच खळबळ माजून राहिली होती. निरीश्वरवादी पंथाचे धुरीण चार्लस

ब्रॅडलॉ हे असून त्यांची एकंदर सामाजिक व राजकीय मतें उदार होतीं. सर्व मानवजातीसंबंधीं समतेची भावना धारण करून, ते राजकीय व सामाजिक प्रश्नांचा विचार करीत असत. हिंदुस्थानांत नवीनच स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेसंबंधीं त्यांनीं आपुलकी धारण केलेली होती, आणि हिंदी जनतेच्या राजकीय आकांक्षा तृप्त करण्यासाठीं त्यांनीं पार्लमेंटांत एक बिलही आणिलें होतें. यामुळें इंग्लंडांत गेलेल्या हिंदी विद्यार्थ्यांचें मन त्यांच्याकडे ओढलें जाणें अगदीं साहजिक होतें. गांधीजींनीं निरीश्वरवादासंबंधींचें त्यांचें एक व्याख्यान ऐकलें. पण आपल्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं असें ते म्हणतात. चार्लस ब्रॅडलॉ यांच्या अनुयायी म्हणून ॲनि बेझंट या बाई त्या वेळीं इंग्लंडांत प्रसिद्धीस येत होत्या. त्यांनीं नुकताच ब्रॅडलॉ यांचा निरीश्वरवाद सोडून त्या ईश्वरवादी व अध्यात्मवादी बनूं लागल्या होत्या. इंग्लंडांत या अध्यात्मवृत्तींतून थिऑसफिस्ट या नांवाचा एक पंथ अस्तित्वांत येत असून अध्यात्मशास्त्र हें एक शास्त्र असून, त्याची वाढ हिंदु व बौद्ध धर्मांत विशेष झालेली आहे असें त्या प्रतिपादीत. या थिऑसफिस्ट पंथाकडे महात्मा गांधींचें चित्त वेधलें गेलें, त्याचीं कांहीं पुस्तकें वाचून, हिंदु धर्मासंबंधींचा त्यांचा आदर अधिक वाढला. हिंदु धर्म हा केवळ अंधश्रद्धेवर उभारलेला, मागसलेला, धर्म आहे, व तो आधुनिक शास्त्रीय युगांत टिकाव धरूं शकणार नाहीं अशा प्रकारची जी टीका कांहीं ख्रिस्ती–पाद्री लोकांच्या तोंडून त्यांनीं ऐकिली होती ती निराधार आहे, व हिंदु धर्म हा एक फार श्रेष्ठ धर्म आहे अशी त्यांची खात्री झाली.

याच थिऑसफिस्ट पंथाच्या कांहीं मित्रांनीं शिफारस केल्यावरून गांधीजींनीं एडविन ॲर्नोल्ड यानें केलेलें भगवद्गीतेचें इंग्रजी भाषान्तर व बुद्धचरित्र हे ग्रंथ वाचले. हे इंग्रजी ग्रंथ आपणास फारच आवडले आणि त्या वेळेपासून भगवद्गीतेचें बौद्धिकदृष्ट्या अध्ययन करण्याची आपणास प्रेरणा मिळाली असें गांधीजी म्हणतात. कांहीं थिऑसफिस्ट मित्रांच्यासमवेत त्यांनीं भगवद्गीतेचा अभ्यास सुरू केला. भगवद्-गीतेंतील दुसऱ्या अध्यायांतील स्थितप्रज्ञाचीं लक्षणें आणि विशेषतः—

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥

अर्थ : "विषयांचें चिंतन करणाऱ्या मनांत त्यांच्याविषयींची आसक्ति उत्पन्न होते, आसक्तींतून काम, कामांतून क्रोध, क्रोधांतून संमोह, संमोहांतून स्मृतिभ्रंश, स्मृतिभंशांतून बुद्धिनाश आणि बुद्धिनाशांतून विनाश होतो."

हे दोन श्लोक गांधीजींना फारच आवडले. या वेळीं गांधीजी खानपानासंबंधीं व परस्त्रीस्पर्शासंबंधीं आईला दिलेलीं वचनें पाळण्यासाठीं मनोनिग्रह व इंद्रियसंयम यांचा अभ्यास करीत होते. अशा वेळीं विषयांसंबंधींच्या अनासक्तीचें महत्त्व त्यांना विशेष वाटावें हें स्वभाविकच आहे. त्यांचा विवेक आतां जागृत झाला होता आणि वैराग्याचे धडे ते घेत होते. अद्यापि मुमुक्षा पूर्णपणें बाणली नसली तरी आपल्या स्खलनशील व ओढघस्त मनाला आवरून धरण्यासाठीं त्यांना अंतरात्म्याचें सहाय्य हवें असें वाटूं लागलें होतें.

ब्रिटनमध्यें राहून शाकाहाराचें व्रत पाळतांना त्यांना अस्वाद-व्रताचा साहजिकच स्वीकार करावा लागला. मसालेदार व चटकदार पदार्थ न खातां साधे व केवळ उकडलेले पदार्थ खावे लागत. प्रथमतः ते आवडत नसत, पण पुढें पुढें ते पदार्थ आवडूं लागले आणि आपण आपलें वचन पाळीत आहों या अंतःसमाधानामुळें त्यांना गोडीही लागूं लागली असें ते लिहितात. खाद्य पदार्थांची गोडी केवळ जिव्हेवर होणाऱ्या परिणामावर अवलंबून नसून अंतःकरणाच्या प्रसन्नतेवरही अवलंबून असते असा अनुभव आपणांस येऊं लागला असें ते सांगतात.

शाकाहाराचें व्रत पाळीत असतां, केलेल्या प्रतिज्ञेचा, कराराचा किंवा दिलेल्या वचनाचा अर्थ कसा करावा यासंबंधीं एक सूक्ष्म विचार या वेळीं त्यांच्या मनांत उपस्थित झाला. इंग्लंडांत गेल्यावर शाकाहाराच्या

श्रेष्ठतेसंबंधी त्यांनीं अनेक पुस्तकें वाचिलीं व बऱ्याच लोकांशीं चर्चा केली. इंग्लंडांतील लेखक शाकाहारांत अंड्यांचा अंतर्भाव करीत असत, कारण त्यामुळें जिवाला दुःख होत नाहीं असें ते म्हणत. हा युक्तिवाद त्यांस पटला व आपण एकदा-दोनदां अंड्याचे पदार्थ खाल्ले, पण लगेच हा आपला मोह आहे असें त्यांना वाटूं लागलें. आपण मातुःश्रीला जें वचन दिलें त्याचा अर्थ पुस्तकांतील युक्तिवादावरून किंवा आपल्या मतानुसार लावावयाचा नसून मातुःश्री त्या वचनाचा जो अर्थ मानीत असेल त्यावरून त्याचा अर्थ लाविला तरच आपण तिला दिलेलें वचन पाळिलें असें होईल असा त्यांनीं निर्णय दिला व त्या मोहाला ते पुनः बळी पडले नाहींत. या मुक्कामांत आपणास एकदां परस्त्रीसंबंधी मोह उत्पन्न होण्याचा प्रसंग कसा निर्माण झाला होता व अशा कामांत निर्ढावलेल्या आपल्या मित्रानें इषारा देतांच आपण कसे बचावलों याचाही उल्लेख त्यांनीं केला आहे. असा मोह क्षणभरच का होईना आपल्या मनांत उद्भवल्याचा हा जन्मांतील पहिलाच व अखेरचाच प्रसंग होय असेंही ते म्हणतात. यानंतर अशाच एका मित्रानें स्नेहाखातर एका दुर्वर्तनी स्त्रीच्या खोलींत आपणास लोटिलें, पण त्या वेळीं आपलें मन यत्किंचितही विचलित झालें नाहीं असें ते सांगतात. हा त्याच्या आयुष्यांतील तिसरा प्रसंग होता. इंग्लंडातून परत आल्यानंतर दक्षिण आफ्रिकेस जातांना झांजीबार बंदरांत उतरलों असतां बोटीच्या कप्तानाबरोबर मौजेनें सहलीस गेलों असतां तो घडला. यासारखा अगदीं पहिला प्रसंग राजकोटास दुर्व्यसनी मित्रानें घडविला. दुसरा युरोपांत बॅरिस्टरीसाठीं विद्यार्थी म्हणून शिकत असतां व तिसरा झांजीबारच्या बंदरांतील कप्तानाच्या दोस्तीमुळें उद्भवला. पहिल्या प्रसंगीं आपण गोंधळूनच गेलों. दुसऱ्या प्रसंगीं मित्राच्या इशाऱ्यावरून जागृत झालों म्हणून व तिसऱ्या खेपेस आपणास मुळींच मोह उत्पन्न झाला नाहीं म्हणून, आपल्या हातून पापकर्म घडलें नाहीं असें ते लिहितात. पण तीनही प्रसंगांतून परमेश्वरानेंच आपणास बचावलें अशी त्यांची श्रद्धा होती व अशाच प्रसंगांतून व मोहांतून तरून जाण्यास आपणास अंतरात्म्याचा आधार लागतो असें ते मानीत.

"तीर्त्वा मोहार्णवं हत्वा रागद्वेषादि राक्षसान्।
शांतिसीता समायुक्त आत्माराभो विराजते॥"

असें जीवन्मुक्ताचें म्हणजेच स्थितप्रज्ञाचें वर्णन शंकराचार्यांनीं केलें आहे. आत्मारामास शांतिरूप सीतेचा योग होण्यापूर्वी मोहाचा सागर तरून जावें लागतें आणि रागद्वेषादि राक्षसांचा संहार करावा लागतो, हें अद्वैत वेदान्ताचें सार आहे. अध्यात्म, धर्म, मोक्ष यांचा विचार या अंतर्मुखदृष्टीनें व अंतःशुद्धीच्या दृष्टीनें करीत असतां, म. गांधीना या आत्मरूप रामापासून बलाची याचना करावी लागली व त्याच्या प्रार्थनेवर त्यांची श्रद्धा वाढत गेली. ही प्रार्थना केवळ ओंठावरची नसून आपल्या सर्व शक्ति एकवटून व हृदय पिळवटून केलेली ती आर्त जीवाची प्रार्थना होती. आत्मदर्शनासाठीं सर्वस्वाची आहुति देण्याची तयारी करणाऱ्या मुमुक्षु जीवाची आपल्या अंतर्यामीला मारलेली ती हांक होती. पाण्याच्याबाहेर काढिलेला मासां पाण्यांत जाण्यासाठीं जितकी तळमळ दाखवितो तितक्या तळमळीनें आत्मशुद्धीचा केलेला तो प्रयत्न होता.

इंग्लंडांत असतांना गांधीजींच्या मनात ख्रिस्ती धर्मासंबंधीं जो एक अनादर तत्पूर्वी वसत होता, तो नाहींसा होऊन त्या धर्मासंबंधींचा व ख्रिस्तासंबंधींचा आदर निर्माण झाला. राजकोटांत असतांना त्यांनीं बालवयांत असें ऐकिलें होतें कीं, ख्रिस्ती धर्मांत मद्यपान व मांसाहार करण्याची आज्ञाच केलेली आहे. हा त्यांचा गैरसमज इंग्लंडांतील एका शाकाहारी मित्रानें दूर केला आणि बायबल वाचण्याची त्यांना शिफारस केली. त्यांतील जुना करार त्यांना वाचवेना, पण नवा करार व विशेषतः 'गिरिप्रवचन' (Sermon on the Mount) हा भाग वाचतांना त्यांना तो फारच चित्तवेधक वाटला व 'अपकाराची फेड उपकारानें करील तोच सर्वश्रेष्ठ' अशा अर्थाचा जो गुजराती श्लोक त्यांना प्रियतम झाला होता, त्याची त्यांना आठवण झाली. आपल्या अंतःकरणास आकर्षून घेणारा हाच उपदेश ख्रिस्तानें फार परिणामकारक रीतीनें केलेला आहे हें पाहून त्यांचें अंतःकरण उचंबळून आलें,

आणि सर्व धर्मांचें अंतरंग एकच आहे याचा त्यांना अधिक व्यापक अनुभव येऊं लागला. इंग्लंडांतील त्यांच्या निवासांत अशा प्रकारें त्यांची धर्मजिज्ञासा बौद्धिक दृष्टीनें विकसित झाली व आत्मशुद्धि व आत्मदर्शन हेंच सर्व धर्मांचें रहस्य आहे हें त्यांना पटलें. तरीही आत्मदर्शन करण्यासाठीं सतत झटणाऱ्या व्यक्तीचें दर्शन अद्यापि त्यांना झालें नव्हतें. अशा अवस्थेंत ते इंग्लंडाहून हिंदुस्थानास परत आले.

मुमुक्षु मित्राचा लाभ

विलायतेंत असतांना गांधीजींचा डॉ. प्राणजीवन मेहता यांच्याशीं स्नेह जमला होता. ते मुंबईस आले तेव्हां बंदरावर डॉ. मेहता आले होते व ते त्यांना आपल्या घरीं उतरण्यास घेऊन गेले. तेथें दोघांच्याही कुटुंबातील सर्व मंडळींचा परिचय झाला व तो स्नेह कायम टिकला. डॉ. मेहता यांचे बंधु रेवाशंकर जगजीवन यांच्याशींही मोहनदासांचा जन्माचा ऋणानुबंध जडला. रेवाशंकर जगजीवनच्या पेढीचे एक भागीदार आणि सर्वाधार असे व्यवस्थापक कवि राजचंद्र उर्फ रायचंदभाई हे होते. त्यांचें वय त्या वेळीं सुमारें पंचवीस वर्षांचें होतें. डॉक्टर मेहतांच्या वडील बंधूंचे ते जांवई होते. आपल्या व्यापारांत ते वाकबगार असून ते आत्मदर्शनासाठीं सतत झटणारे असे विरक्त मुमुक्षु होते. त्यांचें वर्णन गांधीजी पुढीलप्रमाणें करतात : "स्वतः हजारों रुपयांचा व्यापार करीत ; हिऱ्या-मोत्यांची पारख करीत ; व्यापारांतील कोडीं सोडवीत ; पण हा त्यांचा मुख्य विषय नव्हता. त्यांचा विषय–त्यांचा पुरुषार्थ–आत्मओळख, हरिदर्शन हाच होता.....जो मनुष्य लाखों रुपयांच्या सौद्याच्या गोष्टी बोलून झाल्यावर लगेच आत्मज्ञानाच्या गूढ गोष्टी लिहायला बसतो, तो जातीचा व्यापारी नव्हे, तर शुद्ध ज्ञानी होय. त्यांच्या बाबतींत अशा प्रकारचा अनुभव मला एक वेळच नव्हे तर अनेक वेळ आला. मला त्यांची वृत्ति विचलित झालेली कधींही आढळली नाहीं.....त्या वेळीं जरी माझें आयुष्यातील ध्येय नक्की झालें नव्हतें, सामान्य धार्मिक चर्चेबद्दल मला आवड होती असेंही म्हणत येणार नाहीं, तरी पण रायचंदभाईंच्या धार्मिक चर्चेबद्दल मला फार

आवड वाटे. त्यानंतर अनेक धर्माचार्यांशीं माझी गांठ पडली. प्रत्येक धर्माच्या आचार्यांना भेटण्याचा प्रयत्न मीं केला आहे; पण माझ्यावर रायचंदभाईंनीं जी छाप पाडलेली आहे, ती दुसऱ्या कोणींही पाडलेली नाहीं. त्यांचीं कित्येक वचनें माझ्या हृदयाला जाऊन भिडत. त्यांच्या बुद्धीबद्दल मला आदर वाटे; त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दलही तितकाच आदर वाटे; आणि त्यावरून खात्री होती कीं, ते मला इरादापूर्वक आडवाटेनें नेणार नाहींत. त्यामुळें माझ्या आध्यात्मिक अडचणींच्या वेळीं मी त्यांचा आश्रय घेत असें.

"रायचंदभाईंबद्दल इतका आदर वाटत असतांही त्यांना माझे धर्मगुरु या नात्यानें माझ्या हृदयांत मी स्थान देऊं शकलों नाहीं. गुरूचा माझा शोध अजूनही चालूच आहे.

"म्हणून जरी मी रायचंदभाईंना आपल्या हृदयाचे स्वामी बनवूं शकलों नाहीं, तरीही मला त्यांचा आश्रय वेळोवेळीं कसा मिळत गेला तें आपल्याला पुढें दिसेलच. येथें येवढें सांगणें पुरें आहे कीं, माझ्या जीवनावर गाढ परिणाम करणारे आधुनिक पुरुष तीन आहेत: रायचंदभाईंनीं आपल्या प्रत्यक्ष समागमानें, टॉलस्टॉयनें 'ईश्वरी राज्य तुझ्या हृदयांतच आहे' ('Kingdom of God is within you') या नांवाच्या पुस्तकानें, आणि रस्किननें 'सर्वोदय' ('Unto This Last') नांवाच्या पुस्तकानें मला मुग्ध केलें आहे."

या तीन पुरुषांच्या प्रभावांचें जर थोडें पृथक्करण केलें तर आपणास असें दिसून येईल कीं, आत्मदर्शन–स्थितप्रज्ञता–याची प्राप्ति करून घेऊन सर्व व्यवहार करीत असतां आत्मानंद कसा उपभोगावा या बाबतींत गांधीजींना रायचंदभाईंचें मार्गदर्शन उपयुक्त झालें असावें, आधुनिक जगांतील मानवसंस्कृतीला आध्यात्मिक अधिष्ठान कसें उरलेलें नाहीं व तें प्राप्त करून देण्यानेंच मानवाला खरें सुख व खरी शांति लाभूं शकेल हें ओळखून आधुनिक संस्कृतींत अंतर्बाह्य क्रांति करण्याची प्रेरणा व दृष्टि म. गांधींना टॉलस्टॉयच्या ग्रंथांतून मिळाली, आणि रस्किनचें "सर्वोदय" हें पुस्तक वाचून आर्थिक

व्यवहारांना नैतिक अधिष्ठान असलें पाहिजे, तिकडे दुर्लक्ष करणारें अर्थशास्त्र हें अनर्थशास्त्र आहे हें ज्ञान त्यांच्या मनावर बिंबलें. या तीनहीं पुरुषांचा सर्व व्यवहारांकडे पाहण्याचा दृष्टिकोण आध्यात्मिकच होता, तथापि टॉल्स्टॉयची सर्वांगीण सामाजिक क्रांतीची दृष्टि इतर दोघांत नाहीं हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. या दृष्टीनें विचार केल्यास म. गांधींच्या क्रांतिकारक धर्मनिष्ठेचा वैचारिक उगम टॉल्स्टॉयच्या विचारांतच आपणांस आढळतो.

म. गांधींच्या धर्मनिष्ठ वृत्तींतून क्रांतिकारक लोकनेतृत्वाची वृत्ति कशी व केव्हां निर्माण झाली, त्याचाच विचार आतां पुढील प्रकरणापासून आपणांस करावयाचा आहे.

: : ३ : :

कूली बॅरिस्टर आणि वर्णभेदाविरुद्ध लढा

"अशा तऱ्हेनें मी समाजाच्या सेवेमध्यें तन्मय होऊन गेलों. याचें कारण आत्मदर्शनाची अभिलाषा हेंच होतें. ईश्वराची ओळख सेवेनेंच होईल असें समजून मीं सेवाधर्माचा स्वीकार केला. हिंदी लोकांचीच सेवा करण्याचें कारण, ती सेवा मला सहजप्राप्त होती. ती कशी करायची तें मला समजत होतें. तिचे मार्ग मला शोधायला जावें लागलें नव्हतें. मी माझ्या मतें, प्रवास करण्यासाठीं, काठेवाडच्या भानगडींतून सुटण्यासाठीं आणि निर्वाहाचें साधन मिळविण्यासाठीं, दक्षिण आफ्रिकेला गेलों, पण तेथें सांपडलों ईश्वराच्या शोधांत— आत्मदर्शनाच्या प्रयत्नांत."

(आत्मकथा, प्रकरण २२ वें)

महात्मा गांधींच्या जीवनाचा पहिला भाग संपवून आतां आपणांस त्यांच्या चरित्राच्या दुसऱ्या भागांत प्रवेश करावयाचा आहे. विलायतेतील बॉरिस्टरीचा अभ्यासक्रम संपवून ते सन १८९१ मध्यें हिंदुस्थानांत परत आले. त्यानंतर कांहीं दिवस त्यांनीं मुंबई व राजकोट या ठिकाणीं धंदा सुरू करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांत त्यांना यश येण्याचा फारसा संभव दिसेना. इतक्यांत सन १८९३ मध्यें दक्षिण आफ्रिकेंतील एका व्यापारी पेढीवाल्याकडून वकिलीच्या स्वरूपाचें काम चालून आलें. या व्यापारी कंपनीची पेढी पोरबंदर येथेंही होती. त्या मेमण पेढीकडून गांधीजींच्या बंधूंकडे असें बोलणें

निघालें कीं, " दक्षिण आफ्रिकेंत आमचा व्यापार आहे. आमची मोठी पेढी आहे. आमचा एक मोठा दावा चालू आहे. दावा चाळीस हजार पौंडांचा आहे. आमच्याजवळ उत्तमांत उत्तम वकील, बॅरिस्टर आहेत. तुमच्या भावाला पाठवलात तर त्याची आम्हांला मदत होईल, आणि त्यालाही कांही मदत मिळेल. तो आमची बाजू वकिलाला चांगल्या तऱ्हेनें समजावून देऊं शकेल."

या कामाचें स्वरूप दुसऱ्या वकिलांना आपली बाजू समजावून देणें एवढेंच होतें कीं प्रत्यक्ष कोर्टांत काम चालविणें हेंही त्यांत होतें, याचा स्पष्ट उलगडा पहिल्यांदां झाला नव्हता. शेठ अबदुल करीम झवेरी यांची व गांधीजींची गांठ पडली व त्यांना कामाचें स्वरूप कळून आलें. दक्षिण आफ्रिकेंत दादा अबदुल्लाशेठ यांची मोठी पेढी असून, शेठ अबदुल करीम झवेरी हे त्यांचे पोरबंदरचे भागीदार होते. दादा अबदुल्ला यांचा दावा ट्रॉन्सवालमध्यें प्रिटोरिया येथें चालू होता. हा दावा चाळीस हजार पौंडांचा म्हणजे सहा लाख रुपयांचा होता. अबदुल्ला-शेठ यांचे प्रतिवादी तय्यबशेठ हे असून ते सोयरेच होते. या दाव्याचें काम सुमारें एक वर्षभर चालेल आणि तितके दिवस दक्षिण आफ्रिकेंत राहण्याचा सर्व खर्च करून, त्याशिवाय येण्याजाण्याचें पहिल्या वर्गाचें भाडें आणि शिवाय एकशें पांच पौंड रोख देऊं अशीही सूचना होती. यांतील मुख्य काम दुसऱ्या वकिलांना बाजू समजावून देणें आणि पेढतिर्फे होणारा इंग्रजी पत्रव्यवहार करणें, अशासारखेंच होतें. वकिली म्हणण्यापेक्षां पेढीची ती एक तात्पुरती नोकरीच होती. पण त्यासाठीं एका बॅरिस्टराची त्यांना गरज होती. गांधीजींनीं ही कामगिरी पतकरिली, आणि ते सन १८९३ सालच्या एप्रिल महिन्यांत अबदुल्लाशेठ यांच्या कामासाठीं दक्षिण आफ्रिकेस जाण्यास निघाले. या वेळीं ते चोवीस वर्षांचे होते. दक्षिण आफ्रिकेस एक वर्षभर जाऊन परत येण्यासाठीं ते जे निघाले ते सुमारें वीस वर्षें तिकडेच सार्वजनिक कार्यांत गुंतून राहिले, आणि वीस वर्षांनंतर इसवी सन १९१४ सालीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा एक अद्वितीय सत्याग्रही नेता आणि यशस्वी राजकीय पुढारी अशी कीर्ति संपादून व महात्मा ही पदवी प्राप्त करून

घेऊन, दक्षिण आफ्रिकेहून कायमचे आपल्या मातृभूमीस परत आले. सन १८९३ पासून सन १९१४ पर्यंतचा वीस वर्षांचा त्यांच्या चरित्राचा हा भाग त्यांच्या जीवनांत आणि दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी समाजाच्या जीवनांत एक क्रांतिकारक काळ असा गणिला जातो. ते सन १८९३ साली तिकडे गेले त्या वेळीं नुकताच विलायतेंतून शिकून आलेला एक बॅरिस्टर, राजकोटच्या दिवाणाचा एक मुलगा, आणि कोर्टांत उभें राहून वक्तृत्व करण्यासही न धजणारा आणि जगांतील व्यवहाराचें फारसें ज्ञान नसलेला एक सामान्य बुद्धीचा सुशिक्षित तरुण, यापलीकडे त्यांच्याकडे कोणीही पाहूं शकत नव्हतें; पण सन १९१४ साली दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा वर्णभेदाच्या जुलमी कायद्याविरुद्ध चालू झालेला लढा सत्याग्रहाच्या अपूर्व साधनानें यशस्वी करून जेव्हां ते हिंदुस्थानांत परत आले, त्या वेळीं हिंदी राजकारणांतील विख्यात असे सर्व पुढारी त्यांच्याकडे एक यशस्वी राजकीय पुढारी आणि भारतीय संस्कृतीचा असामान्य नेता, एवढेंच नव्हे तर परतंत्र भारताला स्वतंत्र बनाविण्याचें कार्य करणारा उगवता राष्ट्रपुरुष, या दृष्टीनें पाहूं लागले होते. एका लाजाळू व लोकभीरु बॅरिस्टराचा असा अलौकिक लोकनायक, सत्याग्रही, संत आणि क्रांतिकारक कर्मवीर महात्मा कसा बनला, याचा विचार या प्रकरणापासून आपणांस करावयाचा आहे.

दुय्यम किंवा उच्च शिक्षणक्रम संपवून पैसे मिळविण्याचा धंदा सुरू करीपर्यंत गांधीजींच्या मनांत आपण राजकीय नेतृत्व करावें अशी आकांक्षा केव्हांच स्फुरली नव्हती. विलायतेंत असतांना त्यांची राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी यांच्याशीं गांठभेट व ओळख झाली होती; तथापि राजकारणाकडे त्यांचें लक्ष वेधलें नव्हतें. त्यांच्या अंतःकरणांत आपल्या देशासंबंधींची भक्ति व आपल्या धर्मासंबंधींचा अभिमान जागृत होऊं लागला होता. इंद्रियसंयम, मनोनिग्रह, अंतःकरणशुद्धि आणि सत्यप्रीति हे गुण त्यांच्या अंगीं प्रकर्ष पावूं लागले होते. त्यांची धर्मजिज्ञासा जागृत झाली होती आणि स्थितप्रज्ञ बनावें, मुमुक्षु व्हावें, ईश्वराचा साक्षात्कार घडवून घ्यावा, असेही विचार त्यांच्या मनांत

उदय पावत होते ; पण आपली कर्तव्याची कक्षा त्यांनीं वैयक्तिक कुटुंबापलीकडे कल्पिलेली नव्हती. आपण एक सार्वजनिक नेता बनावें, राजकारणांत पडावें किंवा समाजसेवेला आजन्म वाहून घ्यावें, हे विचार त्यांच्यापुढें नव्हते. ही सार्वजनिक कर्तव्यबुद्धि त्यांच्या अंतःकरणांत प्रथम दक्षिण आफ्रिकेंत गेल्यावरच उदय पावली, आणि या कर्तव्यबुद्धिचीही मूलप्रेरणा धर्मजिज्ञासेंत होती. धर्मजिज्ञासेंतून आत्मदर्शन, आत्मदर्शनासाठीं लोकसेवा, लोकसेवेसाठीं राजकारण-प्रवेश आणि राजकारणासाठीं सत्याग्रह, अशी त्यांच्या विचारांची व जीवनाची परिणति झालेली आहे. या परिणतीचा हा क्रम या प्रकरणाच्या शिरोभागीं दिलेल्या त्यांच्या अवतरणांत उल्लेखिलेला आढळतो.

म. गांधींच्या चरित्राचा, वयाच्या पंचविसाव्या वर्षापासून पंचेचाळिसाव्या वर्षापर्यंतचा (१८९४ ते १९१४), दुसरा भाग म्हणजे त्यांच्या जीवनांतील क्रांतीचा काळ आहे. या वीस वर्षांच्या काळांतील पहिलीं बारा वर्षें (१८९४ ते १९०६) हीं सत्याग्रही साक्षींत्काराच्या पूर्वतयारीचा, तपश्चर्येचा काळ असें म्हणतां येतील. १९०६ सालीं ही बारा वर्षांची तपश्चर्या पुरी होऊन, त्यांना सत्याग्रही मंत्राचें दर्शन झालें, आणि त्यानंतरच्या आठ वर्षांत त्यांनीं या मंत्राच्या अनुरोधानें दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा वर्णभेदविरोधी लढा चालवून, पहिलें सत्याग्रहयुद्ध यशस्वी केलें. १९०६ सालीं त्यांना सत्याग्रही दीक्षा घेण्याची जी प्रेरणा झाली त्या प्रेरणेस ते परमेश्वरी प्रेरणा समजत, व ती दीक्षा घेऊन आजच्या मानवसंस्कृतीला धर्माचें व अध्यात्माचें, म्हणजेच अहिंसेचें व सत्याचें, आधिष्ठान नाहीं, तें निर्माण करून देण्यासाठीं आमरण झटत राहणें, हें ते आपलें जीवितकर्तव्य समजत. बॅरिस्टर मोहनदास गांधी हे महात्मा कर्मवीर गांधी कसे बनले ? आणि पैसे मिळविण्याकरितां एक वर्षाच्या कामासाठीं दक्षिण आफ्रिकेस गेलेले गांधी तेथेंच कायमचे राहून हिंदी लोकांचे नेते कसे बनले ?

मुंबईहून निघून ते नाताळच्या दरबान बंदरांत पोहोंचल्यानंतर दोनचार दिवसांतच त्यांना आपण 'बॅरिस्टर' असलों तरी या देशांतील

गोरे लोक आपणांस 'कूली' (मजूर) समजतात असा अनुभव येऊं लागला. दक्षिण आफ्रिकेंत गोरे लोक वसाहती करून राहूं लागल्यानंतर त्यांनीं जे मळे केले त्या मळ्यांत काम करण्यास त्यांना हिंदुस्थानांतून मजूर नेण्याची गरज भासूं लागली. हे मजूर मुदतबंदीचे करार करून, जादा पैशाचें आमिष दाखवून, नेण्यांत येत असत. या मुदतबंदीच्या करारास 'अॅग्रीमेंन्ट' असें इंग्रजी नांव असून त्याचा अपभ्रंश 'गिरमिट' असा झाला होता. या शब्दावरून मुदतबंदीच्या मजुरांना 'गिरमिटये' हें नांव पडलेलें होतें. प्रथमतः हिंदी लोक मजूर म्हणूनच तिकडे गेले असले तरी, ती मुदत संपल्यावर ते लोक स्वतंत्र शेती करून तिकडे राहूं लागले. हळूहळू या मजूर व शेतकरी हिंदी लोकांच्या व तेथील मूळच्या रहिवाशांच्या गरजा भागविणारे दुकानदार, व्यापारी, सावकार, पेढीवाले हिंदी लोक तेथें जाऊन राहूं लागले. ते तेथील व्यापारांत युरोपियन गोऱ्या लोकांशीं चढाओढ करून धनिक बनूं लागले, आणि घरंदाज बनून, अधिकाधिक प्रदेश आक्रमण करूं लागले. या घरंदाज धनिक लोकांना शिक्षक, वैद्य, डॉक्टर, वकील असा सुशिक्षित धंदेवाला वर्ग हवासा वाटूं लागला व तोही तिकडे जाऊं लागला. या सर्व वर्गांच्या व दर्जांच्या हिंदी लोकांना गोरे लोक 'कूली' या नांवानेंच संबोधूं लागले आणि 'कूली' या शब्दाचा मूळचा 'मजूर' हा अर्थ मागें पडून 'कूली' म्हणजे कोणताही हिंदी किंवा आशियांतील गौरेतर किंवा काळा मनुष्य असा अर्थ रूढ झाला. सर्व हिंदी लोकांप्रमाणें बॅरिस्टर गांधी हे दक्षिण आफ्रिकेंत गेल्यावर, 'कूली बॅरिस्टर' बनले. एका राजदरबारी दिवाणांचा विलायतेस जाऊन बॅरिस्टर होऊन आलेला तरुण, सुशिक्षित मुलगा आपण आहों, प्राचीन सुसंस्कृत हिंदु धर्मांतील वैश्य वर्णांत आपला जन्म झालेला आहे, आणि ब्रिटिश साम्राज्याचा नागरिक असल्यानें त्या साम्राज्यांतील कोणत्याही प्रदेशांत वकिलीचा अथवा वाटेल तो धंदा करून आपलें दैव काढण्याचें स्वातंत्र्य आपणांस आहे, असा अहंकार त्यांना वाटणें अगदीं साहजिक होतें. त्यांच्या अंतःकरणांतील हा अहंकार सुप्त होता तरी दरबान बंदरांत उतरल्या दिवसापासून त्या अहंकारावर तडाखे

बसूं लागले, आणि हिंदी मनुष्य कितीही सुधारलेला, सुशिक्षित, सुसंस्कृत अथवा सधन असो, तो आपणास उच्चवर्णीय समजत असो कीं हीनवर्णीय समजत असो, तो मुदतबंदीचा करार केलेला गुलाम असो कीं स्वतंत्र धंदा करणारा व्यापारी, सावकर, वकील, डॉक्टर असो, गोऱ्या युरोपियन वसाहतवाल्या लोकांच्या दृष्टीनें तो 'कूली' च होता. या दृष्टीनें मोहनदास गांधी हे बॅरिस्टर झाले तरी, 'कूली बॅरिस्टर' होते आणि या देशांत त्यांना स्वतंत्र नागरिकाचे व गोऱ्या लोकांशीं समानतेचे असे कोणतेही हक्क नव्हते. आपण सुशिक्षित ब्रिटिश नागरिक आहों, ब्रिटिश लोक मनुष्यामनुष्यांत भेद मानीत नाहींत, त्यांच्या संस्कृतींत जातिभेद नाहीं, त्यांच्या राहणीचा, आचारविचारांचा आणि संस्कृतीचा स्वीकार करण्यानें आपणही त्यांच्याबरोबरीचें राष्ट्र बनूं, असे संस्कार बॅ. मोहनदास गांधींच्या मनावर आतांपर्यंत झाले होते. ब्रिटिश राज्यकर्ते हे हिंदुस्थानला सुधारण्यासाठीं हिंदुस्थानांत आले आहेत व ते आपले उद्धारक आहेत, हें मत त्यांच्या मनावर बिंबलेलें होतें. त्यांच्या अंतःकरणांत ब्रिटिश साम्राज्यासंबंधींची राजनिष्ठा खोल रुजलेली होती, पण दक्षिण आफ्रिकेंत नाताळांतील दरबान बंदरांत पाय ठेवल्यापासून त्यांना फार विपरीत अनुभव येऊं लागला. या देशांत काळा-गोरा हा भेद कळसास पोहोंचलेला असून, काळा मनुष्य कितीही शिकलेला, सुधारलेला किंवा सुसंस्कृत असो, तो गोऱ्या मनुष्याचा 'कूली' किंवा दास असून त्याला गुलामाहून अधिक चांगल्या रीतीनें वागविण्यांत येत नाहीं, असा अनुभव त्यांना येऊं लागला.

एकदोन दिवसांत अबदुल्लाशेठ यांनीं मोहनदासांना दरबानच्या कोर्टांत नेऊन वकील मंडळींच्या ओळखी करून दिल्या. वकील मंडळी-समवेत मोहनदास कोर्टांत बसले असतां, न्यायाधीश त्यांच्याकडे रोखून पाहूं लागला, व त्यानें त्यांना युरोपियनांप्रमाणें डोक्याची पगडी काढून बसण्याचा हुकूम दिला. मोहनदास कोर्टांतून उठून गेले. स्थानिक वृत्तपत्रांत मोहनदासांच्या पगडीची बरीच चर्चा झाली. यामुळें बॅरिस्टर गांधींना ताबडतोब प्रसिद्धि मिळूं लागली. चारसहा दिवसांत

त्यांना दरबानहून प्रिटोरियाला जाण्याचें निमंत्रण आलें. त्याप्रमाणें अबदुल्लाशेठ यांनीं त्याना पहिल्या वर्गाचें तिकिट काढून दिलें, व त्यांची रवानगी करून दिली.

नाताळची राजधानी मॉरित्सबर्ग येथें रेल्वे रात्रीं नऊ वाजतां पोहोंचली. तेथें मोहनदासांच्या डब्यांत एक गोरा मनुष्य शिरला. आपल्या डब्यांत काळा आदमी असणें त्याला सहन झालें नाहीं. त्यानें लगेच रेल्वे अधिकाऱ्यांना बोलावून आणिलें, आणि त्यांच्याकडून मोहनदासांना त्या डब्यांतून उतरून मागील तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत जाऊन बसण्याची आज्ञा झाली. मोहनदासांनीं तसें करण्याचें नाकारतांच त्यांना पोलिसांकडून गचांडी देऊन खालीं ओढण्यांत आलें, व त्यांचें सामान प्लॅटफॉर्मवर फेंकून देण्यांत आलें. मोहनदासांनीं दुसऱ्या डब्यांत जाऊन बसण्याचें नाकारलें, तेव्हां गाडी निघून गेली, आणि मोहनदास वेटिंग रूममध्यें जाऊन रात्रभर तेथेंच बसून राहिले! त्यांचें सामान रेल्वे-नोकरांनीं दुसरीकडे नेऊन ठेविलें.

मॉरित्सबर्ग स्टेशनांत सर्व रात्रभर वेटिंगरूममध्यें बसून सकाळपर्यंतचा वेळ मोहनदासांनीं काढला. आपला झालेला अपमान हा केवळ आपल्या एका व्यक्तीचा अपमान नसून, तो दक्षिण आफ्रिकेंत येऊन राहिलेल्या सर्व हिंदी लोकांचा अपमान आहे, आणि हा अपमान दूर व्हावयाचा तर आफ्रिकेंतील वर्णद्वेषाची भावना गोऱ्या लोकांच्या मनांतून नाहींशी झाल्यावांचून असे प्रकार थांबणार नाहींत, अशी त्यांची खात्री झाली. या रात्रीं त्यांच्या डोक्यांत विचारांचें काहूर माजलें. या अपमानानंतर त्यांच्यापुढें दोन मार्ग मोकळे होते : पहिला मार्ग असा कीं, ज्या कामासाठीं आपण आलों तेवढें काम होईपर्यंत जे जे अपमान होतील ते सर्व मुकाट्यानें गिळून, आपल्या कामाचे पैसे खिशांत घालून, आपल्या देशाचा रस्ता सुधारावयाचा. कोणताही सामान्य व्यवहारी मनुष्य याच मार्गाचा अवलंब करावा असें ठरवील. त्या वेळीं दक्षिण आफ्रिकेंत शेंकडों लोक व्यापारासाठीं जात असत आणि आपल्या धंद्याकडे व पैशाकडे लक्ष देऊन भोगावे लागतील ते

सर्व अपमान भोगीत असत, आणि सहस्रावधि, किंवहुना लक्षावधि, रुपयांची कमाई आपल्या देशाकडे पाठवीत किंवा तेथें संसार थाटून राहत. हा सामान्य व्यवहारी मनुष्याचा मार्ग बॅरिस्टर मोहनदास गांधी यांनाही स्वीकारतां आला असता. हाही मार्ग न स्वीकारतां, घेतलेलें काम तसेंच अर्धवट सोडून देऊन, तेथूनच परत आपले देशीं येणें व पुन्हा दाक्षण आफ्रिकेंत न जाणें असाही एक मार्ग त्यांच्यापुढें होता. हा दुसरा मार्ग, आपले होणारे अपमान गिळीत, हातीं घेतलेलें काम संपेपर्यंत व त्याचा मोबदला खिशांत पडेपर्यंत तेथेंच राहण्याच्या पहिल्या मार्गाहून आर्थिकदृष्ट्या थोडा नुकसानीचा असला तरी स्वाभिमानाला, म्हणजे वैयक्तिक स्वाभिमानाला, न दुखविणारा असा होता. पण हे दोनही मार्ग स्वीकारणें योग्य नाहीं असा विचार मोहनदासांच्या मनांत उद्भवला. हा अपमान केवळ आपल्या एका व्यक्तीचा नसून तो जर सर्व हिंदी जनतेचा असेल, आणि सर्व हिंदी लोकांना जर वर्णद्वेषामुळें अशीं दुःखें सहन करावीं लागत असतील, तर तो वर्णद्वेष नाहींसा होईपर्यंत हिंदी लोकांच्या वतीनें युरोपियन वसाहतवाल्यांविरुद्ध झगडण्याचें कर्तव्य कोणींतरी अंगावर घेतलें पाहिजे. म्हणून आपणास व्यक्तिदृष्टीनें जे अपमान अथवा जीं दुःखें सोसावीं लागतील तीं सर्व सोसून, दक्षिण आफ्रिकेंत जाऊन राहिलेल्या हिंदी लोकांना आपणांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध झगडण्याचें शिक्षण आपण द्यावें असा विचार प्रथमतः या वेळीं त्यांच्या मनांत आला. व्यक्तिजीवनांतून मुक्त होऊन सामाजिक जीवनाशीं समरस होण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग म्हणण्यास हरकत नाहीं. आतांपर्यंत 'मी' म्हणजे माझें कुटुंब एवढीच त्यांच्या 'मी' ची व्याप्ति होती. आतां त्यांना 'मी' म्हणजे माझें हिंदी राष्ट्र असा अनुभव येऊं लागला. आपल्या राष्ट्राचा मी एक घटक आहें व त्याच्यावर येणाऱ्या आपत्तींत आपण सहभागी असतों हें जर खरें असेल, तर त्या आपत्तींतून आपल्या राष्ट्राची मुक्तता करणें हेंही आपलें कर्तव्य बनतें. केवळ वैयक्तिक सुखदुःखांच्या किंवा मानापमानांच्या दृष्टीनें या प्रश्नांचा विचार न करतां, तो राष्ट्रीय दृष्टीनें आपण

करावयास शिकल्यावांचून या आपत्तींतून आपली सुटका होणें शक्य नाहीं असा विचार करून यापुढें आपण वागावें असें त्यांना वाटूं लागलें.

या स्टेशनावर एक दिवस राहून दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं त्याच गाडीनें मोहनदासांचा प्रवास पुढें सुरू झाला. मध्यंतरींच्या काळांत त्यांनीं रेल्वे अधिकाऱ्यांना व अबदुल्लाशेठ यांना तारा करून आपली परिस्थिति कळविली. रेल्वेच्या जनरल मॅनेजरची गांठ अबदुल्लाशेठ यांनीं घेतली तेव्हां त्यानें आपल्या नोकरांची बाजू चुकली नाहीं असें म्हटलें तरी, मोहनदासांचा पुढील प्रवास निर्विघ्नपणें पार पडेल अशी हमी दिली. मोहनदास मॉरित्सबर्ग स्टेशनपासून रात्रीं निघून सकाळीं चार्लस टाउन येथें येऊन पोंचले. चार्लस टाउनपासून जोहान्सबर्गपर्यंतचा प्रवास तेथें आगगाडी नसलेमुळें घोडयाच्या गाडींतून करावा लागे. या घोडयाच्या गाडींतील प्रवासांत दोन दिवस जावयाचे होते. पहिल्या दिवशीं स्टँडरटनचा टप्पा गांठून तेथें रात्रभर मुक्काम करावयाचा आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं तेथून निघून रात्रीं जोहान्सबर्गला पोंचावयाचें. या घोडयाच्या गाडींतील प्रवासांत पुन्हा अपमान सहन करण्याचा प्रसंग आला. चार्लस टाउनपासून स्टँडरटनपर्यंत जाणारी घोडयाची गाडी लहान होती. तींत आंत बसण्याला मोहनदासांना परवानगी मिळाली नाहीं. आपलें तिकिट असूनही त्यांना बाहेर ड्रायव्हरजवळ उघडयावर बसविण्यांत आलें. एवढा अपमान त्यांनीं मुकाटयानें सहन केला, पण एवढयावर हें प्रकरण थांबलें नाहीं. थोडा प्रवास झाल्यानंतर त्या गाडीचा गोरा कंडक्टर आतांपर्यंत आंत बसला होता, त्याला बाहेर ड्रायव्हरजवळ बसण्याची इच्छा झाली. ड्रायव्हरच्या पायांजवळ एक मळकें कापड ठेवून, तुम्ही या कापडावर बसा, मला तुमच्या जागीं बसून विडी ओढायची आहे, असा हुकूम त्यानें मोहनदासांना केला. मोहनदासांनीं मी ही गोष्ट मुळींच करणार नाहीं असें म्हणून त्याची आज्ञा मोडली. त्याबरोबर चवताळून जाऊन त्यानें मोहनदासांना लाथांबुक्क्यांनीं मारपीट करण्यास सुरवात केली. मोहनदास हा सर्व मार मुकाट्यानें सहन करीत होते, पण त्यांनीं आपली जागा सोडली नाहीं. हा प्रकार पाहून

आंतल्या एका गोऱ्या मनुष्यानें मध्यें पडून मोहनदासांना आंत बसूं द्यावें असा आग्रह धरला, व त्यानंतर त्यांना आंत बसण्याची परवानगी मिळाली. गांधीजींनीं ती परवानगी मिळतांच आंत जाण्याचें कबूल केलें, आणि तेथून त्यांचा जोहान्सबर्गपर्यंतचा प्रवास निर्विघ्नपणें पार पडला. जोहान्सबर्गला ते दुसऱ्या दिवशीं रात्रीं जाऊन पोंचले. प्रथमतः ते एका हॉटेलांत गेले. तेथें मॅनेजरची गांठ त्यांनीं घेतली. मॅनेजरनें त्यांच्याकडे पाहिलें व हा मनुष्य काळा आहे असें ताडून त्यानें आपल्या हॉटेलांत जागा नाहीं असें सांगितलें. नंतर ते महंमद कासीम कमरुद्दीन यांच्या दुकानीं गेले, व तेथें त्यांना अबदुल्लाशेठ यांचे मित्र अबदुल्ला गनीशेठ हे भेटले. त्यांनीं त्यांची सर्व सोय केली. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी मनुष्याची कशी दुःस्थिति आहे हें समजावून सांगितलें. त्यानंतर पुढें त्यांना जोहान्सबर्ग-पासून प्रिटोरियाला जावयाचें होतें. हा प्रदेश ट्रान्सवालमधला होता. तेथेंही पुन्हा रेल्वेंतून प्रवास करावयाचा होता. मोठ्या मुष्किलीनें मोहनदासांना पहिल्या वर्गाचें तिकिट मिळालें, पण कांहीं प्रवास झाल्यानंतर जर्मीस्टन या स्टेशनावर रेल्वेचा गार्ड आला. त्यानें मोहदासांस तिसऱ्या वर्गांत चल असें फर्माविलें. मोहनदासांनीं पहिल्या वर्गाचें तिकिट त्यास दाखविलें. पण तेवढ्यानें तो स्वस्थ बसेना, व त्यांना तिसऱ्या वर्गांत घालविण्याचा प्रयत्न करूं लागला. त्या डब्यांत बसलेला दुसरा एकच गोरा प्रवासी होता. त्यानें गार्डास सांगितलें कीं, त्यांच्यापाशीं पहिल्या वर्गाचें तिकिट आहे. त्याना तूं त्रास देऊं नको. यानंतर "तुम्हांस कूली-बरोबर प्रवास करण्यांत कांहीं वाटत नसल्यास माझें कांहीं जात नाहीं" असें पुटपुटत तो निघून गेला. यानंतर रात्रीं प्रिटोरियास पोहोंचेपर्यंत दुसरें कोणतेंही विघ्न पुन्हा उपस्थित झालें नाहीं. या प्रवासांत गांधीजींना जे अनुभव आले व त्या प्रसंगांतून पार पडतांना त्यांनीं जी वृत्ति धारण केली, त्या अनुभवांत व त्या वृत्तींतच गांधीजींनीं पुढें वाढविलेल्या सत्याग्रहवृक्षाचें बीज रोविलें गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. गांधीजींचा हा प्रवास त्यांच्या जीवनाला नवीन वळण

देऊन, एका बॅरिस्टराचें सार्वजनिक लोकनायकांत परिवर्तन घडविण्यास कारण झाला, किंवा या अनुभवाच्या निमित्तानें त्यांच्या अंतःकरणांत वसत असलेला सत्याग्रही बाणा जागृत झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. गांधीजींचा हा प्रवास, त्यांच्या जीवनांतच नव्हे तर दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या जीवनांत, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थान या राष्ट्राच्या जीवनांत, किंबहुना एकंदर मानवी इतिहासांत, संस्मरणीय व महत्त्वाचा असा गणला जाईल.

कायदेशीर व राजनिष्ठ चळवळ

मोहनदास गांधी हे ज्या दाव्याच्या कामासाठीं म्हणून दक्षिण आफ्रिकेंत गेले होते, तो दावा कोर्टांत चालून त्याचा निकाल होण्यापेक्षां दोन्ही पक्षांनीं पंच नेमून त्यांच्यापुढें आपली बाजू मांडावी आणि ते देतील तो निकाल दोघांनींही मान्य करावा, अशी खटपट त्यांनीं तेथें गेल्यापासून चालविली होती. हा दावा अबदुल्लाशेठ आणि तय्यबशेठ यांच्यामधील असून तो चाळीस हजार पौंडांचा म्हणजे सहा लाख रुपयांचा होता. दोघेही शेठ एकाच शहरचे रहिवासी आणि एकमेकांचे सोयरे होते. कोर्टांत हा दावा चालल्यास वाटेल तितकीं वर्षें त्याचें काम लांबवितां येणें शक्य होतें, आणि एवढ्या काळांत ते दोघेही शेठ धुळीला मिळूं शकले असते. अशा परिस्थितींत त्यांना पंचांमार्फत त्याचा निकाल करून घेणें हितावह होतें; पण ही हिताची गोष्ट दोघांनाही पटवून देण्यास मोहनदासाना बरीच खटपट करावी लागली. अखेरीस दोन्ही पक्ष तडजोडीस म्हणजे पंचांमार्फत निकाल लावून घेण्यास तयार झाले. पंच नेमले गेले आणि तय्यबशेठ यांनीं अबदुल्ला-शेठ यांना सदतीस हजार पौंड आणि खर्च द्यावा असें ठरलें. मात्र ही एवढी मोठी रक्कम देण्यास त्यांना पुरेशी मुदत देणें भाग होतें. लांब मुदतीचे अनेक हप्ते ठरवून देऊन मोहनदास गांधी यांनीं या दाव्याची तडजोड घडवून आणली. यासंबंधीं ते लिहितात : " पंच नेमून घेण्याच्या कामीं जी मेहनत पडली तिच्यापेक्षां हे लांब लांब मुदतीचे हप्ते ठरविण्याचे कामीं मला अधिक मेहनत करावी लागली. दोन्ही पक्ष खुष

झाले; दोघांची प्रतिष्ठा वाढली; माझ्या संतोषाला सीमा राहिली नाही. मी खरी वकिली शिकलो. मनुष्याची चांगली बाजू शोधून काढायला शिकलो. मनुष्याच्या अंतःकरणांत प्रवेश करण्याची कला साधली. मीं ठरविलें कीं, वकिलाचें कर्तव्य पक्षकारांमध्यें पडलेली फूट भरून काढणें हें आहे. हा धडा माझ्या मनांत इतका दृढमूल झाला कीं, माझ्या वीस वर्षांतील वकिलीचा बराचसा वेळ स्वतःच्या ऑफिसांत बसून शेंकडों दाव्यांच्या तडजोडी करण्यांतच गेला. त्यापासून माझें कांहीं नुकसान झालें असें म्हणतां येत नाहीं. आत्म्याचें नुकसान तर नाहींच झालें."

अशा प्रकारें ज्या दाव्याच्या कामासाठीं ते दक्षिण आफ्रिकेस गेले, त्याचा गोड शेवट झाला. आतां त्यांना तेथें राहण्याचें धंद्याच्या दृष्टीनें कोणतेंही कारण उरलें नाहीं. आपल्या देशीं परत जाण्याचा विचार त्यांनीं केला. त्यांना निरोप देण्यासाठीं म्हणून अबदुल्लाशेठ यांनीं एक मेजवानीचा समारंभ घडवून आणला. या निमित्तानें शेठजींनीं अनेक मंडळी एकत्र जमाविली. ही मंडळी जमली असतां, त्याच वेळीं वर्तमानपत्रांत, दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांना त्या वेळपर्यंत जो मताधिकार होता तो काढून घेणारें एक बिल नाताळच्या पार्लमेंटांत आलें असल्याचें प्रसिद्ध झालें होतें. या विषयावर मोहनदासांनीं चर्चा सुरू केली. तेथें जमलेली सर्व मंडळी व्यापारी पेशाची असल्यामुळें त्यांना या विषयाचें फारसें ज्ञान नव्हतें. पार्लमेंटांत सभासद निवडून देण्याच्या कामीं आपणांस मताधिकार आहे, हें त्यांना माहात असलें तरी, तिकडे त्यांचें फारसें लक्ष नव्हतें. शिवाय व्यवहारदृष्टीनें विचार करतां, आपणांस त्याचा कांहीं उपयोग आहे असेंही त्यांना वाटत नव्हतें. आपण ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक असून आपणांस मिळालेला हा हक्क काढून घेण्यांत येत आहे व तो वर्णभेदाच्या तत्त्वानुसार काढून घेण्यांत येत आहे, यामुळें आपला दर्जा गुलामासारखा होणार असून हिंदी लोकांना यापुढें दक्षिण आफ्रिकेंत राहणेंही अशक्य होईल व त्यांना आपलीं गाऱ्हाणीं दूर करून घेण्यास मार्ग उरणार नाहीं, ही गोष्ट मोहनदासांनीं त्या मंडळींच्या मनावर ठसविली तेव्हां त्यांनीं याबाबत चळवळ करून आपली दाद लावून देण्यासाठीं तुम्हीच येथें रहा आणि आमचें

नेतृत्व स्वीकारा असा आग्रह केला. अर्थात् तेथें रहावयाचें म्हणजे पैशाचा प्रश्न होता. ती मंडळी मोहनदासांना या सार्वजनिक कार्याबद्दल मोबदला म्हणून ते मागतील तितका पैसा देण्यास तयार होती; परंतु आपणांस सार्वजनिक कार्याबद्दल पैसा घ्यावयाचा नाहीं असें म. गांधींनीं त्यांना सांगितलें तेव्हां तुम्ही येथें वकिलीची सनद काढून कायमचे रहा, आम्ही तुम्हांस काम देऊं, असें मंडळींनीं सुचविलें. हें त्यांनीं मान्य केलें आणि त्या वेळपांसून थोडयाच दिवसांत त्यांनीं सनद मिळविण्यासाठीं वरिष्ठ कोर्टाकडे अर्ज केला. या अर्जाला गोऱ्या वकिलांनीं आपल्या सभेमार्फत विरोध केला. आजपर्यंत कोणत्याही काळया मनुष्यास तेथें वकिलीची सनद मिळालेली नव्हती, आणि ब्रिटनमधील बॅरिस्टर या दृष्टीनें जरी त्यांना आफ्रिकेंत सनद मिळण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नव्हती, तरी आजपर्यंत न घडलेली एक गोष्ट घडत आहे आणि वसाहतींत हिंदी लोक अनेक वर्षें येत असले तरी त्यांच्या पैकीं कोणीही वकिलीसारखा सुशिक्षिताचा धंदा करूं शकेल अशी आजपर्यंत कोणास कल्पना नसल्यामुळेंच, काळ्या लोकांना बंदी करणारा कायदा झालेला नाहीं हें लक्षांत घेऊन वरिष्ठ कोर्टांनीं हा नवा पायंडा पाडूं नये अशी या गोऱ्या वकील सभेची तक्रार होती. अर्थात् कायद्याच्या दृष्टीनें या तक्रारींत मुळींच जोर नव्हता, पण गोऱ्या समाजाचा या तक्रारीला पाठिंबा असून त्याच्या अंतःकरणांतील वर्णभेद त्यामुळें व्यक्त झाला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अशा रीतीनें मोहनदास गांधी हे दक्षिण आफ्रिकेंत कायमचे राहिले व पुढें इसवी सन १९१४ पर्यंत त्यांनीं तेथें आपला धंदा चालवून हिंदी समाजाचें नेतृत्वही केलें.

आपल्या सार्वजनिक कार्यासाठीं त्यांनीं ता. २२ मे १८९४ रोजीं नाताळ हिंदी कॉंग्रेस या नांवाची संस्था काढली. हिंदी लोकांचीं सर्व गाऱ्हाणीं सरकारपुढें मांडून तीं दूर करण्याचा प्रयत्न करणें हें जसें या संस्थेचें एक कार्य होतें, तसेंच हिंदी लोकांत शिक्षणप्रसार करून त्यांची सेवा करणें आणि त्यांच्या राष्ट्रीय भावना जागृत करून त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देणें, हें तेथील दुसरें काम होतें. या

दुसऱ्या कामासाठीं " कलोनियल बॉर्न इंडियन एज्युकेशनल असोसिएशन " म्हणजे वसाहतींत जन्मलेल्या हिंदी लोकांची शिक्षणसंस्था या नांवाची एक संस्था काढण्यांत आली. तेथील हिंदी लोकांच्या मुलांना व तरुणांना शिक्षणास साह्य करणें, त्यांची विचारशक्ति वाढविणें, व्यापारी मंडळींशीं त्यांचा संबंध घडवून आणणें, आणि तरुणांना स्वतःच्या हिमतीवर काम करण्याला प्रोत्साहन देणें, अशासारखें काम या संस्थेमार्फत होत होतें. सार्वजनिक विषयाची चर्चा करणें, वाचनालय चालविणें, व वक्तृत्व करण्यास शिकविणें, अशीं कामें ती करीत असून, तिनें एक पुस्तकालयही सुरू केलें. कॉंग्रेसचें तिसरें काम म्हणजे दक्षिण आफ्रिकेतील इंग्रज लोकांत, इंग्लंडांत आणि हिंदुस्थानांत हिंदी लोकांची दक्षिण आफ्रिकेंत कशी स्थिति आहे व ती सुधारण्यासाठीं काय केलें पाहिजे यासंबंधींचें ज्ञान पसरविणें व त्यासाठीं प्रचार करणें हें होतें. अशा रीतीनें मोहनदास गांधी यांनीं इसवी सन १८९४ पासून दक्षिण आफ्रिकेंत जाऊन राहिलेल्या हिंदी लोकांचें नेतृत्व स्वीकारून त्यांचें एक संघटन सुरू केलें. राष्ट्रीय भावना निर्माण करून, आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव त्यांना करून देणें, आपआपसांतील धर्मभेद व जातिभेद विसरून परस्परांना सहाय्य करण्यास प्रवृत्त करणें, आणि आपल्या हक्कांसाठीं जागृत राहून सनदशीर व कायदेशीर मार्गानें त्या हक्कांची प्राप्ति व वाढ करून घेण्यासाठीं झीज सोसून प्रयत्न करण्यास शिकविणें, हें नाताळमधील हिंदी कॉंग्रेसचें ध्येय होतें.

ज्या वेळीं ही संस्था स्थापन झाली त्याच्यापूर्वी नऊ वर्षें म्हणजे इसवी सन १८८५ सालीं हिंदुस्थानांत हिंदी कॉंग्रेस ही संस्था स्थापन झाली होती. ती स्थापन झाल्यापासून नऊ-दहा वर्षांत तिचें नांव सर्व हिंदी लोकांत प्रिय झालें होतें. पण त्याचबरोबर इंग्लंडांतील 'प्रतिगामी' वृत्तीच्या लोकांत ती अप्रिय झालेली होती. इसवी सन १८९३ सालीं हिंदी राष्ट्रीय सभेला थोडेंसें यश मिळून लोकनियुक्त प्रतिनिधि कायदे मंडळांत पाठविण्याचा हक्क अगदीं अल्प प्रमाणांत व अप्रत्यक्ष

स्वरूपांत मिळाला होता. यानंतर थोड्याच दिवसांत नाताळांतील हिंदी लोकांना त्यापूर्वी असलेला मताधिकार, कायदेशीर रीतीनें हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. हिंदी लोक केवळ मजूर या दृष्टीनें उंसाच्या मळ्यांत व चहाच्या मळ्यांत राबण्यासाठीं गोऱ्या वसाहतवाल्यांना हवे होते. त्यासाठीं इसवी सन १८६० सालापासून हिंदुस्थानांतून सात सात वर्षांचे मुदतबंदीचे करार करून मजूर नेण्यांत येत असत. ही मुदत भरण्यापूर्वी त्यांनीं नोकरी सोडल्यास तो फौजदारी गुन्हा समजण्यांत येई. असा गुन्हा करणाऱ्यास तुरुंगाची शिक्षा असे. ही एक प्रकारची गुलामगिरीच होती. या गुलामगिरीची मुदत संपल्यानंतर एक तर त्यांनीं आपल्या देशीं परत जावें किंवा पुन्हा मुदतबंदीचा नवा करार करावा, व गुलाम होऊनच तेथें रहावें अशी गोऱ्या लोकांची इच्छा होती. त्यांनीं शेती, व्यापारधंदा किंवा इतर सुशिक्षित व्यवसाय करून प्रतिष्ठित नागरिक बनावें, आणि गोऱ्या लोकांच्या बरोबरीनें सन्मानानें व समानतेनें तेथें नादावें हें त्यांना पसंत नव्हतें. या भावनेच्या बुडाशीं त्यांचा वर्णाभिमान होता आणि आशियांतील सर्व काळे, सांवळे व पिवळे लोक हे गोऱ्या लोकांचे म्हणजे युरोपियनांचे सेवा करणारे गुलाम अथवा संस्कृतिहीन शूद्र आहेत असें ते समजत. हा वर्णाभिमान दूर करून तेथें जाऊन राहिलेल्या हिंदी लोकांना स्वतंत्रतेचे व समानतेचे नागरिक हक्क मिळवून देणें हा नाताळ हिंदी काँग्रेसचा मूळ उद्देश होता, आणि ब्रिटिश साम्राज्याची घटना मूलतः व तत्त्वतः वर्णाभिमानरहित आहे असें ब्रिटिश मुत्सद्दी व नागरिक म्हणत असत. इंग्लंडांत जे कायदे होते त्यांत वर्णाभिमान नाहीं. हिंदुस्थानांत जातिधर्म यांचा विचार न करतां, आम्ही सर्वांचें समान बुद्धीनें रक्षण करतों आणि लोकशाही राष्ट्रीयत्व निर्माण झालें म्हणजे हिंदी लोकांना स्वराज्य देऊन आम्ही आपल्या देशास परत जाऊं असेंही ब्रिटिश मुत्सद्दी म्हणत. हिंदुस्थानांतील हिंदी काँग्रेस ही या त्यांच्या अभिवचनांचा आधार घेऊन, तीं अभिवचनें त्यांनीं पुरीं करावींत याच भूमिकेनें ब्रिटिश सरकारशीं झगडत होती. तिला आठदहा वर्षांत थोडेफार यशही आलें होतें. आणि तिचे पुढारी हिंदी

जनतेंत मानमान्यता पावून ब्रिटिश अधिकाऱ्यांकडूनही त्यांचें नेतृत्व कबूल करण्यांत येऊं लागलें होतें. सुशिक्षित हिंदी तरुणांत या पुढाऱ्यांचा आदर्श पुढें ठेवून वागण्याची वृत्ति फैलावत होती. अर्थात् बॅरिस्टर मोहनदास गांधी यांनीं कॉंग्रेस संस्थेचाच आदर्श आपल्यापुढें ठेवून, ब्रिटिश साम्राज्यनिष्ठेच्या आधारावरच हिंदी लोकांनीं त्या साम्राज्यांत समानतेचा दर्जा प्राप्त करून घ्यावा असें आपलें धोरण ठरविलें, आणि त्यासाठीं नाताळ हिंदी कॉंग्रेसची स्थापना केली.

आपण ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक आहों आणि या साम्राज्यांतील नागरिकांत वर्णभेदमूलक विषमता करणें हें त्याच्या ध्येयाशीं विसंगत आहे हें गृहीत धरून, ब्रिटिश साम्राज्यांतील दक्षिण आफ्रिकेंत जो वर्णभेद सामाजिक व्यवहारांत त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आला, व ज्या वर्णभेदास कायदेशीर आधार देण्याचे प्रयत्न त्या देशांत सुरू होते त्या वर्णभेदाविरुद्ध झगडत असतां, आपण ब्रिटिश साम्राज्य नष्ट करावें अशी त्यांची भूमिका नव्हती; कारण, वर्णभेद हा त्या साम्राज्यसंस्थेच्या मूलभूत घटनेशीं विसंगत असा एक तिच्यावरील कलंक असून, तो कलंक पुसून टाकण्यास आपण झटत आहों, व म्हणून तसें करण्यांत आपली साम्राज्यनिष्ठा दुखावली जात आहे असें त्यांना वाटत नव्हतें. ब्रिटिश साम्राज्याचें मूलभूत स्वरूपच विषमतामूलक व अन्यायी आहे ही भूमिका त्यांनीं हिंदुस्थानांत आल्यानंतर व पहिलें महायुद्ध होऊन गेल्यानंतर स्वीकारली; तोंपर्यंत त्यांनीं जें राजकारण केलें त्यांत साम्राज्यनिष्ठेस धक्का लावलेला नव्हता. अर्थात् त्या साम्राज्यावर जेव्हां बोअर युद्धासारखी आपत्ति आली किंवा त्याच्याविरुद्ध झुलू लोकांनीं बंड केलें तेव्हां त्यांनीं आपला विरोध थांबवून त्या आपत्कालांत साम्राज्यास सहाय्यही केलें. तें संकट दूर झाल्यानंतर पुन्हा त्यांनीं हिंदी लोकांविरुद्ध करण्यांत आलेल्या कायदेशीर अन्यायांना विरोध करण्याचें आपलें राजकारण सुरू केलें. इसवी सन १८९४ सालीं त्यांनीं प्रथमतः दोन अन्यायांविरुद्ध चळवळ करण्यास सुरवात केली. त्यांपैकीं पहिला अन्याय म्हणजे हिंदी लोकांचा मताधिकार केवळ ते हिंदी किंवा आशियांतील आहेत एवढ्या मुद्यावर काढून घेण्यांत येत होता तो होय.

हिंदुस्थानांत आपणांस मताधिकार देण्यांत आलेला असून, आपण ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक असल्यानें, आपणांविरुद्ध वर्णभेदमूलक कायदे करून आपणांस मिळालेला हक्क कायदेशीरपणें काढून घेणें हा अन्याय आहे, व म्हणून असा कायदा नाताळ सरकारनें करूं नये व त्यांनीं केला तरी साम्राज्य सरकारनें म्हणजे ब्रिटिश सरकारनें त्यास संमति देऊं नये अशा प्रकारची ही चळवळ होती. ही चळवळ दोनतीन वर्षें झाल्यानंतर, ती वरकरणी तरी तात्पुरती यशस्वी झाली. वरकरणी म्हणण्याचें कारण असें कीं, साम्राज्य सरकारनें वर्णभेद करणारा मताधिकाराचा कायदा नामंजूर केला; तथापि त्यानंतर मताधिकारास शिक्षणाची अशी अट घालण्यांत आली कीं, ज्या अटीमुळें सामान्यतः हिंदी लोकांना तो अधिकार मिळूं नये.

इसवी सन १८९४ सालीं आफ्रिकेंतील मुदतबंदीचा करार पुरा झाल्यानंतर, जे मजूर तेथें कायमचे रहिवासी होऊं इच्छीत होते त्यांनीं तेथें न राहतां आपल्या देशास परत जावें या हेतूनें तेथें राहणाऱ्या स्वतंत्र हिंदी मजुरांवर दरसाल पंचवीस पौंड कर, म्हणजे तीनशें पंचाहत्तर रुपयांचा कर, बसविण्याची सूचना करण्यांत आली. या सूचनेचा उघड अर्थ मुदतबंदीची मर्यादा संपल्यानंतर हिंदी लोकांना त्या देशांत कायमची वस्ती करणें अशक्य व्हावें असाच होता. असा कर मुळींच लादूं नये अशी चळवळ तत्काल सुरू झाल्याचा ताबडतोब परिणाम एवढाच झाला कीं, हा कर दरसाल पंचवीस पौंड असावा ही मूळची सूचना मागें पडून वार्षिक तीन पौंडांचा कर बसविण्यांत यावा असा कायदा करण्यांत आला, व त्या कायद्यास हिंदुस्थान सरकारच्या व्हाइसरॉयनेंही संमति दिली. यामुळें या तीन पौंडांच्या कायद्याविरुद्ध फारशी चळवळ तत्काल करणें अव्यवहार्य बनलें. दरसाल तीनशें पंचाहत्तर रुपये द्यावे लागले असते ते आतां फक्त पंचेचाळीस रुपये द्यावे लागतील एवढें समाधान मानून त्या वेळीं नाताळ हिंदी काँग्रेसला स्वस्थ बसावें लागलें. तथापि हिंदी मजुरांवरचा हा कर आज ना उद्यां रद्द करवून घेतलाच पाहिजे असें

काँग्रेसचें धोरण होतें. हा तिचा निश्चय यशस्वी होण्यास वीस वर्षें लागलीं. त्याच्यासाठीं केवळ नाताळांतीलच नव्हे तर सर्व दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांना सत्याग्रह करून तुरुंगांत जावें लागलें. सुमारें दहा हजार हिंदी लोक तुरुंगांत गेले, व कित्येक गोळीबार सहन करून प्राणांस मुकले. हजारों लोकांनीं संप करून आपलीं कामें बंद पाडलीं. हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार यांनीं मध्यस्थी केली आणि नामदार गोखले यांनीं दक्षिण आफ्रिकेंत जाऊन शिष्टाई केली. त्या वेळीं तो कर रद्द करण्याचें तोंडी आश्वासन मिळालें, पुन्हा तें आश्वासन मोडण्यांत आलें, पुन्हा सत्याग्रह सुरू झाला व मग हा कर सन १९१४ सालीं कायमचा रद्द झाला.

सत्याग्रहनिष्ठेचा विकास

म. गांधींच्या जीवनांत धर्मनिष्ठा, समाजसेवा आणि राजकारण या तीन गोष्टींचा इतका अपूर्व संगम झालेला आहे कीं, या तीनही प्रकारच्या व्यवहारांचा परस्परांशीं काय संबंध आहे आणि असावा, याचा विचार केल्याखेरीज त्यांच्या जीवनाचा आपणांस उलगडाच होऊं शकत नाहीं. सामान्यतः धर्मनिष्ठ व्यक्ति ही राजकारणांत पडत नाहीं असा आधुनिक काळाचा एक दंडक समजला जातो. धर्मनिष्ठ व्यक्ति राजकारणांत पडली तर त्यामुळें राजकारणांत घोंटाळे उत्पन्न होतात, किंवा त्या व्यक्तीची धर्मनिष्ठा मलिन होते, म्हणून धर्मनिष्ठांनीं राजकारणांत पडूं नये, किंवा त्यांनीं राजकारण केलें तरी आपल्या धर्मनिष्ठ बुद्धीचा राजकारणी व्यवहारांत कोणताही संबंध आणूं नये, असें आधुनिक विद्वानांचें मत आहे. धर्माचा राजकारणाशीं कांहीं संबंध नाहीं हें मत एकंदर आधुनिक संस्कृतीचें एक आद्य लक्षण किंवा प्रमुख लक्षण समजलें जातें. मध्ययुगीन संस्कृति ही राजकारण आणि धर्मकारण यांची भेसळ करणारी संस्कृति गणली जाते आणि आधुनिक संस्कृति ही धर्मकारणाशीं राजकीय व्यवहारांची फारकत करणारी अशी संस्कृति मानली जाते. आधुनिक काळांत मी धर्मबुद्धीनें राजकारण करतों असें म्हणणारी व्यक्ति पुढें आल्यास तिला मध्ययुगीन, प्रतिगामी, अशीं विशेषणें

लावण्यांत येतात. या दृष्टीनें म. गांधींच्या राजकारणास प्रतिगामी असें समजणारे अनेक विद्वान् आहेत. त्याचप्रमाणें म. गांधी जें राजकारण करीत होते तें राजकारण हिंदु धर्माला व हिंदु संस्कृतीला मारक आहे असा त्यांच्यावर आक्षेप घेऊन, हिंदु धर्माच्या नांवानें राजकारण करणारा एक पक्ष गांधीजींच्या राजकारणाला सतत विरोध करीत होता, आणि अखेरीस या हिंदुत्वनिष्ठ गणल्या गेलेल्या राजकारणी व क्रांतिकारक म्हणविणाऱ्या एका व्यक्तीनें व वृत्तीनें म. गांधींचा वध केला. तेव्हां म. गांधी यांच्या जीवनांत धर्मनिष्ठा व राजकारण यांचा जो अपूर्व संगम झाल्याचें वर दर्शविलें त्याचें स्वरूप कोणतें होतें, व गांधीजींच्या जीवनांत धर्मनिष्ठ राजकारणाचा जो आविष्कार झाल्याचें आपणांस दिसतें तो खरोखर कोणत्या स्वरूपाचा होता, व त्याचें स्वरूप मानवसंस्कृतीला कितपत हितावह व उद्धारक आहे, यासंबंधीं आपलें मत निश्चित बनविल्यावांचून गांधीजींच्या जीवनाचा ग्रंथ आपणांस उलगडणार नाहीं, व तो उलगडला तरी त्याचें यथायोग्य मूल्यमापन आपणांस करतां येणार नाहीं.

या सर्व बिकट प्रश्नांचा निर्णय करण्यापूर्वी गांधीजींच्या चरित्राचें संपूर्ण अवलोकन करून त्या चरित्रांत त्यांच्या धर्मनिष्ठेचें व राजकारणाचें बीज कोठें व कसें रोविलें गेलेलें होतें आणि त्या एकाच बीजाला अंकुर फुटून त्या अंकुराची वाढ होतां होतां त्यालाच धर्मनिष्ठा, समाजसेवा आणि राजकारण या तीन शाखा कशा फुटल्या, आणि या तीनही शाखांत जे जे व्यवहार त्यांनीं केले त्या सर्व व्यवहारांत त्यांची स्वतःच्या व मानवसमाजाच्या जीवनाकडे पाहण्याची एकच दृष्टि कशी होती, याचा आपण अभ्यास केला पाहिजे. हा अभ्यास केल्यानंतर मग आपणांस वरील बिकट प्रश्नांचें कांहीं तरी समाधानकारक उत्तर देतां येईल.

गांधीजी जेव्हां दक्षिण आफ्रिकेंत गेले तेव्हां ते समाजसेवा किंवा राजकारण करण्याच्या वृत्तीनें गेले नाहींत. आपल्या कुटुंबाच्या पोषणा-

साठीं एक धंदा करावा एवढ्याच विचारानें त्यांनीं तें काम अंगावर घेतलें होतें ; पण धंद्यासाठीं म्हणून दक्षिण आफ्रिकेंत गेल्यानंतर त्यांनीं समाजसेवेचें व्रत स्वीकारलें आणि हें व्रत पार पाडीत असतां त्यांना राजकारणही करावें लागलें. पण समाजसेवा व राजकारण हीं दोनही त्यांच्या अंतःकरणांतील धर्मनिष्ठ बुद्धीचीं बाह्य स्वरूपें होतीं. आतां आपणांस गांधीजींच्या धर्मनिष्ठ बुद्धीला या दोन शाखा कशा फुटल्या याचाच विचार करावयाचा आहे. मागील प्रकरणांत गांधीजींच्या अंतःकरणांत धर्मजिज्ञासा प्रथमपासूनच कशी वसत होती, विलायतेंत गेल्यावर त्या जिज्ञासेची कशी वाढ झाली, आणि विलायतेहून हिंदुस्थानांत परत आल्यावर रायचंदभाई या सत्पुरुषाच्या संगतीमुळें या धर्मजिज्ञासेला आत्मप्राप्तीचें किंवा मोक्षप्राप्तीचें स्वरूप कसें येऊं लागलें होतें, त्याचा निर्देश करण्यांत आलेलाच आहे. रायचंदभाईंच्या सहवासामुळें गांधीजी हे जे केवळ धर्मजिज्ञासु होते ते मुमुक्षु बनले, आणि स्थितप्रज्ञाची अनासक्त वृत्ति आपल्या अंगीं बाणावी आणि आपला व्यवसाय करीत असतांही जीवन्मुक्ताची अंतःशांति आपणास प्राप्त व्हावी अशी तीव्र लालसा त्यांच्या अंतःकरणांत वाढूं लागली. मनाच्या अशा अवस्थेंत ते दक्षिण आफ्रिकेला गेले. रायचंदभाईंच्या उदाहरणावरून आपण आपला व्यवसाय करीत असतांही आपणास स्थितप्रज्ञाची अवस्था प्राप्त करून घेतां येईल व टिकवितां येईल, असें त्यांना वाटत होतें. अर्थात् त्यासाठीं आपला धंदा सोडण्याचें किंवा कर्मसंन्यास घेण्याचें त्यांना कारण वाटलें नाहीं. पुढें ते दक्षिण आफ्रिकेंत गेल्यापासून त्यांची ही मुमुक्षा अतिशय तीव्र होऊन त्यांनीं तिच्या शांतीसाठींच लोकसेवेचें व्रत घेतलें आणि सत्याग्रहाचें राजकारण शोधून काढून त्याचा झेंडा उभारला. या सत्याग्रहाच्या धर्माचें दर्शन त्यांना पूर्णपणें प्राप्त होण्यास दक्षिण आफ्रिकेंत सार्वजनिक लोकसेवेची तपश्चर्या बारा वर्षें करावी लागली. आणि आत्मोन्नतीसाठीं व आत्मदर्शनासाठीं निरनिराळ्या धर्मांच्या संस्थापकांनीं लिहिलेल्या ग्रंथाचें अध्ययन करून त्यांना धर्मविचारांचें मंथन करावें लागलें. हें करीत असतां दक्षिण आफ्रिकेंतील ख्रिस्ती धर्मांतील अनेक

धर्मनिष्ठ प्रचारकांशीं त्यांचा सहवास घडला, स्नेह जडला आणि त्यांनीं विचारविनिमय केला. विलायतेंत असतांच त्यांनीं भगवद्गीता आणि बायबल यांच्या अध्ययनास सुरवात केली होती, आणि दोहोंतही सांगितलेला आत्मप्राप्तीचा, प्रेमाचा आणि सत्यनिष्ठेचा सिद्धांत एकच आहे अशी त्यांची भावना व बुद्धीची धारणा होऊं लागली होती. दक्षिण आफ्रिकेंत गेल्यानंतर पहिलें वर्ष त्यांनीं प्रिटोरिया या ट्रान्सवालमधील शहरांत घालविलें. तेथें गेल्यापासून त्यांचा ख्रिस्ती मिशनरी लोकांशीं किंवा पाद्री लोकांशीं ताबडतोब संबंध आला, हा एक योगायोगच म्हटला पाहिजे.

प्रिटोरियांत त्यांच्या अशिलानें जो वकील दिला होता त्याचें नांव मि. बेकर असें होतें. मि. बेकर हे गृहस्थ जसे वकील होते तसेच ते धर्मनिष्ठ पाद्रीही होते. अर्थात् प्रिटोरियात गेल्यानंतर मि. बेकर यांचीच त्यांना प्रथम गांठ घ्यावी लागली आणि त्या वेळेपासून मि. बेकर यांनीं गांधीजींना ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करण्याचा उपदेश सुरू केला. गांधीजींची धर्मजिज्ञासा व मुमुक्षु वृत्ति या वेळीं इतकी तीव्र व जागृत झालेली होती कीं, तिच्या समाधानासाठीं ते वाटेल तो त्याग करण्यास व तसें करणें आवश्यक आहे अशी बुद्धीची खात्री झाल्यास, मोक्षप्राप्तीसाठीं धर्मांतर करण्यासही तयार होते. परंतु मोक्षप्राप्तीसाठीं आपणांस किंवा इतर कोणासही स्वतःचा धर्म सोडावा लागेल अशी त्यांची त्या वेळीं भावना नव्हती, व पुढेंही त्यांना तसें कधीं वाटलें नाहीं. सर्व धर्मांचा निर्विकार व निःपक्षपाती बुद्धिनें अभ्यास करावयाचा व मग आपल्या अंतरात्म्यास जी प्रेरणा होईल तिच्याप्रमाणें वागावयाचें असा त्यांनीं निर्धार केला. मि. बेकर यांचें एक धर्ममंडळ होतें. त्या धर्ममंडळांत गांधीजी जात असत, आणि त्या मंडळाच्या सार्वजनिक प्रार्थनेंत भागही घेत असत. मि. बेकर यांनीं एक प्रार्थना-मंदिर स्वतःच्या खर्चानें बांधलेलें होतें. रोज दोनप्रहरीं एक वाजतां त्या मंदिरांत जमून ही मंडळी आपणांस आत्म्याची शांति व प्रकाश (आत्मज्ञान) प्राप्त होण्यासाठीं प्रार्थना करीत असत. या मंडळांत मि. कोट्स या नांवाचे असेच एक तरुण धर्मनिष्ठ गृहस्थ होते. ख्रिस्ती धर्मांतील क्वेकर पंथाचे ते अनुयायी होते.

मि. कोट्स यांचा आणि गांधीजींचा बराच स्नेहसंबंध वाढत गेला आणि त्यांच्या शिफारशीनें त्यांनीं धर्मासंबंधीं पुष्कळच वाङ्मय वाचलें. हें वाङ्मय वाचीत असतांनाच त्यांनीं टॉलस्टॉयचे ग्रंथ वाचण्यास सुरवात केली आणि त्यांपैकीं "परमेश्वरी राज्य तुमच्या अंतःकरणांतच आहे" (देव आहे अंतर्यामीं) या नांवाचें पुस्तक त्यांना मिळालें व तें त्यांनीं वाचलें. या पुस्तकाचा त्यांच्या मनावर फारच पगडा बसला. समाजाच्या सर्व प्रकारच्या व्यवहारांत सत्यनिष्ठा आणि अहिंसावृत्ति यांचें पालन सर्वांनीं केलें पाहिजे हाच ख्रिस्ती धर्माचा व इतर सर्व धर्मांचा मूलभूत सिद्धांत आहे, व तो त्रिकालाबाधित आहे, असें विवेचन त्यांत केलेलें आहे. आधुनिक मानवसंस्कृति या सिद्धांतापासून ढळलेली आहे, आणि म्हणूनच तिच्यावर अनेक आपत्ति ओढवत आहेत. या सर्व आपत्तींचा विनाश करावयाचा तर सर्व धर्मांनीं सांगितलेला हा आध्यात्मिक सिद्धांत मानवसंस्कृतीला आधारभूत बनविला पाहिजे, आणि तसें करण्यासाठीं आजच्या मानवसंस्कृतीचें भौतिक अधिष्ठान उखडून टाकून तिच्यांत एक सर्वांगीण क्रांति घडवून आणली पाहिजे, आणि ही क्रांति ज्यांनीं घडवून आणावयाची त्यांनीं सत्यनिष्ठेनें व अहिंसेनें वागण्याची प्रतिज्ञा प्रथम केली पाहिजे, म्हणजे त्यांच्याच हातून या लोकीं परमेश्वरी राज्य स्थापन होऊं शकेल, असे विचार टॉलस्टॉयनें आपल्या ग्रंथांत प्रतिपादिलेले आहेत. म. गांधींच्या सत्याग्रहनिष्ठस हीच विचारसरणी आधारभूत झालेली असून, त्यांचें सर्व राजकारण हा आदर्श पुढें ठेवूनच घडलेलें आहे. या विचारसरणींत आत्मप्राप्ति, लोकसेवा आणि राजकारण अशीं पृथक् पृथक् दालनें नाहींत. मानवाच्या सर्व व्यवहारांशीं संबंध असणारी आणि त्याच्या सर्व व्यवहारांत क्रांति घडवून आणणारी अशी ही धर्मनिष्ठा असून, या धर्मनिष्ठेंत हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी, शीख, असा भेदाभेद केलेला नाहीं. जो सत्यनिष्ठेचें आणि अहिंसेचें व्रत पाळतो तोच खरा धर्मनिष्ठ; मग ही सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ति आपल्या अंगीं बाणविण्यासाठीं तो कोणत्याही धर्मसांप्रदायाचा अनुयायी असो, अथवा कोणत्याही देवाचा तो उपासक असो. सत्य

हाच परमेश्वर किंवा परब्रह्म होय, आणि सर्व भूतमात्रासंबंधींचें प्रेम, शत्रुमित्रांसंबंधींची समदृष्टि हेंच त्या परमेश्वराच्या प्राप्तीचें सर्वश्रेष्ठ साधन होय. आपली बुद्धि सत्यनिष्ठेपासून केव्हांही विचलित होऊं नये, आपलें अंतःकरण सदैव सर्वांवर प्रेम करणारें आणि सर्वांचें हित चिंतणारें राहिलें पाहिजे, आणि आपले सर्व इंद्रियव्यापार त्या अनुसंधानानेंच घडले पाहिजेत, हेंच आत्मप्राप्तीचें खरें लक्षण होय. अशा प्रकारची मानवाची जी आदर्श अथवा पूर्ण अवस्था तीच त्याचा ऐहिक मोक्ष, आणि हा मोक्ष प्राप्त करून घेण्यासाठीं सदैव झगडत राहणें हाच अंतःशांतीचा खरा उपाय. असा हा धर्म, सर्व धर्मग्रंथांत सारखाच प्रशंसिलेला व उपदेशिलेला आढळतो. भगवद्गीता, धम्मपद, बायबल, व कुराण या सर्वांत हाच एक धर्म सांगितलेला असून, त्या सर्वांचें रहस्य एकच आहे. अशा प्रकारें सर्व धर्मांचा गाभा गांधीजींना हस्तगत करावयाचा होता. या धर्मामुळें कोणताही भेदभाव मनांत उद्भवूं शकत नाहीं, कोणताही अहंकार जागृत होऊं शकत नाहीं, आणि कोणासंबंधींही द्वेषभाव, तुच्छताबुद्धि किंवा वैर निर्माण होऊं शकत नाहीं. शत्रूवरही प्रेम करावें, दुष्टालाही साधुत्वानें जिंकावें आणि सत्यानेंच असत्याचा पाडाव करावा, या तत्त्वांवर त्याची उभारणी झालेली असल्यानें, धर्मा-धर्मांत किंवा राष्ट्राराष्ट्रांत कलह माजतील ही तर भीति मुळींच उद्भवूं शकत नाहीं. सत्याग्रही निष्ठा या वृत्तीवर आधारलेली असून, ही वृत्ति अंगीं बाणविण्यासाठीं मनुष्याला किती प्रयास पडतात व केवढी तपश्चर्या सतत करावी लागते याचें वर्णन गांधीजींनीं आपल्या आत्मकथेंत सविस्तर केलेलें आहे.

अपकाराची फेड उपकारानें करावयाची आणि लोकांनीं आपला छळ केला तरी तो शांतपणें सोसून त्याचा प्रतिकार मात्र सतत करावयाचा असा हा मार्ग आहे. यांत झुंजारवृत्ति आणि साधुवृत्ति या दोहोंचा समन्वय आहे. तसेंच आपल्या अंतःकरणांतील दुष्ट मनोवृत्तींशीं झगडा आहे. तसेंच समाजांतील अन्यायांविरुद्धही झगडा आहे. यांत समाजसेवा हें आत्मप्राप्तीचें साधन आहे; कारण समाजाचा आत्मा व

आपला आत्मा एकच आहे, या अनुभवांतून विश्वाच्या आत्म्याशीं एकरूप होण्याचा मार्ग चोखाळावयाचा आहे. समाजाचें रक्षण करणारी राज्यसंस्था प्रत्येक समाजांत असतेच, व ही संस्था जे अन्याय करते अथवा ज्या अन्यायांना आपला पाठिंबा देते, त्या अन्यायांविरुद्ध झगडणें हा या समाजसेवेचा एक अवश्य भागच होऊन बसतो. राजसत्तेच्या अन्यायांविरुद्ध झगडणें हें एक राजकारणच आहे व ज्यांनीं समाजसेवा हें आपल्या आत्मप्राप्तीचें साधन बनविलें त्यांना ही सेवा करीत असतां राजसत्तेच्या अन्यायांविरुद्ध झगडण्याचें हें राजकारणही थोडेंफार करावें लागतें. अशा प्रकारें आत्मदर्शन, समाजसेवा व राजकारण हीं गांधीजींच्या जीवनांत एकरूप झालेलीं होतीं. ते मोक्षार्थी होते, तरी ते कर्मसंन्यासी नसून कर्मयोगी होते, आणि ते राजकीय कर्मयोगी होते. मात्र ते ज्या राजकारणांत हिंसेचा साधन म्हणून उपयोग करावा लागतो असें राजकारण करीत नव्हते.

त्यांचें राजकारण हें राजधर्मांतील नसून तें प्रजाधर्मांतील होतें, व त्यांची वृत्ति असंग्रही यतीची होती. असंग्रहीवृत्ति व अहिंसावृत्ति यांचा परमोत्कर्ष जरी यतिधर्मांत झालेला असला तरी सर्व समाजाचें ध्येय तेंच असलें पाहिजे, आणि प्रजाधर्माची प्रगति वाढत्या दिशेनेंच होत राहिली पाहिजे, व यति हेच समाजाचे खरे नेते असून अहिंसा हीच समाजधारणा करणारी खरी शक्ति आहे हें म. गांधींनीं समाजाच्या मनावर ठसविलें. राज्यसंस्थेला खरा आधार सत्याचा व न्यायाचा असला पाहिजे. पण तसें नेहमींच असत नाहीं. तेव्हां अन्यायाच्या व्यवहारांना पाठिंबा देणाऱ्या राज्यसंस्थेविषयीं प्रजेनें कोणती वृत्ति स्वीकारावी असा प्रश्न उपस्थित होतो. सामान्यतः राजानिष्ठ राहून कायदे पाळणें हें प्रजेचें राजकीय कर्तव्य मानिलें जातें. पण कायदा हा न्यायासाठीं असतो आणि जे कायदे अन्याय करतात ते पाळणें हा प्रजाधर्म कसा व किती प्रमाणांत होऊं शकतो, असे प्रश्न उपस्थित होतात. पण कायदे मोडण्याची संवय समाजांतील व्यक्तींना लागेल तर समाजांत अंदाधुंदी माजेल व त्या अंदाधुंदींतून प्रस्थापित राज्ययंत्र मोडून पडलें

तरी जें नवें राज्ययंत्र त्याच्या जागीं येईल तें अधिक वाईट येणार नाहीं याबद्दल कोणती दक्षता घ्यावी व अन्यायाचे कायदे मोडण्यास जनतेला प्रवृत्त करतांना तिच्या अंगीं न्यायनिष्ठा वाढत जाईल अशी दक्षता कशी घ्यावी हें प्रजाधर्मांतील राजकारण करणाऱ्यांपुढें अत्यंत बिकट प्रश्न आहेत. या प्रश्नांचीं आजपर्यंत दोनच उत्तरें देण्यांत येत असत. एक तर कायदे कितीही अन्यायाचे असले व राजसत्ता कितीही जुलमी असली तरी कायदे पाळणें व राजनिष्ठ राहणें हेंच प्रजेचें कर्तव्य आहे. दुसरें म्हणजे राजसत्तेनें फार जुलूम केला तर प्रजेनें आपल्या हातीं शस्त्र घेऊन तें राज्ययंत्र मोडून टाकावें व त्या जागीं दुसरें राज्ययंत्र उभें करावें. हा दुसरा मार्ग सशस्त्र क्रांतीचा मार्ग होय. पहिला मार्ग हा प्रजेला गुलामी करणारा व अन्यायाला मदत करणें हाच प्रजाधर्म असें शिकविणारा असल्यानें त्याला धर्म किंवा कर्तव्य हें नांव शोभत नाहीं, व त्याचें नैतिकदृष्ट्या समर्थनही होऊं शकत नाहीं. अन्यायाला न्याय, अकर्तव्याला कर्तव्य म्हणणें, अनितीला नीति अथवा अधर्माला धर्म म्हणण्यासारखेंच आहे. या गुलाम धर्मापेक्षां सशस्त्र क्रांतीचा मार्गही अधिक श्रेष्ठ ठरेल, पण त्यांतही धोका आहे व सशस्त्र क्रांतीनंतर उभें केलें जाणारें राज्ययंत्र अधिकच अन्यायी ठरण्याचा धोका असतो. या दोनही आपत्ति टाळण्यासाठीं म. गांधींनीं अहिंसा व सत्यनिष्ठा हीं तत्त्वें न सोडतां समाजांत क्रांति करण्याचा, सविनय कायदेभंगाचा, अनत्याचारी असहकाराचा किंवा सत्याग्रहाचा मार्ग शोधून काढिला, व त्या मार्गाचे राजकीय प्रयोग दक्षिण आफ्रिका व हिंदुस्थान या ठिकाणीं केले; पण सत्याग्रह-वृत्तीनें कायदेभंग करण्याचें राजकारण करण्यापूर्वी बारा वर्षें त्यांनीं कायदेशीर व राजनिष्ठ राजकारण केलें, अनेक प्रकारें समाजसेवा केली. ही समाजसेवा करण्यासाठीं असंग्रह, ब्रह्मचर्य, हीं व्रतें घेतलीं. अद्वेष व निर्वैरवृत्ति अंगीं बाणविण्याचा सतत प्रयत्न केला. अनेक प्रकारचा देहदंड व छळ करणाऱ्या व्यक्तींसंबंधींही औदार्याची, क्षमेची व प्रेमाची वृत्ति धारण केली. यामुळेंच सत्याग्रही राजकारणाचा यशस्वी प्रयोग करण्याचा अधिकार त्यांच्या अंगीं आला व हा प्रयोगही आठ वर्षांनंतर,

हजारों लोकांच्या बंदिवासानंतर व हिंदुस्थान सरकार, हिंदी राष्ट्रीय पुढारी व ब्रिटिश साम्राज्य सरकार यांच्या मध्यस्थीनंतर यशस्वी झाला. पण हें यश प्रारंभीं कोणास दिसणें शक्य नव्हतें. ही सर्व तपश्चर्या व कष्ट आपल्या आंतरिक निष्ठेनें व अनासक्त कर्तव्यबुद्धीनें म. गांधी करीत होते. या अनासक्त कर्तव्यनिष्ठेसच गांधीजी सत्यनिष्ठा असें म्हणतात. या सत्यनिष्ठेनेंच ते कायदे पाळीत असत व या सत्य-निष्ठेसाठींच ते कायदे मोडीतही असत. ते लोकांना राजनिष्ठ राहण्याचाही उपदेश करीत व राजद्रोही बनण्याचाही उपदेश करीत ; पण हे दोनही उपदेश आपण सत्याच्या आग्रहासाठींच करतों असेंही ते म्हणत ; आणि हें सर्व करणें हाच माझा धर्म आहे असें सांगत. त्यांनीं सांगितलेला हा प्रजाधर्म आचरणारांत जसे हिंदु होते तसे मुसलमानही होते, जसे पार्शी होते तसे ख्रिस्तीही होते, आणि ते सर्व आपापल्या धर्माचा असाच उपदेश आहे असेंही म्हणत. इतकेंच काय, तर ज्या गोऱ्या युरोपियन लोकांविरुद्ध म. गांधी दक्षिण आफ्रिकेंत व हिंदुस्थानांत मिळून सतत पन्नास वर्षे झगडले, ते युरोपीय गोरे लोकही आज म. गांधींना येशू ख्रिस्ताचा आदेश आचरणारा आधुनिक धर्म-पुरुष असें मानतात, आणि कोणताही धर्म न मानणारे कम्युनिस्ट व समाजवादी हेही गांधींना एक क्रांतिकारक लोकनायक व आदर्श मानव असें मानितात. अर्थात् याचा अर्थ त्यांचीं सर्व मतें सर्वांना मान्य अहित असा मात्र नव्हे.

म. गांधींची प्रकृति निष्ठावंत व भावनाशील होती. मातापिता यांच्यावरील त्यांचें प्रेम आणि असत्याची चीड या भावना त्यांच्या अंतःकरणांत मूळपासूनच प्रबल होत्या. श्रावण आणि हरिश्चंद्र यांच्याकडे त्यांचें चित्त अगदीं बालपणापासून वेधिलें गेलें होतें. आपली हिंदु धर्मावरील भक्ति ही स्वतःच्या मातेसंबंधींच्या भक्तीसारखी किंवा पत्नी-वरील प्रेमासारखी गाढ आणि अनिर्वचनीय आहे असें ते म्हणत. पण ही त्यांची स्वधर्मनिष्ठा केव्हांही व्यावर्तक स्वरूपाची किंवा संकुचित स्वरूपाची झाली नाहीं. आपण जसा आपल्या मातेस मान देतों तसा इतरांनीं आपापल्या मातेस मान देणें हें स्वाभाविक व योग्य आहे ही जशी

आपली समजूत असते त्याचप्रमाणें प्रत्येकानें आपआपल्या धर्मास मान द्यावा हेंच योग्य आहे. कारण, सर्व धर्म तत्त्वतः एकच आहेत हें मत त्यांच्या मनावर बालपणापासूनच इतकें भिनलेलें होतें कीं, सर्व धर्मांसंबंधींची समदृष्टि हा त्यांचा सहजस्वभाव बनला होता. त्यांतून ख्रिस्ती धर्मासंबंधीं त्यांच्या मनांत प्रथमतः जो थोडासा आनादर उत्पन्न झाला होता तो ते इंग्लंडांत उच्च शिक्षणासाठीं प्रथम गेले त्याच वेळीं त्यांच्या मनांतून नष्ट झाला, आणि ख्रिस्तासंबंधींचा व त्याच्या उपदेशासंबंधींचा त्यांचा आदर एकसारखा वाढत गेला. अक्रोध आणि अद्वेष या वृत्ति वाढविणें हेंच आपलें आद्य कर्तव्य आहे, व तें आपणांस जी लोकसेवा करावयाची तिला आधारभूत असलें पाहिजे अशी त्यांची वृत्ति दक्षिण अफ्रिकेंत गेल्यापासून अधिकाधिक वाढूं लागली. दरबान बंदरापासून प्रिटोरियापर्यंत त्यांनीं जो प्रवास केला त्या प्रवासांत त्यांना अपमान आणि देहदंड सोसण्याचे प्रसंग कसे आले तें मागें दिलेंच आहे. या अपमानांचा प्रतिकार करणें हें आपलें कर्तव्य आहे ही बुद्धि जागृत झाली तरी त्यांत आपल्या वैयक्तिक अपमानांचा मोबदला किंवा सूड घेण्याची वृत्ति जशी त्यांनीं धारण केली नाहीं, तशीच ज्या व्यक्तींनीं आपला अपमान केला किंवा आपणांवर आघात केला त्या व्यक्तींसंबंधींचा द्वेष किंवा वैर त्यांनीं आपल्या मनांत धरलें नाहीं. त्यांच्या मनांत ही जी अद्वेषाची किंवा निर्वैरत्वाची भावना या वेळपासून वाढूं लागली तिची जोपासना ते कर्तव्यबुद्धीनें करीत गेले. असें करतांना त्यांना ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा विशेष आधार मिळाला; तथापि भगवद्गीतेंतही असाच अद्वेषाचा व निर्वैराचा उपदेश केलेला आहे, असें त्यांचें मत त्या वेळेच्या पूर्वीपासूनच असल्यानें, आपण हा उपदेश शिकण्यासाठीं ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली पाहिजे असें त्यांना केव्हांही वाटलें नाहीं. येशू ख्रिस्त हाच एक अवतारी पुरुष आहे व त्याला अनन्यसाधारण धर्मपुरुष मानिल्यावांचून मनुष्यास आत्मदर्शन किंवा मोक्षप्राप्ति होणार नाहीं असें जें मत त्यांचे ख्रिस्ती मित्र त्यांना उपदेशीत तें त्यांना केव्हांही पटलें नाहीं. टॉलस्टॉयच्या ग्रंथांचा त्यांच्या मनावर

विलक्षण पगडा बसला. त्यांतही सर्वधर्मसमत्वाचीच मांडणी केलेली त्यांना आढळली, आणि म्हणून स्वधर्मनिष्ठा म्हणजे केवळ आपलाच धर्म श्रेष्ठ मानणें असा अर्थ जसा त्यांनीं कधीं केला नाहीं, तसाच ख्रिस्ती मिशनरी करीत असलेला इतरांच्या धर्मांतराचा प्रयत्न हाही त्यांना कधींही अनुकरणीय वाटला नाहीं. हिंदु धर्म हा मला श्रेष्ठ वाटतो म्हणून मी त्या धर्माची दीक्षा इतर धर्मांच्या लोकांना द्यावी हें मत त्यांना योग्य वाटत नव्हतें. एकमेकांनीं एकमेकांच्या धर्मांपासून जें शिकण्याजोगें असेल तें शिकावें आणि आपापल्या धर्माची शुद्धि करावी. त्यासाठीं कोणीं कोणाचा धर्म स्वीकारण्याची आवश्यकता नाहीं. हीच त्यांची वृत्ति स्वदेशाभिमानासंबंधींही होती. प्रत्येकानें आपआपल्या देशाची सेवा करावी, पण आपल्या देशाच्या सेवेसाठीं किंवा भक्तीसाठीं इतर देशांतील लोकांना त्रास द्यावा, त्यांची अवहेलना करावी, किंवा त्यांचा द्वेष करावा, असा देशभक्तीचा अर्थ करणें योग्य नाहीं. देशभक्ति व स्वदेशसेवा हीं वस्तुतः मानवभक्तीची प्रेरणा बनलीं पाहिजेत. सर्व मानवांची सेवा करावयाची म्हटलें तरी निरनिराळ्या लोकांनीं आपआपलें सेवाक्षेत्र वांटून घेतलें पाहिजे. ही वांटणी करतांना ज्याचा जो देश त्याची सेवा त्यानें करावी. असा श्रमविभाग हा एक नैसर्गिक श्रमविभाग असून त्यामुळें प्रत्येकाची सेवा करण्याची शक्ति अधिकांत अधिक फलप्रद होऊं शकते. म्हणूनच म. गांधींनीं दक्षिण आफ्रिकेंत गोरे युरोपियन, काळे हिंदी, आणि मूळचे आफ्रिकन, असे तीनही प्रकारचे लोक असतांना, त्यांतील हिंदी लोकांच्या सेवेचें कार्य आपल्या अंगावर घेतलें. हिंदी लोक हे आपल्या देशांतील या दृष्टीनें त्यांची सेवा करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे असें जरी ते मानीत होते, तरी गोऱ्या युरोपियन लोकांचा किंवा मूळच्या आफ्रिकन लोकांचा स्नेह संपादन करण्याची व त्यांची सेवा करण्याची जी जी संधि त्यांना लाभली ती त्यांनीं केव्हांही फुकट जाऊं दिली नाहीं. त्यांच्यासंबंधींचा द्वेषभाव, इतकेंच नाहीं तर दूरीभावही, त्यांनीं आपल्या वर्तनांत कधींही प्रकट केला नाहीं. सत्याग्रह व कायदेभंग या साधनांनीं तेथील गोऱ्या लोकांच्या सरकाराविरुद्ध व

समाजाविरुद्ध पुढें ते झगडूं लागले तेव्हांही त्यांच्या कार्यांत अनेक गोऱ्या युरोपियन लोकांचें सहकार्य त्यांना लाभलें होतें व अनेकांनीं त्यांच्याबरोबर सत्याग्रहांत भाग घेऊन तुरंगवासही पतकरला होता. ही त्यांची सर्व धर्मांच्या व सर्व देशांच्या लोकांसंबंधींची 'वसुधैव कुटुंबक' वृत्ति त्यांनीं प्रयत्नपूर्वक साध्य करून घेतलेली कृत्रिम वृत्ति नव्हती, तर ती एक बाळपणापासून वाढत आलेली स्वाभाविक वृत्ति होती असें ते लिहितात.

ज्याप्रमाणें आपल्या कुटुंबांतील व्यक्तींची सेवा व शुश्रूषा आपण करतों त्याचप्रमाणें आपल्या घरीं आलेल्या पाहुण्यांची सेवा व शुश्रूषा आपण केली पाहिजे याबद्दल त्यांचा आग्रह असे; तसेंच कोणीहीं आजारी किंवा रोगी पाहिला कीं त्याची सेवा करण्याची ही वृत्ति त्यांच्या अंतःकरणांत एकदम उसळून येई. दक्षिण आफ्रिकेंत राहत असतां, त्यांनीं आपल्या घरीं येणाऱ्या सर्व धर्मांच्या व सर्व जातींच्या पाहुण्यांची सर्व प्रकारची सेवाशुश्रूषा स्वतः केली व आपल्या धर्मपत्नीसहीं करावयास लावली. कांहीं कांहीं वेळां त्यांनीं रस्त्यानें जात असतां भेटलेल्या महारोग्यांना घरीं आणून त्यांची सेवा केलेली आहे. आणि प्लेगसारख्या साथी आल्या तेव्हां, किंवा युद्धासारखीं संकटें ओढवलीं तेव्हां, त्यांत सांपडलेल्या रोग्यांची व जखमी घायाळांची शुश्रूषा करण्याची संधि मिळावी म्हणून त्यांनीं शुश्रूषा पथकें व रुग्णालयें चालविण्यांत पुढाकार घेतला. अशा तऱ्हेनें हें त्यांचें सेवाकार्य हा एक त्यांचा धर्मदीक्षेचा व आत्मोन्नतीचाच भाग होता.

ते आपल्याकडून आपल्या प्रतिपक्षासंबंधीं अशा प्रकारची निर्वैरत्वाची व अद्वेषाची भावना ठेवून आपलें समाजसेवेचें व राजकारणाचें कार्य करीत असले तरी, त्यांच्यासंबंधीं प्रतिपक्षाला कधीं राग आला नाहीं किंवा त्यांचें वैर प्रतिपक्षानें केलें नाहीं असा मात्र याचा अर्थ नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत कायमचें राहण्याचें ठरवून, एकदोन वर्षें धंदा चालवून, सार्वजनिक चळवळ केल्यानंतर इ. स. १८९६ च्या मे महिन्यानंतर ते हिंदुस्थानांत परत आले व तेथें आफ्रिकेसंबंधीं माहिती देणारीं व्याख्यानें

व पत्रकें यांच्या साधनांनीं आफ्रिकेंतील हिंदी बांधवांसंबंधीं त्यांनीं येथील लोकांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली. त्या वेळीं त्यांनीं जी चळवळ केली व जीं पत्रकें काढलीं, त्यांच्यामुळें येथें फार खळबळ झाली. याच वेळीं इंग्लंडांतही या प्रश्नासंबंधीं चर्चा सुरू झाली, आणि येथील चळवळीची माहिती इंग्लंडांत जाऊन, तेथील वृत्तपत्रांनींही आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या प्रश्नाकडे ब्रिटिश सरकारचेंही लक्ष वेधलें. या सर्व बातम्या, थोड्याफार विपर्यस्त व अतिरंजित स्वरूपांत दक्षिण आफ्रिकेंतील गोऱ्या लोकांना व तेथील सरकारला जेव्हां समजल्या तेव्हां त्या समाजांत गांधीद्वेषाची एक प्रचंड लाट उसळली. आतां पुन्हां त्यांना आपल्या देशांत येऊं देऊं नये, आणि येण्याचा प्रयत्न केल्यास हद्दपार करून परत आपल्या देशीं धाडावें, अशी मागणी गोऱ्या समाजाकडून होऊं लागली. इ. स. १८९६ सालच्या अखेरीस म. गांधी आपलें कुटुंब घेऊन, कायमचे राहण्यासाठीं कलकत्त्याहून निघून दरबान बंदरास येऊन पोंचले. त्यांची बोट बंदरास लागण्याची वेळ येईपर्यंत तेथील गोरा समाज म. गांधींच्याविरुद्ध अत्यंत खवळून गेलेला होता. गांधींनीं आपल्या समाजाचा दुर्लौकिक जगभर केला, आपणांवर खोटे आरोप केले, आम्ही हिंदी लोकांना पशूप्रमाणें वागवितों असें म्हटलें, आणि आतां आपल्याबरोबर शेंकडों हिंदी लोक घेऊन ते आफ्रिकेस येत आहेत, आणि अशा तऱ्हेनें दर महिन्यास शेंकडों लोक हिंदुस्थानांतून आफ्रिकेस आणण्याची योजना त्यांनीं आंखलेली आहे, अशा भरमसाट अफवा तेथें पसरविण्यांत आल्या होत्या. म. गांधी आपल्या कुटुंबासह ज्या बोटीनें गेले तिच्याबरोबर आणखीही एक बोट होती व या दोन्ही बोटींवर मिळून एकंदर सातआठशें लोक होते. त्यांपैकीं कांहीं दक्षिण आफ्रिकेंतून हिंदुस्थानास गेलेले परत आलेले होते, कांहीं नवे होते व कांहीं नाताळांत उतरून दुसरीकडे जाणारेही होते. वस्तुतः त्यांना म. गांधींनीं बोलावून नेलेलें नव्हतें, किंवा त्यांचा म. गांधींच्याशीं कोणताही संबंध नव्हता ; पण या दोन्ही बोटींतील उतारूंना आपल्या बंदरांत उतरूं देऊं नये, त्यांना हिंदुस्थानांत परत धाडावें, नाहीं तर आम्ही त्या बोटी बुडवून टाकूं, अशी हाकाटी

गोऱ्या लोकांनीं सुरू केली. सरकारनें म्हणजे बंदरावरील अधिकाऱ्यांनीं त्या बोटी आंत घेतल्या नाहींत व कोणताही साथीचा रोग नसतांना त्यांना क्वारंटाईन म्हणून चोवीस दिवस बंदराबाहेर लांबकळत ठेवण्यांत आलें. यानंतर म. गांधींच्या बोटीच्या कप्तानानें बंदरावरील अधिकाऱ्यास असें कळविलें कीं, आम्ही आतां असे बंदराबाहेर राहणार नाहीं, आम्हीं बंदरांत घुसूं, बोटींतील उतारूंचें रक्षण करणें हें येथील सरकारचें कर्तव्य आहे, व तें कर्तव्य पार न पाडल्यास साम्राज्य सरकार काय तो जाब तुमच्या सरकारास विचारील. असा निर्वाणीचा खलिता गेल्यानंतर बोटी बंदरास लागल्या. तो दिवस इसवी सन १३ जानेवारी १८९७ होता.

बोटींवरील इतर उतारू उतरण्यांत जरी धोका नव्हता, तरी गांधी व त्यांचें कुटुंब यांना उतरणें धोक्याचें आहे, असा इषारा पोलिस अधिकाऱ्यांकडून आलेला होता, व म्हणून त्यांनीं संध्याकाळपर्यंत वाट पहावी व संध्याकाळीं सुपरिंटेंडेंटनीं त्यांना घेऊन जावें असा विचार ठरला होता. थोड्या वेळानें म. गांधींच्या कुटुंबास दुसऱ्यांच्याबरोबर पाठविण्यांत आलें व त्यांच्या पत्नी व दोन मुलें पार्शी रुस्तुमशेटजी यांच्या घरीं जाऊन पोंचल्याची बातमी आली. यानंतर थोड्या वेळांत बोटीच्या एजंटाचा वकील मि. लॉटन हा तेथें आला व मी म. गांधींना घेऊन जातों, त्यांना आतां कांहीं इजा होणार नाहीं, वादळ शांत झालें आहे, असें म्हणून म. गांधींना घेऊन गेला. अशा प्रकारें म. गांधी व लॉटन हे बंदरांतून बाहेर पडून रस्त्यास लागले तोंच गोऱ्या लोकांचा एक मोठा घोळका त्यांच्यावर धांवून आला आणि त्यांची पगडी उडवून देऊन त्यांच्यावर अंडीं, दगड, यांचा वर्षाव होऊं लागला, आणि कांहींनीं त्यांना लाथाबुक्क्यांनीं मारण्यासही सुरवात केली. इतक्यांत पोलिस सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर यांची बायको तेथें आली व तिनें मोठ्या धैर्यानें पुढें जाऊन म. गांधींची सुटका केली, आणि लवकरच सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर हे एक पोलिसची तुकडी घेऊन आले व म. गांधींना त्यांची मंडळी होती तिकडे म्हणजे रुस्तुमशेटच्या बंगल्यांत घेऊन गेले. इतकें होईपर्यंत हजारों लोकांचा घोळका त्या घराभोंवतीं

जमला, आणि गांधींना आमच्या हवालीं करा, नाहीं तर आम्ही घर जाळून टाकूं अशा धमक्या देऊं लागला ; तेव्हां पोलिस सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर यांनीं म. गांधींना सुचविलें कीं, तुम्ही आतां पोलिसाचा वेष घेऊन बाहेर पडा, आणि आमच्या पोलिसठाण्यावर जाऊन रहा ; नाहीं तर तुमच्या या पार्शी मित्राचें घर जळून खाक होईल व तुमच्या-सह, तुमच्या मुलांबाळांचीही त्यांत राखरांगोळी होईल. अर्थात् त्या वेळीं पोलिस सुपरिंटेंडेंटचा हा सल्ला ऐकण्यावांचून म. गांधींना गत्यंतरच उरलें नव्हतें. तो सल्ला ऐकून म. गांधी पोलिसठाण्यावर जाऊन पोंचले. ही बातमी समजतांच पोलिस सुपरिंटेंडेंटनीं आतां तुमचें सावज तुमच्या आटोक्याबाहेर गेलें असें सांगून जमावाला हताश केलें, व म. गांधी गेल्याची माहिती कळल्यानंतर तो जमाव निराश होऊन आपआपल्या घरीं निघून गेला.

अशा प्रकारें गोऱ्या युरोपियन समाजाचें जें एक भयंकर वादळ म. गांधींच्याविरुद्ध उठलें होतें तें लवकरच शांत झालें. म. गांधींनीं हिंदुस्थानांत जीं भाषणें केलीं होतीं तीं छापून काढिलेलीं होतीं. तीं तेथील वृत्तपत्रांकडे पाठविण्यांत आलीं तेव्हां युरोपियन वृत्तपत्रांनीं आपण गांधींच्यावर जे खोटे आरोप केले त्याबद्दल खेद प्रदर्शित केला, आणि गांधींनीं आफ्रिकेंत असतांना जी टीका युरोपियन लोकांवर व सरकारवर केली होती त्याहून अधिक कांहीं हिंदुस्थानांत सांगितलें नाहीं व अशी टीका करण्याचा कायदेशीर हक्क त्यांना आहे हें त्यांनीं कबूल केलें. याच्या उलट म. गांधींनीं एवढें वादळ उठलें असतांही जी धीराची, शांततेची व निर्वैराची वृत्ति दाखविली ती पाहून सुविचारी युरोपियनांत म. गांधींची प्रतिष्ठा अधिक वाढली आणि आपल्या गोऱ्या समाजानें जी गुंडगिरी केली ती पाहून त्याच्यांतील शहाण्या लोकांना पश्चात्तापही होऊं लागला. नाताळमधील ॲटर्नी-जनरल मि. एस्कोंब यांनीं या गांधीविरोधी चळवळीचा उठाव करण्यांत भाग घेतला होता. हें प्रकरण घडल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं एकदां मि. एस्कोंब हे म. गांधींना भेटले व आपल्या कृत्याबद्दल त्यांनीं गांधीजींची माफी मागितली. अर्थात् गांधीजींनीं त्यांना आधींच क्षमा केलेली होती.

ही गोष्ट होऊन अर्धा तास होण्याच्या आंतच मि. एस्कोंब हे रस्त्यावरच हृदयक्रिया बंद पडून एकाएकीं मरण पावल्याचें आढळून आलें!

१८९७ सालींच वसाहतमंत्री मि. चेंबर्लेन यांनीं हिंदी लोकांचा मताधिकार काढून घेणारा वर्णभेदमूलक कायदा रद्द करविला, तेव्हां एकप्रकारें म. गांधींचा विजय झाला असेंच वाटलें. पण पुढें लवकरच दुसऱ्या स्वरूपांत हिंदी लोकांना या अधिकारापासून व्यवहारतः दूर ठेवणारा कायदा झाला हें खरें असलें तरी १८९७ नंतर म. गांधींच्या संबंधींचा आदर गोऱ्या लोकांतही वाढूं लागला व त्यांच्या नेतृत्वाला हिंदी लोकही मनःपूर्वक पाठिंबा देऊं लागले. यानंतर हिंदी लोकांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्यास व त्यांची सर्वांगीण सुधारणा करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. १८९७ व १८९९ सालीं हिंदुस्थानांत दोन मोठे दुष्काळ पडले; तेव्हां आपल्या देशबांधवांस मदत करण्याचें कर्तव्य पार पाडण्यासाठीं दक्षिण आफ्रिकेंत मोठा फंड म. गांधींनीं उभारला व तो इकडे पाठविण्यांत आला. आतां हिंदुस्थानांत कोणतीही आपत्ति उद्भवली कीं असे पैसे दक्षिण आफ्रिकेंतील लोक इकडे पाठवितात असा प्रघातच पडला आहे. तसेंच हिंदी लोकांचीं राहणी अधिक स्वच्छतेची व्हावी, त्यांचें आरोग्य सुधारावें, त्यांच्या धर्मादाय संस्था निघून औषधपाण्याची मोफत सोय व्हावी, अशाही खटपटी ते करीत. कांहीं दिवस ते अशा धर्मादाय दवाखान्यांत औषधें तयार करून रोग्यांना देण्याचें व त्यांची परिचर्या व शुश्रूषा करण्याचें काम रोज दोन तास नियमानें करीत असत.

अशा प्रकारें हिंदी समाजांत एकजीव व चैतन्य निर्माण करून त्याला आपल्या हक्कांबरोबर कर्तव्यांचीही जाणीव करून देत असतांना दक्षिण आफ्रिकेंत इंग्रज व डच वसाहतवाले यांच्यांत बोअर युद्ध म्हणून प्रसिद्ध असलेलें युद्ध सुरू झालें. या युद्धाच्या वेळीं हिंदी समाजानें ब्रिटिशांची बाजू घेऊं नये असें अनेक हिंदी लोकांना मनांतून वाटत होतें, व स्वतः म. गांधींनाही इंग्रजांची बाजू न्यायाची वाटत नव्हती. असें असलें तरी आपण ज्या साम्राज्याचे घटक व

नागरिक म्हणून आपणांस समानतेचे हक्क मिळविण्याचे प्रयत्न करीत आहों, त्याच्या शत्रूस मिळणें व तें साम्राज्य मोडण्यास साहाय्य करणें हें योग्य नाहीं असाच निर्णय म. गांधींच्या मनानें व बुद्धीनें दिला. ब्रिटिशांचा पराभव झाला तर आपणावर डच लोक सूड घेतील या दृष्टीनें आपण या वेळीं ब्रिटिश राज्याला मदत न करणें हेंही नैतिक-दृष्ट्या त्यांना न्यायाचें वाटलें नाहीं. केवळ हिंदी लोकांना वाग-विण्याच्या दृष्टीनें व स्वार्थाच्या दृष्टीनें इंग्रज व डच यांत कांहीं भेद करण्यासारखें नव्हतें. शिवाय आपलें सर्व राजकारण ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक या पायावर उभारलेलें असतांना आपत्प्रसंगीं त्याला दगा देणें हें प्रामाणिकपणाचें नव्हे. या प्रामाणिकपणासच ते सत्यनिष्ठा म्हणतात. जे हिंदी लोक या वेळीं इंग्रजांस साहाय्य करूं नये असें म्हणत होते, ते युद्ध संपल्यावर पुनः त्या साम्राज्याचे नागरिक म्हणून हक्कांची याचना करणारच होते. इतकेंच नाहीं तर आपल्या मनांतील राजद्रोह प्रकट करण्याचें त्यांना धैर्य नव्हतें ! त्यांचें खासगी व सार्वजनिक जीवन वरकरणी तरी साम्राज्यनिष्ठेचेंच होतें. अर्थात् आपत्कालीं त्या साम्रा-ज्यास साहाय्य करणें हेंच त्यांचें कर्तव्य होतें. हें कर्तव्य पार पाडण्या-साठीं घायाळ सैनिकांच्या शुश्रूषा-पथकांत आमचें एक पथक उभार-ण्याची परवानगी आम्हांस द्या असा अर्ज त्यांनीं केला व तशी परवानगी मिळाल्यानंतर अशी स्वयंसेवकांची तुकडी स्वतः उभारून ते तिचें नेतृत्व करूं लागले.

हें बोअर युद्ध इसवी सन १९०१ पर्यंत चालू होतें. या युद्धांत म. गांधींनीं शुश्रूषा-पथक निर्माण करून घायाळ सैनिकांना रणांगणांतून उचलून दवाखान्यांत आणण्यांचें व तेथें औषधोपचार व शुश्रूषा करण्याचें जें काम केलें त्यांत त्यांची मर्दुमकी, संघटनाशक्ति, आणि हिंदी लोकांच्यावरील त्यांचें नैतिक वजन यांची चांगलीच कसोटी झाली. हिंदी लोक साम्राज्यनिष्ठेच्या आधारावर आपणांस समानतेचे हक्क मागतात, परंतु ही त्यांची साम्राज्यनिष्ठा केवळ ओंठांवरची आहे, व आपत्कालीं ते आपणांस दगा देतील असा संशय इंग्रज समाजाच्या व सरकारच्या मनांत होता. हा समज दूर करून आम्ही जसे हक्क

मागण्यांत पुढें आहों तसे कर्तव्य करण्यांत आणि त्यागपूर्वक शौर्य गाजविण्यांतही इंग्रजांच्या बरोबरीचे आहोंत हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें. अशा प्रकारें युद्धाच्या वेळीं हिंदी लोकांनीं आपणांस साह्य केलें याचा परिणाम कांहीं काल तेथील गोऱ्या लोकांचे मनावरही झाला, आणि म. गांधींचा सरकार-कडूनही गौरव झाला. त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना एक सुवर्ण-पदक देण्यांत आलें. यानंतर आतां हिंदी लोकांना हळूहळू साम्राज्यां-तील नागरिक हक्क मिळूं शकतील व वर्णभेदमूलक अन्याय दूर होऊं शकतील अशी आशा म. गांधींना वाटूं लागली. यानंतर आतां आपण आपल्या देशीं परत जावें असा विचार त्यांनीं केला आणि नाताळांतील हिंदी लोकांनींही त्यांना निरोप देण्याची तयारी केली. आतां आपण स्वदेशांत जाऊन राष्ट्रसभेचें काम करावें असा विचार करून, त्यांनीं आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा निरोप घेतला. नाताळांतील हिंदी लोकांनीं या वेळीं त्यांचा मोठा गौरव करून त्यांना मानपत्रें व भेटी दिल्या.

या वेळीं ज्या भेटी त्यांना मिळाल्या त्यांत अनेक सोन्या-चांदीच्या वस्तु, इतकेंच नव्हे तर हिरे-माणकांच्या जडावाच्या वस्तुही होत्या. या वस्तूंचा स्वीकार गांधीजींनीं स्वतःसाठीं करावयाचा नाहीं आणि त्यांचा एक सार्वजनिक निधि बनवून तो समाजसेवेला अर्पण करा-वयाचा असें ठरविलें. त्यांना या समारंभाच्या निमित्तानें ज्या वस्तु मिळाल्या त्या त्यांच्या पत्नीनें व मुलांनीं व त्यांनीं स्वतः नेहमीं अंगावर वापराव्या किंवा दिवाणखान्यांत तो सजविण्यासाठीं ठेवाव्यात अशा प्रकारच्या होत्या. या वस्तु देणाऱ्यांची इच्छा त्यांचा सार्वजनिक निधि व्हावा अशी नव्हती; परंतु गांधीजी हे आतां असंग्रही बनूं लागले होते. इ. स. १९०१ नंतर त्यांच्यांत असंग्रह आणि ब्रह्मचर्य या वृत्ति फार प्रबळ बनूं लागल्या. त्यास अनुसरून त्यांनीं स्वतःस व स्वतःचे कुटुंबास खाजगी उपभोगासाठीं मिळालेल्या या बहुमोल वस्तु समाजाला अर्पण केल्या. या कामीं त्यांच्या पत्नीला ही गोष्ट पटविण्यास त्यांना बरेच प्रयास पडले. त्यांच्या पत्नी कस्तुरबाई यांना

अशा अनेक वस्तु दिलेल्या होत्या. उदाहरणार्थ, त्यांना एक पन्नास गिनींचा सोन्याचा हार नजर म्हणून दिला होता. या वस्तु त्यांच्याकडून काढून घेऊन समाजाला अर्पण करण्याचा गांधीजींना हक्क आहे काय, असा एक सूक्ष्म प्रश्न या बाबतींत उपस्थित झाला. मुलांना दिलेल्या वस्तु देऊन टाकण्याची कल्पना मुलांना पटवून देण्यास फारसा प्रयास पडण्याचें कारण नव्हतें. पत्नीची गोष्ट निराळी होती. त्यांना आपल्या मुलांबाळांची व भावी सुनांची काळजी होती. आपण मुलांना कांहीं धन ठेवणें हें एक आपलें कर्तव्य आहे या दृष्टीनें त्यांनीं तिकडे पाहणें साहाजिक होतें. गांधीजींचा युक्तिवाद व दृष्टिकोन त्यांच्याहून भिन्न होता. आपण केलेल्या समाजसेवेमुळें मुलांना व आपले पत्नीला या वस्तु मिळालेल्या आहेत. अर्थात् समाजसेवेबद्दल आपण मोबदला घ्यावयाचा नाहीं हें जें आपलें व्रत त्याला आपल्या कुटुंबियांनीं या वस्तूंचा स्वीकार करण्यानें बाध येतो अशी त्यांची दृष्टि होती. मुलांनीं किंवा पत्नीनें कष्ट करून किंवा सेवा करून हें धन संपादन केलेलें नव्हतें. अर्थात् स्वतः सेवा करून धन संपादन करणें हेंही अयोग्य आहे अशा वृत्तीच्या गांधीजींना वरील युक्तिवाद केव्हांच पटणें शक्य नव्हतें. त्यांनीं त्या सर्व धनाचा त्याग केला आणि सार्वजनिक कार्यासाठीं त्यांतून एक निधि निर्माण केला.

यानंतर गांधीजी आपल्या मंडळीस घेऊन हिंदुस्थानांत आले आणि नामदार गोखले यांचे आग्रहावरून मुंबईस धंदा करावा व राष्ट्रीय सभेचें काम करावें असें त्यांनीं ठरविलें. पण ही गोष्ट तडीस जाणारी नव्हती. थोड्याच दिवसांत दक्षिण आफ्रिकेंत व विशेषतः ट्रान्सवालमध्यें हिंदी लोकांवर अन्याय होत आहे आणि त्यासाठीं त्यांची दाद लावून देण्यास तुम्ही परत या असें त्यांना तिकडून निमंत्रण आलें. हें निमंत्रण तारेनेंच आलें. आणि नवीन मुंबईस थाटलेलें बिऱ्हाड मोडून व बायकामुलांचा निरोप घेऊन ते पुन्हा आफ्रिकेंत जाऊन दाखल झाले. बोअर युद्धानंतर ट्रान्सवाल ही डच वसाहत पूर्णपणें ब्रिटिश साम्राज्यांत दाखल झाली, पण तेथील हिंदी लोकांची वाताहत होऊन गेलेली होती. सर्व ट्रान्सवाल युद्धकाळांत बेचिराख झालेला होता, आणि

हिंदी लोक तेथून पळून बाहेर गेलेले होते. जे हिंदी लोक युद्धापूर्वी ट्रान्सवालमध्यें राहिलेले होते त्यांना पुन्हा तेथें जाऊन रहावयाचें होतें, आणि तसें करण्यापूर्वी ते तेथें पूर्वी राहिलेले आहेत असा दाखला त्यांना मिळवावा लागे. असे दाखले देणारें एक एशियाटिक खातें या नांवाचें स्वतंत्र खातें सरकारनें निर्माण केलेलें होतें. या खात्यांतील अमलदाराकडून आपण पूर्वीचे रहिवासी आहों असा दाखला मिळविण्यास लांचलुचपत आणि वशिला यांचा सरास उपयोग करण्यांत येऊं लागला. अर्थात् हक्कवाल्यांना दाखले मिळेनात व बिन हक्कवाल्यांना मिळत असे अनेक प्रकार घडूं लागले. या सर्वांची कायदेशीर दाद लावून घेणें आणि ट्रान्सवालमध्यें हिंदी लोकांना नेऊन पुन्हा तेथें त्यांची वसाहत करणें हें मोठेंच कार्य बनलें, व तें करण्यासाठीं म. गांधींना अनेक वर्षें तेथें राहणें भाग होतें. अखेरीस जोहान्सबर्ग येथें पुन्हा वकिलीची सनद काढून त्यांनीं आपल्या धंद्यास व सार्वजनिक कार्यास आरंभ केला. लवकरच मुंबईची मंडळी ते तिकडे घेऊन गेले व आपल्या कामास त्यांनीं सुरवात केली. आतां त्यांना आपल्या सार्वजनिक कार्यांत कौटुंबिक जबाबदाऱ्या आड येतात असें वाटूं लागलें आणि या वेळेपासून त्यांनीं पत्नीसंबंधानें सुद्धां ब्रह्मचर्यव्रत स्वीकारलें. नाहीं तर कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्यावांचून राहणार नाहींत व आपली सार्वजनिक सेवेची भावना पूर्णपणें तृप्त होणार नाहीं, हें ओळखून त्याबाबत संयम पाळण्याचें त्यांनीं ठरविलें.

अशा प्रकारें इसवी सन १९०१ पासून त्यांनीं वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याची तयारी सुरू केली. हा संयम पाळण्यांत प्रथमतः सार्वजनिक सेवा अधिक मोकळेपणानें करतां यावी अशी दृष्टि असली तरी, अंतःकरणांत स्वतःच्या पत्नीसंबंधींसुद्धां कामविकार जागृत होऊं नये अशी अवस्था प्राप्त झाल्यावांचून आत्मदर्शन किंवा आत्मसुख प्राप्त होण्याची पात्रता आपल्या अंगीं येऊं शकत नाहीं असा त्यांना अनुभव येऊं लागला. हा विचार जसजसा वाढूं लागला तसतसें मनःसंयमाचें अध्यात्मशास्त्र त्यांना समजूं लागलें. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर, हे मनुष्याचे सहा शत्रु कां मानलेले आहेत,

आणि कामविकार जिंकल्यावांचून क्रोध आणि लोभ यांच्यावरही विजय मिळवितां येत नांहीं याचा अनुभव येऊन, असंग्रह, अस्वाद आणि ब्रह्मचर्य यांचा एकमेकांशीं कसा आंतरिक संबंध आहे तें त्यांना दिसूं लागलें. हे अध्यात्मशास्त्रांतील सिद्धांत अनुभवावर उभारलेले असून ते सिद्धांत ज्यांनीं शोधून काढले ते भौतिक शास्त्रज्ञांप्रमाणें प्रयोगानें संशोधन करणारे शास्त्रज्ञ होते, आणि या शास्त्रीय सिद्धांतांचा अवलंब केल्यावांचून आपण लोकसेवेमार्फत आत्मदर्शन घेण्याचें जें व्रत अंगीकारलें आहे तें आपणास पार पाडतां येणार नाहीं असें त्यांना वाटलें. ब्रह्मचर्य पाळणारांनीं जिव्हेचें नियंत्रण करण्यास शिकलें पाहिजे. यावरून अस्वादाचें महत्त्व त्यांना अधिक पटूं लागलें. कामविकार जिंकल्यावांचून अक्रोध आणि अद्वेष या वृत्ति अंतःकरणांत बाणत नाहींत, असा अनुभव त्यांना पत्नीशीं वर्तन करतांना येऊं लागला. पूर्वी पत्नीशीं कोणत्याही बाबतींत मतभेद झाला असतां क्रोध येत असे, तो ब्रह्मचर्य पालनानंतर येईनासा झाला. अशा रीतीनें अंतःशांतीचें साधन आणि रहस्य त्यांना आधिकाधिक कळूं लागलें.

असंग्रहाच्या आणि शरीरश्रमाच्या व्रताचें महत्त्व कळण्यास व त्यास अनुसरून अशा असंग्रही व शरीरश्रमवादी लोकांचा एक आश्रम स्थापन करण्याची स्फूर्ति निर्माण होण्यास त्यांना एक नैमित्तिक कारण झालें. तें म्हणजे रस्किनचें "सर्वोदय" ("Unto This Last") या नांवाचें पुस्तक त्यांनीं एकदां प्रवासांत असतांना वाचलें. हें कसें झालें तें त्यांनीं आत्मकथेंत दिलेलें आहे. त्याची माहिती पुढीलप्रमाणें.

वृत्तपत्र आणि फिनिक्स आश्रम

इ. स. १९०४ सालीं म. गांधींनीं दक्षिण आफ्रिकेंत दोन संस्था स्थापन केल्या. या दोन संस्था म्हणजे "इंडियन ओपिनियन" या नांवाचें एक साप्ताहिक वृत्तपत्र आणि दुसरी संस्था म्हणजे दरबानशेजारीं "फिनिक्स आश्रम" या नांवाचा एक आश्रम. या दोन संस्था अद्यापि चालू आहेत आणि म. गांधींचे एक चिरंजीव श्री. मणीलाल गांधी हे दक्षिण आफ्रिकेंत राहून तेथील काम पाहतात.

"इंडियन ओपिनीयन" (हिंदी लोकमत) हें साप्ताहिक दरबान येथें प्रसिद्ध होत असे व म. गांधी जोहान्सबर्ग येथें राहत असत. श्री. मनसुखलाल नाझर हे या पत्राचे संपादक होते, तरी त्यांतील बहुतेक महत्त्वाचें लिखाण व अग्रलेख स्वतः म. गांधीच लिहीत असत. या पत्रापायीं म. गांधींना फारच बूड सोसावी लागत होती. त्यांची बहुतेक सर्व शिल्लक या कामीं खर्च होऊं लागली. कांहीं वेळां तर दरमहा ७५ पौंडांपर्यंत खर्च या कामीं पडल्याचें गांधीजी सांगतात. या पत्राची कांहीं तरी निराळी व्यवस्था लावावी म्हणून ते १९०४ च्या अखेरीस जोहान्सबर्गहून दरबानला जाण्यासाठीं म्हणून निघाले तेव्हां बरोबर वाचण्यासाठीं म्हणून त्यांचे मित्र मि. पोलक यांनीं मागें सांगितलेलें रस्किनचें पुस्तक दिलें होतें. हें पुस्तक वाचूनच त्यांना दरबानजवळ एखादी शेतजमीन घ्यावी आणि तेथें आश्रम स्थापून त्या आश्रमांत तें पत्र चालू करावें ही कल्पना सुचली.

रस्किनच्या "अंटु धिस लास्ट" या पुस्तकांत असें काय होतें कीं ज्याच्यामुळें म. गांधींच्या मनावर त्याचा एवढा प्रभाव पडावा? हें पुस्तक अर्थशास्त्रासंबंधीं असून व्यक्तिवादी अर्थशास्त्रावर त्यांत मूलग्राही टीका केलेली आहे. आर्थिक व्यवहारांत नैतिक कर्तव्यांचा विचार करण्याचें कारण नाहीं, प्रत्येकानें आपल्या फायद्याकडे पाहून वागण्यानेंच परस्परांच्या स्पर्धेच्या किंवा चढाओढीच्या तत्त्वानुसार सर्वांचें हित आपोआप होईल आणि या आर्थिक व्यवहारांचें कायद्यानें नियंत्रण करण्याची काहीं गरज नाहीं, अशीं मतें व्यक्तिवादी अर्थशास्त्रज्ञांनीं रूढ केलीं होतीं. या सर्व सिद्धांतांवर "मूले कुठारः" या पद्धतीनें रस्किननें हल्ला चढविला आहे आणि आर्थिक व्यवहारांना नैतिक अधिष्ठान दिलें पाहिजे व अर्थशास्त्राला आध्यात्मिक स्वरूप दिलें पाहिजे असा सिद्धांत मांडिलेला आहे. *

*या पुस्तकाचें मराठी भाषान्तर "अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र?" या नांवानें मीं केलें आहे.

म. गांधींनीं या पुस्तकापासून तीन निष्कर्ष काढिले. ते यासंबंधीं आत्मकथेंत लिहितात—

सर्वोदयाचे सिद्धान्त मी समजलों ते असे—

(१) सर्वांच्या कल्याणांत आपलें कल्याण आहे.

(२) वकील काय किंवा हजाम काय, दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे.

(३) साधें अंगमेहनतीचें शेतकऱ्याचें जीवन हेंच खरें जीवन होय.

या तीन निष्कर्षांसंबंधीं थोडा अधिक खुलासा येथें केला पाहिजे. व्यक्तिवादी अर्थशास्त्रज्ञांचें मत असें होतें कीं, प्रत्येक व्यक्तीनें आपापला स्वार्थ साधिला म्हणजे स्पर्धाप्रधान समाजांत सर्वांचें हित आपोआप होईल. म्हणून स्वार्थ व स्पर्धा या तत्त्वांवर आर्थिक घटना असणेंच योग्य आहे. यांच्याविरुद्ध रस्किनचें असें मत आहे कीं, हे सिद्धान्त चुकीचे असून समाजाची आर्थिक रचना सेवा व सहकार्य या तत्त्वांवर झाल्यावांचून सर्वांचें हित होणार नाहीं. सर्वांनीं आपले आर्थिक व्यवहार स्वहितबुद्धीनें न करतां सर्वहितबुद्धीनें व समाजसेवाबुद्धीनें केले तर प्रत्येकाचें हित आपोआप होईल. सर्वांच्या हितास साहाय्य केल्यानें प्रत्येकाचें हित आपोआप होतें, पण प्रत्येकानें आपलें हित साधण्याचा प्रयत्न केल्यानें सर्वांचें हित होत नाहीं, तर उलट समाजांत अनर्थ माजतो. म्हणून स्वार्थ व स्पर्धा या तत्त्वांना मोकाट सोडणारें व आर्थिक व्यवहारांचें नियंत्रण करूं नये म्हणणारें व्यक्तिव्यादी अर्थशास्त्र हें अनर्थशास्त्र आहे असें रस्किननें दाखवून दिलें.

प्रत्येक व्यवहाराला नीतीचा आधार असावा हें तत्त्व म. गांधींच्या मनावर टॉलस्टॉयचे ग्रंथ वाचून आधींच बिंबलें होतें. तथापि रस्किननें तो सिद्धांत अर्थशास्त्राला लावून दाखविलेला पाहून म. गांधींना हें पुस्तक विशेष आवडलें यांत नवल नाहीं. शिवाय रस्किन हा टॉलस्टॉयप्रमाणें बायबलचा मोठा भोक्ता, अध्यात्मवृत्तीचा व सुधारक असल्यामुळेंही म. गांधींच्या मनावर त्याची छाप विशेष पडली. म. गांधींनीं समाज-

सेवेची दीक्षा आधींच घेतली होती. आतां त्यांना समाजाच्या आर्थिक घटनेचा पाया सेवावृत्तीवर व सहकार्यावर न घालतां स्वार्थावर व स्पर्धेवर घातल्यामुळें आधुनिक संस्कृतीवर अनर्थ कसे गुदरत आहेत व त्यामुळें अखेरीस ही आधुनिक युरोपीय संस्कृति रसातळास जाणार आहे हें अर्थशास्त्रीय दृष्टीनें सिद्ध केलेलें वाचावयास मिळालें. दुसरें असें कीं, हा भावी अनर्थ टाळण्यास समाजाला नैतिक व आध्यात्मिक अधिष्ठान दिलें पाहिजे असें या ग्रंथांत प्रतिपादिलेलें त्यांना आढळलें. त्यांना ज्या प्रकारचें पारमार्थिक अर्थशास्त्र हवें होतें तें त्यांना त्यांत मिळालें. टॉलस्टॉयनें त्यांना राजकीय व सामाजिक व्यवहारांना अध्यात्माचा पाया असण्याची आवश्यकता पटवून दिली होती व रस्किननें त्यांना आर्थिक व्यवहारांना आध्यात्मिक अधिष्ठान देण्याचें महत्त्व पटवून दिलें.

दुसरा निष्कर्ष त्याहूनही महत्त्वाचा आहे. समजाची सेवा करणाऱ्या सर्वच प्रकारच्या सेवकांच्या कामाचें मोल सारखेंच असावें, कारण त्यांचें समाजाला सारखेंच महत्त्व आहे. यांतून आर्थिक समतेचें तत्त्व उदयास येतें. प्रत्येकानें आपल्या अंगच्या सर्व शक्ति समाजाला अर्पण कराव्यात आणि समाजानें प्रत्येकाच्या सर्व शक्तींचा विकास होईल एवढें धन प्रत्येकास द्यावें. वकिलीचा धंदा, हजामाचा धंदा, डॉक्टराचा धंदा व भंग्याचा धंदा यांत अमुक उच्च, अमुक नीच, असें मानण्यांत कांहीं अर्थ नाहीं. समाजाला उपयुक्त अशीं सर्वच कामें सारख्याच दर्जाचीं समजावींत व त्यांच्याबद्दल मिळणाऱ्या मोबदल्यांतही फरक किंवा विषमता असूं नये असा हा निष्कर्ष आहे. या बाबतींत म. गांधींची समत्वबुद्धि रस्किनच्या मूळ ग्रंथांतील प्रतिपादनापेक्षां अधिक पुढें गेलेली आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. रस्किनच्या मूळ ग्रंथांत आर्थिक समतेचें तत्त्व इतक्या प्रमाणांत पुरस्कारलेलें आहे असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि म. गांधींचा निष्कर्ष त्यांच्या संन्यस्त व ध्येयनिष्ठ वृत्तीशीं सुसंगत असून टॉलस्टॉयच्या विचारांचा त्यांत प्रभाव पडल्याचें दिसून येतें.

तिसरा निष्कर्ष—शेतकरी समाजाचें व शरीरश्रमाचें जीवन हेंच

सर्वश्रेष्ठ जीवन—हाच त्यांना आश्रम स्थापण्याची स्फूर्ति देण्यास कारण झाला. लवकरच त्यांनीं दरबानपासून दहा-बारा मैलांवर १०० एकर जमीन विकत घेतली आणि तेथें 'फिनिक्स आश्रम' या नांवाचा आश्रम स्थापन केला. येथें त्यांनीं 'इंडियन ओपिनियन' हें पत्र व त्याचा छापखाना नेऊन ठेविला. या आश्रमाचे रहिवासी कांहीं हिंदी व कांहीं युरोपियन गृहस्थ झाले. त्यांनीं शेती करून हा छापखाना व पत्र चालवावें, प्रत्येकानें गरिबीनें राहण्याचें व्रत घ्यावें, दरमहा तीन पौंडांपेक्षां अधिक वेतन घेऊं नये, प्रत्येकानें शेतीसाठीं दोन एकर जमीन घ्यावी, तींत त्यानें स्वतः खपून शेती करावी, आणि याउपर कांहीं फायदा झाल्यास सर्वांनीं तो सारखा वांटून घ्यावा, असे मूळचे नियम होते. पुढें त्यांत कमीजास्त फेरफार करण्यांत आले. म. गांधींचे युरोपियन मित्र श्री. पोलक व श्री. वेस्ट हे यांत प्रथमपासून सामील झालेच होते. स्वतः तेथें जाऊन कायमचें रहावें व हळूहळू धंदा सोडावा असा म. गांधींचा विचार होता. पण त्यांचा व्याप व सार्वजनिक कार्याची वाढती जबाबदारी यामुळें त्यांना तेथें फार दिवस राहतां आलें नाहीं. धंदा करून मिळविलेले पैसेच या दोन संस्थांत त्यांना घालावे लागत होते.

झुलूंची शुश्रूषा व सत्याग्रहाचा साक्षात्कार

वरील दोन संस्था उभारून म. गांधींनीं आश्रम थाटला तोंपर्यंत १९०४ साल संपून गेलें होतें. पुढें एक वर्षभर त्यांची सुव्यवस्था लागते तोंपर्यंत १९०६ च्या मध्याच्या सुमारास नाताळांत झुलू लोकांनीं बंड केलें. या बंडाच्या वेळीं पुनः घायाळ होणाऱ्या झुलूंची शुश्रूषा करण्यासाठीं म. गांधींनीं एक तुकडी तयार केली आणि त्यांची सेवाशुश्रूषा करण्याच्या कामावर जाऊन ते दाखल झाले. झुलू लोकांवर इंग्रजांनीं जबरदस्त असा एक कर बसविला होता; त्याच्या प्रतिकारार्थ त्यांनीं लढा उभारला होता. इंग्रज सरकार या बंडखोर गणलेल्या झुलू लोकांवर बंड मोडण्याच्या नांवानें सूड उगवीत होतें. वस्तुतः बंड असें फारसें तेथें कांहीं नव्हतेंच. रानटी जनावरांची शिकार करावी तशी गोऱ्या लोकांनीं काळ्या लोकांची शिकार चालविली होती असें दृश्य

आपणांस तेथें दिसलें असें स्वतः म. गांधी लिहितात. हें दृश्य पाहून त्यांच्या राजनिष्ठेला पहिला धक्का बसला, पण आपण जर या झुलू लोकांची सेवाशुश्रूषा केली नाहीं तर तीही कोणी करणार नाहीं व त्यांना औषधपाण्यावांचून मरावें लागेल, एवढेंच समाधान मानून आपण हें दुःख गिळून स्वस्थ बसलों असें ते लिहितात.

लवकरच हें बंड मोडल्याचें जाहीर झालें व गांधीजी ती कामगिरी आटोपून 'फिनिक्स आश्रमां'त येऊन दाखल झाले. त्यांच्या गैरहजेरींत कस्तुरबा व मुलें त्या आश्रमांतच राहत असत. त्या वेळीं हिंदी व युरोपियन मिळून पांचसहा कुटुंबें आश्रमवासी म्हणून तेथें राहत होतीं.

या वेळपर्यंत या आश्रमांत ब्रह्मचर्याचें व्रत पाळण्याचा विचार कोणीं प्रकट केला नव्हता. झुलूंची सेवाशुश्रूषा करीत असतांना गांधीजींना असें वाटूं लागलें कीं, आपण जें ब्रह्मचर्य पाळण्याचा यत्न १९०० सालापासून करीत आहों, तें आतां उघडपणें व्रत म्हणून जाहीर करावें, आणि आपल्या आश्रमवासी सहकाऱ्यांनाही शक्य तर तें व्रत घेण्याचा उपदेश करावा. 'फिनिक्स आश्रमां'त येतांच त्यांनीं आपल्या व्रताची माहिती सहकाऱ्यांना दिली. सर्वांनीं तिची प्रशंसा केली, कांहींनीं तसा प्रयत्न करून पाहण्याचें ठरविलें व कांहींनीं तें आपणांस निभणार नाहीं असें सांगितलें. हें व्रत कठीण आहे असेंच बहुतेकांचें म्हणणें पडलें. स्वतः म. गांधींनीं तें व्रत कांहींच्याबरोबर कायमचें चालू ठेविलें हें सर्वश्रुतच आहे. अशा प्रकारें म. गांधी हे आतां पूर्णपणें सत्याग्रही यति बनले. (१) सत्य, (२) अहिंसा, (३) ब्रह्मचर्य, (४) असंग्रह, (५) अस्तेय, (६) अस्वाद, (७) शरीरश्रम आणि (८) अभय, अशीं आठ व्रतें त्यांनीं १९०६ पर्यंत आत्मसात् केलीं असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या आठ व्रतांत सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यतानिवारण आणि स्वदेशी अशीं तीन व्रतें धरिलीं म्हणजे विनोबा भावे यांचीं एकादश व्रतें होतात—

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह।
शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन॥
सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना।
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें॥

अशी अकरा व्रतांची यादी आतां गांधीवादांत आधारभूत मानिली जाते.

यांपैकीं सर्व धर्म व जाति यांच्याविषयीं समबुद्धि व अस्पृश्यता-निवारण, हीं दोन व्रतें मला व्रतें म्हणून कधीं घ्यावीं लागलीं नाहींत; कारण तो माझा मूळ स्वभावच होता, व सहजपणेंच माझें तसें वर्तन होत असे, असें गांधीजी म्हणतात—

"माझ्या जीवनयात्रेमध्यें अशा तऱ्हेचे प्रसंग वारंवार घडून आले आहेत कीं, ज्यांमुळें मी भिन्न भिन्न धर्मांच्या व जातींच्या निकट सहवासामध्यें येऊं शकलों. या सर्वांच्या अनुभवावरून एवढें सांगतां येईल कीं, आत आणि परके, देशी आणि परदेशी, गोरे आणि काळे, हिंदु आणि मुसलमान, किंवा ख्रिस्ती, पारशी किंवा यहुदी यांच्यामध्यें भेद कसा तो माझ्या मनाला शिवलेलाही नाहीं. माझें हृदय असले भेद ओळखूंच शकत नाहीं असें मी सांगूं शकतों. हा मी माझा सद्गुणही समजत नाहीं; कारण कीं, मी ज्याप्रमाणें अहिंसा, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, इत्यादि यम अभ्यासिण्याचा प्रयत्न केल्याची व तो प्रयत्न अजूनही चालू असल्याची मला पूर्ण जाणीव आहे, त्याप्रमाणें या प्रकारचा अभेद शिकण्याचा कधीं मी मुद्दाम म्हणून प्रयत्न केला असेल असें मला स्मरत नाहीं."*

आपपरभेद, धर्मभेद व जातिभेदरहित अशी ही जी अभेदवृत्ति, तशीच सत्यनिष्ठा हीही म. गांधींची एक उपजत सहजवृत्तिच म्हणावी लागेल. सत्यनिष्ठा व समदृष्टि यांच्याप्रमाणें अहिंसा, अभय, अस्वाद, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, अस्तेय, या वृत्ति त्यांच्या उपजत नव्हत. त्या त्यांनीं प्रयत्नपूर्वक व क्लेश सोसून संपादन केल्या व त्या तितक्याच आत्मसात् केल्या यांतच त्यांचें खरें लोकोत्तरत्व व महात्मेपण आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, हे शत्रु त्यांच्या अंतःकरणांत प्रबल होते, पण

* आत्मकथा, भाग २ रा, पृ. ३०.

त्यांची मुमुक्षा त्यांहून प्रबल त्यांनीं बनविली. इंद्रियसुखाची आसक्ति त्यांच्यांत होती, पण ते पूर्ण आनासक्त बनले. ते भीरु होते, पण ते पूर्ण निर्भय बनले. अखेरीस त्यांच्याइतका निष्काम, निर्विकार, निर्भय आणि अनासक्त कोणी नाहीं असें लोक म्हणूं लागले. यामुळेंच ते सत्याचा आग्रह शेवटपर्यंत टिकवूं शकले, आणि समदृष्टीनें सर्वोदय साधण्याचा संदेश जगाला देऊन गेले. त्यांच्या समदृष्टीला हा स्वकीय तो परकीय, हा श्रेष्ठ तो कनिष्ठ, हा साधु तो असाधु, असा भेद दिसत नव्हता ; कारण, सर्वांचा उद्धार त्यांना करावयाचा होता, आणि सर्वांच्या अंतर्यामीं ही आत्मोद्धाराची दैवी शक्ति वास्तव्य करीत आहे अशी त्यांची निष्ठा होती, व ती निष्ठा त्यांना अनुभवगोचर होती. या सर्वांतर्यामी, सर्वसमर्थ चिच्छक्तीलाच ते सत्य म्हणत असत, आणि त्या सत्याचा सदैव साक्षात्कार व्हावा यासाठींच ते आपल्या अंतःकरणांतील हीन वृत्तींपासून, पापवृत्तींपासून मुक्त होण्याचा ध्यास घेऊन बसले होते. दक्षिण आफ्रिकेंतील बारा वर्षांच्या दीर्घ तपश्चर्येनंतर त्यांची ही सत्याग्रही साधना इतकी परिणत झाली होती कीं, त्यांना आतां सत्याग्रह मंत्राचें स्पष्ट दर्शन होऊं लागलें. येथून त्यांचें राजकारणही राजनिष्ठेहून सत्यनिष्ठेचा आधार अधिक घेऊं लागलें आणि सत्याच्या आग्रहासाठीं कायद्याचा भंगही करावा लागेल असें त्यांना दिसूं लागलें. १९०६ सालीं झुलूंच्या सेवाशुश्रूषेचें कार्य संपवून ते परत आले तोंच, हिंदी लोकांवर जुलूम व अन्याय करणारा, इतकेंच नव्हे तर सर्व हिंदी लोकांना दक्षिण आफ्रिकेंतून नामशेष करणारा, एक नवा कायदा होत असल्याचें त्यांना समजलें. "ट्रान्सवाल एशिॲटिक लॉ अमेंडमेंट बिल" या नांवानें एक कायद्याचा मसुदा ट्रान्सवालच्या कायदे मंडळापुढें आला होता. हें बिल पास होऊन कायदा झाल्यास आपण तो कायदा रद्द होईपर्यंत सविनय कायदेभंग करूं, अशी सत्याग्रही प्रतिज्ञा त्यांनीं ११ सप्टेंबर १९०६ रोजीं जोहान्सबर्ग येथें भरलेल्या हजारों लोकांच्या समेंत जाहीरपणें घेतली. या वेळेपासून सुमारें आठ वर्षें म. गांधींना दक्षिण आफ्रिकेंतील सरकाराविरुद्ध सत्याग्रह लढा करावा लागला. त्यानंतर त्यांत विजयी होऊन ते स्वदेशीं आले.

: : ४ : :

दक्षिण आफ्रिकेंतील अष्टवार्षिक सत्याग्रह-युद्ध

११ सप्टेंबर सन १९०६ या दिवशीं जोहान्सबर्ग येथें हिंदी लोकांची एक प्रचंड सभा भरून, ट्रान्सवाल सरकारनें एशियाटिक लॉ अमेंडमेंट ऑर्डिनन्स या नांवाचा जो कायदा करण्याचें जाहीर केलें होतें तो कांहीं झालें तरी आम्ही पाळणार नाहीं, आणि तो रद्द करवून घेऊं अशा तऱ्हेची शपथ, म. गांधींच्या सूचनेवरून सभेस जमलेल्या सुमारें तीन हजार हिंदी लोकांनीं घेतली. अद्यापि हा कायदा व्हावयाचा होता, त्याचा केवळ मसुदा प्रसिद्ध झालेला होता, तथापि सरकारनें केलेला कायदा आम्ही पाळणार नाहीं अशा तऱ्हेची प्रतिज्ञा उघडपणें करण्याचा हिंदी लोकांचा हा पहिलाच प्रसंग होता. दक्षिण आफ्रिकेंतच नव्हे तर हिंदुस्थानांतही इ. स. १९०६ साल हें राजकीय आंदोलनाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें गणण्यांत येत असतें. हिंदुस्थानांत या सालीं बंगभंगाविरुद्ध चळवळ फार जोरांत सुरू झाली, आणि बंगाल-मध्यें ब्रिटिश मालाच्या बहिष्काराचें शस्त्र सरकाराविरुद्ध उगारण्याचें ठरलें. लो. टिळक, लाला लजपतराय, आणि बिपिनचंद्र पाल, हे तीन राजकीय पुढारी या बहिष्काराच्या चळवळीचे उत्पादक आणि नेते गणले जातात. हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र व्हावा हें ध्येय त्यांनीं इ. स. १९०६ सालीं उघडपणें राष्ट्रापुढें मांडण्यास सुरवात केली. या ध्येयाचें साधन म्हणून स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या चळवळी हातीं घेण्यांत आल्या. बहिष्कार या शब्दांत केवळ ब्रिटिश मालावरील

बहिष्कार एवढाच संकुचित अर्थ न घेतां, ब्रिटिश सरकारच्या नोकऱ्यावरील बहिष्कार, कायदे मंडळांतील व स्थानिक स्वराज्यांतील जागांचे राजीनामे, शिक्षणसंस्था व कोर्टे यांच्यावर बहिष्कार, जुलमी कायद्यांचा भंग आणि करबंदी या सर्व गोष्टींचा अंतर्भाव बहिष्कार या शब्दांत होतो, असें बंगाली पुढारी प्रतिपादीत असत; आणि लो. टिळक यांनींही बहिष्कारयोगाची ही व्याप्ति मान्य केलेली होती. हा एक निःशस्त्र क्रांतीचा कार्यक्रम होता. सशस्त्र क्रांति ही आपणांस अशक्य असल्यामुळें हा निःशस्त्र क्रांतीचा कार्यक्रम जरी त्यांनीं निरुपाय म्हणून स्वीकारलेला असला, तरी तो आपणांस संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्यास पुरेसा समर्थ आहे, अशी त्यांची कल्पना होती. राष्ट्रीय समेकडून स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, आणि बहिष्कार, असे चार ठराव या राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं इ. स. १९०६ सालच्या कलकत्ता काँग्रेसमध्यें मंजूर करून घेतले. या ठरावांनाच राष्ट्रीय पक्षाची चतुःसूत्री असें म्हणतात. इ. स. १९०६ ची कलकत्त्यास भरलेली राष्ट्रीय सभा या दृष्टीनें फार महत्त्वाची व नवीन युगप्रवर्तन करणारी समजली जाते. या अधिवेशनाचे अध्यक्ष राष्ट्रपिता महर्षि दादाभाई नौरोजी हे होते. याच सालीं पूर्व बंगालमध्यें बारिसाल येथें भरलेल्या प्रांतिक परिषदेच्या वेळीं अध्यक्षाची मिरवणूक काढूं नये व वंदे मातरम्‌चा घोष करूं नये असा हुकूम निघाला असतां, लोकांनीं तो हुकूम मोडून मिरवणूक काढली, आणि सरकारनें लाठीहल्ले करून त्यासाठीं लोकांचीं डोकीं फोडलीं. अशा प्रकारें इ. स. १९०६ साल हें हिंदी राजकारणांत कायदेशीर चळवळीच्या पुढें जाण्याचें, बहिष्कारयोगाच्या उदयाचें, आणि निःशस्त्र प्रतिकाराच्या साधनाचा स्वीकार केल्यास आपणांस संपूर्ण स्वराज्य प्राप्त करून घेतां येईल अशी निष्ठा जागृत झाल्याचें साल म्हणून प्रसिद्ध आहे. या मार्गानें म्हणजे निःशस्त्र क्रांतीच्या मार्गानें राष्ट्राला पुढें नेण्याचें प्रत्यक्ष काम म. गांधी यांनाच करावें लागलें. ते १९१५ सालीं दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रहाची व सविनय कायदेभंगाची चळवळ यशस्वी करून हिंदुस्थानांत आले. त्या वेळीं लो. टिळक प्रभृति पुढाऱ्यांनीं १९०६ सालीं जी बहिष्कारयोगाची चळवळ सुरू केली होती

ती सरकारनें आपल्या दडपशाहीनें खणून काढलेली होती ; त्याचप्रमाणें ना. गोखले वगैरे प्रागतिक पुढारी नेमस्तपणानें व कायदेशीर वृत्तीनें वागून, स्वराज्याचें ध्येय आपणांस गाठतां येणें कठीण आहे हें ओळखून, बरेच हताश झालेले होते. लो. टिळक १९०७ पासून १९१४ पर्यंत तुरुंगांत असून, ते नुकतेच बंधमुक्त झालेले होते. जरी तात्त्विक दृष्टीनें आपली बहिष्कारयोगाची चळवळ योग्य प्रसंग पाहून पुन्हा करण्यास हरकत नाहीं, व तशी ती केल्यास ब्रिटिश सरकारची अडवणूक करून आपणांस त्याच्यापासून स्वराज्य मिळवितां येईल अशी त्यांची निष्ठा होती, तरी ते सुटून येतांच दोनतीन महिन्यांच्या आंत युरोपियन महा-युद्ध सुरू झाल्यामुळें आणि पूर्वीची त्यांची चळवळ सरकारनें नेस्त-नाबूद केलेली असल्यामुळें त्यांना बहिष्काराच्या चळवळीचें पुनरुज्जीवन करणें व्यवहारतः अशक्य होतें. अशा वेळीं म. गांधी हिंदुस्थानांत आले व ते दक्षिण आफ्रिकेंत निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ यशस्वी करून आले होते. यावरून हिंदुस्थानास स्वराज्य मिळविण्यासाठीं जो निःशस्त्र प्रतिकार करावा लागेल असें त्यांना वाटत होतें, त्याचें नेतृत्व करण्यास हा एक लायक पुढारी आहे असें लो. टिळकांना वाटलें असल्यास नवल नाहीं. १९१८ सालीं सौ. अवंतिकाबाई गोखले यांनीं लिहिलेल्या गांधी-चरित्रास लिहिलेल्या प्रस्तावनेंत लो. टिळकांनीं तसें लिहिलेंही आहे.

ना. गोखले हे तर प्रथमपासूनच गांधीजींचें विभूतिमत्त्व ओळखून होते. यामुळें त्यांनीं आपल्या भारत सेवक समाजांत दाखल होऊन हिंदी राजकारण करावें असें त्यांना वाटत होतें. तात्पर्य, या वेळीं सामान्य जनतेला म. गांधींची फारशी माहिती नसली तरी, लो. टिळक, ना. गोखले, लाला लजपतराय, हे थोर पुढारी त्यांचें विभूतिमत्त्व आणि राजकारणां-तील त्यांचें महत्त्वाचें स्थान ओळखून होते ; परंतु लो. टिळकांच्या किंवा ना. गोखल्यांच्या सांप्रदायिक भक्तमंडळींस ही दृष्टि नव्हती. "गुणी गुणं वेत्ति, न निर्गुणस्तथा।" असें एक संस्कृत सुभाषित आहे. असामान्य व्यक्तीचें असामान्यत्व ओळखण्यास सुद्धां ओळखणाराचे अंगीं असामान्य बुद्धिमत्ता असावी लागते, असा या सुभाषिताचा

अर्थ करतां येईल. हा न्याय येथें बरोबर लागू पडतो. असो. येथें हा विस्तार करण्याचें कारण, म. गांधींनीं १९०६ पासून १९१४ पर्यंत जो निःशस्त्र प्रतिकाराचा प्रयोग दक्षिण आफ्रिकेंत अष्टवार्षिक लढा करून यशस्वी केला, त्याचें भावी हिंदी राजकारणाच्या दृष्टीनें किती महत्त्व आहे तें वाचकांच्या लक्षांत यावें हेंच होय; हिंदुस्थानची एकंदर परिस्थिति पाहतां त्याला कायदेशीर मार्गाची चळवळ स्वराज्य मिळविण्यास पुरी पडणारी नव्हती, आणि सशस्त्र क्रांतीची चळवळ करून स्वराज्य संपादन करणें हा मार्ग व्यवहारतः त्याला अशक्य होता. लो. टिळक, ना. गोखले किंवा लाला लजपतराय, यांना ही गोष्ट बौद्धिक-दृष्ट्या पटलेली होती, आणि म्हणून हिंदुस्थानास स्वराज्य मिळविण्यास निःशस्त्र प्रतिकार, सविनय कायदेभंग अथवा बहिष्कार, यांसारख्या उपायांचा अवलंब करणें अवश्य आहे याची जाणीव सर्व हिंदी पुढाऱ्यांना इ. स. १९०६ सालींच झाली होती; पण ही जाणीव मूर्त स्वरूपास आणून निःशस्त्र क्रांतीचा मार्ग यशस्वी करून दाखविणारा पुढारी म. गांधी हाच झाला. लो. टिळक आणि ना. गोखले यांच्या निधनानंतर १९२० सालापासून तों १९४८ सालीं म. गांधींचा वध होई-पर्यंतच्या काळांत २८ वर्षें राष्ट्रीय सभा ही केवळ त्यांच्याच नेतृत्वाखालीं कां राहिली, या प्रश्नाचा उलगडा आमच्या बुद्धीप्रमाणें वरीलसारखा होऊं शकतो. निःशस्त्र क्रांतीखेरीज हिंदुस्थानला स्वतंत्र होण्यास दुसरा कोणताही मार्ग नव्हता ही गोष्ट हिंदुस्थानची परिस्थिति व त्या वेळची जगाची परिस्थिति यांचें वास्तववादी ज्ञान ज्यांना होतें त्यांच्या बुद्धीला पटलेली होती. पण हा निःशस्त्र क्रांतीचा मार्ग तीसचाळीस कोटि लोकसंख्येच्या प्रचंड राष्ट्राकडून चोखाळला जाण्यास त्या राष्ट्राच्या जनतेंत ज्या सद्गुणांची प्रेरणा करणें आवश्यक होतें, त्या सद्गुणांची प्रेरणा करण्यास म. गांधींसारखा एक असामान्य संत राजकीय नेतृत्व करण्यास पुढें येण्याची आवश्यकता होती. या संताच्या अंगीं राजकीय नेतृत्व करण्यास लागणारे गुण वाढावयास हवे होते. म. गांधींच्या अंगीं हे राजकीय संताचे गुण वाढून त्यांचा योग्य दिशेनें विकास होण्यास दक्षिण आफ्रिकेंतील त्यांचें राजकीय नेतृत्व फार उपयोगी

पडलें. तेथील अष्टवार्षिक सत्याग्रही लढ्यांत जी गुणसंपत्ति त्यांनीं संपादन केली त्याच भांडवलाच्या आधारावर त्यांनीं लो. टिळकांच्या व ना. गोखल्यांच्या निधनानंतर हिंदी राष्ट्राचें सुमारें तीस वर्षें अप्रतिहत नेतृत्व केलें, आणि त्यांच्या या नेतृत्वामुळेंच हिंदुस्थान हें एक स्वतंत्र राष्ट्र बनून जगांतील पहिल्या दर्जाच्या राष्ट्राच्या बरोबरीचा मान आज त्याला मिळूं लागला आहे. इतकेंच नव्हे, तर गांधीजींनीं या राष्ट्रांत ज्या सद्गुणांची प्रेरणा निर्माण केली आहे, त्या सद्गुणांची जर जोपासना आपण केली, तर म. गांधी हे आजच्या जगांत जसें जगद्गुरूचें स्थान पटकावूं शकले, तसेंच आपलें राष्ट्र हें इतर राष्ट्रांच्या गुरुस्थानीं मिरवूं लागेल अशी एक थोर महत्त्वाकांक्षा किंवा आत्मविश्वास आमच्या नेत्यांच्या अंतःकरणांत आज निर्माण झालेला आहे. या सर्व गोष्टींचा पाया १९०६ पासून १९१४ पर्यंत दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांनीं जो सत्याग्रहाचा लढा केला त्या लढ्यांतच घातला गेला. जसा एखादा रसायनशास्त्रज्ञ रसशाळेंत एखादें नवीन संशोधन करतो व तो प्रयोग यशस्वी झाल्यानंतर त्याचा मोठा प्रयोग औद्योगिक क्षेत्रांत करण्यांत येतो, त्याचप्रमाणें म. गांधींनीं आपल्या सत्याग्रही राजकारणाचा एक छोटा प्रयोग दक्षिण आफ्रिकेंत यशस्वी केला आणि त्या यशस्वी प्रयोगाच्या आत्मविश्वासानें हिंदी राजकारणाचीं सूत्रें आपल्या हातीं घेऊन राष्ट्रसभेच्या मार्फत हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याच्या कार्मीं निःशस्त्र क्रांतीचा एक त्याहून मोठा प्रयोग हिंदुस्थानांत केला.

११ सप्टेंबर १९०६ रोजीं जरी कायदेभंगाची प्रतिज्ञा करण्यांत आली, तरी हा कायदा अद्यापि व्हावयाचा होता. तोंपर्यंत इंग्लंडांत एक शिष्टमंडळ नेऊन तो न होण्याबद्दल कांहीं खटपट करावी असें ठरलें. त्याप्रमाणें १९०६ च्या ऑक्टोबरमध्यें म. गांधी व श्री. अली या नांवाचे एक मुसलमान गृहस्थ इंग्लंडास वसाहतमंत्र्याची गांठ घेऊन हिंदी लोकांवर हा कायदा लादूं नये अशी खटपट करण्यासाठीं गेले. हा कायदा पास झाल्यास ट्रान्सवालमध्यें राहणाऱ्या प्रत्येक हिंदी मनुष्यास नोंदणी ऑफिसांतून आपल्या नांवाची सही करून व आंगठे उठवून राहिवाशाचा दाखला घ्यावा लागणार होता, व तो दाखला

नेहमीं बरोबर बाळगून हिंडावें लागणार होतें. यामुळें प्रत्येक हिंदी मनुष्याचा दर्जा गुन्हेगार जातीच्या व्यक्तीसारखा होणार होता. तसेंच बाहेरून नव्या येणाऱ्या रहिवासी हिंदी लोकांनाही केवळ हिंदी या नात्यानें बंदी करण्यांत येणार होती. तेथें रहिवासी झालेल्यांना गांवांतील विशिष्ट गलिच्छ भागांतच राहण्याची सक्ती होणार होती. हिंदु लोकांनीं—म्हणजे उच्च वर्णीय म्हणवून घेणाऱ्या हिंदूंनीं—हरिजनांना अस्पृश्य मानून त्यांचे वाडे—महारवाडे, मांगवाडे, धेडवाडे, इत्यादि—प्रत्येक गांवांत करून ठेविले, आणि त्यांच्या कांहीं जाती गुन्हेगार ठरवून त्यांतील सर्व व्यक्तींना हजेरी देण्याची व गांवांत नोंद ठेवण्याची अपमानकारक शर्त हजारों वर्षें लादून गुलामगिरींत राबविलें. या त्यांच्या पापाचें फल म्हणूनच कीं काय गोऱ्या लोकांनीं हिंदूंतील सर्व लोकांनाच नव्हे, तर हिंदुस्थानांतून येणाऱ्या मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती, या सर्व काळ्या लोकांना किंवा चिनी पिवळ्या लोकांनाही आफ्रिकेंत गुलाम बनवून गुन्हेगार जातींतील व्यक्तींप्रमाणें वागविण्याचा प्रघात पाडिला आहे. त्यांच्याकडून कूलीचें काम करून घेण्यास ते तयार आहेत; पण त्यांनीं शेतकरी, व्यापारी, सावकार, वकील, डॉक्टर, बनून स्वतंत्र नागरिक बनूं नये व त्यांना समानतेनें वागविलें जाऊं नये असा या गोऱ्या वसाहतवाल्यांचा आग्रह असतो. ट्रान्सवालमध्यें वर्णभेदभावना फार तीव्र असून, या भावनेला मान देण्यासाठीं व स्वतंत्र हिंदी लोकांचें ट्रान्सवालमधून उच्चाटन करण्यासाठींच हा कायदा करण्यांत येत आहे, असें म. गांधींनीं आपलें म्हणणें वसाहतमंत्र्यापुढें मांडिलें. पण त्याचा त्या वेळीं फारसा उपयोग झाला नाहीं. ट्रान्सवालमध्यें नवीन पार्लमेंट स्थापन होणार होतें; तोंपर्यंत हा कायदा करूं नये एवढें आपण करूं शकतों असें वसाहतमंत्र्यानें सांगितलें. पण त्याचबरोबर नव्या पार्लमेंटनें हा कायदा केल्यास त्यांत आपण ढवळाढवळ करणार नाहीं असें ट्रान्सवाल सरकारलाही त्यांनीं कळविलें. तेव्हां हा कायदा होण्याचें कांहीं काल म्हणजे सातआठ महिने लांबणीवर पडलें. याहून या शिष्टाईपासून कांहीं फायदा झाला नाहीं.

यानंतर नवीन पार्लमेंट अस्तित्वांत येऊन तो कायदा पास झाला व १ ऑगस्ट १९०७ पासून त्याच्या बजावणीस सुरुवात झाली. याआधीं कांहीं दिवस एक सत्याग्रह समिति–पॅसिव्ह रेझिस्टन्स असोसिएशन नांवाची समिति–स्थापन करण्यांत आली. जोहान्सबर्गमध्यें ५,००० लोकांची एक सभा भरविण्यांत आली व तेथें प्रत्येकाकडून सत्याग्रहाची प्रतिज्ञा करून घेण्यांत आली. या वेळीं या कायद्याचा परिणाम चिनी लोकांवर होणार असल्यानें चिनी लोकांनीं स्वतंत्रपणें सत्याग्रह करण्याचें ठरविलें. १ ऑगस्टपासून सगळ्या एशियाटिक ऑफिसांसमोर स्वयंसेवक उभे राहून 'परवाने घेऊं नका' असा उपदेश करूं लागले. इतक्यावर कोणी आंत जाऊन परवाने घेण्याचा आग्रह धरल्यास, त्याला आंत नेऊन पोहोंचवणारेही स्वयंसेवक तेथें ठेवण्यांत आले होते. अशा प्रकारें परवाने न घेणारांची संख्या वाढूं लागली व अशांवर खटले भरून शिक्षा देण्याचा सपाटा सुरू झाला. डिसेंबर १९०७ मध्यें सत्याग्रही लोकांवर नोटिसा बजावण्यांत आल्या. त्याप्रमाणें म. गांधींवरही ट्रान्सवाल सोडून जाण्याची नोटीस बजावण्यांत आली. इतरांना बिगर परवाना धंदा केल्याबद्दल सहा सहा महिनेपर्यंत शिक्षा दिल्या. म. गांधींना ट्रान्सवाल सोडून जाण्याचा हुकूम मोडल्याच्या सौम्य गुन्ह्यासाठीं म्हणून फक्त दोनच महिने शिक्षा झाली. "ज्यांना कायदा मोडण्याचा मीं उपदेश केला, त्यांना सहा सहा महिने शिक्षा दिली, तर मलाही तीच शिक्षा द्यावी", अशी विनंति म. गांधींनीं न्यायाधिशांस केली. पण तुमचा गुन्हा सौम्य आहे, तुम्हीं फक्त हद्दपार होण्याचा हुकूम मोडण्याचा तांत्रिक गुन्हा केला आहे, असें कोर्टाकडून सांगण्यांत आलें. ता. १ जानेवारी १९०८ ला म. गांधींनाही तुरुंगवासाची पहिली शिक्षा झाली व ती उघडपणें कायदा मोडून व गुन्हा कबूल करून त्यांनीं आपणावर ओढवून घेतली होती.

सत्याग्रहाचें तत्त्व व त्याचें महत्त्व

सरकारनें गुन्ह्याचा आरोप करून एखाद्या व्यक्तीवर खटला भरावा, त्यानें तो आरोप खोटा म्हणून, आपला बचाव करण्यासाठीं वकील

देऊन, अथवा स्वतः वकिली करून, कायद्याच्या कचाटींतून सुटण्याचा शक्य तों प्रयत्न करावा, अखेरपर्यंत आपण निर्दोषी आहों असें प्रतिपादन करावें, आणि दोष अथवा गुन्हा शाबीत झाल्यानंतर त्याबद्दल कायद्यानें ठेवलेली शिक्षा कमींत कमी भोगावी लागावी असा प्रयत्न आरोपीनें करावा, हें तंत्र सर्वांच्या परिचयाचें आहे. पण आरोपीनें कोणताही बचाव न करतां मीं कायदा किंवा हुकूम मोडला आहे, व तो जाणूनबुजून कर्तव्यबुद्धीनें मोडला आहे, मला कायद्यानें सांगितलेली जास्तींत जास्त शिक्षा द्या, अशी न्यायाधिशांपाशीं शिक्षेची याचना करावी हें सत्याग्रही तंत्र १९०६ सालीं लोकांना अपूर्वच होतें. तें पाहून लोक थक्कच झाले; कारण हिंदुस्थानांत या वेळीं जे राजकीय खटले होत असत त्यांतही हें सत्याग्रही तंत्र कोणी अवलंबीत नसे. दक्षिण आफ्रिकेंत आपण तेथील सरकारशीं कोणत्या वृत्तीनें लढलों त्याचें वर्णन म. गांधींनीं १९१६ सालीं जुलैच्या २७ तारखेस विद्यार्थ्यांपुढें बोलत असतांना साबरमती आश्रमांत पुढीलप्रमाणें केलें: "या उपायाचें अवलंबन करणाराला कोणाचीं डोकीं फोडावयाचीं नसतात, फक्त आपलेंच डोकें फोडूं द्यावयाचें असतें. आम्हीं दक्षिण आफ्रिकेंतील सरकारशीं सामना करण्यासाठीं हाच उपाय स्वीकारला होता. आम्हीं सरकारला सांगितलें कीं, 'आम्ही कधींही तुमच्या जुलमी कायद्याखालीं मान वांकविणार नाहीं. ज्याप्रमाणें दोन हातांशिवाय टाळी वाजत नाहीं, दोन माणसांशिवाय भांडण होऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें दोन पक्षांशिवाय राज्यही संभवत नाहीं. जोंपर्यंत आम्ही प्रजा या नात्यानें राहत आहोंत तोंपर्यंतच तुम्हांला आमचे राज्यकर्ते म्हणून राहतां येईल. पण आम्ही आतां या बाबतींत तुमच्याशीं प्रजा या नात्यानें रहायला तयार नाहीं. आणि मग तुम्ही या बाबतींत आमच्यावर राज्य करूं शकणार नाहीं. जेथपर्यंत तुम्ही आम्हांला न्यायानें व प्रेमानें बांधून घ्याल, तेथपर्यंतच आम्ही तुम्हांला बांधूं देऊं. पण तुम्ही आमच्याशीं दगलबाजी करून जर आम्हांला चिरडून टाकूं पहाल, तर तें अशक्य आहे. इतर बाबतींत तुम्हाला वाटेल तें करा, पण आमच्यासाठीं जे कायदे कराल त्यांत आमचें मत घ्यावेंच

लागेल. आम्हांला विचारल्यावांचून आम्हांला दडपून टाकण्यासाठीं जे जे कायदे कराल ते ते तुमच्या पुस्तकांतच राहणार आहेत. आम्ही ते कधींही पाळणार नाहीं. त्याबद्दल जी शिक्षा तुम्ही कराल ती सोसायला आम्ही तयारच आहों. तुरुंगांत पाठवाल तर तेथें स्वर्ग समजून राहूं! फांशीं चढवाल तर हंसतमुखानें फांसावर चढूं! आमच्यावर जितक्या दुःखांचा वर्षाव कराल तितकीं सर्वे दुःखें शांतपणें सहन करूं, पण तुमच्या कैसालाही धक्का लावणार नाहीं. आम्ही आनंदानें मरूं, तुम्हांला हातही लावणार नाहीं. पण या कुडींत प्राण असेपर्यंत तुमच्या जुल्मी कायद्याची अमलबजावणी आमच्यावर करतां येणार नाहीं.'

"सुरवात अशी झाली कीं, एका रविवारीं जोहान्सबर्गमध्यें माझ्या घरासमोरील टेंकडीवर मी आणि हेमचंद्र नांवाचे दुसरे एक गृहस्थ संध्याकाळच्या वेळीं बसलों होतों. हा दिवस जसा काय कालच गेला, इतकी मला त्याची आठवण आहे. माझ्यापाशीं सरकारी गॅझेट आलेलें होतें. तें वाचतांच माझें शरीर संतापानें कांपूं लागलें. त्यांत वर सांगितलेले कित्येक कायदे हिंदी लोकांसंबंधीं झाल्याचें लिहिलें होतें. मला वाटलें कीं, सरकार आपल्या मनांत काय समजत आहे? मी एकदम त्याचें भाषांतर केलें व खालीं लिहिलें कीं, 'आम्ही या कायद्यांना कधींही वश होणार नाहीं.' तो लेख लागलाच फिनिक्सकडे 'इंडियन ओपिनियन' पत्रांत छापण्यासाठीं पाठविला. या वेळीं मला स्वप्नांतही वाटलें नव्हतें कीं, हिंदी लोक या कामीं अपूर्व शौर्य दाखवितील किंवा सत्याग्रहाची एवढी जोरांत चळवळ होईल. मीं लागलीच ही हकीकत माझ्या हिंदी बंधूंना सांगितली. त्यावरून पुष्कळ लोक सत्याग्रह करण्यास तयार झाले. पहिल्या खेपेच्या लढ्यांत लोक सामील झाले ते अशा समजुतीनें कीं, थोडा काळ दुःख सहन केल्यानें आपलें कार्य होऊन जाईल.

"पुन्हा दुसऱ्या खेपेला जेव्हां झगडा सुरू झाला तेव्हां सुरवातीला थोडींच माणसें होतीं, पण मागाहून पुष्कळ येऊन मिळालीं.

आणि जेव्हां ना. गोखले आफ्रिकेंत आले, तेव्हां सरकारनें तडजोड करण्याचें वचन दिल्यामुळें झगडा बंद पडला. पण पुढें सरकारनें दगलबाजी केली व स्वतःचें वचन पाळलें नाहीं. तेव्हां पुनः तिसऱ्या वेळीं उचल करावी लागली. त्या वेळीं गोखलेसाहेबांनीं मला विचारलें कीं, चळवळींत किती माणसें येतील? मी सांगितलें कीं, तीसपासून साठपर्यंत येतील. पण तितकींही माणसें न येतां आम्हीं सोळा इसमांनींच सामन्यास सुरवात केली. आम्हीं दृढ-निश्चयच केला होता कीं, जोंपर्यंत सरकार आपले जुलमी कायदे रद्द करणार नाहीं किंवा कांहीं समाधानकारक निकाल होणार नाहीं, तोंपर्यंत मिळेल ती शिक्षा सहन करावयाची, पण नमतें घ्यावयाचें नाहीं. अधिक माणसें आम्हांला मिळतील अशी आशा मुळींच नव्हती. परंतु जेव्हां मनुष्य निःस्वार्थपणें, सत्याखातर, देशहितासाठीं, आत्मार्पण करण्यास तयार होतो, तेव्हां त्याच्या कार्याचा परिणाम झाल्या-शिवाय राहत नाहीं! पाहतां पाहतां एकदम वीस हजार मनुष्यें चळवळीस मिळालीं, तुरुंगही पुरेनासे झाले, आणि सर्व हिंदुस्थानचें रक्त उसळ्या मारूं लागलें. पुष्कळ जण म्हणतात कीं, लॉर्ड हार्डिंज मध्यें न पडते तर तडजोड होऊं शकली नसती; पण असें म्हणणारे एवढा विचार करण्यास विसरतात कीं, लॉर्ड हार्डिंज यांनीं मध्यस्थी कां केली? कानडामधील हिंदी लोकांइतकीं दुःखें दक्षिण आफ्रिकेंत नव्हतीं, मग कानड्याच्यासंबंधीं मध्यस्थी कां केली नाहीं आणि दक्षिण आफ्रिकेसंबंधींच कां केली? ज्या ठिकाणीं हजारों माणसांचें आत्मबल एकत्र होतें, ज्या ठिकाणीं हजारों स्त्रीपुरुष प्राण देण्याला तयार होतात, तेथें काय अशक्य आहे? मध्यें पडल्याशिवाय लॉर्ड हार्डिंजना चालण्यासारखेंच नव्हतें, आणि तसें करून त्यांनीं आपलें शहाणपण सिद्ध केलें. शेवटीं आफ्रिकेच्या सरकारला तडजोड करावी लागली हें आपणांला माहीतच आहे. यावरून आपणाला दिसून येईल कीं, कोणाचींही डोकीं फोडल्याशिवाय केवळ आत्मबलानें—सत्याग्रहानें—आपणांस पाहिजे तें मिळवितां येईल.

"शस्त्रानें लढणाराला शस्त्रांची किंवा इतरांच्या मदतीची वाट

पहावी लागते, आडवाटा शोधाव्या लागतात; पण सत्याग्रहानें लढणाऱ्याचा मार्ग सरळ असतो, त्याला कोणाचीही वाट पहावी लागत नाहीं. तो एकटा असला तरी लढूं शकतो, इतरांची मदत नसेल तर फळ उशिरां मिळेल एवढेंच. आम्ही थोडींच माणसें असतों तर फरक एवढाच पडला असता कीं, आज मी आपल्यामध्यें बसलेला दिसलों नसतों. कदाचित् माझें सर्व आयुष्यही तेथें झगडण्यांत खर्ची पडलें असतें. पण म्हणून काय झालें? जें फळ मिळालें तेंच थोडें उशिरां मिळालें असतें. सत्याग्रहाच्या युद्धांत फक्त आपलीच तयारी पाहिजे. संयमवृत्ति बाणलेली असली पाहिजे. ही तयारी करण्यासाठीं गिरिकंदरीं रहावें लागलें तरी तेथें रहावें.

"आफ्रिकेंतील सत्याग्रह यशस्वी होण्यास वेळ लागला याचें कारण हें होतें कीं, तेथील सत्याग्रह अत्यंत शुद्ध स्वरूपाचा नव्हता. चळवळींत पडलेल्या सर्वच लोकांना सत्याग्रहाची खरी किंमत माहीत नसते. मारामाऱ्या आणि अत्याचार सोडणारे लोक नेहमीं तो अनिष्ट आहे अशी मनाची खात्री झाल्यामुळेंच सोडतात असें नाहीं. हे लोक म्हणजे नांवाचेच सत्याग्रही. कित्येक लोक या चळवळींत मिश्र हेतूनें व कधीं कधीं अशुद्ध हेतूनें सामील झाले होते. सक्त देखरेख करण्याचें काम घडलें नसतें, तर कित्येकांनीं अत्याचार करण्यासही मागेंपुढें पाहिलें नसतें. ज्याच्या आत्म्याचा विकास पूर्णपणें झाला आहे तोच मनुष्य अस्सल सत्याग्रह करण्यास खरोखरच लायक आहे. तो एका क्षणांत इष्ट वस्तु साध्य करूं शकेल.

"सत्याग्रहानें 'एक पंथ दो काज' होतात. त्यानें आत्मोन्नतिही होते आणि विश्वाची सेवाही घडते. अशा दृष्टीनें पाहिलें असतां सत्याग्रह हें खरें शिक्षण होय. सामान्य शिक्षण संपल्यावर हें द्यायचें नसून त्याच्याआधीं दिलें पाहिजे. द्वेषाला प्रेमानें, असत्याला सत्यानें, आणि जुलमाला सहनशीलतेनें जिंकतां येतें ही गोष्ट अक्षरओळख होण्यापूर्वीच मुलाला समजूं लागली पाहिजे. या गोष्टीची सत्यता मला जोरानें भासूं लागल्यामुळेंच आफ्रिकेंतील चळवळ चालू असतांना मीं

तेथें एक आश्रम स्थापन केला होता. माझ्या येथें येण्याचेंही एक सबळ कारण हें आहे कीं, सत्याग्रही या नात्यानें माझ्यांत जी पुष्कळच अपूर्णता आहे, ती नाहींशी करण्याची खटपट करावी, आणि ही गोष्ट जितकी हिंदुस्थानांत साध्य होण्याजोगी आहे तितकी दुसऱ्या कोठेंही होण्यासारखी नाहीं." *

सत्याग्रहाच्या तीन मोहिमा

दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह-लढ्याच्या एकंदर तीन मोहिमा झाल्याचा व त्यांतील अखेरची मोहीम फार मोठी व यशस्वी झाल्याचा गांधीजींच्या वरील भाषणांत उल्लेख आलेला आहे. १९०६ सालीं जरी सत्याग्रहाची प्रतिज्ञा ११ सप्टेंबरच्या जोहान्सबर्ग येथील सभेंत घेण्यांत आली, तरी त्यानंतर सुमारें एक वर्षभर शिष्टाईतच काळ गेला. १ ऑगस्ट १९०८ सालीं ट्रान्सवाल सरकारनें एशियाटिक लोकांविरुद्ध नोंदणीकायदा केला, व त्यानंतर नोंदणी करून परवाने न घेतां राहणाऱ्यांना पकडून तुरुंगांत टाकण्याचा किंवा त्यांना ट्रान्सवालमधून हद्दपार करण्याचा सपाटा सुरू केला. म. गांधींना १ जानेवारीस दोन महिन्यांची सजा देण्यांत आली. पण ३० जानेवारीपासून मि. आल्बर्ट कार्टराइट यांच्या मार्फत गांधीजींशीं तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न ट्रान्सवाल सरकारनें सुरू केले. मि. आल्बर्ट कार्टराइट हे 'ट्रान्सवाल लीडर' या पत्राचे संपादक होते व त्यांनीं म. गांधींची गांठ तुरुंगांत जाऊन घेतली. जानेवारीअखेरपर्यंत शेंकडों हिंदी लोक सत्याग्रह करून तुरुंगांत गेल्यामुळें व ही लाट एकसारखी पसरूं लागल्यामुळें हें प्रकरण मिटवावें अशी इच्छा सरकारला झाली. ही तडजोड घडून येऊन म. गांधींची सुटका १९०८ च्या फेब्रुवारींत झाली.

तडजोडीचें स्वरूप असें होतें कीं, सरकारनें एशियाटिक लॉ अमेंडमेंट कायदा रद्द करण्याचें वचन द्यावें, हें वचन तीन महिन्यांनंतर

* 'महात्मा गांधी', विभाग ३ रा, लेख व भाषणें, पृष्ठ २८-३१. (लेखिका-अवंतिकाबाई गोखले)

अमलांत यावें, मध्यंतरींच्या काळांत हिंदी लोकांनीं स्वेच्छेनें नोंदणी करून व आंगठे देऊन परवाने घ्यावेत, मूळ कायदा तीन महिन्यांत रद्द होणार असल्यानें आतां नोंदणी करण्यास व स्वेच्छेनें आंगठे देण्यास हिंदी लोकांनीं हरकत घेऊं नये, असें म. गांधींना वाटलें. आत ही गोष्ट कायद्याच्या सक्तीनें होत नसून, कायदा रद्द करण्याचें वचन मिळाल्यामुळें उभयपक्षी करारानें व स्वेच्छेनें होत आहे हा युक्तिवाद करून, म. गांधींनीं या तडजोडीस आपल्या अनुयायांची मान्यता मिळविली. महिना दीड महिना मोहीम होतांच सरकार नमलें यांत या तडजोडीचें खरें महत्त्व होतें. आणि जनरल स्मट्सनीं दिलेलें वचन जर दगलबाजीनें मोडलें नसतें, तर हा लढा १९०८ सालींच संपला असता; पण सरकारनें दगलबाजी केली व आपलें वचन मोडलें.

म. गांधींना आपल्या अनुयायांना ही तडजोड पटवून देण्यास फार प्रयास पडले. ज्या लोकांना परवाने घेऊं नका व आंगठे देऊं नका असें सांगितलें, त्यांनाच आतां तसें करण्यास सांगण्याचा प्रसंग आला. लोक म्हणूं लागले कीं, म. गांधी म्याले; कोणी म्हणाले, म. गांधींनीं लांच घेतली आणि कांहीं तर त्यांना दगलबाज ठरवून त्यांचा खून करण्यासही टपले. १० फेब्रुवारीपासून एशियाटिक कचेरींत जाऊन स्वेच्छेनें परवाने घेण्यास सुरुवात व्हावयाची होती. स्वतः म. गांधी प्रथम परवाना घेणार होते व त्यासाठीं ते कचेरींत जावयास निघाले. कांहीं पठाण त्यांचा खून करण्याला टपून बसले होते व त्यांनीं म. गांधींच्यावर हल्ला करून त्यांना खालीं पाडलें. म. गांधी रक्तबंबाळ होऊन खालीं पडले व बेशुद्ध झाले. पोलिसांनीं हल्लेखोरांस पकडून नेलें व म. गांधींना उचलून घरीं नेण्यांत आलें. मिसेस डोक यांनीं त्यांना आपल्या घरीं नेऊन व शुश्रूषा करून शुद्धीवर आणिलें. ते शुद्धीवर येतांच त्यांनीं हल्ला करणाऱ्या पठाणांचा नेता मीर आलम कोठें आहे असा प्रश्न केला. पोलिसांनीं त्याला पकडल्याचें समजतांच त्यांनीं पोलिस अधिकाऱ्यांना त्याला माफी देण्याचें पत्र लिहिलें. तसेंच नोंदणी अधिकाऱ्यास घरीं बोलावून, प्रथम नोंदणी करून व आंगठे देऊन आपला पहिला परवाना काढण्याची प्रतिज्ञा पुरी केली.

यानंतर सर्व हिंदी लोकांनीं स्वेच्छेनें परवाने काढून आपल्या बाजूनें सरकारशीं केलेला करार, तीन महिन्यांच्या आंत पुरा करण्याचें काम त्यांनीं अंगावर घेतलें. त्यासाठीं जोहान्सबर्ग येथें एक सभा चालू असतांना, त्यांच्यावर सुऱ्याचा हल्ला करण्यासाठीं आणखी एक मनुष्य आलेला होता. सभा संपवून ते घराकडे चालूं लागतांच तो त्यांच्याकडे सरसावला. म. गांधींच्या हें लक्षांत येतांच त्यांनीं एकदम पुढें जाऊन त्याच्या गळ्यांत हात घातला आणि हंसून त्याच्याशीं गोड शब्दांत बोलण्यास सुरवात केली. हे दोघे जण बऱ्याच अंतरापर्यंत एकमेकांशीं काय बोलत आहेत याची त्यांच्या बरोबरीच्या लोकांस कांहीं कल्पना नव्हती. थोड्याच वेळांत तो मारेकरी आपलें हत्यार म. गांधींच्याजवळ देऊन लज्जेनें शरमून परत गेला. नंतर पोलकबाई बरोबर होत्या त्यांनीं म. गांधींना विचारलें कीं, हा मनुष्य कोण होता? तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, तो माझा खून करण्यासाठीं सुरा घेऊन आलेला होता, आणि म. गांधींनीं तो सुरा बाईंच्या हातीं दिला. या वेळेपासून म. गांधींच्याबरोबर शरीररक्षक ठेवावे असें लोकांनीं ठरविलें. इतक्या कष्टानें व लोकांत अप्रियता संपादून म. गांधींनीं आपल्या अनुयायांना कराराची पूर्तता करावयास लाविलें. मे १९०८ पर्यंतच्या काळांत सर्व हिंदी लोकांनीं परवाने घेतले. पण जनरल स्मट्स यांनीं नोंदणीचा कायदा रद्द करण्याचें वचन बेधडक मोडिलें! म. गांधी फशीं पडले.

यानंतर म. गांधींनीं पुनः चळवळ करण्याचा निर्धार केला, आणि स्वेच्छेनें काढिलेले परवाने जाहीर रीतीनें जाळून टाकण्याचें ठरविलें. त्याबरोबर लोकांत पुनः उत्साहाचें भरतें आलें, आणि जोहान्सबर्ग येथें पुनः एक प्रचंड सभा भरवून, त्या सभेंत जाहीरपणें २,००० परवाने एकत्र करून, त्यांची होळी करण्यांत आली! या वेळीं म. गांधींच्यावर प्राणघातक हल्ला करणारा पठाण मीर आलम हा सभेंत आला आणि त्यानें म. गांधींचें स्वागत करून त्यांच्याशीं प्रेमानें व आदरानें हस्तांदोलन केलें व त्यांची क्षमा मागितली. म. गांधींनीं त्याला आधींच क्षमा केलेली होती. पुनः सत्याग्रहास जोर येऊं लागला व पुनः म. गांधींना पकडण्यांत आलें. १५ ऑक्टोबर रोजीं म. गांधींना

पुनः दोन महिन्यांची शिक्षा झाली. त्यानंतर पुनः तीन महिन्यांची शिक्षा झाली.

या तिसऱ्या वेळच्या बंदिवासांत म. गांधींना फार त्रास सोसावा लागला. एक रात्रभर त्यांना खुनी, बदमाष कैद्यांच्या बराकींत कोंडण्यांत आलें होतें व ते दुष्ट लोक त्यांना शिव्या देऊन अचकटविचकट हावभाव करून सतावूं लागले. हे रानटी गुन्हेगार काफिरी व चिनी होते. दुसऱ्या दिवशीं त्यांना दुसरीकडे नेऊन ठेवण्यांत आलें; पण या खेपेस त्यांना कष्टाचीं कामें, गलिच्छ कामें, अपमान सहन करण्याचे प्रसंग, जेवणाखाणाचे हाल अशा अनंत यातना सहन कराव्या लागल्या. अर्थात् ते हा सर्व त्रास तितिक्षाबुद्धीनें व आत्मोन्नती-साठीं करावी लागणारी तपश्चर्या या दृष्टीनें सहन करीत होते. बंदि-वासांत असतांनाही त्यांचें धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास, इत्यादि विषयांचें वाचन चालूच होतें. टॉलस्टॉय, इमर्सन, कार्लाईल, प्लेटो, हे त्यांचे आवडते ग्रंथकार होते. तसेंच उपनिषदें, भगवद्गीता, पातंजल योग, कवि राजचंद्र यांचे ग्रंथ व बायबल यांचाही अभ्यास चालूच होता. आपल्या सर्व व्यवहारांचें साध्य आत्मप्राप्ति हेंच असलें पाहिजे, हें त्यांना उपनिषदांचें रहस्य वाटत होतें. बंदिवासांत भोगावे लागणारे क्लेश या आत्मनिष्ठ वृत्तीनें ते सहन करीत होते; कारण ते सत्यासाठीं बंदिवास सोशीत होते आणि सत्य हेंच परमेश्वराचें, परमात्म्याचें किंवा परब्रह्माचें स्वरूप होय असें त्यांना वाटत होतें. हे क्लेश ते अद्वेषवृत्तीनें सहन करीत होते. तसेंच शरीरकष्टाचीं व स्वच्छतेसाठीं करावीं लागणारीं गलिच्छ गणलेलीं कामें करण्यांतही त्यांना आनंद वाटत असे. मात्र आपल्याबरोबर तुरुंगांत आलेल्या इतर सहकाऱ्यांना होणारा असह्य त्रास पाहून, त्यांना या कष्टांत लोटण्यांत आपण चुकलों तर नाहींना, असाही विचार त्यांच्या मनांत येऊन, केव्हां केव्हां त्यांचें चित्त उद्विग्नही होई; पण आपण केलेला उपदेश कर्तव्यबुद्धीनें केलेला आहे व सत्याग्रही निष्ठेच्या मनुष्याला येतील ते कष्ट सहन करण्या-वांचून दुसरा मार्ग नाहीं, असा विचार करून ते ही उद्विग्नता नष्ट करीत. सत्याग्रह हा लोकसेवेचा तसाच आत्मप्राप्तीचाही मार्ग आहे ही त्यांची निष्ठा या बंदिवासांत वाढतच गेली.

टॉलस्टॉय, इमर्सन, कार्लाईल यांचे ग्रंथ वाचून, आधुनिक युरोपीय संस्कृति ही भौतिक सुखाचें, व्यक्तिस्वार्थाचें व स्पर्धेचें ध्येय पुढें ठेवून मनुष्याला भ्रष्ट बनवीत आहे अशी त्यांची खाली झाली. तसेंच कार्लाईलचें फ्रेंच क्रांतीवरील पुस्तक त्यांनीं वाचलें तेव्हां त्यांची अशी खात्री झाली कीं, आधुनिक युरोपनें सशस्त्र क्रांतीचा जो मार्ग स्वीकारला त्यापासून त्याचें मुळींच हित झालेलें नाहीं, व आपण त्याचें अनुकरण न करतां दुसरा मार्ग शोधून काढिला पाहिजे. मॅझिनीचें 'मानवी कर्तव्यें' (Duties of Man) हें पुस्तक वाचून त्यांचें हें मत अधिकच दृढ झालें. फ्रेंच क्रांतिकारकांनीं व्यक्तीला हक्कासाठीं झगडण्यास शिकविलें, पण आपण तसें न करतां, आपल्या कर्तव्यासाठीं झगडण्याचा उपदेश केला पाहिजे हें मॅझिनीचें मत त्यांना पटलें. पण कर्तव्यासाठीं झगडण्याचा म. गांधींचा मार्ग अहिंसेचा होता. त्या अहिंसक लढ्यावरील त्यांची श्रद्धा या लढ्यांतील अनुभवानें अधिकच वृद्धिंगत झाली.

१९०९ सालीं दोनदां तुरुंगवास सोसून बाहेर आल्यावर सरकारनें त्यांना फिरून तुरुंगांत न घालतां केवळ त्यांच्या अनुयायांनाच तुरुंगांत घालून त्यांचे अनुयायी नष्ट करण्याचा डाव टाकला. तेव्हां त्यांनीं हिंदुस्थान व इंग्लंड या दोन देशांत शिष्टमंडळें पाठवून, चळवळ पुष्कळ काळ चालली तर तिला बाहेरून सहाय्य व सहानुभूति मिळावी असे प्रयत्न करण्याचें ठरविलें. त्यांचे युरोपियन मित्र व सहकारी मि. पोलक हे हिंदुस्थानांत आले व ते स्वतः इंग्लंडास गेले. १९०९ सालीं जूनपासून नोव्हेंबरपर्यंतचा काळ त्यांनीं इंग्लंडांत साम्राज्य सरकारशीं व तेथें गेलेल्या जनरल स्मट्सप्रभृति दक्षिण आफ्रिकन मुत्सद्यांशीं शिष्टाई करण्यांत घालविला. वसाहतींत येणाऱ्या व राहणाऱ्या हिंदी लोकांवर वर्णभेदमूलक कायदे करून अन्याय करण्यांत येऊं नये हें तत्त्व ज. स्मट्सकडून मान्य करवून घेण्याचे त्यांनीं प्रयत्न चालू ठेविले होते. पण ज. स्मट्स यांनीं वर्णभेद नष्ट करण्याचें तत्त्व मान्य करण्यास स्पष्ट नकार दिला. अशा प्रकारें त्या वेळीं त्यांचे प्रयत्न सफल झाले नाहींत, तरी पुढील सालीं दक्षिण आफ्रिकेंत संघराज्य स्थापन होतांच ७ ऑक्टोबर १९१० या तारखेस साम्राज्य सरकारकडून

संघराज्यास एक खलिता गेला. या खलित्यांत १९०७ चा दुसरा कायदा (एशियाटिक लॉ अमेंडमेंट ॲक्ट)—या कायद्याविरुद्धच सत्याग्रह चालू होता—रद्द करावा आणि हिंदी लोकांना वर्णभेदाच्या तत्त्वावर आफ्रिकेंत येण्यास बंदी करण्यांत येऊं नये, फक्त हिंदी लोक सुचवितात त्याप्रमाणें त्यांच्या आयातीस मर्यादा घालण्याची दुसरी एखादी योजना करावी, अशी जोराची शिफारस करण्यांत आली. पुढें १९११ सालीं याच शिफारशीच्या आधारें आपण नवा कायदा १९१२ सालीं आणूं, तोंपर्यंत आहे या कायद्याचीही बजावणी करण्यांत या शिफारशीप्रमाणें सुधारणा करूं, असें वचन दक्षिण आफ्रिकन सरकारनें दिलें व ही दुसरी युद्धतहकुबी होऊन सत्याग्रहयुद्धाची दुसरी मोहीम स्थगित करण्यांत आली. ही युद्धतहकुबी पुनः एक वर्ष वाढविण्यांत आली व ती १९१३ च्या ऑक्टोबरपर्यंत तशीच राहिली.

"हिंद स्वराज्य" व सत्याग्रह

१९०९ सालीं जूनपासून नोव्हेंबरपर्यंत म. गांधी इंग्लंडात शिष्टाईसाठीं होते. त्या काळांत त्यांची व हिंदी क्रांतिकारकांची गांठ पडली. वॅ. सावरकर यांचीही या वेळीं त्यांची ओळख झाली. त्या वेळीं 'हिंदी स्वातंत्र्याचें युद्ध' या नांवाचें १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धावरील त्यांचें पुस्तक लिहून झालें होतें. या क्रांतिकारक मंडळींशीं म. गांधींची बरीच चर्चा झाली, पण कोणी कोणास आपलीं मतें पटवूं शकले नाहींत. गांधीजींना या वेळींच हिंदी स्वराज्याचा प्रश्न सत्याग्रहानेंच सुटूं शकेल अशी निष्ठा वाटूं लागली होती. युरोपीय इतिहासाचा अभ्यास करून, फ्रेंच क्रांतिकारक किंवा इटालियन क्रांतिकारक यांचा मार्ग चोखाळून, आपल्या देशाला बंधमुक्त करण्याचा प्रयत्न जे करीत आहेत ते चुकत आहेत असें त्यांचें मत त्या वेळींच बनलें होतें. हिंदुस्थानांत नेमस्त-प्रागतिक व जहाल-राष्ट्रीय असे दोन पक्ष अनुक्रमें ना. गोखले व लो. टिळक यांच्या नेतृत्वाखालीं एकमेकांशीं झगडत होते. १९०७ सालीं या झगड्यांत राष्ट्रसभा दुभंगली व राष्ट्रीय पक्ष सरकारनें उखडून काढिला. यानंतर सशस्त्र क्रांतिकारक

पक्ष वाढूं लागला होता. याच क्रांतिकारकांची गांठ म. गांधींच्याशीं या वेळीं पडली होती. १९०९ च्या नोव्हेंबरांत ते इंग्लंडहून आफ्रिकेस येण्यास परत फिरले. त्या वेळीं बोटींतच त्यांनीं 'हिंद स्वराज्य' या नांवाचें एक संवादरूप पुस्तक लिहिलें व तें आफ्रिकेंत गेल्यावर 'इंडियन ओपिनियन' या आपल्या साप्ताहिकांतून प्रकरणशः प्रसिद्ध केलें. १९०९ सालीं भरलेल्या हिंदी राष्ट्रसभेला त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहास सहाय्य करण्यासंबंधीं एक पत्र लिहिलें होतें. त्या पत्राच्या शेवटींही त्यांनीं आपला हिंदी राजकारणाचाही प्रश्न सत्याग्रहाच्या मार्गानें सुटेल, आपण युरोपीय संस्कृतीचें अंधानुकरण करूं नये, ती संस्कृति अधोगतीस लागली असून तिचा लवकरच विनाश होणार आहे, असे उद्गार काढिले होते. यावरून असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, हिंदुस्थानचा स्वराज्याचा लढा आपण सत्याग्रहाच्या साधनानें यशस्वी करूं शकूं असा विचार त्यांना १९०९ सालीं प्रथम सुचला. 'हिंद स्वराज्य' या पुस्तकांत त्यांनीं आपली ही निष्ठा सविस्तर मांडली असून, त्यांचे त्या पुस्तकांत ग्रथित झालेले विचार नेभस्त-प्रागतिक, जहाल-राष्ट्रीय आणि सशस्त्र क्रांतिकारक या तीनही विचार-सांप्रदायांहून अगदीं वेगळे व स्वतंत्र असे आहेत.

टॉलस्टॉय आश्रम आणि उपवासाचें तंत्र

१९१० सालीं दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाला एक निराळेंच वळण लागलें. म. गांधी व मि. पोलक हे १९०९ सालीं अनुक्रमें इंग्लंड व हिंदुस्थानांत जाऊन दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचीं गाऱ्हाणीं जगापुढें मांडूं लागले. तेव्हां हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार यांच्याकडून दक्षिण आफ्रिकेंतील सरकारवर हिंदी लोकांचा प्रश्न सोडविण्याबद्दल दडपण येऊं लागलें. हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व धनिकवर्गही दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या देशबांधवांच्या दुःस्थिती-संबंधींच्या कहाण्या ऐकून जागे झाले, व ना. गोखले व त्यांचा भारत सेवक समाज यांनीं सर्व देशभर जागृति करून या प्रश्नास धसास लाविलें. ना. गोखले यांनीं मध्यकायदेमंडळांत असा ठराव मांडला कीं, यापुढें

दक्षिण आफ्रिकेंत हिंदी मजुरांना मुदतबंदीच्या करारानें पाठविण्यास बंदी करावी. तिकडे ट्रान्सवाल सरकारनें सत्याग्रही लोकांना हद्दपार करून हिंदुस्थानांत आणून सोडण्यास प्रारंभ केला. या सालीं सत्याग्रहींच्या एकंदर तीन तुकड्या हिंदुस्थानांत पाठविण्यांत आल्या. त्यांत अनुक्रमें एकशें चार, साठ व एकशें सव्वीस असे एकूण सुमारें तीनशें सत्याग्रही होते. हे जन्मापासून दक्षिण आफ्रिकेंतच वाढलेले असून त्यांना हिंदुस्थानांत कोठेंही थारा नव्हता. आपल्या पूर्वजांची ही मातृभूमि आहे, यापलीकडे त्यांची येथें कोणाशींही ओळखदेखील नव्हती. त्यांचीं बायकामुलें दक्षिण आफ्रिकेंतच होतीं.

म. गांधी यांनीं त्यांचे जर्मन मित्र मि. केलनबॅक यांच्या मदतीनें ३० जानेवारी १९१० रोजीं जोहान्सबर्ग या शहराजवळ एक टॉल-स्टॉय आश्रम नांवाची संस्था काढिली होती, व तेथेंच या निर्वासित हिंदी लोकांच्या बायकामुलांची सोय केलेली होती. त्यांची सर्व सेवा-शुश्रूषा व काळजी करण्याचा भार स्वतः म. गांधी व त्यांचे मित्र मि. केलनबॅक यांनीं उचलला होता. त्यांचे कपडे धुणें, साफसफाई करणें, मुलें सांभाळणें, शिक्षण देणें, इत्यादि सर्व प्रकारचीं कामें स्वतः म. गांधींनींही केलेलीं आहेत. या आश्रमांत त्यांना मुलांमुलींना एकत्र शिकवितांना किंवा वावरूं देतांना उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रश्नांचीं सत्याग्रही दृष्टिकोनानें नवीं नवीं उत्तरें देण्याचे प्रसंग आले. उनाड, खोडकर मुलांना व सत्प्रवृत्त मुलांना एकत्र ठेवावें कीं नाहीं, खोडकर मुलांना शिक्षा करावी कीं नाहीं, या प्रश्नांचींही उत्तरें त्यांना द्यावीं लागलीं. १९११-१२ सालांत त्यांना आश्रमांतील दोन व्यक्तींच्या अधःपतनाची माहिती समजली, तेव्हां त्यांनीं त्यावर आत्मशुद्धीसाठीं म्हणून उपवास करण्याचें ठरविलें. एकदां त्यांनीं एक आठवडा उपवास केला व साडेचार महिने एकभुक्त राहण्याचें व्रत स्वीकारलें. त्यानंतर त्यांनीं एकदां चौदा दिवसांचा एक दीर्घ उपवास केला. हा आपला प्रयोग त्या वेळीं यशस्वी झाला असें ते लिहितात. शिष्याच्या अपराधाबद्दल त्याला शिक्षा न करतां गुरूनें स्वतःला दंड करण्याचें हें नवेंच सत्याग्रही तंत्र म. गांधींनीं टॉलस्टॉय आश्रमांत प्रथम अवलंबिलें

असें म्हणतां येईल. यासंबंधीं म. गांधींचे विचार वाचनीय आहेत. ते त्यांच्याच शब्दांत पुढें देतों :—

"कित्येक कैदी सुटून गेल्यानंतर टॉलस्टॉय आश्रमामध्यें थोडींच माणसें राहिलीं. हीं मुख्यतः फिनिक्सवासी होतीं. त्यामुळें आश्रम फिनिक्सला घेऊन गेलों. फिनिक्समध्यें माझी खूप कसोटी झाली. शिल्लक राहिलेल्या आश्रमवासियांना फिनिक्सला पोहोंचवून मी जोहान्सबर्गला परत येतों तोंच दोन व्यक्तींच्या भयंकर पतनाची बातमी मला मिळाली. मीं त्याच दिवशीं फिनिक्सची गाडी पकडली. मि. केलन-बॅकनीं माझ्याबरोबर येण्याचा आग्रह धरला...पतनाची बातमी मला त्यांचेकडूनच मिळाली होती.

"रस्त्यामध्यें मीं माझा धर्म समजावून घेतला, किंवा तो मला समजला, अशी स्वतःच्या मनाची समजूत करून घेतली म्हणाना. मला असें वाटलें कीं, आपल्या देखरेखीखालीं राहिलेल्यांच्या पतनाबद्दल पालक किंवा शिक्षक कांहीं अंशानें तरी जबाबदार आहे...म्हणून मी सात दिवस उपवास व साडेचार महिने एकाहार असें व्रत घेतलें... एवढा निश्चय केल्याबरोबर मला लगेच हलकें वाटूं लागलें, मन शांत झालें, ज्यांचे हातून दोष घडला होता त्यांचेबद्दलचा राग थंडावला, आणि त्यांच्याबद्दल कींवच तेवढी राहिली.

" अशा तऱ्हेनें आगगाडीमध्येंच मन हलकें करून मी फिनिक्सला पोहोंचलों. तपास करून अधिक माहिती काढायची ती काढून घेतली. माझ्या उपवासाबद्दल सर्वांना कठीण तर वाटलेंच, पण त्यामुळें वातावरण निर्मळ झालें. पापाचरणाची भयंकरता सर्वांच्या लक्षांत आली, आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा आणि माझा संबंध मजबूत व सरळ झाला.

"या प्रसंगांतूनच कांहीं काळानंतर मला चौदा दिवस उपवास करण्याचा प्रसंग आला. त्याचा परिणाम तर अपेक्षेपलीकडेही चांगला झाला अशी माझी समजूत आहे.

"या प्रसंगावरून माझा असें सिद्ध करण्याचा हेतु नाहीं कीं,

शिष्याच्या प्रत्येक दोषाबद्दल नेहमीं शिक्षकानें उपवास वगैरे केलेच पाहिजेत. पण मला वाटतें कीं, कांहीं प्रसंगीं तरी असल्या प्रायश्चित्तादाखल करावयाच्या उपवासांची अवश्य जरूरी आहे. मात्र यासाठीं विवेक व अधिकार पाहिजेत. **जेथें शिष्य-शिक्षकामध्यें शुद्ध प्रेमबंधन नाहीं, जेथें शिक्षकाला शिष्याच्या दोषाबद्दल खराखुरा आघात वाटलेला नाहीं, जेथें शिष्याला शिक्षकाबद्दल आदर वाटत नाहीं, तेथें उपवास निरर्थक आहे आणि उलट हानिकारक होण्याचाही संभव आहे. परंतु असल्या उपवास-अर्धउपवासाबद्दल मतभेद असले तरीही शिक्षक हा शिष्याच्या दोषांबद्दल थोड्याबहुत अंशानें तरी जबाबदार आहे, याबद्दल मला लेशमात्र शंका नाहीं"** *

ज्या व्यक्तीचें आपणावर प्रेम आहे तिचा नैतिक अधःपात झाला असतां, आपण देहदंड सोसणें व आपला व त्या व्यक्तीचाही आत्मोद्धार साधण्यास सहाय्य करणें, हा विचार, दुसऱ्याच्या अंतःकरणांतील अंतरात्मा व आपला अंतरात्मा एकच आहे व एकमेकांना सहाय्य करून सर्वांनींच आत्मोन्नति करण्यासाठीं झटावें व तसें करतांना गुरुशिष्यांत असणारें प्रेमबंधन शिक्षेनें शिथिल न होतां तें अधिक दृढ करावें या दृष्टिकोनांत आहे. इंद्रियवश होणें व मनोनिग्रह सुटणें हें पापाचरणाचें आद्य कारण आहे. इंद्रियसंयम व मनोनिग्रह करण्याचें आत्मबल जागृत करणें हा उद्देश असला म्हणजे एकानें केलेल्या उपवासामुळें दुसऱ्याच्या अंगींही या वृत्ति जागृत होऊं शकतात. अर्थात् जेथें अपराधी मनुष्याला आपण केलेलें कृत्य पाप आहे असें वाटत नसेल, तेथें या उपायाचा उपयोग होणें संभवनीय नाहीं. तसेंच ज्यानें ही उपवासाची तपश्चर्या आरंभिली असेल, त्याच्यावर अपराधी मनुष्याचें प्रेम नसेल किंवा त्याच्याबद्दल त्यास द्वेषच वाटत असेल, तर या उपायाचा उपयोग नाहीं, हें म. गांधींचें मत अनुभवास व युक्तीस पटण्यासारखेंच आहे. म. गांधींनीं पुढें

* आत्मकथा, भाग २ रा, पृ. १२३-२४-२५.

हिंदुस्थानांत आल्यावर आपल्या अनुयायांना ताळ्यावर आणण्यासाठीं व हिंदूंना हरिजनांसंबंधींचें कर्तव्य किंवा मुसलमानांसंबंधींचें आपलें कर्तव्य बजावण्याच्या कामीं अधिक प्रेरणा देण्यासाठीं या उपायाचा अवलंब केला हें सर्वांना माहीतच आहे. या उपायाचा प्रथम शोध त्यांना या प्रसंगीं लागला.

गोखले-शिष्टाई व तिसरी मोहीम

१९१० सालीं हिंदी सत्याग्रहींना हद्दपार करण्याचें धोरण आफ्रिकन सरकारनें स्वीकारल्यापासून, हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार यांनीं आफ्रिकेंतील सरकारला हिंदी लोकांचा प्रश्न सोडविण्याचा जोराचा आग्रह करण्यास सुरवात केली. अखेरीस हें हद्दपारीचें धोरण बंद करणें त्याला भाग पडलें, आणि १९११ सालीं सत्याग्रही पुढारी म. गांधी यांजपाशीं तडजोड करून, १९१२ मध्यें नवे कायदे करून तुमचा प्रश्न सोडवूं, असें वचन त्याला द्यावें लागलें. यानंतर १९१३ पर्यंत सत्याग्रह-लढा बंद होता. मध्यंतरीं १९१२ सालीं ना. गोखले हे म. गांधींच्या विनंतीवरून दक्षिण आफ्रिकेंत गेले. त्यांनीं युनियन सरकारच्या मंत्र्यांची गांठ घेतली आणि परवाना कायदा (एशियाटिक लॉ अमेंडमेंट ॲक्ट) रद्द करण्याचें व मुदतबंदीच्या मजुरांची मुदत संपल्यावर जे तेथें राहतील त्यांच्यावर बसविण्यांत येणारा दरसाल तीन पौंडांचा कर-डोईपट्टी-रद्द करण्याचेंही वचन घेतलें. हें वचन ना. गोखले यांना मिळाल्यामुळें आतां पुनः सत्याग्रह-युद्ध करण्याचा प्रसंगच येणार नाहीं असें वाटूं लागलें होतें. ना. गोखले व म. गांधी यांनीं या वेळीं सर्व संघराज्यांत दौरा काढला आणि हजारों लोकांच्या अनेक सभा घेऊन, आम्ही परवाना कायदा रद्द करून घेऊं, आणि करारमुक्त मजुरांवरील तीन पौंडांची डोईपट्टी रद्द करवून घेऊं, अशी आश्वासनें देण्यांत आलीं. ना. गोखले यांच्या या दौऱ्यामुळें हिंदी लोकांत विलक्षण जागृति व उत्साह निर्माण झाला आणि आपले सर्व क्लेश संपून आपला लढा यशस्वी होणार अशी आशा लोकांना वाटूं लागली. पण ही गोष्ट इतक्या अनायासें घडणारी नव्हती.

१९१३ सालीं हिंदी लोकांवर आणखी एका कायद्याची कुऱ्हाड येऊन आदळली. स्टर्लं जज्मेंट या नांवानें प्रसिद्ध असलेला एक वरिष्ठ कोर्टाचा न्यायनिवाडा प्रसिद्ध झाला. त्यामुळें हिंदु-मुसलमान धर्म-पद्धतीनें जे विवाह झाले असतील त्यांना दक्षिण आफ्रिकेंतील न्यायासनें मान्यता देणार नाहींत असा अर्थ होऊं लागला. अर्थात् कायद्याच्या दृष्टीनें हिंदु-मुसलमान पद्धतीनें विवाह झालेल्या स्त्रियांचें धर्मपत्नीत्व नष्ट झालें असा याचा अर्थ झाला. यामुळें त्यांचें कायदेशीर धर्म-पत्नीत्व मान्य करवून घेणें, निदान जे विवाह एकपत्नीक असतील त्यांना तरी कायद्याची मान्यता मिळवून देणें, हा एक फार महत्त्वाचा चळवळीचा विषय बनला. तशी मान्यता मिळेपर्यंत या स्त्रियांचा कायदेशीर दर्जा केवळ रखेल्यांसारखा झाला ही अत्यंत चीड आणणारी गोष्ट होती. यामुळें स्त्रियांनाही सत्याग्रहांत भाग घेण्यास सांगावयाचें असें म. गांधींनीं ठरविलें. इकडे ज. स्मट्स वगैरे सरकारी अधिकाऱ्यांनीं दिलेलीं वचनें पाळणारे कायदे करण्याचा, किंवा करारमुक्त मजुरांवरील डोईपट्टी रद्द करण्याचाही मुळींच संभव दिसेना; तेव्हां आतां फार मोठ्या प्रमाणावर कायदेभंग, करबंदी आणि सार्वत्रिक संप करून लढ्याला अत्यंत उग्र स्वरूप देण्याचा निर्धार म. गांधींनीं केला, आणि तसें सरकारला—ज. स्मट्स यांना—पत्र लिहिलें. त्यांत, आम्ही परवाना कायद्याविरुद्ध मोहीम करूं, तीन पौंड कर न देण्याची चळवळ करूं, आणि जे मजूर मुदतबंदीचा करार करून कामावर आहेत, त्यांना जरी आज हा कर द्यावा लागत नसला, तरी मुदत संपतांच त्यांच्यावरही तो बसणार आहे म्हणून त्यांना हा कर रद्द होईपर्यंत सार्वत्रिक संप करण्याची विनंति करूं, असें म. गांधींनीं लिहिलें होतें. सरकार व खाणीवाले या बाबतींत बेगुमान होते, आणि पोलिस व शस्त्रबळ यांच्या सहाय्यानें संपवाल्यांना झोडपून टाकूं असाही त्यांना विश्वास वाटत असावा. अखेरीस सत्याग्रहास सुरवात झाली. स्त्रियांनींही सत्याग्रह करून तुरुंगाचा रस्ता धरला. पुढें सरकारनें स्त्रियांना तुरुंगांत न घालण्याचें ठरविलें तेव्हां सर्व नाताळभर खाणीखाणींतून हिंडून आणि उंसाच्या मळ्यांत व

साखरेच्या कारखान्यांत जाऊन त्यांनीं कामगारवर्गाला सार्वत्रिक संप करण्याची विनंति करण्याचा उपक्रम सुरू केला. याचा विलक्षण परिणाम होऊन, सर्व खाणी व उंसाचे मळे आणि साखरेचे कारखाने बंद पडले. सर्व संपवाले कामगार न्यू कॅसल येथें येऊन जमा झाले. आणि तेथें तीन हजार कामगार व त्यांचीं बायकामुलें यांची एक प्रचंड छावणी बनली. तेथें त्यांना भात, रोटी व थोडी साखर एवढेंच अन्न देण्यांत येत असे. ही सर्व व्यवस्था स्वतः म. गांधी, श्री. नायडू, मि. केलनबॅक, मि. पोलक, वगैरे मंडळी करीत असत. त्यांच्या पत्नी कस्तुरबाई याही अर्थात् त्यांच्याबरोबर होत्याच. अशा तऱ्हेनें छावणींतील कामगारांची संख्या वाढूं लागली. मळेवाले व सरकार यांची दडपशाही सुरू झाली. ज. स्मट्स यांनीं असें जाहीर केलें कीं, आपण तीन पौंडांची डोईपट्टी रद्द करण्याचें वचन केव्हांच दिलें नाहीं! हें पाहतांच म. गांधींनीं ना. गोखले यांना तार केली व तारेनेंच जबाब मागितला. ना. गोखले यांचें उत्तर निःसंदिग्ध शब्दांत आलें कीं, आपणापाशीं युनियन सरकारच्या मंत्र्यांनीं कर उठविण्याचें वचन दिलें आहे!

यानंतर आतां न्यू कॅसल येथें जमलेल्या कामगारांचा एक प्रचंड मोर्चा नाताळमधील टॉलस्टॉय आश्रमापर्यंत पायीं नेण्याचें ठरविलें, आणि अशा प्रकारें नाताळवर स्वारी करून, बिगर परवाना तेथें जाण्याचा आपला हक्क शाबीत करावयाचा, किंवा सर्वांना तुरुंगांत घालण्यास सरकारला भाग पाडावयाचें, असा बेत ठरविण्यांत आला. नाताळ व ट्रान्सवाल याच्या सरहद्दीवर चार्लस टाउन हें गांव आहे. तेथें सुमारें तीन हजार कामगार छावणींत जमले होते. तेथून पुढें ट्रान्सवालवर २,००० सत्याग्रही सैनिकांचा मोर्चा स्वारी करणार होता, व त्याच्याबरोबर म. गांधी सेनानी म्हणून जाणार होते. बायकामुलांना तेथेंच छावणींत ठेवावयाचें होतें. २८ सप्टेंबर १९१३ रोजीं म. गांधींनीं हा सर्व बेत सरकारला कळविला होता, व ३० ऑक्टोबर रोजीं म. गांधी चार्लस टाउनला जाऊन दाखल झाले. नंतर एक आठवड्याची नोटीस देऊन हा दोन हजार सैनिकांचा मोर्चा सुरू झाला. सरकारनें प्रथम अनेक कामगारांना

पकडून तुरुंगांत घालण्याचा प्रयोग करून पाहिला व धाकदपटशा, गोळीबार करून संप मोडण्याचेही प्रयत्न करण्यांत आले, पण त्यांचा कांहींही उपयोग झाला नाहीं.

यानंतर मात्र आतां खुद्द म. गांधींना पकडावें असा विचार करून ता. ८ नोव्हेंबर रोजीं सरकारनें फक्त म. गांधींना पकडलें व कोर्टाकडे नेलें; पण त्यांनीं लगेच तार करून सरकारला विनंति केली कीं, एकट्या पुढाऱ्याला पकडून सैनिकांना पुढें जाऊं देणें धोक्याचें आहे. त्यांनीं आपली जामिनावर सुटका करून घेतली व ते पुनः जाऊन मोर्चांत दाखल झाले. पुनः ता. ९ ला त्यांना अटक केली. इतक्यांत मि. पोलक हे तेथें आले. म. गांधींनीं मि. पोलक यांच्याकडे नेतृत्व दिलें आणि आपण पोलिस ऑफिसरांबरोबर निघून गेले. मोर्चा पुढें चालूं लागला, पण दुसऱ्या दिवशीं बाल्फोर या ठिकाणीं या सर्व सैनिकांना पकडून तुरुंगांत नेण्याची व्यवस्था सरकारनें करून ठेविली होती. स्टेशनवर तीन मोकळ्या आगगाड्या आणून उभ्या केलेल्या दिसत होत्या. पोलिस बंदोबस्त कडेकोट होता. पोलिस अधिकाऱ्यांनीं मि. पोलक यांना सांगितलें कीं, आम्ही या सर्व लोकांना अटक करून नेणार आहों तेव्हां तुम्ही आम्हांस या कामीं मदत करा. मि. पोलक यांनीं सांगितलें कीं, मी त्यांना सांगतों, पण माझें ते सर्व शांतपणें ऐकतीलच असें मला सांगतां येत नाहीं. म. गांधींनीं शांतता राखण्याचा संदेश दिलाच होता. अखेरीस सत्याग्रहींना अटक होण्यास सांगण्यांत आलें. कांहीं लोक प्रथम गोंधळ करूं लागले व आम्ही टॉल-स्टॉय आश्रमाकडे जाणार, तुम्हांस वाटेल तें करा, असें ओरडूं लागले. पण मि. पोलक यांनीं अखेरीस त्यांची समजूत काढली कीं, "अमुक ठिकाणीं जाणें हें आपलें साध्य नसून, कायदेभंग करून तुरुंगांत जाणें हें आपलें आजचें साध्य आहे. आपणांस आतां तुरुंगांत नेण्यांत येत आहे, तेव्हां आतां पुढें जाण्याचा आग्रह धरण्याचें कारण नाहीं. शिवाय तुम्हांस अटक केल्यानंतर सत्याग्रही या नात्यानें तुम्ही पोलिस नेतील तिकडे शांतपणें गेलें पाहिजे." हा युक्तिवाद सर्वांना पटला आणि तें दोन हजार सत्याग्रही सैनिकांचें सैन्य संपूर्ण शांततेनें ता. १० नोव्हेंबर

१९१३ रोजीं पोलिसांच्या स्वाधीन झालें व त्यांना तुरुंगांत नेऊन ठेवण्यांत आलें. म. गांधींवर आतां दोन आरोप ठेवून अनुक्रमें ९ महिने व ३ महिने सजा देण्यांत आली. पण महिना-दीड महिन्यांतच सरकार नमलें आणि १८ डिसेंबर १९१३ रोजीं त्यांची बिनशर्त मुक्तता करण्यांत आली. ताबडतोब ज. स्मट्सनें त्यांना बोलावून घेतलें आणि २१ जानेवारी १९१४ रोजीं उभयपक्षांत कायमची तडजोड होऊन म. गांधींनीं सत्याग्रह बंद केल्याचें जाहीर केलें.

अशा रीतीनें ११ सप्टेंबर १९०६ रोजीं जें सत्याग्रहयुद्ध करण्याची प्रतिज्ञा घेतली, तें सत्याग्रहयुद्ध २१ जानेवारी १९१४ रोजीं पुरें झालें, आणि त्यांत सत्याग्रही पक्षाचा पूर्ण विजय झाला. यानंतर जी तडजोड झाली तिला **गांधी-स्मट्स करार** असें म्हणतात. १९०७ चा २ रा कायदा—ज्याला एशियाटिक लॉ अमेंडमेंट ॲक्ट असें म्हणतात तो परवाना कायदा—रद्द झाला. हिंदी लोकांची दक्षिण आफ्रिकेंत अधिक आयात होऊं नये अशी अट मान्य केल्यामुळें, वर्णभेदाच्या मुद्यावर हिंदी लोकांवर बंधनें लादूं नयेत व हळूहळू तेथें रहिवासी झालेल्या लोकांना समतेचे नागरिक हक्क मिळविण्यास अवसर करून द्यावा हें तत्त्व मान्य करण्यांत आलें, आणि ३ पौंडांची डोईपट्टीही रद्द झाली. अशा प्रकारें ज्या विशिष्ट गाऱ्हाण्यांविरुद्ध लढा पुकारण्यांत आला होता तीं गाऱ्हाणीं दूर झालीं. नागरिकहक्कांत वर्णभेद मानूं नये हें तत्त्व अप्रत्यक्षपणें मान्य झालें. विवाहासंबंधीं कायद्यांत दुरुस्ती होऊन हिंदु-मुसलमान पद्धतीनें झालेल्या व होणाऱ्या एकपत्नीक धर्मविवाहांना कायदेशीर मान्यता मिळाली व डोईपट्टी रद्द होऊन करारमुक्त मजुरांवरील कराचा भार कमी झाला. यामुळें त्यांना तेथें कायमचें रहिवासी होणें सुलभ बनलें. अशा रीतीनें सुमारें सात वर्षें लढून म. गांधींनीं सत्याग्रहाचें नवें शस्त्र प्रभावी असल्याचें सिद्ध केलें, आणि या आध्यात्मिक लढ्याचा मार्ग शोधून काढणारे व त्याचा अवलंब करून आत्मोद्धार व जगदुद्धार करूं पाहणारे हिंदी लोक हे गोऱ्या युरोपियन लोकापेक्षां कमी सुधारलेले नसून अधिक सुसंस्कृत आहेत, व त्यांनाच मानवसंस्कृतीचें खरें रहस्य समजलें आहे, हें त्यांनीं दाखवून दिलें.

१९१४ सालीं गोऱ्या युरोपियन लोकांना, हिंदी लोकांवर दडपशाही करून नामशेष करण्याच्या कामांत पराभूत करून, म. गांधींनीं आपल्या अंगच्या आत्मबलाचा प्रभाव पटवून दिला, आणि तुम्ही 'कूली' म्हणून ज्या हिंदी राष्ट्राचा अपमान करतां, त्याच्यापाशींच संस्कृतीचे धडे शिकून घेण्याचा प्रसंग तुम्हांला येणार आहे हें दाखवून दिलें. पण हें त्या वेळीं फार थोड्या युरोपियनांच्या लक्षांत आलें. आज या गोष्टीस पस्तीस वर्षें झालीं. त्या वेळीं अगदीं थोड्या लोकांना पटलेल्या म. गांधींच्या सत्याग्रहाची महती आज जगांतील बहुतेक विचारवंतांस पटली आहे. तसेंच आधुनिक युरोपीय संस्कृतीचें आसुरी स्वरूपही गेल्या पस्तीस वर्षांत जीं दोन महायुद्धें झालीं त्यानंतर सर्वांस पटूं लागलें आहे. पण १९१४ सालीं दक्षिण आफ्रिकेंत उदयास आलेल्या या भारतीय नेत्याचें व त्याच्या सत्याग्रही निष्ठेचें महत्त्व खुद्द हिंदुस्थानलाही फारसें कळत नव्हतें!

सॉलोमन कमिशन व लढ्याची समाप्ति

म. गांधींची बिनशर्त मुक्तता १८ डिसेंबर रोजीं झाली व १९१४ च्या २१ जानेवारीस म. गांधींनीं सत्याग्रह बंद केल्याचें जाहीर केलें. तरीही लढ्याची औपचारिक पूर्तता व्हावयाची होती; तिला आणखी पांचसहा महिने लागणार होते. १९१३ च्या नोव्हेंबरमध्यें दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहमोहिमेला जें उग्र स्वरूप प्राप्त झालें, त्यामुळें हिंदुस्थान, हिंदी सरकार आणि साम्राज्य सरकार हीं हादरून गेलीं आणि दक्षिण आफ्रिकेंत सार्वत्रिक संप, कायदेभंग व करबंदी यांची एवढी प्रचंड लाट उसळली कीं, तेथें एक क्रांतिसदृश वातावरण निर्माण झालें. ना. गोखले, लॉर्ड हार्डिंज (हिंदुस्थानचे त्या वेळचे व्हॉइसरॉय) यांनीं सत्याग्रहाच्या चळवळीला उघड पाठिंबा दिला आणि एका बादशाही कमिशनची मागणी केली. अखेरीस सॉलोमन कमिशन या नांवाचें एक चौकशी-कमिशन नेमण्यांत आलें व त्याच्यापुढें आपल्या तक्रारी मांडतां याव्यात म्हणूनच म. गांधी व इतर सत्याग्रहींना सोडण्यांत आलें होतें. पण या कमिशनमध्यें जे गोरे लोक नेमण्यांत आले होते, त्यांचीं

जाहीर मतें हिंदी लोकांविरुद्ध असल्यामुळें म. गांधींनीं व सत्याग्रह-समितीनें त्यांच्यापुढें आपण जाणार नाहीं असें ठरविलें! लॉर्ड हार्डिंज, ब्रिटिश मुत्सद्दी व ना. गोखले यांना म. गांधींचें हें धोरण पसंत पडलें नाहीं, व स्वतः ना. गोखले यांनीं म. गांधींना कमिशनपुढें आपलें म्हणणें मांडा असा आग्रहाचा निरोप पाठविला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. म. गांधींनीं आपला निर्धार बदलला नाहीं. म. गांधींच्या सत्याग्रही स्वभावाची या वेळीं कसोटीच झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्यावर जितकें दडपण येणें शक्य होतें तितकें या वेळीं आलें होतें. पण म. गांधी हे कोणत्याही बाह्य दडपणाला वश होणारे नेते नव्हते. त्यांचा आधार सत्यावर होता व त्यांच्या अंतःकरणातील सत्याला जी गोष्ट पटली नाहीं ती ते कोणत्याही भीतीला, मोहाला किंवा ममत्वाला वश होऊन मान्य करणारे नव्हते. या वेळीं हिंदुस्थानांतून रे. अँड्रूज व पिअर्सन हेही मध्यस्थी करण्यासाठीं गेले होते, पण त्याचा कांहींही परिणाम झाला नाहीं. स्वतः म. गांधी व सत्याग्रह-समिति यांनीं कमिशनपुढें आपलें म्हणणें मांडलें नाहीं. तरीही कमिशननें जो रिपोर्ट केला त्यांत सत्याग्रह-समितीच्या सर्व मागण्यांना उचलून धरण्यांत आलें, आणि द. आफ्रिकन सरकारनें पुढें इंडियन रिलीफ ॲक्ट नांवाचा कायदा करून, त्या सर्व मागण्यांना कायदेशीर मान्यता दिली. ज्या बाबी या कायद्यांत मुग्ध राहिल्या होत्या किंवा ज्या बाबी अमल-बजावणीसंबंधींच्या होत्या, त्याही म. गांधी व जनरल स्मट्स यांनीं परस्परांना पत्रें लिहून एक प्रकारच्या करारूपानें घडवून आणिल्या. या सर्व गोष्टी घडण्यास सुमारें सहा महिने लागले. यानंतर १९१४ च्या जुलै महिन्यांत म. गांधी व कस्तुरबाई हीं दोघें आपलें दक्षिण आफ्रिकेंतील कार्य यशस्वी रीतीनें संपवून आपल्या देशास येण्यास निघालीं. पण मायदेशास येण्यापूर्वी ते इंग्लंडात ना. गोखले आजारी होते तिकडे त्यांना भेटण्यासाठीं गेले. द. आफ्रिका सोडतांना त्यांच्या अंतःकरणांत, व त्यांना निरोप देतांना तेथील युरोपियन व हिंदी लोकांच्या मनांत, ज्या भावना उचंबळून आल्या त्यांचें वर्णन कोण करूं शकेल?

दक्षिण आफ्रिकेचा अखेरचा निरोप

दक्षिण आफ्रिकेंत पूर्ण वीस वर्षें घालवून आतां म. गांधी आपल्या मातृभूमीकडे चालले होते. ते १८९३ सालीं एका खटल्याच्या निमित्तानें एक अननुभवी नवशिक्षित तरुण बॅरिस्टर या नात्यानें तिकडे गेले होते. त्या वेळीं त्यांचें वय अवघें चोवीस वर्षांचें होतें. फार तर वर्षभर राहून हजार-दीड हजार रुपये गांठीस बांधून परत यावें आणि आपल्या कुटुंबाचें पोषण करूं लागावें एवढीच त्यांची त्या वेळीं कल्पना होती. पण तिकडे गेल्यानंतर ते कर्तव्याच्या बंधनांत पडले. हें कर्तव्याचें बंधन त्यांना मोक्षाचा मार्ग दाखवीत होतें. किंबहुना कर्तव्य हाच त्यांना मोक्ष वाटूं लागला ; आणि देह, देहाच्या गरजा, इंद्रियांच्या वासना, मनांतील विकार, कुटुंबियांची ममता, बुद्धीचा व विद्वत्तेचा अहंकार, हीं त्याना बंधनें वाटूं लागलीं. या सर्व बंधनांतून हळूहळू ते मुक्त झाले. त्यांचें अंतःकरण प्रसन्न होऊं लागलें. कर्तव्याकर्तव्य याचें ज्ञान अधिकाधिक सूक्ष्म होऊं लागलें. हिंदी समाजाशीं ते एकरूप झाले आणि त्याचा उद्धार हाच आपला उद्धार, तो समाज म्हणजेच मी असा अनुभव त्यांना येऊं लागला. त्या समाजाचीं सुखदुःखें तींच आपलीं सुखदुःखें त्यांना भासलीं. त्याचीं दुःखें, त्याचा अपमान, त्याचा स्वाभिमान, त्याचा उद्धार हे सर्व आपलेच आहेत येवढ्यावरच त्यांचा आत्मविकास थांबला नाहीं. हिंदी लोकांवर जुलूम करणाऱ्या गोऱ्या समाजाचाही त्यांनीं द्वेष केला नाहीं आणि त्याच्या जुलमी सरकारच्या अधिकाऱ्यांचाही त्यांनीं द्वेष केला नाहीं. आपल्या समाजाचा उद्धार करण्यासाठीं त्यांनीं जो लढ्याचा मार्ग अवलंबिला तो दोघांच्याही उद्धाराचा मार्ग होता. दक्षिण आफ्रिकेंतील गोरे, काळे, सांवळे व पिवळे, सर्व वर्णांचे लोक परस्परांशीं प्रेमानें, सहकार्यानें समबुद्धीनें आणि सेवावृत्तीनें वागत आहेत, असें भावी जग त्यांच्या डोळ्यांपुढें दिसूं लागलें. ज्या हिंदी समाजाला मागासलेला, रानटी, गलिच्छ, संस्कृतिहीन असें गोरे लोक मानीत होते, त्या हिंदी समाजांत यांनीं दिव्य तेज निर्माण केलें आणि त्या दिव्य तेजाच्या प्रभावानें

गोऱ्या समाजाला व सरकारला पराभूत केलें, कुंठित केलें, लाजविलें आणि अखेरीस नमविलें. इतकेंही करून त्या गोऱ्या लोकांचें त्यांनीं प्रेम संपादन केलें. त्यांच्यांतील साधुवृत्तीचे विद्वान् लोक म. गांधींचे भक्त बनले, त्यांचे गुण गाऊं लागले, त्यांचीं चरित्रें लिहूं लागले आणि त्यांच्या बरोबरीनें स्वार्थाचा संन्यास घेऊन सत्याग्रह-युद्धांत त्यांना सहाय्य करूं लागले. असें एक प्रेमाचें वातावरण त्यांनीं आपल्याभोंवतीं निर्माण केलें. या वातावरणांत काळा-गोरा, सधन-निर्धन, उच्च-नीच, हिंदु-मुसलमान-ख्रिस्ती-पार्शी, स्त्री-पुरुष हे कृत्रिम भेद नष्ट होत, आणि आपण सर्व एकाच चिच्छक्तीचे आविष्कार आहों आणि तिच्याशीं तादात्म्य पावण्याचा अनुभव घेण्यासाठीं झटत आहों असा अनुभव सर्वांना येऊं लागला. एवढी क्रांति त्यांनीं ज्या देशांत राहून, वीस वर्षें प्रयत्न करून, घडवून आणिली, तो देश म्हणजे आपली पवित्र पुण्यभूमि किंवा तपोभूमि आहे, असें त्यांना वाटत असल्यास नवल नाहीं.

ते तेथें गेले तेव्हां चोवीस वर्षांचे होते; आतां ते पंचेचाळीस वर्षांचे झाले होते. त्या वेळीं ते कोणास माहीत नव्हते; आतां ते हिंदी, ब्रिटिश व दक्षिण आफ्रिकन पुढाऱ्यांचे दृढपरिचित झाले असून, ते सर्व त्यांच्या अंगच्या असामान्य शीलापुढें मान लववूं लागले होते. अशा पुण्यभूमीचा अखेरचा निरोप घेतांना त्यांचें अंतःकरण सद्गदित झालें व त्यांना निरोप देतांना तेथील सर्व वर्णांच्या व सर्व दर्जांच्या लोकांचीं मनें त्यांच्या भावी वियोगानें व्यथित झालीं. पण त्यांची मातृभूमि त्यांना आकर्षीत होती. त्यांचे राजगुरु ना. गोखले त्यांना आपल्या कार्याचा भार उचलण्यास तुम्ही या, असें निमंत्रण देत होते. आपण वीस वर्षांच्या तपश्चर्येनें प्राप्त करून घेतलेलें सत्याग्रहाचें अस्त्र सोडून आपल्या मातृभूमीची मुक्तता करण्यास त्यांचें अंतःकरण उत्कंठित झालें होतें. ही मातृभूमि परतंत्र आहे तोंपर्यंत जगांतील कोणत्याही देशांत हिंदी लोकांची गुलामगिरी नष्ट होणें शक्य नाहीं हें त्यांना दिसूं लागलें होतें, आणि आपणास अवगत झालेल्या सत्याग्रही मंत्रावांचून आपल्या मातृभूमीची मुक्तता होणार नाहीं असाही त्यांच्या

बुद्धीचा निर्णय झालेला होता. ही कर्तव्याची ओढ त्यांना मायभूमीकडे ओढीत होती.

जोहान्सबर्ग येथें त्यांना निरोप देण्याचा समारंभ तेथील निरनिराळ्या समाजांच्या वतीनें करण्यांत आला. त्यांना मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं आणि त्यांचा शक्य त्या परीनें गौरव करण्यांत आला. या सर्व सन्मानास व गौरवास उत्तर देण्यास ते उठले व त्यांनीं पुढील-प्रमाणें भाषण केलें :—

"जोहान्सबर्ग हें गांव कांहीं मला आजच परिचित झालेलें नाहीं. मला येथें अनेक मित्रांचे चेहेरे दिसत आहेत. माझ्याबरोबर त्यांनीं अनेक लढ्यांत भाग घेतला आहे असे अनेक स्नेही येथें बसले आहेत. येथें मीं अनेक दुःखें व निराशा यांचा अनुभव घेतलेला आहे. जोहान्सबर्ग ही एक खाणीवाल्यांची छावणी असली तरी माझें या गांवावर प्रेम आहे. १९०६ च्या सप्टेंबर महिन्यांत सत्याग्रह-लढ्याची मुहूर्तमेढ या जोहान्सबर्गमध्येंच रोंवण्यांत आली. माझे एक मित्र, मार्गदर्शक आणि चरित्रलेखक मि. डोक यांचा—माझा परिचय याच जोहान्सबर्गमध्यें झाला. माझी कर्तव्यदक्षता ज्याला आकलन होऊं शकली नाहीं, व म्हणून मी काय करीत आहें याची ज्याला कल्पना करतां आली नाहीं, अशा माझ्या एका देशबांधवानें जेव्हां माझ्यावर प्राणघातक हल्ला केला, तेव्हां माझी शुश्रूषा करून फिरून जीवदान देणारी एक प्रेमळ भगिनी मिसेस् डोक यांचा स्नेह मला याच ठिकाणीं लाभला. मि. केलनबॅक, मि. पोलक, मिस् श्लेशिन आणि इतर सहकारी मित्र व हिंदी लोकांना नित्य प्रोत्साहन देऊन साहाय्य करणारे इतर अनेक स्नेही याच गांवीं लाभले. म्हणून जोहान्सबर्गशीं माझ्या अंतःकरणांतील अत्यंत पवित्र अशा भावना गुंतलेल्या आहेत व या पवित्र भावना मी व सौ. गांधी आज आमच्या अंतःकरणांतून हिंदुस्थानास नेत आहों. मी, सौ. गांधी आणि आमचीं मुलें या सर्वांची हिंदभूमीच्या खालोखाल जर कोणची पुण्यभूमि असेल तर ती दक्षिण आफ्रिकाच होय.

"ज्या वेळीं हिंदी लोक अत्यंत निराशामय अंधारांतून जात होते, तेव्हां मि. हॉस्किन यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांना सहाय्य करणारी युरोपियनांची समिति याच जोहान्सबर्ग शहरांत स्थापन झाली, व तेच मि. हॉस्किन अद्यापि त्या समितीचे अध्यक्ष आहेत. वली अम्मा नांवाची एक तरुण मुलगी याच जोहान्सबर्ग शहरांत राहत होती व तिनें सत्यासाठीं आपले प्राण अर्पण केले. मी आतां बोलत असतांना तिचा चेहरा माझ्या डोळ्यांपुढें दिसत आहे. ती एक साधीभोळी, निष्ठावान् मुलगी होती. मला जें ज्ञान आहे तें ज्ञान तिला नव्हतें. निःशस्त्र प्रतिकार म्हणजे काय, त्याच्यापासून आपल्या समाजाचें कोणतें हित होणार आहे, हें तिला कांहीं कळत नव्हतें; पण आपल्या लोकांसंबंधींच्या उत्साहाच्या वादळांत जणुं काय ती गुरफटली गेली, ती त्या उत्साहानें भारून गेली, ती तुरुंगांत गेली. ती बाहेर आली तेव्हां तिचें शरीर क्षीण झालें होतें. आणि थोड्याच दिवसांत ती प्राणास मुकली. नागाप्पन आणि नारायणस्वामी या नांवांचे दोन सुंदर तरुण मुलगे, ज्यांनीं नुकताच विशींत प्रवेश केला आहे असे तरणे बांड जवान, यां जोहान्सबर्गमध्यें राहत होते व त्यांनींही या सत्याग्रह-युद्धांत आपल्या प्राणांच्या आहुति दिल्या. पण सौ. गांधी व मी हे दोघे मात्र अद्यापि जिवंत असून आज आपल्यापुढें उभें आहों. आम्ही दोघे कीर्तीच्या प्रकाशांत मिरवीत आहों, पण या इतर लोकांनीं पडद्याआड राहून कामें केलीं आहेत. आपण कोठें चाललों आहों याचें त्यांना ज्ञानही नव्हतें; फक्त आपण जें करीत आहों तेंच आपलें कर्तव्य आहे व तें योग्य आहे एवढेंच त्यांना दिसत होतें. जर कोणाची स्तुति करणें योग्य असेल, तर ती कर्तव्यासाठीं प्राणार्पण केलेल्या या तीन व्यक्तींची करणें योग्य होईल. हरबतसिंग याचेंही नांव तुम्हीं ऐकिलें आहे. हा एक ७५ वर्षें वयाचा म्हातारा होता. त्याच्या सहवासांत तुरुंगवास भोगण्याचें भाग्य मला लाभलें आहे. तो एक मुदतबंदीच्या करारांतून मुक्त झालेला हिंदी मजूर होता. जेव्हां मीं त्याला म्हटलें, 'तुम्ही येथें कशाला आलां? तुम्हांला येथेंच मरण येईल.' तेव्हां त्या शूर पुरुषानें उत्तर दिलें, 'मग त्यात बिघडलें काय? तुमचा लढा कशासाठीं चालू आहे

तें मला माहीत आहे. तीन पौंडांची डोईपट्टी कांहीं तुम्हांला द्यावी लागत नाहीं, तर ती माझे जे करारमुक्त मजूर बांधव आहेत त्यांनाच द्यावी लागते. अशा मरणापेक्षां अधिक चांगलें मरण कसें येणार?' दरबानच्या तुरुंगांतच त्यानें मृत्यूला कवटाळलें! म्हणून निःशस्त्र प्रतिकारामुळें दक्षिण आफ्रिकेची मनोदेवता जागृत झाली व तिनें तेज फाकलें यांत मुळींच आश्चर्य नाहीं!"

अशा प्रकारें भाषणास सुरवात करून त्यांनीं आपल्या भावना व्यक्त केल्या व अखेरीस ते म्हणाले :—

"आतां मला आपलें भाषण संपवून आपला निरोप घेणें अवश्य आहे. ही भावना कोणत्या शब्दांनीं प्रकट करावी तें मला समजत नाहीं. माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम भाग दक्षिण आफ्रिकेंत गेला आहे. श्री. गोखले यांनीं मला अशी जाणीव करून दिली आहे कीं, हिंदुस्थान हा मला आतां अपरिचित देश बनला आहे. दक्षिण आफ्रिकेशीं माझा परिचय आहे, पण हिंदुस्थानची ओळख मला नाहीं. मला हिंदुस्थानची ओढ कां लागली आहे तें सांगतां येत नाहीं, पण तुमच्या वियोगाचा आघात व येथील युरोपियन मित्रांच्या वियोगाचा आघात मला तीव्रपणें जाणवत आहे. तुम्हीं मला आशेंत व निराशेंतही सहाय्य केलें आहे. या आघाताची तीव्रता सहन करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं फारच अल्प आहे, पण तुमचा निरोप घेऊन मला जाणें प्राप्त आहे हेंही मला दिसत आहे. मी तुमचा निरोप घेतों व तुम्ही मला आशीर्वाद द्या. तुमच्या स्तुतीच्या वर्षावानें आमचीं डोकीं भडकूं नयेत अशी तुम्ही प्रार्थना करा. आम्हांला आमच्या कर्तव्याची जाणीव सदैव रहावी व तें पार पाडण्याची शक्ति आम्हांस लाभावी एवढीच तुमची सदिच्छा असूं द्या. आदि, मध्यें आणि अंतीं आपण नेहमीं मनोदेवतेला साक्षी ठेवून वागत गेलों, तर जें जें आपणांस मिळणें योग्य असेल त्याचा लाभ झाल्याविना केव्हांही राहणार नाहीं."

: : ५ : :

पहिलें महायुद्ध आणि सत्याग्रही राजकारण

अहिंसा व युद्ध-सहकार्य

इसवी सन १९१४ च्या जुलई महिन्यांत महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेचा निरोप घेऊन हिंदुस्थानास यावयास निघाले त्या वेळीं नामदार गोखले इंग्लंडांत आजारी असल्यामुळें प्रथम तेथें जाऊन त्यांची गांठ घ्यावी आणि त्यानंतर हिंदुस्थानास यावें अशा विचारानें महात्मा गांधी कस्तुरबाईंच्यासह प्रथम इंग्लंडांत गेले. ते तेथें पोंचतात तोंपर्यंत पहिल्या महायुद्धास सुरवात झाली होती. ता. ३ ऑगस्ट रोजीं जर्मनीनें फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारलें आणि इंग्लंडही लगेच युद्धांत गोंवलें गेलें. गांधीजी इंग्लंडांत पोहोंचले त्या वेळीं ना. गोखले पॅरिसमध्यें अडकून पडले होते. युद्ध सुरू झाल्यामुळें त्यांना इंग्लंडास येण्यास थोडा विलंब लागला. गांधीजींनीं फिनिक्स आश्रमांतील जी मंडळी त्यांच्याबरोबर हिंदुस्थानास येणार होती त्यांना आधींच हिंदुस्थानांत पाठविलें होतें आणि दीनबंधु अँड्रयूज यांच्या सल्ल्याप्रमाणें स्वामी श्रद्धानंद यांचें गुरुकुल अथवा रवींद्रनाथ टागोर यांचें शांतिनिकेतन येथें त्यानीं राहावें असें ठरलें होतें. गांधीजींचे एक सत्याग्रही सहकारी मि. केलनबॅक हे त्यांच्याबरोबर ना. गोखले यांच्या भेटीसाठीं म्हणून इंग्लंडासच गेले होते. त्यांचा बेत गांधीजींच्याबरोबर हिंदुस्थानांत यावें असाच होता. परंतु अँग्लो-जर्मन युद्ध सुरू झाल्याबरोबर ते जर्मन असल्यामुळें त्यांना

हिंदुस्थानांत येण्याची परवानगी स्वतः गांधींनीं प्रयत्न करूनही मिळूं शकली नाहीं.

ना. गोखले इंग्लंडांत आल्यानंतर त्यांच्याशीं गांधीजींची चर्चा झाली. त्यांत साहजिकपणें महायुद्धासंबंधीं आपलें व हिंदुस्थानचें कर्तव्य काय, हा विषय तपशीलवार चर्चिला गेला. गांधीजी आणि ना. गोखले यांच्या दृष्टिकोनांत एक तात्त्विक मतभेद होता आणि तो म्हणजे गांधीजी हे सत्याग्रही दीक्षा घेतलेले अहिंसावादी होते आणि त्या दृष्टीनें महायुद्धांत आपलें कर्तव्य काय, याचा विचार ते करीत असत. गोखले हे प्रागतिक पक्षाचे पुढारी व राजकीय मुत्सद्दी होते. या दृष्टीनें त्यांनीं महायुद्धांत ब्रिटिशांना राजनिष्ठापूर्वक साहाय्य करण्याचें ठरविलें. यांत अनपेक्षित किंवा विसंगत असें कांहीं नव्हतें. गांधीजींच्यापुढें अहिंसेची दृष्टि होती आणि हिंदुस्थानचा प्रश्न सत्याग्रहानें सोडवून दाखवावा व दाखवितां येईल, अशी त्याची निष्ठा होती. सत्याग्रह-दृष्टीनें महायुद्धाशीं सहकार्य करणें म्हणजे सरकारच्या हिंसाकर्माशीं सहकार्य करणेंच होतें; असें असूनही त्यांनीं या महायुद्धांत ब्रिटिश साम्राज्याला सहकार्य द्यावयाचें असा निर्णय घेतला. हें त्यांचें कृत्य-अथवा धोरण-त्यांच्या अहिंसाव्रताशीं विसंगत आहे, असा आक्षेप त्यांच्या सत्याग्रही सहकाऱ्यांनीं व इतर मित्रांनीं घेतला. या आक्षेपांचें निरसन, गांधीजींनीं आपल्या आत्मकथेंत पुढीलप्रमाणें केलेलें आहे :—

"खरें पाहतां ज्या विचारसरणीला अनुसरून मी बोअर युद्धामध्यें पडलों होतों त्याच विचारसरणीचा उपयोग या वेळींही केला होता. युद्धामध्यें भाग घेणें याचा अहिंसा तत्त्वाशीं मेळ बसत नाहीं हें मला पूर्णपणें कळत होतें. पण कर्तव्याचें ज्ञान, नेहमींच दिव्याच्या प्रकाशाप्रमाणें स्पष्ट नसतें. सत्याच्या पुजाऱ्याला अनेक वेळां आडवळणांनींही जावें लागतें.

"अहिंसा ही फार व्यापक वस्तु आहे. सभोंवार पेटलेल्या हिंसेच्या वणव्याच्या मध्यभागीं सांपडलेले दुबळे प्राणी असे आपण आहोंत. 'जीवो जीवस्य जीवनम्' हें वचन खोटें नाहीं. मनुष्य एक क्षणभरही

बाह्य हिंसेशिवाय जगूं शकत नाहीं. बसतां-उठतां, सर्व क्रिया करतांना, इच्छा असो वा नसो, थोडी तरी हिंसा तो करीतच असतो. त्या हिंसेमधून सुटण्याचा जो महाप्रयास करीत असेल, त्याची भावना केवळ दयेचीच असेल. तो सूक्ष्मांत सूक्ष्म जंतूचाही नाश इच्छीत नसेल, आणि यथाशक्ति त्याला बचाविण्याचाच प्रयत्न करीत असेल, तर तो अहिंसेचा पुजारी होय. त्याच्या हरएक कार्यांमध्यें नेहमीं वाढता संयम राहील; त्याची करुणावृत्ति निरंतर वाढत जाईल; पण कांहीं झालें तरी कोणीही देहधारी बाह्य हिंसेपासून सर्वथैव मुक्त होऊं शकत नाहीं.

"आणखी असें कीं, अहिंसेचा पायाच अद्वैत भावना आहे आणि जर प्राणिमात्रच अभिन्न आहेत तर एकाच्या पापाचा परिणाम दुसऱ्यावर होणारच; त्यामुळेंही मनुष्य हिंसेपासून सर्वथैव मुक्त राहूं शकत नाहीं. समाजांत वावरणारा मनुष्य इच्छा नसतांनाही समाजाच्या हिंसेंत भागीदार बनतोच. दोन प्रजांमध्यें जेव्हां युद्ध होतें तेव्हां अहिंसा मान्य करणाऱ्या व्यक्तींचें कर्तव्य तें युद्ध थांबविण्याचें आहे. तें कर्तव्य जो करूं शकत नसेल, ज्याच्यामध्यें विरोध करण्याची शक्ति नसेल, ज्याला विरोध करण्याचा अधिकार प्राप्त झालेला नसेल, त्यानें लढाईच्या कामांत भाग घ्यावा आणि भाग घेत असतांही त्या कर्मांतून स्वतःला, स्वतःच्या देशाला, त्याचप्रमाणें जगाला सोडविण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करावा.

"इंग्रजी राज्यामार्फत माझी म्हणजे माझ्या देशबांधवांची स्थिति सुधारण्याची माझी इच्छा होती. मी इंग्लंडांत राहत असतां इंग्लंडचें आरमारच माझें रक्षण करीत होतें. त्याच्या बळाचा अशा तऱ्हेनें फायदा घेत असल्यामुळें त्याच्यामध्यें असलेल्या हिंसकतेचा मीं सरळच भागीदार होत होतों. अर्थात् जर मला त्या सत्तेशीं संबंध ठेवावयाचा असेल–त्या सत्तेच्या निशाणाखालीं राहायचें असेल–तर एक तर, मीं युद्धाला उघड उघड विरोध करून जोंपर्यंत त्या सत्तेची युद्धनीति बदलणार नाहीं तोंपर्यंत सत्याग्रहाच्या शास्त्राप्रमाणें तिच्यावर बहिष्कार घातला पाहिजे किंवा त्या सत्तेचे जे कायदे मोडण्यासारखे असतील त्यांचा सविनय भंग करून तुरुंगाचा रस्ता पकडला

पाहिजे. नाहींपेक्षां मीं तिच्या युद्धकार्यांमध्यें भाग घेत राहूनच, त्या कार्याचा विरोध करण्याची शक्ति व अधिकारही मिळवला पाहिजे. तेवढी शक्ति माझ्यामध्यें नव्हती. अर्थात् मला युद्धांत भाग घेण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं असें मीं ठरविलें.

"अहिंसेच्या दृष्टीनें हातांत बंदूक धारण करणारा व त्याला मदत करणारा यांच्यामध्यें भेद मला तरी दिसत नाहीं. जो मनुष्य लुटारूंच्या टोळीमध्यें त्यांची पडेल ती चाकरी करण्यासाठीं, त्यांची ओझीं उचलण्यासाठीं, ते लूट करीत असतील, तेव्हां पहारा करण्यासाठीं, ते घायाळ झाल्यास त्यांची शुश्रूषा करण्यासाठीं राहतो, तो लुटीबद्दल त्या लुटारूंइतकाच जबाबदार आहे. या दृष्टीनें विचार करतां लष्करांत जखमी लोकांची शुश्रूषा करण्यास जाणारा मनुष्य युद्धाच्या जबाबदारीतून मोकळा राहूं शकत नाहीं."[१]

हा युक्तिवाद समजून घेतांना आपण त्यांतील अधिकारभेदाच्या मुद्याकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे असें मला वाटतें. जेव्हां दोन राज्यांमध्यें युद्ध सुरू होतें, तेव्हां त्यांपैकीं कोणत्याही राज्यांत जे अहिंसावादी राहत असतील त्यांचें त्या युद्धासंबंधीं कर्तव्य काय? केवळ आपण त्या युद्धांत शस्त्र घेऊन लढूं नये, एवढें म्हणूनच त्या व्यक्तीचें कर्तव्य संपत नाहीं. त्यानें आपलें अहिंसाबल खर्ची घालून तें युद्ध थांबविण्यासाठीं अखेरपर्यंत झगडलें पाहिजे आणि तसें करणें जर त्याला शक्य वाटत नसेल, तर तो आपला अधिकार नाहीं, असें म्हणून त्यानें युद्धाशीं असहकार हें धोरण सोडून दिलें पाहिजे. आपण केवळ लाक्षणिक सत्याग्रह करून युद्ध संपेपर्यंत तुरुंगांत जाऊन स्वस्थ बसावें हेंही धोरण गांधीजींच्या युयुत्सु कर्मप्रधान प्रकृतीला पटणारें नव्हतें. गांधीजी केवळ वैयक्तिक क्रिया करून आपल्यापुरतें कर्तव्य मीं केलें असें म्हणून समाधान मानणारे नव्हते. आपलें कर्तव्य असें म्हणतांच तें आपल्या राष्ट्राचें कर्तव्य इतकी तरी त्या शब्दाची व्याप्ति त्यांच्या अंतःकरणांत सहज स्फूर्त होत

१. आत्मकथा, खंड २ रा, पृ. १३२–३४.

असे. हिंदी राष्ट्राला सत्याग्रही दीक्षा देण्याची आकांक्षा त्यांच्या अंतःकरणांत त्या वेळीं स्पष्टपणें उदित झालेली होती. हें स्वराज्य आपण सत्याग्रहाच्या शक्तीनें ब्रिटिश साम्राज्यांत राहून मिळवूं असा त्यांना विश्वास होता. ब्रिटिश साम्राज्य ही संस्था सैतानी आहे व ती मोडून टाकावी अशी त्यांची त्या वेळीं वृत्ति नव्हती. ही साम्राज्यसंस्था सत्याग्रहानें सुधारूं शकेल ही त्यांची श्रद्धा दक्षिण आफ्रिकेंतील यशानें अधिकच वाढली होती. अशा वेळीं त्या साम्राज्यावर युद्धाची आपत्ति आली असतां त्याच्याशीं असहकार करणें हें आपलें कर्तव्य नसून त्याला या आपत्तींतून बचावण्यासाठीं साहाय्य करणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें त्यांना वाटलें. अर्थात् त्याला युद्धावांचून किंवा हिंसेवांचून बचावण्याचा सत्याग्रहाचा मार्ग पटवून देण्याचा आपला अधिकार नाहीं हें त्यांचें मत कोणासही सयुक्तिकच वाटेल. पण हिंदी लोकांनाही अहिंसादृष्टीनें युद्धाशीं असहकार करण्याचें तत्त्व पटवून देण्याचा अधिकार आपणांस प्राप्त झालेला नव्हता असेंही त्यांचें मत होतें व तेंही बरोबर होतें.

त्या वेळीं जे लोक युद्धांत इंग्रजांना मदत करूं नका म्हणत होते ते अहिंसा-दृष्टीनें म्हणत नव्हते. सत्याग्रहानें स्वराज्य मिळेल ही श्रद्धाही त्या वेळीं हिंदी जनतेंत नव्हती. अशा वेळीं युद्ध करणें हेंच पाप आहे हें मत हिंदी जनतेला पटविण्याचा अधिकार त्या वेळीं गांधींनाही आलेला नव्हता, इतकेंच नाहीं तर ते केवळ अहिंसावादी म्हणून एखादा लाक्षणिक सत्याग्रह करून तुरुंगांत जाऊन बसले असते, तर त्याचा अर्थही जनतेला समजला नसता. गोखले किंवा टिळक यांसारख्यांना तो अर्थ कळला असता तरी युद्धविरोधी प्रचार करणाऱ्या या व्यक्तींना युद्धकालांत युद्धविरोधी प्रचार करण्याचा हक्क द्यावा, असें म्हणून त्यांच्या कृतीचें समर्थन करण्यासही ते पुढें येऊं शकले नसते. अशा परिस्थितींत हिंदी जनतेंत सत्याग्रह-निष्ठा फैलावण्याचें कर्तव्य ज्याला करावयाचें होतें, त्यानें अहिंसात्त्वाचा प्रचार करण्यासाठीं युद्धविरोध ही बाब स्वीकारण्याची पात्रता आपल्या अंगीं अद्यापि आलेली नाहीं असें मानणें अयुक्त म्हणतां येणार नाहीं.

राज्यसंस्था म्हटली कीं तिला स्वसंरक्षणासाठीं युद्ध करावें लागतें. ती युद्धांत गुंतली असतां तिच्याशीं असहकार करणें म्हणजे तिनें युद्ध थांबविलें तरी पाहिजे किंवा ती मोडली तरी चालेल अशी तरी आपली वृत्ति असली पाहिजे. बाहेरच्या आघातानें ती मोडून पडली तर जी सत्ता तिला मोडणार ती एक नवें राज्य लादणारच असते. तें राज्य आपणांस इष्ट असेल तरच ती मोडणें समर्थनीय ठरेल. हिंदुस्थानांत त्या वेळीं जे राजकीय पक्ष होते ते सर्वच आपलें राजकारण बाह्यतः तरी साम्राज्य-निष्ठेच्या आधारावरच करीत होते. गांधीजीही सत्याग्रही राजकारण त्याच आधारावर करावें असें मानीत होते. नेमस्त प्रागतिक हे ब्रिटिश सरकार सनदशीर मार्गानें स्वराज्य देईल या निष्ठेनें साम्राज्यनिष्ठ बनले होते. जहाल राष्ट्रीय हे राजद्रोह करून कोणतेंच राजकारण करणें शक्य नाहीं, म्हणून कायदेशीर राजनिष्ठा पाळत होते. सशस्त्र क्रांतिकारक गुप्त राजकारणापलीकडे हिंदुस्थानांत राहून कांहींच करूं शकत नव्हते. या परिस्थितींत सत्याग्रही राजकरण करूं इच्छिणारांसही युद्धसहकार्याची भूमिका सोडून युद्धकालांत कांहीं करणें त्या वेळीं शक्य नव्हतें. हिंदी राष्ट्र सत्याग्रही बनेल किंवा नाहीं, हा प्रश्न पुढचा होता. पण त्याला सत्याग्रही बनविण्यास प्रारंभ करतांना प्रथमच युद्धाशीं असहकाराची भूमिका स्वीकारून तो प्रारंभ करणें शक्य नव्हतें. या दृष्टीनें गांधींच्या वरील युक्तिवादाचा विचार केला तर त्या वेळीं त्यांनीं युद्धसहकार्याची भूमिका अहिंसावादी असूनही कां स्वीकारली याचा उलगडा होऊं शकेल असें वाटतें. तसेंच युद्धाशीं असहकार म्हणजे केवळ हातीं शस्त्र घेऊन न लढणें एवढाच समजतां कामा नये.

युद्धकालांत राज्याचे सर्व व्यवहार त्याच कार्यांत यश मिळविण्याच्या रोखानें चालू असतात. तेव्हां हा असहकार सार्वत्रिक बनणें अपरिहार्य असतें. शिवाय जोंपर्यंत सत्याग्रहानें राष्ट्ररक्षण करण्याचा अधिकार राष्ट्रांत आलेला नाहीं, तोंपर्यंत अहिंसेच्या दृष्टीनेंही राष्ट्राला युद्धाशीं असहकार करण्याचा उपदेश करणें बरोबर होणार नाहीं. कारण ज्याना अहिंसेनें राष्ट्ररक्षण करतां

येत नाहीं त्यांनीं हिंसेनें रक्षण करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. भेकंडपणापेक्षां हिंसा ही श्रेष्ठ असेंही महात्मा गांधींचें एक तत्त्व आहे व त्या दृष्टीनें अधिकारभेदानुसार ते न्याय्य युद्धांचेंहि समर्थन करूं शकतात हें ध्यानांत घेतलें पाहिजे. ब्रिटिश साम्राज्यापासून संरक्षण आपण घेतों, त्याचे घटक म्हणून त्याच्याकडे स्वराज्याची मागणी करतों, मग त्याचें रक्षणही आपण केलेंच पाहिजे. जोंपर्यंत त्याच्या अभावीं अथवा तें मोडून पडलें असतां आपण आपलें स्वराज्य स्थापण्याची व त्याचें संरक्षण करण्याची योजना आंखलेली नाहीं व ती अमलांत आणण्याची शक्यता आपल्या दृष्टिपथांत येत नाहीं तोंपर्यंत त्यानें पुकारलेल्या युद्धाशीं आपण सहकार्य केलें पाहिजे अशी ही विचारसरणी आहे. यावरून युद्धाशीं असहकार या तत्त्वाचा, युद्ध चालू असतां प्रचार करणाऱ्यानें किती गोष्टींचा विचार केला पाहिजे व विशेषतः लोकांना राजकीय कर्तव्य शिकविण्याची भूमिका ज्यांनीं स्वीकारली आहे त्यांनीं किती खोल विचार केला पाहिजे, याची कल्पना वरील विवेचनावरून येऊं शकेल. गांधीजींनीं तें कर्तव्य स्वीकारलेलें होतें. त्यांना केवळ हिंसा हें पाप आहे व तें मला लागूं नये येवढीच दृष्टि स्वीकारून वैयक्तिक मोक्ष किंवा स्वर्ग प्राप्त करून घ्यावयाचा नव्हता. त्यांना मानवसमाजांत एक सर्वांगीण क्रांति घडवून आणावयाची होती. ही क्रांति घडवून आणण्याचें सत्याग्रह हें साधन वापरण्याची शिकवण हिंदुस्थानला द्यावयाची होती. ही शिकवण देतांना साम्राज्यांतर्गत स्वराज्य सत्याग्रहानें प्राप्त करून देणें,एवढीच त्यांनीं आपल्या अधिकाराची मर्यादा त्या वेळीं ठरविलेली होती, आणि हा प्रश्नहि एकदम हातीं घेण्याची घाई न करतां त्याहून छोटे छोटे प्रश्न सोडवून दाखवून सत्याग्रहाच्या मार्गावरील आपला व हिंदी लोकांचा अधिकार आपण वाढवीत न्यावा असे त्यांचे विचार होते. म्हणून महायुद्ध संपेपर्यंत त्यांनीं स्वराज्याच्या प्रश्नांतही आपणास गोंवून घेतलें नाहीं.

महायुद्ध संपेपर्यंत स्वराज्याची मागणी न करतां आपण साम्राज्याला बिनशर्त साहाय्य करावें असें त्यांचें धोरण असलें, तरी लोकांवर जेथें अन्याय-प्रस्थापित राज्ययंत्राच्या दृष्टीनेंही जो अन्याय-चालू असेल,

तेथें सत्याग्रह करण्याचा हक्क मात्र ते युद्धकालांतही स्थगित करण्यास तयार नव्हते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राष्ट्रीय सभा व तिचे जहाल-मवाळ पुढारी महायुद्धानंतर कोणत्या सुधारणा आपणांस मिळाव्यात याबद्दल चळवळी करीत होते. त्या चळवळींत गांधीजी फारसें लक्ष घालीत नसत. पण ज्या ठिकाणीं जनतेवर कांहीं असह्य जुलूम चालू असेल तेथें त्या जुलमाचा सत्याग्रहानें प्रतिकार करण्याचें शिक्षण जनतेला देण्याची संधि मिळाल्यास तसा प्रयत्न व प्रयोग ते करीत असत. हिंदी जनतेला अहिंसा शिकविण्याचा हा मार्ग त्यांनीं पहिल्या महायुद्धाच्या काळांत अवलंबिला होता. एकदम स्वराज्य, स्वातंत्र्य, युद्धबंदी असले आकाशाला गवसणी घालणारे राजकीय प्रश्न हातीं न घेतां छोटीं छोटीं राजकीय गाऱ्हाणीं घेऊन तीं अहिंसेनें दूर करण्याचें शिक्षण जनतेला देणें हाच सत्याग्रही राष्ट्र निर्माण करण्याचा मार्ग असून असें एक राष्ट्र निर्माण झाल्यास त्यांतूनच मानव-संस्कृतींत सर्वांगीण क्रांति घडवून आणण्याचा मार्ग जगाला लाभेल अशी ही क्रम-विकासाची पण क्रांतिकारक दृष्टि आहे. समाजाच्या सर्व व्यवहारांतील हिंसा नष्ट करणें व विशेषतः युद्धरूपाची हिंसा नष्ट करणें ही गोष्ट एकदम हातांत घेण्यासारखी नाहीं. म्हणून तो अधिकार आपणांस अद्यापि प्राप्त झालेला नाहीं असा विचार करून त्यांनीं त्या युद्ध-कालांतील आपलें कर्तव्य मर्यादित करून घेतलें.

हिंदी परिस्थितीचें निरीक्षण

विलायतेंतून निघून १९१५ च्या जानेवारी महिन्यांत महात्मा गांधी हिंदुस्थानांत येऊन पोहोंचले. मुंबईत त्यांना उतरून घेऊन त्यांचें स्वागत करण्याची व्यवस्था ना. गोखले यांच्या भारतसेवकसमाजानें केली होती. मुंबईहून ते प्रथम पुण्यास जाऊन ना. गोखले यांची भेट घेण्यास जाणार होते, पण पुण्यास येण्यापूर्वी मुंबईच्या गव्हर्नरांना भेटून या, त्यांची तुम्हांस भेटण्याची फार इच्छा आहे, असें गोखल्यांनीं त्यांना कळविलें होतें. त्याप्रमाणें त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन याची गांधींनीं गांठ घेतली.

लॉर्ड विलिंग्डन यांनीं गांधीजींच्याकडे असें वचन मागितलें कीं, "ज्या वेळीं सरकारविरुद्ध तुम्हांस काहीं 'करावयाचें' असेल, तेव्हां तें करण्यापूर्वी तुम्हीं सरकारला आपण तसें करणार असल्याचें आगाऊ कळवावें." "मी तर नेहमींच असें करीत असतों", गांधी म्हणाले, "सत्याग्रही या नात्यानें मी जेव्हां कोणाविरुद्ध कांहीं करणार असेन तेव्हां तसें त्यांना आधीं कळवून करणें हें तर माझें कर्तव्यच आहे असें मी नेहमीं मानीत आलों आहें; अर्थात् असें वचन देण्यास मला कोणतीच अडचण नाहीं." लॉर्ड विलिंग्डन म्हणाले, "तसेंच कोणतीही शंका आल्यास माझी गांठ घेतली, तर तुम्हांस असें आढळून येईल कीं, सरकार जाणूनबुजून केव्हांही कांहीं वाईट करीत नाहीं." "या विश्वासाच्या आधारानेंच मी वागत असतों", असें गांधींनीं उद्गार काढिले. अशा प्रकारें ब्रिटिश साम्राज्याचा एक प्रतिनिधि आणि हिंदी जनतेचा प्रतिनिधि होऊं इच्छिणारा एक संत-लोकनायक-यांची पहिली मुलाखत झाली.

या वेळीं मुंबईत गांधींच्या स्वागतार्थ प्रागतिक मंडळींनीं एक खाना दिला व तेथें सर्व बडी पुढारी मंडळी पेटिट यांच्या बंगल्यावर जमली होती. पण या थाटामाटाच्या खान्याच्या वेळचीं तीं इंग्रजी भाषणें आणि तें दरबारी वातावरण गांधींना मुळींच मानवलें नाहीं. तथापि सर्वांच्या-प्रमाणें या वेळीं आपणही औपचारिक चार शब्द इंग्रजींत बोललों आणि सर फेरोजशहा यांच्या आड लपून बसलों, असें वर्णन त्यांनीं या प्रसंगाचें केलें आहे. या वर्णनावरून मुंबईच्या प्रागतिकांसंबंधीं त्याचा अनुकूल ग्रह झाला नाहीं हें स्पष्ट होतें. यानंतर मुंबईतील गुजराती समाजानेंही त्यांची एक सत्कारसभा भरविली. या वेळीं बॅ. जीनाही गुजराती या नात्यानें हजर होते. सर्वांचीं भाषणें इंग्रजींतच झालीं, पण गांधीजींनीं मात्र गुजरातींतच भाषण केलें. गुजराती मंडळींच्या सभेंत एका गुजराती पुढाऱ्याचा सन्मान होत असतां इंग्रजींतून भाषणें होणें हें गांधीजींना असह्यच वाटलें.

नेमस्त प्रागतिक या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या बड्या लोकांकडून असे एकदोन खासगी सत्कार-समारंभ झाले, तसाच

त्यांचा एक जाहीर सत्कार-समारंभ करावा असें मुंबईतील जहाल राष्ट्रीय पक्षाच्या "नॅशनल यूनियन" या सभेनें ठरविलें. ही सभा सी. पी टँकवरील हिराबागेंत झाली. ही सभा डॉ. साव्हे यांनीं घडवून आणिली होती व तिला लो० टिळक उपस्थित होते. या वेळीं गांधी व टिळक यांच्या या वेळच्या भेटीचें वर्णन डॉ. साव्हे यांनीं 'चित्रमय जगत्' मध्यें पुढीलप्रमाणें केलें आहे: "लोकमान्य दिवाणखान्यांत आल्याबरोबर गांधीजी व्यासपीठावरून खालीं उतरून दरवाजापर्यंत पुढें जाऊन प्रथम त्यांना कडकडून भेटले...गांधीजींनीं स्वतः लोकमान्यांना व्यासपीठावर नेऊन बसविलें व त्यांच्या पायाला हात लावून त्यांना नमस्कार केला. सभेचा कार्यक्रम संपल्यानंतर लोकमान्य मला जवळ बोलावून म्हणाले, "डॉक्टर, तुमचें आज अभिनंदन केलें पाहिजे तुम्हीं नॅशनल यूनियनच्या कार्यासाठीं अतिश्रेष्ठ व्यक्ति मिळविलीत. तिला सांभाळून ठेवा. हातची जाऊं देऊं नका."

यानंतर गांधी लगेच ना. गोखले यांना भेटण्यासाठीं पुण्यास गेले. पुणें या शहरासंबंधीं त्या वेळीं महात्मा गांधींच्या अंतःकरणांत किती पवित्र आणि उदात्त भावना वसत होत्या, त्याची कल्पना बाबू राजेंद्र प्रसाद यांनीं १९१७ सालची एक आठवण लिहून ठेविली आहे तिच्यावरून लक्षांत येते. चंपारण्य जिल्ह्यांतील काम चालू होतें. त्या वेळची ही आठवण आहे. बाबू राजेन्द्र प्रसाद लिहितात, "एके दिवशीं मी गांधीजींबरोबर एका गांवाहून परत येत होतों. वाटेंत बोलणें सुरू झालें. मीं त्यांना विचारलें, 'आपण देशभर हिंडत-फिरत आलां. देशसेवेच्या दृष्टीनें सर्वांत उच्चस्थान आपणांस कोठें आढळलें?' त्यानीं बहुतेक सर्व प्रांतांच्या गोष्टी सांगितल्या. शेवटीं ते म्हणाले, 'देशसेवकांसाठीं पुणें हें तीर्थस्थान आहे. तेथें एका शहरांत इतके त्यागी लोक आहेत कीं, तितके लोक इतर कोणत्याही ठिकाणीं नाहींत. त्यागाच्या दृष्टीनें तेथील संस्था आपल्या देशाला आदर्श निर्माण करून ठेवणाऱ्या आहेत. तेथें नव्या संस्थाही जन्म घेत असतात व चालू राहतात.'" ही पुण्यांतील पुण्याई टिळक, आगरकर, गोखले

यांनीं निर्माण केलेली होती. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, अनाथबालिकाश्रम, इत्यादि संस्थांनीं आणि रानडे, भांडारकर, टिळक, गोखले, आगरकर, कर्वे या थोर विद्वान् त्यागी देशभक्तांनीं व लोकसेवकांनीं राष्ट्रभक्ति व लोकसेवा हा नवा धर्म बनविला होता. लोकसेवा आणि राजकारण हीं सर्व आध्यात्मिक उन्नतीचीं साधनें आहेत, हीं निष्ठा त्यांनीं आपल्या पवित्र, उन्नत आणि तेजस्वी चारित्र्यानें सर्व भरतखंडांत निर्माण केली होती. यामुळें पुणें हें या वेळीं आधुनिक भारताचें तीर्थ-क्षेत्र आहे असें महात्मा गांधींना वाटत होतें. या पुण्यक्षेत्रांत प्रथम ते १८९६ सालीं दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नावर लोकजागृति करण्यासाठीं हिंदुस्थानांत हिंडत असतांना आले होते. याच वेळीं त्यांना प्रथमतः टिळकांचें व गोखल्यांचें दर्शन झालें. त्या वेळीं टिळकांच्याकडे पाहून त्यांचें चारित्र्य हिमालयाप्रमाणें भव्य आणि गोखल्यांच्याकडे पाहून त्याचें जीवन गंगेप्रमाणें प्रसन्न व विशाल असल्याचा अनुभव आपणांस आला असें त्यांनीं लिहून ठेविलें आहे. हिमालय आणि भागीरथी यांच्याइतक्या पवित्र आणि उदात्त भावना जागृत करणाऱ्या वस्तु भारतांत दुसऱ्या नाहींत. पुण्यांत गेले असतां या दोहोंचेंही दर्शन एकाच वेळीं घडावें, अशी स्थिति टिळक-गोखले यांच्या काळांत होती. गांधीजी गोखल्यांना आपले गुरुच मानीत असत व गोखले गांधीजींना अत्यंत श्रेष्ठ अशी आध्यात्मिक विभूति मानीत असत. भारतीय मानवतेनें त्यांच्या जीवनांत अत्युच्च शिखर गांठलें आहे अशी त्यांच्या विभूतिमत्त्वाची थोरवी गोखले वर्णन करीत. दादाभाई, रानडे यांच्यानंतर गोखल्यांना आपल्या दिव्य गुणांनीं मोहून टाकणारी व्यक्ति गांधी हीच होती. त्यानीं आपल्या भारतसेवकसमाजाचें सभासद व्हावें आणि भारताच्या सार्वजनिक जीवनाला आध्यात्मिक स्वरूप देण्याची आपली महत्त्वाकांक्षा पुरी करावी अशी गोखल्यांची मनापासून इच्छा होती. पण ही त्यांची इच्छा भारतसेवकसमाजाच्या इतर कांहीं सभासदांना तितकीशी मान्य नव्हती. गांधींना मात्र गोखल्यांच्या इच्छेस मान द्यावा आणि आपण त्यांच्या समाजाचें

सदस्य व्हावें असें वाटत होतें. अशा पवित्र आणि गाढ भावनांनीं गांधी या वेळीं पुण्यांत आलेले होते.

या वेळीं गोखले फार आजारी होते. पुढें एक महिन्याभरांतच त्यांचा अंत झाला (१९ फेब्रुवारी १९१५). त्या वेळीं गांधी त्यांच्या जवळ नव्हते. गांधी पुण्यांत आल्यानंतर त्यांनीं भारतसेवकसमाजांत दाखल व्हावें किंवा नाहीं, यासंबंधीं गोखल्यांशीं जें बोलणें झालें त्यावरून त्यांना असें दिसून आलें कीं, भारतसेवकसमाजाच्या कांहीं सभासदांना गांधींचीं तत्त्वें व आपल्या समाजाचीं तत्त्वें यांत विरोध दिसत आहे. गोखले गांधींना म्हणाले कीं, तुम्ही जसे आपल्या मतांबद्दल आग्रही आहां तितकेच तुम्ही इतरांच्या मतांबद्दल सहिष्णु आहां हें मला माहीत आहे, पण हें माझें मत त्या मंडळींना तितकेंसें पटत नाहीं. स्वतःच्या मतांबद्दलचा आत्यंतिक आग्रह हा सत्यनिष्ठेचा द्योतक गुण असून दुसऱ्यांच्या मतांसंबंधीं उदारता व सहिष्णुता हा अहिंसावृत्तीचा निदर्शक गुण आहे. सत्याग्रही व्यक्तींत हे दोनही गुण असले पाहिजेत. या निष्ठेनें गांधीजी त्या दोहोंचेंही संवर्धन आपल्या अंगीं करीत असत. हें त्यांचें द्विविध स्वरूप गोखल्यांना प्रतीत झालें होतें. पण तें त्यांच्या अनुयायांना प्रतीत झालें नव्हतें. गांधींनीं एक वर्षभर सर्व देशभर हिंडून परिस्थितीचें निरीक्षण करावें व मग आपलें पुढील कार्य व धोरण ठरवावें असें गोखल्यांनीं त्यांना सांगितलें व तें त्यांनाही लगेच पटलें. गांधींची इच्छा गुजरातेंतच कोठेंतरी एखादा आश्रम स्थापून राहावें व आपल्या कार्यास प्रारंभ करावा अशी होती. त्याला गोखल्यांनीं लगेच मान्यता दिली आणि त्या आश्रमाला लागेल तो पैसा मी तुम्हांस देत जाईन असें त्यांनीं गांधींना सांगितलें. "तुम्ही आमच्या समाजांत या किंवा येऊं नका. पण तुमचा आश्रम तो मी माझाच आश्रम मानणार", असेंही गोखल्यांनीं गांधींना सांगून टाकलें.

यानंतर गांधी आपल्या आप्त मंडळींस भेटण्यासाठीं राजकोटला जावयास निघाले व तेथून ते दक्षिण आफ्रिकेंतून फिनिक्स आश्रमांतून

जी आश्रमी मंडळी आली होती, त्यांना भेटण्यासाठीं शांतिनिकेतनास गेले. शांतिनिकेतनमध्यें त्यांना फिनिक्स आश्रमांतील मंडळी भेटली व तेथें दीनबंधु अँड्रयूज व पिअर्सन हे इंग्रज मित्रही भेटले. या वेळीं त्याच ठिकाणीं काकासाहेब कालेलकर यांचा व त्यांचा परिचय झाला. ते त्या वेळीं शांतिनिकेतनालाच होते. दुसरे महाराष्ट्रीय चिंतामणशास्त्री जोशी हेही त्यांना प्रथम तेथेंच भेटले. ही मंडळी पुढें गांधीजींच्या साबरमती येथील सत्याग्रहाश्रमास मिळाली. काकासाहेब कालेलकर हे लो. टिळक, अरविंद घोष, रवींद्रनाथ टागोर यांच्याकडे जातां जातां अखेरीस गांधीजींचे कायमचे शिष्य बनले हें ज्यांना माहीत आहे, त्यांना या त्यांच्या प्रथम परिचयाचें विशेष कौतुक वाटेल. अध्यात्म आणि क्रांतिकारक राष्ट्रभक्ति यांचा उगम त्यांच्या अंतःकरणांत यापूर्वीच झालेला होता. आतां त्यांना अहिंसेची मूर्ति भेटली. या अहिंसामूर्तीत त्यांना अध्यात्म व क्रांतिनिष्ठा यांचा अपूर्व संगम प्रतीत झाला असल्यास नवल नाहीं. गांधीजी सुमारें एक आठवडा शांतिनिकेतनास राहिले असतील–नसतील, इतक्यांत त्यांना गोखले यांच्या निधनाची हृदयविदारक तार येऊन पोहोंचली. ताबडतोब गांधी पुण्यास येऊन दाखल झाले. अशा प्रकारें गांधीजी ज्यांना राजकारणांतील आपले गुरु असें मानीत असत, त्यांचा अंत झाल्यामुळें आपला एक आधार तुटला असेंच त्यांना वाटलें असल्यास नवल नाहीं.

गोखल्यांच्या निधनाची तार आल्यानंतर गांधी शांतिनिकेतनाहून पुण्यास येण्यास निघाले; त्या वेळीं दीनबंधु अँड्रयूज हे त्यांच्याबरोबर बरद्वानपर्यंत प्रवासांत होते. त्या वेळीं त्यांचें पुढीलप्रमाणें संभाषण झालें : " तुम्हांला हिंदुस्थानांत सत्याग्रह करण्याचा प्रसंग येईल असें वाटतें का, आणि वाटत असेल तर केव्हां, याची कांहीं कल्पना येते का ? " असें अँड्रयूज यांनीं विचारलें. यावर गांधींनीं उत्तर दिलें, " याचें उत्तर देणें कठीण आहे. मला एक वर्षपर्यंत तर कांहीं करायचेंच नाहीं. गोखल्यांनीं माझ्याकडून वचन घेतलें आहे कीं, एक वर्षपर्यंत मीं भ्रमण करावें, कोणत्याही सार्वजनिक प्रश्नासंबंधीं मत निश्चित करूं नये, बोलून दाखवूं नये. हें वचन मी अक्षरशः पाळणार

आहें. त्यानंतरसुद्धां मला कोणत्याही प्रश्नावर बोलण्यासारखें असेल तरच मी बोलणार आहें. यावरून पांच वर्षेपर्यंत सत्याग्रह करण्याचा प्रसंग येईल असें मला वाटत नाहीं." यानंतर, 'हिंद-स्वराज्य' या पुस्तकांत गांधींनीं जे विचार प्रदर्शित केले होते त्यांसंबंधीं गोखल्यांचें मत सांगतांना गांधी लिहितात : "एक वर्षभर तुम्हीं हिंदुस्थानांत राहून अनुभव घेतलात म्हणजे तुमचे विचार आपोआप ठिकाणावर येतील." पुण्यास पोंचल्यानंतर गांधींनीं भारतसेवक-समाजांत दाखल व्हावें कीं नाहीं याबद्दल सभासदांशीं मोकळेपणानें चर्चा झाली. कांहीं सभासदांचा त्यांचा समावेश करण्यास तात्त्विक विरोध होता आणि तसें केल्यास ज्या मूळ उद्देशानें भारतसेवक-समाज गोखल्यांनीं स्थापन केला त्या उद्देशासच धक्का लागेल असेंही कांहींचें प्रामाणिक मत होतें. अशा परिस्थितींत या प्रश्नाचा निर्णय केवळ औपचारिक बहुमतानें लावून घ्यावा हें गांधींना पसंत पडलें नाहीं. आपण कायदेशीर सभासद होऊं नये, असाच त्यांनीं आपल्या मनाशीं निर्णय घेतला आणि तो निर्णय कांहीं काळानें पत्र लिहून श्रीनिवासशास्त्री यांना त्यांनीं कळविला. असें असलें तरी भारतसेवकसमाजाशीं गुरुबंधु या नात्याचा संबंध गांधींनीं व त्या समाजानें अखेरपर्यंत मानसिकदृष्ट्या कायम ठेवला होता. गोखल्यांचा कायदेशीर राजकीय वारसा मात्र गांधींच्या-कडे न येतां तो शास्त्रीप्रभृति भारतसेवकसमाजाच्या सभासदांकडे गेला. गांधींच्या मतानें हिंदुस्थानांतील सार्वजनिक जीवनालां आध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून देणें (Public life must be spiritualised) हा गोखल्यांचा भारतसेवकसमाजाच्या स्थापनेच्या-मागें मूळ उद्देश होता. त्या उद्देशास अनुसरूनच आपण भारतीय जनतेला सत्याग्रही दीक्षा देत आहोंत व तसें करण्यानेंच भारत-सेवकसमाजाचा—सार्वजनिक जीवनाला आध्यात्मिक स्वरूप देण्याचा—उद्देश सफल करीत आहोंत अशी त्यांची निष्ठा होती. तथापि या विषयाची केवळ युक्तिवादानें चर्चा करून बहुमत-अल्पमत घेऊन निर्णय ठरविणें हा अशा कामीं योग्य मार्ग नव्हे. यासाठीं त्यांनीं

गोखल्यांच्या संस्थेंत शिरूं नये आणि आपल्या मतानुसार त्यांचा संदेश लोकांना आचरण्याचा मार्ग दाखवून द्यावा असें ठरविलें.

सत्याग्रहाश्रमाची स्थापना

त्या वर्षी मे महिन्याच्या पंचवीस तारखेस गांधींनीं अहमदाबादे-जवळ साबरमतीच्या तीरावर सत्याग्रहाश्रम स्थापन केला. थोड्याच दिवसांत त्यांनीं आश्रमासाठीं जी दुसरी जागा पसंत केली ती साबरमतीच्या तीरावरील व सेंट्रल जेलपासून नजीक अशीच होती. जेल ज्या ठिकाणीं बांधतात तेथील हवा आरोग्यदायक असावी अशी काळजी घेण्यांत येत असते, या दृष्टीनें त्यांनीं ती जागा पसंत केली. शिवाय ज्याला सत्याग्रहाश्रम स्थापन करायचा आहे त्याला वारंवार तुरुंगांत जाण्याचा प्रसंग येणारच. या दृष्टीनें आपणांस ती जागा विशेष पसंत पडली असेंही त्यांनीं लिहून ठेवलें आहे. टिळक, आगरकर व चिपळूणकर यांनीं जेव्हां 'केसरी' व 'मराठा' हीं वर्तमानपत्रें सुरू केलीं तेव्हां कोणीं एकानें 'केसरी' तील लिखाण वाचून चिपळूणकरांना प्रश्न केला कीं, "तुम्ही इतके कडक लेख सरकारविरुद्ध कसे लिहितां ?" तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, "अगोदर एक पाय तुरुंगांत ठेवून मगच आम्ही हातांत लेखणी धरीत असतों." ही आठवण आगरकरांनीं चिपळूणकरांच्या मृत्युलेखांत दिलेली आहे. त्यासारखीच वृत्ति धारण केल्याखेरीज मनुष्याला सत्याग्रही बनतां येणार नाहीं. याचा अर्थ प्रत्येक वेळीं कायदे मोडून तुरुंगांत जाणें हेंच सत्याग्रही मनुष्याचें साध्य आहे, असा होऊं शकत नाहीं. परंतु जुलमी राज्य, अन्यायी समाजघटना आणि विवेकभ्रष्ट धर्म यांच्याखालीं वावरणाऱ्या सत्याग्रही नेत्याला राजभय, लोकभय आणि सनातनी धर्मनिष्ठांचें भय यांच्यापलीकडे गेल्याखेरीज एकही पाऊल टाकतां येणार नाहीं, आणि म्हणून अशा प्रकारच्या विविध रोषांना बळी पडण्याची तयारी ज्याला सत्याग्रही व्हावयाचें असेल त्यानें सदैव ठेविली पाहिजे. राजभय, समाजभय अथवा धर्मभय यांच्यांतून ज्यांचें अंतःकरण मुक्त झालेलें नाहीं त्यांना सत्याची व अहिंसेची उपासना करतां येणार नाहीं. सत्य-

दृष्टीनें विचार केल्यास राज्य, समाज आणि धर्म या सर्व संस्था सत्य आणि अहिंसा यांच्या संरक्षणासाठीं व संवर्धनासाठींच असतात. तेंच त्यांचें ध्येय आहे. पण या ध्येयांना सदैव जागणारीं राज्यें, समाज व धर्मसंस्था फारशा आढळत नाहींत. त्यांचे सर्व व्यवहार त्या ध्येयासाठीं म्हणून होत असल्याचें जाहीरपणें सांगण्यांत येतें. परंतु अनेक वेळां राज्यें न्यायाच्या नांवानें अन्याय करीत असतात; समाजसंस्था समाज-धारणेच्या नांवानें विषमता आणि द्वेष या भावना जागृत करीत असतात, आणि धर्मसंस्था धर्मासाठीं म्हणून सत्याचा व प्रेमाचा बळी देत असतात. अशा वेळीं त्या राज्याविरुद्ध, समाजाविरुद्ध आणि धर्मा-विरुद्ध क्रांति करून सत्याग्रही नेत्यांना सत्याची व अहिंसेची उपासना करावी लागते. यासाठीं सत्याग्रहाश्रम आणि बंदिखाना यांचें सान्निध्य औचित्यास धरून आहे, असें वाटलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. अशा भावनांनीं एकोणीसशें पंधराच्या मे महिन्यांत २९ तारखेला महात्मा गांधींनीं साबरमतीच्या तीरावर आपल्या सत्याग्रहाश्रमाची स्थापना केली.

साबरमतीचा सत्याग्रहाश्रम स्थापन होण्यापूर्वी व नंतर त्या वर्षाच्या अखेरपर्यंत गांधींनीं जवळजवळ सर्व हिंदुस्थानभर प्रवास करून ठिकठिकाणच्या सार्वजनिक संस्था पाहिल्या आणि कार्यकर्ते व पुढारी यांच्याशीं चर्चा केली. ते जेथें जेथें जात तेथें तेथें कांहीं सत्कार-समारंभ, सभा, भाषणें, वगैरे होत. या सर्व प्रसंगीं गांधीजी आपली सत्याग्रहा-संबंधींची भूमिका व तत्त्वज्ञान तात्त्विक दृष्टीनें लोकांपुढें मांडीत. अत्याचारी व गुप्त मंडळ्या यांच्या राजकारणाचा ते निषेध करीत. मनुष्यानें आपणांस जें पटलें असेल तें निर्भय वृत्तीनें उघड सांगावें, त्या सत्याचा उघड प्रचार करण्यासाठीं भोगावे लागतील ते क्लेश सहन करावेत, कोणाची हिंसा करूं नये आणि दुटप्पी वर्तन करूं नये, असा उपदेश ते तरुणांना करीत. धर्मबुद्धीनें राजकारण करा, सार्वजनिक जीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान निर्माण करा, या गोखल्यांच्या वाक्यांचा असा अर्थ ते लावीत. ब्रिटिश साम्राज्याशीं आपण राजनिष्ठ कां आहोंत, याचें स्पष्टीकरण करतांना ते म्हणत कीं, 'या साम्राज्यांत राहून प्रत्येकास समानतेचा व स्वतंत्र नागरिकत्वाचा हक्क मिळवितां

येईल अशी माझी खात्री आहे. म्हणून मी त्याच्याशीं एकनिष्ठ आहें. मात्र ही समानता व स्वतंत्रता ब्रिटिश लोक आपण होऊन तुम्हांस देतील असें समजूं नका. कोणाही राज्यकर्त्यांस देतां येण्याजोगी अशी ही वस्तु नाहीं. ती प्रत्येक प्रजाजनानें आपल्या सामर्थ्यानें प्राप्त करून घेतली पाहिजे. तुम्ही आपणांस गुलाम प्रजाजन असें समजूं नका. मी स्वतःस गुलाम समजत नाहीं आणि माझ्यापुरता समानतेचा व स्वतंत्रतेचा हक्क मीं मिळवलेला आहे. ब्रिटिश साम्राज्यांत सत्याग्रहाच्या बळावर आपणांस असे हक्क मिळवतां येतात, म्हणूनच मी त्या साम्राज्याशीं एकनिष्ठ आहें.' अशा तऱ्हेनें ठिकठिकाणीं ते आपल्या सत्याग्रही तत्त्वज्ञानानुसर देशभक्तीचा, लोकसेवेचा आणि आत्मोन्नतीचा मार्ग उपदेशीत असत. अशा प्रकारें एक वर्षभर सर्व निरीक्षण झाल्यानंतर त्यांनीं राजकारणावर बोलण्यास हळूहळू आरंभ केला.

राजकीय मतप्रदर्शन

इसवी सन १९१६ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत बनारस हिंदु युनिव्हर्सिटी या संस्थेचा उद्घाटनसमारंभ झाला. त्या वेळीं पं. मदनमोहन मालवीय यांनीं त्या समारंभासाठीं देशांतील सर्व मोठ्या लोकांना, विद्वानांना, राजेरजवाड्यांना आणि सरकारी अधिकाऱ्यांनाही एकत्र जमविलें होतें. विद्यार्थ्यांच्यापुढें निरनिराळ्या वक्त्यांचीं व नेत्यांचीं भाषणें झालीं. या समारंभास महात्मा गांधी हजर होते आणि तेथें ता० ४ फेब्रुवारीं रोजीं त्यांचें भाषण झालें. या भाषणांत त्यांनीं प्रचलित राजकारणासंबंधीं आपले विचार अगदीं जाहीरपणें प्रथमच मांडले असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या समारंभाचें एकंदर दृश्य पाहून त्यांच्या मनांत ज्या भावना जागृत झाल्या त्या त्यांनीं श्रोत्यांपुढें मांडल्या. त्या समारंभाचें उद्घाटन व्हाइसरॉय यांचे हस्तें करण्यांत आलें होतें. त्यांच्या भेटीच्या वेळीं सर्वत्र ठेवण्यांत आलेला कडेकोट बंदोबस्त आणि तेथें चालू असलेला गुप्त-पोलिसांचा सार्वत्रिक संचार हें पाहून गांधींना आपल्या देशाच्या एकंदर राजकीय परिस्थितीबद्दल फार विषाद वाटला. राज्यकर्ते प्रजेला भीत आहेत;

प्रजा राज्यकर्त्यांचा मनांतून द्वेष करीत आहे आणि असें असूनही प्रजेंतील प्रत्येक व्यक्तीस पोलिस पाहून भीति वाटत आहे. सुशिक्षित लोक व तरुण यांच्यात धर्मनिष्ठा व त्यागी देशभक्ति यांची उणीव सर्वत्र दिसत आहे. देशांतील शेतकरीवर्ग कंगालतेनें व जुलमानें पीडलेला असूनही त्या समारंभास जमलेले राजे-महाराजे आपल्या अंगावर बहुमोल वस्त्रें आणि अलंकार घालून मिरविण्यांत आनंद मानीत आहेत. कांहीं धाडशी देशभक्त स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं गुप्त कट रचून अत्याचारी क्रांतीचे प्रयत्न करीत आहेत. हें सर्व दृश्य पाहून त्यांनीं त्या परिस्थितींत आपलें कर्तव्य काय या-संबंधीं तरुणांना उपदेश करण्यास सुरवात केली. बरेंचसें प्रास्ताविक भाषण झाल्यानंतर ते म्हणाले, "आपणांस कितीही चीड आली तरी हें विसरून चालणार नाहीं कीं, आज हिंदुस्थान उतावीळ झालेला आहे आणि त्यांत एक अराजक-सेनाच निर्माण झाली आहे. मीही एक अराजकवादीच आहें; पण तो निराळ्या प्रकारचा. आपल्यामध्यें हा जो एक अराजक-वर्ग निर्माण होत आहे, त्यास जर मी भेटूं शकेन तर असें सांगेन कीं, तुम्हांस ज्या प्रकारचा अराजकवाद हवा आहे त्यास या देशांत स्थान नाहीं. हिंदुस्थानास आपल्या जेत्यावर विजय मिळवावयाचा असल्यास त्यांत तुमच्या अराजकवादास जागा नाहीं. हें एक भयाचेंच चिन्ह आहे. जर आपला परमेश्वरावर विश्वास असेल व जर आपण त्याचें भय बाळगीत असूं तर आपणांस इतर कोणासही भिण्याचें कारण नाहीं; मग तो महाराजा असो, व्हाइसरॉय असो, गुप्त-पोलिस असो, किंवा खुद्द जॉर्ज बादशहा असो. या अराजक लोकांच्या देशभक्तीबद्दल मी त्यांना मान देतों, आपल्या देशासाठीं मरण्यास ते तयार होतात, याबद्दल मी त्यांचा सन्मान करतों; पण मी त्यांना म्हणतों कीं, खून करणें हें सन्मान्य बलिदानाचें पूर्वचिन्ह होऊं शकेल काय? तें असूं नये असें मी म्हणतों. आपल्या धर्माची त्याला मान्यता नाहीं. बाँबवाले गुप्त कट रचितात, पण त्यांना उघड वावरण्याचें भय असतें व पकडले गेले तर आपल्या असन्मार्गी उत्साहाबद्दल शिक्षा भोगावी लागते. मला कांहीं लोक

म्हणतात कीं, 'आम्हीं जर असें केलें नसतें तर वंगभंगाच्या चळवळीनंतर आम्हांस जे हक्क मिळाले ते मिळाले नसते.' इतकें भाषण होत आहे तोंच व्यासपीठावर बसलेल्या श्रीमती ॲनि बेझंटबाई यांनीं हें भाषण आतां थांबवा असें म्हणण्यास सुरवात केली, त्यामुळें सभेंत थोडा गोंधळ माजला. थोडा वेळ शांतता झाल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीनें गांधींनीं भाषण पुढें चालू केलें. स्वराज्याच्या मुद्यावर आल्यावर ते म्हणाले, "जर आपणांस स्वराज्य मिळावयाचें असेल तर तें आपणच घेतलें पाहिजे. आपणांस स्वराज्य केव्हांही बहाल केलें जाणार नाहीं. ब्रिटिश राष्ट्राच्या व ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासाकडेच पहा. ब्रिटिश लोक स्वातंत्र्यप्रेमी असले तरी जे लोक स्वतः स्वातंत्र्य मिळवून घेत नाहींत, त्यांना स्वातंत्र्य देण्यास ते केव्हांही तयार होत नाहींत. तुम्हांस वाटल्यास बोअर युद्धापासून धडा घ्या. जे लोक एके काळीं ब्रिटिश साम्राज्याचे शत्रु होते तेच त्याचे आज मित्र झालेले आहेत." हे शब्द बाहेर पडतांच बेझंटबाई या व्यासपीठावरून उठून सभागृह सोडून बाहेर पडल्या आणि त्यांच्या मागोमाग तेथें जमलेले राजे-महाराजे हेही निघून गेले. अशा गोंधळांत हें भाषण तसेंच अर्धवट राहिलें. महात्मा गांधींनीं हिंदी राजकारणावर जें हें पहिलेंच जाहीर वक्तव्य केलें त्यामुळें एक जबरदस्त धक्का त्या वेळच्या राजकीय वातवारणाला बसला आणि गांधीजींच्या रूपानें एक कांहीं नवेंच राजकीय तत्त्वज्ञान व क्रांतिकारक शक्ति या देशांत निर्माण होत आहे, याची पहिली जाणीव सर्व हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाला या वेळीं झाली.

सत्याग्रहाचा अल्पारंभ

गांधींनीं हिंदुस्थानांत पाय ठेवल्यापासूनच, किंबहुना इंग्लंडांतून हिंदुस्थानला निघालेल्या बोटीवर पाय ठेविल्यापासूनच, त्यांना या देशातील इंग्रज व हिंदी जनता याच्या संबंधांत एक प्रकारचा सेव्य-सेवकभाव, विषमता व अन्याय यांचा आविष्कार सर्वत्र जाणवूं

लागला. द. आफ्रिकेंत गोरे व काळे यांच्यांत द्वेष वसत असला तरी तेथें जे थोडे गोरे व काळे व्यक्तिदृष्ट्या परस्परांचे मित्र बनतात, त्यांच्यांत पूर्ण मोकळेपणा व समानतेचें नातें निर्माण होतें, असा अनुभव त्यांना आला होता. पण हिंदुस्थानकडे जाणारा प्रत्येक इंग्रज कोणत्याही दर्जाच्या हिंदी मनुष्याशीं वागतांना, मी जेता आहें आणि हिंदी मनुष्य जित आहे ही भावना विसरूं शकत नाहीं असा अनुभव त्यांना वोटीवरच येऊं लागला. हिंदुस्थानांत आल्यानंतर त्यांना असें दिसून आलें कीं, या देशांतील सुशिक्षित व धनिकवर्ग जनतेपासून दूर गेलेला असून जनतेच्या जीवनाशीं तो मुळींच समरस झालेला नाहीं. इंग्रजी भाषेंतून सर्व शिक्षण होणें आणि सत्ता व संपत्ति प्राप्त करून घेण्याचे सर्व मार्ग परकीय सरकारच्या हातीं असणें हीं दोन या वाढत्या भेदाचीं कारणें होतीं. गांधींनीं येथें आल्यानंतर जर कोणतें मोठें कार्य केलें असेल तर तें म्हणजे सुशिक्षित-वर्गाचें व धनिक-वर्गाचें लक्ष सत्ताधाऱ्यांकडून काढून तें जनतेच्या जीवनाचा उद्धार करण्याकडे लाविलें. येथें आल्यापासून त्यांनीं जनतेला समजेल अशा भाषेंत बोलण्याचा निश्चय केला आणि जनतेच्या जीवनाशीं समरस होऊन शक्य तितकें वागावें असें ठरविलें. यासाठीं ते रेल्वेंतून प्रवास करतांना तिसऱ्या वर्गानें प्रवास करूं लागले. या प्रवासांत त्यांना हरघडीस अन्याय व जुलूम चालू असल्याचें दिसून आलें. या अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य जनतेंत आणावयाचें तर सुशिक्षितांनीं तिसऱ्या वर्गानेंच प्रवास केला पाहिजे व वेळप्रसंगीं सत्याग्रह करण्यासही तयार असलें पाहिजे, हें त्यांना पुणें ते राजकोट या पहिल्याच प्रवासांत दिसून आलें.

मुंबईहून काठेवाडांत जातांना विरमगांव स्टेशनवर जकात-तपासणी होत असे. या तपासणीच्या वेळीं तिसऱ्या वर्गाच्या लोकांना किती त्रास होतो तें त्यांनीं स्वतः पाहिलें. त्यांचें स्वागत करण्यास आलेल्या सार्वजनिक कार्यकर्त्यांनींही या त्रासाबद्दल तक्रारी केल्या. तेव्हां गांधींनीं त्यांना सवाल केला, "तुमची तुरुंगांत जाण्याची तयारी आहे काय? ती तयारी असेल तरच हा जाच कमी होऊं शकेल." पुढें त्यांनीं

या बाबतींत मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकार यांच्याशीं पत्रव्यवहार केला. मुंबई सरकारच्या चिटणिसांची एकदां गांठही घेतली. या चिटणिसांनीं गांधींनीं एका सार्वजनिक सभेंत केलेल्या भाषणाचा वृत्तान्त आपणाकडे आला असून त्यांत सत्याग्रहाची धमकी सरकारला दिली असल्याबद्दल तक्रार केली. ते म्हणाले, "तुम्हांला ही धमकी नाहीं वाटत? आणि अशा तऱ्हेनें बलाढ्य सरकार धमकीला थोडीच भीक घालणार आहे!"

"ही धमकी नव्हे, हें लोकशिक्षण आहे." गांधींनीं उत्तर दिलें, "लोकांना आपल्या दुःखनिवारणाचे रास्त मार्ग दाखवून देणें माझ्यासारख्याचें कर्तव्य आहे. ज्या राष्ट्राला स्वतंत्रता पाहिजे असेल त्या राष्ट्रापाशीं स्वतःच्या संरक्षणाचा अंतिम इलाज असणें आवश्यक आहे. सामान्यपणें असले इलाज हिंसक असतात. सत्याग्रह हें शुद्ध अहिंसक शस्त्र आहे. त्याचा उपयोग व त्याची मर्यादा दाखवून देणें मी स्वतःचा धर्म समजतों. इंग्रज सरकार बलाढ्य आहे याबद्दल मला शंका वाटत नाहीं. पण सत्याग्रह हें सर्वांहून श्रेष्ठ शस्त्र आहे याविषयींही मला शंका नाहीं."

यावर सेक्रेटरी आपली मान हालवून म्हणाले, "तें काय तें दिसेलच." यानंतर गांधींना असें सांगण्यांत आलें कीं, ही जकात-तपासणी रद्द करणें प्रांतिक सरकारच्या हातीं नसून हिंदुस्थान सरकारच्या हातीं आहे. यावर त्यांनीं व्हाइसरॉयशीं पत्रव्यवहार केला, पण त्याला कांहींच उत्तर आलें नाहीं. पुढें दोन वर्षांनीं व्हाइसरॉयशीं प्रत्यक्ष गांठ झाली तेव्हां हा विषय गांधींनीं काढला व त्यानंतर ही जकात-तपासणी रद्द झाली. सत्याग्रहाच्या अल्पारंभाचा हा दाखला बराच बोधप्रद आहे. जनतेला आपलीं गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं सत्याग्रहाचा उपयोग करण्याचा हक्क आहे, हा विचारच त्या वेळीं किती भयंकर समजला जात असे हें यावरून दिसून येतें. तसेंच गांधींच्या सर्व हालचालींवर सरकारची प्रारंभापासून कशी नजर होती तेंही स्पष्ट होतें. गांधी प्रत्येक प्रसंगीं सत्याग्रहाची उपयुक्तता लोकांना

व सरकारला पटवून देण्याचा प्रयत्न अत्यंत शांत, संयमी व सहज वृत्तीनें कसे करीत होते व त्या कामीं धैर्य प्रगट करण्याप्रमाणें धीर धरण्याचाही उपदेश ते कसा करीत होते, हेंही विचार करण्यासारखें आहे.

आश्रमवासींची सत्त्वपरीक्षा

सत्याग्रह-निष्ठेनें वागणाऱ्या व्यक्तीस केवळ राजसत्तेला विरोध करण्याचेच प्रसंग येतात असें नाहीं. समाज व धर्म या संस्थांची सुधारणा करण्याचें व्रत त्यांनीं अंगीकारिलें असल्यानें त्यांना समाजाचा व धर्माचाही रोष पत्करावा लागतो. समाज त्यांना धर्माच्या नांवानें विरोध करूं लागतो, तेव्हां त्यांना बहिष्कृत होण्याचा प्रसंग प्राप्त होतो. साबरमतीस सत्याग्रहाश्रम स्थापन होऊन एकदोन महिने होतात न होतात, तोंच श्री. ठक्करबाप्पा यांचें मुंबईहून एक पत्र गांधींना आलें कीं, तुम्ही आपल्या आश्रमांत एक अस्पृश्य समाजाचें कुटुंब ठेवून घेण्यास तयार आहां काय? हें कुटुंब तेथील नियम पाळण्यास तयार आहे. गांधींनीं हें कुटुंब आणून ठेविलें. त्याबरोबर अहमदाबादेंत खळबळ उडाली, व धनिकांनीं आश्रमाला पैसा देण्याचें बंद करणार अशी धमकी दिली. आश्रमाची व्यवस्था पाहणारे श्री. मगनलाल गांधी यांनीं गांधींना एकदां सांगितलें कीं, आतां आपल्याजवळचे सर्व पैसे संपले. तेव्हां गांधी म्हणाले, "तर मग आपण आतां अंत्यजवाड्यांत जाऊन राहूं. तेथील लोक जसे राहतात तसे राहूं. जें मिळेल तेवढ्यावर राहावयाचें व मजुरी करून निर्वाह करावयाचा असा निर्धार करायचा." त्याच दिवशीं एक अनोळखी गृहस्थ आश्रमाच्या दाराशीं आला व त्यानें 'तुम्हांस मी कांहीं मदत देणार आहें, ती घ्याल का, असें विचारलें. गांधींनीं 'होय' म्हणतांच तो निघून गेला. दुसऱ्या दिवशीं तोच गृहस्थ दारावर आला. त्यानें तेरा हजार रुपयांच्या नोटा गांधींच्या हातावर ठेविल्या व तो कांहीं विशेष न बोलतां निघून गेला. पूर्वी या गृहस्थाची गांधींच्याशीं केव्हांही ओळख नव्हती व तो कधीं आश्रमांत आला नव्हता. अशा

प्रकारें अचानक द्रव्यसाहाय्य मिळून आश्रमाच्या खर्चाची सुमारें एक वर्षाची व्यवस्था झाली !

किसान-कामगारांना सत्याग्रहाचे धडे

महात्मा गांधींना पहिलीं दोन वर्षें हिंदुस्थानचें एकंदर निरीक्षण करण्यांत आणि आपल्या तत्त्वज्ञानाचा परिचय हिंदुस्थानला करून देण्यांतच घालवावीं लागलीं. या काळांत गांधींनीं देशांतील कोणत्याही राजकीय पक्षास न मिळतां आपला स्वतःचा मार्ग आपल्या बुद्धी-प्रमाणें व निष्ठेप्रमाणें आक्रमिण्याचें निश्चित केलें. गोखल्यांच्याप्रमाणें टिळकांच्याबरोबरही त्यांनीं आपलें तत्त्वज्ञान आणि राजकारण यांसंबंधींचे विचार चर्चा करून व घासून तपासून पाहिले, तेव्हां त्यांना दिसून आलें कीं, त्यांच्या व आपल्या दृष्टिकोनांत तात्त्विक मूलग्राही भेद आहे. आपला सत्याग्रहाचा मार्ग त्यांना नापसंत होता असें नाहीं ; तथापि, त्या मार्गाची श्रेष्ठता मान्य करूनही सामान्य जनतेला तो मार्ग कितपत झेपेल याबद्दल त्यांना शंका होती. आपल्या मार्गावर त्यांचा विश्वास नाहीं व नव्हता, असें मात्र गांधी केव्हांही म्हणत नसत. आपल्या प्रयोगास त्यांनीं आशीर्वाद-पूर्वक साह्य केलें असतें अशीही त्यांची भावना होती. तथापि टिळक स्वतः जें राजकारण करीत होते त्यांत गांधींची सत्याग्रही वृत्ति किंवा निष्ठा नव्हती हें उघड आहे. तरी गांधींच्या राजकीय प्रयोगांस शक्य तें सहाय्य करावें अशीच वृत्ति टिळकांची अखेरपर्यंत होती आणि त्यांच्या पश्चात् जेव्हां गांधींनीं राष्ट्रीय सभेकडून अनत्याचारी असह-काराचा ठराव मान्य करवून प्रचंड आंदोलन केलें तेव्हांही आपल्या या आंदोलनास, टिळकांची व आपली अखेरची मुलाखत झाली त्या वेळीं त्यांनीं मान्यता दिली होती, असेंही गांधींनीं टिळकांच्या मृत्यूनंतर अनेकवार लिहिलें. आपल्या व्यावहारिक राजकारणांत त्यांचें आपणांस साह्य मिळालें असतें अशी त्यांची यथाथ समजूत होती. तथापि त्यांच्या-आपल्या वर्तनतत्त्वांत आणि जीवनाविषयक दृष्टिकोनांत सूक्ष्म पण मूलग्राही फरक आहे व म्हणून टिळकांचे मार्ग हे माझे मार्ग नव्हेत.

आणि ते माझ्या मार्गानें चालत नव्हते हेंही गांधी मान्य करीत ; पण लगेच असेंही म्हणत कीं, याचा अर्थ त्यांचा माझ्या मार्गावर विश्वास नव्हता असा होऊं शकत नाहीं. या सर्व सूक्ष्म तात्त्विक व राजकीय मतभेदांचें थोडें अधिक विवेचन पुढील एका प्रकरणांत करण्यांत येईल. येथें येवढेंच सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं, गांधीजी ज्या सत्याग्रहाच्या मार्गानें राष्ट्राला नेऊं पाहत होते त्या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करणारा एकही पक्ष त्यांना त्या वेळीं या देशांत दिसला नाहीं, आणि म्हणून आपला मार्ग आपल्या एकट्याच्या शक्तीवर आणि जनतेच्या पाठिंब्यावर आपण कापीत गेलें पाहिजे असें त्यांनीं ठरविलें. मात्र राष्ट्रीय सभा जें राजकारण करीत होती तिला सहाय्य होईल असेंच ते आपलें वर्तन ठेवीत असत. प्रत्येक वर्षी तिच्या अधिवेशनास ते हजर असत. त्याप्रमाणें इ० स० १९१६ च्या डिसेंबर महिन्यांत लखनौ येथें जें अधिवेशन झालें त्यासही ते गेले होते.

लखनौच्या अधिवेशनास श्री. राजकुमार शुक्ल या नांवाचे एक बिहारचे किसान-प्रतिनिधि हजर होते. बाबू ब्रजकिशोर प्रसाद हे बिहार प्रांताचे त्या वेळचे पुढारी असून ते कौन्सिलचे सभासद आणि पाटणा हायकोर्टातील सुप्रसिद्ध वकील होते. त्या वेळीं बिहार प्रांतांत चंपारण्य जिल्ह्यांतील किसानवर्गावर तेथील निळीचे मळेवाले गोरे कारखानदार फार जुलूम करीत आहेत अशी हाकाटी ऐकूं येत होती. चंपारण्य जिल्ह्यांतील शेकडों किसानांप्रमाणें श्री. राजकुमार शुक्ल या किसानावरही या गोऱ्या कारखानदारांचा भयंकर जुलूम झालेला होता. आपलें हें गाऱ्हाणें राष्ट्रीय सभेपुढें मांडून त्याची दाद लावून घ्यावी म्हणून राजकुमार शुक्ल हे बाबू ब्रजकिशोर या आपल्या प्रांताच्या पुढाऱ्याबरोबर लखनौस आले होते. चंपारण्यांतील किसानांच्या गाऱ्हाण्यांबद्दल जो ठराव करण्यांत आला, त्या ठरावावर या किसान-प्रतिनिधीनें भाषण केलें. राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत किसानानें केलेलें भाषण हें बहुधा पहिलेंच असावें. आपल्या ठरावावर महात्मा गांधींनीं बोलावें अशी त्यांची व इतर कांहीं बिहारी प्रतिनिधींची इच्छा होती व तशी त्यांनीं गांधींना विनंतिही केली,

परंतु मीं स्वतः तुमची परिस्थिति पाहिल्यावांचून ठरावावर बोलणार नाहीं असें गांधींनीं त्यांना सांगितलें. त्या वेळीं त्यांनीं चंपारण्यांत जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करण्याचें त्यांना अभिवचन दिलें. इ. स. १९१७ च्या एप्रिल महिन्यांत कलकत्त्यास अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक झाली. तिचें काम संपल्यावर वरील वचनास अनुसरून महात्मा गांधी राजकुमार शुक्ल यांच्याबरोबर पाटण्यास येऊन दाखल झाले. राजकुमार शुक्ल यांनीं गांधींना बाबू राजेंद्र प्रसाद यांच्या घरीं नेलें. राजेंद्रबाबू हे त्या वेळीं पाटणा हायकोर्टाचे एक प्रसिद्ध वकील होते व ब्रजकिशोर प्रसाद यांच्या सहकार्यानें ते कांहीं सार्वजनिक कार्यही करीत असत. ब्रजकिशोर यांच्याबरोबर ते कलकत्त्यास अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या सभेस हजरही होते, पण त्या वेळीं गांधींची व त्यांची ओळखही झालेली नव्हती. राजेंद्रबाबूंच्या घरीं गांधी व राजकुमार शुक्ल हे गेले त्या वेळीं राजेंद्रबाबू जगन्नाथपुरीस गेलेले होते आणि घरांत एका नोकराशिवाय कोणीच नव्हतें. राजकुमार शुक्लांच्या-सारखा एक शेतकरी आणि गांधींच्यासारखा एक साधा मनुष्य आलेला पाहून हे कोणीतरी सामान्य अशिल असावेत असें समजून त्यांचा त्यानें यथातथाच सत्कार केला. नंतर चंपारण्य जिल्ह्याचें मुख्य ठिकाण जें मोतीहारी त्या गांवीं दुसरे दिवशीं गेले. पाटण्याहून ब्रजकिशोर यांच्या निरोपावरून दोन वकील मंडळी गांधींच्याबरोबर राजकुमार शुक्ल यांनीं नेली होती. मोतीहारीस चारपांच दिवस राहून जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या तक्रारी प्रत्यक्ष ऐकून घ्याव्या, नंतर खेड्यांतून हिंडावें आणि मग पुढील बेत ठरवावा, असा गांधींचा हेतु होता. ते मोतीहारीस गेले तेव्हां जवळच्याच गांवांतून एक प्रतिष्ठित गृहस्थ आलेला होता. या गृहस्थाचें घर नीळ-कारखानदारानें लुटून न्यावयास लाविलें होतें. या लुटालुटीचा सर्व पुरावा मिळण्यासारखा होता. ठिकठिकाणच्या किसानांचे असे पुरावे व त्यांचीं गाऱ्हाणीं ऐकून घेऊन सर्व परिस्थिति अवलोकन करणें हेंच मुख्य काम प्रथम करावें लागणार होतें. बरोबरच्या वकिलांना ते त्यासंबंधीं सूचना देत होते. इतक्यांत तिकडे जातांना

वाटेंतच भेटलेल्या डि० मॅजिस्ट्रेटचा हुकूम त्यांना आला कीं, तुम्हीं हा जिल्हा सोडून जावें. तो हुकूम पाळावयाचा नाहीं, असा गांधींनीं तात्काल निर्धार केला. डि० मॅजिस्ट्रेटकडून अलिल्या हुकमांत तुमच्या येथील वास्तव्यामुळें दंगेधोपे होऊन शांततेस धोका बसण्याचा संभव आहे ; म्हणून तुम्हीं हा जिल्हा सोडून ताबडतोब जावें, अशा अर्थाचा मजकूर होता. गांधींनीं त्याला उत्तरीं कळविलें कीं, सार्वजनिक कार्याच्या जबाबदारीचें कर्तव्य लक्षांत घेऊन मी आपणांस असें कळवितों कीं, मी हा हुकूम पाळणार नाहीं आणि त्याबद्दल मला जी शिक्षा होईल, ती भोगण्याची माझी तयारी आहे. यानंतर आतां गांधींना तुरुंगात जावें लागणार हें उघडच झालें. इतक्यांत बाबू राजेंद्र प्रसाद हे तेथें येऊन पोंचले. गांधींची त्यांची प्रथम येथेंच ओळख झाली. गांधींनीं आपल्या बरोबरीच्या वकील मंडळीस प्रश्न केला कीं, मला पकडून नेल्यानंतर तुम्ही काय करणार ? त्यावर त्यांनीं सरळच सांगितलें कीं, आम्ही तुमच्याबरोबर म्हणून येथें आलों. आतां तुम्हांला सरकारनें अटक केली, तर आमचें आतां काम कांहींच नाहीं. आम्ही परत जाऊं. गांधींनीं विचारलें, "मग या किसानांच्या कामाचें काय होणार ?" तेव्हां दुसरे एक वकील थोडा अधिक विचार करून म्हणाले कीं, "मी हें पुरावा जमविण्याचें काम पुढें चालू ठेवीन, पण मलाही जर बंदी करण्यांत आली, तर मी परत जाईन व दुसऱ्या वकिलास पाठवून देईन व त्यानंतर त्यालाही बंदी झाल्यास आणखी कोणी पाठवितां येईल." पण एवढ्यानेंही गांधींचें समाधान होऊं शकलें नाहीं व राजेंद्रबाबूप्रभृति तेथें जमलेल्या स्थानिक लोकांनाही हें कृत्य समाधानकारक वाटेना. गांधींच्यासारखा या ठिकाणास अगदीं अपरिचित मनुष्य येथें येऊन शेतकऱ्यांच्या परिस्थितीची पाहणी करण्याचा आग्रह धरतो, आणि त्यासाठीं तुरुंगांत जाण्यास तयार होतो. आणि आम्ही याच प्रांतांतील पुढारी म्हणविणारे लोक त्याला तुरुंगांत ठेवून आपआपल्या घरीं परत जाणार असें म्हणतों ! ही गोष्ट न रुचून त्यांच्यापैकीं एकानें असें सांगितलें कीं, "आम्हीं तुमच्या

मागून तुरुंगांत जाण्यास तयार आहों." हें ऐकतांच गांधींना समाधान वाटलें व ते एकदम उद्‌गारले, "आतां आपला विजय झालाच!"

यानंतर गांधींनीं आपली कोर्टांत सादर करण्याची जबानी तयार केली आणि तुरुंगांत जाणारांच्या तुकड्या कराव्यात व त्या तुकड्यांचे नायक ठरवावेत अशीही योजना आंखली. त्यांत बाबू राजेंद्र प्रसाद यांनाही एका तुकडीचे नायक ठरविण्यांत आलें होतें. आतां लोकांतील सर्व भय एकदम कोठल्या कोठें पळून गेल्यासारखें भासूं लागलें. इकडे गांधींनीं डि. मॅ. चा हुकूम मोडून सत्याग्रह आरंभिल्याचें वर्तमान सर्व देशभर पसरलें आणि गांधींवरील खटला काढून घ्यावा व त्यांना चौकशीचें काम निर्विघ्नपणें करूं द्यावें असें वरिष्ठ व प्रांतिक सरकार-कडून जिल्हाधिकाऱ्यांस कळविण्यांत आलें. ही बातमी कळतांच जिकडे तिकडे उत्साहाचें भरतें आलें. लोकं भराभर आपलीं गाऱ्हाणीं सांगण्यास पुढें येऊं लागले आणि पुरावा देण्यासही भीतनासे झाले. हें चौकशीचें काम चालू असतांना तेथेंच ग्रामसफाई, शिक्षण, औषधो-पचार अशांसारखीं विधायक लोकसेवेचीं कामें सुरू केलीं पाहिजेत, असें गांधींनीं ठरविलें.

थोड्याच वेळांत चंपारण्यांत निरनिराळ्या प्रांतांतील लोकसेवक स्वयंसेवक बनून पुढें आले. बाबू राजेंद्र प्रसाद हे जसे या वेळीं गांधींच्या राजकारणांत प्रविष्ट झाले, त्याचप्रमाणें आचार्य कृपलानी हेही याच प्रसंगानें गांधींचे अनुयायी बनले. महाराष्ट्रांतील शंकरराव देव, अवंतिकाबाई गोखले, कर्नाटकांतील पुंडलीक कातगडे ही मंडळीही याच वेळीं गांधी-अनुयायांत दाखल झाली. हें चौकशीचें काम बरेंच झाल्या-नंतर बिहार सरकारनें एक चौकशी कमिटी नेमली. तींत एक सरकारचा, एक जमीनदारांचा, एक कारखानदारांचा आणि एक रयतांचा असे चार समासद नेमण्यांत आले. त्यात रयतांचा प्रतिनिधि म्हणून महात्मा गांधींची नेमणूक करण्यांत आली. वर्षअखेरीच्या आंत या कमिटीचा एक रिपोर्ट झाला व त्यांतील सूचना सर्वानुमतें करण्यांत आल्या. सर्वानुमतें सूचना व्हाव्यात असा गांधींचा आग्रह असल्यामुळें त्यांना रयतांच्या बऱ्याच मागण्या फार नेमस्त स्वरूपात कराव्या लागल्या.

या सूचना सर्वानुमतें झाल्यामुळें सरकारला त्या सर्व मान्य कराव्या लागल्या. लगेच "चंपारण्य शेतकरी कायदा" (Champaran Agrarian Act) या नांवाचा कायदा होऊन किसांनांचीं बरींच दुःखें व त्यांच्यावर होणारे बहुतेक जुलूम दूर झाले. या प्रकरणासंबंधीं बाबू राजेंद्र प्रसाद यांनीं पुढीलप्रमाणें आपले विचार मांडले आहेत :—

"कमिशनमध्यें तडजोडीनें जी गोष्ट ठरली ती रयतांच्या मागणीपेक्षां पुष्कळ कमी होती. पण या सर्व आंदोलनाचा परिणाम चंपारण्यामधून नील-कारखानदारांचा धाक नाहींसा होण्यांत झाला. जुलूम करण्याची पूर्वीची शक्ति त्यांच्यांत आतां उरली नाहीं. रयतांत हिम्मत आली आणि जीव आला. आतां निमूटपणें जुलूम सहन करण्यास ते तयार नव्हते आणि जुलूम केल्यावांचून तर चंपारण्याचा कारभार फायदेशीर होऊं शकत नव्हता. तो जुलूम आतां बंद पडला. कारखानदारांना ही गोष्ट लवकरच समजली. तीन-चार वर्षांच्या आंतच त्यांनीं सर्व जमिनी व सर्व कारखाने विकून टाकिले ; जें कांहीं मिळालें तें घेऊन ते चालते झाले. त्यांचीं जमीन रयतांच्या हातीं आली. आतां ते त्या जमिनी पूर्वीप्रमाणें प्रेमानें पिकवूं लागले. जेथें कारखानदारांचे सुंदर बगीचे व बंगले होते तेथें आज रयतांचीं गुरें बांधलीं जात आहेत. त्या सत्तर-पंचाहत्तर कारखान्यांपैकीं एखाददुसरा कारखाना आजही उभा दिसतो. तेथें आतां जुलूम होऊं शकत नाहीं. ज्याचे विषारी दांत पाडून टाकिले आहेत, जो फुसकारूं शकतो पण आतां कोणाला चावूं शकत नाहीं, अशा सापाप्रमाणें ते कारखाने आपले जीवित कंठीत आहेत.

"गांधीजींनीं थोड्याच दिवसांत देशव्यापी स्वरूपांत फार मोठ्या प्रमाणावर जो सत्याग्रह केला, त्याचें तें स्वरूप आम्हांस चंपारण्यामध्यें पाहावयास मिळालें.

"महात्माजींबरोबर आलेले बहुतेक कार्यकर्ते वकिली पेशाचे होते. त्यांच्यापैकीं एकानेंही पेशा सोडून देण्याच्या इराद्यानें हें काम सुरू केलेलें नव्हतें. थोड्याच दिवसांत सुटका होईल, अशा कल्पनेनें आम्हीं गांधीजींबरोबर गेलों. पण तेथें गेल्यावर काम वाढतच चाललें आहे,

असें दिसलें. तें पूर्ण केल्यावांचून तेथून मागें हटणें देखील कठीण होतें. म्हणून दहापांच दिवस काम करण्याच्या उद्देशानें तेथें गेलेले लोक सुमारें दहा महिने तेथें राहिले. काम संपल्यानंतर आम्ही जेव्हां परत आपापल्या गावीं गेलों, तेव्हां बरोबर नवे विचार, नवी स्फूर्ति आणि नवे कार्यक्रम घेऊन गेलों. सर्व प्रांतांत एक नवें जीवन आलें. त्याचा प्रभाव थोड्याच दिवसांत दृष्टीस पडला. आमचे डोळे पुष्कळसे उघडले. जोंपर्यंत आमच्यापैकीं कांहीं लोक आपला सर्व वेळ देशाचें काम करण्यांत वेंचणारे असे कार्यकर्ते बनणार नाहींत, तोंपर्यंत बिहारचें सार्वजनिक जीवन ढिलेंच राहील, हें आतां आम्हांस दिसूं लागलें."

चंपारण्यांतील निळीच्या मळ्यातील शेतकऱ्यांची दाद लावून घेण्याचें हें कार्य संपतें न संपतें तोंच गुजरातेंतील खेडा जिल्ह्यांत दुष्काळ पडला असून सारासूट किंवा तहकुबी न देतां सक्तीनें वसुली करण्याचें सरकारी अधिकाऱ्यांचें धोरण दिसूं लागलें. अहमदाबाद-गुजरातसभेनें हें प्रकरण धसास लावून गरीब शेतकऱ्यांना सूट मिळवून घेण्याचा निर्धार केला. सभेनें शिष्टमंडळ पाठवून कलेक्टरकडे तक्रार केली; पण कलेक्टरनें त्यांच्या मागणीस धुडकावूनच लाविलें. तेव्हां गांधीजींनीं साराबंदी करण्याची चळवळ हातीं घेण्याचें ठरविलें. गांधीजी गुजरातसभेचें अध्यक्ष होते. त्यांनीं नडियाद येथें सर्व पुढारी मंडळी जमविली. त्यांत श्री. वल्लभभाई पटेल, शंकरलाल बँकर, अनसूयाबेन, इंदुलाल याज्ञिक, महादेव देसाई, इत्यादि मंडळी होती. चंपारण्याच्या लढ्यांत जसे बाबू राजेंद्र प्रसाद हे थोर पुढारी गांधींना मिळाले, तसे खेडा जिल्ह्यांतील सारासुटीच्या चळवळींत श्री. वल्लभभाई पटेल हे त्यांना लाभले. आपला मोठा व वाढत्या वकिलीचा धंदा सोडून ते या वेळपासूनच देशकार्यास लागले असें म्हणण्यास हरकत नाहीं. हळूहळू वल्लभभाई हे गुजरातचे 'सरदार' बनले. खेडा जिल्ह्यांतील साराबंदीची चळवळ ही हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारविरुद्ध शेतकऱ्यांनीं केलेली सत्याग्रहाची पहिलीच चळवळ असें म्हणण्यास हरकत नाहीं. १८९६ सालीं पुण्यांतील सार्वजनिक सभेनें लो. टिळकांच्या नेतृत्वाखालीं महाराष्ट्रांत दुष्काळांतील शेतकऱ्यांना सारा न भरण्याचा उपदेश करण्याचा प्रयत्न केला होता. पण सरकारनें

सभच्या प्रचारकांवर खटले भरून तुरुंगाचा रस्ता दाखविल्यावर ही चळवळ थांबली. त्यानंतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोंचलेली दुसरी कोणतीच चळवळ सांगतां येणार नाहीं. त्यांतून हा तर महायुद्धाचा काळ होता. अशा परिस्थितींत शेतकरी लोकांत राजसत्तेला आव्हान देऊन सारा-बंदीची चळवळ करण्याचें धैर्य त्या वेळीं कोणताही पुढारी दाखवूं शकत नव्हता. पण महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं खेडा जिल्ह्यांत ही चळवळ सुरू झाली तेव्हां सर्व हिंदुस्थानचें लक्ष तिकडे खेचलें गेलें.

खेड्यांतील शेतकऱ्यांनीं पुढीलप्रमाणें प्रतिज्ञा केली : "आमच्या गांवचें पीक चार आण्यांहून कमी आलेलें आहे हें आम्हांला माहीत आहे. या कारणास्तव सारावसुली पुढील वर्षापर्यंत तहकूब करण्याबद्दल आम्हीं सरकारकडे अर्ज केला, परंतु तशी तहकुबी मिळाली नाहीं. म्हणून आम्ही खालीं सह्या करणारे प्रतिज्ञा करतों कीं, आम्ही सरकारचा या सालचा वसूल पुरा किंवा जेवंढा राहिला असेल तेवढा भरणार नाहीं. परंतु तो वसूल करण्यासाठीं सरकारला जे कायदेशीर इलाज करावेसे वाटतील ते करूं देऊं व त्यापायीं सोसावीं लागणारीं दुःखें सहन करूं. आमची जमीन खालसा झाली तरीही खालसा होऊं देऊं; पण आपल्या हातानें पैसे भरून खोटे ठरून स्वाभिमानाला मुकणार नाहीं. जर नामदार सरकारनें बाकी येणें असलेल्या सर्व ठिकाणीं हता तहकूब ठेवला तर आमच्यापैकीं ज्यांना सामर्थ्य आहे ते सबंध किंवा बाकी राहिलेली रक्कम भरण्यास तयार आहेत. सामर्थ्य असणारांनींही वसूल न भरण्याचें कारण एवढेंच कीं, जो समर्थ आहे त्यानें पैसे भरले म्हणजे जो असमर्थ आहे तोही घाबरून जाऊन आपली वाटेल ती चीजवस्त विकून किंवा कर्ज करूनही वसूल भरतो आणि दुःखांत पडतो. अशा स्थितींतून गरिबाला वांचविणें हें शक्तिमानाचें कर्तव्य होय, अशी आमची समजूत आहे."

ही चळवळ कांहीं काळ चालली, पण पुढें लोक सरकारच्या दडपशाहीला भिऊं लागले व कांहीं लोक सारा भरूं लागले किंवा जप्त करण्यास माल देऊं लागले. जमीनजप्तीला लोक घाबरूं लागले. तिकडे सरकारही तडजोडीस तयार होऊन नडियाद ताल्क्याच्या मामलेदारानें,

जे समर्थ असतील ते सारा भरतील, तर असमर्थ असणारांना तहकुबी मिळेल असें बोलणें सुरू केलें. कलेक्टरनें सर्वत्र असे हुकूम दिल्यास तडजोड करण्यास आपण तयार आहों असें गांधींनींही कळविलें. कलेक्टरनें लिहिलें कीं, तसे हुकूम आगाऊच सर्वत्र सुटले आहेत. अशा रीतीनें तडजोड झाली. या प्रकरणासंबंधीं गांधी लिहितात, "तरी पण या निकालानें आमचें कोणाचेंच समाधान झालें नाहीं. सत्याग्रह-युद्धाच्या शेवटीं जी गोंडी झाली पाहिजे, ती तेथें नव्हती. कलेक्टरला तर वाटे कीं, आपण नवीन असें कांहींच केलें नाहीं. गरीब लोकांना सूट देण्याची भाषा होती; पण तेही क्वचितच सुटले. गरीब कोण हें ठरविण्याचा अधिकार लोकांना चालविता आला नाहीं. लोकांमध्यें तेवढें त्राण राहिलें नव्हतें याबद्दल मला वाईट वाटत होतें. म्हणूनच लढा संपल्याबद्दल उत्सव करण्यांत आला तरी तो मला वरील कारणास्तव निस्तेज वाटला.

"असें असलें तरी या लढ्याचे जे अप्रत्यक्ष परिणाम झाले त्यांपासून होणारा लाभ तर आजही दिसून येत आहे व घेण्यांत येत आहे. खेडा सत्याग्रहापासूनच गुजरातच्या शेतकरीवर्गाच्या जागृतीला, त्याच्या राजकीय शिक्षणाला सुरवात झाली.

....."शेतकरीवर्गांत सुशिक्षितांचा, स्वयंसेवकांचा खरा प्रवेश या लढ्यापासूनच झाला असें म्हणतां येईल. सेवक पाटीदारांच्या राहणीशीं समरस होऊन गेले. स्वयंसेवकांना आपल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा या लढ्यामध्यें कळून आल्या; त्यांची त्यागशक्ति वाढली. वल्लभभाईंना स्वतःची ओळख या लढ्यामध्येंच पटली. एवढी एकच गोष्ट घेतली तरी तीही कमी महत्त्वाची नव्हती ..... पाटीदारांना स्वतःच्या शक्तीची जाणीव झाली व तिचा कधींच विसर पडला नाहीं. प्रजेच्या मुक्तीचा आधार स्वतः तिच्यावरच आहे, तिच्या त्यागबलावर आहे, ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत आली. गुजरातच्या लोकजीवनांत नवीन तेज संचरलें, नवा उत्साह प्रकटला. खेड्याच्या निमित्तानें गुजरातच्या भूमींत सत्याग्रहानें आपलीं पाळें शिरकविलीं."

खेडा जिल्ह्यांतील सत्याग्रह संपतो तोंच अहमदाबादेंत मजूर आणि गिरणी-मालक यांच्यामध्यें तंटा उपस्थित झाला आणि मजुरांनीं संप करण्याचें ठरविलें. या वेळींही गांधींनीं मजुरांची बाजू घेऊन त्यांना आपला पाठिंबा देण्याचें मान्य केलें. त्यांनीं मजुरांना आपल्या चार अटी सांगितल्या. त्या चार अटी अशा : (१) कांहीं झालें तरी शांतताभंग करावयाचा नाहीं. (२) जे खुषीनें कामावर जाणार असतील, त्यांच्यावर जबरदस्ती करावयाची नाहीं. (३) भिक्षान्न घेऊन निर्वाह करावयाचा नाहीं. (४) संप कितीही लांबला तरी निश्चय ढळूं द्यायचा नाहीं. स्वतःचे पैसे संपले म्हणजे दुसरें काम करून पोट भरावयाचें. हा संप दोन आठवडे उत्तम चालला. पंधरा दिवसांनंतर लोक उतावीळ झाले. उपासमार होऊं लागली तशी संपांत फुटाफूट होऊं लागली आणि कांहीं लोक कामावर गेल्यास त्यांच्यावर अत्याचार होण्याचा धोका निर्माण झाला ; म्हणून मजुरांचा निर्धार टिकून रहावा आणि त्यांनीं कामावर जाऊन किंवा अत्याचार करून आपल्या प्रतिज्ञेचा भंग करूं नये, या उद्देशानें महात्मा गांधींनीं उपवास सुरू केला. हा उपवास १२ मार्च १९१८ रोजीं सुरू झाला. अखेरीस तीन दिवस उपवास झाल्यानंतर मालकांनीं पंच नेमून तंटा मिटविण्याची कबुली दिली व अठराव्या दिवशीं संप मिटला. या वेळेपासून अहमदाबादमध्यें कामगार-संघटनेचा पाया घातला गेला. पुढें त्यांतून गांधींच्या तत्त्वांनुसार चालणारी 'मजूर महाजन' ही कामगार-संघटना अस्तित्वांत आली आणि मालक-मजूर यांचे तंटे पंचायती-मार्फत तोडून घ्यावेत या तत्त्वाला मान्यता मिळाली.

सत्याग्रह, युद्धसहकार्य आणि स्वराज्य

१९१४ सालीं सुरू झालेलें महायुद्ध १९१८ सालच्या नोव्हेंबरात थांबलें, आणि १९१९ च्या जानेवारींत शांतता परिषद भरली. युद्ध सुरू झालें त्या वेळीं महात्मा गांधी इंग्लंडांत होते आणि आपण युद्ध-सहकार्याचें धोरण स्वीकारतों हेंच आपलें कर्तव्य आहे असा निर्णय त्यानीं घेतला हें या प्रकरणाच्या प्रारंभीं सांगितलेंच आहे.

त्यानंतर ते हिंदुस्थानांत आले आणि दोन वर्षें सर्व परिस्थितीचें निरीक्षण करून १९१७ सालापासून त्यांनीं आपल्या सत्याग्रही राजकारणास सुरुवात केली. ही सुरुवात करतांना स्वराज्याचा प्रश्न एकदम हातांत न घेतां चंपारण्य, खेडा जिल्हा मजूर-मालक तंटा असे प्रश्न घेऊन शेतकरी-कामकरी लोकाना सत्याग्रहाचें महत्त्व आणि स्वरूप पटवून द्यावें, असे प्रयत्न त्यांनीं १९१७-१९१८ या काळांत सुरू केले. त्याबरोबरच देशात लो. टिळक व डॉ. बेझंट यांनीं सुरू ठेविलेल्या स्वराज्याच्या चळवळींकडेही त्यांचें लक्ष होतें. आणि गुजरातसभेच्या वतीनें, राष्ट्रसभेच्या स्वराज्याच्या मागणीला लाखों प्रजाजनाचा पाठिंबा आहे, हें दाखविण्यासाठीं जनतेच्या सह्या घेण्याचें कामही त्यांनीं सुरू केलें होतें. स्वराज्याच्या चळवळीशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध असा त्या वेळीं येवढाच होता. पण डॉ. बेझंट यांना अटकेंत ठेवून ती चळवळ बंद पाडण्याचा जेव्हां सरकारनें १९१७ सालीं प्रयत्न चालविला, तेव्हां ही दडपशाही थांबवून डॉ. बेझंट प्रभृति पुढाऱ्यांना सोडवून घेण्यासाठीं सत्याग्रह किंवा प्रत्यक्ष प्रतिकार सुरू करावा, असा खल जेव्हां राष्ट्रीय सभेंत सुरू झाला तेव्हां मात्र गांधी त्यांत लक्ष घालूं लागले. देशांत सत्याग्रहास सुरवात झाली तर त्याला राष्ट्रीय सभेनें मान्यता द्यावी किंवा नाहीं, हा प्रश्न १९१७ सालीं फार जोरांत पुढें आला. गांधींनीं चंपारण्यांत सत्याग्रह केलाच होता, पण ती चळवळ राष्ट्रीय सभेच्या नांवानें केली नव्हती. डॉ. बेझंट प्रभृति स्वराज्याच्या चळवळीचे नेते सरकारनें अटकेंत ठेवले तेव्हां राष्ट्रीय सभेपुढें हा प्रश्न जोरांत आला. या वेळीं मुंबईच्या काँग्रेस कमिटीनें सत्याग्रहास राष्ट्रीय सभेनें मान्यता द्यावी किंवा नाहीं याचा निकाल लावण्यासासाठीं एक कमिटी नेमली होती. तींत गांधी, टिळक व चंदावरकर या तिघांचीं नांवें घालण्यांत आलीं होतीं. टिळकांनीं गांधींच्या नेतृत्वाखालीं सत्याग्रह करण्यास अनुकूलता दर्शविली होती, पण नेमस्त पक्षाचा त्याला विरोध होता. या वेळींच हें सिद्ध झालें कीं, गांधी गोखल्यांचे अनुयायी असें म्हणवीत असले, तरी त्यांनीं सत्याग्रह सुरू केला तर गोखलेपक्ष त्यांतून अंग

काढून घेणार व टिळकपक्ष त्यांना पाठिंबा देणार! स्वतः टिळक हयात होते तोंपर्यंत आणि त्यांच्या मृत्यूनंतर पुढें दहाबारा वर्षें सामान्यतः असाच अनुभव आला! पण या वेळीं दडपशाहीच्या निषेधार्थ सत्याग्रह करण्याची गरजच पडली नाहीं. लवकरच २० ऑगस्ट १९१७ रोजीं मॉंटेग्यूंनीं स्वराज्याचें ध्येय मान्य करण्याची घोषणा केली आणि युद्धोत्तर पहिला हप्ता देण्याचें जाहीर केलें. यासाठीं लवकरच ते हिंदुस्थानांत आले व डॉ. बेझंट यांना बंधमुक्त करण्यात आलें. १९१७ सालीं कलकत्त्याच्या अधिवेशनाच्या अध्यक्ष त्याच होत्या. अशा प्रकारें राष्ट्रसभेला सत्याग्रहासंबंधीं निर्णय घेण्याचा प्रश्न मागें टाकतां आला. तरी या अधिवेशनापासून सुरेंद्रनाथ बानर्जीप्रभृति प्रागतिक, राष्ट्रसभेतून बाहेर पडले. राष्ट्रसभा टिळक, दासप्रभृति राष्ट्रीय पक्षाच्या हातीं गेली आणि गांधी राष्ट्रसभेंत राहूनही आपला सत्याग्रहाचा मार्ग स्वतःच्या हिंमतीवर व स्वतःच्या नांवानें चोखाळत राहिले.

१९१८ सालीं व्हाइसरॉयनें व प्रांतिक गव्हर्नरांनीं युद्धसहकार्याच्या परिषदा भरवून लोकांच्या पुढाऱ्यांना निमंत्रणें दिलीं. गांधींनीं दिल्लीचें निमंत्रण स्वीकारलें, पण टिळक, बेझंटप्रभृति स्वराज्यसंघ-होमरूल लीगवाल्यांना निमंत्रणें दिलीं पाहिजेत असें मत त्यांनीं प्रगट केलें. तसेंच व्हाइसरॉयनीं आपल्या भाषणांत या आपत्कालीं सर्व मतभेद मिटवून लोकांनीं फक्त युद्धसहकार्य करावें असा युक्तिवाद केला. त्यास अनुलक्षून महात्मा गांधींनीं त्यांना एकंदर परिस्थितीसंबंधीं एक पत्र लिहिलें व त्यांत सर्व विषय सविस्तर मांडले. हें पत्र त्यांनीं प्रसिद्ध केलें. त्यांत पुढील विचार होते :—

"माझ्या म्हणण्याप्रमाणें सर्व चालतें, तर मीं असल्या वेळीं होमरूल वगैरेचा उच्चारही केला नसता, तर साम्राज्याच्या संकटकालीं त्याच्या संरक्षणार्थ सर्व सशक्त हिंदी लोकांना मुकाट्यानेंच आत्मबलिदान करण्याची प्रेरणा दिली असती. असें केल्यानें आम्ही साम्राज्याचे सर्वांत श्रेष्ठ व आदरणीय भागीदार बनूं शकूं, व जात, वर्ण, देश, इत्यादि भेद पुसून टाकूं. पण सुशिक्षित वर्गानें याहून कमी परिणाम-

कारक असा मार्ग स्वीकारला आहे. जनसमाजामध्यें त्याचें वजन मोठें आहे. मीं हिंदुस्थानांत पाऊल टाकलें, तेव्हापासूनच सामान्य लोकांशीं माझा निकट संबंध येत गेला आहे आणि मी आपल्याला कळवूं इच्छितों कीं, होमरूलची उत्कंठा त्यांच्यामध्येंही शिरली आहे. होमरूलखेरीज लोकांचें कधींही समाधान व्हावयाचें नाहीं; होमरूल मिळविण्यासाठीं सहन करावे तेवढे कष्ट थोडेच आहेत, हेंही त्यांना समजतें...आमच्या मदतीचा पाया भविष्यकालासंबंधींच्या आशांवर रचिलेला आहे व ही आशा कोणती हें जरा विशेष स्पष्ट करून सांगणें अवश्य आहे. मला सौदा करायचा नाहीं, तरी पण मला येवढें सांगितलें पाहिजे कीं, त्या आशेची निराशा झाली, तर साम्राज्यासंबंधींची आजवरची आमची समजूत भ्रामक होती असें ठरेल.

"घरगुती झगडे विसरून जा, असें आपण सुचविलें; त्याचा अर्थ जर असा असेल कीं, जुलूम व अमलदारांचीं अपकृत्यें सहन करा, तर तें होण्यासारखें नाहीं. सरकारच्या संघटित जुलमाविरुद्ध, सर्व शक्तीनिशीं लढणें, हा मी आपला धर्म समजतों. म्हणून, आपणच अमलदारांना सुचवावें कीं, त्यांनीं एकाही जीवाची अवहेलना करूं नये व लोकमताला पूर्वी कधीं दिला नसेल इतका मान द्यावा,..... मी असें समजतों कीं, चंपारण्य व खेडा येथें मीं जें काम केलें ती माझी युद्धाच्या कामाला मदतच झाली आहे. अशा तऱ्हेचें माझें काम बंद ठेवायला जर आपण मला सांगत असाल, तर त्याचा अर्थ मला आपला श्वास कोंडून धरायला आपण सांगतां, असाच मीं समजेन. शस्त्रबळाऐवजीं आत्मबळाला किंवा प्रेमबळाला लोकप्रिय करण्याच्या माझ्या प्रयत्नांत जर यश आलें तर, माझी खात्री आहे कीं, हिंदुस्थानवर, सबंध जगानें डोळे वटारले तरी त्याच्याशीं तो सामना करूं शकेल, म्हणून आत्मक्लेश सहन करण्याची ही सनातन-नीति माझ्या जीवनांत बिंबविण्यासाठीं मी स्वतःला नित्य घडे देत राहीन व या नीतीचा अवलंब करण्याचाही उपदेश करीत राहीन.

"शेवटीं मला आपल्याला विनंति करावयाची कीं, मुसलमानी राज्य-संबंधीं स्पष्ट आश्वासन देण्यास आपण ब्रिटिश प्रधानमंडळाला सुचवावें.

.....या मुसलमानी राज्याच्या हक्कांना धक्का न लावण्यानें, त्यांच्या धर्मस्थानांसंबंधींच्या भावना न दुखविण्यानें आणि हिंदुस्थानची होमरूलची मागणी मान्य करण्यानेंच साम्राज्याचेंही संरक्षण होणार आहे. हें पत्र मीं याच्यासाठीं लिहिलें आहे कीं, मी इंग्रजांचा चहाता आहें. आणि ज्या प्रकारची राजनिष्ठा इंग्लिश मनुष्याच्या अंतःकरणात वसत असतें, तशीच राजनिष्ठा हिंदी मनुष्याच्या अंतःकरणांतही निर्माण करावी अशी माझी इच्छा आहे."

दिल्लीची युद्धपरिषद इ. सन १९१८ च्या मे महिन्यांत भरली होती. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं हें पत्र लिहिलें आहे. या वेळीं ब्रिटिश साम्राज्य फार अडचणींत होतें आणि म्हणूनच लोकनेत्यांना बोलावून युद्धसहाय्य करण्याची याचना करण्यांत आली होती. युद्ध सुरू झालें त्या वेळीं बिनशर्त युद्धसहकार्य द्यावें अशी महात्मा गांधींची वृत्ति होती. तरी ही आपली वृत्ति आज एकंदर देशाची वृत्ति नाहीं आणि युद्ध संपतांच स्वराज्य मिळण्याचें आश्वासन आपणांस मिळावें अशा शर्तींवरच देशाचें खरें युद्धसहकार्य मिळूं शकेल अशी आज वस्तुस्थिति आहे, हें वरील पत्रांत त्यांनीं अप्रत्यक्षपणें व्हाइसरॉयला कळविलें आहे. सौदा करण्याच्या वृत्तीनें नसल तरी प्रभावी सहकार्य करण्याच्या दृष्टीनें लोकांना युद्धोत्तर स्वराज्याचें निश्चित आश्वासन मिळालें पाहिजे, असें जे टिळक म्हणत असत त्यासारखीच ही दृष्टि आहे. मात्र दोघांच्या स्वभावांतील भेदामुळें त्या शब्दयोजनेंतही फरक पडलेला आहे. वृत्तिभेद व तत्त्वभेद असूनही राजकीय व्यवहारांत एकाच धोरणावर येऊन अनेकांना एकमेकांशीं सहकार्य करावें लागतें याचेंच हें एक उदाहरण आहे. असें सहकार्य केल्यावांचून कोणताहीं राजकीय व्यवहार घडूंच शकत नाहीं. वृत्तिभेद व तत्त्वभेद असूनही राजकीय व्यवहारात आपलें असें सहकार्य होऊं शकेल, याची जाणीव टिळकांना व गांधींना होती.

या पत्रांतील दुसरा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. तो म्हणजे युद्धकाळात सहकार्य देण्याला भावी स्वराज्याचें आश्वासन अशी अट

घालण्यास जरी महात्मा गांधी तयार नव्हते, तरीही सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलमाविरुद्ध लोकांना सत्याग्रहानें प्रतिकार करण्याची शिकवण देण्याचा आपला हक्क किंवा कर्तव्य अशा बिकट प्रसंगींही स्थगित करण्यास गांधी मुळींच तयार नव्हते, व तसें त्यांनीं या पत्रानें व्हाइसरॉयना स्पष्टपणें कळविलें होतें. लोकांवर जुल्म होऊं नये, जुल्म झाल्यास त्यांनीं प्रतिकार करावा, आणि पूर्वी कधींही मिळाला नाहीं इतका लोकमताला मान देऊन सरकारनें आपला राज्यकारभार युद्धकालांत चालविलाच पाहिजे असा गांधींचा आग्रह आहे. वस्तुतः खरें लोकराज्य निर्माण करण्याची शक्ति या आग्रहाच्या रूपानेंच गांधी पहिल्या महायुद्धांत निर्माण करीत होते, असें म्हणतां येईल. भावी स्वराज्याचें पोकळ आश्वासन मिळविण्यापेक्षां जनतेमध्यें आत्मबलाची ही शक्ति वाढविणें हाच गांधींचा भावी स्वराज्याच्या प्राप्तीचा या वेळचा मार्ग होता. टिळक व काँग्रेस त्या वेळीं जें राजकारण करीत होते, त्याहून अधिक खोल आणि प्रभावी असें हें एक नवेंच राजकारण होतें. आणि ती नवी शक्ति टिळकांच्या प्रत्ययास आलेली होती.

यानंतर या पत्रांतील तिसरा मुद्दा म्हणजे, मुसलमानी राज्यासंबंधींचा होय. आशिया खंडांतील हिंदुस्थानच्या पश्चिमेकडील प्रदेशांत युरोप खंडापर्यंत मुसलमानी राज्यें पसरलेलीं आहेत. त्या वेळीं तुर्कांचें साम्राज्य युरोपांतही कांहीं भागावर होतें. हें तुर्की साम्राज्य इंग्रजांविरुद्ध त्या वेळीं जर्मनीच्या बाजूनें लढत होतें. तुर्कस्तानचा खलिफा हा सर्व मुसलमानांचा धर्मगुरु असल्यानें हिंदुस्थानांतील मुसलमान लोक इंग्रजांच्या बाजूनें लढणार नाहींत अशी भीति ब्रिटिश मुत्सद्यांना वाटत होती. म्हणून आमचा युद्धांत विजय झाला तरी आम्ही तुर्की साम्राज्याला नष्ट करणार नाहीं आणि मुसलमानांचीं धर्मस्थानें असलेल्या प्रदेशावर ख्रिस्ती लोकांचें राज्य करणार नाहीं अशीं आश्वासनें ब्रिटिश मुत्सद्दी कावेबाजपणानें भरमसाट पण संदिग्ध शब्दांत देत असत. हीं आश्वासनें पाळलीं जाणार नाहींत अशी भावना मुसलमान जनतेंत पसरत होती. ही भावनाच पुढें करून महात्मा गांधी व्हाइसरॉयना लिहितात कीं, या-

संबंधीं ब्रिटिश पंतप्रधानांनीं निःसंदिग्ध आश्वासन दिलें पाहिजे. अशा रीतीनें या पत्रांत स्वराज्य, खिलाफत, सत्याग्रह आणि युद्धसहकार्य या चार मुद्यांचा स्पष्ट उल्लेख आला असून त्यासंबंधींची महात्मा गांधींची तात्त्विक भूमिका विशद करण्यात आलेली आहे.

युद्ध-समाप्ति आणि राष्ट्रव्यापी सत्याग्रह

इसवी सन १९१८ च्या नोव्हेंबर ११ या तारखेस जर्मनीचा पाडाव होऊन युद्ध समाप्त झालें. आणि इ. स. १९१९ च्या जानेवारींत, युरोपांत फ्रान्समध्यें व्हर्साय शहरीं शांतता परिषद सुरू झाली. या वेळीं राष्ट्रीय सभेनें लोकमान्य टिळक आणि डॉ. बेझंट यांच्या नेतृत्वाखालीं एक शिष्टमंडळ विलायतेस स्वराज्याची मागणी करण्यासाठीं पाठविलें होतें. हे पुढारी तिकडे स्वराज्याच्या शिष्टाईत गुंतले असतांना हिंदुस्थान सरकार हिंदुस्थानांत प्रचंड दडपशाही करण्याची पूर्वतयारी करीत होतें. रौलॅट कायदे या नांवानें प्रसिद्ध असलेले दोन दडपशाहीचे कायदे हिंदुस्थान सरकारनें कायदेमंडळापुढें आणलेले होते. कायदेमंडळांत त्या वेळीं सरकारचें हुकमी बहुमत असल्यानें लोकप्रतिनिधींच्या विरोधाला न जुमानतां, हे कायदे सरकार पास करून घेणार याबद्दल शंकाच नव्हती. २८ फेब्रुवारी सन १९१९ या तारखेस या कायद्यांविरुद्ध एक राष्ट्रव्यापी सत्याग्रहाची मोहीम करण्याचें महात्मा गांधींनीं ठरविलें; आणि एक सत्याग्रह-समिति स्थापून ते सत्याग्रहाची मोहीम सुरू करण्याच्या उद्योगास लागले. या सत्याग्रहास मार्चअखेरपासून सुरवात व्हावयाची होती. आणि त्यासाठीं सत्याग्रह करूं इच्छिणाऱ्या लोकांची यादी करण्यास गांधींनीं सुरुवात केली. या वेळीं लो. टिळक विलायतेंत होते. तेव्हां आपण या सत्याग्रहांत भाग घ्यावा किंवा नाहीं असा प्रश्न त्यांच्या येथील अनुयायांपुढें उभा राहिला. मुंबईचे डॉ. डी. डी. साठे हे टिळकांचे अनुयायी म्हणून त्या वेळीं मुंबईत प्रसिद्ध होते. त्यांनीं या प्रसंगाची एक आठवण 'चित्रमय जगत्' च्या मार्च १९४८ च्या अंकांत प्रसिद्ध केली आहे. ते म्हणतात, "टिळकांच्या अनुयायांपैकीं

या सत्याग्रहांत सही देणारा मी एकटाच होतों. प्रथम पुष्कळांनीं सह्या दिलेल्या होत्या. पण सह्या करणाऱ्या प्रत्येक इसमानें उद्यां संध्याकाळीं सत्याग्रह करून तुरुंगांत जाण्यास तयार असलें पाहिजे, असें जेव्हां गांधींनीं सांगितलें तेव्हां सही दिलेल्या अनेकांनीं आपली तुरुंगांत जाण्याची तयारी नाहीं म्हणून आपलीं नांवें परत घेतलीं." ही गोष्ट डॉ. साठे यांनीं टिळकांना पत्राद्वारें कळविली. तेव्हां टिळकांचें त्याबाबत उत्तर आलें कीं, आज गांधी हे एकटेच असे गृहस्थ आहेत कीं, ते कांहींतरी करूं शकतील आणि म्हणून तुम्हीं त्यांना शक्य तें सहाय्य केलें पाहिजे. पुन्हा ता. १५ मे १९१९ च्या दुसऱ्या पत्रांत टिळकांनीं लिहिलें, "मीं पूर्वी तुम्हांस लिहिलेंच आहे कीं, आपण गांधींना पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे." यानंतर या सत्याग्रह चळवळीचें काय झालें तें पुढील प्रकरणांत सांगण्यांत येईल. येथें येवढेंच सांगितलें म्हणजे पुरें कीं, लो० टिळक विलायतेंतून परत आल्यानंतर मुंबईत त्यांच्या सत्काराची जी पहिलीच सभा झाली त्या वेळीं त्यांनीं असें जाहीरपणें सांगितलें कीं, "गांधींनीं सत्याग्रह केला तेव्हां त्यांत भाग घ्यावयास मी या देशांत नव्हतों याबद्दल मला वाईट वाटतें."

रौलॅट ॲक्ट नांवाच्या काळ्या कायद्याविरुद्ध जी सत्याग्रहाची चळवळ महात्मा गांधींनीं सुरू केली, त्या चळवळीनंतर महात्मा गांधी हे राष्ट्रसभेचे नेते बनले असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. त्या वेळीं लो० टिळक आणि डॉ. बेझंट यांच्याकडेच एकंदर जनता व सुशिक्षित देशभक्त राजकीय नेते या दृष्टीनें पहात होते. १९१७-१८ सालीं जुन्या प्रागतिक पुढाऱ्यांनीं राष्ट्रसभा सोडून जाण्यास प्रारंभ केलाच होता. लो० टिळक व डॉ. बेझंट विलायतेस स्वराज्य-शिष्टाई करण्यास गेले होते, तरी त्या शिष्टाईतून विशेष कांहीं निष्पन्न होणार नाहीं हें विचारी लोकांना दिसूं लागलें होतें. इकडे हिंदुस्थान सरकारनें स्वराज्याबाबत निराश झालेले लोक क्रांतिकारक प्रयत्न करतील तर त्यांना दडपून टाकण्याची तयारी या काळ्या कायद्याच्या रूपानें चालू ठेविली होती. अशा परिस्थितींत कायद्यांतील चळवळीचें जुनें राजकारण संपत आलें

होतें व सरकार मॉंटेग्यू सुधारणांच्या रूपानें जें देईल, तें घेऊन स्वस्थ बसण्याचा नामुष्कीचा प्रसंग जुन्या धोरणाच्या पुढाऱ्यांवर आला होता. म्हणूनच आतां नवें सत्याग्रही राजकारण करण्यावांचून देशाला गत्यंतर नाहीं हें टिळकांनीं ओळखिलें होतें व त्याच दृष्टीनें त्यांनीं डॉ. साळ्वे यांना लिहिलें कीं, "Gandhi is the only man who can do something and you must help him as much as you can."

"I have already written you before that we should fully support Mr. Gandhi."

ता. ३० मार्च १९१९ रोजीं सर्व हिंदुस्थानांत हरताळ पाडावा, चोवीस तास उपवास करावा आणि सायंकाळीं सभा करून रौलॅट कायद्याचा निषेध करावा असा प्राथमिक आदेश महात्मा गांधींनीं दिला. त्या वेळीं ते मद्रास प्रांतांत होते. चक्रवर्ती राजगोपालाचार्य हे नवे अनुयायी त्यांना मिळाले होते. याच सुमारास पंडित मोतीलाल नेहरू आणि पंडित जवाहरलाल नेहरू हे पितापुत्र गांधींच्याकडे आकर्षिले जात होते. पंजाबांतिल स्वामी श्रद्धानंद आणि कराचीचे जयरामदास दौलतराम हेही याच वेळीं गांधींच्याकडे नेतृत्वाच्या दृष्टीनें पाहूं लागले होते. गांधींनीं ता. ३० मार्च हा हरताळाचा दिवस बदलून ६ एप्रिल हा जाहीर केला, तरीही दिल्लीला ता. ३० रोजींच हरताळ व निदर्शनें झालीं आणि ता. ५ एप्रिल रोजीं सर्व देशभर एक प्रचंड वादळ उठावें तसें उठलें. सरकारनें बेकायदा ठरविलेलीं "हिंद स्वराज्य" व "सर्वोदय" हीं आपलीं पुस्तकें छापून व वांटून गांधींनीं सत्याग्रहास सुरुवात केली.

ही बातमी सर्व देशभर पडलेल्या कडकडीत हरताळानें सर्वत्र फैलावली. अमृतसर, दिल्ली इकडे खळबळ व आंदोलन यांचें प्रचंड वादळ उठलें आणि ती परिस्थिति पाहण्यासाठीं गांधी स्वतः पंजाबकडे जाण्यास निघाले. त्यांना पंजाबांत जाण्याची बंदी करणारा हुकूम कोसी स्टेशनवर बजावण्यांत आला. तो हुकूम त्यांनीं मानिला नाहीं.

तेव्हां त्यांना अटक करून परत मुंबईस आणून सोडण्यांत आलें. तों-पर्यंत गुजरात, मुंबई इकडे दंगे व अत्याचार सुरू झाले होते. सर्व पंजाब पेटला होता आणि अमृतसर, गुजराणवाला इकडे लष्करी कायदा पुकारण्यांत आला. जालियनवाला बागेंत पंधरावीस हजार लोकांची सभा भरली असतां, ज. डायर नांवाच्या नरराक्षसानें मशीन गन्स् लावून हजारों लोकांना घायाळ केलें. आणि शेंकडों स्त्री-पुरुषांना यम-सदनास पाठविलें. जनता खवळून गेली आणि सरकार माथेफिरू बनलें. तेव्हां महात्मा गांधींनीं सत्याग्रह बेमुदत तहकूब करण्याचा आदेश ता. १८ एप्रिल रोजीं दिला आणि देशभर उठलेलें वादळ तात्पुरतें शांत करून पंजाबात झालेल्या राक्षसी हत्याकांडाची चौकशी करण्याचें काम केल्यावांचून पुढें पाऊल टाकावयाचें नाहीं असें ठरविलें. अशा प्रकारें अमृतसरला जालियनवाला बाग तेथें ता. १३ एप्रिल रोजीं ज. डायरनें केलेलें राक्षसी हत्याकांड आणि ता. ६ एप्रिलपासून सुरू झालेल्या पहिल्या राष्ट्रव्यापी सत्याग्रहानें उठलेलें आंदोलनाचें प्रचंड वादळ यांमुळें हिंदी राजकारणांत एक नवें युग सुरू झालें. हिंदी प्रजेनें १९१९ एप्रिल ६ रोजीं ब्रिटिशांच्या सैतानी कायद्याच्या अमलाविरुद्ध पहिलें उघड बंड सर्व देशभर हरताळ पाडून, उपोषण करून व सभा भरवून जाहीर केलें आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वाला मान्यता देऊन सत्याग्रहाच्या मार्गानें आम्ही तुमच्या मागून येऊं, अशी प्रतिज्ञा केली. ता. ६ एप्रिल ते ता. १३ एप्रिल हा काळ या वेळपासून राष्ट्रीय सप्ताह म्हणून पाळण्यांत येऊं लागला आणि ता. १३ एप्रिल हा, जालियनवाला बागेंत ज्या हिंदुमुसल्मानांनीं ज. डायरच्या मशीन गन्सना बळी पडून प्राण सोडिले, त्यांच्या पुण्यस्मृतीचा पवित्र दिन म्हणून साजरा करण्यांत येऊं लागला.

अशा प्रकारें हिंदी जनतेनें महात्मा गांधींचें नेतृत्व आणि सत्या-ग्रहाची निष्ठा यांना मान्यता दिली. पण महात्मा गांधी व सत्याग्रह यांचें स्वरूप तिला त्या वेळीं मुळींच समजलें नव्हतें आणि आजही त्यांची पूर्ण ओळख तिला झाली आहे, असें म्हणतां येणार

नाहीं. पण जनतेला ओळख झाली असो किंवा नसो, लहान मुलांचें जितकें गाढ प्रेम आपल्या मातेवर असतें तितकेंच, किंबहुना त्याहूनही गाढ प्रेम या वेळेपासून हिंदी जनतेचें महात्मा गांधींवर बसलें. ब्रिटिशांची सत्ता केवढीही प्रचंड व प्रबल भासली, तरी ती राक्षसी व सैतानी आहे आणि गांधींच्या रूपानें या राक्षसी सत्तेचा अंत करणारा राम आपणांस पुनः भेटला आहे, अशी भावना हिंदी जनतेची होऊं लागली. जनता त्यांच्यामागून जाऊं लागली आणि जनतेवर असणारें ब्रिटिशांचें राज्य हळूहळू मावळूं लागलें आणि गांधींचें राज्य स्थापन होऊं लागलें. यापुढें गांधींचें चरित्र म्हणजे हिंदी जनतेनें ब्रिटिश सत्तेविरुद्ध झगडून त्यांचें साम्राज्य नष्ट कसें केलें व आपलें स्वराज्य कसें संपादन केलें, त्याचा इतिहास असें म्हटल्यास फारसें चूक होणार नाहीं. पण गांधींच्या मागून गेल्यास ब्रिटिशांचें राक्षसी साम्राज्य नष्ट होईल, ही भावना सफल झाली असली व आपणांस अपेक्षेप्रमाणें स्वराज्य मिळालें असलें, तरी "तें स्वराज्य हें रामराज्य आहे काय? रामराज्य म्हणजे काय? व तें कोठें आहे? हें रामराज्य तुमच्या अंतःकरणांतच आहे. तुमचा अंतरात्मा हाच राम, तोच परमात्मा, तेंच परब्रह्म, तोच अल्ला आणि सत्याग्रह हाच त्या रामराज्याचा मार्ग!" हे गांधींचे शब्द अद्यापिही खरेच आहेत, असा ध्वनि अद्यापही जनतेच्या अंतःकरणांतून उमटत आहे व तो तसाच पुढेंही उमटत राहील, पण गांधींच्या तोंडचे शब्द मात्र आत आपणांस ऐकूं येणार नाहींत!

नि सं. नं. ८६८ स्थळ प्रत

: : ६ : :

राष्ट्रसभेचें नेतृत्व आणि सत्याग्रही स्वातंत्र्ययुद्ध

(पूर्वार्ध)

" Some friends have argued, ' your Satyagraha movement only accentuates the fear we have of the onrush of Bolshevism '. The fact, however, is that, if anything can possibly prevent this calamity descending upon our Country, it is Satyagraha. "

Mahatma Gandhi :
Satyagraha Day in Madras.
[30th March 1919].

प्रकरणाच्या आरंभीं जो उतारा दिला आहे, तो महात्मा गांधींनीं ता. ३० मार्च १९१९ रोजीं मद्रास येथें रौलॅट कायद्याविरुद्ध सत्याग्रह करण्याची योजना समजावून देण्यासाठीं जी जाहीर सभा भरली होती तिला पाठविलेल्या लेखी संदेशांतील आहे. त्यांत ते लिहितात, " कांहीं मित्र मला सागतात कीं, आपल्या देशांत बोल्शेविझमचा लोंढा येण्याचा जो धोका निर्माण होत आहे, तो धोका तुमच्या या सत्याग्रहामुळें अधिकच वाढणार आहे. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, हें अरिष्ट आपल्या देशावर ओढविण्याचा धोका थांबविण्याचें सामर्थ्य जर कशांत असेल, तर तें फक्त सत्याग्रहांतच आहे. "

या वेळीं रशियांत बोल्शेविक क्रांति होऊन वर्ष दीड वर्षही झालें नव्हतें. अशा परिस्थितींत या देशांत बोल्शेविक क्रांति घडूं नये यावर एकच एक उपाय सत्याग्रह हाच आहे असें गांधींनीं म्हणावें, यांतील रहस्य काय असावें? तें रहस्य त्यांनीं पुढीलप्रमाणें विशद केलें आहे: 'आधुनिक भौतिक संस्कृतीचा बोल्शेविझम हा एक अपरिहार्य परिणाम आहे. सत्याग्रह हा एक या भौतिक संस्कृतीविरुद्ध झगडण्याचा मार्ग असल्यानें व त्यांतून आध्यात्मिक संस्कृतीचा उदय होईल अशी आपली निष्ठा असल्यानें आपलें हें मत तर्कसिद्ध आहे,' असें म्हणण्याचा त्यांचा आशय आहे. देहाहून आत्मा श्रेष्ठ आहे; भौतिक सुखाहून आत्मिक सुख श्रेष्ठ आहे; पाशवी शस्त्रबलाहून आत्मबल श्रेष्ठ आहे; या निष्ठेवर सत्याग्रहाची उभारणी झालेली आहे; देह, भौतिक सुखें आणि शस्त्रबल यांना आधुनिक संस्कृतीनें प्राधान्य दिलें आहे. त्यामुळें रक्तपाती वर्गयुद्धें आणि सशस्त्र क्रांत्या निर्माण होतात व भौतिक संस्कृतीचींच तीं फळें आहेत. हीं फळें नको असतील तर आपण या आधुनिक भौतिक संस्कृतींतच क्रांति केली पाहिजे असा यांचा दृढविश्वास होता. ही क्रांति करण्याचे दोन मार्ग त्यांना दिसत होते. पहिला शस्त्रबलाचा आणि दुसरा आत्मबलाचा. आपण जर विचारपूर्वक व निष्ठावंत भावानें दुसऱ्याचा स्वीकार केला नाहीं तर पहिला मार्ग अटळच आहे व त्या मार्गानें राष्ट्र जाऊं नये म्हणून कोणीं कितीही प्रयत्न केले, तरी ते सफल होणार नाहींत असें त्यांनीं या शब्दांनीं सूचित केलें आहे. आपण आज जरी केवळ रौलॅट कायद्याविरुद्ध सत्याग्रह पुकारीत असलों तरी ही एक राष्ट्रीय जीवनांत क्रांति आहे आणि या राष्ट्रीय क्रांतींत यश आल्यास सर्व जगाला मानव-संस्कृतींत क्रांति करण्याचा एक नवा मार्ग लाभेल अशी त्यांना आशा होती. देहाहून आत्मा श्रेष्ठ, भौतिक सुखाहून आत्मिक आनंदाचे मोल मोठें आणि शस्त्रबलाहून आत्मबलाचा प्रभाव अधिक, ही निष्ठा सत्याग्रहाच्या रूपानें गांधी भारतवर्षांत निर्माण करीत होते. आपण कांहीं हा संदेश नव्यानें व प्रथमच भारताला देत आहों असें ते मानीत नव्हते. सत्याचा व अहिंसेचा

ज्ञानाचा व प्रेमाचा जो सनातन मानवधर्म प्राचीन भारतानें शोधून काढिला होता, तोच मानवधर्म आपण सत्याग्रहाच्या नांवानें भारताला पुनः उपदेशीत आहों असें त्यांना वाटत होतें.

हा प्राचीन सिद्धान्त सर्वच देशांतील धर्मपुरुषांनीं उपदेशिलेला आहे. सर्व धर्मांचा आधार व उद्देश हाच आहे. मात्र आधुनिक युरोपांत उदय पावलेल्या आधुनिक संस्कृतीनें हा सिद्धान्त धुडकावून लाविला आहे. भारतावरही या आधुनिक संस्कृतीनें आक्रमण केलें आहे आणि सुशिक्षित शहरवासीयांना या संस्कृतीचा मोह पडलेला आहे. ब्रिटिशांच्या शस्त्रबलाची त्यांना दहशत वाटते. त्यांच्या मालाचा त्यांना मोह पडतो. त्यांच्या कायद्याच्या राज्याला ते साहाय्य करतात. त्यांचे विचार व त्यांचीं मतें हींच त्यांना शिक्षणाची कमाल वाटते. या कायद्याचे पाश खेड्यांपर्यंत पोहोंचविणारीं कोर्टें, त्यांत धंदा करून गबर होणारे वकील, त्यांचा माल खेड्यांत नेऊन विकणारे व्यापारी आणि त्याची मोठ्या प्रमाणावर नेआण करणाऱ्या आगगाड्या, परदेशी औषधांचा खप करून त्यांवर धन कमावणारे डॉक्टर आणि युरोपीय संस्कृतीचे पोवाडे गाणारे, शिक्षण देणारे शिक्षक व प्राध्यापक हे सर्व भारताला युरोपीय भौतिक संस्कृतीचे दास करणारे दलाल आहेत, अशी त्यांची दृष्टि होती. तथापि, अद्यापि खेड्यांत, विशेषतः आगगाड्यांपासून दूर असणाऱ्या खेड्यांत, भारताची आध्यात्मिक संस्कृति टिकाव धरून आहे. या सात लाख खेड्यांत जर आपला सत्याग्रहाचा संदेश पोहोंचविला, तर भारतीय संस्कृति पुनः नव्या तेजानें झळकूं लागेल आणि युरोपीय संस्कृतीच्या पाशांतून आपली मुक्तता करून घेईल असें गांधींना वाटे. या सात लाख खेड्यांत सत्याग्रहाचा संदेश फैलावणारे सत्याग्रही क्रांतिकारक येथें रामराज्य निर्माण करूं शकतील, ही त्यांची श्रद्धा होती. त्यांची ही भाषा आधुनिक सुशिक्षितांच्या बुद्धीला प्रथम प्रथम पटली नाहीं, तरी त्यांनीं निर्माण केलेली शक्ति प्रभावी होत असल्याचें त्यांना दिसत होतें आणि सामान्य, अज्ञानी, दरिद्री व दीन गणलेल्या शेतकऱ्यांतही ती एक नवचैतन्य निर्माण करूं लागली. तसेंच देशांतील सर्व क्रांतिकारक

तरुण त्यांच्या झेंड्याखालीं जमूं लागले आणि त्यांच्या अंतःकरणांतील क्रांतिनिष्ठा खेड्यापाड्यांतही फैलावूं लागली.

असहकारितेचा जन्म आणि वाढ

इ. स. १९२० च्या सप्टेंबर महिन्यांत राष्ट्रसभेनें महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं अनत्याचारी असहकारितेचें धोरण स्वीकारिलें आणि तिच्या आंतर-बाह्य स्वरूपांत एक क्रांति घडून आली. ही असहकाराची चळवळ राष्ट्रसभेची मान्यता मिळण्यापूर्वीच ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं महात्मा गांधींनीं सुरू केली होती. या गोष्टी सर्वांना माहीत आहेत. पण १ ऑगस्ट १९२० रोजीं प्रकट झालेल्या असहकाराच्या क्रांतिकारक आंदोलनाचा आद्य संकल्प २४ नोव्हेंबर १९१९ रोजीं दिल्ली येथें भरलेल्या एका खिलाफत-प्रकरणासंबंधींच्या सभेंत गांधींनीं केला होता. डिसेंबर महिन्यांत अमृतसर येथें १९१९ चें राष्ट्रसभेचें अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार होतें. त्याच्याआधीं महिनाभर ही सभा दिल्लीस भरलेली होती. या सभेस स्वामी श्रद्धानंदही हजर होते आणि खिलाफत-प्रकरणांत मुसलमान समाजाचा विश्वासघात ब्रिटिशांनीं केला, तर ब्रिटिशांविरुद्ध कसा लढा करावा, या विषयाचा विचार हिंदु व मुसलमान पुढाऱ्यांनीं करावा असा या सभेचा उद्देश होता. मौलाना हजरत मोहानी यांनीं सर्व ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावा असा ठराव आणिला होता. महात्मा गांधी विरुद्ध होते. केवळ ब्रिटिश कापडावर बहिष्कार घालण्याचें धोरण त्यांना मान्य होतें. कारण कापडाच्या बाबतींत स्वदेशीव्रताचीच ती एक दुसरी बाजू होती. पण सर्वच ब्रिटिश मालावर बहिष्कार घालणें अव्यवहार्य असून ब्रिटिशांऐवजीं इतराचा परदेशी माल घेणें हें द्वेषमूलक आहे व तें अहिंसेंत बसत नाहीं म्हणून तें गांधींना मान्य नव्हतें. तेव्हां बहिष्कार मान्य नसेल, तर सरकारला नमविण्यास तुम्ही दुसरा कोणता उपाय सुचवितां असा सवाल त्यांना साहजिकच करण्यांत आला व त्या सवालास जबाब या दृष्टीनें, जें सरकार प्रजेच्या इच्छेनुसार वागत नाहीं व तिला दिलेलें वचन

मोडतें, त्याच्याशीं संघटित असहकार करून आपल्या इच्छेस मान द्यावयास लावणें हा हक्क प्रजेस आहे, किंबहुना तें तिचें कर्तव्यही आहे व तें अहिंसेंतही बसतें, असा विचार गांधींनीं सभेपुढें मांडला. ज्याला १९०७ सालीं सरकारवरील बहिष्कार असें नांव होतें, त्याचाच हा एक अहिंसक पर्याय आहे हें सभेला पटलें व त्या कल्पनेस सभेचा पाठिंबा मिळाला. पुढें ही अनत्याचारी असहकाराची कल्पना १ ऑगस्ट १९२० पर्यंत मागेंच राहिली आणि अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत महात्मा गांधी मॉंटेग्यू सुधारणांच्या ठरावांत सरकारशीं सहकार्य करावें आणि मॉंटेग्यूचे आभार मानावे, असे शब्द घालण्याबद्दल आग्रह धरून बसले होते. स्वराज्यासाठीं सत्याग्रह किंवा असहकार असले कार्यक्रम हातीं घेण्यास त्या वेळीं ते तयार नव्हते, येवढाच याचा खरा अर्थ होता. पंजाबमधील हत्याकांडाची सरकारी चौकशी त्या वेळीं पुरी व्हावयाची होती व त्याबाबत सरकार लोकांना कितपत न्याय देणार हें कळावयाचें होतें. तसेंच खिलाफत-प्रकरणाचाही निकाल लागावयाचा होता. या दोन प्रकरणांत लोकमत धुडकावून दिलें गेल्यानंतर सरकारशीं असहकाराचें युद्ध पुकारणें समर्थनीय ठरेल. तोंपर्यंत नवीन सुधारणा अपुऱ्या व असमाधानकारक असल्या तरी आपण त्यांच्याशीं असहकार करूं नये असा गांधींचा दृष्टिकोण होता. पं. मालवीय सहकारिता पक्षाचे नेते असून देशबंधु दास हे नवी राज्यघटना मोडून टाकावी या मताचे होते. लो० टिळक यांचा दे. बं. दास यांनाच पाठिंबा असला तरी घटनाभंग असे शब्द ठरावांत न घालतां किंवा सहकारिता असेही शब्द न घालतां "प्रतियोगी सहकारिता" (Responsive co-operation) अशा अर्थाचे शब्द घालावेत व ठराव सर्वानुमतें व्हावा असें त्यांना वाटत होतें. अखेरीस बऱ्याच वादविवादानंतर श्री. जयरामदास दौलतराम यांनीं एक शब्दयोजना सुचविली आणि ती सर्वानुमतें मान्य झाली, पण त्या शब्दांच्या अर्थाबद्दल पुढें रणेंही माजलीं! पुढील घटना इतक्या वेगानें बदलत गेल्या कीं, अमृतसर अधिवेशनांत सरकारशीं सहकार्य करावें म्हणणारे महात्मा गांधीच खिलाफत व पंजाब-प्रकरणांत न्याय

मिळाला नाहीं हें पाहतांच अनत्याचारी असहकाराचें युद्ध पुकारण्यास पुढें सरसावले!

"प्रतियोगी सहकारिता" या शब्दांचा अर्थ जर प्रतिपक्षाची वृत्ति पाहून त्याच्याशीं आपण सहकारिता करावयाची किंवा असहकारिता करावयाची, याचा निर्णय करणें असा असेल, तर पंजाब व खिलाफत-प्रकरणांत लोकांची पूर्ण निराशा झाली म्हणून सरकारशीं असहकार पुकारावा हें मत त्या तत्त्वाशीं सुसंगतच ठरतें. पण ज्या लोकमान्यांनीं 'प्रतियोगी सहकारिता' हे शब्द प्रथम रूढ केले ते १९२० च्या १ ऑगस्टला पहांटेच निधन पावल्यामुळें त्याच दिवशीं सुरू झालेली चळवळ त्यांनीं मान्य केली असती कीं नाहीं अथवा त्यांच्या प्रतियोगी सहकारितेच्या धोरणाशीं ती सुसंगत आहे कीं नाहीं, याचा अधिकृत निर्णय कोणीच देऊं शकलें नाहीं. केवळ गांधींची व टिळकांची जीवनतत्त्वें किंवा वर्तनतत्त्वें भिन्न होतीं असें म्हटल्यानें या प्रश्नाचा निर्णय लागूं शकत नाहीं. कारण राष्ट्रीय सभेनें व तिच्या इतर नेत्यांनीं जरी गांधींचें राजकीय नेतृत्व व त्यांचा कार्यक्रम स्वीकारिला तरी त्यांचें समग्र जीवनतत्त्व किंवा वर्तनतत्त्व केव्हांच स्वीकारलें नाहीं. गांधींचें जीवनतत्त्व सर्वश्रेष्ठ आहे, याबद्दल राष्ट्रसभेच्या नेत्यांना शंका नव्हती व ती टिळकांनाही नव्हती. फक्त त्यांचें वर्तनतत्त्व सर्वस्वीं राष्ट्रसभेला झेपणार नाहीं असें इतर राष्ट्रीय नेत्यांचें मत होतें व टिळकांनाही तसेंच वाटत होतें. इतर राष्ट्रीय नेते व्यवहारदृष्ट्या जसें गांधींचें नेतृत्व महत्त्वाचें व उपयुक्त मानीत असत, तसेंच टिळकांनींही मानिलें असतें व या दोन थोर नेत्यांचें सहकार्य घडून राष्ट्राची अधिक प्रगति टिळक अधिक जगते तर झाली असती, अशी लोकांची भावना होती व गांधींनाही तसेंच वाटत होतें. १९२० च्या सप्टेंबर महिन्यांत राष्ट्रसभेचें खास अधिवेशन होऊन महात्मा गांधींनीं मांडलेला अनत्याचारी असहकाराचा ठराव बहुमतानें मंजूर झाला व दे. बं. दास व बिपिनचंद्र पाल यांच्या उपसूचना नामंजूर झाल्या. या प्रसंगास अनुलक्षून महात्मा गांधी आत्मकथेंत लिहितात :—

"या खास अधिवशेनाचे वेळीं लोकमान्य नाहींत याबद्दल मला फारच वाईट वाटलें. मला अद्यापपर्यंत असें वाटतें कीं, ते जिवंत असते तर त्यांनीं कलकत्त्याच्या प्रसंगाबद्दल आनंद मानिला असता. परंतु तसें झालें नसतें तरीही त्यांनीं विरोध केलेला मला आवडला असता. मला त्यापासून शिकायला मिळालें असतें ..... मध्यरात्रीं मला त्यांच्या मृत्यूचा टेलिफोन माझे सहकारी पटवर्धन यांनीं केला. त्याच वेळीं आपल्या सोबत्यांपाशीं मीं उद्गार काढिले : 'मला एक मोठा आधार होता तो गेला.' त्या वेळीं असहकाराचें आंदोलन खूप जोरानें चाललें होतें. त्यांच्याकडून पाठिंबा मिळविण्याची मला आशा वाटत होती. शेवटीं जेव्हां असहकार संपूर्ण स्वरूपांत उभा राहिला, तेव्हां त्यानीं कोणतें धोरण स्वीकारलें असतें तें एक देव जाणें, पण मला एवढें माहीत आहे कीं, राष्ट्राच्या इतिहासांतील या आणीबाणीच्या वेळेला त्यांची उणीव सर्वांनाच विशेष जाणवत होती."

अशा प्रकारें १९१५ सालीं गोखले आणि १९२० सालीं टिळक दिवंगत झाले आणि हिंदी स्वातंत्र्याचा लढा पुरा करण्याचें कार्य महात्मा गांधी यांच्याकडे आलें व राष्ट्रसभेची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन त्यांनीं तें कार्य २७ वर्षें चालवून हिंदुस्थानांतून ब्रिटिश साम्राज्य नामशेष झाल्याचें पाहिलें. मात्र हिंदुस्थानांत रामराज्य स्थापन करण्याचें कार्य अपुरेंच राहिलें. तो लढा त्यांनीं तसाच आमरण पुढें चालविला होता. पण गोखले व टिळक यांना त्यांनीं पुढें जें कार्य केलें त्याबद्दल धन्यताच वाटली असती यांत शंका नाहीं. कलकत्त्यास असहकाराच्या ठरावावर जो वादविवाद झाला, तो तत्त्व आणि तपशील या दोन्हीही दृष्टींनीं झाला. डॉ. बेझंट आणि श्री. जीना यांचा विरोध मूलभूत तत्त्वालाच होता, तर दास, पाल यांचा विरोध तपशिलांतील कायदे-मंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार घालण्याच्या बाबीला विशेष होता. शिक्षणसंस्था व न्यायासनें यांच्या बहिष्काराला ही लाला लजपतराय प्रभृतींचा विरोध होता. खिलाफत समितीच्या अनुयायांचा गांधींना पूर्ण पाठिंबा असून प्रसिद्ध जुन्या पुढाऱ्यांपैकीं पंडित मोतीलाल नेहरू यांचा मात्र गांधींना सर्वस्वी पाठिंबा होता. मोतीलाल नेहरू हे

पूर्वीचे प्रागतिक पक्षाचे नेमस्त पुढारी होते तरी पंजाबांतील हत्याकांड पाहून आणि त्यांचा मुलगा जवाहरलाल याच्या जहाल वृत्तीकडे पाहून मोतीलालजींचा प्रागतिक राजकारणावरील विश्वास ढासळला होता. महात्मा गांधींच्याकडे त्यांचें चित्त वर्षभर वेधिलें होतें आणि रौलॅट कायद्याविरुद्ध सुरू होणाऱ्या सत्याग्रहांत जवाहरलालनें एकाएकीं पडूं नये असा उपदेश मोतीलाल यांनीं गांधींच्या मुखानेंच मुलाला करविला होता. पुढें पंजाब-चौकशीच्या कामांत चित्तरंजन दास व मोतीलालजी मनोभावें पडले व जवाहरलालही दासबाबूंच्या हाताखालीं या वेळीं कामास लागले होते. या वेळेपासून नेहरू पितापुत्र हे गांधींच्या आकर्षणकक्षेंत कायमचे ओढले गेले. पुढें स्वराज्यपक्ष काढून कायदे-मंडळांत शिरून घटनाभंगाचें धोरण राष्ट्रसभेकडून मान्य करवून घेण्यांत जरी मोतीलाल हे दासबाबूंच्या बरोबरीनें गांधींच्या विरुद्ध नेटानें उभे राहिले, तरी कलकत्ता अधिवेशनांत ते सर्वस्वीं गांधींच्या पक्षास होते.

कायदेमंडळांवर बहिष्कार घालून केवळ विधायक लोकसेवा करीत बसण्याचा तो काल, नव्हता तर ताबडतोब प्रत्यक्ष प्रतिकारास प्रारंभ करावयाचा तो काल होता. कौन्सिलें, कोर्टें, शिक्षणसंस्था यांच्या बहिष्कारानंतर कायदेभंग, करबंदी, सरकारी नोकरीवर बहिष्कार, पोलिस व लष्कर यांतील नोकऱ्यांवरही बहिष्कार असा हा कार्यक्रम होता. सर्वसामान्य जनतेसाठीं स्वदेशी, खादी, चरखा, अस्पृश्यता-निवारण, ग्रामपंचायती, हिंदु-मुसलमान ऐक्य, राष्ट्रीय शिक्षण, मद्यपानबंदी असा सर्व विधायक कार्यक्रमही त्यांत होता. शिवाय या सर्व गोष्टी वर्ष-सहा महिन्यांत घडवून आणून, एक वर्षांत स्वराज्याच्या प्रश्नावर सरकारला आपलें म्हणणें मान्य करण्यास भाग पाडण्याची कल्पना या ठरावामागें होती. खिलाफत व पंजाब-प्रकरणांनीं जनतेंत जो क्षोभ निर्माण झाला होता त्या क्षोभाला विधायक व अनत्याचारी क्रांतीचें स्वरूप तात्काळ देण्याचा हा प्रयत्न होता आणि नव्या सुधारणांवर मतदारांनींच बहिष्कार घालून एक वर्षाच्या आंत कायदेभंग व करबंदी या रूपांनीं नवी राज्यघटना मोडून पाडावी अशी ही योजना होती. एकंदर जनतेंत अपूर्व उत्साह आणि

त्यागवृत्ति जागृत झालेली होती आणि मोठमोठ्यांच्या जीवनांत आमूलाग्र क्रांति घडवून आणून त्यांना राष्ट्रासाठीं संन्यास घेण्यास लावण्याचें अद्‌भुत सामर्थ्य महात्मा गांधींच्या अंगीं असल्याचा प्रत्यय सर्वांस येत होता. प्रांतिक पुढारी होण्याच्या लायकीचे देशांतील अनेक नवे विद्वान् देशभक्त गांधींच्या विभूतिमत्त्वानें मोहमुग्ध झाले होते. बाबू राजेंद्र प्रसाद, मोतीलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, चक्रवर्ती राजगोपालाचार्य यांसारखे अव्वल दर्जाचे कायदेपंडित व आपल्या व्यवसायांत निष्णात असे वकील वकिली सोडून या क्रांतिकार्यांत धुरीणत्व स्वीकारण्यास उत्सुक होते. देशांतील तरुण विद्यार्थी घरेंदारें व शिक्षणसंस्था सोडून खेड्यांत जाऊन क्रांतिकार्य करण्यास पुढें येणार होते. मुसलमान जनता खिलाफत-प्रकरणामुळें ब्रिटिश राज्य उलथून पाडण्याची भाषा प्रथमच बोलूं लागली होती; अशा वेळीं असहकारितेच्या तपशीलांत मतभेद करून ती प्रेरणा राष्ट्रांत निर्माण करून अनत्याचारी क्रांतीचें नवें तत्त्वज्ञान शिकविण्यास पुढें आलेल्या गांधींसारख्या असामान्य लोकनायकास विरोध करण्यास सामान्य प्रतिनिधि तयार नव्हते, आणि ते मांडतील तो ठराव बहुमतानें मंजूर करण्यास तयार होते. यासाठींच अशा प्रसंगीं लोकमान्य टिळकांसारखा तितकाच मोठा नेता असता तरच गांधींच्या ठरावांतील तपशीलांत तो एखादी सुधारणा करूं शकला असता असें लोकांना वाटत होतें. टिळकांच्यानंतर गांधी हे जनतेच्या हृदयाचे कायमचे अधिपति झाले व त्यांच्या विरोधकांनाही ते देतील तेवढ्याच सवलती बहुजनसमाजाच्या या प्रतिनिधींकडून मिळवाव्या लागत. ही जी परिस्थिति १९२० सालीं निर्माण झाली ती जवळजवळ अखेर-पर्यंत टिकली. पण इतका गांधींचा नैतिक प्रभाव असला तरी स्वतः ते आपल्या प्रतिपक्षीयांना सवलती देत व आपलें बहुमत असतांनाही प्रतिपक्षीयांचे ठराव किंवा उपसूचना मंजूर करण्यास संधि देत. हें एक त्यांचें अहिंसक क्रांतीच्या धोरणांतील अंगच होतें, हें पुढें लोकांना हळूहळू कळूं लागलें.

कलकत्त्याचें जादा अधिवेशन संपल्यानंतर पहिला कार्यक्रम नवीन सुधारणा कायद्यावर बहिष्कार घालण्याचा प्रचार मतदारांत करणें

आणि मतदान-केंद्रावर कोणाही मतदारानें जाऊं नये, असा प्रचार करणें हाच होता. टिळकपक्षाचे अनुयायी म्हणविणाऱ्या लोकांनीं राष्ट्रसभानिष्ठ लोकशाही पक्ष (काँग्रेस डेमॉक्रॅटिक पक्ष) या नांवाचा पक्ष उभारून निवडणुकीस उमेदवार उभे करण्याचें ठरविलें होतें तरी त्या पक्षाचा सर्व आधार राष्ट्रसभेवरील निष्ठा हाच असल्यामुळें आणि राष्ट्रसभेचा ठराव निवडणुकीवर बहिष्कार घालावा असा स्पष्ट झाला असल्यामुळें हा बहिष्कार सर्व राष्ट्रसभाभक्तांवर बंधनकारक नाहीं, असा खुलासा गांधींनीं केला असतांही राष्ट्रसभानिष्ठ लोकशाही पक्षानें आपले उमेदवार मागें घेतले. सरकारशीं सहकारिता करावी किंवा न करावी, आणि न करावयाची तर ती कोणत्या मुद्यावर केव्हां करूं नये, हा सर्व तपशील राष्ट्रसभेनें बहुमतानें ठरवावा व तो सर्व राष्ट्रसभाभक्तांनीं अमलांत आणावा हें तत्त्व टिळकांनीं इतक्या वेळां बोलून व लिहून दाखविलें होतें कीं, त्या तत्त्वाविरुद्ध वागून निवडणुकी लढविण्यास टिळकांच्या नांवाचा उपयोग करणें हें कोणासही त्या वेळीं शक्य नव्हतें. गांधी हे बहुमताची शिस्त सामान्यतः पाळावी अशा मताचे असले, तरी मनोदेवतेच्या आज्ञेविरुद्ध वागून कोणचीही शिस्त पाळणें योग्य नाहीं असें त्यांचें तत्त्व असल्यानें ज्यांचा नवीन कायदेमंडळांत निवडून येऊन देशकार्य करितां येईल असा विश्वास असेल, त्यांनीं बहिष्काराचा ठराव झाला असतांही मनोदेवतेस स्मरून निवडणुकीस उभें राहावें अशी सवलत देण्यास ते तयार होते. पण टिळकांच्या नांवानें या सवलतीचा उपयोग करणें व विशेषतः असहकाराचें तत्त्व आपणास मान्य आहे अशी कबुली दिल्यानंतर तपशीलाच्या मुद्यावर अशी सवलत घेऊन निवडणुकीस उभें राहणें टिळकशिष्य म्हणविणारांस शक्य नव्हतें. अर्थात् त्या सर्वांनीं हा मतदानावरील बहिष्कार यशस्वी करण्यास सहाय्य केलें आणि जे प्रागतिक लोक किंवा ब्राह्मणेतर पक्षासारखे जमातवादी पक्ष राष्ट्रसभेच्या बाहेर राहून तिला विरोध करीत होते त्यांचेच प्रतिनिधि या वेळीं निवडणुकीस उभे राहिले आणि शेंकडा १०-५ टक्के मतदारांच्या संमतीनें निवडून आलेले हे लोक, आम्हींच

जनतेचे कायदेशीर प्रतिनिधि म्हणून मिरवूं लागले. अशा रीतीनें मतदानावरील बहिष्काराचा हा कार्यक्रम एका अर्थी यशस्वी झाला असें म्हणतां आलें, तरी राष्ट्रसभेबाहेरील अराष्ट्रीय पक्षांना वस्तुतः मतदारांचा मुळींच पाठिंबा नसतांना आम्हीच जनतेचे कायदेशीर प्रतिनिधि असा दावा सांगण्याची संधि मिळाली. यामुळें पुढील निवडणुकीच्या आंत पंडित मोतीलाल नेहरू हे देशबंधु चित्तरंजन दास यांच्या पक्षास मिळून त्यांनीं कायदेमंडळावरील बहिष्काराचा हा ठराव बदलून घेऊन स्वराज्य पक्षाच्या नांवानें निवडणुकी लढवाव्या आणि कायदे-मंडळांत जाऊन सरकारची अडवणूक करावी असा कार्यक्रम हळूहळू राष्ट्रसभेकडून मान्य करून घेतला ; पण या नव्या निवडणुकी पुढें तीन वर्षांनीं होणार होत्या, तोंपर्यंत या मुद्याला आतां विशेष महत्त्व राहिलें नव्हतें.

इ. स. १९२० सालच्या निवडणुकी होऊन गेल्यानंतर राष्ट्रीय समेचें अधिवेशन नागपूर येथें डिसेंबरांत झालें. त्या अधिवेशनापुढें हा कौन्सिलबहिष्काराचा प्रश्न आतां व्यवहारदृष्ट्या उरलाच नव्हता. तो आतां तीन वर्षें पुढें ढकलला गेला होता. यामुळें गांधी, नेहरू, आणि दास, या सर्वांची एकी होऊन, एक वर्षभर असहकाराची प्रचंड चळवळ करावयाची आणि वर्षअखेरीस कायदेभंग व करबंदी येथपर्यंत ती रेटीत न्यावयाची असें ठरलें. नागपूरची राष्ट्रसभा झाल्यानंतर, पहिले तीन महिने शिक्षण-संस्थांवर बहिष्कार घालून विद्यार्थ्यांना बाहेर काढावयाचें आणि कोर्टांवर बहिष्कार घालून वकिलांना त्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक नेते म्हणून खेड्यांतील जनतेंत जागृति करण्याच्या कार्यासाठीं व संघटनेसाठीं न्यावयाचें या दोन कार्यक्रमांवर विशेष जोर देण्यांत आला. हजारों विद्यार्थी शिक्षण-संस्थांवर बहिष्कार घालून क्रांतिकार्यासाठीं आपलें आयुष्य वाहून घेण्यास पुढें आले. कांहीं सुप्रसिद्ध प्रांतिक कायदेपंडित आपला धंदा सोडून या कार्यास वाहून घेण्यास पुढें आले. परंतु जिल्हानिहाय व तालुकानिहाय जे जे वकील आजपर्यंत राजकीय पुढारी म्हणून वावरत होते, ते या कार्यांत

सामील होण्यास तयार झाले नाहींत. यामुळें आपल्या शिक्षण-संस्था सोडून क्रांतिकार्यास वाहून घेण्यासाठीं जे हजारों विद्यार्थी या वेळीं पुढें आले होते, त्यांचें मार्गदर्शन करण्यास व त्यांना देशसेवेच्या कामीं लावण्यास जिल्हानिहाय व तालुकानिहाय सुशिक्षित नेते मिळूं शकले नाहींत. आजपर्यंत जे राष्ट्रीय पक्षाचे राजकीय पुढारी म्हणून मिरवत होते, त्यांना ही असहकाराची चळवळ आणि सत्याग्रहाचें व्रत झेंपण्यासारखें नव्हतें. त्यांनीं या चळवळींतून मागें पाय घेतला आणि आपणास न झेंपणारी ही चळवळ देशाला विघातक आहे असाही खाजगी प्रचार करण्यास सुरवात केली. स्थानिक नेत्यांच्या अभावीं, शिक्षण-संस्थांतून बाहेर पडलेले विद्यार्थी दोनतीन महिने इकडे तिकडे भटकून पुन्हा जून महिन्यांत आपआपल्या शिक्षणसंस्थांत जाऊन दाखल झाले. पण त्यांच्यापैकीं जे निर्धाराचे होते ते राष्ट्रीय शिक्षण-संस्थांत दाखल झाले आणि त्यांनीं पुढें १९३० सालीं जेव्हां सत्याग्रहाची पुन्हा चळवळ झाली तेव्हां महत्त्वाची कामगिरी केली. या वेळीं या विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या, दुय्यम व उच्च राष्ट्रीय शिक्षण-संस्था प्रत्येक जिल्ह्यांत व प्रांतांत निघाल्या. या राष्ट्रीय शिक्षण-संस्थांचे अनेक चालक हे पुढें १९३० च्या सत्याग्रह-चळवळींत स्थानिक नेते व कार्यकर्ते म्हणून पुढें आले. वकील वर्गानें मात्र सामान्यतः गांधींच्या असहकारी चळवळीशीं अखेरपर्यंत असहकार केला.

मार्च १९२१ मध्यें अखिल भारतीय काँग्रेससमिति भरली. तींत पुढील तीन महिन्यांचा कार्यक्रम आंखण्यांत आला, तो असा : काँग्रेसचे सामान्य सभासद १ कोटी करावेत. टिळक-स्वराज्य-फंड नांवाचा निधि १ कोटी जमवावा. ब्रिटिश कापडावरील बहिष्कार तीन महिन्यांत पुरा करावा. पंचवीस लक्ष चरखे खेड्यापाड्यांतून सुरू करावेत. अशा तऱ्हेचा हा कार्यक्रम होता. यांपैकीं एक कोटी रुपयांचा निधि गांधींनीं अत्यंत परिश्रम करून आणि दास, नेहरूंनीं आपली सर्व पुण्याई खर्च करून तीन महिन्यांत उभा केला. हा एक त्या वेळीं मोठा चमत्कार गणण्यांत आला. कारण याच्यापूर्वी लाख दोन लाखांचे निधि जमविणें ही गोष्ट टिळक किंवा मालवीय यांच्या व्यतिरिक्त

कोणाच्या हातून घडली नव्हती. या वेळीं गांधींच्यावर धनिक वर्गानें पैशाचा पाऊस पाडला. इतकेंच नाहीं तर गांधी ज्या ज्या गांवीं जात व ज्या ज्या सभांमध्यें भाषणें करीत त्या सभांतून धनिकांच्या स्त्रिया त्यांच्यावर आपल्या दागिन्यांचाही वर्षाव करीत असत. सभा संपल्यानंतर आपलीं बहुमोल परदेशी उंचीं वस्त्रें आणून त्यांच्या होळ्या पेटविण्यांत येत. सभेला येणारे सर्व वर्गांचे लोक खादीचा साधा पोषाख करून येऊं लागले आणि उंची कपडे घालून येणारे लोक, समाजांत येण्यास लाजूं लागले. खादीची टोपी ही बहुमानाची निशाणी ठरली. अशा रीतीनें परदेशी कापडाचा बहिष्कार बराच प्रभावी होऊं लागला, पण खादीच्या नांवानें बाजारांत मिळणारें कापड अनेक वेळां गिरण्यांत विणलेलें व जपानी सुतानें बनविलेलेंही होतें. वकील वर्गाप्रमाणें व्यापारीवर्गानेंही या वेळीं गांधींना दगाच दिलेला होता. तथापि, परदेशी व विशेषतः ब्रिटिश कापडावरील बहिष्कार बराच यशस्वी झाला. काँग्रेसच्या सभासदांची संख्याही जवळजवळ एक कोटीपर्यंत वाढत गेली. परंतु चरख्याचा प्रसार आणि खादीची निपज या गोष्टी मात्र इतक्या प्रमाणांत होऊं शकत नव्हत्या, आणि एवढी प्रचंड विधायक संघटना इतक्या थोड्या अवधींत निर्माण होणें जवळजवळ अशक्यच होतें. त्या वेळीं चरखा म्हणजे काय आणि त्याचा उपयोग करून सूत कसें काढावें याचीही कोणास फारशी माहिती नव्हती– या कार्मीं त्या वेळीं पुष्कळच पैसे फुकट गेले व तसें होणें हेंही अपरिहार्यच होतें. तरीही त्या वेळीं बरीच खादी निर्माण झाली आणि खादी लोकप्रिय झाल्यानें तिची मागणी वाढली. यामुळें पुढें १९२५ सालीं जेव्हां महात्मा गांधींनीं अखिल भारतीय चरखा संघ या नांवाची संस्था काढली तेव्हां तिच्या कार्यास अनुकूल भूमिका आधींच निर्माण झालेली होती.

अशा प्रकारें ही चळवळ एकसारखी जोरांत देशभर पसरूं लागली. ३१ जुलईपासून दोन महिन्यांत सप्टेंबरअखेर हा विलायती कापडाच्या बहिष्काराचा कार्यक्रम पुरा करावा असें ठरलें.

कायदेभंगाकडे

यानंतर आतां लोक कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यास अत्यंत आतुर झाले. गांधीजी त्यांना एकसारखे थोपवून धरीत होते. खेड्या-पाड्यांतून विधायक कार्याला मोठ्या प्रमाणावर प्रारंभ झाल्याखेरीज सत्याग्रहाला हात घालूं नये अशी गांधींची इच्छा होती. परंतु सरकारनें दडपशाहीस आरंभ केल्यामुळें आणि इंग्लंडच्या युवराजांस हिंदुस्थानांत आणून येथील जनता कॉंग्रेसच्या मागें नाहीं आणि ती ब्रिटिश राजाशीं राजनिष्ठ आहे. असें प्रदर्शन जगापुढें करण्याचा निश्चय हिंदुस्थान सरकारनें केल्यामुळें असहकाराच्या चळवळींतून कायदेभंगाची चळवळ लवकर हातीं घेणें गांधींना आवश्यक वाटलें.

ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर या तीन महिन्यांत असहकाराच्या आंदोलनाचा वेग आणि प्रभाव एकसारखा वाढत गेला. सप्टेंबर महिन्यांत सरकारनें अलीबंधूंना राजद्रोहाच्या आरोपाखालीं शिक्षा केली. या वेळपासून दडपशाहीचीं चक्रें जोरांत फिरूं लागलीं आणि ज्या मानानें दडपशाहीचें स्वरूप उग्र होऊं लागलें त्या मानानें गांधींचा प्रतापही वाढूं लागला. नोव्हेंबरमध्यें युवराजांची भेट हिंदुस्थानला व्हावयाची होती. या वेळीं या भेटीवर कडक बहिष्कार पाडण्याचा कार्यक्रम लोकांपुढें आयताच चालून आला. गांधींनींही नोव्हेंबरच्या मध्याच्या सुमारास स्वतःच्या नेतृत्वाखालीं बार्डोलीस करबंदीची मोहीम सुरू करण्याची नोटिस सरकारला देण्याचें ठरविलें; मात्र त्या वेळीं देशांतील इतर सर्व विभागांत पूर्ण शांतता पाळली गेली पाहिजे अशी त्यांची अट होती. बार्डोलीस स्वराज्याचा झेंडा प्रथम उभा करावयाचा आणि तेथें यश मिळालें म्हणजे हळूहळू सर्व देशभर ती चळवळ पसरवीत न्यावयाची, अशी त्या वेळची योजना असावी.

पण बार्डोलीस १९२१ सालीं सुरू होणार म्हणून जाहीर झालेला सत्याग्रह-संग्राम त्या वेळीं सुरू होऊंच शकला नाहीं. १७ नोव्हेंबर रोजीं युवराज मुंबई बंदरांत येऊन उतरणार होते. त्या निमित्तानें सर्व

देशभर हरताळ पाळण्यांत आला होता. सर्वत्र हा हरताळ शांततेनें झाला व तो अत्यंत यशस्वी झाला; पण मुंबईत एकदम दंग्यास सुरुवात झाली. हे दंगे राजनिष्ठ लोक आणि असहकारवादी लोक यांच्या दरम्यान सुरू झाले. या वेळीं हिंदु-मुसलमान हे समाज असहकारांत सामील होते, पण मुंबईतील पार्शी व खिस्ती हे समाज त्यांत बहुसंख्येनें सामील नव्हते. त्यामुळें हिंदु-मुसलमान जमावांकडून पार्शी व खिस्ती समाजावर हल्ले करण्यास सुरवात झाली. दोनतीन दिवसांत दंग्यांना फार उग्र स्वरूप येऊन पन्नाससाठ लोक ठार झाले आणि तीनचारशें लोक जखमी झाले. १९ नोव्हेंबर रोजीं महात्मा गांधींनीं दंगे शांत होण्यासाठीं उपोषणाचें दिव्य सुरू केलें आणि या उपोषणाचा उपयोग होऊन खवळलेला जनसमाज शांत होण्यास लगेच सुरुवात झाली. पांचव्या दिवशीं पूर्ण शांतता होऊन गांधीजींच्या उपवासाची समाप्ति झाली. गांधीजींचें नैतिक नेतृत्व विजयी झालें.

गांधींनीं ताबडतोब जाहीर केलें कीं, बार्डोलीचा सत्याग्रह आणखी कांहीं काळ पुढें ढकलणें भाग आहे. यामुळें अनेक उत्साही लोकांची निराशा झाली. तथापि युवराजांच्या दौऱ्यावरील बहिष्काराची चळवळ वणव्याप्रमाणें सर्वत्र फैलावूं लागली. हें पाहून सरकारनें राष्ट्रसभा व खिलाफत समित्या यांचीं स्वयंसेवक दलें बेकायदा ठरविण्यास प्रारंभ केला. अर्थात् या दलांत सामील होऊन हुकूमभंग करण्याचा सत्याग्रह सुरू झाला. मोठमोठे पुढारीही या बेकायदा दलाचे स्वयंसेवक म्हणून तुरुंगांत जाऊं लागले आणि या त्यांच्या सत्याग्रहामुळें चळवळीचें वादळ अधिकाधिक वेगानें पसरूं लागलें. २४ डिसेंबर रोजीं युवराज कलकत्त्यास जाणार होते आणि त्या वेळीं अत्यंत कडक हरताळ पाडण्यांत यावयाचा होता. या वेळपर्यंत सुमारें पंधरा हजार स्वयंसेवक व शेंकडों पुढारी तुरुंगांत गेले. अहमदाबाद येथें भरणाऱ्या राष्ट्रसभेचें नियोजित अध्यक्ष देशबंधु दास व त्यांच्या पत्नी, पंडित मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय, मौलाना अबुल कलाम अझाद, इत्यादि पुढारी तुरुंगांत गेल्याच्या बातम्या रोज येऊन जनतेच्या कानांवर धडकूं लागल्या. अर्थात् २४ डिसेंबरचा कलकत्त्यांतील हरताळ अत्यंत कडक-

पणें पाळला जाणार व तो कोणतीही सत्ता कितीही दडपशाही करून थांबवूं शकणार नाहीं अशी व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांची खात्री झाली. लोकांच्या अंतःकरणातील राजशासनाची भीतिच नष्ट झाली. जों जों शिक्षा करावी तों तों लोकांत धैर्याचाच आविष्कार होऊं लागला. या वेळीं लॉर्ड रीडिंग हे क्षणभर गोंधळून गेले आणि शक्य तर कांहीं तडजोड करून २४ डिसेंबरचा हरताळ तहकूब करवावा आणि युवराजाच्या स्वागताचा योजिलेला समारंभ निर्विघ्नपणें पार पाडावा अशी त्यांना इच्छा झाली. खिलाफत, पंजाब, स्वदेशी, यांसंबंधीं जनतेचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचा विचार करण्यासाठीं एखादी पुढारी परिषद–गोलमेज परिषद–बोलवूं आणि सत्याग्रही बंदी सोडूं, अशीं बोलणीं पंडित मदनमोहन मालवीय यांच्या मध्यस्थीनें गांधींच्याशीं सुरू झालीं. पण खिलाफत–पुढारी व फतवाबंदी म्हणून ज्यांची प्रसिद्धि होती—मुसलमानांनीं लष्करी नोकरी करूं नये असा फतवा काढणारे पुढारी—त्यांना सोडण्याची व्हाइसरॉयची तयारी नव्हती. गांधींना यात हिंदुमुसलमानांत भेद पाडण्याचा डाव दिसला म्हणून त्यांनीं त्या पुढाऱ्यांना सोडण्याचा आग्रह धरिला. अखेरीस २४ डिसेंबरचा हरताळ उठूं शकला नाहीं आणि व्हाइसरॉयला तडजोडीची गरज उरली नाहीं.

अहमदाबाद येथें हकीम अजमलखान यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रसभेचें अधिवेशन भरलें. गेल्या वर्षींच नागपूर अधिवेशनांत "शांततेच्या व न्याय्य मार्गांनीं स्वराज्यप्राप्ति" हें नवें ध्येय ठरवून राष्ट्रसभेची नवी घटना करण्यांत आली होती. ही सर्वच बैठक अपूर्व उत्साहानें व नव्या स्वरूपांत भरली होती. साबरमतीच्या तीरावर एक खादीनगर वसविण्यांत आलें होतें. मंडपही खादीचा असून आतां खुर्च्याऐवजीं खादीच्या बैठकी होत्या. सर्व प्रतिनिधि खादीवेषधारी होते. अशा नव्या थाटांत भरलेली ही राष्ट्रसभा म्हणजे एक सत्याग्रही सैनिकांची छावणीच जणुं भासत होती. गांधींच्यापुढें बार्डोलीचा सत्याग्रह-संग्राम उभा होता आणि त्यांना सर्वाधिकारी नेमून सत्याग्रह-संग्राम

सुरू करावा, असा ठराव होऊन हें अपूर्व उत्साहाचें राष्ट्रसभेचें अधिवेशन समाप्त झालें.

पं. मालवीयप्रभृति मध्यस्थानीं एक सर्वपक्षीय पुढारी-परिषद जानेवारींत मुंबईत बोलाविली व डिसेंबरांत मोडलेली तडजोडीची बोलणीं पुन्हा सुरू करण्याचा व्यूह रचिला. गांधींनीं जानेवारीअखेरपर्यंत लढ्याची नोटिस न देण्याचें ठरविलें. पण या पुढारी-परिषदेला व गांधींच्या सामोपचाराच्या पत्राला व्हाइसरॉय यांनीं नकारार्थी उत्तर पाठविलें व १ फेब्रुवारीस गांधींनीं बार्डोलीचा संग्राम सुरू करणार असल्याचा अंतिम खलिता व्हाइसरॉय यांस पाठविला. हा खलिता ता. ४ फेब्रुवारीस प्रसिद्धही झाला. गांधींनीं या वेळीं आपली सर्व शक्ति भाषणस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य हे मूलभूत राष्ट्रीय हक्क राष्ट्रसभेला मिळावेत येवढ्यावरच एकवटलेली असून ते हक्क मिळाले तर आपण आक्रमक कायदेभंग करणार नाहीं असेंही लिहिलें होतें. पण व्हाइसरॉयाना आतां समेटाची गरज नव्हती. यामुळें लढा अटळ झाला. इतक्यांत ५ फेब्रुवारी रोजीं बिहार प्रांतातील चौरीचौरा या गांवीं जमावानें २२ पोलिसांना उभें जाळलें आणि त्यांत कांहीं राष्ट्रसभेचे स्वयंसेवक असणारांनीं भाग घेतला अशी बातमी महात्मा गांधींना तारेनें येऊन पोहोंचली. बातमीचा शांतपणें विचार करून महात्मा गांधींनीं सत्याग्रहसंग्राम बेमुदत स्थगित करण्याचा निर्णय घेतला व तो १२ फेब्रुवारी इ. स. १९२२ ला बार्डोलीस भरलेल्या राष्ट्रसभेच्या कार्यकारिणींत मंजूरही करून घेतला! राष्ट्रसभाजनांनीं यापुढें केवळ हुकूमभंगासाठीं म्हणून स्वयंसेवक होणें, मिरवणुकी काढणें, किंवा सभा भरविणें, असे सत्याग्रहाचे प्रकार करूं नयेत असा इशारा देण्यांत आला. विधायक कार्यक्रम म्हणून एक कोटि सभासद करवून घेणें, चरखा लोकप्रिय बनविणें, राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था काढणें, ग्रामपंचायती निर्माण करणें, आणि दारूबंदी व्हावी म्हणून कायदेशीर प्रचार करणें असा कार्यक्रम जनतेपुढें ठेवण्यांत आला. लवकरच ता. २४। २५ फेब्रुवारीस अखिल भारतीय कॉंग्रेस समितीची बैठक होऊन या ठरावास मंजुरी मिळविण्यांत आली आणि अशा प्रकारें

स्वराज्यासाठीं आंखलेला सत्याग्रह-संग्राम महात्मा गांधींनीं बिनमुदत तहकूब केला.

हें पाहून अनेकांनीं त्यांना दोष दिला आणि देशांत कोठेंही अत्याचार झाले तर राष्ट्रसभेनें सत्याग्रह-संग्राम स्थगित करावयाचा असें धोरण स्वीकारल्यास असा सत्याग्रह करण्यास अनुकूल परिस्थिति केव्हाही निर्माण होणार नाहीं असे आक्षेप पुढें येऊं लागले. अनेकांनीं गांधी हे राजकारण करण्यास नालायक आहेत, असा आपल्या बुद्धीचा कायमचा निर्णय करून टाकला, पण गांधी हयात असेपर्यंत केव्हांही सत्याग्रह करण्याचा प्रसंग आल्यास त्यांनाच त्याचें नेतृत्व देण्याची प्रथा अखेरपर्यंत कायम होती. सन १९२१ सालीं महात्मा गांधींनीं हिंदी जनतेच्या मनावर हें जें प्रभुत्व एकदां संपादन केलें, तें त्यांनीं अखेरपर्यंत अव्याहत उपभोगिलें. स्वातंत्र्यासाठीं सार्वत्रिक सत्याग्रह करावयाचा झाला, तर तो त्यांनींच केला पाहिजे अशी जनतेची दृढ श्रद्धा त्यांच्यावर बसली आणि त्यांच्या हयातींत तरी मी असा सार्वत्रिक सत्याग्रह करतों असें म्हणणारा दुसरा कोणताही पुढारी पुढें आला नाहीं किंवा निपजला नाहीं. त्यांनीं विशिष्ट वेळीं माघार घेऊं नये, विशिष्ट वेळीं चढाई करावी अथवा अमुक मुद्यावर तडतोड करावी किंवा करूं नये असा उपदेश करणारे अथवा टीका करणारे अनेक निघाले, पण प्रत्यक्ष जे सत्याग्रह-संग्राम झाले ते गांधींनींच सुरू केले आणि जेव्हां ते थांबविणें अवश्य वाटलें तेव्हां त्यांनींच ते स्थगित केले. मात्र याचा अर्थ इतरांनीं केलेल्या टीकेकडे किंवा उपदेशाकडे ते मुळींच लक्ष देत नसत, अथवा इतराच्या टीकेपासून कोणताही बोध ते घेत नसत असा नाहीं. ज्यांनीं विधायक दृष्टीनें व सद्बुद्धीनें टीका केली त्यांच्यापासून गांधींनीं पुष्कळ बोध घेतला. त्यांच्याशीं जमवून घ्यावें म्हणून अनेक वेळां तडजोडी केल्या आणि आपली सत्याग्रह-युद्धनीति व तिच्यांतील डावपेंच यात त्यांस अनुसरून, अनेक फेरफारही केले; परंतु अत्याचारी कृत्यांना त्यांनीं केव्हाही प्रोत्साहन तर दिलें नाहींच, ण मान्यताही दिली नाहीं. जेव्हां जेव्हा त्यांना असें वाटलें कीं,

आतां ही चळवळ आपल्या अनत्याचाराच्या आवरणाखालीं राहूं शकत नाहीं तेव्हां त्यांनीं ती स्थगित केली आणि तिला विधायक लोकसेवेचें स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं जर असें केलें नसतें आणि प्रथमपासून अत्याचारी वातावरण फैलावत असतांही त्याला दुर्लक्षून अथवा मान्यता देऊन आपली कायदेभंगाची चळवळ तशीच पुढें रेटीत नेली असती, तर त्या अवस्थेंत महिना-पंधरा दिवस दंगल उडून सरकारनें आपल्या लष्करी जोरावर ती चळवळ, तिला मान्यता देणारी राष्ट्रीय सभा, आणि तिचे नेते महात्मा गांधी या सर्वांना कायमचें नेस्तनाबूत केलें असतें. परिणामदृष्ट्या ही गोष्ट १९२१ सालीं अगदीं शक्य व संभवनीय होती. यामुळें गांधींनीं सत्याग्रह-संग्रामासंबंधीं जी सतत दक्षता घेतली ती धोरण या दृष्टीनें अपरिहार्यच होती, असें इतिहासकारास फलदृष्ट्याही म्हणावें लागतें, परंतु गांधींनीं १९२२ च्या फेब्रुवारी महिन्यांत बार्डोली-सत्याग्रह मागें घेऊन जी तत्त्वनिष्ठा दाखविली ती त्यांना त्या वेळीं लोकांत अत्यंत अप्रिय करण्यास कारण झाली. इतकी अप्रियता संपादन करणारा हा राजकीय नेता पुन्हा अशा तऱ्हेची सत्याग्रहाची आक्रमक चळवळ करूं शकेल असें त्या वेळीं त्यांच्या टीकाकारांस वाटत नव्हतें; पण हे टीकाकार गांधींच्यापेक्षा अधिक प्रभावी नेतृत्व करूं शकतील अशी निष्ठा जनतेच्या मनांत या टीकाकारांसंबंधीं केव्हांही निर्माण झाली नाहीं.

सहा वर्षांची सजा

गांधींनीं फेब्रुवारीच्या अखेरीस आक्रमक सत्याग्रह-संग्राम मागें घेतला, इतकेंच नाहीं तर संरक्षक सत्याग्रहही आपल्या बचावासाठीं कोणीं करूं नये असा आदेश राष्ट्राला दिला. आता गांधींचें नेतृत्व संपलें असें त्याचे टीकाकार म्हणत होते. तथापि सरकारला तसें वाटत नव्हतें. त्यांना गांधींची भीति होती आणि म्हणून त्यांनीं १० मार्च १९२२ रोजीं रात्रीं साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमांत गांधी आणि 'यंग इंडिया' पत्राचे प्रकाशक श्री. शंकरलाल बँकर या दोघांना अटक केली आणि दुसऱ्या दिवशीं

मॅजिस्ट्रेटपुढें उभें करून 'यंग इंडिया' पत्रांत लिहिलेल्या लेखांबद्दल राजद्रोहाचा खटला भरला. १५ जून १९२१ च्या अंकांत "राजद्रोह हा एक सद्गुण आहे", २० सप्टेंबरच्या अंकांत "राजनिष्ठेला धक्का", १५ डिसेंबरच्या अंकांत "एक कोडें आणि त्याचें उत्तर" आणि २३ फेब्रुवारीच्या अंकात "आयाळ हालूं लागली" अशा मथळ्याचे चार लेख प्रसिद्ध झाले होते. या चार लेखांबद्दल हा राजद्रोहाचा खटला भरण्यांत आलेला होता. गांधी हे संपादक आणि शंकरलाल बँकर हे प्रकाशक म्हणून दोघांवरही खटला चालू झाला. मॅजिस्ट्रेटनें खटला सेशन कोर्टांत पाठविला. १८ मार्च रोजीं अहमदाबादचे सेशन जज्ज मि. ब्रूमफिल्ड यांच्यापुढें हा खटला सुरू झाला. खटल्याचें काम फारच सोपें होतें. आपण राजद्रोह केला आहे, इतकेंच नाहीं तर ब्रिटिश सरकारविरुद्ध अनत्याचारी वृत्तीनें असंतोष फैलाविणें आणि जनतेच्या अंतःकरणांतील असंतोषाला अहिंसक रूपानें प्रकट करणें हें आपण आपलें कर्तव्य समजतों, असें गांधींनीं कोर्टांत सादर केलेल्या आपल्या जबानींत स्पष्टपणें सांगितलें होतें. गांधींच्यावर भरलेला हा खटला पाहून लोकांना व सरकारला सुमारें पंधरा वर्षांपूर्वी टिळकांच्यावर भरलेल्या खटल्याची आठवण झाली. त्यांच्यावरही राजद्रोहाचाच आरोप होता. त्यांनीं आठ दिवस स्वतः खटला चालवून शब्दांच्या अर्थाचा कीस काढला, आणि आपल्या पत्रांत प्रसिद्ध झालेले लेख राजद्रोहाच्या कायदेशीर कक्षेंत येऊं शकत नाहींत,असें बुद्धिचातुर्यानें सिद्ध केलें. लोकांनीं व कायदेपंडितांनींही त्यांनीं आपल्या बचावासाठीं योजिलेले युक्तिवाद आणि कायदेपांडित्य पाहून त्यांच्या बुद्धिचातुर्याचें कौतुक केलें. तथापि आपलें हें सर्व बुद्धिचातुर्य आणि कायदेपांडित्य फुकट जाऊन सरकार आपणांस शिक्षा देणार हें त्यांना माहीत होतें. सरकारचें कृत्य अन्यायाचें व बेकायदेशीर आहे असें सिद्ध करणें हाही त्यांचा एक हेतु होता. गांधींची नीति ही सत्याग्रह-नीति होती. त्यांना हिंदी जनतेला अन्यायी राज्याविरुद्ध उघड बंड करण्याचें शिक्षण द्यावयाचें होतें. प्रजेला राज्यक्रांतीचा एक अहिंसक मार्ग दाखवून द्यावयाचा होता. तत्त्वनिष्ठेसाठीं व सत्यासाठीं जुलमी कायद्याचा भंग

करणें आणि त्या कायदेभंगासाठीं मिळणारी शिक्षा आनंदानें सहन करणें या सत्याग्रही प्रजाधर्माचें शिक्षण त्यांना द्यावयाचें होतें. प्रजेंत ही सत्याग्रही वृत्ति बाणली तर तिच्यावर कोणतीही बलाढ्य सत्ता जुलूम करूं शकणार नाहीं आणि तसा तिनें प्रयत्न केला, तर आपल्या तत्त्व-निष्ठेनें पूर्ण अनत्याचारी क्रांति ती यशस्वी करूं शकेल हें दाखवून देणें हा गांधींचा उद्देश होता. टिळकांना ज्याप्रमाणें सहा वर्षें सक्त मजुरीची कैद देण्यांत आली त्याचप्रमाणें गांधींनाही सेशन जज्जानें सहा वर्षांची कैद दिली. ही शिक्षा सांगतांना जज्जानें टिळकांच्या नांवाचा व खटल्याचा उल्लेख केला. गांधींनीं आपणांस त्याच कलमा-खालीं तितकीच शिक्षा दिल्याबद्दल न्यायाधिशाचे आभार मानले. आपण सहा वर्षांची सजा दिली असली तरी मध्यंतरीं राजकीय परिस्थिति सुधारल्यास सरकारनें तुमची मुक्तता केली तर मला बरें वाटेल असें न्यायाधिशानें बोलून दाखविलें. गांधींनीं आपल्या जबानींत आपण कायदेशीर गुन्हा जाणूनबुजून केला असल्या-मुळें त्या कायद्याखालीं असलेली जास्तींत जास्त शिक्षा देणें, किंवा हा कायदाच अन्यायाचा आहे हें ओळखून आपल्या जागेचा राजीनामा देणें, हे दोनच मार्ग तुम्हांपुढें आहेत असें न्याय-मूर्तीस सुचविलें होतें. अर्थात् न्यायमूर्तीची दृष्टि कायद्याच्या पलीकडे असणाऱ्या न्यायापर्यंत पोहोंचणें शक्य नव्हतें. खऱ्या न्यायाला जागून अन्यायी कायद्याची बजावणी करण्याचें पाप आपल्या हातून घडूं नये, म्हणून अन्यायी सरकारशीं असहकार करण्याइतकी तीव्र न्यायनिष्ठा न्यायमूर्तींच्या अंतःकरणांत वसत असेल, अथवा ती जागृत होऊं शकेल अशी अपेक्षा सामान्यतः कोणीही करीत नाहीं. गांधींच्या जबानींतील या सिद्धांताचा बोधही त्या वेळीं किती लोकांना झाला असेल, याची शंकाच आहे. परंतु अन्यायाशीं अनत्याचारी असहकार करणें हा प्रत्येक मानवाचा धर्म आहे, अशी जगाला शिकवण देण्यासाठीं अवतरलेल्या महात्म्यानें न्यायाधीशापुढें सादर केलेल्या जबानींत आपल्या धर्मास अनुसरून, त्याच्या परमेश्वरासंबंधींच्या कर्तव्याची जाणीव न्यायाधीशास करून दिली, तर त्यांत नवल नाहीं. न्यायाधीशासहित कोणत्याही मानवी

प्राण्यानें कायदा हेंच आपलें परब्रह्म न मानितां सत्यरूपी परब्रह्माच्या उपासनेसाठीं कायद्याचा भंग करणें हेंच सर्वांचें सर्वश्रेष्ठ कर्तव्य आहे, याची जाणीव गांधींनीं न्यायाधीशास करून दिली असली तर तें यथायोग्यच होय. पण तें केवळ कायद्याचें कोर्ट होतें ; तेथें न्यायाचा किंवा सत्याचा विचार करण्याचें कोणास कारण वाटलें नाहीं हें साहजिकच होय.

गांधींनीं ता. १२ मार्चलाच, हकीम अजमलखान राष्ट्रसभेचे अध्यक्ष होते, त्यांना पत्र लिहून कळविलें कीं, आतां माझ्यामागून कोणीही कायदेभंग करून, मग तो बचावाचा असो कीं चढाईचा असो, तुरुंगांत जाऊं नये. लोकांनीं आतां हिंदु-मुसलमान-ऐक्य, अस्पृश्यता-निवारण आणि खादी या विधायक कार्यावर सर्व शक्ति केंद्रित करावी. देशांतील सहकारितावादी पक्षाविषयीं विरोधी भावना टाकून प्रेमानें त्यांना जिंकण्याचा प्रयत्न करावा. हिंदु, मुसलमान, इत्यादि सर्व धर्मांच्या लोकांनीं धर्मबुद्धीनें व कर्तव्यभावनेनें नित्य सूत कांतावें. सूत कांतणें हा एक हिंदु-मुसलमान, धनिक, निर्धन, स्पृश्य-अस्पृश्य या सर्वांना प्रेमानें एकत्र बांधणारा धागा आहे. हा धागा विणीत गेल्यानेंच राष्ट्र निर्माण होईल. ही विधायक राष्ट्रसेवा करण्यानेंच सर्व बहिष्कार ते अमलांत आणूं लागतील. अशा प्रेमाच्या शक्तीनें आपणांस राज्ययंत्र स्थगितही करतां येईल, मात्र त्यासाठीं विध्वंसक वृत्ति वाढविण्याची म्हणजे कोणत्याही प्रकारचा कायदेभंग करण्याची आतां गरज नाहीं. ही विधायक लोकसेवा करणारे व खादीच्या रूपानें स्वदेशीचा, अस्पृश्यता-निवारणाचा व हिंदु-मुसलमान-ऐक्याचा संदेश खेडोंपाडीं पोहोंचविणारे असहकारवादी सरकारनें तुरुंगांत घातले तर मात्र त्यांनीं मागें पहूं नये. हा खादीचा सेवाधर्म केव्हांही कोणतीही आपत्ति आली तरी सोडूं नये व सर्वस्व पणाला लावून त्याचा नित्य प्रचार करावा. मी एकटा सत्याग्रही तुरुंगांत गेलों आहें तेवढा तूर्त पुष्कळ काळ पुरा आहे.

कौन्सिलांतील असहकार

महात्मा गांधी सहा वर्षांची शिक्षा होऊन येरवडा तुरुंगांत

येऊन दाखल झाले. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं दे. बं. दास व पं. मोतीलाल नेहरू सुटून आले. पुनः कौन्सिलांत जावें कीं जाऊं नये या वादास राष्ट्रसभेंत प्रारंभ झाला. "कायदेभंग समिति" नांवाची एक चौकशी-समिति नेमण्यांत आली आणि तिनें देशभर हिंडून परिस्थितीची पाहणी केली. देशाची परिस्थिति सत्याग्रह करण्यास अनुकूल नाहीं, तेव्हां आतां कौन्सिलांत प्रवेश करून सरकारची सतत अडवणूक करावी आणि सुधारणा कायदा मोडून टाकावा असा नवा कार्यक्रम असहकारांतच सामील करून घ्यावा, अशी सूचना या कायदेभंग चौकशी-समितीनें केली. या सूचनेस पं. मोतीलाल नेहरू व दे. बं. दास या दोघांचा पाठिंबा होता. श्री. विठ्ठलभाई पटेल हेहि त्याच मताचे होते. केळकर, अणेप्रभृति महाराष्ट्रीय पुढारी याच्यापुढें जाऊन मंत्रिपदेंहि स्वीकारावींत असा उपदेश करीत असत; तरीहि पहिला बदल या दृष्टीनें त्यांचा दास, नेहरू, पटेल यांच्या अडवणुकीच्या धोरणाला पाठिंबा होता. याच्या उलट चक्रवर्ती राजगोपालाचार्य व वल्लभभाई पटेल यांचा या फेर-बदलास कसून विरोध होता. विधायक कार्य आणि झेंडासत्याग्रहा-सारखे प्रासंगिक सत्याग्रह यांवरच सर्व भर द्यावा; कायदेमंडळांत मुळींच जाऊं नये, असा यांचा आग्रह होता. पहिले आपणांस फेरवादी व दुसरे नाफेरवादी म्हणवीत असत. हा वाद १९२२ अखेर भरलेल्या गया येथील राष्ट्रसभेंत फार जोरास चढला. अध्यक्ष दे. बं. दास होते. राजगोपालाचार्य उर्फ राजाजी हे नाफेरवाद्यांचे अग्रणी होते व त्यांनीं फेरवादी पक्षाचा गयेला पूर्ण पाडाव केला. पण हा वाद येवढ्यानें मिटला नाहीं. इतक्यांत (१९२३ सालीं) मौलाना महंमदअली सुटून आले व त्यांनीं दोन्ही पक्षांचा हा वाद मिटावा अशीच गांधींचीही इच्छा असल्याचें जाहीर केलें. १९२३ मध्यें नव्या निवडणुकी होणार होत्या. त्यापूर्वी दिल्लीला मौ. आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रसभेचें खास अधिवेशन भरलें व दास-नेहरू यांच्या पक्षास निवडणुकी लढविण्याची परवानगी देण्यांत आली. अशा प्रकारें राष्ट्रसभेंत स्वराज्यपक्ष या नांवाचा एक पोटपक्ष अस्तित्वांत येऊन कौन्सिलांत अडवणूक करून घटनाभंग

करण्याचा कार्यक्रम राष्ट्रसभेनें असहकाराचाच एक भाग म्हणून मान्य केला. १९२३ डिसेंबरमध्यें मौ. महंमदअली यांच्या अध्यक्षतेखालीं कोकोनाडा येथें राष्ट्रसभेचें अधिवेशन झालें. त्यांतही तो कार्यक्रम मान्यता पावला. राष्ट्रसभेची गाडी अशा प्रकारें शुद्ध गांधीवादापासून दुसरीकडे जाऊं लागली. गांधी येरवडा तुरुंगांत शांतपणें विश्रांति घेत होते. तुरुंगांत गेल्यानंतर बाहेरच्या राजकारणाचें नेतृत्व करण्याची हांव धरूं नये व बाहेरच्या नेत्यांनीं आपल्या बुद्धीप्रमाणें आपलें कर्तव्य करावें, अशा वृत्तीनें ते या बाबतींत तटस्थ होते. त्यांना सहा वर्षें बंदीवासांत काढावयाचीं होतीं.

आजारीपण, मुक्तता आणि विधायक संघटना

येरवडा तुरुंगांत असतांना १९२४ च्या जानेवारी महिन्यांत महात्मा गांधींना अपेंडिसायटीसचा एक भयंकर आघात झाला. कर्नल मॅडॉक हे जेल-सुपरिंटेंडेंट व पुण्याचे सिव्हिल सर्जन होते. त्यांनीं ता. १२ जानेवारीस गांधींना तपासलें. तेव्हां ताबडतोब शस्त्रक्रिया करण्यावाचून गत्यंतर नाहीं अशी त्यांची खात्री झाली. त्यांनीं गांधींना लगेच ससून हॉस्पिटलमध्यें नेलें आणि शस्त्रक्रिया करूं किंवा नको, तुमचा कोणी विश्वासाचा दुसरा डॉक्टर किंवा इतर आप्तेष्ट बोलावूं का, असें मॅडॉक यांनीं गांधींना विचारलें. गांधींनीं ताबडतोब तुम्हीच शस्त्रक्रिया करा, माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे, असें सांगितलें. या वेळीं पुण्यांत भारतसेवकसमाजाचे अध्यक्ष व गांधींचे गुरुबंधु ना. शास्त्री होते. पहिले पूर्ण सहकारवादी व दुसरे पूर्ण असहकारवादी अशीं यांचीं राजकारणें परस्परांहून भिन्न होतीं. तरीही गांधींनीं त्यांनाच बोलाविलें आणि त्यांच्या समक्ष क. मॅडॉक यांनीं ऑपरेशन करावें असें लिहून दिलें. या वेळीं राजबंदी या नात्यानें कोणतेंही राजकारण बोलण्याचा मोह गांधींनीं धरिला नाहीं आणि शस्त्रक्रियेस ते सज्ज झाले.

या वेळीं आणखी एक घोटाळा झाला. शस्त्रक्रिया करण्यासाठीं गांधींना भूल देऊन टेबलावर घेतलें तेव्हां रात्र होती, व हॉस्पिटल-

मधील विजेचे दिवे एकाएकीं विजेचा प्रवाह बंद पडून विझून गेले! सर्वत्र अंधार झाला. अखेरीस दुसरे साधे दिवे लावून शस्त्रक्रिया केली व सुदैवानें ती यशस्वी झाली. गांधींच्या आयुष्यांतील हा एक अपमृत्युच झाला. क. मॅडॉक यांच्या शस्त्रकौशल्यावर सर्व जगांतील सर्वश्रेष्ठ मानवाचें जीवित त्या वेळीं अवलंबून होतें आणि गांधीजींचा या वेळीं अंत झाला असता तर त्यांच्यावर व ब्रिटिश राज्यकर्त्यांवर हिंदी जनतेचा व जगांतील विचारवंतांचा जो रोष झाला असता तो कल्पनातीत होता. पण त्यांच्या, ब्रिटिशांच्या, हिंदी जनतेच्या व मानवसमाजाच्या सुदैवानें गांधींचे प्राण या अपमृत्यूंतून वाचावले. मॅडॉक यांचें हस्तकौशल्य, शास्त्रनैपुण्य, कर्तव्यदक्षता, गांधींची स्थितप्रज्ञाची शांत व निर्विकार वृत्ति आणि अनुकूल योगायोग या सर्व कारणांच्या समुच्चयानें ही आलेली आपत्ति दूर झाली.

गांधीजींच्या या दुखण्यामुळें सर्व राष्ट्राला काळजी उत्पन्न झाली. सर्व जगभर त्यांच्याविषयीं आपुलकी वाटत असल्याचें पहिलें निदर्शन या वेळीं जनतेला अनुभवतां आलें. सर्व पक्षांकडून आणि सर्व राष्ट्रांतील विचारवंतांकडून गांधींना बंधमुक्त करण्याची मागणी होऊं लागली. गांधींना हॉस्पिटलमध्यें कांहीं आप्तेष्टांना भेटण्याची परवानगी या वेळीं देण्यांत आली होती. पं. मोतीलाल व जवाहरलाल या वेळीं त्यांना भेटून गेले. पण थोडें बरें वाटूं लागतांच सरकारनें पुनः त्यांना तुरुंगांत नेऊन ठेविलें हें पाहून लोकांना फार दुःख आणि संताप वाटूं लागला. पण ५ फेब्रुवारीस त्यांची बिनशर्त मुक्तता झाली हें ऐकून सर्वांना हायसें वाटलें.

या वेळीं गांधींची प्रकृति बरीच क्षीण झाली होती. हवापालट करण्यासाठीं ते जुहूस जाऊन समुद्रकाठीं राहिले. या वेळीं पं. मोतीलाल नेहरू हे गांधींच्याशीं राजकारणाची सविस्तर चर्चा करण्यासाठीं तेथें एक बंगला घेऊन राहिले. पं. जवाहरलाल हेही बरोबर होतेच. मोतीलाल हे आपला कौन्सिलवादी कार्यक्रम गांधींना पटवून देण्यासाठीं व शक्य तर त्यांचा त्यास आशीर्वाद मिळविण्यासाठीं आले होते. पण

बरेच दिवस चर्चा करूनही गांधींनीं त्यांच्या कार्यक्रमास आपली मान्यता दिली नाहीं. देशांतील परिस्थिति बदललेली आहे, हें त्यांना मान्य होतें. पण राष्ट्रसभेनें स्वतः कौन्सिलच्या कामांत पडावें आणि सतत विरोध, अडवणूक व घटनाभंग करण्यासाठींच निवडून येण्याची दगदग करावी हें त्यांना मान्य नव्हतें. यापेक्षां तिनें हें प्रातिनिधिक राजकारण इतर पक्षांकडे सोंपवावें; ज्यांचा त्या राजकारणामुळें जनतेचें हित होईल असा विश्वास होता त्यांना तें करूं द्यावें आणि राष्ट्रसभेच्या सेवकांनीं खेड्यांतील जनतेची प्रत्यक्ष सेवा विधायक वृत्तीनें करीत राहावें अशी त्यांची वृत्ति होती. प्रत्यक्ष सेवेंतून जनतेची ओळख होते, तिचा विश्वास संपादन करतां येतो, इतर राजकीय पक्षांशीं स्पर्धा व चुरस वाढत नाहीं आणि जनतेचें व सेवकांचें आत्मबल वाढीस लागतें. असें प्रत्यक्ष सेवेचें कार्य सतत करीत राहिलें म्हणजे केव्हां तरी प्रत्यक्ष प्रतिकाराची वेळ आपोआप चालून येते व त्या वेळीं जनतेला अनत्याचारी प्रतिकार करण्यास शिकवावें, ही वृत्ति सर्व राष्ट्रसभेनें स्वीकारावी अशी गांधींची दृष्टि होती. प्रत्यक्ष सेवा आणि प्रत्यक्ष प्रतिकार हेंच सत्याग्रही राजकारण आणि ज्यांनीं अनत्याचारी असहकाराची दीक्षा घेतली असेल, त्यांनीं येवढेंच करीत राहावें. मोतीलालजींना हें मत मान्य नव्हतें व गांधींना कौन्सिलवाद मान्य नव्हता. यामुळें दोघांची एक दृष्टि होऊं शकली नाहीं, तरीही दोघांनीं एकमेकांचा दृष्टिकोण समजून घेतला आणि दोन्ही वृत्तींच्या लोकांना राष्ट्रसभेंत स्थान असावें व दोघांनीं परस्परांशीं स्नेहानें, आदरानें व सहकार्यानें वागावें असें ठरलें. याप्रमाणें म. गांधी व पं. मोतीलाल यांनीं दोन निवेदनें काढून आपापलीं मतें जनतेपुढें मांडलीं.

म. गांधींचें निवेदन

गांधींच्या निवेदनाचा थोडक्यांत सारांश असा होता: (१) मला असहकाराचा जो अर्थ वाटतो त्याच्याशीं कौन्सिल-प्रवेश हें विसंगत धोरण आहे. कौन्सिलबहिष्कार हें त्रिविध बहिष्काराचें (–कौन्सिलें, कोर्टें व शिक्षण संस्था–) एक अंग असून त्यांच्यामागें एकच वृत्ति

आहे. या वृत्तीला कौन्सिल-प्रवेश मारक असल्यानें त्यापासून बहिष्काराहून अधिक लोकहित होईल हें मला पटत नाहीं. माझें मतही स्वराज्यपक्षाला पटण्याची अपेक्षा नव्हतीच. म्हणून कौन्सिल-प्रवेश ही घटना घडून आली असल्यामुळें देशानें माझें मत व स्वराज्यपक्षाचें मत यासंबंधीं कोणती वृत्ति धारण करावी येवढाच प्रश्न आहे. नाफेरवाद्यांनीं स्वराज्यपक्षीयांना विरोधच करीत राहून त्यांचें शत्रुत्व करायचें, कीं तटस्थ राहून आपल्या तत्त्वांशीं विसंगत न होतां शक्य तेथें साहाय्य करावयाचें ?

(२) दिल्ली व कोकोनाडा या अधिवेशनांनीं परवानगी दिल्यानंतर स्वराज्यपक्ष कौन्सिलांत गेला असल्यानें नाफेरवाद्यांनीं पूर्ण तटस्थ राहून त्यास आपल्या वृत्तीप्रमाणें काम करूं द्यावें आणि सर्व विरोधी प्रचार बंद करावा. दिल्ली व कोकोनाडा या अधिवेशनांच्या ठरावामागील हेतु स्वराज्यपक्षीयांना आपल्या निष्ठेप्रमाणें प्रयोग करण्याचें स्वातंत्र्य द्यावें असाच होता व म्हणून त्याच्या कामांत नाफेरवाद्यांनीं विघ्नें आणूं नयेत व विरोधी प्रचार करूं नये ; शक्य तेथें साहाय्य करावें.

(३) सतत, सुसंगत विरोध व अडवणूक करण्यासाठींच कौन्सिलांत जावें हें मला मान्य नाहीं. त्यापेक्षां (१) खादीला कायदेशीर उत्तेजन देणें व खादीचाच सर्व खप वाढेल अशी व्यवस्था करणें, (२) परकीय कापडाच्या आयातीवर प्रतिबंधक जकात बसविणें आणि (३) मादक पदार्थ व मद्य यांच्यापासून मिळणारें सरकारी उत्पन्न बंद करून ती खोट लष्करी खर्चांत कपात करून भरून काढण्याचा कायदेशीर प्रयत्न करणें, असे ठराव करून, सरकार जर ते अमलांत आणणार नाहीं तर कौन्सिलें बरखास्त करण्याची मागणी करावी. तें ऐकिलें नाहीं तर स्वतः राजीनामे द्यावेत आणि देशाची कायदेभंगास तयारी करावी. अशी परिस्थिति निर्माण झाली कीं मी स्वराज्यपक्षाबरोबर व त्याच्या हाताखालीं काम करीत आहें, असेंच त्यांना आढळून येईल.

(४) जे नाफेरवादी असतील त्यांनीं स्वराज्यपक्षावर टीका करीत न राहतां सर्व शक्ति खादी व राष्ट्रीय शिक्षण या दोहोंवर विशेष केंद्रित

करावी ; शिवाय हिंदु-मुसलमान-ऐक्य ही एक आपली सत्त्वपरीक्षा पहाणारी बाब आहे हें लक्षांत घ्यावें.

हें सर्व निवेदन राष्ट्रसभेच्या संघटनेचा मूलभूत विचार केल्यावांचून अपुरेंच आहे. त्यासंबंधीं माझे महत्त्वाचे विचार आहेत, पण ते इतक्यांत मांडण्याची गरज नाहीं.

या वेळीं पं. मोतीलालजींनींही एक निवेदन काढलें. त्याचा सारांश पुढीलप्रमाणें होता. त्याखर दे. बं. दास यांचीही सही होती.

पं. मोतीलाल व दे. बं. दास यांचें निवेदन

(१) स्वराज्यपक्षाचें धोरण योग्य आहे अशी महात्मा गांधींची खात्री आम्ही करूं शकलों नाहीं याबद्दल आम्हांस खेद होतो. असहकार ही जर केवळ एक मनोवृत्तीचीच गोष्ट असेल आणि आमचें कौन्सिलांतील कार्य असहकाराच्या मनोवृत्तीशीं सुसंगत नसेल तर तो शब्दही सोडून देण्यास आमची कांहीं हरकत नाहीं. आमच्या मताप्रमाणें राष्ट्राची स्वावलंबनशक्ति वाढावी आणि नोकरशाही आमच्या स्वराज्याच्या मार्गांत जे अडथळे निर्माण करीत आहे, त्यांचा प्रतिकार करावा असें आमचें धोरण आहे. व नागपूर कॉंग्रेसच्या असहकाराच्या ठरावांत तें सामावूं शकेल, एवढें स्पष्ट करून आम्ही हा शाब्दिक वाद सोडून देतों.

(२) कायदेमंडळांत अडवणूक करणें, सतत, सुसंगत, आणि निर्भेळ अडवणूक हे आमचे शब्द व आमचें धोरण असलें तरी आमचा खरा अर्थ स्वराज्याच्या आमच्या मार्गांत नोकरशाहीनें निर्माण केलेल्या अडथळ्यांचा प्रतिकार करणें असाच आहे. देशाच्या एकंदर जमाखर्चापैकीं फक्त $\frac{1}{6}$ जमाखर्चासंबंधींच लोकप्रतिनिधींचें मत घेण्यांत येतें. अशी परिस्थिति आहे, तोंपर्यंत कायदेमंडळापुढें येणारीं सर्व अंदाजपत्रकें फेंटाळून लावणें हेंच आमचें धोरण राहील.

(३) नोकरशाही आपली सत्ता खंबीर करण्यासाठीं जे जे कायदे कायदेमंडळापुढें ठेवील, त्यांपासून आपाततः थोडेफार हित होण्याचा

आभास निर्माण होत असला तरी अशा क्षणिक हिताकडे दुर्लक्ष करून, देशाच्या मोठ्या हिताच्या दृष्टीनें आम्ही असे सर्व कायदे फेंटाळून देऊं.

(४) महात्मा गांधींनीं आपल्या निवेदनांत सुचविल्याप्रमाणें विधायक कार्यास साहाय्य करणारे ठराव आम्ही आणूं. देशाची संपत्ति बाहेर जाऊं नये असें आमचें आर्थिक धोरण आम्ही आंखून घेऊं. मध्य-कायदेमंडळ आणि प्रांतिक कायदेमंडळें यांच्या सभासदांची निवडणूक ज्यांत होईल, अशा कमिट्यांमध्यें आम्ही काम करूं.

(५) कायदेमंडळांतील कामापेक्षां त्याच्याबाहेरील विधायक कार्यच अधिक महत्त्वाचें असून कायदेमंडळाबाहेरील विधायक कार्याची शक्ति हीच खरोखर कायदेमंडळांतील काम यशस्वी होण्यामागील प्रभावी शक्ति असते. ही शक्ति जेव्हां भरपूर निर्माण होईल, आणि देशाची कायदेभंग करण्याची शक्ति प्रत्ययास येईल तेव्हां आम्ही महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं व काँग्रेसच्या झेंड्याखालीं सत्याग्रह करण्यास पुन्हा येऊन उभे राहूं.

(६) देशांतील कामगारवर्गाचें संघटन करण्यासाठीं जी कामगार-संघ काँग्रेस स्थापन झालेली आहे, तशी संस्था कामगारांच्या हितरक्षणास अवश्य आहे, असें आमचें मत असलें तरी कारखानदारांचेंही योग्य हितरक्षण झालें पाहिजे. दीर्घकालीन दृष्टीनें विचार केल्यास दोन्ही वर्गांचें हित एकच आहे असें दिसून येतें.

निष्कर्ष

वरील निवेदनावरून दिसून येईल कीं, राष्ट्रीय सभेच्या दोन्ही पक्षांत जरी तात्त्विक मतभेद असले तरी त्यांचें मूलभूत मतैक्यच आहे.

वरील दोन्ही निवेदनें वाचलीं असतां, असें लक्षांत येईल कीं, कायदेमंडळांतील कार्य हें असहकारवादी राष्ट्रीय सभेनें केव्हांच अंगीकारूं नये, अशी महात्मा गांधींची इच्छा होती. ही भूमिका

तिच्यांतील स्वराज्यपक्षास मान्य नव्हती आणि कायदेमंडळांतील अडवणूक हा एक असहकाराचाच प्रकार आहे, असें स्वराज्यपक्षाचें म्हणणें होतें. राष्ट्रीय सभेनें आपल्या पोटांत या दोन्ही वृत्तींना आश्रय देण्याचें ठरवावें असा या दोन्ही निवेदनांचा मथितार्थ आहे. हें लक्षांत घेतल्यास राष्ट्रसभा ही केवळ गांधी सांप्रदायाची संस्था बनवावी, असा प्रयत्न गांधी या वेळीं करीत होते हें मत निराधार असल्याचें दिसून येईल. केवळ बहुमताच्या जोरावर या वेळीं आपले सांप्रदायिक मत गांधींना राष्ट्रीय सभेवर लादणें शक्य होतें. तसें त्यांनीं केलें असतें तर, स्वराज्यपक्षास त्या संस्थेंतून बाहेर पडण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. पण गांधी हे आपलीं मतें न सोडण्याच्या बाबतींत कितीही आग्रही असले तरी आणि केवळ युक्तिवादानें इतर सर्वांना आपल्या मतास वळवून घेण्यास ते सतत प्रयत्न करीत असले तरी राष्ट्रसभा ही संस्था केवळ बहुमतानें आपली सांप्रदायिक संस्था बनवावी, असा त्यांनीं केव्हांच आग्रह धरला नाहीं. या वेळीं नाफेरवादी म्हणविणारे, चक्रवर्ती राजगोपालाचार्य आणि वल्लभभाई पटेल, हे स्वतःस गांधी सांप्रदायी म्हणवीत असत, परंतु म. गांधींची प्रतिपक्षासंबंधींची उदार, सहिष्णु वृत्ति त्यांच्या अंगीं त्या वेळीं नव्हती व पुढेंही आली नाहीं. तरी गांधीनीं उदारपणानें स्वराज्य-पक्षाशीं समेट केला, आणि त्याला राष्ट्रीय सभेंत राहून आपलें कार्य करूं दिलें. इतकेंच नाहीं तर, आपल्या सांप्रदायिक अनुयायांना आवरून धरून ही परमतसहिष्णुतेची अहिंसा त्यांना शिकविली व आपलीं मतें न सोडतां, देशबंधु दास व मोतीलाल नेहरू, यांना कसें सहाय्य करतां येतें तें प्रत्यक्ष उदाहरणानें दाखवून दिलें. अल्पसंख्य पक्षासंबंधीं इतकी उदार वृत्ति व सहिष्णु धोरण राष्ट्रीय सभेनें स्वीकारलेंच पाहिजे, असा आग्रह त्यांनीं धरला आणि अखेरपर्यंत ही राष्ट्रीय संस्था देशातील राजसत्ता काबीज करणारी एकपक्षीय संस्था बनूं नये, याबद्दल जिवाचा आटापिटा केला. पुढें त्यांचे सांप्रदायिक अनुयायी म्हणविणारे राजगोपालचार्य आणि वल्लभभाई हे कौन्सिलवादी बनले आणि त्यानीं अधिकारस्वीकार

केला. तरीही त्या वेळीं गांधींनीं स्वतः तें तत्त्व स्वीकारलें नाहीं आणि काँग्रेसमध्यें १९३५ नंतर जो नवा समाजवादी पक्ष स्थापन झाला त्यालाही बहुमताच्या जोरावर चिरडून न टाकतां किंवा बाहेर हाकलून न देतां, सन्मानानें आपल्या राष्ट्रीय संघटनेंत सामावून घ्या, हाच उपदेश त्यांनीं आपल्या अनुयायांस अखेरपर्यंत केला. ज्या दिवशीं राष्ट्रीय सभा ही संस्था, केवळ एक सांप्रदायिक राजकीय पक्ष बनेल त्या दिवशीं तिचें सर्व जनतेच्या वतीनें बोलण्याचें स्वरूप नष्ट होईल व म्हणून तिला राष्ट्रसभा हें नांवही देतां येणार नाहीं, असाच त्यांचा अखेरपर्यंत आग्रह होता. व ते हयात असेपर्यंत तो आग्रह राष्ट्रसभेनें अमलांतही ठेवला होता, याची हकीगत पुढें येईलच.

विधायक कार्याची संघटना

यानंतर महात्मा गांधींनीं राष्ट्रीय सभा व तिचें राजकारण हळूहळू दास, नेहरू यांचे हातीं देऊन, अखिल भारतीय चरखा संघ आणि राष्ट्रीय शिक्षण या विधायक प्रवृत्तीवर आपलें सर्व लक्ष केंद्रित करण्याचें ठरविलें. जुहू येथें वर सांगितलेलीं राजकीय बोलणीं जेव्हां चालू होतीं तेव्हां पंडित जवाहरलाल नेहरू हेही हजर होते. त्यांना फेर-नाफेर वादामध्यें विशेष रस वाटत नव्हता; तथापि राष्ट्रीय सभेनें संपूर्ण स्वातंत्र्य हें आपलें ध्येय जाहीर करावें आणि सार्वत्रिक सत्याग्रहाची तयारी लगेच करावी अशी त्यांची मनोवृत्ति होती. गांधींना हाही विचार पटला नाहीं. प्रत्यक्ष लोकसेवा करून विधायक कार्यानें प्रचंड संघटना निर्माण करावी, म्हणजे प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ करण्याची संधि जेव्हां येईल तेव्हां आपली तयारी राहील; ही तयारी होण्यापूर्वी उतावीळ होऊन प्रक्षोभक राजकीय ध्येयांचा प्रचार करण्यांत अर्थ नाहीं असा गांधींचा उपदेश होता. हा उपदेश जवाहरलाल यांना त्या वेळीं पटला नाहीं व तेही निराश होऊन गेले.

यानंतर लवकरच अखिल भारतीय काँग्रेस समिति १९२४ च्या जून महिन्यांत अहमदाबाद येथें भरली. गांधींनीं जुहू येथें स्वराज्यपक्षाशीं जो समेट करण्याचें ठरविलें होतें त्या समेटास मान्यता मिळवून घेणें

हाच या सभेचा मुख्य उद्देश होता. या वेळीं राष्ट्रीय सभेच्या प्राथमिक सभासदास वार्षिक चार आणे वर्गणी देण्याची जी अट होती ती बदलून घेऊन दरमहा अमुक वार सूत कातणें आणि नित्य खादी वापरणें अशा दोन अटी घालाव्या, असा गांधींचा आग्रह होता. काँग्रेस ही संस्था लोकसेवकांची आहे आणि तिचा प्रत्येक सभासद लोकसेवेचें व्रत घेऊन, दररोज कांहीं काळ शरीर-श्रमाचें काम करून, देशाला अत्यंत आवश्यक भौतिक संपत्ति निर्माण करीत आहे, याची ओळख जनतेला पटावी आणि काँग्रेसच्या सभासदाचें सार्वजनिक शील वाढावें असा गांधींचा या बाबतींतला दृष्टिकोण होता. स्वराज्यपक्षाच्या लोकांनीं आपलें हें म्हणणें मान्य करावें आणि आपण त्यांच्या कौन्सिलांतील कार्यास पाठिंबा द्यावा, असा उभयपक्षीं समेट गांधींनीं घडवून आणला. दास, नेहरू यांनीं हा समेट मान्य केला, पण पुढें एक वर्षाचे आंत राष्ट्र-सभेच्या सभासदांचें हें स्वरूप अव्यवहार्य असें ठरविण्यांत येऊन सुताच्या अटीऐवजीं वार्षिक चार आणे वर्गणी वैकल्पिक म्हणून ठरविण्यांत आली. याचा व्यावहारिक अर्थ सुताची वर्गणी रद्द झाली असाच होता व तसा तो पुढें उघडपणें करण्यांत आला. गांधींनीं आपली ही अटही आतां काढून घेतली आणि स्वराज्यपक्षार्शी, आपलें तत्त्व न सोडतां, शक्य तें सहकार्य करण्याचें धोरण १९२५ पासून स्वीकारलें.

१९२४ च्या अखेरीस बेळगांव येथील काँग्रेसचे अध्यक्ष गांधी होते. तेथें त्यांनीं, असहकारितेचें धोरण काँग्रेसनें बिनमुदत स्थगित करावें असा ठराव मंजूर करून घेतला. स्वराज्यपक्षार्शी झालेला समेट बेळगांवास खुल्या अधिवेशनांत मान्य करून घेतलाच. याच्यापूर्वी महात्मा गांधींनीं देशांतील हिंदु-मुसलमानांचें ऐक्य व्हावें या उद्देशानें ता. १८ सप्टेंबर १९२४ पासून २१ दिवसांचा एक मोठा उपवास केला. हा उपवास चालू असतां, ते दिल्लीस मौ. महंमदअली यांच्या घरीं होते. तेथें हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांची एक मोठी परिषद झाली

आणि तींत सर्वांच्या संमतीनें असा ऐक्य निर्माण करण्याचा एक मसुदा तयार होऊन, त्यावर सर्वांच्या सह्या झाल्या; पण त्याचा पुढें काहींही विशेष परिणाम झाला नाहीं. हिंदु-मुसलमानांचे दंगे वाढतच चालले आणि असहकाराच्या पहिल्या चळवळीच्या वेळीं खिलाफत-प्रकरणामुळें जसें या दोन धर्मांच्या जनतत ऐक्य निर्माण झालें होतें तसें पुनः केव्हांही होऊं शकलें नाहीं.

१९२५ सालच्या एप्रिल महिन्यांत गांधींनीं आपल्या 'यंग इंडिया' पत्रांत उघडपणें लिहिलें कीं, "मी आतां हिंदु-मुसलमान प्रश्नावर आपणांस तज्ज्ञ मानीत नाहीं." (I no longer consider myself as an expert on the Hindu-Muslim question.") तरीही खिलाफत चळवळीमुळें मुसलमान समाजांत एक राष्ट्रीय पक्ष निर्माण झाला व तो पक्ष राष्ट्रसभेच्या प्रत्येक सत्याग्रह-संग्रामांत भागीदार झाला हें लक्षात ठेविलें पाहिजे. पण या पक्षाला निवडणुकीच्या राजकारणांत अराष्ट्रीय मुस्लिम लीग पक्षाचा पराभव करतां आला नाहीं व मुस्लिम लीग ही संस्थाही राष्ट्रीय बनूं शकली नाहीं. यामुळें राष्ट्रसभेच्या राजकारणाविरुद्ध मुस्लिम लीगचें अराष्ट्रीय राजकारण फोफावत जाऊन हिंदु-मुसलमान समाजांचे दंगे हें एक हिंदी राजकारणांतील कायमचें अंग बनून राहिलें. यांतूनच पुढें पाकिस्तान निर्माण झालें. मात्र उरलेल्या भागांत जें संघराज्य आज आहे त्याचें स्वरूप जातिधर्मभेदातीत लोकशाही असें राहिलें आहे. अखेरीस त्याचें हें स्वरूप कायम राहावें यासाठीं प्रयत्न करीत असतांच गांधींचा वध एका हिंदुराष्ट्रवाद्यानें केला! तरीही राष्ट्रसभा ही अखेरपर्यंत केवळ हिंदूंची सभा बनली नाहीं व तिनें हिंदु-मुसलमान ऐक्यावर उभारलेली जातिधर्मभेदातीत लोकशाही हेंच आपलें ध्येय असलें पाहिजे, ही गोष्ट मुसलमानेतर जनतेला पटवून दिली याचें श्रेय बरेंचसें महात्मा गांधींना आहे. सुशिक्षित व विचारी लोकांनीं हें ध्येय नेहमींच मान्य केलेलें आहे, पण अज्ञानी जनतेला तें पटवून देण्याचें श्रेय महात्मा गांधींच्या इतकें दुसऱ्या कोणासही नाहीं. मात्र मुसलमान जनतेंतील बहुसंख्य मतदारांना

हें पटूं शकलें नाहीं. याला अनेक राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक कारणें आहेत. पण त्यांत विभक्त मतदार संघाचा कायदा हें सर्वांत प्रभावी कारण असून त्याचा हिंदी राजकारणांत प्रवेश गांधींच्याकडे राष्ट्राच्या राजकारणाचीं सूत्रें जाण्यापूर्वीच झालेला असून टिळकांनीं लखनौ करार करून व गांधींनीं खिलाफत चळवळ करून हें विष मारून टाकण्याचा प्रयत्न केला, परंतु तें विष मरूं शकलें नाहीं व अखेरीस त्यांतून देशाच्या फाळणीपर्यंत अनेक अनर्थ राष्ट्रावर गुदरले. या अनर्थांचीं पूर्वचिन्हें १९२४ नंतर हिंदु-मुसलमानांच्या दंग्याच्या रूपानें दिसूं लागलीं.

१९२५ सालीं देशबंधु दास हे अकालीं निधन पावले आणि पंडित मोतीलाल नेहरू हेच स्वराज्यपक्षाचे नेते बनले. हिंदु-मुसलमानांच्या दंग्यामुळें पंडित मालवीय व लाला लजपतराय यांनीं स्वराज्यपक्ष सोडून राष्ट्रीय पक्ष नांवाचा वेगळा पक्ष काढिला आणि केळकर, अणे, मुंजे हे महाराष्ट्रीय पुढारीही स्वराज्यपक्षांतून फुटले व डॉ. जयकर याच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं प्रतियोगी सहकारिता पक्ष स्थापन केला. अशा प्रकारें कायदेमंडळांत काम करणारांचे स्वराज्य पक्ष, प्रतियोगी पक्ष व राष्ट्रीय पक्ष असे तीन तट पडले. राष्ट्रसभेनें स्वराज्यपक्षासच १९२६ अखेर होणाऱ्या निवडणुकींत पाठिंबा दिला व महात्मा गांधींचाही आशीर्वाद त्यानें मिळविला. तरी तीनही पक्ष राष्ट्रसभेंत होते व त्यांपैकीं कोणासही शिस्तभंग म्हणून बाहेर जावें लागलें नाहीं. इतकेंच नाहीं तर या पक्षांचे पुढारी राष्ट्रसभेच्या कार्यकारिणींतही सभासद असत.

महात्मा गांधींनीं १९२५ सालीं अखिल भारतीय चरखा-संघाची स्थापना केली व त्यांचे राजकीय अनुयायी म्हणवून घेणारे बहुतेक लोक या संघटनेंत सामील झाले. गांधी-सेवा-संघ या नांवाचीही एक संघटना याच वेळीं अस्तित्वांत आली. कौन्सिलांतील राजकारण व त्या-संबंधीचे पक्षोपक्ष यांपासून या संघटना अलिप्त असल्या तरी सामान्यतः त्यांना स्वराज्य पक्षाचेंच राजकारण पसंत असून हा पक्ष अखेरीस कौन्सिलचें राजकारण सोडून बाहेर पडेल व पुनः गांधींच्या नेतृत्वाखालीं

स्वराज्य-सत्याग्रह केव्हां तरी सुरू होईल अशी या लोकांची अपेक्षा होती. ही अपेक्षा १९२९ अखेर खरी ठरली. १९३० सालीं महात्मा गांधींनीं जो प्रचंड स्वातंत्र्य-सत्याग्रह केला, त्यांत स्वराज्यपक्ष पं. मोतीलाल नेहरूंच्या सल्ल्यानुसार कौन्सिलावर बहिष्कार टाकून सामील झाला.

जवाहरलाल, सुभाषचंद्र आणि जयप्रकाश यांची नवी पिढी

१९२४ सालीं बेळगावच्या अधिवेशनात 'अनत्याचारी असहकार' हें धोरण राष्ट्रसभेनें स्थगित केलें, आणि तिचें राजकारण १९२९ अखेर पंडित मोतीलाल नेहरूंच्या स्वराज्यपक्षाकडे गेलें आणि १९२९ डिसेंबरअखेर लाहोर येथें तिचें अधिवेशन होऊन, कौन्सिलावर बहिष्कार टाकून स्वातंत्र्याचा सत्याग्रह सुरू करावा असा ठराव होऊन त्या सत्याग्रह-संग्रामाचें सेनानीपद महात्मा गांधींना देण्यात आलें. यामुळें स्वराज्यपक्षाऐवजीं राष्ट्रसभेंतील नाफेरवादी पक्ष आतां देशांतील राजकारणाचा नेता बनला असा कोणास भास झाला तरी तो केवळ भासच होता. १९२७ पासून देशांतील राजकारणांत तरुणांचें एक नवें राजकारण सुरू झालें होतें. हें स्वातंत्र्यवादी व समाजवादी राजकारण होतें. युवक-संघ, स्वातंत्र्य-संघ या रूपानें तरुणांत एक नवी शक्ति निर्माण होत होती. देशांतील स्वराज्यपक्षाच्या प्रातिनिधिक संस्थांतील राजकारणांत या तरुणांना विशेष 'राम' दिसत नव्हता. ते तरुण स्वातंत्र्यनिष्ठ होते व त्यांचें चित्त रशियांतील समाजवादी क्रांतीनें वेधून घेतलेलें होतें. गांधींच्या अहिंसावादावर त्यांचा विश्वास नव्हता, तरीहि त्यांच्यापाशीं एक प्रत्यक्ष प्रतिकाराचा कार्यक्रम आहे हें त्यांना दिसत होतें. १९२७ सालच्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय राष्ट्रसभेनें मान्य केलें, कोणत्याही साम्राज्यवादी युद्धाशीं सहकार्य करावयाचें नाहीं असा ठराव केला आणि ज्या साम्राज्यविरोधी चळवळी युरोपांत व आशियांत चालू होत्या त्यांच्याशीं सख्य व सहकार्य करण्याचें धोरणही कांहीं अंशीं मान्य केलें. १९२७ च्या डिसेंबरांत

डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखालीं मद्रास येथें राष्ट्रसभेचें जें अधिवेशन झालें त्यांत हे ठराव पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रयत्नानें मंजूर झाले.

१९२६ च्या अखेरीस ब्रुसेल्स येथें एक साम्राज्यविरोध परिषद भरली होती. या परिषदेस इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, इत्यादि साम्राज्यवादी युरोपीय राष्ट्रांच्या जित देशांतील बरेच प्रतिनिधि आले होते. चीन मधील क्युओमिनटँग (तेथील राष्ट्रीय पक्षाचें नांव) या पक्षाचे प्रतिनिधीही होते. याच्या आधीं कांहीं दिवस पंडित जवाहरलाल नेहरू हे युरोपांत गेले होते. ते तिकडे असतांनाच त्यांना या परिषदेची बातमी लागली. आपणास काँग्रेसच्या वतीनें या परिषदेस प्रतिनिधि म्हणून हजर राहतां यावें अशी त्यांनीं तेथील काँग्रेस नेत्याना विनंती केली व ती मान्य होऊन, हिंदी राष्ट्राच्या वतीनें ते त्या परिषदेस उपस्थित राहिले. या वेळेपासून त्यांचा युरोपांतील समाजवादी पुढाऱ्यांशीं परिचय झाला. तसेंच चीनमधील राष्ट्रीय पक्षाशींही त्यांचा संबंध जडत गेला. आशिया खंडांतील भावी राजकारणांत आपआपल्या देशांतील राष्ट्रीय पक्षांचा युरोपखंडांतील समाजवादी पक्षाशीं संबंध वाढवावा आणि आपल्या देशांतील राष्ट्रीय आंदोलनास समाजवादी दृष्टिकोन स्वीकारण्यास लावावें असें धोरण, तेथें जमलेल्या प्रतिनिधींनीं स्वीकारलें होतें. या परिषदेनंतर कांहीं दिवसांनीं १९२७ च्या उत्तरार्धांत पं. जवाहरलाल नेहरू हे युरोपांतून आपल्या देशांत परत आले. त्या वेळीं हिंदुस्थानास १९२९ सालानंतर अधिक सुधारणा देण्याचा विचार करण्यासाठीं सायमन-कमिशन नावाचें ब्रिटिश पार्लमेंटच्या सात सभासदांचें एक मंडळ हिंदुस्थानांत पाहणी करण्यासाठीं आलें होतें. यांत हिंदी लोकांचा एकही प्रतिनिधि नसल्यामुळें त्याच्यावर बहिष्कार घालण्याची चळवळ राष्ट्रीय-सभेनें सुरू केली होती. या चळवळींत देशांतील तरुण सामील होऊन त्या आंदोलनांत समाजवादी क्रांतीच्या भावना पेरीत होते. पं. जवाहरलाल नेहरू यांनीं याच युवक चळवळींत नेतृत्व स्वीकारलें होतें. देशगौरव या नांवानें त्या वेळीं प्रसिद्ध असलेले सुभाषचंद्र बोस हेही त्या चळवळींत अग्रभागीं होते. राष्ट्रीय सभेनें

स्वातंत्र्याचें ध्येय मान्य केल्यानंतर, ठिकठिकाणीं युवक-संघ व स्वातंत्र्य-संघ या नांवाच्या संस्था स्थापन होऊन देशांत क्रांतिकारक वातावरण फैलावूं लागल. सायमन-कमिशन ज्या ज्या ठिकाणीं जाइल त्या त्या ठिकाणीं प्रचंड सभा आणि निदर्शनें होत आणि सायमन-कमिशनवर बहिष्कार घालण्याच्या मिरवणुकी निघत असत. हें कमिशन देशातील सर्व मोठमोठ्या शहरांत हिंडलें आणि ठिकठिकाणीं त्याच्यावर बहिष्कार घालण्याचीं जीं निदर्शनें झालीं तीं पोलिसांनीं उधळून लावण्याचा प्रयत्न केला. लाहोर येथें असें निदर्शन झालें तेव्हां जो लठीमार झाला त्यांत लाला लजपतराय याना मार लागला आणि त्यांत ते जे आजारी पडले त्यांतच अखेरीस त्यांचा अंत झाला. या एकंदर प्रकारामुळें देशातील स्वातंत्र्याची चळवळ फोफावत जाऊन तरुणांत क्रांतिकारक वृत्ति वाढूं लागली.

१९२८ सालीं राष्ट्रीय-सभेनें स्वराज्याची एक सर्वमान्य योजना ठरविण्यासाठीं नेहरू-कमिटी नांवाची एक कमिटी नेमली होती. पंडित मोतीलाल नेहरू हे त्या कमिटीचे अध्यक्ष होते. तिनें बनविलेली योजना 'नेहरू-रिपोर्ट' या नांवानें प्रसिद्ध झाली. संपूर्ण स्वातंत्र्य हें राष्ट्रीयसभेनें आपलें ध्येय जाहीर केलें असलें तरी ताबडतोब वसाहतीचें स्वराज्य दिल्यास देशांतील सर्व पक्षांनीं त्याचा स्वीकार करावा, असा या रिपोर्टाचा आशय होता. पंडित जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस या तरुण पुढाऱ्यांना ही तडजोड मान्य नव्हती. १९२८ सालीं कलकत्ता येथें राष्ट्रीयसभेचें अधिवेशन डिसेंबरांत झालें; त्याचे अध्यक्ष पंडित मोतीलाल नेहरू हे होते. त्यांनीं मुद्दाम तार करून महात्मा गांधींना अधिवेशनास हजर राहण्याची विनंति केली होती व त्याप्रमाणें ते हजर राहिले.

१९२८ सालीं घडलेली दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे बार्डोली तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं सत्याग्रह करून, आपल्या तालुक्यावर जी नवी सारावाढ लादण्यांत आली होती ती रद्द करून घेतली ही होय. या चळवळीचें नेतृत्व वल्लभभाई पटेल यांच्याकडे असून त्यांत विजय संपादन

केल्यानंतर त्यांना सरदार वल्लभभाई असें म्हणण्यात येऊं लागलें. गांधींचे एकनिष्ठ अनुयायी म्हणून त्या वेळीं ते प्रसिद्ध असून कौन्सिलांतील राजकारणांत काहीं अर्थ नसून खरी शक्ति खेड्यांतील जनतेंत निर्माण करावी आणि सत्याग्रह करून सरकारला आपल्यापुढें प्रत्यक्ष प्रतिकारानें नमवावें, असें त्यांचें मत होतें. हें मत त्यानीं बार्डोलीच्या सत्याग्रहाच्या रूपानें या वेळीं प्रत्यक्ष अमलांत आणून दाखविलें. हा सत्याग्रहाचा लढा प्रत्यक्ष सरदार पटेल याच्या नेतृत्वानें चालला असला तरी महात्मा गांधी यांची प्रेरणाही तिच्यामागें कार्य करीत होती. हा लढा चालू असतां पं. मोतीलाल नेहरू यांची नेहरू-कमिटी अलाहाबादेंत भरून सर्वपक्षीय स्वराज्ययोजना आखींत होती. त्या वेळीं मोतीलालजींनीं गांधीजींना त्या कमिटीच्या सभेसाठीं हजर राहण्यास बोलाविलें होतें. या वेळीं बार्डोलीचा लढा ऐन हातघाईस आलेला असल्यामुळें आपण तिकडे येऊं शकत नाहीं असा जबाब त्यांनीं दिला. या वेळीं त्यांनीं धाडलेल्या एका तारेंत असें ध्वनित करण्यांत आलें होतें कीं, तुम्ही स्वराज्याची योजना तयार करा, पण ती योजना पदरात पाडून घेण्यास जी शक्ति लागेल ती शक्ति निर्माण करण्याच्या कामांत मी गुंतलों आहें. ही शक्ति बार्डोलीस निर्माण झाली आणि ती ब्रिटिश सत्तेपुढें प्रभावी ठरली. याचा त्या वेळच्या एकंदर राजकीय वातावरणावर फार मोठा परिणाम झाला. गांधींच्या सत्याग्रह तत्त्वज्ञानांत जें सामर्थ्य आहे, त्या सामर्थ्यामुळें ब्रिटिश साम्राज्यास आपण आपल्यापुढें नमवूं शकूं असा आशावाद त्यामुळें पुन्हा देशात संचारला.

कलकत्ता अधिवेशनांत मोतीलाल नेहरू यांनीं बनविलेल्या स्वराज्य-योजनेस राष्ट्रसभेची मान्यता मिळवून घेणें हें मुख्य कार्य होतें. हें काम केवळ मोतीलाल प्रभृति जुन्या स्वराज्यपक्षी पुढाऱ्यांच्या हातून तडीस जाणें कठीण होतें. जरी कदाचित् बहुमताच्या जोरावर ती मान्यता जुन्या पक्षांच्या धोरणास मिळाली असती तरी तरुण पक्ष जर राष्ट्रीय सभेंतून बाहेर गेला असता तर दोघाचीही शक्ति परस्परांशीं भांडण्यात नष्ट होऊन त्याचा फायदा ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांस

मिळाला असता. जुन्या-नव्या पुढाऱ्यांना एकत्र ठेऊन, दोघाचा समन्वय करण्याचें आणि स्वातंत्र्य-लढा करण्याचें जनतेचें सामर्थ्य वाढीस लाऊन, तें प्रभावी करण्याचें कौशल्य केवळ म. गांधी याच्याच-पाशीं होतें. त्यांनीं दोन्ही पक्षांची तडजोड घडवून आणून असा एक ठराव केला कीं, १९२९ च्या अखेरीच्या आंत जर ब्रिटिश सरकारनें वसाहतीचें पूर्ण स्वराज्य देण्याचें मान्य केलें तरच तें स्वीकारावें. नाहीं तर संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करून पुन्हा अनत्याचारी असहकार आणि सार्वत्रिक सत्याग्रह या मार्गांनीं स्वातंत्र्याचा लढा सुरू करावा. या ठरावास जवाहरलाल नेहरू यांनीं पाठींबा दिला आणि तो ठराव प्रचंड बहुमतानें मंजूर झाला.

या वेळेपासून पुन्हा महात्मा गांधी यांनीं देशाच्या राजकारणाचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं आणि १९२९ च्या ३१ डिसेंबरपर्यंत वसाहतीचें स्वराज्य शिष्टाईनें संपादन करतां येतें किंवा नाहीं हें पाहून त्यांत निराशा झाल्यानंतर लाहोर येथील अधिवेशनांत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं ३१ डिसेंबर १९२९ हा दिवस संपतांच, म्हणजे रात्रीं बारा वाजून गेल्यानंतर संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर करून घेतला. याच्या पूर्वी व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं ब्रिटिश सरकारच्या वतीनें अशी घोषणा केली होती कीं, हिंदुस्थानचें अंतिम ध्येय वसाहतीचें स्वराज्य आहे हें आम्हांस मान्य आहे आणि त्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं सायमन-कमिशनचा रिपोर्ट झाल्यानंतर पुढील सालीं म्हणजे १९३० सालीं इंग्लंडांत एक गोलमेज परिषद भरविण्यांत येईल; आणि त्या परिषदेस हिंदी पुढाऱ्यांना निमंत्रणें देण्यांत येतील. या घोषणेनंतर महात्मा गांधींनीं डॉ. सप्रू आणि बॅ. जिना यांच्या समवेत लॉर्ड आयर्विन यांची एक मुलाखत घेतली. या मुलाखतींत गांधी यांच्याकडे नेतृत्व होतें आणि त्यांनीं प्रथमच लॉर्ड आयर्विन यांच्याकडे अशी मागणी केली कीं, भावी गोलमेज परिषदेंत वसाहतीचें स्वराज्य ताबडतोब देण्यांत येईल आणि त्यांत साम्राज्यांतून फुटून निघण्याचा हक्कसुद्धां हिंदुस्थानला मिळेल असें

आश्वासन ब्रिटिश मंत्रिमंडळानें किंवा हिंदुस्थान सरकारनें द्यावें. निदान लॉर्ड आयर्विन यानीं स्वतः तें आश्वासन द्यावें. यापैकीं कोणतीही गोष्ट करणें अथवा करवून घेणें आपणास शक्य नाहीं असें व्हाइसरॉयनीं सांगितलें. तेव्हां गांधींनीं तडजोड अशक्य आहे असा निर्णय देऊन मुलाखत संपविली. यानंतर ते लाहोर अधिवेशनास गेले आणि तेथें त्यांच्याच प्रेरणेनें पंडित मोतीलाल नेहरू यांनीं स्वातंत्र्याचा, गोलमेज परिषदेवर बहिष्कार घालण्याचा आणि कायदेमंडळावर बहिष्कार घालून सत्याग्रहाचा स्वातंत्र्यसंग्राम सुरू करण्याचा ठराव माडला. या ठरावास पंडित मालवीय, केळकर, इत्यादींचा विरोध होता. पण तो विरोध ऐकून घेण्यासही त्या वेळीं कोणी तयार नव्हतें.

: : ६ : :

राष्ट्रसभेचें नेतृत्व आणि सत्याग्रही स्वातंत्र्ययुद्ध

(उत्तरार्ध)

अशा प्रकारें महात्मा गांधींनीं राष्ट्रसभेंतील मुत्सद्यांच्या राजकीय मागणीच्या पाठीमागें नव्या स्वातंत्र्यवादी व समाजवादी विचारांच्या तरुणाची शक्ति व त्यांचा उत्साह आणून उभा केला आणि स्वतः त्या दोघांचेंही नेतृत्व स्वीकारून धडाडी आणि सावधानता, शौर्य आणि आणि मुत्सद्दीगिरी तसेंच तत्त्वनिष्ठा आणि व्यवहारदक्षता या परस्परविरुद्ध भासणाऱ्या पण यशस्वी होण्यास अत्यंत अवश्य असणाऱ्या गुणांचा समन्वय साधिला. १९३० सालीं २६ जानेवारीच्या शुभमुहूर्तानें स्वातंत्र्यसंग्रामाची घोषणा करण्यांत आली आणि फेब्रुवारी महिन्यांत स्वातंत्र्य-सत्याग्रहाचे सेनानी म्हणून त्यांना सर्वाधिकारी नेमण्यांत आलें. २ मार्च रोजीं त्यांनीं व्हाइसरॉयकडे एक खलिता पाठवून ११ मागण्या-किमान मागण्या म्हणून किंवा स्वातंत्र्याचें पूर्वचिन्ह म्हणून-मागितल्या आणि त्या मान्य न झाल्यास मिठाचा कायदा मोडून बेकायदा मीठ तयार करण्याच्या रूपानें सार्वत्रिक सत्याग्रहास सुरवात करण्याचें जाहीर केलें.

१२ मार्च रोजीं ऐंशीं लोकांची सत्याग्रही लोकांची एक तुकडी घेऊन त्यानीं "दांडी-मोर्चा" या नांवानें जगप्रसिद्ध झालेली चाल सुरू केली. या वेळीं सर्व राष्ट्र एकदम नवीन चैतन्य प्राप्त व्हावें त्याप्रमाणें नवचैतन्यानें नाचूं लागलें आणि एखाद्या भूकंपाच्या धक्क्यानें प्रचंड पर्वत हादरून जावा, त्याप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यसत्तेचा गड डळमळूं लागला. साबरमती-आश्रमांतून समुद्रकिनाऱ्यावरील दांडी नांवाच्या गांवापर्यंत आपल्या तुकडीसह महात्मा गांधी पायीं प्रवास करीत गेले. प्रत्येक गावांत सत्याग्रहाचा क्रांतिकारक उपदेश श्रवण करण्यास हजारों लोकांचे थवेच्या थवे जमत असत आणि सर्व खेड्यापाड्यांतून स्वातंत्र्यरणाची घोषणा कानांवर येत असे.

या वेळीं कांहीं लोकांना प्रारंभींच अशी शंका होती कीं, आतां ही राष्ट्रव्यापी प्रचंड सत्याग्रह-मोहीम महात्मा गांधी सुरू करीत आहेत, पण चौरीचौऱ्याप्रमाणें येवढ्या मोठ्या देशात कोठें कांहीं थोडा अत्याचार झाला कीं पुनः ही चळवळ थांबवितील काय? या शंकेचें कांहींसें समाधान गांधींनीं 'यंग इंडिया' त त्या वेळीं लिहिलेल्या लेखांवरून होण्याजोगें होतें. या वेळीं ते स्वतः फक्त ऐंशीं लोकांची एक तुकडी घेऊन पहिला शुद्ध सत्याग्रह करणार होते. ते हा सत्याग्रह सर्व राष्ट्राच्या वतीनें करणार नसून तो केवळ आपल्या स्वतःच्या वतीनेंच करणार होते. त्यांना पकडल्यानंतर राष्ट्रसभेच्या वतीनें सत्याग्रह करण्यास सर्वाधिकारी म्हणून पंडित नेहरू यांची नेमणूक करण्यांत येणार होती. त्यानंतर त्या सत्याग्रहाला खरें राष्ट्रीय व सार्वत्रिक स्वरूप येणार होतें. अर्थात् हा सार्वत्रिक सत्याग्रह तितका शुद्ध राहणार नाहीं हें त्यांना माहीत होतें. येवढी खात्री वाटूं लागली कीं, या वेळीं उगीच कोठें तरी कांहीं कमी जास्ती झालें कीं लगेच चळवळ मागें घेण्यात येणार नाहीं, असा याचा अर्थ होता. त्यांनीं वरील विवेचन करतांना आणि आपली वैयक्तिक भूमिका व राष्ट्रसभेची भूमिका यांत सूक्ष्म भेद केला असला तरी हेंही सांगितलें कीं, कोणाही राष्ट्रसभेच्या लोकांनीं केलेल्या अत्याचाराबद्दलची नैतिक जबाबदारी मी नाकारीत आहें असें मात्र कोणीं समजूं नये. जर राष्ट्रसभेच्या लोकानीं अत्याचार केला व त्यामुळें माझ्या अंतः-

करणाला धक्का बसला तर मी काय करीन हें मात्र मला सांगतां येत नाहीं; कारण अशा सर्व बाबतींत बुद्धीपेक्षां अंतःप्रवृत्तीला मान देऊनच मी वागत असतों. या अंतर्ध्वनीकडे लक्ष देऊन चालणारा मनुष्य केव्हां कोणीकडे जाईल हें सांगतां येणार नाहीं. राष्ट्रसभा आणि आपण या दोघांच्या जबाबदारींत व कर्तव्यांत ही जी एक सूक्ष्म, अस्पष्ट भेदरेषा गांधींनीं ओढली, तिच्यासंबंधीं पं. जवाहरलाल नेहरू आत्मचरित्रांत लिहितात :

"He did give us the impression that there was a slightly different orientation to his thinking, and that civil disobedience when it came, need not be stopped because of a sporadic act of violence. If, however, the violence became a part of the movement itself, then it ceased to be peaceful disobedience movement and its activities had to be curtailed or varied. This assurance went a long way in satisfying many of us"*.

या वेळीं गांधीजींची विचारसरणी अशी दिसते कीं, सत्याग्रह हें जर सर्व परिस्थितींत अवलंबितां येण्यासारखें साधन असेल, तर आजूबाजूस हिंसा चालू असतांनाहि तो चालू ठेवितां आलाच पाहिजे. फक्त ही हिंसा जर त्या चळवळीला अंगभूतच बनली तर मात्र त्या चळवळीचें अहिंसक स्वरूपच नष्ट होईल व मग सत्याग्रह चालणारच नाहीं. पण जोंपर्यंत अत्याचार किंवा हिंसा हें त्या चळवळीचें अंग बनलेलें नाहीं, तोंपर्यंत चळवळ मागें घेण्याचें कारण नाहीं.

मिठाच्या सत्याग्रहाच्या रूपानें सुरू झालेली ही चळवळ अत्यंत उग्र स्वरूपांत अशी आठनऊ महिने चालली व २६ जानेवारी १९३१ रोजीं राष्ट्रसभेचे नेते बंधमुक्त होऊन बाहेर पडले व त्यांना लॉर्ड

* Jawaharlal Nehru : Autobiography, P. 210.

आयर्विन यांनीं चळवळ बंद करून गोलमेज परिषदेस हजर राहण्याची विनंति केली आणि गांधी–आयर्विन करार नांवाचा करार होऊन ब्रिटिश सरकार व राष्ट्रसभा यांच्या दरम्यान वर्षभर चालू असलेला स्वातंत्र्यसंग्राम स्थगित होऊन स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं शिष्टाई करण्याचा काळ आला. हा गांधी-आयर्विन करार १९३१ च्या मार्चमध्यें घडून आला. या करारामुळें राष्ट्रसभेला पूर्वी केव्हांही मिळालें नव्हतें इतकें महत्त्व आणि वैभव हिंदी राजकारणांत मिळालें. गांधींच्या राजकीय नेतृत्वाची, मुत्सद्दीपणाची आणि क्रांतिकारक शक्तीची प्रचीति हिंदी जनतेला आणि हिंदुस्थानांतील सर्व पक्षांना आली. ब्रिटिश सरकारला अनेक वटहुकूम काढून आणि लक्षावधि लोकांना तुरुंगांत टाकून अथवा गोळीबार करूनही चळवळ थांबवितां आली नाहीं. या वेळीं गुजरात, कर्नाटक आणि अयोध्या प्रांत या ठिकाणीं शेतकऱ्यांनीं स्वराज्यासाठीं साराबंदी व खंडबंदी अशा चळवळी करून स्थावर-जंगम मालमत्ता गमावली व अनेक प्रकारचा छळ सहन केला. सरहद्द प्रांतांतील पठाणांनीं खुदाई खिदमतगार नांवाची अहिंसक स्वयंसेवकसेना निर्माण करून लष्कराच्या गोळीबारापुढें छातीं पुढें करून गोळ्या झेलल्या. एका गढवाली पलटणीनें हें अहिंसक धैर्य पाहून आपण त्यांच्यावर गोळ्या घालणार नाहीं असें सांगून लष्करी कायद्याचा भंग केला. महाराष्ट्रीय शेतकऱ्यांनीं जंगल-सत्याग्रह करून असेंच शौर्य गाजविलें आणि राष्ट्रसभा ही शेतकऱ्यांची खरी प्रतिनिधि आहे असें सिद्ध केलें. चरखा–संघ आणि राष्ट्रीय शिक्षण या संस्थांनींहि या वेळीं या स्वातंत्र्य-संग्रामांत भाग घेतला आणि नवे समाजवादी, स्वातंत्र्यनिष्ठ युवक दहशत-वादाचा त्याग करून शास्त्रीय क्रांतीची तयारी करण्यांत अनत्याचारी प्रतिकाराचें केवढें मोठें स्थान आहे तें ओळखूं लागले. ही चळवळ एकंदरींत अनत्याचाराचीच झाली व ती गांधी-आयर्विन करारानें तात्कालिक थोडी तरी यशस्वी झाली, अशी जनतेची व जगाची कल्पना झाली. शिवाय सत्याग्रही लोकांना बंधमुक्त करणें, जप्त केलेल्या जमिनी व स्थावर मालमत्ता परत करणें, परदेशी कापडावर व मद्यावर निरोधन करण्याचा राष्ट्रसभेचा हक्क मान्य करणें, समुद्रकांठच्या

लोकांना स्वतःपुरतें मीठ तयार करण्याचा हक्क मिळणें हीं करारांतील कलमें पाहिलीं असतां राष्ट्रसभेचा तात्कालिक विजय उघड दिसत होता. या वेळपर्यंत एक गोलमेज परिषद होऊन जाऊन (१) मध्य सरकार जबाबदार करणें, (२) संयुक्त राज्य स्थापन करणें आणि (३) संक्रमणकालीन कांहीं बाबतींत संरक्षक बंधनें घालणें या तत्त्वांना ब्रिटिश सरकारनें मान्यता दिली होती. राष्ट्रसभेला तेथें जाऊन संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्याचा हक्क असावा आणि संरक्षक बंधनें हिंदी हिताच्या दृष्टीनें अवश्य असतील तेवढींच असावींत, येवढी भर त्यांत घालून गांधींनीं तडजोड करण्यासाठीं इंग्लंडास जाण्याचें कबूल केलें होतें.

२६ जानेवारीस गांधींची तुरुंगांतून सुटका झाली. त्या वेळीं पंडित मोतीलालजी अलाहाबादेस फार आजारी होते. गांधी तिकडेच गेले व स्वराज्यभवनांतच कार्यकारिणीची सभा भरली, पण मोतीलालजी अत्यवस्थ होते, व ता. ४ फेब्रुवारीस त्यांचा अंत झाला. गांधींना हा मोठाच धक्का बसला. माझी स्थिति आज एखाद्या विधवेहूनही अधिक अनाथ झाली आहे, असे उद्गार त्यांनीं काढिले. गांधी-मोतीलाल यांच्या संयुक्त नेतृत्वाचा काळ संपून आतां गांधी-जवाहरलाल यांच्या नेतृत्वाचा काळ येणार होता. जवाहरलाल याना आतां "बापू" हेच पितृस्थानीं वाटत होते आणि जवाहरलाल हाच माझा राजकीय वारस होईल अशी भाषा यापूर्वीच गांधींनीं सुरू केली होती. देशांतील तरुणांचें मन समाजवादानें भारून टाकिलें आहे आणि त्या समाजवादाला अहिंसावादाचें महत्त्व पटवून देण्यास जवाहरलाल हेंच आपलें साधन आहे या दृष्टीनें गांधी त्यांच्याकडे पाहत होते. १९३० च्या आंदोलनांत जे तरुण पुढें आले ते केवळ राष्ट्रवादी नव्हते. केवळ राष्ट्रीय स्वातंत्र्य येवढेंच त्यांचें ध्येय नसून समाजवाद हें त्यांचें ध्येय आहे हें त्यांनीं पाहिलें होतें. आपण जसें राष्ट्रवाद्यांना सत्याग्रहाचें महत्त्व पटवून दिलें तसें समाजवाद्यांना तें पटवून देणें हेंच यापुढील कार्य आहे, असें त्यांना स्पष्ट दिसत होतें. पंडित नेहरूंच्या कुटुंबाबरोबर त्यांचा दृढ स्नेह जमला होता, तरी त्यांत केवळ खासगी ममतेचा भाग नव्हता. गांधींना कांहीं खासगी जीवन नव्हतेंच असें म्हणतां येईल.

आधुनिक जगांतील बुद्धिप्रधान संस्कृतीची मूर्तिच त्यांना जवाहरच्या रूपानें भेटली होती आणि त्या मूर्तीत गांधींना आत्मबलाची प्राणप्रतिष्ठा करावयाची होती. जवाहरलाल यांचा आत्मा गांधींच्या प्रभुत्वाखालीं व त्यांच्या प्रेरणेनेंच राष्ट्राची सेवा करीत होता. मोतीलालजींचा वियोग दोघांनाही सारखाच जाणवला आणि त्या दुःखानें त्यांचीं अंतःकरणें अधिकच निकट आलीं.

इंग्लंडांतील स्वातंत्र्य–शिष्टाई

दुसऱ्या गोलमेज परिषदेंत भाग घेण्यास जाण्यापूर्वी कराची येथें राष्ट्रसभेचें अधिवेशन भरून गांधी–आयर्विन करारास मान्यता मिळवून घेण्यांत आली. त्यानंतर त्या कराराची पूर्ण बजावणी करून घेण्यांत बराच काळ गेला. अयोध्या प्रांत, सीमाप्रांत आणि बंगाल या प्रांतांत वातावरण अत्यंत तंग होतें. बंगालमध्यें गुप्त क्रांतिकारकांना दडपून टाकण्यास सरकार उतावीळ झालें होतें आणि तेथील राष्ट्रसभेवर क्रांतिकारकांना पोटांत वाढूं देण्याचा आरोप होता. अयोध्या प्रांतांत शेतकरीवर्गांत समाजवादी वर्गविग्रहाची चळवळ करीत आहेत व पंडित नेहरू त्यांना उठाव देत आहेत असा आरोप होता. सीमाप्रांतांत खुदाई खिदमतगार व अब्दुल गफारखान यांना नेस्तनाबूद करण्यास तेथील सरकार उत्सुक झालें होतें. गांधी–आयर्विन करार हा येथील अधिकारीवर्गाला मुळींच पसंत नव्हता आणि त्याची बजावणी करावयाची नाहीं असाच त्यांचा जवळजवळ निर्धार होता. अखेरीस या सर्व कटकटी मिटल्यावांचून आपण विलायतेस जाणार नाहीं असा निर्धार गांधींनीं केला. तेव्हां पुनः सिमल्यास व्हाइसरॉयशीं दुसरी तडजोड होऊन गांधींनीं विलायतेस जाण्याचें ठरविलें. ते तिकडे गेले तेव्हां त्यांना हिंदुस्थानांतील परिस्थितीची काळजीच वाटत होती आणि इंग्लंडांत आपल्यापुढें निराशाच वाढून ठेविली आहे असेंही दिसत होतें. कारण तेथें जे लोक जमविण्यांत आले होते ते सर्व जमातवादी व प्रतिगामी वृत्तीचेच होते. अर्थात् हे कोणीही हिंदी जनतेचे प्रतिनिधि नाहींत; राष्ट्रसभा हीच हिंदी राष्ट्राची खरी

प्रतिनिधि आहे या भूमिकेवर तेथें जाऊन गांधींना हिंदी राष्ट्राची स्वातंत्र्याची मागणी करावयाची होती. २९ ऑगस्ट १९३१ रोजीं अशा मनःस्थितींत गांधीजी राष्ट्रसभेचे एकमेव प्रतिनिधि म्हणून संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी ब्रिटनकडे करण्यासाठीं मुंबई सोडून इंग्लंडास गेले.

सप्टेंबरपासून डिसेंबरपर्यंत तिकडे राहून डिसेंबरअखेरीस ते निराश होऊन परत आले. तथापि या वेळची त्यांची इंग्लंडची भेट दुसऱ्या दृष्टीनें फार यशस्वी झाली. जगांतील सर्व राष्ट्रांची दृष्टि हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याकडे खेचली गेली. इंग्लंडांतील सामान्य जनता, विद्वान् लोक, मुत्सद्दी, तत्त्वज्ञानी या सर्वांना हिंदी राष्ट्राची मागणी समजून देण्याची संधि त्यांना मिळाली आणि अजिंक्य ठरलेल्या ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध बंड करून उठलेल्या या सत्याग्रही क्रांतिकारकाचा प्रभाव जगाच्या निदर्शनास आला. गांधी विलायतेस निघाले तेव्हां ते कांहींतरी नामुष्कीची तडजोड करून परत येणार आणि ब्रिटिश मुत्सद्यांच्या मोहजालांत अडकणार अशी भीति कांहीं तरुण क्रांतिकारकांना वाटत होती. पण त्यांनीं तेथें आपल्या राष्ट्राच्या वतीनें जी शिष्टाई केली तिचे वृत्तान्त इकडे येऊं लागले ते वाचून या तरुणांची अशी खात्री झाली कीं, हा साठ वर्षांचा म्हातारा क्रांतिकारक आपल्याहून अधिक खंबीर वृत्तीचा लढवय्या आहे. ब्रिटिश बादशहा ते ब्रिटिश कामगारांपर्यंतच्या सर्व दर्जांच्या व सर्व वर्गांच्या इंग्रजांचें चित्त त्यानें वेधून घेतलें आणि त्या वेळीं हिंदी स्वातंत्र्याचें गाठोडें घेऊन जरी त्यांना परत फिरतां आलें नाहीं तरी हिंदी स्वातंत्र्याच्या वतीनें लढणारी राष्ट्रसभा व तिचा एकमेव नेता यांची स्वातंत्र्याची मागणी न्याय्य असून तिच्या प्राप्तीसाठीं वाटेल तो त्याग करण्याची वृत्ति या राष्ट्रांत आतां निर्माण झाली असल्यामुळें आज ना उद्यां ती आपणास मान्य करणें भाग आहे, अशी ब्रिटिश राष्ट्राची खात्री झाली.

गोलमेज परिषदेच्या फेडरल स्ट्रक्चरल कमिटीचें काम, सेंट जेम्स पॅलेसमध्यें सुरू झालें, तेव्हां गांधींनीं राष्ट्रीय सभेची स्वातंत्र्याची मागणी मांडण्यासाठीं जें पहिलेंच भाषण केलें, त्याचा सारांश पुढील-

प्रमाणें होता : आपण येथें जे आलें आहोंत ते पूर्ण सहकाराची वृत्ति स्वीकारून. राष्ट्रीय सभेची जी मागणी आहे ती पटवून देण्यासाठीं आलें आहों. आणि त्या संस्थेचा मी प्रतिनिधि असल्यामुळें त्या मागणींत मी कांहींही कमी करूं शकणार नाहीं, ही आपली भूमिका प्रथमतः त्यांनीं स्पष्ट केली. तसें करतांना प्रथमतः त्यांनीं राष्ट्रीय सभेचा थोडासा इतिहास सांगितला. तो सांगतांना, त्यांचा मुख्य भर एकाच मुद्यावर होता, आणि तो मुद्दा म्हणजे, ही संस्था कोणत्याही एका जातीच्या, धर्माच्या किंवा वर्गाच्या लोकाची प्रतिनिधि नसून तिची संस्थापना करून वाढ करण्यांत सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांनीं भाग घेतलेला आहे. आणि अशाच व्यापक धोरणांनीं तिचें कार्य गेलीं पन्नास वर्षें चालू आहे. या संस्थेच्या स्थापनेची मूळ कल्पना ह्यूम नांवाच्या एका इंग्रजाच्या डोक्यांत उदय पावली. तिचें संगोपन करून वाढ करण्यांत सर फेरोजशहा मेहता, आणि दादाभाई नौरोजी यांनीं कष्ट केले आणि दादाभाई नौरोजी हे त्यामुळें राष्ट्रपितामह म्हणजे राष्ट्राचे आजोबा या थोर पदवीस पोहोंचले. बद्रुद्दीन तय्यबजी यांच्यासारख्या मुसलमानांनीं आणि उमेशचंद्र बानर्जी, कालिचरण बानर्जी, के. टी. पाल यांसारख्या ख्रिस्ती धर्माच्या लोकांनीं तिच्यांत भाग घेतलेला आहे. अद्यापि ज्यांच्या दुःखाचें विस्मरण आपणांस झालेलें नाहीं, असे मौ. महंमदअल्ली हे तिचे एकदां अध्यक्ष होते. आजही तिच्या कार्यकारिणीमध्यें जे पंधरा सभासद आहेत, त्यांतील चार सभासद मुसलमान आहेत. स्त्री-पुरुष असाही भेद ही संस्था मानीत नाहीं. डॉ. ॲनि बेझंट, आणि सरोजिनी नायडू अशा स्त्रियांनीं तिचें अध्यक्षपद मंडित केलेलें आहे. अस्पृश्यतानिवारण आणि हिंदु मुसलमान ऐक्य हीं तिनें आपलीं दोन प्रमुख कर्तव्यें ठरविलीं आहेत. देशांत खेडोपाडीं पसरलेली जी उपाशी मूक जनता आहे, तिची ती खरी प्रतिनिधि आहे. सर्वांच्या हितसंबंधांचें रक्षण करावें असें तिचें धोरण असलें तरी ज्यांचे हितसंबंध या मूक जनतेच्या हिताला पोषक आहेत, त्यांचेंच रक्षण ती करील आणि या मूक जनतेच्या

हितरक्षणासाठीं त्याला विरोधी असणाऱ्या, इतर हितसंबंधांचा बळी देण्यासही ती मागेंपुढें पाहाणार नाहीं अशी ती एक शेतकरी संस्था आहे. किंवा तशी ती अधिकाधिक बनूं लागली आहे. अखिल भारतीय चरखा-संघ ही संस्था सुमारें दोन हजार खेड्यांतील पन्नास हजार स्त्रियांना (हा आंकडा आतां एक लक्ष ऐशीं हजारांपर्यंत गेला आहे.) सूतकताईचें काम देते. या स्त्रियांपैकीं सुमार पन्नास टक्के स्त्रिया मुसलमान असाव्यात, आणि त्यांतील हजारों स्त्रिया, अस्पृश्य जातींच्याही आहेत. अशा तऱ्हेनें राष्ट्रीय सभा ही संस्था देशांतील पंच्यायशीं टक्के जनतेची प्रतिनिधि असून, त्या संस्थेनें मला आपला एकमेव प्रतिनिधि म्हणून, येथें स्वातंत्र्याची मागणी करण्यासाठीं पाठविलेलें आहे. ही मागणी कराची कॉंग्रेसच्या ठरावांत ग्रथित झालेली आहे, असें सांगून गांधींनीं तो ठराव वाचून दाखविला. त्यात पुढील मुद्दे होते : (१) पूर्ण स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्य हें कॉंग्रेसचें ध्येय आहे. तें प्राप्त करून घेण्यासाठीं तिच्या शिष्टमंडळानें प्रयत्न करावा. (२) विशेषतः संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण आणि आर्थिक स्वातंत्र्य या गोष्टींवर सत्ता मिळवावी. (३) हिंदुस्थान आणि ब्रिटन यांचें जें देणेंघेणें असेल त्याची चौकशी तिऱ्हाईत पंचांमार्फत करून घ्यावी. (४) इंग्लंड व हिंदुस्थान यांपैकीं दोघांसही समान भागीदार समजून ही भागीदारी केव्हांही स्वेच्छेनें सोडून देण्याचा अधिकार प्रत्येकास असावा. (५) या बाबतींत कांहीं संक्रमणकालांतील तडजोडी करणें हिंदुस्थानच्याच हिताच्या दृष्टीनें इष्ट असेल तर, तशा कांहीं तात्पुरत्या तरतुदी तडजोडीनें घडवून आणण्याचा अधिकार कॉंग्रेसच्या शिष्ट-मंडळास असावा.

हा ठराव वाचून दाखविल्यानंतर त्यांनीं प्रत्येक मुद्याचें थोडेफार स्पष्टीकरण केलें. अखेरीस आपली स्वतःची इच्छा, स्वातंत्र्याच्या व समानतेच्या पायावर, हिंदुस्थान आणि ब्रिटन यांची स्वेच्छेची भागीदारी निर्माण व्हावी अशीच आहे, असें सागून अशी भागीदारी निर्माण होत आहे, अशी खात्री करून घेऊनच या देशांतून परत जाण्याची माझी इच्छा आहे, असें त्यांनीं सांगितलें.

महात्मा गांधींचें हें भाषण ऐकत असतांना तेथें जमलेल्या इंग्रज व हिंदी प्रतिनिधींना थोडासा अचंबाच वाटला. त्यांच्या भाषणाच्या प्रस्तावनेचा रोख त्यांना असा दिसला कीं, त्या परिषदेंत जमलेले शें-दीडशें हिंदी लोक हे सरकारनियुक्त असल्यामुळें आणि त्यांपैकीं प्रत्येकाला विशिष्ट हितसंबंधाचा प्रतिनिधि म्हणूनच सरकारनें निमंत्रण दिलें असल्यामुळें त्या कोणासही सर्व राष्ट्राच्या वतीनें बोलण्याचा हक्क नाहीं. कॉंग्रेस ही संस्था देशांतील सर्व धर्मांच्या व सर्व जातींच्या पंचायशीं टक्के मूक जनतेची प्रतिनिधि असल्यामुळें आणि तिनें आपल्या वतीनें गांधी या एकाच व्यक्तीस शिष्टाई करण्यास पाठविलें असल्यामुळें इतर कोणाच्याही मतापेक्षां, गांधींच्याच मताला राष्ट्राचे प्रतिनिधि म्हणून मान देण्यांत आला पाहिजे. त्यांच्याशिवाय इतर लोक विशिष्ट हितसंबंधांचे आणि तेही ब्रिटिश सरकारनें नेमलेले प्रतिनिधि असल्यामुळें सर्व राष्ट्राच्या वतीनें बोलण्याचा त्यांपैकीं कोणासही अधिकार नाहीं. गांधींची ही भूमिका म्हणजे त्या गोलमेज परिषदेवर टाकण्यांत आलेला एक बॉंबच होता. तसेंच त्यांनीं स्वातंत्र्य आणि समान भागीदारी या तत्त्वांना मान्यता मिळवणें हाच पहिला मुद्दा निर्माण केला. यामुळें अल्पसंख्याकांच्या हितसंरक्षणाचा मुद्दा त्यांनीं बाजूस सारला, असाही गवगवा तेथें सुरू झाला. हिंदुस्थानांत सर्व राष्ट्राच्या वतीनें बोलणारी कोणतीही संस्था नाहीं आणि अनेक अल्पसंख्याक गट एकमेकांशीं लढत असून त्याचें ऐक्य होऊं शकत नाहीं म्हणून हिंदुस्थानास स्वातंत्र्य देतां येत नाहीं, असें सिद्ध करणें हा ब्रिटिश मुत्सद्यांचा डाव गोलमेज परिषद भरविण्यांत होता. तो डाव ओळखूनच तेथील आपल्या पहिल्याच भाषणांत, या परिषदेस आलेले हे लोक राष्ट्राचे प्रतिनिधि नसून राष्ट्रीय सभा आणि तिच्या वतीनें स्वातंत्र्याची शिष्टाई करण्यास आलेला मी, हेच राष्ट्राचे खरे प्रतिनिधि आहेत अशी भूमिका महात्मा गांधींनीं घेतली. येथें जमलेल्या सर्व हिंदी लोकांनीं एक मुख्य मागणी करावी म्हणजे मग तिचा आम्ही विचार करूं, असें ब्रिटिश मुत्सद्दी म्हणत होते, तर याच्याउलट, तुम्हीं येथें ज्या पद्धतीनें लोक

जमविले आहेत ती पद्धतच सदोष असल्यामुळें त्यांचें एकमत होणें शक्य नाहीं व हें जाणूनच तुम्हीं परिषदेची अशी घटना केलेली आहे, हें गांधींनीं आपल्या पहिल्याच भाषणांत ब्रिटिश मुत्सद्यांच्यापुढें मांडलें. अशा रीतीनें गोलमेज परिषदेच्या डावांत गांधींच्यावर मुत्सद्दीपणानें मात करण्याचा व्यूह ज्यांनीं रचला त्यांची निराशा झाली. आणि हा पट आतां उघळून जाणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं ! तरीही एकदां सुरू झालेला हा खेळ अखेरपर्यंत चालू ठेवून आपल्या स्वातंत्र्याच्या मागणीचा सोक्षमोक्ष करून घेतल्यावांचून परत जावयाचें नाहीं आणि इंग्लंडांतील सर्व प्रमुख मुत्सद्यांच्यापुढें जाऊन आपली मागणी कशी व कां सयुक्तिक आहे तें पटवून देण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न करावयाचा असा निर्धार गांधींनीं केला होता.

ब्रिटिश मुत्सद्यांचा मुख्य डाव गोलमेज परिषदेंत अल्पसंख्याकांचा प्रश्न उभा करावयाचा आणि हा प्रश्न सुटत नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानला स्वातंत्र्य किंवा पूर्ण स्वातंत्र्य देतां येत नाहीं असें म्हणून राष्ट्रसभेची मागणी धुडकावून लावण्याचा होता. याच्याउलट प्रथम स्वातंत्र्य व संपूर्ण स्वराज्य मान्य करा आणि मग कोणत्याही निःपक्षपाती न्यायाच्या तत्त्वानुसार अल्पसंख्याकांच्या रक्षणाचा प्रश्न सोडवा, असा आग्रह राष्ट्रसभेचा होता. गांधींनीं विलायतेस जातांना अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविण्याची एक योजना राष्ट्रसभेकडून मान्य करवून नेलेली होती व तिला राष्ट्रीय मुसलमानांचा व राष्ट्रीय वृत्तीच्या इतर अस्पृश्यादि अल्पसंख्याकांचा पाठिंबा होता. ही योजना थोडक्यात पुढीलप्रमाणें होती :—

"(१) हिंदुस्थानची भावी राज्यघटना संयुक्त स्वरूपाची असावी. शेष अधिकार घटक राज्यांकडे सोंपविण्यानें हिंदुस्थानच्या एकंदर हितसंबंधांस धक्का लागेल असें पुढें अधिक चौकशीअंतीं दिसून आलें नाहीं तर ते घटक राज्यांकडेच असावेत. सीमाप्रातास, बलुचिस्थानास प्रांतिक स्वराज्य द्यावें आणि सिंधची जनता प्रांतिक स्वराज्याचा आर्थिक बोजा उचलण्यास तयार असेल तर तो प्रांतही वेगळा करावा.

(२) मताधिकार सार्वत्रिक करून तो सर्व प्रौढ स्त्रीपुरुषांस द्यावा. संयुक्त मतदारसंघ हाच भावी राज्यघटनेचा पाया असावा. सिंध प्रांतांतील हिंदु आणि आसामांतील मुसलमान, सीमाप्रांत व पंजाबांतील शीख आणि ज्या प्रांतांत हिंदु किंवा मुसलमान २५ टक्क्यांहून कमी प्रमाणांत असतील तेथें ते, या सर्वांना लोकसंख्येच्या प्रमाणांत राखीव जागा ठेवाव्यात आणि अधिक जागा मिळविण्यासाठीं संयुक्त निवडणुकी लढविण्यास मुभा असावी.

(३) अल्पसंख्याकांच्या राजकीय व इतर हक्कांचें संरक्षण हें मध्य सरकारच्या कक्षेंतील कर्तव्य असावें.

(४) राज्यघटनेच्या कायद्यांत मूलभूत राष्ट्रीय हक्क नमूद करावेत व त्यांत अल्पसंख्य जमातींची संस्कृति, भाषा, लिपि, शिक्षण, धंदे आणि धर्माचार व धर्मविधि यांचें संरक्षण करण्याची हमी देण्यांत यावी. खासगी मालमत्तेच्या संबंधींचा कौटुंबिक कायदा (Personal Laws) यांचें रक्षण करण्याचीही तरतूद राज्यघटनेच्या कायद्यानें करण्यांत यावी.

(५) देशांतील सरकारी नोकरांत किमान लायकी व कार्यक्षमता टिकवून सर्व जमातींना योग्य तो हिस्सा मिळविण्याची संधि मिळावी. यासाठीं पक्षातीत अशा लोकांचें एक पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमून त्याच्यामार्फत अधिकारी वर्गाचा भरणा करण्यांत यावा."

या योजनेला राष्ट्राची मान्यता मिळेल असा विश्वास राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीनें प्रकट करून त्याच ठरावांत असें म्हटलें होतें कीं, ही योजना आत्यंतिक जमातवाद व शुद्ध राष्ट्रवाद यांची तडजोड करून बनविलेली आहे. जर याहून अधिक सर्वसंमत अशी योजना निरनिराळ्या जमातप्रतिनिधींनीं बनविली तर तिला ही राष्ट्रसभा मान्यता देईल.

अशा प्रकारें राष्ट्रसभेनें स्वतःची अशी एक योजना बनविली असून तिला अल्पसंख्य जमातींतील राष्ट्रीय वृत्तीच्या नेत्यांची संमति मिळवली होती. इतकेंच नाहीं तर याहून अधिक सर्वसंमत योजना

भिन्न मत असणाऱ्या सर्व प्रतिनिधींनीं पुढें आणली तर तिला मान्यता देण्याचीही तयारी दाखविली होती. याच्याही पुढें जाऊन गांधींनीं सांगितलें कीं, आपली योजना राज्यघटनेंत नमूद करावी व नंतर एक निःपक्षपाती न्यायमंडळ नेमावें व त्यानें अल्पसंख्याकांच्या हितरक्षणार्थ कांहीं अधिक तरतुदी सुचविल्या तर त्यांनाही आपण राष्ट्राची संमति मिळवूं. इतकें सांगितल्यानंतर आतां या विषयावर अधिक कोणताही युक्तिवाद करण्याचें उरलें नव्हतें. ब्रिटिश मुत्सद्यांचा यावर एकच आग्रह होता कीं, तुम्ही येथें जमलेल्या प्रतिनिधींना संमत अशी योजना तयार करा. त्यावर गांधींचें असें म्हणणें होतें कीं, हे प्रतिनिधि राष्ट्रीय वृत्तीचे नसून त्यांना तुम्हींच निमंत्रण देऊन आणिलें आहे व ते केवळ आपापल्या विशिष्ट जमातीचा व हितसंबंधाचा जास्तींत जास्त स्वार्थ साधण्याच्याच दृष्टीनें विचार करणार. त्यांचा दृष्टिकोण संपूर्ण स्वातंत्र्याचा नसून परकीय सत्ताधाऱ्यांच्या सत्तेंतील मोठ्यांत मोठा भाग आपल्या हातीं यावा येवढीच त्यांची दृष्टि आहे व यामुळें त्यांचें एकमत होऊं नये अशींच या परिषदेची घटना आहे. देशांतील ८५, किंबहुना ९५ टक्के जनतेचा पाठिंबा राष्ट्रसभेला आहे व तिच्यांत प्रत्येक जमातींतील राष्ट्रीय वृत्तीचे नेते दाखल झालेले आहेत. पण त्यांना तुम्ही येथें येऊं देत नाहीं, त्यांना पुढारी बनूं देत नाहीं, तरीही ते आमच्याबरोबर देशाच्या स्वातंत्र्यासाठीं क्लेश सहन करतात व तुरुंगांतही जातात. तुमच्या राजबंदींची गणती करा म्हणजे सर्व जमातींचे पुढारी त्यांच्या त्यांच्या जमातींच्या संख्येच्या प्रमाणांत आमच्याबरोबर तुरुंगांत गेल्याचें सिद्ध होईल. हेच अल्पसंख्याकांचे खरे प्रतिनिधि आहेत व त्यांचा आमच्या योजनेला पाठिंबा आहे.

गांधींचा हा युक्तिवाद सत्यावर, न्यायावर आणि राजनीतीच्या सर्वमान्य तत्त्वांवर आधारलेला होता. पण 'सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं' या म्हणीप्रमाणें ब्रिटिश मुत्सद्यांची या युक्तिवादानें खात्री पटणें शक्य नव्हतें, कारण तो युक्तिवाद मान्य करून हिंदुस्थानास स्वातंत्र्य देण्याची त्यांची तयारी नव्हती. गोलमेज परिषदेस जमलेल्या

प्रतिनिधींची एक अल्पसंख्याक समिति नेमण्यांत आली होती. तिनें बहुमतानें एक रिपोर्ट तयार केला. त्यांत सर्व अल्पसंख्याकांना विभक्त मतदारसंघ देण्यांत येऊन राखीव जागा ठेवण्यांत आल्या होत्या. या सर्व अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींचें बहुमत प्रतिनिधि सभेंत व्हावें व त्यांच्याच हातीं सत्ता राहावी अशी ही योजना होती. महात्मा गांधींनीं या योजनेला हिंदी स्वातंत्र्याच्या "शवविच्छेदनाची योजना" (Process of national vivisection) असें नांव देऊन तिचा धिक्कार केला. ही योजना दहा वर्षें अमलांत आणून मग फेरविचार करावा असें त्यांत म्हटलें होतें. या योजनेंत अस्पृश्यांनाही विभक्त मतदारसंघ देऊन हिंदु समाजाचें विच्छेदन करण्यांत आलें होतें. या वेळीं "आगाखान-करार" (Agakhan pact) या नांवानें प्रसिद्ध झालेला एक करार अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधींनीं केला होता. त्यांत मुसलमान, अँग्लो-इंडियन, युरोपियन व हिंदी ख्रिस्ती आणि अस्पृश्य असे पांच जमातींचे प्रतिनिधि सामील होते व दहा वर्षें याच्या प्रतिनिधींच्या हातीं सत्ता राहावी व राष्ट्राचे शतशः तुकडे पडून एकराष्ट्रभावना केव्हांच निर्माण होऊं नये अशी तरतूद करण्यांत आली होती. या योजनेचा पुरस्कार सर ह्यूबर्ट कार यांनीं केला आणि ब्रिटिश पंतप्रधानांनींही त्या योजनेस आपले आशीर्वाद दिले होते. या योजनेचा धिक्कार करतांना महात्मा गांधींनीं पुढीलप्रमाणें तेजस्वी उद्गार काढिले :

"हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ अशा राजकीय संस्थेचा प्रतिनिधि या नात्यानें बादशहाचें सरकार, अल्पसंख्याकांचे प्रतिनिधि म्हणवून घेणारे सभासद आणि सर्व जग यांना असें मी बिनदिक्कत सांगतों कीं, हिंदुस्थानला स्वराज्य देण्यासाठीं बनविलेली अशी ही योजना नसून, नोकरशाहीच्या हातीं असलेल्या सत्तेचा कांहीं भाग आपणांस मिळावा येवढाच हेतु मनात धरून बनविलेली ही योजना आहे यांत संशय नाहीं.

"हाच जर उद्देश असेल–आणि तो तसा आहे हें या योजनेच्या सर्व स्वरूपावरून व्यक्तच होत आहे–तर राष्ट्रसभा तिला मान्यता

देणार नाहीं. ज्या योजनेखालीं जबाबदार राज्य आणि स्वातंत्र्य याच्या खंबीर वृक्षाची वाढ होणें कदापि शक्य नाहीं. अशी योजना मान्य करण्यापेक्षां राष्ट्रसभा वनवासांत जाईल; मग तो वनवास कितीही वर्षें भोगावा लागो.

"सर ह्यूबर्ट कार म्हणतात कीं, ही योजना फक्त कांहीं काल टिकणारीच बनविण्यांत आली असल्यानें तिचा स्वीकार केल्यानें राष्ट्रत्वाला धक्का लागणार नाहीं. हीं दहा वर्षें संपतांच आम्ही एकमेकांस प्रेमानें कवटाळूं लागूं. ही त्यांची कल्पना ऐकून मला आश्चर्य वाटतें. मला आलेल्या राजकीय अनुभवानें मला दुसराच धडा दिला आहे. जर कधीं काळीं जबाबदार राज्य अस्तित्वांत येणार असेल, तर तें शुभ परिस्थितींतच आलें पाहिजे. या योजनेंत जें शवविच्छेदन होणार आहे, ती क्रिया त्यावर घडतांच कामा नये. कोणत्याही राष्ट्रीय सरकारला हा ताण सहन करण्याचें सामर्थ्य असणें शक्य नाहीं.

"सर्वांवर कळस करणारी गोष्ट म्हणजे, मला आश्चर्य वाटतें कीं, पंतप्रधान, आपणही ही योजना अपरिहार्य आहे असें सुचविल्याचें ऐकतों, आणि ती साडे अकरा कोटि लोकांना किंवा हिंदुस्थानांतील ४६ टक्के जनतेला मान्य होईल असे उद्गार आपण काढिले. आपली ही आंकडेवारी चुकीची असल्याचा उघड पुरावा दिसलाच आहे. लोकसंख्येंतील पन्नास टक्के अशा ज्या स्त्रिया त्यांनीं विशिष्ट प्रतिनिधित्वास पूर्ण विरोध असल्याचें आपणांस सांगितलेंच आहे. यामुळें आपला हा आंकडा थोडा तरी कमी होणारच. कॉंग्रेस ही केवळ ब्रिटिश हिंदुस्थानांतीलच नव्हे तर संस्थानी जनतेंतीलही ८५ ते ९५ टक्के लोकांची प्रतिनिधि आहे असा दावा मी आपल्यापुढें करीत आहेंच."

डॉ. आंबेडकर :—"ज्या पांच टक्के लोकांचें प्रतिनिधित्व कॉंग्रेस करीत नाहीं ते कोण?"

महात्मा गांधींनीं आपलें भाषण चालू ठेविलें. "या कामीं सार्वमत घ्या म्हणजे कॉंग्रेस ही प्रतिनिधि आहे कीं नाहीं त्याचा निर्णय होईल" असें

त्यांनीं आव्हान दिलें. अखेरीस अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ देण्याच्या योजनेला तीव्र विरोध करून ते म्हणाले,

"असें केल्यानें हिंदु समाजांत जे तट पडतील ते पाहतां मला मुळींच समाधान वाटूं शकत नाहीं. यापेक्षां अस्पृश्य लोक, मुसलमान किंवा ख्रिस्ती झाले तरीही त्याबद्दल तितकें दुःख होणार नाहीं. जे अस्पृश्यांच्या राजकीय हक्काचीच भाषा बोलतात, त्यांना हिंदुस्थानची ओळख नाहीं किंवा हिंदुसमाजघटनेचेंही त्यांना ज्ञान नाहीं. म्हणून मी माझें सर्व बळ एकवटून सांगतों कीं, या गोष्टीला विरोध करण्यांत केवळ मी एकटा उरलों तरीही माझे प्राण खर्ची घालून मी तिचा विरोध करीन."

या भाषणांतील अखेरच्या वाक्यांत अस्पृश्य जातींच्या विभक्त मतदार संघांना विरोध करण्यासाठीं आपण प्राणही अर्पण करूं असे जे निर्धाराचे शब्द गांधीजींनीं काढिले, त्यांतूनच पुढें (कम्यूनल अवार्ड) जातीय निर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांतील अस्पृश्यांना दिलेले विभक्त मतदार संघ रद्द करवून घेण्यासाठीं १९३३ सालीं त्यांना प्राणांतिक उपोषणाचें दिव्य करावें लागलें व अखेरीस ती आपत्ति दूर होऊन अस्पृश्यता-निवारणाची व हरिजनसेवेची चळवळ जोरास लागली.

गोलमेज परिषदेंतून स्वातंत्र्याची प्राप्ति होऊं शकत नाहीं ही गोष्ट आतां महात्मा गांधींना पूर्णपणें समजून चुकली. कांहीं झालें तरी आपणांस (१) परराष्ट्रीय राजकारण, (२) संरक्षण आणि (३) तिजोरी यांच्यावर ताबा मिळूं शकत नाहीं, हें सिद्ध झाल्यानंतर त्यांनीं तसें उघडपणें लोकांस सांगण्यासही सुरवात केली. आतां गोलमेज परिषद मोडणार अशा बातम्या सर्वत्र पसरूं लागल्या. तेव्हां साहजिकच इंग्लंडांतील विचारी लोकांना, पुढें काय होणार, पुनः सत्याग्रहसंग्राम सुरू होणार किंवा कसें, तसें झाल्यास त्यात लोक कितपत भाग घेतील, भाग घेतला तर लोक शांत राहतील काय, असे अनेक प्रश्न सुचूं लागले. गांधींच्या गांठीभेटी, मुलाखती, वृत्तपत्रांत लेख, निरनिराळ्या देशांना संदेश, हा प्रचार या वेळीं फार जोरात चालू होता. सर्व जगाचे डोळे

या वेळीं हिंदुस्थानच्या प्रश्नावर खिळून गेले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. जर ब्रिटिश मुत्सद्यांनीं या वेळीं गांधींचें समाधान करून हा हिंदी प्रश्न सोडविला असता तर त्याचा जगावर परिणाम झाला असता व कदाचित दुसरें महायुद्धही टळूं शकलें असतें. पण हें होणार नव्हतें. इतकी दूरदृष्टि व शहाणपण इंग्लंडांत नव्हतें. याच वेळीं इंग्लंडांत समाजवादी मंत्रिमंडळ गडगडून त्याच्या जागीं बाल्डविनचें राष्ट्रीय मंत्रिमंडळ आलें व एकंदर प्रतिगामी प्रवृत्ति बळावूं लागली. हीं चिन्हें दिसूं लागतांच गांधींनीं आपल्या मुलाखतींत हीं चिन्हें बोलून दाखविण्यास मागें-पुढें पाहिलें नाहीं. या दृष्टीनें फेनर ब्रॉक्वे यांच्याशीं त्यांचें झालेलें पुढील संभाषण फार महत्त्वाचें आहे :—

पुनः लढा झालाच तर काय होणार ?

"जर ही परिषद मोडली तर त्याचा परिणाम हिंदुस्थानांत काय होईल हें तुम्ही सांगूं शकाल काय ?" ब्रॉक्वे यांनीं विचारलें.

"तपशीलवार सांगतां येणार नाहीं." गांधींनीं उत्तर दिलें, "मला जो वास येतो त्यावरून अत्यंत तीव्र स्वरूपाचा लढा पुनः करावा लागेल असें दिसतें."

"पण पुनः प्रतिकाराची वृत्ति जागृत करणें तुम्हांस शक्य होईल असें वाटतें काय ? एकदां चळवळ बंद केली तर ती पुनः सुरू करणें नेहमींच अधिक कठीण नसतें काय ?"

"त्याबद्दल मला मुळींच शंका नाहीं !" गांधींनीं न कचरतां विधान केलें, "मीं बंद केलेली चळवळ पुनः करणें मला केव्हांच कठीण वाटलें नाहीं. मात्र माझ्या अंतःकरणाची खंबीरता मला वाटत असली पाहिजे. मीं १९२२ सालीं बार्डोलीचा लढा थांबविला. माझे मित्र अगदीं गांगरून गेले होते; पण पुनः १९३१ मध्यें तो लढा आम्हीं उभा केला. तसें करण्यास तीच वेळ योग्य होती. पहिल्यानें लढा स्थगित केला तेंच इष्ट ठरलें. मध्यंतरीच्या काळांत आम्ही कांहीं स्वस्थ बसलों नव्हतों. लोक आमच्या

विचार पचवीत होते. आमचें विधायक कार्य चालू होतें आणि त्याचा प्रभाव पडला. लोकांना लढ्याचें स्वरूप आणि तत्त्व समजून आलें आणि त्यांनीं आश्चर्यकारक असा जबाब दिला."

"पंडित जवाहरलाल म्हणतातच आहेत कीं, लोकांना थोपवून धरणेंच कठीण झालें आहे."

"हें सर्व इष्टच आहे. मी उघडपणें हें सांगूं इच्छितों कीं, अशी जर स्वयंप्रेरणा लोकांत नसेल तर लढा करावा अशीही माझी इच्छा नाहीं. पण मी इतका दूर असलों तरी मला ही जाणीव आहे कीं, लोक अगदीं तयार आहेत. ते फक्त खूण मिळण्याचीच वाट पाहत आहेत."

"शहरांतील लोकांचीच तेवढी अशी वृत्ति आहे कीं शेतकरी वर्गांतही हीच वृत्ति आहे?"

"होय. मला तर यापुढें शेतकरी वर्गावरच अधिकाधिक अवलंबावें लागणार आहे."

"ते मुख्यतः आर्थिक बुद्धीनें लढ्यांत भाग घेतात कीं राजकीय बुद्धीनें घेतात?"

"त्यांच्या आर्थिक गाऱ्हाण्यामुळें त्यांना राजकीय परिस्थितीचेंही ज्ञान झालेलें आहे. आजची राज्यपद्धति मुळासकट उलथून पाडल्याखेरीज आपली आर्थिक परिस्थिति सुधाणार नाहीं हें त्याना कळलें आहे. हिंदुस्थान सरकार हें धनिक वर्गाचेंच रक्षक बनलें आहे. गरिबांपासून पै-पैसा काय असेल तो काढून घेण्याचा कट हिंदी सरकारच्या आड राहून धनिक वर्गानें रचिला असेंच दिसत आहे. शेतकऱ्यावर जो कराचा डोईजड बोजा लादण्यांत आला आहे तो कमी केल्यावाचून शेतकऱ्याची स्थिति सुधारणें शक्य नाहीं."

"मध्य सरकारांत जबाबदार राज्य स्थापण्याच्या मुद्यावर जर परिषद मोडली, तर सायमन-कमिशनच्या विरुद्ध जशी एकमुखी विरोधी चळवळ झाली तशी होईल असें तुम्हांस वाटतें काय?"

"हो, मला तसें वाटतें. प्रागतिक किंवा नेमस्त लोक प्रत्यक्ष प्रतिकारांत सामील होणार नाहींत, पण त्यांचें मत पूर्णपणें राष्ट्रसभेच्याच बाजूस राहील."

"प्रांतिक स्वराज्याच्या पायावर ब्रिटिश सरकारशीं तडजोड घडणें तुम्हांस शक्य वाटतें काय?"

"मुळींच नाहीं. मीं एक तशी योजना सुचविली होती, पण ब्रिटिश सरकार ती मान्य करण्यास तयार होईना. जर प्रांतिक सरकारांना खरी सत्ता दिली आणि मध्य सरकारांत लवकर जबाबदार राज्य स्थापण्याची निःसंदिग्ध हमी देण्यांत आली तर तडजोड होऊं शकेल. या दोहोंच्या प्रस्थापनेंत जरी कांहीं काल अंतर ठेविलें तरी चालेल, पण दोहोंचा कायदा एकदमच झाला पाहिजे. एकाच कायद्यांत प्रांतिक व मध्य स्वराज्याची तरतूद असली पाहिजे. मध्य स्वराज्याच्या कायद्यावांचून प्रांतिक स्वराज्याकडे हिंदी राष्ट्रीय पुढारी ढुंकूनही पाहणार नाहींत."

या मुलाखतींत गोलमेज परिषदेंतून स्वातंत्र्याची प्राप्ति होत नाहीं आणि पुनः हिंदुस्थानांत येऊन दुसरा लढा सुरू करावा लागणार आहे याची स्पष्ट जाणीव महात्मा गांधींनीं जगाला करून दिलेली आहे. परिषदेच्या अखेरच्या दिवशीं गांधींनीं जें भाषण केलें त्यांतही पुढील लढ्याची नांदी म्हटलेलीच जगाला ऐकूं आली. त्या भाषणांत आपल्या लढ्याचीं कारणें आणि त्याचें स्वरूप यांचें पुनः एकदां स्पष्टीकरण गांधींनीं केलें. भाषणाच्या सुरवातीसच ते म्हणाले, "या परिषदेस आलेले इतर सर्व पक्ष हे आपापल्या विशिष्ट विभागांचे प्रतिनिधि आहेत, पण सर्व हिंदुस्थान व त्यांतील सर्व हितसंबंध यांचें प्रतिनिधित्व करणारी राष्ट्रसभा हीच एक संस्था आहे. ती जमातवादी संस्था नसून ती वर्णभेद, वंशभेद किंवा धर्मभेद मानीत नाहीं. ही एक रोज वाढणारी संस्था असून तिनें सात लक्ष खेड्यांतील जनतेवर आपला प्रभाव चालत असल्याचें दाखवून दिलेलें आहे. असें असूनही राष्ट्रसभा हा अनेक पक्षांपैकींच एक पक्ष आहे, असें येथें मानण्यांत येत आहे.

"तुम्हीं जरी राष्ट्रसभेला निमंत्रण दिलें आहे तरी ती सर्व हिंदुस्थानची प्रतिनिधि आहे, हा तिचा अधिकार तुम्ही नाकारीत आहां. जगाच्या या टोंकांत असणाऱ्यांना हा अधिकार नाकारणें शक्य आहे आणि तो अधिकार मीही येथें शाबीत करूं शकणार नाहीं. असें असून मी हा अधिकार येथें मांडीत आहें. याचें कारण एवढेंच कीं, माझ्या डोक्यावर फार मोठी जबाबदारी आहे.

"राष्ट्रसभा ही बंडखोर वृत्तीची प्रतिनिधि आहे. हिंदी प्रश्नाचा सर्वसंमत असा निर्णय शिष्टाईनें लावण्यासाठीं बोलावण्यांत आलेल्या या परिषदेंत बंडाची भाषाही पुटपुटण्यास मनाई आहे हें मला माहीत आहे. येथें जमलेल्या सभासदांनीं एकामागून एक भाषणें करून पुनः पुनः सांगितलें कीं, हिंदुस्थाननें आपलें स्वातंत्र्य शिष्टाईच्या, युक्तिवादाच्या मार्गानेंच संपादन करावें आणि हिंदुस्थानची मागणी जर युक्तिवादानेंच ब्रिटननें मान्य केली तर त्यांतच ब्रिटनचें सर्वश्रेष्ठ वैभव आहे. पण राष्ट्रसभेचें मत याहून थोडें भिन्न आहे. राष्ट्रसभेपाशीं एक दुसरा पर्याय आहे. पण तो पर्याय तुम्हांस अप्रिय वाटतो.

"येथें झालेल्या अनेक वक्त्यांचीं भाषणें अत्यंत लक्षपूर्वक आणि योग्य तो सन्मान देऊन मीं ऐकिलीं आहेत. ते म्हणतात कीं, हिंदुस्थानांत जर कायदे मोडण्याची, बंडाची, दहशतवादाची आणि अशीच इतर वृत्ति फैलावली तर मोठी आपत्ति गुजरेल. मी कांहीं इतिहासाचा अभ्यास केला आहे असें म्हणत नाहीं; तसा दंभ करीत नाहीं. पण शाळेंतील विद्यार्थी या नात्यानें मलाही इतिहासाची प्रश्नपत्रिका लिहावी लागत असे. तेव्हां मीं वाचलेलें आहे कीं, इतिहासाच्या पानांवर स्वातंत्र्य-वीरांच्या रक्ताचे डाग पडलेले आहेत. कल्पनातीत असे क्लेश सहन करण्याच्या दिव्यांतून गेल्यावांचून राष्ट्रांना आत्मप्राप्ति झाल्याचें एकही उदाहरण मला माहीत नाहीं. खून करण्याचा सुरा, विषाचा पेला, बंदुकीची गोळी, भाले आणि तलवारी किंवा अशींच इतर हिंसक साधनें यांचा उपयोग, मी ज्यांना स्वातंत्र्याचे अंधभक्त म्हणतों त्यांनीं आजपर्यंत केलेला आहे. आणि असें असूनही इतिहासज्ञांनीं त्यांना त्याबद्दल दोष दिलेला नाहीं.

"अशा अवस्थेंत राष्ट्रसभेनें जगाच्या रंगभूमीवर प्रवेश केलेला आहे. तिनें एक नवें साधन शोधून काढिलें आहे. हें साधन इतिहासाला अज्ञात आहे. सविनय कायदेभंग हें त्या साधनाचें नांव असून राष्ट्रसभा त्याच साधनाचा उपयोग करीत आहे. असें म्हणतांच माझ्यापुढें दगडाची भिंत उभी राहते. मला असें सांगण्यांत येतें कीं, जगातील कोणतेंही सरकार हें सहन करणार नाहीं. बरोबरच आहे. सरकार तें सहन करणारच नाहीं. कोणत्याही सरकारनें उघड बंड सहन केलेलें नाहीं. कोणतेंही सरकार सविनय कायदेभंग सहन करणार नाहीं, पण या शक्तीपुढें सरकाराना खचून पडावें लागतें. तसेंच आज ब्रिटिश सरकार या शक्तीपुढें खचत आहे. प्रबल अशा डच सरकारला, आठ वर्षें आमची सत्त्वपरीक्षा घेतल्यानंतर परिस्थितीचा तर्क-शुद्ध निष्कर्ष मान्य करावाच लागला. जनरल स्मट्स् हे एक शूर सेनानी आहेत, मोठे मुत्सद्दी आहेत आणि कठोर सत्त्वपरीक्षक आहेत, पण त्यांनासुद्धां आपल्या स्वाभिमानाच्या रक्षणासाठीं लढणाऱ्या निरपराधी स्त्री-पुरुषांचे प्राण घेण्याचा प्रसंग आला तेव्हा त्या कर्माची भीति वाटली व शिसारी आली. ज्या गोष्टी आपण केव्हांही मान्य करणार नाहीं असें ते १९०८ सालीं इरादापूर्वक म्हणत होते, त्याच गोष्टी ज. बोथा यांचें बल पाठीशीं उभें असतांनाही १९१४ सालीं त्यांना कराव्या लागल्या; कारण त्या वेळपर्यंत या सत्याग्रहींची पुरी सत्त्वपरीक्षा त्यांनीं घेतली होती. हिंदुस्थानांतही लॉर्ड चेम्सफोर्डना तसें करावें लागलें आहे. बोरसद आणि बार्डोली या प्रकरणांत मुंबईच्या गव्हर्नरांना तेंच करावें लागलें. म्हणून पंतप्रधान महाशय, मी आपणांस म्हणतों कीं, आतां ही गोष्ट नाकारण्याची वेळ उरलेली नाहीं. आतां आपले मार्ग एकमेकांच्या उलट दिशेनें जाण्याचा संभव आहे. निराशा झाली असली तरी मी आशा बाळगून आहें. अद्यापि माझ्या देशाला सन्मान्य समेट करतां यावा, आणि माझ्या लक्षावधि देशबंधुभगिनींना आणि बालकांना या अग्निदिव्यांतून जाण्याचा प्रसंग पुन्हा येऊं नये याबद्दल मी शक्य ते प्रयत्न करीन. अशा प्रकारच्या लढ्यात त्यांना पुन्हा लोटणें ही कांहीं आनंदाची किंवा

समाधानाची गोष्ट नाहीं. परंतु दुसरें अग्निदिव्य करणें हेंच जर आमचें भवितव्य असेल तर त्याला मी आनंदानें व समाधानानें कवटाळीन. तसें करतांना, मी माझें कर्तव्यच करीत आहें आणि देशाला जें योग्य वाटतें तेंच तो करीत आहे, असें समाधान आम्हांस राहील आणि त्याला हेंही विशेष समाधान राहील कीं, आपण इतरांचे प्राण घेत नसून स्वतःच्याच प्राणांचें बलिदान करीत आहों ; आपण ब्रिटिशांना क्लेश प्रत्यक्षपणें देत नसून आम्हीच क्लेश भोगीत आहों. प्रो. गिल्बर्ट मरे हे मला जें म्हणाले तें माझ्या शब्दांत तुम्हांस सांगतों. ते म्हणाले, 'जेव्हां तुमचे सहस्रावधि देशबांधव क्लेश सहन करितात तेव्हां आम्हां इंग्लिश लोकांना त्याबद्दल मुळींच क्लेश होत नाहींत, असें तुम्ही समजूं नका. आम्ही कांहीं हृदयशून्य नाहीं.' मलाही तसें म्हणावयाचें नाहीं. आम्हांस क्लेश देतांना तुम्हांसही क्लेश होतात हें मी जाणतों, पण असे क्लेश तुम्हांस अधिक व्हावेत हीच माझी इच्छा आहे. कारण तुमच्या अंतःकरणाचा भेद मला करावयाचा आहे. जेव्हां तुमच्या अंतःकरणाचा मी भेद करीन तेव्हांच शिष्टाई यशस्वी होण्यास लागणारी अनुकूल मानसिक परिस्थिति निर्माण होईल. शिष्टाई तर नेहमींच करावी लागेल. आज मी जो इतके मैल दूर शिष्टाईकरतां आलों आहें, तोही लॉर्ड आयर्विन यांनीं अनेक वटहुकूम काढून आमची सत्त्वपरीक्षा घेतल्यानंतरच आलों आहें. हिंदुस्थानांतील हजारों स्त्री-पुरुष आणि हजारों बालकें यांनीं आत्मक्लेश सहन केल्याचा भरपूर पुरावा, लॉर्ड आर्यविन याच्यापुढें आहे आणि वटहुकूम असोत किंवा नसोत, लाठी-मार होवो किंवा न होवो, आतां या प्रवाहाचा महापूर थोपवून धरणें शक्य नाहीं आणि स्वातंत्र्यासाठीं तहानलेल्या हिंदी स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणांत उसळून येणाऱ्या भावना दडपून टाकणें शक्य नाहीं हें त्यांनीं पाहिलें आहे. माझे प्राण मीं तुमच्या पुढें ठेवलेले आहेत. वर्किंग कमिटी आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटी यांचेही प्राण तुमच्या हातीं आहेत. परंतु हें लक्षांत असूं द्या कीं, लक्षावधि मूक जनतेच्या प्राणांचा हा प्रश्न तुम्हापुढें आहे. त्यांचे प्राण शक्य तर बळी द्यावे लागूं नयेत अशी माझी इच्छा आहे आणि म्हणून हिंदुस्थानला

खरें स्वातंत्र्य मिळत असेल तर मी समेट करण्यास अत्यंत उत्सुक आहें. या स्वातंत्र्याला तुम्ही कोणतेंही नांव द्या. गुलाबाला कोणतेंही नांव दिलें तरी त्याचा सुवास मधुरच असतो. तीच स्थिति स्वातंत्र्याच्या गुलाबाचीही आहे. मला तें गुलाबपुष्प हवें आहे. कृत्रिम फूल नको आहे. 'वसाहतीचा दर्जा म्हणजे काय व त्याचा अर्थ काय होतो' या शब्दजंजाळापलीकडे मी गेलों आहें. मला शब्दाचा वाद करावयाचा नाहीं. पूर्ण स्वातंत्र्य मला हवें आहे. आणि तें मिळालें तर मी शब्दाबद्दल तंटा करणार नाहीं."

यानंतर अल्पसंख्याकांच्या हितरक्षणासंबंधीं ते म्हणाले, "अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविल्याखेरीज हिंदुस्थानला स्वातंत्र्य किंवा स्वराज्य नाहीं हें मी जाणतों. तथापि मी दुसरीकडे जें म्हणालों तेंच पुन्हा एकदां येथें सांगतों कीं, जोंपर्यंत एका जमातीला दुसऱ्या जमातीपासून किंवा एका वर्गाला दुसऱ्या वर्गापासून दूर लोटणारी परकीय राज्याची पाचर कायम आहे तोंपर्यंत या प्रश्नाचें खरें जिवंत उत्तर मिळणार नाहीं. आणि निरनिराळ्या जमातींमध्यें जिवंत मैत्रीही निर्माण होणार नाहीं. तोंपर्यंतच्या योजना, या केवळ कागदी योजना ठरतील, पण ज्या क्षणीं ही पाचर काढून घेण्यांत येईल त्याच वेळीं आमचे घरगुती संबंध, आमच्या एकमेकांसंबंधींच्या भावना आणि आम्ही सर्व एकाच देशांत जन्मास आलों ही जाणीव प्रभावी बनेल. या गोष्टींना महत्त्व नाहीं असें तुम्हांस वाटतें काय? हीं भांडणें फार जुनीं नाहींत. आम्हां सर्वांस लज्जा वाटविणारी ब्रिटिश सत्ता जितकी जुनी आहे, तेवढींच हीं भांडणेंही जुनीं आहेत. ब्रिटन आणि हिंदुस्थान यांचा, आज जो अनैसर्गिक, कृत्रिम आणि दुर्दैवी संबंध अस्तित्वांत आहे, तो बदलून जाऊन स्वेच्छेनें एकत्र येणाऱ्या समान भागीदारांचा संबंध जेव्हां त्यांच्यांत निर्माण होईल तेव्हां तुम्हांस आढळून येईल कीं, हिंदु-मुसलमान, शीख, युरोपियन, अँग्लो-इंडियन, ख्रिश्चन आणि अस्पृश्य, हे सर्व परस्परांशीं अद्वैत भावनेनें वागूं लागतील."

यानंतर गांधींनीं संस्थानिकांना उद्देशून दोनतीन मुद्दे सांगितले. त्यांनीं आपल्या प्रजेला नागरिक हक्क द्यावेत, या हक्कांचें रक्षण करण्याची सत्ता

देशांतील वरिष्ठ कोर्टाला द्यावी आणि प्रजेच्या प्रतिनिधित्वाचें तत्त्व मान्य करून इंग्लंडचा राजा किंग जॉर्ज हा जसा घटनात्मक पद्धतीनें राज्य करतो तसेंच राज्य करण्यास आम्ही तयार आहोंत, केवळ अनियंत्रित हुकूमशहा असे आम्ही राहूं इच्छीत नाहीं, अशी लोकांची खात्री करावी. यानंतर पठाणांच्या सीमाप्रांतास तावडतोब प्रांतिक स्वराज्य देण्यांत यावें अशी पंतप्रधानांना विशेष विनंति करून त्यांनीं आपल्या भाषणाच्या अखेरीस आभारप्रदर्शनाचें कार्य केलें.

हें आभारप्रदर्शन करतांना ते म्हणाले, " यापुढें आपलें सहकार्य टिकणार नाहीं किंवा तें माझ्यावर अवलंबून नाहीं. बऱ्याच अंशीं तें आपल्यावरच अवलंबून आहे. पण तें केवळ तुमच्यावरही अवलंबून असणार नाहीं. इतक्या अनेक घटनांवर तें अवलंबून असेल कीं, त्या सर्व घटनांवर तुम्ही किंवा आम्ही या कोणाचेंच नियंत्रण चालणार नाहीं. पण तें कांहीं झालें तरी मी आपणा सर्वांचे, बादशहा आणि महाराणी यांच्यापासून तो लंडनच्या ईस्ट एण्डमध्यें मी ज्या दरिद्री लोकांच्या वस्तींत उतरलों आहें तेथें राहणाऱ्या गरिबांपर्यंत सर्वांचे आभार मानतों. लंडनच्या त्या विभागांत राहणाऱ्या गरीब जनतेनें आपल्या कुटुंबांतील एक घटक या नात्यानें माझा स्वीकार केला आहे. ती मला विशेष आदर दाखवीत आहे. तिच्या या आदराची स्मृति हें बहुमोल धन घेऊन मी परत जात आहें. या परिषदेंतही आदर आणि खरें प्रेम यांव्यतिरिक्त कोणतीही दुसरी भावना माझ्यासंबंधीं मला प्रत्ययास आली नाहीं. अनेक इंग्लिश लोकांशीं माझा येथें संबंध आला. तो एक बिनमोल असा झालेला लाभ मी समजतों. मीं जें जें त्यांच्यापुढें मांडलें तें खरें असलें तरी त्यांना अप्रिय असतांनाही तें त्यांनीं लक्षपूर्वक ऐकून घेतलें. त्यांनीं हें ऐकत असतां केव्हांही क्रोध किंवा कंटाळा दर्शविला नाहीं. पुढें माझें कांहीं झालें किंवा या परिषदेचें भवितव्य कसेंही ठरलें, तरी या देशांत वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत माझ्याविषयीं जो अत्यंत आदर आणि गाढ प्रेम मला आढळलें तें मी आपल्या अंतःकरणांत जतन करून नेत आहें. मानवी अंतःकरणांतील

खरें स्वातंत्र्य मिळत असेल तर मी समेट करण्यास अत्यंत उत्सुक आहें. या स्वातंत्र्याला तुम्ही कोणतेंही नांव द्या. गुलाबाला कोणतेंही नांव दिलें तरी त्याचा सुवास मधुरच असतो. तीच स्थिति स्वातंत्र्याच्या गुलाबाचीही आहे. मला तें गुलाबपुष्प हवें आहे. कृत्रिम फूल नको आहे. 'वसाहतीचा दर्जा म्हणजे काय व त्याचा अर्थ काय होतो' या शब्दजंजाळापलीकडे मी गेलों आहें. मला शब्दाचा वाद करावयाचा नाहीं. पूर्ण स्वातंत्र्य मला हवें आहे. आणि तें मिळालें तर मी शब्दाबद्दल तंटा करणार नाहीं."

यानंतर अल्पसंख्याकांच्या हितरक्षणासंबंधीं ते म्हणाले, "अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविल्याखेरीज हिंदुस्थानला स्वातंत्र्य किंवा स्वराज्य नाहीं हें मी जाणतों. तथापि मी दुसरीकडे जें म्हणालों तेंच पुन्हा एकदां येथें सांगतों कीं, जोंपर्यंत एका जमातीला दुसऱ्या जमातीपासून किंवा एका वर्गाला दुसऱ्या वर्गापासून दूर लोटणारी परकीय राज्याची पाचर कायम आहे तोंपर्यंत या प्रश्नाचें खरें जिवंत उत्तर मिळणार नाहीं. आणि निरनिराळ्या जमातींमध्यें जिवंत मैत्रीही निर्माण होणार नाहीं. तोंपर्यंतच्या योजना, या केवळ कागदी योजना ठरतील, पण ज्या क्षणीं ही पाचर काढून घेण्यांत येईल त्याच वेळीं आमचे घरगुती संबंध, आमच्या एकमेकांसंबंधींच्या भावना आणि आम्ही सर्व एकाच देशांत जन्मास आलों ही जाणीव प्रभावी बनेल. या गोष्टींना महत्त्व नाहीं असें तुम्हांस वाटतें काय? हीं भांडणें फार जुनीं नाहींत. आम्हां सर्वांस लज्जा वाटविणारी ब्रिटिश सत्ता जितकी जुनी आहे, तेवढींच हीं भांडणेंही जुनीं आहेत. ब्रिटन आणि हिंदुस्थान यांचा, आज जो अनैसर्गिक, कृत्रिम आणि दुर्दैवी संबंध अस्तित्वांत आहे, तो बदलून जाऊन स्वेच्छेनें एकत्र येणाऱ्या समान भागीदारांचा संबंध जेव्हां त्यांच्यांत निर्माण होईल तेव्हां तुम्हांस आढळून येईल कीं, हिंदु-मुसलमान, शीख, युरोपियन, अँग्लो-इंडियन, ख्रिश्चन आणि अस्पृश्य, हे सर्व परस्परांशीं अद्वैत भावनेनें वागूं लागतील."

यानंतर गांधींनीं संस्थानिकांना उद्देशून दोनतीन मुद्दे सांगितले. त्यांनीं आपल्या प्रजेला नागरिक हक्क द्यावेत, या हक्कांचें रक्षण करण्याची सत्ता

देशांतील वरिष्ठ कोर्टाला चावी आणि प्रजेच्या प्रतिनिधित्वाचें तत्त्व मान्य करून इंग्लंडचा राजा किंग जॉर्ज हा जसा घटनात्मक पद्धतीनें राज्य करतो तसेंच राज्य करण्यास आम्ही तयार आहोंत, केवळ अनियंत्रित हुकूमशहा असे आम्ही राहूं इच्छीत नाहीं, अशी लोकांची खात्री करावी. यानंतर पठाणांच्या सीमाप्रांतास ताबडतोब प्रांतिक स्वराज्य देण्यांत यावें अशी पंतप्रधानांना विशेष विनंति करून त्यांनीं आपल्या भाषणाच्या अखेरीस आभारप्रदर्शनाचें कार्य केलें.

हें आभारप्रदर्शन करतांना ते म्हणाले, " यापुढें आपलें सहकार्य टिकणार नाहीं किंवा तें माझ्यावर अवलंबून नाहीं. बऱ्याच अंशीं तें आपल्यावरच अवलंबून आहे. पण तें केवळ तुमच्यावरही अवलंबून असणार नाहीं. इतक्या अनेक घटनांवर तें अवलंबून असेल कीं, त्या सर्व घटनांवर तुम्ही किंवा आम्ही या कोणाचेंच नियंत्रण चालणार नाहीं. पण तें कांहीं झालें तरी मी आपणा सर्वांचे, बादशहा आणि महाराणी यांच्यापासून तो लंडनच्या ईस्ट एण्डमध्यें मी ज्या दरिद्री लोकांच्या वस्तींत उतरलों आहें तेथें राहणाऱ्या गरिबांपर्यंत सर्वांचे आभार मानतों. लंडनच्या त्या विभागांत राहणाऱ्या गरीब जनतेनें आपल्या कुटुंबांतील एक घटक या नात्यानें माझा स्वीकार केला आहे. ती मला विशेष आदर दाखवीत आहे. तिच्या या आदराची स्मृति हें बहुमोल धन घेऊन मी परत जात आहें. या परिषदेंतही आदर आणि खरें प्रेम यांव्यतिरिक्त कोणतीही दुसरी भावना माझ्यासंबंधीं मला प्रत्ययास आली नाहीं. अनेक इंग्लिश लोकांशीं माझा येथें संबंध आला. तो एक बिनमोल असा झालेला लाभ मी समजतों. मीं जें जें त्यांच्यापुढें मांडलें तें खरें असलें तरी त्यांना अप्रिय असतांनाही तें त्यांनीं लक्षपूर्वक ऐकून घेतलें. त्यांनीं हें ऐकत असतां केव्हांही क्रोध किंवा कंटाळा दर्शविला नाहीं. पुढें माझें कांहीं झालें किंवा या परिषदेचें भवितव्य कसेंही ठरलें, तरी या देशांत वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत माझ्याविषयीं जो अत्यंत आदर आणि गाढ प्रेम मला आढळलें तें मी आपल्या अंतःकरणांत जतन करून नेत आहें. मानवी अंतःकरणांतील

ही प्रेमभावना येथें आढळली, येवढ्यानेंही इंग्लंडला मीं दिलेल्या या भेटीचें सार्थक झालें असें मला वाटतें. इंग्लिश स्त्री-पुरुषांना हिंदुस्थानसंबंधीं अनेक असत्य गोष्टी कथन करून, त्यांचीं मनें दूषित करण्यांत आलेलीं असतात. लँकेशायरमधील मजूरवर्गामध्यें आमच्या बहिष्कारानें बेकारी वाढल्यामुळें आमच्याविषयीं राग वाटण्याचा सकारण संभव होता, पण तेथेंही मी गेलों असतां त्यांच्यांत माझ्यासंबंधीं क्रोधाची किंवा द्वेषाची भावना मला आढळली नाहीं. तेथील स्त्री-पुरुष कामगारांनीं मला हृदयाशीं कवटाळलें. त्यांच्याचपैकीं मी एक आहें असें समजून ते माझ्याशीं वागले, याची विस्मृति मला केव्हांही होणार नाहीं. सहस्रावधि इंग्रजांचें मित्रप्रेम मी माझ्याबरोबर घेऊन जात आहें. माझी-त्यांची ओळख नाहीं. परंतु रोज सकाळीं पहांटे उठून जेव्हां मी या तुमच्या रस्त्यांतून हिंडावयास जातों, तेव्हां माझ्यासभोंवार असलेल्या जनसमूहाच्या नेत्रांतून तें प्रेम ओसंडत असलेलें दिसतें. हा सर्व सत्कार व ही उदारता माझ्या दुदवी देशाचें भवितव्य यापुढें कांहींही ठरलें तरी मी केव्हांही विसरणार नाहीं. तुम्हीं शांतपणें माझें म्हणणें ऐकून घेतलें याबद्दल मी तुमचा आभारी आहें."

यानंतर पंतप्रधान मि. मॅक्डोनल्ड यांचे वैयक्तिक आभार मानताना ते म्हणाले, " माझ्या मतानें तरी आतां आपले मार्ग भिन्न दिशांना जाण्याचा कांहींसा संभव मला दिसत आहे. तुमच्या पत्रकाचा मी काना-मात्रांसहित अद्यापि अभ्यास करीन. तथापि आपले मार्ग भिन्न झाले तरीही मी आपले अंतःकरणपूर्वक आभार मानूं इच्छितों. आजच्या समाजांत एकमेकांशीं पूर्ण सहमत सर्वच वेळीं व्हावें असें आपलें भाग्य नाहीं. याच्या उलट आपल्या जीवनांतील अनेक वादळांना तोंड देण्यास आपण तयार असावें यांतच मानवाचें खरें श्रेष्ठत्व आहे. अनेक प्रसंगीं सख्ख्या बंधूंनासुद्धां भिन्न दिशांस जाणाऱ्या मार्गांनीं जावें लागतें, पण आपले सर्व तंटे संपविल्यानंतर जर त्यांना असें म्हणतां आलें कीं, आम्ही जरी एकमेकांशीं झगडलों तरी कोणाचा मत्सर केला नाहीं. आम्ही सज्जनाप्रमाणें व शूर शिपायाप्रमाणें लढलों हें जर

आम्हांस, म्हणजे मला आणि माझ्या देशबांधवांना आमच्यासंबंधीं आणि पंतप्रधान, आपल्यासंबंधीं व आपल्या देशबंधूंसंबंधींही मला म्हणतां आलें, तर आम्ही एकमेकांपासून दूर जात असतानाही योग्य प्रकारें वागलों असें मी म्हणेन. यापुढें माझा मार्ग कोणच्या दिशेनें जाईल हें मला माहीत नाहीं, पण तो कोणत्याही दिशेनें गेला तरी मला त्याचें कांहीं वाटणार नाहीं. जरी माझा मार्ग तुमच्या अगदीं विरुद्ध दिशेनें गेला तरीही अंतःकरणांपासून मी तुमचे आभार मानणें हेंच माझें कर्तव्य आहे."

हिंदी स्वातंत्र्याचा जगाला संदेश

केवळ तात्कालिक स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीनें महात्मा गांधींची विलायतची सफर अपेक्षी झाली असली, तरी हिंदी स्वातंत्र्याचा जगभर प्रचार होण्याच्या दृष्टीनें आणि गोलमेज परिषदेला शें-दीडशें प्रतिनिधि बोलावून आम्हीं हिंदी स्वराज्याचा प्रश्न सोडविला असें जगाला भासविण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनीं चालविला होता तो विफल करून, हिंदी जनतेची खरी प्रतिनिधि राष्ट्रसभा हीच संस्था आहे व संपूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत हिंदी राजकारणाचा प्रश्न सुटलेला नाहीं हें जगाच्या निदर्शनास आणून देण्याच्या दृष्टीनें गांधींचा हा दौरा अत्यंत यशस्वी झाला.

ता. २९ ऑगस्टला महात्मा गांधी हिंदुस्थानांतून इंग्लंडास जाण्यास निघाले आणि ता. ५ डिसेंबर रोजीं इंग्लंडांतून परत निघून ता. २९ डिसेंबरास ते हिंदुस्थानांत मुंबई बंदरांत येऊन दाखल झाले. या काळात सर्व जगाचे डोळे त्यांच्याकडे व हिंदी स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे लागले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें १९३१ साल होतें. इटालींत मुसोलिनीनें फॅसिझम् स्थापन केला होता, तरीही जर्मनींत अद्यापि हिटलरशाहीचा उदय झालेला नव्हता. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेली राष्ट्रसंघ ही संस्था अद्यापि जिवंत असून दुसरें महायुद्ध होईल किंवा नाहीं याबद्दल जगाचें मत आंदोलन घेत होतें. रशियांतील समाजवाद सुस्थिर बनला होता आणि रशिया-

विरुद्ध सर्व भांडवलदार लोकशाही राष्ट्रें एक होऊन लढतील तरच दुसरें महायुद्ध होईल असा संभव वाटत होता. तथापि १९२९ पासून जी आर्थिक मंदीची लाट उसळली होती त्यामुळें भांडवलशाही जग डळमळूं लागलें होतें. राष्ट्रसंघाची पत कमी होऊं लागली होती. भांडवलदार लोकशाही ही खरी लोकशाही नव्हे, हें रशियाचें मत लोकांना पटूं लागलें होतें. पण त्याचबरोबर रशियाच्या एकपक्षीय हुकूमशाहीच्या मार्गानें जाऊन समाजवादी क्रांति करावी असेंही कोणास वाटत नव्हतें. इंग्लंडांत समाजवादी पक्ष अधिकारावर येऊन सनदशीर मार्गानें समाजवादाची स्थापना करील अशी आशा वाटत होती, पण या काळांतच इंग्लंडांतील समाजवादी पक्ष मोडून त्याचे मॅक्डोनल्डप्रभृति नेते बाल्ड्विनच्या राष्ट्रीय पक्षांत सामील झाले होते. यामुळें सनदशीर राजकारणानें समाजवादी क्रांति होईल ही आशा नष्ट होत होती.

अशा परिस्थितींत सशस्त्र क्रांतीला व युद्धाला एखादा अनत्याचारी पर्याय सांपडला तर तो हवा आहे, या वृत्तीनें जगांतील सुशिक्षित राजकारणी लोक विचार करीत होते. अशा अवस्थेंत १९३० सालीं महात्मा गांधींनीं सत्याग्रहाची जी प्रचंड चळवळ केली त्या चळवळीच्या प्रभावापुढें ब्रिटिश मुत्सद्दी क्षणभर नमले व राष्ट्रसंभेशीं युद्धतहकुबीचा करार करून महात्मा गांधींना स्वातंत्र्याचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठीं विलायतेस घेऊन गेले, हें पाहून महात्मा गांधींनीं सत्याग्रहाच्या रूपानें जगाला अहिंसक क्रांतीचा एक नवा संदेश दिला आहे व तो सशस्त्र क्रांति व महायुद्धें यांना पर्याय होऊं शकेल असा आशावाद शांतताप्रिय सामान्य जनतेच्या मनांत उदय पावत होता. सामान्य जनता, मग ती इंग्लंड, अमेरिका, युरोप, आशिया यांपैकीं कोणत्याही देशांतील अथवा खंडांतिल असो, तिला युद्ध व सशस्त्र क्रांति ह्या गोष्टी वस्तुतः मनापासून नको असतात. तथापि सामाजिक व राजकीय तंटे मिटविण्यास जेव्हां कायदेशीर मार्ग पुरे पडत नाहींत आणि कायदेशीर न्याय देणाऱ्या संस्थांकडून जेव्हां खरा न्याय मिळण्याची पूर्ण निराशा होते, तेव्हां जनता सशस्त्र क्रांतीस किंवा युद्धास प्रवृत्त होते. महात्मा गांधींनीं न्यायस्थापनेचा, न्यायसंपादनाचा एक नवा

अधिक प्रभावी मार्ग हिंदी जनतेला दाखवून देण्यास १९२० सालापासूनच प्रारंभ केला होता व त्या वेळेपासूनच युरोप-अमेरिकेतील तत्त्वज्ञान्यांनीं गांधींना जगांतील सर्वश्रेष्ठ विभूति असें म्हणण्यास प्रारंभ केला होता. पण हें त्यांचें मत जगांतील सामान्य जनतेच्या कानांपर्यंत जाऊन पोहोंचलें नव्हतें. तसेंच त्यांची १९२० सालीं सुरू झालेली असहकाराची मोहीम अखेरीस राजकीयदृष्ट्या विफल ठरली असेंच जगाला वाटत होतें व हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गांत तिचा प्रभाव टिकला नव्हता. पण १९३० चें स्वातंत्र्य-सत्याग्रहाचें आंदोलन, गांधी-आयर्विन करार, त्यामुळें हिंदी राजकारणांत महात्मा गांधी व राष्ट्रसभा यांना मिळालेलें असामान्य स्थान व महत्त्व, यांमुळें या देशांत व जगांत महात्मा गांधींची, क्रांतिकारक राष्ट्रीय नेता या नात्यानें प्रतिष्ठा फार वाढली आणि त्या वेळपासून हिंदी जनतेचें खरें प्रतिनिधित्व राष्ट्रसभेकडेच आलें. जगानें या गोष्टीला मान्यता दिली आणि गांधी-आयर्विन कराराने ब्रिटिश सत्तेनें या मान्यतेवर एक प्रकारें शिक्कामोर्तबच केलें. जरी ब्रिटिश मुत्सद्यांचा तो करार करण्यांत तसा हेतु नसला तरी जग आणि हिंदुस्थानांतील राष्ट्रसभेव्यतिरिक्त इतर पक्षहि गांधी-आयर्विन कराराकडे त्या दृष्टीनें पाहूं लागले. महात्मा गांधींनीं हिंदुस्थान सोडल्यापासून ते परत या देशांत येईपर्यंत जीं जीं भाषणें केलीं, मुलाखती दिल्या आणि दुसऱ्या देशांना संदेश दिला त्यांत हिंदुस्थान, स्वातंत्र्याचा आणि क्रांतीचा एक नवा मार्ग जगांतील दलित जनतेस दाखवून देत आहे, यावर जसा भर दिला, तसाच सत्याग्रही राष्ट्रसभा ही एकच हिंदी जनतेची व राष्ट्राची एकमेव प्रतिनिधि आहे या मुद्यावरही तितकाच भर दिला. यामुळें हिंदुस्थान म्हणजे गांधींचा देश, असें जगांतील सामान्य जनतेचें मत बनलें आणि हिंदी जनतेचीही तशी श्रद्धा वाढली.

यानंतर हिंदुस्थानची एकमेव प्रतिनिधि राष्ट्रसभा नाहीं असें सिद्ध करण्यासाठीं अल्पसंख्य जमातींना जवळ करणें आणि संस्थानिकांना हाताशीं धरणें हें धोरण प्रतिगामी ब्रिटिश मुत्सद्यांनीं स्वीकारलें. या जमातवादी व प्रतिगामी राजकारणास चालना देण्यासाठीं त्यांनीं अनेक

उपाय योजिले. त्यांपैकीं पाकिस्तान हा एक उपाय होय. त्याचा विचार पुढें करण्यांत येईल. हिंदुस्थानांतील राष्ट्रसभाविरोधी राजकीय पक्ष यानंतर जमातवादी बनले आणि ब्रिटिशांनीं या राजकारणास सहाय्य केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. जगांतील एकंदर राजकारणांत फॅसिझम व नाझीझम या शक्ति यापुढें वाढत गेल्या, तशीच हिंदी राजकारणांत ही जमातवादी राजकीय शक्ति वाढत गेली. पण राष्ट्रसभेच्या शक्तीहून या शक्तीचें सामर्थ्य कधींच अधिक वाढलें नाहीं. तथापि ब्रिटिश मुत्सद्यांनीं मुस्लिम राष्ट्रवादास चालना देऊन पाकिस्तान स्थापन केलें. या पाकिस्तानच्या राजकारणांचें बीज दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळीं जो अल्पसंख्यकांचा करार झाला, त्यांतच होतें. पण जगानें १९३१ सालीं हिंदुस्थान म्हणजे गांधी व राष्ट्रसभा म्हणजे सत्याग्रह, क्रांति-शक्ति ही जी मान्यता दिली, ती केव्हांच नष्ट झाली नाहीं.

गांधींनीं विलायतेस जाण्यासाठीं बोटीवर पाय ठेविल्यापासून त्यांच्या प्रचारास प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. बोटीच्या डेकवर दररोज संध्याकाळीं त्यांची सामुदायिक प्रार्थना होत असे. या प्रार्थनेस त्या बोटीवर जे हिंदु, मुसलमान, पारशी, शीख उतारू होते ते सर्व हजर असत. सकाळच्या प्रार्थनेस मात्र-ती फार पहांटे होत असल्यामुळें-फारसें कोणी येत नसे. सायंकाळीं होणाऱ्या प्रार्थनेस कांहीं युरोपियन लोकही हजर राहत. प्रार्थनेच्या अखेरीस गांधींना दररोज एक विषय सुचविण्यांत येत असे आणि त्या विषयावर दुसऱ्या दिवशीं गांधींजी प्रवचन करीत. अशा प्रवचनांमध्यें धार्मिक असे सर्व विषय येत असत. या वेळीं त्यांनीं दिलेल्या प्रवचनांपैकीं "प्रार्थना" या विषयावरील त्यांचें प्रवचन अत्यंत प्रसिद्धि पावलेलें असून त्यांत प्रार्थनेला आपल्या जीवनांत किती महत्त्वाचें स्थान आहे तें त्यांनीं विशद केलेलें आहे. त्याचा थोडक्यांत गोषवारा त्याच्याच शब्दांत पुढें दिला आहे :—

"माझ्या जीवनांत प्रार्थनेला इतकें महत्त्व आहे कीं, प्रार्थनेमुळेंच मी माझा उद्धार करूं शकलों. मीं प्रार्थना केली नसती तर मला फार पूर्वीच वेडही लागलें असतें. खाजगी आणि सार्वजनिक जीवनांतील

अत्यंत कटु असे अनुभव मला भोगावे लागले आहेत, हें तुम्हांस माझ्या आत्मचरित्रावरून दिसून येईल. या अनुभवांमुळें मी निराशेंत बुडून जात असें; ही तात्कालिक निराशा नष्ट करण्यास जर कोणतें साधन मीं योजिलें असेल, तर प्रार्थना हेंच तें साधन होय. मी आपणांस सांगूं शकतों कीं, सत्यनिष्ठा हा जसा माझ्या जीवनाचा मूलभूत भाग आहे, त्या अर्थानें प्रार्थना हा माझ्या जीवनांतील मूळपासूनचा भाग नाहीं. केवळ गरजेमुळेंच मीं तिचा आश्रय केला, आणि जेव्हां प्रार्थनेवाचून माझें जीवन सुखी होणें शक्य नाहीं असा मला अनुभव आला तेव्हांच मीं तिचा अवलंब केला. यानंतर दिवसेंदिवस ईश्वरावरील माझी श्रद्धा वाढत गेली आणि ईश्वराची प्रार्थना करण्याची प्रेरणा इतकी प्रबल बनली कीं, ती आवरणें अशक्य झालें. तिच्यावांचून माझें जीवन मला नीरस आणि शून्यवत् भासूं लागलें. दक्षिण आफ्रिकेंत असतांना ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनेंत मीं भाग घेतलेला होता. पण तिनें माझ्या अंतःकरणाचा कबजा केव्हांच घेतला नाहीं. त्यांच्या प्रार्थनेंत मी समरस होऊं शकलों नाहीं. ते परमेश्वरापाशीं कांहीं मागण्या करीत. मला तसें करवेना, त्यामुळें मला त्याच्यामध्यें भाग घेण्यांत मुळींच यश आलें नाहीं. प्रारंभीं परमेश्वर आणि प्रार्थना यांच्यावर माझी श्रद्धा नव्हती. माझें आयुष्य बरेंचसें जाईपर्यंत माझ्या जीवनांत प्रार्थना न केल्यानें कांहीं उणीव आहे असें मला भासत नसे, पण या अवस्थेनंतर अशी निष्ठा प्राप्त झाली कीं, ज्याप्रमाणें शरीरधारणेला अन्नाची गरज आहे त्याचप्रमाणें आत्म्याला प्रार्थनेची अपरिहार्य आवश्यकता आहे. किंबहुना प्रार्थना ही आत्म्याला जितकी आवश्यक आहे तितकें अन्नही शरीराला आवश्यक नाहीं. शरीर निरोगी राहण्यास पुष्कळ वेळां निराहार राहण्याची आवश्यकता असते. पण प्रार्थनेचा निराहार असा असूंच शकत नाहीं. मनुष्याला अतिआहाराप्रमाणें अति प्रार्थना करणें शक्यच नाहीं. कितीही केली तरी ती थोडीच राहणार. जगांत जगद्गुरु म्हणून जे प्रसिद्ध आहेत त्यापैकीं बुद्ध, येशू आणि महंमद हे श्रेष्ठ जगद्गुरु असें सांगतात कीं,

त्यांना प्रार्थनेमुळेंच प्रकाश प्राप्त झाला आणि प्रार्थनेवांचून ते जगूंही शकले नसते. राजकीय क्षितिजावर निराशा उत्पन्न होऊन मला कितीही मेडसावूं लागली तरी माझी शांति कधीं ढळली नाहीं. मला लाभलेल्या या शांतीचा इतर लोक हेवा करतात असें मला आढळून आलें आहे. मी आपणांस सांगतों कीं, ही माझी शांति मला प्रार्थनेमुळें प्राप्त होत असते. मी विद्वान् मनुष्य नाहीं, पण मी प्रार्थनेचा भक्त आहें असें नम्रपणें म्हणूं शकतों. या प्रार्थनेचें स्वरूप अमुकच असावें असा माझा आग्रह नाहीं. तथापि तिचे कांहीं रूढ प्रकार आहेत आणि या मळलेल्या वाटेनें, ज्या वाटेनें प्राचीन ऋषि गेले त्या वाटेनें, जाणें हें बिनधोक आहे, हा एक माझा अनुभव मीं सांगितला. प्रत्येकानें प्रयोग करून पाहावा म्हणजे त्यास असें आढळून येईल कीं, प्रार्थनेमुळें आपल्या जीवनांत दररोज कांहीं भर पडत आहे."

दुसऱ्या दिवशीं एका तरुणानें प्रश्न केला : "आपण ईश्वरावरील श्रद्धा गृहीत धरूनच बोलूं लागतां. आमच्यासारखे ईश्वरावर श्रद्धा न ठेवणारे जे असतील त्यांनीं प्रार्थना कशी करावी ?"

यावर गांधी म्हणाले, "ज्यांची ईश्वरावर श्रद्धा नसेल त्यांच्यामध्यें ती श्रद्धा निर्माण करण्याचें सामर्थ्य माझ्यापाशीं नाहीं. अशा कांहीं गोष्टी असतात कीं, त्या स्वयंसिद्धच असतात आणि इतर अशा कांहीं आहेत कीं, त्या केव्हांही सिद्ध करतां येणार नाहींत. भूमितींतील गृहीत कृत्यासारखेंच ईश्वराचें अस्तित्व आहे. तें केवळ बुद्धीच्याच नव्हे तर अंतःकरणाच्याही आटोक्याबाहेरचें असूं शकेल. केवळ बुद्धीनें केलेले प्रयत्न या कामीं कमीअधिक प्रमाणांत निष्फळ ठरलेले आहेत. कारण तार्किक युक्तिवादानें सिद्ध केलेल्या सिद्धान्तामुळें चैतन्यमय ईश्वरावरची निष्ठा निर्माण होऊं शकत नाहीं. कारण ती निष्ठा तर्कबुद्धीच्या पलीकडचीच आहे.....या कामीं सर्व तार्किक युक्तिवाद बाजूस सारून तुम्हीं एखाद्या लहान मुलाप्रमाणें ईश्वरावर श्रद्धा ठेवावी असें मी तुम्हांस म्हणेन. माझें अस्तित्व जर खरें असेल, तर ईश्वराचें अस्तित्वही तितकेंच खरें आहे. माझ्या जीवनास ईश्वराची जशी

आवश्यकता आहे तशीच आवश्यकता लक्षावधि जनतेच्या जीवनासही आहे. त्यांना तें बोलून दाखवितां येत नसेल, पण त्यांच्या जीवनाचें निरीक्षण केल्यास तुम्हांस दिसून येईल कीं, त्यांच्या जीवनाचा तो एक भाग आहे. ही श्रद्धा आज ढांसळत आहे. ती फिरून निर्माण करा एवढेंच मी तुम्हांस सांगतों. तसें करण्यापूर्वी तुमच्या बुद्धीस ज्या गोष्टी दिपवून टाकीत आहेत आणि ज्या ज्यांमुळें तुमचा तोल जात आहे, अशा अनेक गोष्टी तुम्हांस विसरून जाव्या लागतील, अशी श्रद्धा धारण करून तुम्ही चालूं लागा. आपणांस कांहींच समजत नाहीं, या विश्वांत एखाद्या परमाणूहूनही आपण क्षुद्र आहोंत, या गोष्टीला मान्यता देणें आणि विनय धारण करणें या दोहोंचें चिन्ह म्हणजेच ही श्रद्धा होय. परमाणूपेक्षांही आम्ही क्षुद्र आहों असें मी म्हणतों; याचें कारण परमाणूसुद्धां आपल्या जीवनाचा नियम उल्लंघीत नाहीं, पण आमच्या अज्ञानी अहंकारामुळें निसर्गाचा नियम आम्ही धाब्यावर बसवितों. ज्यांच्यापाशीं श्रद्धा नाहीं त्यांच्याशीं तर्क लढविण्यास माझ्यापाशीं युक्तिवाद नाहींत. एकदां तुम्हीं ईश्वराचें अस्तित्व मान्य केलें म्हणजे त्यांत प्रार्थना येणारच. आमचें सर्व जीवन हीच एक प्रार्थना आहे आणि म्हणून विशिष्ट वेळीं बसून प्रार्थना करण्याची आम्हांस आवश्यकता नाहीं, असला भयंकर युक्तिवाद आपण करतां कामा नये. ज्यांचें सर्व जीवन सर्व काल परमेश्वराशीं–अनंताशीं–तादात्म्य पावलेलें होतें, त्यांनींही असा अहंकार धरला नाहीं. त्यांचें सर्व जीवन ही एक अखंड प्रार्थना असली तरी ते तुमच्या-आमच्यासाठीं प्रार्थनेस विशिष्ट वेळीं बसत आणि 'आम्हीं ईश्वराशीं एकनिष्ठ राहूं' अशी प्रतिज्ञा पुन्हा पुन्हा करीत. अर्थात् आम्हीं अशी प्रतिज्ञा करावी असा कांहीं आग्रह परमेश्वराचा नाहीं, परंतु आपण ही प्रतिज्ञा रोज केली पाहिजे, म्हणजे जीवनांतील कोणत्याही आपत्तींतून आपण पार पडूं असें मी तुम्हांस आश्वासन देतों."

एडन बंदरांत पोहोंचतांच तेथील हिंदी व अरबी लोकांनीं गांधीजींचें थाटांत स्वागत केलें. या ठिकाणीं प्रथमतः तेथील ब्रिटिश रेसिडेंटनें तुम्ही हिंदुस्थानचें राष्ट्रीय निशाण उभारणार असल्यास

स्वागतसमारंभास परवानगी मिळणार नाहीं असें कळविलें. पण गांधींनीं तेथील पुढारी सर फ्रामरोझ दिनशा यांना सांगितलें कीं, आता राष्ट्रसभेनें ब्रिटिश सरकारशीं तह केला असल्यानें ब्रिटिश सरकारचा एजंट राष्ट्रसभेच्या झेंड्याचा अपमान करूं शकत नाहीं असें तुम्ही एजंटास कळवा. त्याप्रमाणें फोनवरून कळवितांच त्यानें आपली मनाई काढून घेतली आणि राष्ट्रसभेचें निशाण उभारून गांधीजींना मानपत्र देण्याचा आणि ३२८ गिनींची थैली समर्पण करण्याचा समारंभ करण्यांत आला. या वेळीं महात्मा गांधींनीं अरबी राष्ट्राला आपला संदेश दिला. या समारंभास जे अरब लोक हजर होते त्यांना उद्देशून ते म्हणाले :—

"राष्ट्रसभेच्या वतीनें मी आपणांस आश्वासन देतों कीं, तिचें ध्येय केवळ एकट्या राष्ट्राचें स्वातंत्र्य एवढेंच नाहीं. असें एकलकोंडें स्वातंत्र्य जगाला त्रासदायकही होण्याचा धोका असतो. सत्य आणि अहिंसा हें राष्ट्रसभेचें ध्येय असल्यामुळें तिच्यापासून जगाला धोका होण्याचा संभव नाहीं. माझी अशी खात्री आहे कीं, मानवजातीचा एक-पंचमांश येवढी लोकसंख्या असणारा हिंदुस्थान जर अहिंसा व सत्य याच्या आश्रयानें स्वतंत्र झाला तर जगाच्या सेवेच्या कामीं ती एक प्रचंड शक्ति होईल. उलट आज हिंदुस्थानला आपल्या कारभारांतही कांहीं बोलण्याचा अधिकार नसल्यानें मात्र त्याच्यापासून इतरांना धोका आहे." यानंतर हिंदुस्थानांतील हिंदु-मुसलमानांत ऐक्य निर्माण करण्यास अरबांनीं साहाय्य करावें असें सागून महात्मा गांधी म्हणाले : "तुम्हांस ऐकण्यास आनंद वाटेल कीं, पठाण हे आमच्याशीं शांततेनें वागतात. गेल्या लढ्यांत ते आमच्या खांद्याशीं खांदा भिडवून लढले. त्यांनीं स्वातंत्र्याच्या वेदीवर आपल्या तरुणांची कुर्बानी केली. पैगंबराच्या देशांत राहणाऱ्या तुम्हीं लोकांनीं हिंदुस्थानांतील हिंदु-मुसलमानांत ऐक्य निर्माण करण्यास साहाय्य करावें. हें तुम्ही कसें करूं शकाल हें मी तुम्हांस सांगूं शकणार नाहीं, पण इच्छा असली तर मार्ग सांपडतो, या म्हणीची मी आपणांस आठवण करून देतों...अखेरीस तुम्ही आपापल्या घरीं कांतणें आणि विणणें हे धंदे सुरू करा, असें मीं तुम्हांस

सांगतों. तुमच्या कांहीं खलिफांनीं साध्या राहणीचा आदर्श तुम्हांस दाखवून दिलेला आहे. तुम्ही स्वतःचे कपडे बनवून तेच वापरूं लागाल तर त्यांत इस्लामला कमीपणा येणार नाहीं. तसाच मद्यपानाचा प्रश्नही तुमच्यापुढं आहे. हा दोन दृष्टींनीं तुम्हांस शापरूप आहे. येथें एक थेंबभरही दारू दिसतां कामा नये."

एडन सोडून पुढें बोट निघाली, तेव्हां बोटीवर कांहीं ईजिप्शियन लोक चढले. त्यांनीं प्रार्थनेच्या वेळीं अहिंसेवरील प्रवचनें ऐकिलीं. अहिंसात्मक राजकारणासंबंधीं गांधीजी त्यांना उद्देशून म्हणाले, "तीस कोटि लोकांत अहिंसा मुरली आहे असा दावा मी सांगत नाहीं. पण मी असा दावा खास सांगतों कीं, इतर कोणत्याही संदेशापेक्षां हा संदेश अधिक खोल पोहोंचलेला आहे. आम्हीं नेहमींच अहिंसा आचरलेली नाहीं व प्रचंड बहुसंख्येनें तिचा केवळ धोरण म्हणूनच स्वीकार केलेला आहे. तरीही अहिंसेच्या संरक्षक छत्राखालीं राष्ट्रानें केलेली प्रगति विलक्षण आहे कीं नाहीं हें तुम्हीच तपासून पाहा असें मी तुम्हांस विनवितों. अहिंसा हें प्रबलाचें शस्त्र आहे. दुर्बलांनीं तिचा स्वीकार केला तर तें ढोंगही ठरण्याचा संभव असतो. भीति आणि प्रेम हे परस्परविरोधी शब्द आहेत. प्रेम हें समर्पण करतांना बेफिकीर असतें, मोबदल्यासंबंधीं तें चिंता करीत नाहीं. आपल्या आत्म्याशीं झगडावें तशाच वृत्तीनें प्रेमाचें बल विश्वासीं झगडत असतें आणि इतर सर्व भावनांवर तें विजय संपादन करतें. माझा व माझ्या सहकाऱ्यांचा दैनंदिन अनुभव असा आहे कीं, आपण जर सत्य व अहिंसा हा आपल्या जीवनाचा नियम बनविला तर प्रत्येक प्रश्न त्याच्या योगानें सोडवितां येतो. एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात, तशींच सत्य आणि प्रेम हीं एकाच वस्तूचीं दोन अंगें आहेत असें माझें मत आहे.

"आम्हीं मान्य केला किंवा न केला तरी जसा गुरुत्वाकर्षणाचा नियम हा कार्य करीत असतोच तसाच प्रेमाचा नियमही कार्य करीतच असतो. जसा एखादा शास्त्रज्ञ निसर्गाच्या नियमाचा विविध उपयोग करून अनेक चमत्कार करून दाखवितो त्याचप्रमाणें जो मनुष्य प्रेमाच्या शक्तीचा

प्रयोग यथायोग्य करील तो चमत्कार घडवून दाखवील. कारण अहिंसाबल हें विद्युच्छक्तीसारख्या भौक्तिक शक्तीहून फार अधिक चमत्कारपूर्ण व सूक्ष्म आहे. ज्यांनीं हें अहिंसाबल शोधून काढिलें व आम्हांस दाखवून दिलें, ते आमच्या आधुनिक शास्त्रज्ञांहून मोठे शास्त्रज्ञ होते. एवढेंच कीं, आम्हीं या बळाचा अधिक खोल अभ्यास केलेला नाहीं आणि म्हणून आपणांपैकीं प्रत्येकास त्या शक्तीचें कार्य गोचर होत नाहीं. मी जितका जितका या शक्तीचा प्रयोग करतो, तितका तितका विश्व-घटनेच्या निरीक्षणाचा माझा आनंद वाढतच जातो. त्यामुळें माझ्या जिवाला शांति लाभते आणि विश्वाच्या कोड्याचेंही रहस्य कळूं लागतें. ही शांति व हें समाधान यांचें वर्णन करणेंही मला शक्य नाहीं."

यानंतर सुवेझ आलें. तेथें ईजिप्तची जनता व पुढारी यांचे स्वागतपर संदेश आले. त्यांत मॅडम झगलूल पाशा, वफ्द पक्षाचे त्या वेळचे पुढारी नाहास पाशा, इत्यादींचे स्वागत-संदेश फार महत्त्वाचे होते. आपण परत स्वदेशीं जातांना आपल्या देशास मेट देऊन थोडा मुक्काम करावा असाही त्यांत आग्रह करण्यांत आला होता. ईजिप्तनेंही हिंदुस्थानचाच अहिंसेचा व सत्याचा मार्ग स्वातंत्र्या-साठीं चोखाळावा असा संदेश गांधींनीं ईजिप्शियन लोकांना दिला.

इंग्लंडांत गेल्यावर त्यांनीं ता. १३ सप्टेंबर रोजीं अमेरिकेला उद्देशून रेडियोवर एक भाषण केलें. त्यांत पुढील आशय होता —

" हिंदी गोलमेज परिषदेचा परिणाम केवळ हिंदुस्थानवरच घडणार नसून तो सर्व जगावर घडणार आहे. हिंदुस्थान हें एक खंडराष्ट्र आहे. एक-पंचमांश मानववंश या देशांत राहतो. अत्यंत प्राचीन अशी एक संस्कृति येथें नांदत आहे. हजारों वर्षें चालत आलेल्या परंपरा येथें आज जिवंत आहेत हें पाहून जगाला अचंबाच वाटतो. या संस्कृतीची शुद्धता कालानें मलिन झालेली आहे यांत शंका नाहीं. ही स्थिति इतरही अनेक संस्कृतींची व संस्थांची पण झालेली आहे.

" हिंदुस्थानला जर आपलें प्राचीन वैभव टिकवावयाचें असेल तर त्याला स्वातंत्र्य मिळेल तेव्हांच तसें करणें शक्य होईल. आम्ही हिंदी

लोक स्वातंत्र्यासाठीं झगडत आहों ; येवढ्यामुळेंच आमच्याकडे जगाचे डोळे लागले आहेत असें नाहीं, तर हें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं आम्ही जीं साधनें योजीत आहों, तीं अपूर्व आहेत आणि आम्हांस जें इतिहासाचें ज्ञान आहे तें पाहिल्यास हीं साधनें इतर कोणत्याही लोकांनीं योजिलेलीं नाहींत, म्हणूनच जग आमच्याकडे पाहत आहे हें मी जाणतों.

"हिंसा, रक्तपात, मुत्सद्दीगिरी या शब्दांचा आज जो अर्थ झाला आहे त्या प्रकारची मुत्सद्दीगिरीचीं साधनें आम्हीं वापरलेलीं नाहींत. शुद्ध आणि साधें सत्य आणि अहिंसा हींच आमचीं साधनें आहेत. एक रक्तहीन क्रांति यशस्वी करण्याचा प्रयत्न या दृष्टीनें जगाचें चित्त आम्हीं वेधून घेतलें आहे यात आश्चर्य नाहीं. आजपर्यंत राष्ट्रें एकमेकांशीं पशूंप्रमाणें लढलीं आहेत. ते ज्याना शत्रु समजत, त्याच्यावर त्यांनीं सूड घेतलेला आहे.

"माझ्या अंतःकरणांतील खोल भागात मला असा अनुभव येत आहे कीं, जगाला आज रक्तपाताचा तिटकारा आलेला आहे. जग या हिंसेंतून बाहेर पडण्याचा एक मार्ग शोधीत आहे. आणि मला असा अभिमान वाटत आहे कीं, या भुकेलेल्या जगाला तसा मार्ग दाखवून देण्याचा मान प्राचीन हिंदी राष्ट्राला मिळणार आहे. म्हणून जगांतील सर्व राष्ट्रांनीं या प्रचंड लढ्यांत हिंदुस्थानला अंतःकरणपूर्वक साहाय्य करावें, अशी विनंति करण्यास मला संकोच वाटत नाहीं. आपल्या राष्ट्राचा स्वाभिमान आणि दर्जा टिकविण्यासाठीं लक्षावधि लोक अप्रतिकारबुद्धीनें क्लेश सहन करीत आहेत हें दृश्य खरोखर प्रेक्षणीय, चिंतनीय व स्मरणीय आहे यांत शंका नाहीं.

"हे आत्मक्लेश ही एक आत्मशुद्धीची क्रिया आहे असें मी म्हणतों. माझी अशी खात्री आहे कीं, कोणाही मनुष्याचें स्वातंत्र्य त्याच्या दुबलतेवांचून जाऊंच शकत नाहीं. आमच्या दुर्बलतेचें ज्ञान मला आहे व त्याचा मला खेदही होत असतो. हिंदुस्थानांत पूर्व प्रमुख धर्मांचे प्रतिनिधि आम्ही एकत्र नांदत आहों,

आणि ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे कीं, आमचें कुटुंब घरगुती भांडणांनीं भंगलेलें आहे. हिंदु-मुसलमान एकमेकांवर चालून जात आहेत. तसेंच आम्ही हिंदु लोक आमच्या कोट्यवधि धर्मबांधवांना स्पर्श करण्यासही अपवित्र असें मानीत आहा ही त्याहून अधिक लज्जास्पद गोष्ट आहे.

"स्वातंत्र्यार्थ लढणाऱ्या राष्ट्रांत हे दोष कांहीं कमी महत्त्वाचे नाहींत. तुम्हांस असें दिसून येईल कीं, आत्मशुद्धीच्या आमच्या या लढ्यांत अस्पृश्यतानिवारणाला अग्रस्थान दिलेलें आहे. तसेंच निरनिराळ्या वर्गांत शांति व जमातींत ऐक्य साधणें यालाही पहिलें स्थान देण्यांत आलें आहे.

"त्याचप्रमाणें आमच्या देशांतील मद्यपानाचें व्यसन नष्ट करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहों.....ही खेदाची-अत्यंत खेदाची-गोष्ट आहे कीं, या व्यसनापासून आजचें सरकार जवळजवळ पंचवीस कोटि रुपये उत्पन्न मिळवीत असतें.....निदान या बाबतींत तरी आमच्या सरकारचें आम्हांस सहकार्य मिळतें असें मला तुम्हांस सांगतां आलें असतें तर मला कितीं तरी बरें वाटलें असतें. कोणताही कायदा न करतां केवळ आमच्याशीं या कामीं सरकारनें सहकार्य केलें असतें तर आम्ही मद्य व मादक पदार्थ यांचें संपूर्ण उच्चाटन आमच्या दुर्दैवी देशांतून खास करूं शकलों असतों.

"१९०० मैल लांब आणि १५०० मैल रुंद अशा आमच्या विस्तृत देशांत सात लक्ष खेडीं आहेत. त्यांत लक्षावधि लोक अर्धपोटी राहत असतात. हें एक करुण दृश्य आहे कीं, या साध्याभोळ्या खेडूत लोकांना त्यांचा कोणताही दोष नसतांना वर्षांतून सहा महिने आपल्या शेतावर बेकारींत, आळसांत काढावे लागतात. ज्या वेळीं अन्नवस्त्रांच्या गरजांबाबत हीं खेडीं स्वावलंबी होतीं, असा काळ जाऊन फार दिवस झालेले नाहींत.....कोणीं कांहीं म्हटलें तरी ही वस्तुस्थिति इतिहाससिद्ध आहे कीं, ईस्ट इंडिया कंपनी आली तेव्हां हीं खेडीं बेकार नव्हतीं आणि आज तीं बेकार आहेत.

खेड्यांतील लोकांना जर वर्षांतून सहा महिने काम नसेल, तर त्यांची उपासमार झालीच पाहिजे हें कळण्यास कांहीं विशेष कल्पनाशक्तीची गरज नाहीं.

"या अर्धपोटी लक्षावधि जनतेच्या वतीनें मी जगाच्या मनोदेवतेस विनंति करूं नये काय कीं, जे लोक आपलें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं प्राणार्पण करीत आहेत त्याच्या सहाय्यास तुम्ही या."

असा प्रचार महात्मा गांधींनीं एकसारखा इंग्लंडांत व इतर युरोपीय देशांत, जेथें जेथें ते गेले तेथें तेथें चालविला होता. लंडनमध्यें ते जे राहिले होते तेच मुळीं त्या शहरांतील गरीब लोकांचा जो भाग ईस्ट-एंड-तेथेंच एका गरिबाची सेवा करणाऱ्या संस्थेंत राहिले होते. म्यूरियल लिस्टर या नांवाच्या बाईंनीं ईस्ट-एंड विभागांत दरिद्री जनतेच्या सेवेसाठीं "किंग्स्ले हॉल वसाहत" या नांवाची एक संस्था काढली होती. अत्यंत साधेपणानें राहावयाचें आणि गरिबांची सेवा करावयाची हें तेथें राहणाऱ्या लोकांचें ध्येय होतें. गरिबांच्या सेवेसाठीं वाचनालय, प्रार्थना, व्याख्यानें, करमणुकी, खेळ, वगैरे विविध प्रकारचीं कामें येथें चालत असत. लहान मुलांचें एक वसतिगृहही याला जोडून होतें. हें वातावरण बिर्ला यांनीं नुकत्याच बांधलेल्या आर्यभुवनाच्या वातावरणापेक्षां गांधींना अधिक प्रिय होतें. लंडनमधील दरिद्री जनतेंत त्यांना मिसळून राहावयाचें होतें. या वातावरणांतील आपल्या राहणीसंबंधीं ते लिहितात:

"या सर्व वसाहतींत निरर्थक असें कोणतेंही सामान आढळणार नाहीं. येथें राहणाऱ्यांच्या खोल्या अगदीं छोट्या आहेत. अशा ठिकाणीं आम्हां पांच जणांची सोय करणें हीसुद्धां सोपी व सहज गोष्ट नव्हती. चार लोकांनीं आपल्या जागा रिकाम्या करून आम्हांस दिल्या. बिछाने वगैरे लागेल तें उसनें आणावें लागलें. आमच्याजवळ पुरेसे कपडे, कांबळीं, वगैरे असल्यानें आम्ही जमिनीवरही सुखानें बसूं शकत होतों. लंडनमधील गरीब जनतेशीं असा जिवंत संबंध जोडणें हें खरोखर आनंददायक होतें. मी हिंदुस्थानांत जसा राहतों, तसेंच मला तेथेंही

राहतां येत असे. मी सकाळीं पायीं हिंडावयास जात असें. या वेळीं जे माझ्याबरोबर फिरावयास येत असत व ज्यांना म्यूरियलबाई येऊं देत त्यांच्याशीं मी मोकळ्या मनानें बोलत असें. लंडनच्या पूर्व भागांत राहत असतां मनुष्यस्वभावाचें सर्वोत्तम रूप मला दिसलें, आणि खोलवर दृष्टि दिल्यास पूर्व आणि पश्चिम असा भेद मनुष्यामनुष्यांमध्यें नाहीं हें जें माझें मूळचेंच स्वभावसिद्ध मत होतें तें खरें असल्याचें प्रत्यंतर मला तेथें आलें. त्यांना माझ्याकडे पाहून जो आनंद होत असे तो पाहून माझी खात्री झाली कीं, त्यांच्या अंतःकरणांत हिंदुस्थानसंबंधीं मत्सर नाहीं आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य परत मिळावें अशीच त्यांची इच्छा आहे. या अनुभवामुळें इंग्लंडवरील माझ्या प्रेमात भर पाडण्यास जर कांहीं अवकाश असेल तर तो भरून आला आहे व मी त्यांच्या अधिकच निकट गेलों आहें." लँकेशायरमधील कामगारांत गांधी गेले तेव्हांही त्यांना तसाच अनुभव आला.

ते म्हणतच असत कीं, माझें मुख्य कार्य परिषदेंत नसून तिच्याबाहेर आहे. जनतेचें, सुशिक्षितांचें, विद्वानांचें, सज्जनांचें, धर्मवृत्तीच्या न्यायनिष्ठांचें आणि प्रत्येक क्षेत्रातील प्रतिष्ठितांचें मत अनुकूल करून घेऊन त्याचें दडपण ब्रिटिश मंत्रिमंडळावर आणणें हें त्यांचें कार्य होतें. जगाचें नैतिक दडपण आणणें हा एक सत्याग्रहाचा अपरिहार्य परिणाम आणि साधनही आहे. प्रतिपक्षाच्या बुद्धीला केवळ युक्तिवादानें वश करतां येत नाहीं. या अनुभवांतूनच त्यांनीं सत्याग्रहाची, आत्मबलाची शक्ति उपयोगांत आणून आपलें राजकारण प्रभावी करण्याचें ठरविलें.

वुडब्रुक सेट्‌लमेंट येथें शांततावादी व धर्मप्रवृत्तीच्या अनेक मित्रांनीं त्यांना बोलविलें होतें. मि. होरेस अलेक्झांडर यांच्यासारख्या त्यांच्या मित्रांनीं हा सत्कारसमारंभ घडवून आणिला होता. तेथें त्यांना अनेक प्रश्न विचारण्यांत आले. त्यांत हिंदु-मुसलमान, अस्पृश्य-समाज, इत्यादि नेहमींचे प्रश्न होतेच व त्यांना त्यांनीं नेहमींचीं उत्तरें दिलीं. अखेरीस त्यांना विचारण्यांत आलें कीं, "तुम्ही प्रतिपक्षाच्या बुद्धीला आपलें म्हणणें युक्तिवादानें पटवून देण्याचा मार्ग सोडून कित्येक वेळां अधिक जबरदस्त असे संघटित निषेधाचे उपाय कां योजितां?"

यावर गांधींनीं पुढीलप्रमाणें उत्तर दिलें : "१९०६ सालापर्यंत माझा सर्व भर केवळ युक्तिवादावरच होता. मी अगदीं निरलस सुधारक होतों. मसुदे बनविण्यांत मी वाकबगार होतों. कारण वस्तुस्थितीचें मीं यथातथ्य आकलन केलेलें असे. माझ्या सत्यनिष्ठेचाच हा एक प्रभाव होता. पण दक्षिण आफ्रिकेंत जेव्हां आणीबाणीचा बांका क्षण आला तेव्हां युक्तिवाद प्रभावी होईना. माझे लोक तर बेचैन झाले होते. सामान्य जंतूसुद्धां कित्येक वेळां सूड घेतो तसाच सूड घेण्याची भाषा सुरू झाली. त्या वेळीं एकतर अत्याचाराशीं सहकार्य तरी करावें किंवा संकटाला तोंड देण्याचा दुसरा पर्याय काढून हा अधःपात टाळावा ; यांपैकीं कोणता तरी मार्ग स्वीकारणें मला भाग होतें. अशा परिस्थितींत मला सुचलें कीं, आपणांस अपमानास्पद असणारा कायदा पाळण्याचें आपण नाकारावें आणि सरकारला वाटत असेल तर आम्हांस तुरुंगांत लोटूं द्यावें. अशा प्रकारें युद्धाचा एक नैतिक पर्याय जन्मास आला.

"त्या वेळीं मी साम्राज्यनिष्ठ होतों. कारण त्या वेळीं माझी अशी निष्ठा होती कीं, बऱ्यावाइटांची वजावट करतां एकंदरींत ब्रिटिश साम्राज्यापासून हिंदुस्थानचें व जगाचें हित होत होतें. महायुद्ध (१ लें) सुरू झालें, तेव्हां इंग्लंडांत असतां युद्धाला सहकार्य करण्यांत मीं उडी घेतली. पुढें प्ल्यूरसी होऊन मी हिंदुस्थानास गेलों. तेथेंही मीं रिक्रूट-भरतीची चळवळ प्रकृतीकडे दुर्लक्ष करूनही केली. पण १९१९ मध्यें माझा भ्रमनिरास झाला. रौलॅट कायदा झाला व त्यानंतर आमचीं सर्व पूर्णसिद्ध अशीं गाऱ्हाणीं होतीं त्यांबद्दल जेव्हां सरकारनें दाद दिली नाहीं, तेव्हां मी १९२० सालीं बंडखोर बनलों. या वेळेपासून माझी अशी खात्री दृढावत आहे कीं, लोकांना अत्यंत महत्त्वाच्या अशा ज्या मूलभूत गोष्टी आहेत, त्यांची प्राप्ति केवळ युक्तिवादानें केव्हांही होऊं शकत नाहीं. त्या मिळविण्यासाठीं क्लेश भोगण्याचें मोल द्यावें लागतें. क्लेश भोगणें हा मनुष्याचा धर्म आहे. युद्ध हा वन्य पशूंचा धर्म आहे....युक्तिवादाचा प्रभाव विशेषेंकरून प्रतिपक्षाच्या

बुद्धीवरच पडतो पण आत्मक्लेशामुळें अंतःकरणाचाही भेद होतो. मनुष्याची आंतरबुद्धि त्यानें जागृत होते. आत्मक्लेश हेंच मानव्याचें चिन्ह आहे. तलवार हें नव्हे." असो.

एक खाजगी भेट आणि बालमनावरील छाप

इंग्लंडांत काय किंवा हिंदुस्थानांत काय, महात्मा गांधींच्या जीवनांत खासगी असे कार्यक्रम फारच थोडे असत. खाजगी जीवन आणि सार्वजनिक जीवन असा त्यांच्या चरित्रांत विभागच उरलेला नव्हता. तथापि इंग्लंडांतून परत येण्यापूर्वी त्यांना जिवावरच्या दुखण्यांतून आपल्या शस्त्रकर्लेतील नैपुण्यानें बचावणारे क. मॅडॉक यांची भेट घेण्याची मात्र उत्कट इच्छा होती. एके दिवशीं क. मॅडॉक हे किंग्स्ले हॉलमध्यें आले व त्यांनीं रीडिंग येथें आपल्या घरीं एकदां भेट देण्याची विनंति केली. गांधींनीं मोठ्या आनंदानें तें निमंत्रण स्वीकारलें. ते तेथें जाऊन मॅडॉक पति-पत्नींचें आतिथ्य स्वीकारून त्यांच्याशीं प्रेमाचे दोन सुखसंवाद करून आले. सात वर्षांनंतर अगदीं भिन्न परिस्थितींत ही भेट झाली. तेव्हां दोघांचींही अंतःकरणें प्रफुल्लित होणें अगदीं साहजिक होतें. "तुमच्या पतींच्या शस्त्रनैपुण्यामुळें मी बचावलों आहें" असे कृतज्ञतेचे उद्गार त्यांनीं मॅडॉक-बाईंच्यापाशीं काढिले. तें ऐकून त्यांना किती धन्यता वाटली असेल बरें? क. मॅडॉक हे त्या वेळीं सेवानिवृत्त होऊन वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्र, तसेंच दुग्धालय धंदा यांसंबंधीं संशोधनकार्य करीत होते. ही त्यांची शास्त्रसंशोधनासंबंधींची आस्था व त्यांचा तारुण्यसुलभ उत्साह पाहून गांधींनाही कौतुक वाटलें.

आतां विलायतचा निरोप घेण्यापूर्वी गांधी ज्या पूर्व विभागांतील दरिद्री लोकांत रहात होते, तेथील बालकांच्या मनावर त्यांची कशी छाप पडली होती, त्याचीं एकदोन उदाहरणें सांगून मग हिंदुस्थानास आलें पाहिजे. किंग्स्ले हॉलचें एक बालक-वसतिगृह होतें. तेथील व आसपासचीं मुलें गांधींना 'गांधीकाका (Uncle Gandhi)' या नावानें संबोधीत. एकदां एक मुलगा गांधींना नुसतेंच 'गांधी', 'गांधी'

असें म्हणत होता. तेव्हां त्याची आई त्याला म्हणाली, अरे त्यांना नुसतें गांधी म्हणायचें नाहीं. मि. गांधी असें म्हणावें. यावर तो मुलगा म्हणाला, मी त्यांना गांधीकाका म्हणत जाईन. या वेळेपासून 'गांधी-काका' या नांवानें मुलें त्यांना हांक मारूं लागलीं. गांधींचा वेश येथल्यासारखाच विलायतेस असे. ते पायांत वहाणाच घालीत आणि थंडीचे दिवस असूनही पहांटे उठून फिरावयास जात. तेव्हां त्यांना पाहण्यासाठीं मुलें आपणांस लवकर उठविण्याचा आग्रह वडील मंडळींना करीत. एकदां एका मुलाचे वडील गांधींना विनोदानें म्हणाले, "माझी तुमच्याविरुद्ध एक फिर्याद आहे." "ती काय बुवा?" गांधींनीं विचारलें. "ही आमची जेन" आपल्या आठ-दहा वर्षांच्या मुलीकडे पाहून वडील म्हणाले, "रोज सकाळीं मला येऊन लवकर उठवते. एक चापट मारून उठवते आणि म्हणते कीं, मला उलट मारूं नका. कोणीं आपणांस मारलें तर उलट मारूं नये, सोसावें, असें गांधींनीं आम्हांस शिकवलें आहे."

२ ऑक्टोबर रोजीं या मुलांनीं गांधींचा वाढदिवस साजरा केला. मुलांनीं गांधींना मेवामिठाई आणि आपलीं खेळणीं आणून नजर केलीं. कांहींनीं त्यांच्यासंबंधीं निबंध लिहिले. त्यांतील दोन नमुने पुढें दिले आहेत.

"मि. गांधी हे एक हिंदी गृहस्थ आहेत. १८९० सालीं ते कायदा शिकण्यासाठीं इंग्लंडांत आले होते. पुढें त्यांनीं आपल्या देशाची सुधारणा करावी म्हणून हा धंदा सोडून दिला.

"ते हिंदुस्थानचा व्यापार परत मिळावा म्हणून गोलमेज परिषदेला आले आहेत. ब्राह्मणांनीं अस्पृश्यांना देवळांत येऊं द्यावें असा ते प्रयत्न करतात. हे लोक साठ लक्ष आहेत. त्यांना पोटभर जेवणही मिळत नाहीं. त्यांनीं आपली सर्व संपत्ति देऊन टाकली आहे व अत्यंत गरीब हिंदी लोकांप्रमाणें ते राहतात. म्हणूनच ते लुंगी नेसतात.

"दूध, फळें आणि भाज्या येवढेंच ते खातात. मांस किंवा मासे

खात नाहींत, कारण जीव घेऊं नये अशी त्यांची श्रद्धा आहे. ते ख्रिश्चन हिंदी आहेत.

"मि. गांधी स्वतः कापूस कांततात. इंग्लंडांतही ते रोज तासभर सूत काढतात. ते हॉस्पिटलमध्यें असतांनाहो कांतीत असत. लँकेशायरच्या सुताच्या गिरण्या ते परवांच पाहून आले.

"रविवारीं सायंकाळीं ७ पासून सोमवार सायंकाळीं ७ पर्यंत ते प्रार्थना करतात. या वेळीं तुम्ही त्यांच्याशीं बोलला तरी ते बोलत नाहींत. ते आमच्या घरीं भेट द्यायला आले तेव्हां आई इस्त्री करीत होती. ते म्हणाले, 'तुमचं काम थांबवूं नका. मीही तें काम स्वतः करीत असें.' मीं त्यांच्याशीं हस्तांदोलन केलें आहे. 'हॅलो' किंवा 'गुड बाय' याला 'नमस्कार' असा हिंदी शब्द आहे."

दुसरा निबंध असाच आहे.

"ॲसीसीचा सेंट फ्रान्सिस यास ॲसीसीचा दरिद्री मनुष्य असें म्हणतात. तो सर्वस्वी गांधींसारखाच होता.

"या दोघांनाही निसर्ग, मुलें, फुलें, पक्षी फार आवडतात. गांधी लुंगी घालतात तशीच, सेंट फ्रान्ससही या लोकांत होता तेव्हां घालीत असे.

"गांधी व सेंट फ्रान्सिस हे दोघेही श्रीमंत व्यापाऱ्याचे मुलगे. एका रात्रीं आपल्या मित्रमंडळीबरोबर खाना खात असतां फ्रान्ससच्या मनांत दरिद्री इटालियन लोकांचा विचार आला. त्याबरोबर तो खाना सोडून पळतच बाहेर गेला आणि त्यानें आपले उंची कपडे टाकून दिले. गांधींच्याप्रमाणेंच तो जुनीं गोणपाटें वापरीत असे.

"सेंट फ्रान्ससनें आपले कांहीं अनुयायी जमविले. त्यांनीं झाडपाल्याच्या झोपड्या घातल्या. तसेंच गांधींनींही केलें आहे. आपलें सर्व उंची विलासी जीवन त्यांनीं गरीब हिंदी लोकांना वाहून टाकलें आहे.

"गांधींच्या लोकांनीं त्यांनाच लंडनला येतांना लुंगी वगैरे कपडे दिले, कारण ते विकत घेण्याइतके पैसे त्यांच्यापाशीं नव्हते, असें

आम्ही त्यांना भेटण्यास किंग्स्ले हॉलमध्यें गेलों तेव्हां त्यांनीं आम्हां मुलांस सांगितलें.

" सोमवार हा त्यांचा मौनाचा दिवस असतो, कारण तसा त्यांचा धर्म आहे. गांधींच्या वाढदिवशीं आम्हीं त्यांना लांकडी खेळणीं, मेणबत्त्या आणि मिठाई दिली. शेळीचें दूध, बदाम आणि फळें येवढेंच खाऊन ते राहतात. "

गांधींच्यासंबंधीं आजूबाजूचे लोक व मुलें–बाळें यांना काय वाटे व ते त्यांच्याकडे संत किंवा ख्रिस्तभक्त यांच्याप्रमाणें पूज्य बुद्धीनें कसे पाहत याची कल्पना या निबंधांवरून आपणांस येऊं शकते. अज्ञानी गरीब जनतेच्या व बालकांच्या मनावर गांधींचा कोणता ठसा उठला होता याची कांहींशीं कल्पना आपणांस त्यावरून येऊं शकेल.

लँकेशायरच्या कामगार–वर्गापुढें त्यांचें व्याख्यान झालें व प्रश्नोत्तरें झालीं. त्यानंतर लोक आपापसांत बोलत चालले असतां एक कामगार म्हणाला, "या सर्व आंदोलनांतून कांहींतरी चांगलेंच निष्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. आणि चांगलें नाहीं तर निदान वाईट तरी कांहीं होणार नाहीं. निदान सद्भाव जागृत होत आहे हा तरी तात्काल परिणाम आहे. आम्हांस आतां एकमेकांचें म्हणणें कळूं लागलें. गांधींचें दर्शन हा एक मोठा लाभ आहे. पूर्वेकडील संस्कृतींतून निर्माण झालेली ही एक प्रचंड शक्ति आहे." दुसरा म्हणाला, " बेकार कामगारांतीलच मी एक आहें, आणि मी जर हिंदुस्थानांत असतों तर गांधी म्हणतात तेंच मीही म्हणालों असतों. "

ज्या बेकार कामगारांनीं गांधींची भेट घेतली त्यांच्या मनात ते विलायती कापडावर बहिष्कार घालतात, म्हणून कटुता निर्माण झाली नव्हती. उलट आपण त्या परिस्थितींत असतों तर गांधी करतात तसेंच केलें असतें असे उद्गार आमच्या बहिष्कारानें बेकार झालेल्या एका कामगारानेंही काढावेत, हा गांधींचा व त्यांच्या सत्याग्रहाचा मोठाच विजय नव्हे काय ?

सत्याग्रही स्वातंत्र्ययुद्धाची दुसरी मोहीम

महात्मा गांधी ता. ५ डिसेंबरला इंग्लंडहून निघाले ते ता. २८ डिसेंबर रोजीं मुंबईस येऊन दाखल झाले. यापूर्वी हिंदुस्थानांतील बंगाल, संयुक्त प्रांत आणि सीमा प्रांत येथें सरकारनें राष्ट्रसभेशीं झालेला युद्धतहकुबीचा करार धाब्यावर बसवून वटहुकूम आणि दडपशाही यांचा नंगा नाच सुरू केला होता. बंगालमध्यें दहशतवाद्यांनीं खुनास प्रारंभ केला म्हणून, संयुक्त प्रांतांत शेतकरी खंडबंदी व करबंदी यांची चळवळ करीत आहेत म्हणून आणि सीमा प्रांतांत सरकारविरोधी सतत प्रचार चालू आहे म्हणून ही दडपशाही सुरू करण्यांत आली होती. पंडित जवाहरलाल नेहरू, रफी अहंमद किडवाई आणि सीमा प्रांतांत खान अब्दुल गफारखान उर्फ सरहद्द गांधी यांना बंदींत टाकण्यात आलें होतें. महात्मा गांधी येथें येण्यापूर्वी युद्ध सुरू करण्याचा हा नोकरशाहीचा डाव असुन व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन हे तिच्या हातचें खेळणें बनले होते. इंग्लंडांत टोरी पक्षाचें राज्य स्थापन झालें होतें आणि गांधी-आयर्विन करारानें शेफारून गेलेल्या राष्ट्रसभेला व तिच्या नेतेपदावर आरूढ झालेल्या नंग्या फकिराला नेस्तनाबूद करून त्याच्या राजकीय प्रतिष्ठेचा बुडबुडा फोडण्याचा हा प्रयत्न होता. गांधी इकडे येऊन पोहोंचण्यापूर्वी रोममध्यें त्यांनीं एक मुलाखत दिली व ब्रिटिशांविरुद्ध आपण युद्ध पुकारलें अशी एक खोटीच मुलाखत वृत्तपत्रांत त्या वेळीं प्रसिद्ध झाली होती. ही मुलाखत मुळींच झाली नव्हती असें नंतर बाहेर आलें. अशा रीतीनें ब्रिटिश सरकारनें गोलमेज परिषदेच्या जाळ्यांत न अडकलेल्या सिंहाला दडपशाहीच्या गोळीबारानें ठार करण्याचें ठरविलें होतें. तो गोळीबार करण्यास सरकारला भाग पडलें, कारण त्यानें सरकारवर झडप घातली असें जगाला भासविण्यासाठीं हा खोटा प्रचार वृत्तपत्रांतून सुरू करण्यांत आला होता.

गांधींनीं येथें आल्यानंतर प्रथम जें जाहीर भाषण केलें त्यांत अल्पसंख्याकांचें नांव पुढें करून ब्रिटिशांनीं स्वातंत्र्य देण्याचें कसें नाकारलें

आणि पुनः प्रचंड सत्याग्रह-मोहीम केल्यावांचून स्वातंत्र्य मिळण्याचा संभव नाहीं असें दिग्दर्शित केलें. तसेंच अल्पसंख्याकांना जादा सवलती व विभक्त मतदारसंघ देण्याचें तत्त्व अस्पृश्यांनाही देऊन हा प्रश्न अधिक बिकट व गुंतागुंतीचा करण्यांत येणार आहे, हेंही त्यांनीं सांगितलें. तसें केल्यास आपण प्राण असेपर्यंत त्याच्याविरुद्ध लढूं हा आपला निर्धारही त्यांनीं पुनः एकदा जाहीर केला. पण या मुद्याचें भावी महत्त्व त्या वेळीं कोणाच्या विशेष लक्षांत आलें नाहीं. भाषणाच्या अखेरीस, उतावीळपणें लढ्यास प्रवृत्त होऊं नका व आपण व्हाइसरॉयशीं शक्य ती तडजोड करण्याचे प्रयत्न करणार आहों असेंही त्यांनीं सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं २९ डिसेंबरला गांधींनीं व्हाइसरॉयला तार करून बंगाल, संयुक्त प्रांत व सीमा प्रांत येथील परिस्थितीची चर्चा करण्यास आपणांस मुलाखत द्यावी अशी मागणी केली. 'आम्हीं केलेली दडपशाही अवश्यच आहे. तुम्हांस येथें राष्ट्रसभेच्या नेत्यांनीं केलेल्या गोष्टी नापसंत असतीलच. तुम्ही तशा गोष्टींना प्रोत्साहन देणार नाहींच. तेव्हां या मुद्यास वगळून इतर घटनात्मक गोष्टींविषयीं चर्चा करण्यास यावयाचें असल्यास अवश्य यावें' अशा अर्थाचें उत्तर लॉर्ड विलिंग्डन यानीं गांधींना पाठविलें.अर्थात् दडपशाहीचा मुद्दा सोडून गांधींना व्हाइसरॉयशीं मुलाखत घेण्याचें कांहीं कारणच नव्हतें. अशा प्रकारें सत्याग्रह-संग्राम ताबडतोब पुनः सुरू करण्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं. वार्किंग कमिटीची सभा भरून सत्याग्रह सुरू करण्याचा ठराव मंजूर करण्यांत आला. तो जाहीरही करण्यांत आला. पण व्हाइसरॉयकडे पुनः एकदां मुलाखतीची विनंति करण्यांत आली होती. ही मुलाखत मिळाली नाहीं अथवा तडजोड झाली नाहीं तर हा सत्याग्रहाचा ठराव अमलांत यावयाचा होता. सरकारनें ता. ४ जानेवारीस म. गांधी व इतर पुढाऱ्यांना पकडूनच या पत्रास उत्तर दिलें आणि ४ जानेवारी १९३२ रोजीं सत्याग्रह-संग्रामाची दुसरी मोहीम जोरांत सुरू झाली.

अनेक प्रकारचे दडपशाहीचे कायदे अथवा वटहुकूम आगाऊच करून ठेविले होते. त्यामुळें पंधरा-वीस दिवसांत सर्व चळवळ दडपून

टाकूं अशी सरकारची अपेक्षा होती. ती खोटी ठरून चळवळ देशभर वणव्याप्रमाणें पसरली. एप्रिलमध्यें दिल्लीस बंदीहुकूम मोडून राष्ट्रसभेचें अधिवेशनही झालें. अशा प्रकारें आठ-नऊ महिने देशांत जिकडे तिकडे कायदेभंगाचें एकच रान उठलें. कापड व विलायती मालाचा बहिष्कार, दारूबंदी, मीठ-सत्याग्रह, जंगल-सत्याग्रह, सारा-बंदी, खंडबंदी, झेंडा-सत्याग्रह, उत्सवदिन-सत्याग्रह असे अनेक कार्यक्रम आंखून ते सर्व देशभर कळविण्यांत येत. या प्रचारासाठीं पत्रिका प्रसिद्ध होत असत. गुप्तसंचार व प्रचारखातें निर्माण झालें आणि निधिही गुप्तपणें जमविण्यांत व खर्चण्यांत येऊं लागले. सर्व उघड चळवळी रोखून धरल्या गेल्यामुळें सत्याग्रह-चळवळीला हें एक गुप्त संघटनेचें अंग जडविण्यांत आलें. १९३० च्या चळवळींत ही गुप्त-संघटना अखेरीअखेरीस निर्माण होत होती. पण १९३२ सालीं ती फार व्यापक बनली. तथापि अखिल भारतीय असा एक सर्वाधिकारी जाहीर काम करीत असून तो या सर्व चळवळींचें नियंत्रण व नियमन करीत असे. त्याला पकडल्यावर दुसरा सर्वाधिकारी नेमला जाई. पुढें पुढें त्याला फारसें कांहीं करतांच येईना. तथापि पंडित मालवीय हें एक अनधिकृत राष्ट्रीय पुढारी नेहमीं सल्ला देण्यास सदैव तयार असत व त्यांच्या सल्ल्यानुसार बहुतेक कार्य चाले. गुप्त संघटनापद्धति ही तत्त्वतः महात्मा गांधींच्या तत्त्वाविरुद्ध होती. तरीही ती एक त्या परिस्थितींत अपरिहार्य गोष्ट असेंच राष्ट्रसभेचें सर्व कार्यकर्ते मानीत. मात्र या चळवळींत अत्याचारास अथवा हिंसेस स्थान मिळालें नव्हतें. कांहीं ठिकाणीं तुरळक अत्याचार खवळलेल्या जमावाकडून तात्कालिक प्रक्षोभानें झाले तेवढेच.

हरिजनांसाठीं प्रायोपवेशन

अशा रीतीनें तुरुंगाबाहेर चळवळ चालू असतां तुरुंगांतून महात्मा गांधी हरिजनाच्या विभक्त मतदारांना सरकारनें मान्यता देऊं नये याबद्दल ब्रिटिश पंतप्रधान मॅक्डोनल्ड आणि भारतमंत्री सर सॅम्यूएल होअर यांच्याशीं पत्रव्यवहार करीत होते. बाहेरच्या जगाला याची कांहीं माहिती नव्हती. येरवड्याच्या तुरुंगांतून ता. ११ मार्च रोजीं

सर सॅम्यूएल होअर यांना पत्र लिहून महात्मा गांधींनीं असें कळविलें कीं, सरकारनें जर अस्पृश्य जमातींना विभक्त मतदारसंघ दिले तर आपण आमरण प्रायोपवेशन-उपोषण-करूं ! होअर यानीं या वेळीं फक्त येवढेंच उत्तर पाठविलें कीं, मतदान व मतदारसंघ यांचा विचार करण्यासाठीं लोदियन कमिशन काम करीत आहे. त्याचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर तुमच्या म्हणण्याचा योग्य वेळीं विचार करण्यांत येईल. १७ ऑगस्ट रोजीं मॅक्डोनल्ड यांनीं जातीय निर्णय (Communal award or decision) जाहीर केला. त्यांत अस्पृश्यांना विभक्त मतदार संघ, राखीव जागा, भिन्न मताधिकार हे देऊन शिवाय इतर सार्वत्रिक निवडणुकींत आपले उमेदवार लढविण्याचाही हक्क दिला. हा निर्णय ऐकतांच १८ ऑगस्ट रोजीं महात्मा गांधींनीं प्रायोपवेशनाचा निर्धार केला. लगेच त्यांनीं ब्रिटिश पंतप्रधान मॅक्डोनल्ड यांना कळविलें कीं, आपलें प्रायोपवेशन २० सप्टेंबर १९३२ पासून सुरू होणार. मॅक्डोनल्ड यांचा जबाब ८ सप्टेंबरला आला आणि १२ सप्टेंबर रोजीं हा सर्व पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला. हा पत्रव्यवहार वाचून व महात्मा गांधींचा प्राणांतिक प्रायोपवेशनाचा निर्धार ऐकून सर्व देशाला एकदम काळजीचा, आश्चर्याचा आणि दुःखाचा भयंकर धक्का बसला. सर्व जगाचें अंतःकरण उचंबळून आलें आणि क्षणभर कोणास कांहीं सुचेनासें झालें. या अनुल्लंघनीय पेंचप्रसंगांतून व भयंकर दिव्यांतून महात्मा गांधींचे प्राण वांचण्याचा अथवा वांचविण्याचा कोणास कांहींच उपाय सुचेना.

सर तेजबहादूर सप्रू यांनीं महात्मा गांधींना मुक्त करण्याची सरकारला विनंति केली आणि पंडित मालवीय यांनीं एक सर्व हिंदूंची सर्वपक्षीय परिषद भरवून हा जातीय निर्णय बदलून घेण्याची सूचना देशापुढें मांडिली. हरिजनपुढारी एम्. सी. राजा यांनीं या कल्पनेस तात्कळ दुजोरा दिला. आणि लौकरच या तडजोडीच्या मार्गानें हा राष्ट्रीय प्रश्न सोडवून महात्मा गांधींचे प्राण वांचविण्याच्या प्रयत्नांत विभक्त मतदार संघाचे पुरस्कर्ते डॉ. आंबेडकर हेही सामील झाले.

येरवडा मंदिरांतील हरिजनोद्धार-परिषद आणि येरवडा-करार

ता. २० सप्टेंबर रोजीं हा उपवास सुरू होणार होता. तत्पूर्वी ता. १५ रोजीं महात्मा गांधींनीं मुंबई सरकारकडे एक पत्रक प्रसिद्ध करण्यासाठीं म्हणून पाठविलें. त्यांत या आत्मयज्ञाची भूमिका, त्याचीं कारणें, त्याचा हेतु हीं सर्व विशद केलीं होतीं. हें पत्रक सरकारनें प्रत्यक्ष उपवास सुरू झाल्यानंतर ता. २१ सप्टेंबरला प्रसिद्ध केलें. हा उपवास केवळ हरिजनांच्या प्रश्नासंबंधींच असल्यानें व त्यांत महात्मा गांधींच्या प्राणांवरचें संकट असल्यानें सरकार त्यांना बंधमुक्त करील अशी लोकाची कल्पना, आशा व अपेक्षा होती. पण गांधी हे कोणत्याही शर्तीवर मुक्त होण्यास तयार होणें शक्य नव्हतें व त्यांना मुक्त केलें तरी उपवास चालूच राहणार होता. तेव्हां त्यांना तुरुंगांतच ठेवून हरिजन-कार्यासाठीं किंवा सेवाशुश्रूषा करण्यासाठीं अथवा खासगी कामासाठीं भेटण्याची ज्यांना इच्छा असेल त्यांना भेटूं द्यावें असें सरकारनें ठरविलें व गांधींनींही तें मान्य केलें. गांधींनीं उपवास सुरू करतांच त्यांची मुलाखत घेण्यास पत्रप्रतिनिधींना परवानगी मिळाली. त्यांना मुलाखत देऊन गांधींनीं आपली भूमिका विशद केली आणि आपल्या नेहमींच्या वृत्तीस अनुसरून "मी पूर्णपणें आशावादी आहें. परमेश्वर मला या दिव्यांतून यशस्वी करून पार पाडील", असा दृढ-विश्वास त्यांनीं प्रकट केला.

आपल्या पत्रकांत त्यांनीं पुढील विचार मांडले होते :—

(१) हा उपवास परमेश्वराच्या नांवानें, त्याच्या कार्यासाठीं आणि माझ्या नम्र श्रद्धेनुसार त्याच्या आदेशास स्मरूनच करण्यांत येणार आहे.

(२) या देशांतील अथवा परदेशांतील ज्या लोकांचा माझ्यावर विश्वास आहे त्यांच्याविरुद्ध हा उपवास आहे आणि ज्यांचा माझ्यावर विश्वास नाहीं त्यांच्यासाठीं हा आहे. म्हणून ज्या इंग्रज

अधिकाऱ्यांनीं मला बंदींत ठेवलें आहे व जे हिंदु लोक माझ्यावर विश्वास ठेवीत नाहींत त्यांच्याविरुद्ध हा उपवास नाहीं. जे असंख्य हिंदी लोक (ते कोणत्याही मताचे असोत) असें मानतात कीं, न्याय्य कार्याचाच मी प्रतिनिधि आहें त्यांच्याचविरुद्ध हा उपवास आहे.

(३) हा उपवास हें केवळ भावनेला आवाहन नाहीं. या उपवासाच्या योगानें मी ज्याला शुद्ध व साधा न्याय समजतों त्याच्या पारड्यांत माझें असेल नसेल तें सर्व वजन टाकीत आहें. म्हणून माझे प्राण वांचविण्यासाठीं काळजीमुळें विकारवशतेनें कोणतीही गोष्ट अयोग्य घाईनें करूं नये. परमेश्वराच्या इच्छेवांचून गवताची एक काडीदेखील हालूं शकत नाहीं असा माझा दृढविश्वास आहे. जर त्याला या शरीराकडून अधिक सेवा घडविण्याची इच्छा असेल तर तो त्याचें रक्षण करील. त्याची इच्छा नसेल, तर त्याचें रक्षण कोणीही करूं शकणार नाहीं. मानवी दृष्टीनें सांगावयाचें तर कांहीं काल हें शरीर ताण सहन करूं शकेल.

(४) विभक्त मतदार संघ हें एक अगदीं निकटवर्ती निमित्त झालेलें आहे. जर हिंदु जनतेच्या मनाची अस्पृश्यता आमूलाग्र उखडून टाकण्याची अद्यापि तयारी झाली नसेल, तर मुळींच न कचरतां त्यांनीं माझा बळी दिला पाहिजे.

(५) अस्पृश्य लोक हिंदु धर्माविरुद्ध बंड करतील किंवा त्याचा त्याग करतील तर त्यांत मला आश्चर्य वाटणार नाहीं. स्पृश्य हिंदूंनीं त्यांना भरडून काढून त्यांचें पीठ केलें आहे. तरीही ते हिंदु धर्माला बिलगून राहिले आहेत हेंच एक आश्चर्य आहे. अविभाज्य अशा हिंदु कुटुंबाचे ते घटक बनलेले आहेत. ते त्याचा त्याग करतील असें मला वाटत नाहीं. हिंदु धर्मांत असें कांहीं सूक्ष्म अनिर्देश्य तत्त्व आहे कीं, ज्याच्यामुळें त्यांची इच्छा नसली तरीही ते त्याच्याशीं निगडित झाले आहेत. म्हणूनच त्यांना अलग करण्याचा जो प्रयत्न चालू आहे त्याच्याविरुद्ध मी प्राणपणानें झगडत आहें. अस्पृश्यांना हिंदु समाजांत

संपूर्ण स्वातंत्र्याची हमी न देणारी अशी कोणतीही तडजोड या विभक्त मतदार संघाच्या योजनेची जागा घेऊं शकणार नाहीं.

(६) सामाजिकदृष्ट्या, नागरिकदृष्ट्या किंवा राजकीयदृष्ट्या जर अस्पृश्यांचा छळ सुरू झाला, तर माझ्याप्रमाणें आमरण उपोषणाचें अग्निदिव्य करणारे अनेक सुधारक निघतील किंवा नाहीं याचा विचार हिंदु धर्मसुधारकांनीं करण्याची वेळ आतां आली आहे.

(७) हें दिव्य करण्याची प्रेरणा हा एक मला दिसलेला अंतःप्रकाश तरी असेल किंवा तो एक दृग्भ्रम तरी असूं शकेल. हा जर दृग्भ्रम असेल तर माझी तपश्चर्या मला शांततेनें पुरी करूं द्या. हिंदु धर्मावरील एक भार त्यामुळें दूर होणार आहे. तो जर अंतःप्रकाश असेल तर माझ्या आत्मक्लेशामुळें हिंदु धर्माची शुद्धि होईल आणि माझ्यावर ज्यांचा अविश्वास असेल त्यांच्या अंतःकरणासहि पाझर फुटतील. तसेंच होऊं द्या. विभक्त मतदार संघाचा कायदा करण्याची योजना हेंच या उपोषणाचें तात्कालिक कारण असून ती रद्द होतांच तो सुटेल. एकत्र मतदार संघाच्या पायावर स्पृश्य-अस्पृश्य वर्गांच्या प्रतिनिधींनीं कोणतीहि तडजोड केली तरी मी तिला मान्यता देईन.

(८) मी एक गोष्ट स्पष्ट करूं इच्छितों कीं, हा प्रश्न सुटला तरी जातीय निर्णयाचे इतर भाग मला मान्य आहेत असें मानण्यांत येऊं नये. माझा उपवास हा एक मर्यादित स्वरूपाचा उपाय आहे व तो सर्वत्र लागू करतां येण्यासारखा नाहीं. अस्पृश्यतेचा प्रश्न हा प्रामुख्यानें मला धार्मिक वाटत असल्यानें तो सोडविणें हें एक माझें पवित्र कर्तव्य आहे व त्याची विशेष जबाबदारी माझ्यावर आहे असें मला वाटतें, कारण मीं जन्मभर त्यावर माझें लक्ष केंद्रित केलेलें आहे.

(९) तपश्चर्या या दृष्टीनें अथवा मार्गदर्शक प्रकाश लाभावा म्हणून उपवास करण्याची प्रथा प्राचीन आहे. ख्रिस्ती व इस्लाम धर्मांत मीं ही प्रथा पाहिली आहे आणि हिंदु धर्मांतहि आत्मशुद्धि व तपश्चर्या या बुद्धीनें केलेल्या उपवासांचीं उदाहरणें भरपूर आहेत. हा एक विशेष अधिकार आहे, तसेंच तें एक कर्तव्यही

आहे. माझ्या मित्रांना व चहात्यांना मी इशारा देऊं इच्छितों कीं, त्यांनीं माझें अंधानुकरण करूं नये तर त्यांनीं अस्पृश्यांची निःस्वार्थी सेवा करून व क्लेशपूर्ण कष्ट करून स्वतः हा अधिकार आधीं संपादन करावा म्हणजे जेव्हां त्यांच्या उपोषणाचा काळ येईल, तेव्हा त्यांना स्वतंत्रपणें त्या कर्तव्याचा प्रकाश दिसूं लागेल.

" मीं हा उपवास अत्यंत शुद्ध बुद्धीनें स्वीकारलेला असून कोणत्याही जीवासंबंधीं माझ्या मनांत क्रोध किंवा मत्सर वसत नाहीं. माझ्या दृष्टीनें हें एक अहिंसेचें प्रतीक असून त्या धर्माची ती अखेरची मुद्रा आहे. म्हणून माझे शत्रु समजून जर लोकांनीं कोणावर अत्याचार केले तर त्या कृत्यामुळें ते माझें मरणच लवकर ओढवून घेतील. निदान या कामांत तरी विरोधकांसंबंधीं पूर्ण आदर व विवेक राखणें यशाच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य आहे.

महात्मा गांधींचा हा उपवास ता. २६ सप्टेंबर रोजीं पूर्णपणें यशस्वी होऊन सुटला. 'येरवडा-करार' या नांवाचा करार डॉ. आंबेडकरप्रभृति हरिजनपुढारी आणि पं. मालवीयप्रभृति सवर्ण हिंदु पुढारी यांच्या दरम्यान झाला. त्याला महात्मा गांधींनीं मान्यता दिली. आणि ब्रिटिश मंत्रिमंडळानेंही त्याला अधिकृतपणें मान्यता दिली. या करारान्वयें अस्पृश्य हिंदूंनीं प्रथम आपले उमेदवार एका जागेसाठीं चार या प्रमाणात पृथक्पणें निवडावेत आणि मग सार्वत्रिक मतदार संघांतून त्या चारांपैकीं कोणताही एक निवडून द्यावा असें ठरलें. यासाठीं हरिजनांना देऊं केलेल्या राखीव जागा जवळजवळ दुप्पट कराव्यात असें ठरलें. ही दुहेरी निवडणूक लवकरच उभयपक्षांच्या संमतीनें बंद करावी असेंही ठरलें. सर्वपक्षीय हिंदु पुढाऱ्यांच्या परिषदनें मंदिरप्रवेशासुद्धां सर्व सार्वजनिक स्थळांत हरिजनांना समानतेनें व स्वतंत्रतेनें प्रवेश मिळावा, असा ठराव केला आणि स्वतंत्र हिंदुस्थानांत भरणाऱ्या पहिल्या पार्लमेंटानें अस्पृश्यता कायद्यानें नष्ट करण्याचा कायदा करावा असेंही त्या ठरावांत नमूद करण्यांत आलें.

पं. मालवीय यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस भरलेल्या सर्वपक्षीय हिंदु परिषदेनें ता. २५ सप्टेंबर १९३२ रोजीं मंजूर केलेला हा सुप्रसिद्ध ठराव पुढीलप्रमाणें आहे:—

"The conference resolves that, here-forth, among Hindus no one shall be regarded as an untouchable by reason of his birth and that those who have been so regarded hitherto will have the same right as other Hindus in regard to the use of public wells, public schools, public roads and all other public institutions. This right shall have statutory recogntion at the first oppertunity and shall be one of the earliest acts of the Swaraj Parliamcnt, if it shall not have recieved recognition by that time.

It is further agreed that it shall be the duty of all Hindu leaders to secure, by every legitimate and peaceful means, an early removal of all social disabilities now imposed by custom upon the so-called untouchable classes, includiug the bar in respect of admission to temples."

महात्मा गांधींनीं आपल्या जीवनांत जीं महान् कार्यें करून तीं तडीस नेलीं त्यांत सर्वश्रेष्ठ अशा तऱ्हेचें हें एक कार्य होय. हिंदु धर्मांत अनेक सुधारक झाले आहेत व त्या वेळींही हयात होते. शिवाय जुन्या वळणाच्या लोकांनाही अस्पृश्यांवरील अन्यायांचा आतां कंटाळा आला होता, पण गांधींनीं या कामीं आपला प्राण पणाला लावून जी उत्कटता आणि जी तळमळ हिंदी जनतेच्या अंतःकरणांत निर्माण केली ती केली नसती, तर हा प्रश्न इतक्या सामोपचारानें सुटला नसता. या उपोषणानंतर असेच तळमळीचे हरिजनसेवक

निघावेत म्हणून गांधींनीं 'हरिजन' पत्र तुरुंगांत असतांनाच २१फेब्रुवारी १९३३ पासून सुरू केलें आणि हरिजन-सेवक-संघ पुढें स्थापन केला. त्यांच्या जीवनांत या उपवासापासून हरिजन सेवेला आद्यस्थान प्राप्त झालें आणि त्याचें प्रतीक म्हणून त्यांनीं आपल्या साप्ताहिकांचीं नांवेंही 'हरिजन' इत्यादि ठेविलीं. हिंदुस्थानांत जी मानवसंस्कृति विकास पावली तिच्यांत अस्पृश्यता ही एक विषवल्ली निर्माण झाली. हिंदूंच्या वर्णाश्रमधर्मांला तिनें आनुवंशिक व रोटीबेटी-भेटीबंद स्वरूप दिलें. हिंदु संस्कृति, राष्ट्र निर्माण करण्यास अपात्र बनली आणि इस्लाम संस्कृतीनें तिचा पाडाव करून तिला जर्जर केलें. तरीही ही विषवल्ली समूळ उच्छेदून टाकण्याचें धैर्य कोणीं दाखविलें नाहीं. हिंदुस्थानांतील हिंदु-मुसलमान संस्कृतींचा संगम होण्याच्या आड हिंदूंचा जातीय अहंकार व मुसलमानांचा धार्मिक अहंकार हे येतात. जातीय अहंकाराचें अस्पृश्यता हें एक अत्यंत हीन स्वरूप असून सवर्ण हिंदूंनीं या अहंकाराला धर्म ठरवून अस्पृश्य जमातींचा स्वाभिमान धर्माच्या नांवानें हिरावून घेतला आहे. हा स्वाभिमान त्या वर्गांत पुनः जागृत करून सवर्ण हिंदूंचा वर्णाभिमान नष्ट करणें हें एक पवित्र कार्य आहे. या कर्तव्याची जाणीव महात्मा गांधींनीं करून दिली त्यामुळें हिंदु संस्कृति ही अमानुषतेंतून मानव संस्कृतींत आली. हें धार्मिक कार्य होतें, तसेंच तें उच्च राष्ट्रीकरणही होतें आणि व्यापक अर्थानें तें राजकारणही होतें. अल्पसंख्याकांचा व दलितांचा उद्धार व रक्षण करण्यास आम्हीच पात्र आहों, ब्रिटिश सरकार या कार्यीं अपात्र आहे व त्यानें आपल्या स्वार्थबुद्धीनें दिलेला निर्णय स्पृश्यास्पृश्य दोघे एक होऊन चार-सहा दिवसांत धुडकावून लावूं शकतात हें सिद्ध करून ब्रिटिश मुत्सद्यांचा एक राजकीय डाव म० गांधींनीं उलटविला. परिणामदृष्ट्या पाहिल्यास ही त्यांची एक थोर मुत्सद्देगिरी ठरली असेंही म्हणावें लागतें.

हिंदी राजकारणांत हिंदु-मुसलमान आणि स्पृश्यास्पृश्य भेद हे दोन अत्यंत महत्त्वाचे मुद्दे असून हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व हे दोन भेद नाहींसे होण्यावर अवलंबून आहे. त्यांपैकीं हिंदु-मुसलमानाच्या बाबतींत

महात्मा गांधींनीं राजकीय नेतृत्व स्वीकारण्यापूर्वी १९१७ सालीं राष्ट्र-सभेनें विभक्त मतदार संघ मान्य केले होते. यामुळें त्याविरुद्ध गांधींना कांहीं करणें या वेळीं शक्य नव्हतें. परंतु अस्पृश्यांना विभक्त मतदार संघ आतां नव्यानेंच देण्यांत आले होते. ते महात्मा गांधींनीं आपले प्राण पणास लावून बदलून घेतले. लखनौ-करार आणि येरवडा-करार या दोहोंची तुलना केल्यास आपणांस असेंच दिसून येईल कीं, लखनौ-करारानें विभक्त मतदार संघास मान्यता दिली, त्यामुळें हिंदु-मुसलमानांचा प्रश्न आजपर्यंत आम्हांस सोडवितां आला नाहीं. येरवडा-करारानें स्पृश्यास्पृश्य जमातींना एकत्र मतदार संघांत गोवून घेतल्यामुळें हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व या भेदाच्या बाबतींत आपणांस साध्य करतां आलें. गांधींनीं उपवास करून जें साध्य केलें त्याची खरी योग्यता व त्याची खरी किंमत आतां सर्वांना कळून आली असून त्यांच्या उपवासाच्या वेळीं सर्वपक्षीय हिंदु पुढाऱ्यांच्या परिषदेनें ठराव केला त्याप्रमाणें स्वतंत्र हिंदुस्थानची घटना परिषद भरून तिनें हरिजनांची अस्पृश्यता कायदेशीर रीतीनें नष्ट करून टाकली, आणि निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनीं मंदिरप्रवेशासुद्धां सर्व हक्क अस्पृश्यांना देऊन टाकले. ही गोष्ट धर्मदृष्टीनें आपला अधिकार जगन्मान्य करवून घेणाऱ्या महात्मा गांधींसारख्या थोर विभूतीच्या प्रयत्नांवांचून इतक्या लवकर घडून येणें फार कठीण होतें. हा अन्याय करणारे आणि तो अन्याय भोगणारे या दोघांनाही तो अन्याय नसून तो एक धर्मच आहे असें वाटत होतें. आणि हा खरा धर्म नसून तो हिंदु धर्मावरील एक कलंक आहे अशी भावना जनतेंत नव्यानें निर्माण करणें ही गोष्ट गांधीजींनीं जें आत्मक्लेशाचें तंत्र निर्माण केलें त्यामुळेंच सिद्ध झाली असें म्हणावें लागतें.

ज्या दिवशीं महात्मा गांधींचा उपवास यशस्वी होऊन तो सुटला त्या दिवशीं भारताचे जगद्विख्यात कवि आणि द्रष्टे तत्त्वज्ञ रवीन्द्रनाथ टागोर यांनीं येरवडा तुरुंगांत गांधीजींना भेट दिली. पंडित मालवीय, डॉ. आंबेडकर, रवीन्द्रनाथ टागोर आणि महात्मा गांधी अशा सर्वांच्या देखत हा येरवडा-करार पुरा झाल्याचें आणि तो पुरा झाल्यामुळें

महात्मा गांधींचें उपोषण सुटल्याचें जगाला जाहीर करण्यांत आलें. मालवीय, टागोर आणि महात्मा गांधी हे हिंदु संस्कृतीचे तीन जगद्विख्यात नेते तेथें हजर होते आणि डॉ. आंबेडकर यांच्या रूपानें ह्या हिंदु संस्कृतीनें ज्या जमातीवर अमानुष अन्याय धर्माच्या नांवानें केला होता त्या संस्कृतीविरुद्ध बंड करून उठणारी शक्ति तेथें उभी होती. गांधीजींनीं आपल्या तपश्चर्येनें हजारों वर्षें चालत आलेला अन्याय हा हिंदु धर्म नसून त्याच्यावरील एक कलंक आहे असें हिंदु संस्कृतीच्या अभिमान्यांना पटवून दिलें आणि त्या धर्माविरुद्ध व संस्कृतीविरुद्ध बंड करून उठलेली शक्ति शांत केली.

हरिजनसेवा, ग्रामोद्योग संघ आणि मूलोद्योगी शिक्षण

महात्मा गांधींनीं २६ सप्टेंबर रोजीं आपलें उपोषण संपविलें. त्यानंतर त्यांच्या तुरुंगाचे दरवाजे पुनः बंद करण्यांत आले. तथापि त्यांनीं हरिजनसेवेच्या कार्यापुरतें स्वातंत्र्य सरकारकडून मिळविलें होतें. त्याचें हें सेवाकार्य त्यांचा अंत होईपर्यंत अखंड चालू होतें. या कार्यासाठीं २१ फेब्रुवारी १९३३ पासून त्यांनीं 'हरिजन' या नांवाचीं एक हिंदी व एक इंग्रजी अशीं दोन साप्ताहिकें सुरू केलीं. हें संपादनाचें कार्य ते येरवडा तुरुंगांतूनच करीत असत. त्या कामासाठीं त्यांची ज्यांना भेट घ्यावयाची असेल त्यांना भेटही घेतां येत असे. असें हें कार्य बाहेर चालू असतां दुसरीकडे राष्ट्रसभेचा सत्याग्रहही चालू होता. परंतु गांधीजींनां हें नवें कार्य इतक्या जोरानें सुरू केलें होतें कीं, एकंदर कार्यकर्त्यांचें लक्ष आतां सत्याग्रहावरून उडून दुसऱ्या विधायक कार्याकडे जाऊं लागलें. सत्याग्रहाच्या राजकीय लढ्यावर असा परिणाम व्हावा अशी अर्थातच गांधींची इच्छा नव्हती. परंतु चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्यासारखे गांधींचे शिष्य या वेळीं हरिजनसेवेच्या कार्यांत पडले. आणि अस्पृश्यतानिवारक कायदा करवून घेण्यासाठीं कायदेमंडळांच्या सभासदाच्या गाठीभेटी घेऊं लागले. याचाही परिणाम सत्याग्रहाच्या चळवळीवरील जनतेचें लक्ष

द्विधा होण्यांत झाला ; तरीही १९३३ सालच्या एप्रिल महिन्यात बेकायदा ठरावलेल्या राष्ट्रसभेचें एक अधिवेशन कलकत्ता येथें भरविण्यांत आलें. या अधिवेशनाचें अध्यक्षपद पंडित मालवीय यांना देण्यांत आलें होतें. अर्थात् ते कलकत्त्यास पोहोंचण्यापूर्वी त्यांना व त्यांच्याबरोबर असलेल्या पंडित जवाहरलाल यांच्या मातोश्रींना अटक करण्यांत आली. कलकत्त्यांतील स्वागतसमितीच्या सर्व अधिकाऱ्यांना बंदींत टाकण्यांत आलें. तरीही कलकत्त्यास अधिवेशन झालें आणि सर्व हिंदुस्थानांतून सुमारें एक हजार प्रतिनिधि तेथें हजर राहिले. एप्रिल महिन्यांत हा एक मोठा सामुदायिक सत्याग्रहाचा प्रयोग झाल्यानंतर पुढील महिन्यांत सत्याग्रहाची चळवळ महात्मा गांधींनीं ता. ९ मे १९३३ रोजीं सहा आठवडे स्थगित केली.

सहा आठवडे ही चळवळ स्थगित करण्याचें कारण असें कीं, महात्मा गांधींनीं ता. ९ मेपासून आत्मशुद्धीसाठीं एकवीस दिवसांचें एक उपोषण जाहीर केलें. या उपोषणाचा हेतु हरिजन-सेवेच्या कार्यांत काम करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांचा व अनुयायांचा आत्मोद्धार व्हावा असा होता. आपण आत्मशुद्धीसाठीं हें उपोषण करणार आहोंत, त्यांत सरकारकडून किंवा समाजाकडून कोणतीही अपेक्षा आपण ठेवलेली नाहीं असें गांधींनीं सरकारला आगाऊच कळविलें होतें. यामुळें त्यांचें उपोषण सुरू होतांच सरकारनें त्यांना बिनशर्त बंधमुक्त केलें. आपल्या शरीरप्रकृतीच्या दक्षतेसाठीं सरकारनें जी ही उदारवृत्ति दाखविली तिला अनुरूप असा जबाब म्हणून आपण सहा आठवडेपर्यंत सत्याग्रहाची चळवळ तहकूब करण्याचा सल्ला त्या वेळचे कॉंग्रेसचे सर्वाधिकारी देशभक्त बापूजी माधवराव अणे यांना देत आहों असें गांधींनीं जाहीर केलें. कांहीं झालें तरी तीन आठवडेपर्यंत गांधीजी उपोषण करीत असल्यामुळें राष्ट्राचें लक्ष सत्याग्रहाकडे लागणें शक्यच नव्हतें. या दृष्टीनें सत्याग्रह स्थगित होणें अपरिहार्यच होतें. शिवाय कोणत्याही कारणानें बंधमुक्त होऊन बाहेर आल्यानंतर एकंदर परिस्थितीचा व सत्याग्रहाचा फेरविचार करणें हें गांधींचें कर्तव्यच होतें. सत्याग्रह स्थगित करण्याचा हा सल्ला राष्ट्राला देतांना

गांधींनीं सरकारलाही असा सल्ला दिला कीं, तुम्हीं या सहा आठवड्यांच्या मुदतींत वटहुकूम मागें घेऊन राष्ट्रसभेच्या नेत्यांना बंधमुक्त करावें म्हणजे पुनः राष्ट्रसभा आणि सरकार यांच्या दरम्यान समेट घडवून आणण्याचा प्रयत्न मी करीन. राष्ट्रसभेचें कार्यकारी मंडळ सुटून आल्याखेरीज सत्याग्रह बंद करण्याचा कोणासही अधिकार नाहीं असें गांधींनीं जाहीर केलें. तथापि या सहा आठवड्यांत सरकारनें कांहींही अनुकूल हालचाल केली नाहीं, हें पाहून गांधींनीं पुनः सहा आठवडे चळवळ स्थगित केली आणि पुण्यास तुरुंगाबाहेर असलेल्या निरनिराळ्या प्रांतांतील कार्यकर्त्यांचें एक संमेलन बोलाविलें. या संमेलनांत सामुदायिक सत्याग्रह बंद करून वैयक्तिक सत्याग्रह सुरू करावा असा ठराव करण्यांत आला. मात्र हा वैयक्तिक सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी व्हाइसरॉय यांची गांठ महात्मा गांधी यांनीं घ्यावी आणि शक्य तर तडजोड घडवून आणावी असें या ठरावांत म्हटलें होतें. तेव्हां गांधींनीं व्हाइसरॉयकडे मुलाखतीची मागणी केली, परंतु सत्याग्रहाचा ठराव रद्द केल्यावांचून आपण मुलाखत घेऊं शकत नाहीं असें व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांनीं महात्मा गांधींना कळविलें.

या प्रतिकूल उत्तरानंतर महात्मा गांधींनीं साबरमतीस जाऊन वैयक्तिक सत्याग्रहास सुरवात करण्याचें ठरविलें. ता. २६ जुलै १९३३ या दिवशीं साबरमतीचा सत्याग्रह-आश्रम त्यांनीं विसर्जन केल्याचें जाहीर केलें आणि त्याची सर्व मालमत्ता हरिजनसेवेला अर्पण केली. यानंतर आपण तेहतीस अनुयायांसह अहमदाबादपासून रासपर्यंत सत्याग्रहाचा मोर्चा नेणार आहों अशी नोटीस त्यांनीं ३० जुलै रोजीं सरकारला दिली. त्याच्या दुसरे दिवशीं सरकारनें महात्मा गांधींना अटक करून पुनः येरवडा तुरुंगांत आणून ठेविलें. पण त्यापूर्वी त्यांना हरिजनसेवेचें कार्य करण्यास ज्या सवलती देण्यांत आल्या होत्या त्या देण्याचें सरकारनें नाकारलें, त्यामुळें गांधींनीं तुरुंगामध्यें पुनः उपोषण सुरू केलें. अखेरीस २३ ऑगस्ट रोजीं गांधींची प्रकृति अत्यंत क्षीण झाल्यामुळें सरकारनें त्यांना बिनशर्तें मुक्त केलें. त्यांच्या उपोषणाचा हा आठवा दिवस होता. ता. २० रोजीं पांचव्या दिवशींच

त्यांची प्रकृति ढासळली म्हणून त्यांना ससून हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें होतें, पण २३ तारखेस प्रकृति फारच क्षीण झाल्यामुळें त्यांना बिनशर्त मुक्त करण्यांत आलें. या वेळीं त्यांना एक वर्षाची सजा देण्यांत आलेली होती. या काळांत तुरुंगांतून आपणांस हरिजनसेवेचें काम पूर्वीप्रमाणेंच चालवूं द्यावें येवढेंच त्यांचें मागणें होतें. पण ती मागणी सरकारला मान्य करावयाची नव्हती. सरकारनें मुदत भरण्यापूर्वी आपणांस सोडिलें आहे, म्हणून आपण आतां सत्याग्रह करून फिरून तुरुंगांत न जातां उरलेल्या सजेच्या काळांत केवळ हरिजन-सेवेचें कार्यच करूं, कायदेभंग किंवा इतर राजकारण करणार नाहीं; मात्र सत्याग्रह करणारांनीं कांहीं मार्गदर्शन व्हावें म्हणून सल्ला विचारल्यास तेवढा देऊं असें त्यांनीं जाहीर केलें.

नोव्हेंबर महिन्यापासून त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर हरिजन-सेवेला निधि गोळा करण्यासाठीं आणि जागृति करण्यासाठीं दौरा काढिला. केरळ प्रांतांतील गुरुवायूरचें देऊळ हरिजनांना खुलें व्हावें म्हणून श्री. केलाप्पन् यांनीं उपोषण सुरू केलें होतें. गांधींनीं तें उपोषण स्थगित करण्याचा सल्ला दिला होता आणि तीन महिन्यांत मंदिर खुलें झालें नाहीं तर उपोषण करा व मीही तुमच्याबरोबर करीन, असें त्यांना आश्वासन दिलें होतें. यापूर्वी गुरुवायूरच्या मंदिरांत जाणाऱ्या लोकांचें सार्वमत घ्यावें असें ठरलें होतें. या सार्वमताच्या चळवळींत महात्मा गांधींनीं आपल्या उपोषणाचा निर्धार जाहीर केला असल्यानें फार तीव्रता व तेज निर्माण झालें होतें. एकंदर २०,१६३ मतें घेण्यात आलीं. त्यांपैकीं १५,५६३ म्हणजे ७७ टक्के अनुकूल, २,५७९ म्हणजे १३ टक्के प्रतिकूल व २,०१६ तटस्थ (१० टक्के) अशीं मतें पडलीं. अनुकूल मतात ८,००० मतें स्त्रियांचीं होतीं. यावरून हिंदु समाजाची मनोदेवता जागृत होऊन हरिजनांना मंदिरप्रवेश मिळावा असें म्हणूं लागली होती असा सहजच निष्कर्ष निघाला. डॉ. सुब्बारायन् यांनीं या वातावरणाचा फायदा घेऊन मंदिरप्रवेशाला मंत्र्यांच्या संमतीनें कायदेशीर मान्यता देणारें एक बिल मद्रास कायदेमंडळापुढें आणिलें. गुरुवायूर मंदिर १९३४ च्या जानेवारी १ तारखेस हरिजनांना खुलें झालें.

याच सुमारास बिहारमध्यें ता. १६ जानेवारीस धरणीकंपाचा प्रचंड धक्का बसून २०,००० मनुष्यें गतप्राण झालीं. १० लक्ष घरें उध्वस्त झालीं, ६,५०० विहिरी व तलाव नाहींसे झाले आणि सुमारें १० लक्ष बिघे शेतजमीन वाळू पडून तिचें वाळवंटच बनलें! अवघ्या दहापंधरा मिनिटांत सृष्टीनें ही अघोर करणी केली! निसर्गानें केलेल्या विध्वंसनाच्या कार्याची हानि भरून काढणें हें एक प्रचंड विधायक कार्य देशभक्तांपुढें येऊन एकदम उभें राहिलें. बाबू राजेंद्रप्रसाद यांच्यावरच या कामाची धुरा येऊन पडली. पं. जवाहरलाल नेहरू हेही या वेळीं बंधमुक्त होऊन बाहेर आले होते. त्यानींही बिहारला भेट दिली. महात्मा गांधींनींही बिहारकडे जनतेचें, धनिकांचें व कार्यकर्त्यांचें लक्ष वेधिलें. यां सर्व प्रकारामुळें वैयक्तिक सत्याग्रहाच्या चळवळीकडे आतां फारसें राष्ट्राचें लक्ष उरलें नाहीं.

इकडे १९३३ च्या मार्चपासूनच डॉ. अन्सारी, भुलाभाई देसाई, बिधनचंद्र रॉय, वगैरे लोकांनीं आतां सत्याग्रह बंद करून कायदेमंडळांत जावें, दडपशाहीचे कायदे रद्द करून घ्यावेत आणि १९३५ सालीं होणाऱ्या संयुक्त राज्याच्या कायद्याची जी प्रतिगामी योजना श्वेतपत्रिका म्हणून ब्रिटिश सरकारनें जाहीर केली होती, ती हाणून पाडून संपूर्ण स्वराज्याची किंवा स्वातंत्र्याची जी मागणी म. गांधींनीं गोलमेज परिषदेच्यापुढें मांडिली होती तसा कायदा करवून घेण्याचा प्रयत्न कायदेमंडळांतून करावा असें धोरण पुरस्कारिण्यास प्रारंभ केला. ३१ मार्च १९३४ रोजीं दिल्लीस एक पुढारी-परिषद भरली व तिनें स्वराज्यपक्षाचें पुनरुज्जीवन करण्याचा विचार ठरविला. महात्मा गांधींना हें धोरण पटवून देण्याचे प्रयत्न भुलाभाई देसाई व बिधनचंद्र रॉय यांनीं करावेत असें ठरविलें. तिकडे महात्मा गांधी पाटण्याकडे धरणीकंपाच्या भागांतून खेडोपाडीं हिंडत होते. २ एप्रिल १९३४ रोजीं त्यांनीं असें ठरविलें कीं, आतां वैयक्तिक सत्याग्रहही थांबविण्याची वेळ आली आहे. लोकांत त्या कार्यासंबंधीं उत्साह उरलेला नाहीं व जे सत्याग्रही तुरुंगांत जातात त्यांच्यामध्येंही सत्याग्रही वृत्ति मुरलेली नाहीं. इतक्यांत दिल्लीच्या पुढारी-परिषदेचें धोरण त्यांना समजलें व

तिनें पाठविलेल्या पुढाऱ्यांशीं चर्चा होईपर्यंत त्यांनीं सत्याग्रह-तहकुबीचें आपलें पत्रक प्रसिद्ध न करता तसेंच ठेवून दिलें. ७ एप्रिल रोजीं तें पत्रक प्रसिद्ध झालें आणि वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ बिनमुदत बंद करण्यांत आली. या पत्रकांत गांधींनीं असें जाहीर केलें कीं, जनतेला व कार्यकर्त्यांना सत्याग्रहाची खरी वृत्ति अद्यापि समजलेली नाहीं, हें लक्षांत घेऊन स्वातंत्र्यासाठीं सत्याग्रह कसा व केव्हां करावयाचा हा हक्क मी माझ्यापुरताच मर्यादित करून ठेवतों. जोंपर्यंत या सत्याग्रह-शास्त्राचें ज्ञान आपणांस अधिक आहे असें म्हणणारा दुसरा इसम निघाला नाहीं व त्याच्यावर जनतेचा विश्वास बसला नाहीं, तोंपर्यंत मी जीवंत असेपर्यंत स्वातंत्र्याच्या सत्याग्रहाचें पुनरुज्जीवन करण्याचा अधिकार राष्ट्रानें-म्हणजे राष्ट्रसभेनें-केवळ माझ्याकडेच सोंपवावा. राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांनीं खादी, ग्रामोद्योग, हरिजनसेवा, हिंदु-मुसलमान ऐक्य या विधायक कार्यावरच आपलें सर्व लक्ष केंद्रित करावें. या विधायक लोकसेवेनेंच सत्याग्रही वृत्ति जनतेंत बाणेल व पुनः गरज पडल्यास स्वातंत्र्य-सत्याग्रह करण्याचेंही सामर्थ्य राष्ट्रांत येईल.

कायदेमंडळांतील कार्यासंबंधीं डॉ. अन्सारींना त्यांनीं असें पत्र लिहिलें कीं, तुम्हीं स्वराज्यपक्षाचें पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न चालविले आहेत, त्याचें मी स्वागत करतों. कायदेमंडळांतील कार्यासंबंधीं माझीं मतें सर्वश्रुत आहेत. १९२० सालीं तीं होतीं तशींच आजही आहेत. तथापि स्वराज्यपक्ष स्थापन झाल्यास त्याला सल्लामसलत देण्याचें काम मी करीन. आजच्या राष्ट्राच्या परिस्थितींत राष्ट्रसभेंत अशा पक्षाची गरज आहे असें आपलें मत असल्याचेंही त्यांनीं या पत्रांत पुढें म्हटलें होतें. महात्मा गांधी व त्यांचे अनुयायी यांनीं विधायक कार्यांतच मग्न राहावें, कायदेमंडळांतील कार्य करणारा पक्ष राष्ट्रसभेंत स्थापन करावा आणि सर्व प्रकारचा सत्याग्रह बंद करून पुनः महात्मा गांधी सांगतील तेव्हांच स्वातंत्र्य-सत्याग्रह सुरू करावा असा या धोरणाचा अर्थ होता.

९ मे १९३३ रोजीं महात्मा गांधींनीं सामुदायीक सत्याग्रह प्रथम तीन आठवडे व पुनः आणखी तीन आठवडे स्थगित केला. त्याच वेळीं विठ्ठलभाई पटेल व सुभाषचंद्र बोस यांनीं व्हिएन्ना शहरांतून एक पत्रक प्रसिद्ध केलें कीं, महात्मा गांधी हे राजकीय पुढारी या दृष्टीनें अयशस्वी ठरले आहेत. तेव्हां आतां राष्ट्रसभेंत दुसरा राजकीय पक्ष स्थापून निराळ्या धोरणानें व निराळ्या नेत्यांच्या झेंड्याखालीं स्वातंत्र्याच्या लढ्याची आंखणी केली पाहिजे. पं. जवाहरलाल नेहरू यांनाही महात्मा गांधींनीं हरिजन-कार्य सुरू केल्यापासून गांधींचें धोरण नापसंत झालें होतें. वैयक्तिक सत्याग्रह बंद केला, तेव्हां कलकत्त्यास १९३४ च्या प्रारंभीं केलेल्या एका भाषणाबद्दल पं. नेहरू तुरुंगांत होते. विठ्ठलभाई पटेल व सुभाषबाबू परदेशांत होते. पाटणा येथें राष्ट्रसभेच्या अ. भा. समितीची बैठक होऊन महात्मा गांधींच्या नव्या धोरणास मान्यता देण्याचा ठराव बहुमतानें मंजूर झाला. तथापि आपल्या धोरणावर व तंत्रावर आतां राष्ट्रसभेच्या नेत्यांचा खरा विश्वास उरला नसून बरेच लोक आपल्या भिडेनें आपण मांडूं त्या धोरणास पाठिंबा देतात असा त्यांना अनुभव येऊं लागला. हें दृश्य पाहून महात्मा गांधींनीं आतां राष्ट्रसभेंतून बाहेर पडावयाचें ठरविलें. चालू राजकारणांत केवळ सल्लागाराची भूमिका घ्यावी, आपलें सर्व बल विधायक कार्याला चालना देण्यांत खर्ची घालावें आणि शुद्ध सत्याग्रह करण्याची आपली शक्ति आपल्या प्रेरणेनुसार वाढवीत राहावें अशी वृत्ति त्यांच्या अंतःकरणांत या वेळीं उदय पावूं लागली.

महात्मा गांधींवर पुण्यांत बॉम्ब

या सुमारास हरिजन-दौरा संपवून ते पुण्यास आले असतां ता. २५ जून १९३४ रोजीं त्यांना मानपत्र देण्याचें पुणें नगरपालिकेनें ठरविलें. या समारंभास ते जात असतां त्यांच्यावर एका सनातनी म्हणविणाऱ्या इसमानें हरिजन-सेवेच्या त्यांच्या कामानें चिडून जाऊन एक बॉंब फेंकला! पण सुदैवानें त्याचा नेम चुकला आणि महात्मा गांधींना कोणतीही इजा झाली नाहीं. हा बॉंब टाकणाऱ्या इसमाचा

पोलिसांना तपास लावतां आला नाहीं. गांधींच्यावर ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचा जसा रोष होता, तसाच किंबहुना त्याहूनही थोडा अधिक रोष हिंदूंतील काहीं सनातनी धर्मनिष्ठांचा होता, हें या वेळा सिद्ध झालें. पण या माथेफिरूच्या या कृत्याचा हिंदु जनतेनें केव्हांही गौरव न करतां निषेधच केला व हा निषेध करण्यांत स्वतःस सनातनी समजणारे लक्षावधि स्त्री-पुरुष होते. महात्मा गांधी हेही एका उच्च व भिन्न अर्थानें आपण सनातनी हिंदु आहों असेंच अखेरपर्यंत म्हणवीत होते, हें निराळेंच! खरा सनातन धर्म एकच असून सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, इत्यादि त्याचीं अंगें आहेत व हा सनातन मानवधर्मच श्रीकृष्ण, महावीर, बुद्ध, झरतुष्ट्र, ख्रिस्त, महंमद, कबीर, नानक, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, तुलसीदास, मीराबाई यांनीं उपदेशला आहे असें गांधींचें मत होतें. त्यांत द्वेषाला, हिंसेला, असत्याला यत्किंचितही स्थान नाहीं असें ते सांगत. साधुत्वाची वृद्धि, साधुत्वाचें रक्षण आणि साधुत्वाचें आचरण हें गांधींच्या सनातन धर्माचें स्वरूप होतें. पण स्वतःस सनातन हिंदु म्हणविणाऱ्या कांहींना गांधींसारख्या साधूच्या वधानेंच सनातन हिंदु धर्म सुरक्षित होईल असें वाटूं लागलें होतें. या माथेफिरू दुष्ट धर्मनिष्ठेला जेव्हां राजकीय मत्सराच्या विषाचें पुट देण्यांत आलें तेव्हां हिंदुत्वनिष्ठ राष्ट्रवाद जन्मास आला व त्याला कपटकारस्थानाचें हीन रूप प्राप्त झालें. अशा या विकृत, हिंदुत्वनिष्ठ कारस्थानी वृत्तीच्या एका अंध सांप्रदायिकानेंच अखेरीस गांधींचा बळी घेतला. पण तत्पूर्वी गांधींचें स्वातंत्र्यप्राप्तीचें संकल्पित कार्य पुरें झालें होतें!

राष्ट्रसभेच्या राजकारणांतून निवृत्ति

या वेळीं राष्ट्रसभेच्या राजकारणांत बराच गोंधळ माजलेला होता. डॉ. अन्सारी, पं. मालवीय आणि भुलाभाई देसाई, इत्यादि मंडळी सत्याग्रह बंद करून कायदेमंडळांत जाण्याचें राजकारण करण्यासाठीं स्वराज्यपक्षाचें पुनरुज्जीवन करीत होती. याच्या उलट जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, आचार्य नरेंद्रदेव ही मंडळी राष्ट्रसभेंत

एक समाजवादी पक्ष स्थापन करीत होती. या दोन्ही प्रवृत्तींशीं महात्मा गांधींचा तात्त्विक मतभेद होता; तथापि सरदार वल्लभभाई, चक्रवर्ती राजगोपालचारी आणि बाबू राजेंद्रप्रसाद, इत्यादि गांधीवादी म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांचा समाजवादाला विरोध असला तरी नवीन स्थापन होणाऱ्या स्वराज्यपक्षाला अथवा त्या धोरणाला त्यांचा पाठिंबा होता. या कायदेमंडळांतील कार्यानें स्वातंत्र्य मिळणार नाहीं आणि म्हणून समाजवादी पद्धतीनें क्रांति करण्याचें धोरण राष्ट्रसभेला पुनः अंगीकारावें लागेल असें नवीन स्थापन झालेल्या समाजवादी पक्षाचें म्हणणें होतें. कायदेमंडळांतील कार्यानें स्वातंत्र्याचें ध्येय गांठतां येणार नाहीं असें मत अनेक गांधीवादी पुढाऱ्यांचेंही असलें तरी या बाबतींत गांधींच्याकडे सर्व जबाबदारी सोंपविण्यास ते तयार होते; शिवाय राजगोपालाचारीसारख्या कांहीं प्रमुख गाधीवाद्यांचा या वेळींच सत्याग्रही प्रत्यक्ष प्रतिकारावरील विश्वास डळमळूं लागल्याचें स्पष्ट दिसत होतें. राष्ट्रसभा आतां कांहीं काल तरी कायदेमंडळांतील कार्यांत मग्न राहणार हें ओळखून महात्मा गांधी हरिजन सेवक संघ, ग्रामोद्योग संघ इत्यादि विधायक प्रवृत्तींवर सामान्य कार्यकर्त्यांनीं आपला सर्व भर द्यावा असें म्हणूं लागले होते. राष्ट्रसभेंत नवीन स्थापन झालेल्या समाजवादी पक्षाचें क्रांतिकारक धोरण अहिंसेच्या दृष्टीनें जसें त्यांना सर्वस्वीं पसंत नव्हतें तसेंच कायदेमंडळांत जाऊं इच्छिणाऱ्या लोकांशींही ते पूर्णपणें सहमत नव्हते. कायदेमंडळांतील कार्यासंबंधीं माझीं स्वतःचीं मतें १९२० सालीं जीं होतीं तींच कायम आहेत असें त्यांनीं स्वराज्यपक्षाच्या पुनर्जीवनाचें स्वागत करतांनाही डॉ० अन्सारीप्रभृति पुढाऱ्यांना कळविलें होतें. अशा परिस्थितींत आपण शुद्ध सत्याग्रही या नात्यानें राष्ट्रसभेंतून बाहेर पडावें असा निर्णय त्यांनीं घेतला. हा निर्णय त्यांनीं ता. १७ सप्टेंबर १९३४ रोजीं एका जाहीर पत्रकानें राष्ट्राला विदित केला. आपला हा निर्णय इतर अनेक पुढाऱ्यांना मान्य नसला तरी मीं आतां राष्ट्रसभेच्या सेवेंतून निवृत्त होण्याचा काल आला आहे हें माझें मत सरदार वल्लभभाई पटेल यांना पटलें आहे असें त्यानीं या पत्रकांत नमूद केलें आहे. त्यानीं राष्ट्रसभेंतून निवृत्त

होण्याचीं आपलीं जीं कारणें ह्या पत्रकांत दिलीं आहेत त्यांचा थोडक्यांत सारांश पुढीलप्रमाणें होता : काँग्रसमधील विद्वान् पुढारी आणि मी यांच्या मतांत अलीकडे बरेंच अंतर पडलेलें आहे. (१) चौदा वर्षें अहिंसेच्या शस्त्राचा उपयोग करूनही राष्ट्रसभेला अहिंसा हें आपलें ब्रीद बनवितां येईल अशी निष्ठा वाटत नाहीं. केवळ धोरण या दृष्टीनेंच तिनें त्याचा स्वीकार केला आहे. (२) खादी आणि हातसूत या बाबतींत राष्ट्रसभेची निष्ठा अद्यापि माझ्या मताप्रमाणें बसूं शकत नाहीं. रासष्ट्रभेचा मताधिकार कोणास केवळ चार आणे देऊन प्राप्त न होतां जो दररोज २००० वार सूत काढून देईल आणि सतत खादी वापरील त्यालाच तो देण्यांत यावा हें माझें मत राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना व्यवहार्य वाटत नाहीं ; खादी परिधान करण्यावरतीही तिच्या कार्यकर्त्यांची जिवंत निष्ठा दिसत नाहीं. (३) पार्लमेंटरी बोर्ड स्थापन होऊन कायदेमंडळांतील काम सुरू करण्याचें ठरलें तरीही त्याच्या कार्याबाबत अनेक मतभेद काँग्रेसमध्यें आहेत. पाटणा येथें त्यासंबंधीं माझीं मतें मीं जेव्हां जोरानें पुरस्कारलीं तेव्हां तीं मतें माझ्या अनेक सहकाऱ्यांना पसंत नसतांनाही त्यांनीं आपलीं मतें बाजूस ठेवून माझ्या मतास पाठिंबा दिला. एखादे वेळीं आपण ज्याला श्रेष्ठ पुढारी समजतों त्याच्या मताला मान देऊन वागण्यासाठीं आपलीं मतें कांहीं काळ मागें ठेवणें यांत जरी आक्षेपार्ह असें कांहीं नसलें तरी असा प्रसंग वारंवार येत राहणें आणि त्याप्रमाणें अनेकांना आपलीं मतें दडपून ठेवणें भाग पडणें ही गोष्ट लोकशाही तत्त्वास विघातक आहे. मी स्वतः लोकशाहीचा परमभक्त असल्यामुळें मला हें बरें वाटत नाहीं आणि राष्ट्रसभेची लोकशाहीच्या दिशेनें वाढ व्हावयाची तर मीं आपला संबंध तोडून टाकल्याखेरीज ती तशी होणार नाहीं असें मला आतां वाटूं लागलें आहे ; कारण माझ्या मताविरुद्ध आपलीं मतें देण्यासच लोक तयार होत नाहींत. (४) राष्ट्रसभेंत समाजवादी पक्ष नवा स्थापन झाला आहे आणि त्याचें मीं स्वागतही केलें आहे. त्यांच्यामध्यें अनेक सन्मान्य आणि स्वार्थत्यागी असे आमचे सहकारी आहेत. त्यांनीं आपला जो कार्यक्रम प्रसिद्ध केला आहे त्यांपैकीं कांहीं

बाबी मला कितीही अप्रिय वाटत असल्या तरी माझ्या नैतिक दडपणानें, त्यांच्या पत्रकांत व्यक्त झालेले विचार फैलावूं देऊं नयेत अशी माझी वृत्ति नाहीं. हे विचार जर राष्ट्रसभेंत प्रभावी झाले तर मी तिच्यांत राहणार नाहीं. तथापि मी त्यांच्या प्रचाराच्या आड येणार नाहीं. (५) संस्थानें आणि अस्पृश्यता-निवारण या प्रश्नांसंबंधीं माझी विचारसरणी राष्ट्रसभेंतील अनेकांना पसंत नाहीं.

अशा प्रकारचीं कारणें दिल्यानंतर त्यांनीं आपण सत्याग्रहास अवश्य असणारी शुद्ध आत्मिक शक्ति वाढविण्यासाठीं म्हणून राष्ट्रसभेच्या कार्यांतून निवृत्त होण्याचें ठरविलें आहे असें सांगितलें. आपला हा निर्णय कायम झालेला आहे असें सांगूनही गांधींनीं पुढें असें म्हटलें होतें कीं, राष्ट्रसभेला माझी दृष्टि कितपत मान्य होणें शक्य आहे हें अजमावण्यासाठीं मीं तिच्या घटनेंत तीन सुधारणा करणाऱ्या तीन उपसूचना येत्या अधिवेशनाचे वेळीं मांडण्याचें ठरविलें आहे. हें अधिवेशन बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं ऑक्टोबरच्या २६, २७ व २८ या तारखांस होणार होतें. या अधिवेशनांत मान्य करण्यासाठीं गांधींनीं ज्या तीन उपसूचना पाठविल्या होत्या त्या अशा :—

(१) राष्ट्रसभेच्या ब्रीदांत स्वराज्यप्राप्तीच्या साधनासंबंधीं 'न्याय्य व शांततेचे मार्ग' असे जे शब्द आहेत ते बदलून 'सत्यनिष्ठेचे व अहिंसेचे मार्ग' असे शब्द घालावेत. (२) राष्ट्रसभेचा मताधिकार दररोज २००० वार सूत कांतणारे व नित्य खादीधारी असे जे असतील त्यांनाच देण्यांत यावा. (३) जे निवडणुकांपूर्वी निदान सहा महिने राष्ट्रसभेचे मतदार बनलेले नाहींत व जे नित्य खादीधारी नाहींत, अशांना मत दण्याचा अधिकार असूं नये. याशिवाय राष्ट्रसभेच्या अधिवेशनांतील प्रतिनिधींची संख्या सहा हजार होती ती बदलून जास्तीत जास्त एक हजार अशी करण्यांत यावी आणि त्या प्रतिनिधींची वांटणी एक हजार मतदारांना एक प्रतिनिधि या प्रमाणांत निरनिराळ्या मतदारसंघांत करण्यांत यावी असेंही त्यांनीं सुचविलें होतें. राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत त्यांनीं सुचविलेल्या वरील तीन उपसूचना नामंजूर झाल्या. यावरून राष्ट्रसभा ही आपल्या कल्पनेनुसार शुद्ध सत्याग्रही

संस्था बनणें शक्य नाहीं असा त्यांनीं बोध घेतला आणि आपण तिच्यातून निवृत्त होण्याचा घेतलेला निर्णय यथायोग्य आहे, अशी त्यांची खात्री झाली. त्याप्रमाणें ते निवृत्त झाले. तरीही अखेरपर्यंत सत्याग्रहाचे प्रचारक या नात्यानें ते राष्ट्रसभेला पुनः पुनः आपल्या कल्पनेप्रमाणें शुद्ध सत्याग्रही दीक्षा देण्याचा प्रयत्न करीत असत. ही त्यांची इच्छा जरी केव्हांच सफल झाली नाहीं तरीही ते निराश झाले नाहींत आणि तिला तिच्या अधिकारानुसार स्वराज्याचा लढा आणि राष्ट्रसेवेचें कार्य कसें करतां येईल यांसंबंधीं अशा प्रकारें अखेरपर्यंत ते तिला सल्ला देत राहिले.

थोडें सिंहावलोकन

१९२० सालीं महात्मा गांधींनीं राष्ट्रसंभेचें राजकीय नेतृत्व स्वीकारलें आणि त्यानंतर चौदा वर्षांनीं १९३४ सालीं त्यांनीं राष्ट्रसभेचा राजीनामा दिला. या चौदा वर्षांपैकीं पहिलीं चार वर्षं म्हणजे १९२० ते २४ राष्ट्रसभा गांधींच्या तत्त्वानुसार पूर्णपणें असहकारवादी होती. पुढें १९२४ सालापासून १९३० पर्यंत राष्ट्रसभेंत एक कौन्सिलवादी स्वराज्यपक्ष स्थापन झाला. तथापि तो पक्ष त्या वेळीं अधिकारावर गेला नाहीं. या स्वराज्यपक्षाचें नेतृत्व पंडित मोतीलाल नेहरू यांच्याकडे होतें. आणि महात्मा गांधींचे कट्टे अनुयायी सरदार वल्लभभाई पटेल व राजेंद्रबाबू, राजगोपालाचारी हे लोक कौन्सिलबहिष्कारवादीच होते. विधायक लोकसेवा आणि सत्याग्रही प्रत्यक्ष प्रतिकार यानेंच स्वराज्य प्राप्त होईल अशी त्यांची निष्ठा होती. तरीही १९२४ सालीं महात्मा गांधींनीं राष्ट्रसभेचें असहकाराचें धोरण स्थगित केलें आणि स्वराज्य पक्षाला आपलें राजकारण कौन्सिलांत जाऊन करण्यास मोकळीक दिली. त्या पक्षानें १९२४ पासून सहा वर्षं आपल्या धोरणानें कार्य केलें. अखेरीस तेवढ्यानें स्वराज्याची प्राप्ति होणें शक्य नाहीं अशी खात्री झाल्यानंतर तो पक्ष कायदेमंडळावर बहिष्कार घालून महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं १९३० सालीं स्वातंत्र्य-सत्याग्रहांत दाखल झाला. त्यानंतर १९३४ पर्यंत चार वर्षं महात्मा गांधी हेच राष्ट्रसभेचे अधिकृत नेते

व सर्वाधिकारी बनले. मध्यंतरीं १९३१ सालीं गांधी-आयर्विन करार झाला आणि गांधीजी विलायतेस जाऊन त्यांनीं स्वातंत्र्याची शिष्टाई केली. ती विफल झाल्यानंतर ते परत आले आणि १९३२ पासून १९३४ च्या मध्यापर्यंत निरनिराळ्या रूपानें सत्याग्रहसंग्राम चालू राहिला. पुढें तो बंद राहिला. त्यानंतर गांधींनीं राष्ट्रसभला केवळ विधायक लोकसेवा आणि सत्याग्रही प्रत्यक्ष प्रतिकार एवढेंच करणाऱ्या लोकसेवकसंघाचें स्वरूप पुढेंमागें देतां येईल काय अशी चांचपणी केली. त्यांत त्यांची निराशा झाली. या वेळपासून राष्ट्रसभेंतील जुने असहकारवादी पुढारी अधिकारवादी बनले आणि नवे पुढारी अथवा तरुण कार्यकर्ते समाजवादी व प्रत्यक्ष प्रतिकारवादी बनले.

गांधी-आयर्विन करार झाला त्या वेळीं स्वराज्यप्राप्तीनंतर राष्ट्रसभेचें स्वरूप कशा प्रकारचें राहील असा प्रश्न एकदां गांधींनीं पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याजवळ काढला. पंडितजी म्हणाले, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रसभेचें कार्य संपेल आणि ती विसर्जन पावेल. त्यानंतर इतर स्वतंत्र देशांप्रमाणें निरनिराळ्या तत्त्वांवर काम करणारे दुसरे राजकीय पक्ष अस्तित्वांत येतील. गांधींना ही विचारसरणी पटली नाहीं. त्यांनीं आपलें मत असें सांगितलें कीं, स्वातंत्र्यानंतर राष्ट्रसभेनें लोकसेवेचें कार्य करीत राहावें; मात्र तिच्या कोणाही सभासदानें सत्तास्वीकार करूं नये व जे तसें करतील त्यांचें सभासदत्व रद्द करावें. विधायक लोकसेवेनें जनतेचें आत्मबल जागृत, संघटित आणि प्रभावी करणारी अशी एक राष्ट्रीय संस्था हेंच स्वरूप राष्ट्रसभेला यावें आणि तिनें सत्तासंपादनासाठीं इतर पक्षांशीं स्पर्धा करण्याचें राजकारण करूं नये अशा तऱ्हेची आपली कल्पना महात्मा गांधींनीं त्या वेळीं पंडित जवाहरलाल नेहरू यांना सांगितली. प्रत्यक्ष राज्यसत्ता हातीं न घेतां केवळ जनतेचें आत्मबल जागृत, संघटित व प्रभावी करणारी लोकसेवकांची राष्ट्रीय संस्था हें स्वरूप राष्ट्रसभेला द्यावें हें गांधीजींचें मत आपणांस बरोबर आकलन झालें नाहीं किंवा पटलें नाहीं, असें पंडितजींनीं आपल्या आत्मचरित्रांत लिहून ठेवलें आहे. गांधींनीं आपला हा विचार आपल्या निधनापूर्वी एक दिवस राष्ट्रसभेच्या घटनेंत कोणत्या सुधारणा

कराव्यात यासंबंधींचें आपलें मत म्हणून राष्ट्रसभेच्या नेत्यांना सादर केला. राष्ट्रसभेनें विधायक लोकसेवेचें कार्य करावें, एवढा त्यांतील भाग त्यांनीं स्वीकारला असला तरी राजकीय सत्तासंपादनाच्या क्षेत्रांतून आपलें अंग मुळींच काढून घ्यावें हा गांधींचा विचार स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही राष्ट्रसभेला अद्यापि पटलेला नाहीं. असो. या भावी घटनेचा विचार पुढें यथावकाश करण्यांत येईल.

: : ७ : :

प्रांतिक स्वराज्य आणि पुन्हा स्वातंत्र्यसंग्राम

महात्मा गांधींनीं ऑक्टोबर १९३४ मध्यें राष्ट्रसभेंतून सेवानिवृत्ति घेतल्यानंतर केलेलें पहिलें कार्य म्हणजे १४ डिसेंबर रोजीं अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ या नावांची संस्था स्थापन केली हें होय. हरिजन-सेवक-संघ हा यापूर्वीच स्थापन झालेला होता. अखिल भारतीय चरखासंघ हा स्थापन होऊन बरींच वर्षें झालीं होतीं. आतां महात्मा गांधींनीं चरखासंघाच्या खादीधंद्याची कल्पना वाढवून सर्व प्रकारच्या ग्रामोद्योगांचा उद्धार आणि त्यांची सुधारणा ही गोष्ट आपल्या विधायक कार्यक्रमांतून गोवून घेतली. महात्मा गांधींची भारतीय संस्कृतीसंबंधींची सर्व कल्पना ग्रामोद्धाराच्या आधारावर रचलेली आहे. भारतीय संस्कृति ही ग्रामप्रधान संस्कृति असली पाहिजे आणि हिंदुस्थानांतील खेडीं उद्योगानें समृद्ध आणि शिक्षणानें सुसंस्कृत अशीं बनलीं पाहिजेत. प्रचंड औद्योगिक शहरें आणि मोठमोठे कारखाने निर्माण न करतां सर्व देशभर विखुरलेलीं स्वयंपूर्ण स्वावलंबी खेडीं हा भारतीय संस्कृतीचा आदर्श त्यांच्या डोळ्यांपुढें होता. अर्थात् उद्योग-धंदे हे मोठ्या शहरांत केंद्रित न होतां खेड्यांत पसरलेले असले म्हणजे साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हें जें सुखी व समाधानी मानवाचें जीवन तें सर्वांस लाभूं शकतें. खादीची योजना प्रथमतः खेड्यांतील अर्धबेकार शेतकऱ्यांना जोडधंदा मिळावा या कल्पनेंतून निघाली होती. सात लक्ष खेड्यांत पसरलेल्या ८० टक्के शेतकऱ्यांना

वर्षांतून चार-सहा महिने बेकार राहावें लागतें. त्यांना उद्योग देण्यासाठीं अखिल भारतीय चरखासंघाची स्थापना करण्यांत आलेली होती. ही स्थापना १९२५ सालीं झाली. त्यानंतर चौदा वर्षांनीं आतां खेड्यांतील इतर धंद्यांचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं गांधींनीं अखिल भारतीय ग्रामोद्योगसंघाची स्थापना केली. सत्याग्रही कार्यकर्त्यांनीं एकेक खेडें निवडून तेथें ग्रामसेवा, हरिजनसेवा, ग्रामोद्योगसंघटना, इत्यादि ग्रामोद्धारांचीं विविध कार्यें करीत राहावें आणि त्यावरच उपजीविका करून स्वावलंबी व्हावें अशा तऱ्हेचे सत्याग्रही ग्रामसेवक महात्मा गांधींना हजारोंनीं पाहिजे होते. त्यांच्या ग्रामसेवेनें जागृत आणि संघटित झालेली जनता आपल्या असहकाराच्या प्रभावानें कोणत्याही प्रबल राज्यसत्तेला पूर्ण अहिंसेनें आपल्यापुढें वांकवूं शकेल हें त्यांचें सत्याग्रही राजकारण होतें.

या सत्याग्रही राजकारणांत त्यांना केवळ घटनाभंगाच्या प्रक्षोभक कार्यासाठीं कायदेमंडळात जाणाऱ्या राजकीय पक्षाची फारशी गरज वाटत नसे. तथापि सरकारचे दडपशाही कायदे फेटाळून लावावेत, निदान त्यांचा तीव्र शब्दांनीं निषेध करावा आणि लोकांना हवी असणारी राज्यघटना सरकारकडे मागावी, यासाठीं आपण कायदेमंडळांत गेलें पाहिजे असें म्हणणारा एक पक्ष राष्ट्रीय सभेंत होता. या पक्षाला प्रथमतः स्वराज्यपक्ष असें नांव होतें. आतां १९३५ सालापासून राष्ट्रीय सभेच्याच नांवानें हें कायदेमंडळाचें कार्य सुरू करावें, असें ठरलें. हें कार्य करण्याची जबाबदारी महात्मा गांधींचे पट्टशिष्य म्हणून प्रसिद्ध असलेले बाबू राजेंद्रप्रसाद, सरदार वल्लभभाई, राजगोपालाचारी, मौलाना आझाद यांनीं अंगीकारिली होती. आतां लवकरच १९३५ चा राज्यघटनेचा कायदा अमलांत यावयाचा होता. तो राज्यघटनेचा कायदा फेटाळून लावून नवा संपूर्ण स्वराज्याचा कायदा करण्याचें स्वातंत्र्य आपणांस मिळालें पाहिजे अशी राष्ट्रीय सभेची इच्छा होती. अर्थात् १९३५ ची राज्यघटना मोडून टाकणें आणि घटनापरिषदेचा आणि स्वयंनिर्णयाचा हक्क प्राप्त करून घेऊन देशाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवणें हें १९३४ पासून

राष्ट्रीय सभेचें जाहीर धोरण होतें ; तथापि १९३५ च्या राज्यघटनेच्या कायद्यानें जें प्रांतिक स्वराज्य मिळणार होतें त्यांतील सत्तेचा उपयोग आपल्या विधायक कार्यासाठीं शक्यतों करून घ्यावा अशी गांधींची वृत्ति होती आणि पुढें जेव्हां १९३७ सालीं नव्या राज्यघटनेनुसार निवडणुका होऊन आठ प्रांतांमध्यें प्रांतिक स्वराज्याची सत्ता मिळविणें राष्ट्रीय सभापक्षाला शक्य झालें तेव्हा त्या सत्तेचा उपयोग त्या पक्षानें शक्यतों ग्रामोद्धारादि विधायक कार्यास करावा असें धोरण गांधींनीं त्यांना लावून दिलें. केवळ घटनाभंगासाठीं आपण घटनाभंग करावा अशी त्यांची वृत्ति नव्हती. खरी सत्ता आपल्या हातीं आल्यास आपण तिचा उपयोग लोकसेवेसाठीं कितपत होतो, तो मनापासून करून पाहावा ; मात्र असें करतांना जर मध्यसरकारशीं किंवा गव्हर्नरशीं लोकसेवेच्या कामासाठीं झगडणें प्राप्त झालें, तर झगडा करून घटना मोडून पाडण्यास मागेंपुढें पाहूं नये, असें त्यांचें धोरण होतें. हें धोरण यशस्वी करण्यासाठीं त्यानीं प्रथमतः प्रांतिक निवडणुकी झाल्यानंतर जेव्हां आठ प्रांतांत राष्ट्रीय सभेला बहुमत मिळालें आणि तिनें मंत्रिपदें स्वीकारून अधिकारावर जावें किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हां मंत्रिमंडळाच्या दैनंदिन कार्यांत गव्हर्नरांनीं ढवळाढवळ न करतां सामान्यतः इंग्लंडच्या राजाप्रमाणें सनदशीर वृत्तीनें वागावें, असें अभिवचन ब्रिटिश सरकारकडे मागितलें. हें अभिवचन मिळेपर्यंत राष्ट्रीय सभेनें तीनचार महिने अधिकारस्वीकार केला नाहीं, आणि तिच्या पक्षाचेंच बहुमत कायदेमंडळांत असल्यामुळें ती राज्यघटना दोनतीन महिने मोडून पडली. महात्मा गांधींनीं हा जो सल्ला या वेळीं दिला त्याला पुढें पुष्कळच महत्त्व आलें. अखेरीस ब्रिटिश सरकारनें म्हणजे त्यांच्या वतीनें व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं हें आश्वासन दिलें आणि १९३७ सालीं जून महिन्यांत राष्ट्रीय सभेचीं मंत्रिमंडळें आठ प्रांतांत अधिकारारूढ झालीं. त्या सर्व प्रांतांतील मंत्रिमंडळांचें नियंत्रण करण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें एक पार्लमेंटरी बोर्ड स्थापन केलें. बाबू राजेंद्रप्रसाद, सरदार वल्लभभाई

आणि मौलाना आझाद ही मंडळी या नियंत्रणबोर्डांत होती. त्यांनीं निरनिराळे प्रांत आपल्या कक्षेंत वांटून घेऊन, या आठ प्रांतांचा राज्यकारभार राष्ट्रीय सभेच्या धोरणानुसार चालविला.

हें पार्लमेंटरी बोर्ड असलें तरी त्यांना प्रेरणा देणारी आणि मार्ग-दर्शन करणारी विभूति महात्मा गांधी हीच होती. महात्मा गांधींनीं १९३६ सालीं ३० एप्रिलपासून मध्यप्रातांत वर्ध्याशेजारीं 'सेवाग्राम' येथें आपला आश्रम स्थापन केला होता. सेवाग्राम ही ह्या आठ प्रांतांची एक प्रकारें राजधानीच बनली होती. वर म्हटल्याप्रमाणें आपणहून प्रांतिक स्वराज्याच्या घटनेचा भंग करावयाचा नाहीं असें महात्मा गांधींचें धोरण असलें, तरी प्रसंग पडल्यास केव्हांही सत्तात्याग करून बाहेर पडावें आणि घटना मोडल्यानंतर अवश्य होईल तेव्हां पुनः सत्याग्रह-संग्रामास सज्ज असावें, अशीही पण गांधींची वृत्ति होती. सतत तसा प्रचार करणें हें त्यांना पसंत नसे. आपणहून विध्वंसक धोरण न स्वीकारतां आपण स्वतः शक्यतों विधायक लोकसेवा करीत राहावें आणि जेव्हां आपल्या लोकसेवेच्या आड परकीय सत्ता-धारी येतील, तेव्हां त्यांच्याशीं सत्यनिष्ठेनें व अहिंसावृत्तीनें सामना देण्यास तयार असावें. हीच वृत्ति सत्याग्रहाची द्योतक होय, असें त्यांचें मत होतें. किंबहुना तसा त्यांचा स्वभावच होता. आपणहून भांडण काढावयाचें नाहीं, आणि प्रतिपक्षानें आपणहून भांडण काढलेंच तर मागें हटावयाचें नाहीं अशी ही वृत्ति होय. एकंदर विधायक कार्यांत महात्मा गांधींनीं मद्यपानबंदीस अग्रस्थान दिलेलें होतें आणि तीन वर्षांच्या आंत मद्यपानबंदी सर्व प्रांतांत पूर्णपणें अमलांत आलीच पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. प्रांतिक सरकारच्या एकूण उत्पन्ना-पैकीं जवळजवळ निम्में उत्पन्न सरकारच्या दारू-भक्तेदारीपासून मिळत असल्यामुळें, जर मद्यपानबंदी तीन वर्षांत पूर्णपणें अमलांत आली तर सरकारचें निम्में उत्पन्न एकदम घटणार होतें. असें झालें असतां प्रांतिक राज्यकारभार चालविणें जवळजवळ अशक्य झालें असतें. याशिवाय सारा कमी करूं असेंही आश्वासन शेतकरीवर्गाला राष्ट्रसभेनें दिलेलें होतें. हें

आश्वासनसुद्धां अमलांत आलें असतें, तर त्यामुळें प्रांतिक सरकारच्या उत्पन्नांत मोठीच घट आली असती. मद्यपानबंदी ही प्रथमपासून राष्ट्रीय सभेच्या एकंदर कार्यक्रमांत अग्रस्थानीं ठेवण्यांत आलेली होती; शिवाय दारूच्या उत्पन्नांतून पैसे मिळवून सरकारनें जनतेच्या इतर सुखसोयी करतों म्हणणें हें गांधींना नैतिक दृष्टीनें केव्हांही पटणारे नव्हतें. यामुळें मद्यपानबंदी पूर्णपणें अमलांत आल्यानंतर राज्यकारभारांत पडणारी पैशाची तूट भरून काढण्यासाठीं मध्यसरकारकडे पैशाची मागणी करावी, आणि त्यासाठीं पैसा मिळाला नाहीं तर अखेरीस निरुपाय म्हणून कॉंग्रेसच्या मंत्र्यांनीं राजीनामे देऊन घटनात्मक पेंच-प्रसंग निर्माण करावा, असें गांधींना वाटत होतें. कोणतीही गोष्ट एकदां नैतिकदृष्ट्या आवश्यक अशी ठरली कीं ती अमलांत आणण्याच्या बाबत गांधींची वृत्ति अत्यंत जहाल किंबहुना क्रांतिकारक बनत असे. गांधी हे अनेक बाबतींत सौम्य व नेमस्त धोरण स्वीकारीत, परंतु एखादा तात्त्विक अथवा नैतिक मुद्दा उपस्थित झाला असतां ते एकदम क्रांति-कारक वृत्ति धारण करीत. यामुळें त्यांच्या अनुयायांत जे नेमस्त वृत्तीचे लोक होते त्यांना पुष्कळ वेळां अडचण निर्माण होई. मद्यपानबंदीचा कार्यक्रम इतक्या तीव्रतेनें आणि वेगानें अमलांत आणून तीन वर्षांच्या आंत मध्यसरकारशीं भांडण उपस्थित करून राज्यघटनेचा भंग करण्यास नेमस्त वृत्तीचे त्यांचे अनुयायी म्हणविणारे, अनेक प्रांतांचे पंतप्रधान तयार नव्हते. तथापि गांधींच्या आग्रहापुढें त्यांचें हें नेमस्त धोरण फार काळ टिकणें शक्य नव्हतें. यामुळें विधायक कार्यच घसास लागून राज्यघटना मोडण्याचा प्रसंग येणार होता.

याखेरीज आणखी तीन बाबी तरी अशा होत्या कीं, ज्यांच्यांतून असा घटनाभंगाचा प्रसंग केव्हांही निर्माण होणें अपरिहार्य दिसत होतें. अशा तीन बाबींपैकीं पहिली बाब संस्थानांतील प्रजापरिषदांच्या चळवळी ही होय. १९३५ च्या राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणें जें संयुक्त राज्य स्थापन होणार होतें त्यांत, संस्थानी प्रदेशांत दोन-तृतीयांश संस्थानी प्रजा असणारीं संस्थानें सामील होण्यास तयार झाल्यावांचून तें संयुक्त राज्य अमलांत यावयाचें नव्हतें. यासाठीं सर्व संस्थानांतून

प्रजेचा उठाव करून तेथील लोकमत संयुक्त राज्यांत सामील होण्यास अनुकूल करून घेणें, तेथील प्रजेला संस्थानी स्वराज्याचे हक्क प्राप्त करून देणें आणि संस्थानांतर्फे संयुक्त राज्याच्या कायदे करणाऱ्या सभांमध्यें येणारे प्रतिनिधि लोकनियुक्त असावेत अशी मागणी करणें, या गोष्टी राष्ट्रसभेनें हातीं घेणें अवश्य झालें होतें. या संस्थानांतील चळवळी प्रत्यक्ष राष्ट्रसभा करीत नसली तरी निरनिराळ्या संस्थानांतील प्रजापरिषदा महात्मा गांधीप्रभृति राष्ट्रीय सभेच्या नेत्यांच्याकडून मार्गदर्शनाची आणि प्रेरणेची अपेक्षा करीत असत. पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई, इत्यादि राष्ट्रसभेचे नेते या चळवळींना प्रोत्साहन देत आणि कधीं प्रत्यक्ष नेतृत्वही करीत. त्यांना दडपून टाकण्यासाठीं संस्थानांतील राजे दडपशाही करीत. असा झगडा अनेक संस्थानांत उपस्थित झाला होता. राष्ट्रीय सभेचीं मंत्रिमंडळें प्रांतिक सरकारावर अधिष्ठित झाल्यापासून अनेक संस्थानांतील प्रजांनीं सत्याग्रहाच्या चळवळी करून संस्थानी स्वराज्याचा प्रश्न धसास लावला होता. या चळवळींतून केव्हांही भांडण उपस्थित होऊन अखिल भारतीय पेंचप्रसंग निर्माण होणें शक्य होतें. राजकोट संस्थानांत तेथील राजानें प्रथमतः संस्थानी स्वराज्याचें अभिवचन देऊन, पुढें तें वचन फिरविलें. यामुळें स्वतः महात्मा गांधी तेथें गेले आणि तेथें जाऊन ता. ३ मार्च १९३९ रोजीं त्यांनीं एक प्रायोपवेशन सुरू केलें. त्याबरोबर त्यांतून एक अखिल भारतीय पेंचप्रसंग निर्माण होणार असा संभव दिसूं लागला. व्हाइसरॉयनें राजावर दडपण आणून आपलें वचन पाळण्यास भाग पाडण्याचें आश्वासन दिल्यामुळें ता. ७ मार्च रोजीं गांधीजींनीं हें उपोषण सोडलें, परंतु अखेरीस त्यांना असें दिसून आलें कीं, आपण पदरांत पाडून घेतलेला हा विजय व्हाइसरॉयच्या सत्तीनें मिळविला असल्यानें केवळ शुद्ध सत्याग्रही दृष्टीनें त्याचा फायदा घेणें नैतिकदृष्ट्या समर्थनीय नाहीं. म्हणून त्यांनीं अखेरीस तो प्रश्न तसाच अर्धवट सोडून दिला आणि विधायक कार्य करून आपलें नैतिक बल वाढवा आणि मगच आपलें स्वराज्य तुम्हांला मिळूं शकेल असें सांगून ते ह्या प्रश्नांतून माघार घेऊन बाहेर पडले.

या प्रश्नाला गांधींनीं उपस्थित केलेल्या नैतिक मुद्याव्यतिरिक्त एक व्यावहारिक असें महत्त्वाचें अंग होतें. तें म्हणजे राजकोटच्या राजानें जरी आपण दिलेलें वचन पार पाडलें असतें, तरी ती गोष्ट सक्तीनें होत असल्यामुळें राजकोटचे दिवाण आणि त्यांना पाठिंबा देणारे हिंदुस्थान सरकारचे पोलिटिकल एजंट हे दोघे मिळून संस्थानी प्रजेला खरें स्वराज्य मिळूं नये आणि त्याच्या मार्गांत अनेक खटखटी निर्माण व्हाव्यात असा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहींत हें गांधींना स्पष्ट दिसत होतें. असे प्रयत्न करतांना संस्थानांतील मुसलमान आणि हरिजन यांना आपल्या पक्षास वश करून तेथील प्रजापरिषदेला उखडून काढण्याचे प्रयत्न त्यांनीं सुरू केले होते. या सर्व परिस्थितींतून मार्ग काढण्यास गांधींनीं उपवास करून व्हाइसरॉयच्या दडपणानें मिळविलेला विजय व्यवहारतः फारसा फलप्रद होण्याचा संभव नव्हता. पण ह्या एका उदाहरणावरून दिसून येईल कीं, संस्थानी प्रजेच्या झगड्यांतून राष्ट्रीय सभेला अधिकारत्याग करणें भाग पडेल असे प्रसंग निर्माण होणें केव्हांही शक्य होतें.

या संस्थानी प्रश्नाप्रमाणेंच दुसरा प्रश्न म्हणजे संयुक्तराज्य स्थापन झाल्यास आपण त्याचा घटनाभंग करून निषेध करूं असें निःसंदिग्ध आश्वासन राष्ट्रसभेनें जनतेला दिलेलें होतें हा होय. कारण १९३५ च्या कायद्याप्रमाणें मिळलिल्या प्रांतिक स्वराज्यांत जरी मंत्रिमंडळांना बरीच सत्ता मिळालेली होती तरी त्या कायद्यानुसार स्थापन होणाऱ्या संयुक्त सरकारांतील मंत्र्यांना मुळींच सत्ता मिळणें शक्य नव्हतें. यामुळें तो कायदा मोडून टाकण्यावांचून आणि स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार घटना परिषद भरवून स्वतःची नवी राज्यघटना बनविल्यावांचून आम्ही स्वस्थ राहाणार नाहीं, असें धोरण राष्ट्रीय सभेनें स्वीकारलेलें होतें. अर्थात् प्रांतिक स्वराज्याचा प्रयोग दोन अडीच वर्षांहून अधिक काल चालू राहणें कठीण होतें. १९३५ च्या कायद्यांतील मध्यसरकारसंबंधींचा भाग सक्तीनें अमलांत आणण्याचा प्रयत्न ब्रिटिश सरकारनें सुरू केल्यास राष्ट्रसभेला अखिल भारतीय लढा पुकारण्यावांचून गत्यंतर नव्हतें.

याचप्रमाणें आणखी एका प्रश्नावर राष्ट्रीय सभेनें आपलें धोरण इतकें

क्रांतिकारक ठरविलेलें होतें कीं, त्यांतून ब्रिटिश सरकारशीं लढा उत्पन्न होणें किंवा ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानचा स्वयंनिर्णयाचा व स्वातंत्र्याचा हक्क मान्य करून त्याच्याशीं सन्मान्य समेट घडवून आणणें, हे दोनच मार्ग पुढें दिसत होते. ही बाब म्हणजे साम्राज्यशाही महायुद्धाशीं असहकार. १९२८ सालापासून राष्ट्रीय सभेनें असें वारंवार जाहीर केलेलें होतें कीं, यापुढें कोणत्याही साम्राज्यशाही महायुद्धांत आम्ही भाग घेणार नाहीं. अर्थात् हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य दिल्यानंतर त्या युद्धास साम्राज्यशाही युद्ध असें स्वरूप नसेल तर हिंदुस्थान ब्रिटिशांशीं दोस्ती करून युद्धांत सहभागी होऊं शकला असता, असा अर्थ या ठरावांतून निघूं शकतो. पण जोंपर्यंत हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त झालें नाहीं आणि त्यानें स्वतःच्या इच्छेनें महायुद्धांत भाग घेण्याचें ठरविलें नाहीं तोंपर्यंत ब्रिटिश सरकारनें महायुद्ध सुरू करून त्यांत हिंदुस्थानास लोटण्याचा प्रयत्न केल्यास हिंदुस्थानला पुनः असहकार-युद्ध पुकारण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. अखेरीस १९३९ सालीं सप्टेंबर महिन्यांत ह्याच मुद्यावर राष्ट्रसभा आणि ब्रिटिश सरकार यांच्यांत बेबनाव झाला आणि राष्ट्रसभेनें प्रस्थापित राज्यघटना मोडून टाकून प्रथम असहकार, नंतर वैयक्तिक सत्याग्रह आणि त्यानंतर सार्वत्रिक सत्याग्रह अशा चळवळी केल्या. १९४२ सालीं जें प्रचंड आंदोलन हिंदुस्थानांत झालें त्याची पूर्वपीठिका त्याच्यापूर्वी बारा वर्षांपासून ही अशी तयार होत आलेली होती. तात्पर्य, १९३७ सालीं जरी राष्ट्रसभेनें प्रांतिक स्वराज्य मनःपूर्वक चालवून दाखविण्याचा आणि एकदां स्वीकारलेलें सहकार्याचें धोरण विधायक वृत्तीनें अमलांत आणण्याचा निर्धार केलेला होता आणि गांधी त्या वेळीं पेंचप्रसंगाची, घटनाभंगाची, प्रत्यक्ष प्रतिकाराच्या लढ्याची भाषा, आपण बोलत नसत तरी त्यांची क्रांतिकारक प्रकृति ज्यांना माहीत होती त्यांना वरून सौम्य व शांत दिसणारा हा ज्वालामुखी पुनः केव्हां तरी पेट घेणार आणि त्यांतून प्रचंड क्रांतिकारक आंदोलनाचा स्फोट होणार ही गोष्ट कळण्यास फारशी अडचण पडण्याचें कारण नव्हतें. पण गांधींचे अनुयायी

म्हणविणाऱ्यांतही त्यांच्या या क्रांतिकारक प्रकृतीचें बरोबर आकलन झालेले लोक फारसे नव्हते.

गांधींचे या वेळचे शब्द वरकरणीं पाहणाऱ्यांना तरी अत्यंत सौम्य आणि मवाळ असें भासत. प्रांतिक मंत्रिमंडळांवर आरूढ झालेले बहुतेक मंत्री नेमस्त प्रकृतीचेच होते आणि कायदेमंडळांत काम करणारे राष्ट्रीय सभेचे बरेच प्रतिनिधि संधिसाधु धनिक वर्गाचे घटक होते. यामुळें प्रांतिक स्वराज्यावर आरूढ झालेली राष्ट्रसभा पुनः मंत्रिपदाचा त्याग करून सत्याग्रहाचा,प्रत्यक्ष तुरुंगाचा किंवा गोळीबार सहन करण्याचा क्रांतिकारक मार्ग अवलंबील असें तिच्या कायदेमंडळांतील अनुयायांना व बऱ्याच मंत्र्यांनाही वाटत नसे. राष्ट्रीय सभेंत जे समाजवादी होते ते प्रत्यक्ष प्रतिकारवादी होते. राष्ट्रीय सभेला पुनः क्रांतिकारक मार्गावर यावें लागेल, असें गृहीत धरून ते जनतेमध्यें ही क्रांतिकारक वृत्ति फैलावण्यासाठीं प्रक्षोभक भाषणें आणि चळवळी करीत. मंत्रिमंडळांना या चळवळींचा तिटकारा होता आणि त्यांच्या कामांत त्यामुळें निष्कारण विघ्नें उपस्थित होतात अशी त्यांची तक्रारही असे. केवळ गांधींच्या आग्रहामुळें त्या वेळीं समाजवादी पक्षाला राष्ट्रीय सभेंतून काढून टाकण्याचें धोरण प्रभावी ठरलें नाहीं. महात्मा गांधी आणि पंडित नेहरू हे दोन्ही पुढारी असें करण्याच्या विरुद्ध होते. पण अधिकारवादी पक्षाला खरी अडचण महात्मा गांधींचीच होती. यामुळें प्रतिकारवादी पक्ष राष्ट्रसभेंत टिकून राहिला आणि पुढें जेव्हां प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ सुरू झाली तेव्हां त्या पक्षानें आपल्या बुद्धीप्रमाणें त्यांत महत्त्वाचें कार्य केलें. याचा अर्थ समाजवादी पक्षानें १९४२ च्या आंदोलनांत जें धोरण स्वीकारलें किंवा जें कार्य केलें तें गांधींच्या तत्त्वानुसार केलें किंवा त्याला गांधींचा पूर्ण पाठिंबा होता असा होऊं शकत नाहीं.परंतु अधिकारवाद्यांप्रमाणें प्रतिकारवाद्यांची राष्ट्रसभेला आवश्यकता आहे आणि ती क्रांतिशक्ति राष्ट्रसभेंतून बाहेर पडणें इष्ट नाहीं ही जाणीव गांधींनीं केव्हांही बुजूं दिली नाहीं. राष्ट्रीय सभा ही सत्याग्रही बनावी आणि शुद्ध अहिंसेचें तत्त्व तिनें आचरावें अशी त्यांची मनीषा होती, तरीही राष्ट्रीय सभा त्यांच्या कल्पनेप्रमाणें शुद्ध सत्याग्रही केव्हांच बनली नाहीं.

१९३५ नंतर समाजवादी पक्ष हा तिच्यांतील क्रांतिवृत्तीचा द्योतक आणि अधिकारवादी पक्ष हा तिच्यांतील सनदशीर वृत्तीचा द्योतक असें स्थूल मानानें म्हणतां येईल. तथापि हे दोन्ही पक्ष राष्ट्रसभेंत असले पाहिजेत अथवा या दोनही वृत्ति सामावून घेणारी राष्ट्रीय सभा ही संस्था असावी अशी गांधींची वृत्ति होती. त्यांना भावी लढा अभिप्रेत नसला तरी दिसत होता. शिवाय सत्याग्रही मनुष्यानें अथवा संस्थेनें कोणत्याही क्षणीं क्रांतिकारक वृत्ति स्वीकारण्यास तयार असलेंच पाहिजे अशीही त्यांची वृत्ति होती. यामुळें गांधीजी सनदशीर वृत्तीच्या अधिकारवाद्यांना आणि क्रांतिकारक वृत्तीच्या प्रतिकारवाद्यांना राष्ट्रीय सभेंत सन्मानानें राहातां यावें असेंच धोरण ठेवीत. राष्ट्रीय सभा जरी गांधींच्या कल्पनेप्रमाणें शुद्ध सत्याग्रही बनली नाहीं तरी ती स्वातंत्र्य मिळेपर्यंत निःशस्त्र क्रांतिवादी टिकूं शकली ह्याचें बहुतेक श्रेय महात्मा गांधींच्या या धोरणासच द्यावें लागेल. गांधींचें हें व्यापक धोरण आणि त्यांची विशिष्ट वृत्ति राष्ट्रसभेचें मार्गदर्शन करण्यास नसती तर १९३६ सालीं अधिकारारूढ बनलेली राष्ट्रसभा १९३९ सालीं अधिकारत्याग करून असहकाराच्या, सत्याग्रहाच्या व प्रत्यक्ष प्रतिकाराच्या क्रांतिकारक मार्गावर पुनः येऊं शकली असती असें वाटत नाहीं. १९३७ ते ३९ च्या काळांत गांधींच्या अभावीं प्रतिकारवादी क्रांतिकारकांना राष्ट्रसभेचा त्याग करण्यावांचून गत्यंतर नव्हतें, असें झालें असतें तर त्या बाहेर पडलेल्या क्रांतिशक्तीला दडपून टाकण्यांत राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें गुंतून गेलीं असतीं आणि स्वातंत्र्याचा लढा पुकारण्याचें सामर्थ्य त्या संस्थेंत टिकलें नसतें. तिच्यांतून बाहेर पडलेल्या तरुण क्रांतिकारकांना हें क्रांतिकार्य यशस्वी करतां आलें असतें असाही संभव नव्हता. या दृष्टीनें विचार केल्यास गांधींचें सर्वसंग्राहक, व्यापक धोरण आणि देशाच्या बदलत्या परिस्थितीनुसार केव्हां नेमस्त व मवाळ, तर केव्हां जहाल आणि क्रान्तिकारक असें धोरण स्वीकारण्याची त्यांची विशिष्ट प्रकृति यांच्यामुळेंच राष्ट्रसभा स्वातंत्र्य मिळेपर्यंत निःशस्त्र क्रान्तिकारक राष्ट्रीय संस्था हें आपलें स्वरूप टिकवूं शकली असें सर्वांस कबूल करावें लागेल.

मूलोद्योगी शिक्षणयोजना

१९३७ सालापासून १९३९ मध्यें महायुद्ध सुरू होईपर्यंत सुमारें अडीच वर्षें राष्ट्रीय सभेनें प्रांतिक स्वराज्य चालवून दाखविण्याचा विधायक प्रयोग केला. या प्रयोगांत ज्याला वर्धा-शिक्षणयोजना असें म्हणतात किंवा मूलोद्योगी शिक्षणयोजना असें जिला नांव प्राप्त झालें आहे त्या शिक्षणयोजनेला बरेंच महत्त्व आहे.

या शिक्षणयोजनेच्या बुडाशीं महात्मा गांधींची मानवसंस्कृतीकडे पाहण्याची एक सत्याग्रही दृष्टि आहे. भारतीय संस्कृति ही अध्यात्म-प्रधान, ग्रामप्रधान आणि अनाक्रमक अशी राहावी असें त्यांचें मत असल्यानें जीवनासंबंधीं त्यांचा एक विशिष्ट दृष्टिकोन बनलेला होता. आपल्या प्राचीन संस्कृतीचा आधार ज्या शेतीप्रधान ग्रामराज्यांवर होता, त्या प्रकारचीं ग्रामराज्यें स्थापन होऊन त्यांचें आर्थिक जीवन स्वावलंबी, स्वयंपूर्ण आणि सहकारी व सेवामय बनल्यावांचून आपली राष्ट्रीय संस्कृति अहिंसामय, शांतिप्रधान, आरोग्यदायक, सत्यनिष्ठ, आत्मसंयमी होणार नाहीं, असें त्यांना वाटे. या सांस्कृतिक जीवनाचा पाया राष्ट्रीय शिक्षणक्रमांत प्राथमिक अवस्थेतच घातला गेला पाहिजे, या दृष्टीनें गांधींनीं मूलोद्योगी शिक्षणयोजनेची कल्पना १९३७ सालीं ऑक्टोबर महिन्यांत एक अ. भा. शिक्षण परिषद भरवून तिच्यापुढें ठेविली. म. गांधींनीं अगदीं नव्या अशा कांहीं कल्पना जगापुढें व राष्ट्रापुढें ठेविल्या, त्यांत या मूलोद्योगी शिक्षणयोजनेच्या कल्पनेला फार महत्त्वाचें स्थान देण्यांत येत असतें.

या योजनेचा मुख्य आधार हस्तव्यवसायद्वारां मानवाला सर्वांगीण विकासाचें शिक्षण देणें हा आहे. ही प्राथमिक शिक्षणाची योजना असून तिचा अभ्यासक्रम सात वर्षांचा आहे. सात वर्षांपासून चौदा वर्षांपर्यंत एका हस्तव्यवसायाच्या आधारें मुलांना शारीरिक, बौद्धिक आणि आत्मिक शिक्षण देऊन समाजाचे उद्योगी, सहकारी, सेवामय, स्वावलंबी, सुसंस्कृत घटक बनवावयाचें, सामाजिक व आर्थिक समतेवर उभारलेल्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रिकाची नीति त्याला शिकवावयाची,

सत्याचें ज्ञान पुस्तकांपेक्षां अनुभवानें, निरीक्षणानें, प्रयोगानें आणि निष्ठेनें संपादन करतां येतें व करावें लागतें हें त्यांच्या मनावर बिंबवावयाचें आणि मानवाच्या संस्कृतीचा आधार सत्यनिष्ठा, अहिंसावृत्ति आणि तपश्चर्या यांवर घालण्याचा प्रयत्न करणारे राष्ट्रिक निर्माण करून मानवसंस्कृतीचा विकास करण्यांत अघाडीवर राहणारें राष्ट्र निर्माण करण्याचा पाया घालावयाचा, असे अनेक उच्च व उदात्त हेतु या शिक्षणयोजनेच्या बुडाशीं आहेत.

कोणत्या तरी उत्पादक व्यवसायाच्या द्वारां मनाची व बुद्धीची वाढ करण्याचें शिक्षण देणें हें शिक्षणशास्त्रज्ञांना अलीकडे संमत होणारें असेंच एक तत्त्व आहे. बुद्धि ही कर्मानुसारी असते आणि ज्ञान हें व्यवहारासाठीं व आचारासाठीं आहे हें तत्त्व शिक्षणक्रमांत प्रथमपासून अखेरपर्यंत अवलंबिण्यांत येणें फार अगत्याचें आहे. तसेंच सामाजिकदृष्ट्या विचार केल्यास अनेक दर्जांच्या व वर्गांच्या बालकांना एकच प्रकारच्या व्यवसायांतून सर्वांगीण शिक्षण मिळत गेलें तर, व तो व्यवसाय हस्तव्यवसाय व शरीरश्रम अशा प्रकारचा असेल तर, आजच्या समाजांत बुद्धिजीवी आणि शरीरश्रमजीवी असा जो एक भेद निर्माण होऊन विषमता निर्माण झालेली आहे ती नष्ट होण्यास ह्या शिक्षणपद्धतीचा निश्चित उपयोग होऊं शकेल. तसेंच आपल्या सर्व ज्ञानाचा उपयोग समाजाच्या जीवनास आवश्यक असणाऱ्या उपयुक्त पदार्थांच्या निर्मितीसाठीं होत आहे ही भावना विद्यार्थ्यांच्या मनावर ठसली जाऊन त्यांची समाजहितबुद्धि आणि समदृष्टि यांची वाढ होऊं शकेल. आर्थिकदृष्ट्या अशा उपयुक्त व्यवसायाचा आधार घेतल्यानें शिक्षणसंस्थेतील शिक्षणाच्या वेतनापैकीं बराच मोठा भाग तरी या व्यवसायांतून निर्माण होणाऱ्या मालाच्या मोबदल्यांत भागावा अशीही कल्पना या योजनेच्या बुडाशीं आहे. शिक्षण हें शक्यतों स्वावलंबी असावें आणि लहानपणापासून विद्यार्थ्यांच्या मनावर स्वावलंबनाचें तत्त्व बिंबत जावें आणि शरीरश्रम करण्यांत त्यांना अभिमान वाटूं लागावा अशी ही कल्पना आहे. आपण केवळ समाजांतील धनाचा उपभोग घेणारे परोपजीवी घटक नसून आपल्या श्रमानें समाजाच्या संपत्तींत थोडी-

फार तरी भर घालण्याचा मान आपणांस मिळूं शकतो असें लहानपणापासून मुलाच्या मनावर बिंबलें गेलें पाहिजे. स्वतः श्रम न करतां केवळ दुसऱ्यांच्या श्रमानें निर्माण होणाऱ्या वस्तूंचा उपभोग घेणें हें लाजीरवाणें कृत्य असून आपण आपणांस आवश्यक असणाऱ्या वस्तु संपादन करण्याइतक्या मोलाची सेवा केली पाहिजे, याचीही जाणीव त्यांना या पद्धतीच्या शिक्षणानें होऊं शकेल. अशा अनेक महत्त्वाच्या व मूलगामी सांस्कृतिक कल्पना या मूलोद्योगी शिक्षणयोजनेच्या बुडाशीं आहेत.

राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें ज्या आठ प्रांतांत होतीं, त्या आठही प्रांतात शिक्षणक्रमाची ही योजना मान्य करण्यांत येऊन सरकारमार्फत तिचे प्रयोग प्रत्येक प्रांतांत सुरू करण्यांत आले. पुढें १९३९ सालीं महायुद्ध सुरू झाल्यानंतर राष्ट्रसभेनें अधिकारत्याग केला, तरीही हे प्रयोग थोड्याफार अंशानें चालू राहिले होते. आतां ही शिक्षणयोजना जगांतील निरनिराळ्या शिक्षणपद्धतींमध्यें मानाचें स्थान पावलेली शिक्षणपद्धति अशी गणली जाते. अद्यापि या शिक्षणपद्धतीला पूर्ण मूर्तस्वरूप आलेलें नाहीं; आणि अद्यापि ही योजना सर्व राष्ट्रांच्या शिक्षणक्रमाचा आधार बनलेली नाहीं. हिंदुस्थानची राष्ट्रीय शिक्षणपद्धति अद्यापि पूर्णपणें निश्चित व्हावयाची आहे. तो निश्चित करतांना या योजनेपासून विचार करण्यास आरंभ करून पुढें तिच्यांत कमीअधिक फेरफार अनुभवानुसार करण्यांत येतील.

सामाजिक व्यवसायाचें उत्पादनतंत्र एकसारखें बदलत असावें, या उत्पादनतंत्रांत यांत्रिक उत्पादनास योग्य तो अवकाश मिळावा आणि यंत्रकला व भौतिक विद्या यांच्या वाढीचें महत्त्व सामाजिक उन्नतीच्या दृष्टीनें विद्यार्थ्यांना प्रथमपासून कळावें या गोष्टींना आधुनिक शिक्षणपद्धतींत जितकें महत्त्वाचें स्थान देणें अवश्य आहे, तितकें ह्या पद्धतींत दिलें गेलें आहे किंवा नाहीं, हा एक या बाबतींत महत्त्वाचा व विवाद्य असा प्रश्न आहे. एकंदर सामाजिक जविनांत यंत्रकला आणि भौतिक शक्तींच्या साहाय्यानें चालणाऱ्या उत्पादनपद्धति यांचें कोणतें स्थान आहे यासंबंधींच्या विचारांवर वरील प्रश्नाचें उत्तर

अवलंबून राहील. यंत्रकला आणि भौतिक विद्या यांच्या वाढीकडे केवळ साशंक व निषेधाच्या दृष्टीनें न पाहतां सामाजिक जीवनांत सर्वांगीण विकास करण्यास आवश्यक असणाऱ्या संपत्तीच्या वाढीला सहाय्य करणाऱ्या अशा स्वागतार्ह गोष्टी या आहेत ही दृष्टि आधुनिक भारतीय संस्कृतीनें स्वीकारली पाहिजे. हस्तव्यवसायाप्रमाणें यंत्रकलेच्या उपयोगानेंही मानवी बुद्धीचा विकास होतो आणि मानवी कर्तृत्व आणि कर्तव्य यांसंबंधींच्या भावना वाढीस लावतां येतात. समाजाच्या धनोत्पादनाच्या कार्यांत यंत्रकला आणि भौतिक विद्या यांचा उपयोग करून घेऊन सामाजिक समता आणि व्यक्तिस्वातंत्र्य या दोहोंना बाध न येतां त्यांना पोषक व संवर्धक अशी समाजाची उत्पादनपद्धति कशी असावी यांचें संशोधन करून भारतास आपल्या संस्कृतीचा आर्थिक पाया घालावा लागणार आहे. यासंबंधींचे विचार जसे निश्चित होतील त्यावर आपल्या राष्ट्रीय शिक्षणाची पद्धतिही अवलंबून राहील. तथापि मूलोद्योगी शिक्षणपद्धतीनें शिक्षणशास्त्राच्या अभ्यासकांस एक नवीन दिशा दाखवून दिली आहे आणि सत्याग्रही दृष्टिकोनांतून शिक्षणसंस्थेचा विचार कसा करावा हें दाखवून दिलें आहे. ह्या दृष्टीनें महात्मा गांधींच्या या कार्यास विशेष महत्त्व आहे. एकंदर भारतीय संस्कृतींत सत्याग्रही तत्त्वज्ञानाचें जें स्थान राहील त्यावरच या शिक्षणपद्धतीचेंही भवितव्य अवलंबून राहणार आहे.

महायुद्ध आणि राष्ट्रसभेच्या अहिंसेच्या मर्यादा

१९३८ सालापासून युरोपांत महायुद्धाचीं वादळें उठूं लागलीं. आज ना उद्यां महायुद्ध पेटणार अशीं निश्चित चिन्हें दिसूं लागलीं. युरोपांत १९३८ च्या मध्यभागीं आतां हिटलरशीं युद्ध सुरू होणार अशी खात्री वाटूं लागली, पण 'म्युनिच' करारानें ही आपत्ति एक वर्ष पुढें लोटली गेली. 'म्युनिच' करार होण्याच्यापूर्वी आतां महायुद्ध पेटणार अशी बातमी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीकडे आली. पंडितजी या वेळीं युरोपांत होते आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय हक्क मिळाल्यावांचून हिंदुस्थान महायुद्धांत लोकशाही

राष्ट्राशीं सहकार्य करणार नाहीं अशा तऱ्हेचें धोरण राष्ट्रसभेनें जाहीर करावें अशी त्यांनीं राष्ट्रसभेला सूचना केली. या वेळीं राष्ट्रसभेची कार्यकारिणी आणि महात्मा गांधी यांच्यामध्यें युद्धाच्या बाबतींत राष्ट्रसभेनें कोणतें धोरण स्वीकारावें, याबद्दल तीव्र मतभेद निर्माण झाला. आतांपर्यंत राष्ट्रसभेनें अनत्याचारी असहकार हें धोरण केवळ स्वराज्य-प्राप्तीसाठीं अंगीकारलें होतें; पण स्वराज्य प्राप्त झाल्यानंतर आपण राज्य-संस्थेवर आरूढ होऊन देशरक्षणासाठीं सशस्त्र युद्ध करणार नाहीं किंवा करूं नये, ही भूमिका राष्ट्रसभेनें केव्हांच स्वीकारली नव्हती. गांधींना आतां असें वाटूं लागलें होतें कीं, राष्ट्रसभेनें स्वराज्य मिळालें तरी आपलें सत्याग्रही धोरण सोडूं नये आणि युद्ध करण्यांत भाग घेऊं नये. राष्ट्राची अहिंसक प्रतिकारशक्ति व सत्याग्रह यांनीं राष्ट्ररक्षण करणें कसें शक्य आहे, तें दाखवून देण्याचेंच कर्तव्य राष्ट्रसभेनें करीत राहावें. १९३८ सालीं महायुद्ध होण्याचें म्युनिच करारानें टळल्यामुळें त्या वेळीं हा मतभेद तसाच अनिर्णीत राहिला. पुढें १९३९ सालीं सप्टेंबर महिन्यांत प्रत्यक्ष महायुद्ध सुरू झाल्यामुळें राष्ट्रसभेला ह्या मतभेदा-संबंधीं आपली भूमिका निश्चित करणें भाग पडलें. अर्थात् हिंदुस्थानास स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय हे हक्क मिळाले नाहींत, तोंपर्यंत राष्ट्रसभा युद्ध-सहकार्य करूं शकत नाहीं, ही भूमिका राष्ट्रसभेच्या कार्यकारिणींत बहुमान्य झालेली होती. परंतु तिच्यापुढें जाऊन स्वातंत्र्य मिळालें तरी राष्ट्रसभा युद्धसहकार्य करणार नाहीं अशी भूमिका घेण्यास तिची कार्य-कारिणी तयार नव्हती. या बाबतींत महात्मा गांधी आणि पंडित नेहरू यांचा मतभेद होता. आणि बरेच सभासद एवढ्यापुरते पंडित नेहरूंच्या बाजूसच होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. याशिवाय असे कांहीं थोडे सभासद असूं शकतील कीं, जे युद्धकालांत स्वातंत्र्याचा विशेष आग्रह न धरतां भावी आश्वासनावर विसंबून युद्धसहकार्य करावें असें म्हणतील. पण राष्ट्रसभेला हें केव्हांही पटणें शक्य नव्हतें. अखेरीस पंडित नेहरू यांची भूमिका राष्ट्रसभेनें स्वीकारली; तथापि महात्मा गांधींची भूमिका या बाबतींत भिन्न होती. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर सर्व राष्ट्र अहिंसेची भूमिका घेऊं शकत नाहीं हें त्यांना

मान्य होतें, आणि राष्ट्रांतील इतर पक्ष युद्धसहकार्य करतील तर त्याला त्यांचा विरोध नव्हता. पण राष्ट्रीय सभेनें आतांपर्यंत जी सत्याग्रही भूमिका स्वीकारलेली आहे, तिचा या वेळीं त्याग न करतां त्या भूमिकेला चिकटून राहून अहिंसेच्या तत्त्वावर आम्ही युद्धसहकार्य देऊं शकत नाहीं, अशी भूमिका राष्ट्रसभेनें स्वीकारावी असा आग्रह त्यांनीं धरला होता, पण हा आग्रह राष्ट्रसभेनें मान्य केला नाहीं.

अहिंसा आणि युद्धाशीं असहकार या बाबतींत महात्मा गांधींची भूमिका पहिल्या महायुद्धापेक्षां या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं भिन्न झाली होती. ही भिन्न भूमिका त्यांनीं कां धारण केली, आणि पहिल्या महायुद्धाच्या वेळीं जे महात्मा गांधी लोकांना सैनिकभरती करण्याचा उपदेश करीत हिंडत, तेच महात्मा गांधी आतां राष्ट्रसभेनें स्वातंत्र्य मिळालें तरी देशाच्या रक्षणार्थ केवळ सत्याग्रहानें लढण्याचें धोरणच स्वीकारावें असें कां म्हणतात, याचा उलगडा त्या वेळीं पुष्कळ लोकांना होऊं शकला नाहीं. या त्यांच्या परस्परविसंगत दिसणाऱ्या वर्तनाचा कांहीं खुलासा आपणांस करतां येतो किंवा नाहीं तें पाहूं.

महात्मा गांधी हे अहिंसावादी होते आणि युद्धाशीं सहकार्य हें अहिंसेशीं विसंगत आहे याबद्दल त्यांना शंका नव्हती. असें असतांही त्यांनीं पहिल्या महायुद्धाच्या वेळीं ब्रिटिश साम्राज्याच्या युद्धाशीं सहकार्य करावें असा उपदेश जनतेला कां केला, तें आपण प्रथम समजून घेतलें पाहिजे. यासंबंधीं त्यांनीं आपली भूमिका अनेक वेळा विशद केलेली आहे. त्या सर्वांचें सार म्हणून असें सांगतां येईल कीं, आपण ज्या राज्याच्या संरक्षणाखालीं राहतों, त्या राज्याशीं युद्धकालांत असहकार पुकारणें आणि तसा उपदेश जनतेला करणें म्हणजे तें राज्य परकीय सत्तेनें मोडून पाडण्यास सहाय्य करण्यासारखेंच आहे. ज्या वेळीं त्या राज्यांतील जनतेला आपलें स्वतःचें अहिंसक राज्य निर्माण करून अहिंसेच्या साधनानें त्याचें रक्षण करण्याची पात्रता आलेली नसेल, त्या वेळीं त्या जनतेला युद्धाशीं असहकार करण्याचा उपदेश करणें

धोक्याचें आहे. इतकेंच नाहीं तर तसें करणें हें परिणामदृष्ट्या लोकांतील अहिंसावृत्ति वाढविण्यासही सहाय्य करणारें असूं शकणार नाहीं. जर परकीय सत्तेच्या आक्रमक माऱ्यानें प्रस्थापित राज्यसत्ता उलथून पडली आणि त्या जनतेला सत्याग्रहाच्या अहिंसक मार्गानें आपलें संरक्षण कसें करावें हें समजूं शकलें नाहीं, तर ती जनता भेकडपणानें वाटेल त्या हिंसक राज्यसत्तेशीं अथवा आक्रमक सत्तेशीं सहाय्य करूं लागेल. ही त्या जनतेंतील अहिंसावृत्तीची वाढ असें आपणांस म्हणतां येईल काय? अर्थातच म्हणतां येणार नाहीं. तेव्हां युद्धाशीं असहकार करण्याचा उपदेश करण्यापूर्वी तो करण्यास कांहीं एक विशिष्ट अधिकार प्राप्त झाला असला पाहिजे आणि त्या अधिकाराच्या जोरावर जनतेला अहिंसेच्या मार्गानें समाजसंरक्षण करण्याचा मार्ग आपण दाखवून देऊं शकूं आणि ती जनता आपल्या मागून येऊं शकेल, अशा तऱ्हेचा आत्मविश्वास त्या उपदेशकास बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाटत असला पाहिजे. असा अधिकार आणि अशी परिस्थिति नसतांना एखाद्या राज्यसत्तेखालीं नांदणाऱ्या लोकांनीं तिच्यावर चालून आलेल्या युद्धाच्या वेळीं अथवा तिनें सुरू केलेल्या युद्धाच्या वेळीं अहिंसेच्या नांवानें असहकार करणें हें अविवेकी आहे, अशी त्यांची भूमिका दिसून येते. म्हणूनच पहिल्या महायुद्धाच्या वेळीं आपणांस असा उपदेश करण्याचा अधिकार प्राप्त झाला नव्हता असें ते आत्मचरित्रांत लिहितात. शिवाय ब्रिटिश साम्राज्यासंबंधीं त्यांची त्या वेळची वृत्ति ही राजनिष्ठेची होती. ब्रिटिश साम्राज्य ही संस्था एकंदरीनें हिंदुस्थानच्या हितास पोषक अशी असून तिच्याशीं राजनिष्ठ राहून हिंदी जनतेला समानतेचें व स्वातंत्र्याचें स्थान प्राप्त करून घेतां येईल, अशी निष्ठा त्या वेळीं त्यांच्या अंतःकरणांत होती. इतर जे पुढारी त्या वेळीं हिंदुस्थानचें राजकारण करीत होते त्या सर्वांनीं व्यवहारदृष्टीनें या साम्राज्यनिष्ठेच्या आधारावरच आपलें राजकीय धोरण आंखलेलें होतें. गांधी हे त्या वेळीं हिंदुस्थानांत अगदीं नव्यानें आलेले होते. त्यांचें अहिंसक तत्त्वज्ञान मोठमोठ्या विद्वानांसही यथार्थ आकलन झालेलें नव्हतें. जनतेला त्यांचा परिचय नव्हता. अशा परिस्थितींत युद्धाशीं असहकार हें धोरण

स्वीकारून त्यांना काम करणें अशक्य होतें आणि एवादें तसें भाषण करून ते तुरुंगांत जाऊन बसले असते, तर त्यांना अभिप्रेत असणाऱ्या अहिंसेचा प्रचारही होऊं शकला नसता.

या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं याहून अगदीं भिन्न परिस्थिति होती. ती कशी हें प्रथमतः त्यांच्याच शब्दांत समजून घेऊं. त्यांनीं एका शंकितास ता. ४ मे १९४० रोजीं जें एक उत्तर दिलें आहे, तें वाचलें असता आपणांस त्यांच्या या दोन वेळच्या वृत्तिभेदांतील अंतर समजूं शकेल. ते या तारखेच्या 'हरिजनां' तील अग्रलेखांत लिहितात, "मी ज्या वेळीं खेडा जिल्ह्यांत सैनिकभरती करण्यासाठीं हिंडत होतों, त्या वेळच्या माझ्या वृत्तींत आणि माझ्या आजच्या वृत्तींत जें अंतर पडलेलें आहे, तें माझ्या मित्राच्या लक्षांत आलेलें नाहीं. गेल्या महायुद्धाच्या वेळीं नैतिक प्रश्न कोणीं उपस्थितच केला नव्हता. राष्ट्रसभनें अहिंसेची प्रतिज्ञा केलेली नव्हती. आज तिचें जें प्रभुत्व हिंदी जनतेवर दिसून येत आहे तें नैतिक प्रभुत्व तिला त्या वेळीं मिळालेलें नव्हतें. मी त्या वेळीं जें करीत होतों तें केवळ एक व्यक्ति या नात्यानेंच करीत होतों. मी युद्धपरिषदेस हजर होतों आणि तेथें केलेल्या भाषणास अनुसरून माझी प्रकृति धड नसतांनाहि मीं सैनिकभरतीची मोहीम सुरू केली होती. मी लोकांना सांगत असें कीं, तुम्हांस जर हत्यारें हवीं असतील, तर तुम्हीं लष्करी नोकरी करणें हा एक त्याचा निश्चित मार्ग आहे. पण जर तुम्ही माझ्याप्रमाणें अहिंसक असाल तर हा उपदेश मी तुम्हांस करणार नाहीं. माझ्या कल्पनेप्रमाणें माझ्या श्रोत्यांत कोणीही अहिंसावादी नव्हते. ब्रिटनसंबंधीं त्यांच्या मनांत जी विरोधी भावना होती त्यामुळेंच ते सैनिक होण्यास नाखुष असत. हळूहळू ही भावना बदलत जाऊन सत्ता झुगारून देण्याचा विवेकी निर्धार त्यांच्यामध्यें निर्माण होऊं लागला. आज त्या वेळेपेक्षां सर्व परिस्थिति बदललेली आहे. गेल्या महायुद्धांत ब्रिटनला एकमुखी पाठिंबा मिळाला असतांही ब्रिटिशांनीं केलेल्या रौलट कायद्यावरून आणि त्यासारख्या इतर गोष्टींवरून त्यांची वृत्ति दिसून आली. ब्रिटिशांच्या या संकटाला तोंड

देण्यासाठीं राष्ट्रसभेनें अनत्याचारी असहकार हा मार्ग स्वीकारला. जालियनवाला बाग, सायमन कमिशन, गोलमेज परिषदा, कांहीं थोड्या लोकांच्या अत्याचारासाठीं बंगालचें पौरुष हिरावून घेणें ह्या सर्व गोष्टी आज आम्हांस स्मरत आहेत. काँग्रेसनें अनत्याचार स्वीकारल्यामुळें आज सैनिकभरतीसाठीं लोकांकडे जाण्याची मला आवश्यकता उरलेली नाहीं. काँग्रेसमार्फत आज मी अशा थोड्या सैनिकांपेक्षांही अनंत पटींनीं श्रेष्ठ अशी वस्तु ब्रिटनला देऊं शकेन पण ब्रिटनला त्याची आवश्यकता आहे असें दिसत नाहीं. माझी इच्छा असूनही मी या बाबतींत असहाय आहें."

या उताऱ्यांतील विचार थोडे अधिक समजून घेतले पाहिजेत. ब्रिटनला सैनिकभरतीपेक्षांही अनंत पट श्रेष्ठ अशी गोष्ट मी देऊं शकेन म्हणजे काय? हिंदी जनतेचा नैतिक पाठिंबा ही ती वस्तु होय. कोणत्याही भौतिक सहाय्याहून या नैतिक पाठिंब्याची किंमत अधिक आहे असें महात्मा गांधी मानीत. आज ब्रिटिश साम्राज्याला तसा नैतिक पाठिंबा हिंदी जनतेनें द्यावा किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित झाला होता. प्रथमतः गांधीजींनीं या बाबतींत असें धोरण प्रकट केलें होतें कीं, ब्रिटिश व फ्रेंच राष्ट्रें आणि हिटलर यांच्यांत जें युद्ध सुरू आहे त्यांत युद्ध करण्यास हिटलर हाच कारणीभूत आहे म्हणून आपण या युद्धांत ब्रिटिश-फ्रेंच राष्ट्रांशीं नैतिक सहानुभूति ठेवूं शकतों. यासंबंधीं 'हरिजनां'त केलेल्या खुलाशांत ते म्हणतात कीं, हिटलरनें डॅन्झिग बंदर आणि कॉरिडॉर ह्यासंबंधीं जी मागणी केली आहे ती योग्य आहे किंवा नाहीं याचा विचार मी सध्यां करीत नाहीं. माझें म्हणणें एवढेंच आहे कीं, ही मागणी योग्य आहे किंवा नाहीं ह्याचा निकाल तटस्थ पंचांमार्फत लावून घेण्यास हिटलरनें तयारी दाखवावयास हवी होती. हा शांततेचा मार्ग न स्वीकारतां हिटलरनें युद्धाचा मार्ग स्वीकारून आपली मागणी मिळविण्याचा प्रयत्न चालू केला आहे म्हणून तो या युद्धास प्रवृत्त करणारा ठरतो. यामुळें आपली सहानुभूति त्याच्याकडे नसून फ्रेंच-ब्रिटिश ह्या लोकशाही राष्ट्रांकडे आहे. ही वैयक्तिक सहानुभूतीची गोष्ट झाली.

राष्ट्रसभेनें ब्रिटिश साम्राज्य सरकारला युद्धाच्या कामीं सहाय्य करावें किंवा नाहीं हा प्रश्न निराळा होता. राष्ट्रसभेची भूमिका तिनें एक जाहीरनामा काढून विशद केली होती. हा जाहीरनामा पंडित नेहरू यांच्या धोरणास अनुसरून होता. महात्मा गांधींनीं त्यास आपला पाठिंबा नंतर दिला होता. या जाहीरनाम्याची भूमिका अशी होती कीं, ब्रिटननें प्रथमतः आपले युद्धहेतु विशद करावेत आणि ह्या युद्धहेतूंत हिटलरशाहीच्या पाडावाबरोबरच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा व हिंदी लोकशाहीचा अंतर्भाव होतो किंवा नाहीं, त्याचें स्पष्टीकरण करावें. तो अंतर्भाव होत नसेल तर हिंदुस्थान ब्रिटनला नैतिक पाठिंबाही देऊं शकत नाहीं असा या जाहीरनाम्यांतील पहिला मुद्दा होता. हा मुद्दा एका नैतिक भूमिकेवरच उभारलेला आहे. आणि या मुद्यास अनुसरूनच गांधीजी म्हणतात कीं, पहिल्या महायुद्धाच्या वेळीं असा नैतिक मुद्दा कोणींच उपस्थित केलेला नव्हता. ब्रिटनचे हेतु शुद्ध आहेत असें गृहीत धरूनच त्यावेळचे सार्वजनिक राजकीय व्यवहार चालू होते. या वेळीं पंडित जवाहरलाल नेहरूप्रभृति राष्ट्रसभेच्या नेत्यांनीं ह्या गृहीत कृत्याबद्दल शंका उपस्थित केली होती. गांधीजी आतां साम्राज्यनिष्ठ राहिलेले नसून ते साम्राज्याविरुद्ध बंडखोर बनलेले होते. त्यांनीं राष्ट्रसभेला अनत्याचारी असहकाराच्या रूपानें ही बंडखोर वृत्ति शिकविलेली होती. अर्थात् अशा अनत्याचारी बंडखोर राष्ट्रसभेनें जर ब्रिटिशांना नैतिक पाठिंबा द्यावयाचा तर त्यांनीं साम्राज्यशाही सोडून दिल्याचें तात्काळ जाहीर केलें पाहिजे. आणि हिंदुस्थानचा स्वातंत्र्याचा व स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य करून त्याची शक्य ती अमलबजावणी ताबडतोब केली पाहिजे तरच हिंदुस्थान या युद्धांत ब्रिटिशांना नैतिक पाठिंबा देऊं शकेल, अशी ही भूमिका होती. हा नैतिक प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार राष्ट्रसभेला आहे आणि ज्या अर्थी तो उपस्थित केला आहे त्या अर्थी ब्रिटननें तो मान्य केला पाहिजे, येथपर्यंत गांधी व राष्ट्रसभा यांचें मतैक्य होतें. पण या बाबतींत समाधान झालें तर राष्ट्रसभेनें युद्धांत भौतिक सहाय्यही दिलें पाहिजे आणि सशस्त्र सैन्याचा उपयोग करून आपल्या देशाच्या

रक्षणाची जबाबदारी तिनें आपल्या अंगावर घेतली पाहिजे असें राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांचें धोरण होतें. गांधीजी त्या मताचे नव्हते. वरील मुद्यासंबंधीं समाधान झालें तरी आतां राष्ट्रसभेनें जी एक सत्याग्रहाची शक्ति गेलीं पंचवीस वर्षें कमावली आहे, त्या शक्तीची वाढ करून सत्याग्रहाच्या मार्गानेंच राष्ट्ररक्षण होऊं शकेल हें जनतेला व इतर जगाला दाखवून देण्यास राष्ट्रसभेनें पुढें यावें असा त्यांचा या वेळीं आग्रह होता. राष्ट्रसभेचे पुढारी ही भूमिका स्वीकारण्यास तयार नव्हते आणि ती भूमिका स्वीकारण्याइतकी हिंदी जनतेची आत्मिक शक्ति विकास पावलेली नाहीं असेंही ते म्हणत. गेल्या महायुद्धांत तुम्हीं जी भूमिका स्वीकारली आणि सत्याग्रहानें राष्ट्ररक्षण करण्याचा अधिकार प्राप्त झालेला नसल्यामुळें राष्ट्रानें सैनिकभरती करावी असें तुम्ही म्हणत होता, तीच भूमिका आम्ही हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर स्वीकारूं. आपल्या राष्ट्राचें रक्षण सशस्त्र मार्गानें करूं असें राष्ट्रसभेचे नेते म्हणत होते. ही गोष्ट गांधींना पटत नव्हती. त्यांचा युक्तिवाद असा कीं, आपण राष्ट्रसभेची वाढ अनत्याचारी असहकाराच्या रूपानेंच केलेली आहे. त्या मार्गानें स्वातंत्र्य मिळविल्यास आपला अहिंसेवरील विश्वास आणि तिच्या आचरणाचा अधिकार वाढलाच पाहिजे. हा वाढता अधिकार लक्षांत घेऊन आपण आतां पूर्वीच्या भूमिकेहून पुढें गेलें पाहिजे. आज ना उद्यां आपणांस राष्ट्रसभेला सत्याग्रहानें राष्ट्ररक्षण करतां येतें हें तत्त्व पटवितां येईल, अशी आशा गांधीजी प्रथमपासूनच धरून होते. आपण सत्याग्रहानें देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलें तर राष्ट्रांतील इतर पक्ष जरी सशस्त्र युद्ध करण्यास प्रवृत्त झाले तरी निदान सत्याग्रही राष्ट्रसभा त्यांत सामील होणार नाहीं, आणि ती आत्मबलानें राष्ट्ररक्षण करण्याचा मार्ग जगाला दाखवून देण्यास पुढें येईल अशी त्यांची अपेक्षा होती, पण ही अपेक्षा सफल होण्याइतकी राष्ट्रसभेची निष्ठा सत्याग्रहावर वस्तुतः केव्हांच बसलेली नव्हती. यामुळें गांधींच्या या अपेक्षेस यश येण्याचा संभव नव्हता. तरीही गांधीजी आपल्या बाजूस राष्ट्रसभा वळवून घेण्याचा प्रयत्न १९४२ सालापर्यंत पुनः पुनः करीत असल्याचें दिसून येतें.

राष्ट्रसभा स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत अनत्याचारी असहकार व सत्याग्रह या मार्गानें गांधींच्या मागून जाण्यास तयार होती आणि स्वातंत्र्य प्राप्त झाल्याबरोबर सशस्त्र मार्गानें देशाचें रक्षण करण्याच्या कार्यांत सहभागी व्हावें आणि राष्ट्रीय सरकारांत सामील होऊन युद्ध चालवावें असें तिच्या नेत्यांचें धोरण होतें. ही भूमिका अहिंसानिष्ठेशीं विसंगत असून राष्ट्रसभेनें जी निष्ठा आतांपर्यंत वाढवीत आणली तिचा तिनें त्याग करावा हेंही गांधींना पसंत नव्हतें. शिवाय ह्या भूमिकेवर त्यांचा आणखी असाही आक्षेप होता कीं, तुम्ही हिंसक युद्धांत आम्ही भाग घेऊं असें आश्वासन ब्रिटनला देऊन स्वातंत्र्य मिळविण्याची खटपट करीत आहां; अर्थात् या मार्गानें स्वातंत्र्य मिळविणें हा एक हिंसामार्गानें स्वातंत्र्य मिळविण्याचाच प्रकार आहे म्हणून असें आश्वासन देऊन स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग तुम्ही स्वीकारीत असल्यामुळें स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं आम्ही हिंसेचा उपयोग करणार नाहीं हें तुमचें म्हणणेंहि बरोबर नाहीं. युद्धसहकार्याचें आश्वासन देऊन मिळविलेलें स्वातंत्र्य हें अनत्याचारानें मिळविलेलें स्वातंत्र्य होऊं शकत नाहीं असा खल अनेक प्रकारें राष्ट्रसभेच्या कार्यकारिणींत चालत असे. पण या मतभेदाचा निर्णय केवळ तार्किक युक्तिवादानें करून कांहींच फायदा नव्हता. कोणतें धोरण स्वीकारून आपलें मार्गक्रमण करण्याची शक्ति आपल्या अंगीं आहे आणि या बाबतींत कोणत्या मार्गानें जाण्याचा अधिकार आपण आज संपादन केलेला आहे, यावरूनच हा निर्णय घ्यावयाचा होता. अखेरीस तर्कदृष्ट्या सुसंगत वाटणाऱ्या मार्गानें जाण्याची शक्ति जर आपल्यापाशीं नसेल तर तसा प्रयोग करण्याच्या भानगडींत न पडतां आपल्या अधिकारास व शक्तीस अनुरूप असा मार्गच आपण स्वीकारला पाहिजे. हा युक्तिवाद गांधींनाही पटण्याजोगाच होता. ज्या अर्थी आजपर्यंत अनत्याचारी असहकाराचें आचरण करणारे लोक म्हणजे नेते आपल्या अंगीं सत्याग्रहानें राष्ट्ररक्षण करण्याची भूमिका स्वीकारण्याची ताकद नाहीं असें उघडपणें मान्य करीत आहेत, त्या अर्थी राष्ट्रांतही तशी ताकद निर्माण झालेली नाहीं हें गांधींना दिसत होतें आणि म्हणूनच १९४२ च्या ८ ऑगस्ट रोजीं

सार्वत्रिक सत्याग्रहाचा जो ठराव महात्मा गांधींनीं अखिल भारतीय काँग्रेस कमिटीकडून मंजूर करवून घेतला त्यांत राष्ट्र स्वतंत्र झाल्यावर तें आपलें रक्षण शस्त्रबल आणि आत्मबल ह्या दोहोंच्याही सहाय्यानें करील असें स्पष्टीकरण करण्यांत आलें होतें. अर्थात् शस्त्रवादी व आत्मबलवादी ह्या दोहोंचाही समावेश करणारा असा हा ठराव होता असें म्हणतां येईल. तसेंच या ठरावाच्या वेळीं हिंदुस्थान स्वतंत्र होतांच तो दोस्त राष्ट्रांशीं स्नेहाचा तह करील आणि दोस्त राष्ट्रांचीं सैन्यें आपल्या देशांत लढत राहण्यास तो हरकत घेणार नाहीं असेंही स्पष्टीकरण गांधीजींनीं केलेलें होतें. तरीही जो सार्वत्रिक सत्याग्रह व्हावयाचा तो महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं सुरू व्हावा आणि त्यांना पकडल्यानंतर प्रत्येकानें आपल्या सदसद्विवेकबुद्धी-प्रमाणें सत्याग्रह करावा असें त्यांत म्हटलें होतें. अर्थात् हा लढा सत्य आणि अहिंसा या तत्त्वांनुसार चालविला पाहिजे हें बंधन राष्ट्रसभेनें केव्हांच ढिलें केलेलें नव्हतें. मात्र तो कसा चालवावा यासंबंधीं प्रत्येकास पूर्ण स्वातंत्र्य दिलेलें होतें.

दोन राष्ट्रांमध्यें युद्ध सुरू झालें असतां दोनही पक्ष जर शस्त्रानेंच लढत असतात आणि अहिंसावादाच्या दृष्टीनें शस्त्रयुद्ध हेंच जर चुकीचें आहे तर त्यांपैकीं एका पक्षास आपण नैतिक पाठिंबा देतों असें तरी अहिंसावाद्यांना कसें म्हणतां येईल. असाही एक प्रश्न या बाबतींत उपस्थित होऊं शकतो या मुद्याचें उत्तरही गांधींनीं अनेक वेळां दिलेलें आहे. दोनही पक्ष सशस्त्र युद्ध करीत असले तरी त्यांतील कोणता पक्ष आक्रमक आहे आणि कोणता पक्ष आत्म-रक्षक आहे याचा निर्णय देऊन पहिल्याला विरोध करणें आणि दुसऱ्याचें रक्षण करण्यासाठीं आपलें अहिंसाव्रत पाळून प्राण जाईपर्यंत संरक्षणास सहाय्य करीत राहणें हें अहिंसा-वाद्याचें कर्तव्य आहे अशी गांधींची दृष्टि होती. अहिंसावाद हा कर्म-योग आहे. जगांतील भांडणांशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं असें समजून स्वस्थ बसणें हा अहिंसावाद्याचा धर्म होऊं शकत नाहीं. अहिंसा हें जगांतील अन्यायाविरुद्ध अखेरपर्यंत प्राणपणानें लढण्याचें साधन, तसेंच

तें आत्मोद्धाराचें व जगदुद्धाराचें साधन आहे हें मत यथार्थ ठरेल अर्थात् जगांतील राष्ट्रें किंवा इतर व्यक्ति न्यायासाठीं जोंपर्यंत लढत आहेत तोंपर्यंत ते हिंसावादी असल्यानें दोघेही सारखेच अपराधी आहेत आणि म्हणून त्यांपैकीं कोणाशींही मला कांहीं कर्तव्य नाहीं अशी वृत्ति स्वीकारून स्वस्थ बसणें हें अहिंसावाद्यास शोभत नाहीं. हा एक अकर्मयोग होईल आणि असा अकर्मयोग किंवा कर्मसंन्यास हा गांधींच्या वृत्तींत बसणारा नव्हता. त्यांची प्रकृति झुंझार होती. अन्यायाविरुद्ध झगडणें आणि अन्यायपीडित दुर्बलांना सहाय्य करून त्यांना लढ्यास प्रवृत्त करणें हें ते आपलें पहिलें कर्तव्य समजत असत. ज्यांना अन्यायाविरुद्ध झगडण्याची अहिंसक शक्ति प्राप्त झाली नसेल त्यांनीं हिंसाबलानेंही अन्यायाचा प्रतिकार करावा आणि आत्मरक्षण करण्याचा प्रयत्न करावा असें ते निःसंदिग्धपणें सांगत असत. या त्यांच्या झुंझारवृत्तीमुळेंच त्यांनीं अहिंसेला क्रांतिकारक स्वरूप दिलें, अथवा अहिंसेचें क्रांतिकारक स्वरूप त्यांनीं जगाच्या निदर्शनास आणून दिलें.

गांधी-सेवा-संघ आणि राजकीय अहिंसा

१९३९–४० या सालांत महात्मा गांधी आणि राष्ट्रसभेची कार्यकारिणी यांच्यामध्यें जसा राजकारणांतील अहिंसेसंबंधीं मतभेद झाला होता, त्याचप्रमाणें या काळांत जे राजकीय प्रश्न उपस्थित झाले आणि गांधींनीं त्या प्रश्नांचा विचार ज्या दृष्टिकोनानें करण्यास प्रारंभ केला त्या दृष्टिकोनाचें रहस्य काय आणि त्यामुळें राजकीय अहिंसेचें आचरण करणारांनीं आपले व्यवहार कसे करावेत यासंबंधींची चर्चा गांधी-सेवा-संघ या संस्थेच्या सभासदांतहीं करणें भाग पडूं लागलें. ही संस्था १९२२–२३ सालीं महात्मा गांधी तुरुंगामध्यें असतांना श्रीयुत जम्नालाल बजाज यांनीं राष्ट्रसेवेचें विधायक कार्य करणाऱ्या लोकांची संघटना करण्यासाठीं म्हणून सुरू केली. बाबू राजेंद्रप्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल आणि स्वतः जम्नालाल बजाज हे तीनच सभासद राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीपैकीं असे या संस्थेंत होते.

महात्मा गांधींच्या तत्त्वाप्रमाणें सत्य व अहिंसा या निष्ठेस अनुसरून कार्य करावें असें या संघाचें ध्येय होतें. १९३७ सालीं हुदली येथें संघाचें एक संमेलन झालें त्या वेळीं संघाच्या सभासदांनीं कायदे-मंडळाच्या निवडणुकींत भाग घेऊन मंत्रिमंडळाच्या कार्यांत सहभागी व्हावें किंवा नाहीं या प्रश्नाचा विचार झाला. गांधीजींनीं या वेळीं संघाच्या सभासदांनीं कायदेमंडळाच्या राजकारणांत भाग घ्यावयास हरकत नाहीं असें आपलें मत दिलें होतें. त्यास अनुसरून सरदार वल्लभभाई आणि बाबू राजेंद्रप्रसाद हे दोघे राष्ट्रसभेच्या कार्य-कारिणींत आणि तिच्या पार्लमेंटरी बोर्डांत काम करीत असत. पुढें गांधींना असें दिसून आलें कीं, आपण संघाच्या सभासदांना दिलेला हा सल्ला चुकला होता. १९३९ सालीं संघाची सभा चम्पारण्यांत वृंदावन येथें झाली. येथें संघानें एक राजकीय पक्ष म्हणून काम करावें किंवा नाहीं या प्रश्नाची चर्चा झाली. पण तो प्रश्न आपल्या कक्षेबाहेर ठरविण्यांत आला. संघ हा राजकीय पक्ष नव्हे असा या निर्णयाचा अर्थ होतो. पुढें त्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यांत गांधी-सेवा-संघाच्या कार्यकारी सभासदांशीं जेव्हां गांधींची चर्चा झाली तेव्हां त्यांना पुढील प्रश्न विचारण्यांत आले : "आपल्या कल्पनेप्रमाणें अहिंसेवर ज्यांची निष्ठा आहे त्यांना मंत्री होतां येईल काय?" ह्या प्रश्नास गांधींनीं पुढीलप्रमाणें उत्तर दिलें : "आजच्या परिस्थितींत त्यांना तसें होतां येणार नाहीं असें मला वाटतें. आपण हें पाहिलेंच आहे कीं, प्रांतिक स्वराज्य मिळण्याच्या पूर्वी ब्रिटिश सरकार ज्या-प्रमाणें हिंसेचा उपयोग करीत असे त्याचप्रमाणें आमच्या मंत्रिमंडळाला करावा लागला. कदाचित् ही गोष्ट अपरिहार्य असेल. राष्ट्रसभाजन हे जर खऱ्या अर्थानें अहिंसक असते तर शस्त्राचा उपयोग केला नसता; पण राष्ट्रसभेचे बहुसंख्य सभासद निर्भेळ अहिंसावादी नव्हते. परवाच मला एक मंत्री म्हणाले कीं, जितक्या प्रमाणांत हिंसा अपरिहार्य होती तेवढ्याच प्रमाणांत मीं ती केली. त्या वेळीं त्यांना तसें म्हणतां आलें, पण यापुढें त्यांना पुनः म्हणतां येणार नाहीं असा मी प्रयत्न करीन; म्हणजे पुन्हा जर निवडणुकी होऊन मंत्री अधिकारावर गेले तर त्या

कायदेमंडळांत बहुसंख्य सभासद अहिंसानिष्ठ असले तरच ते जातील. म्हणजे दुसऱ्या शब्दांत सांगायचें तर अहिंसेच्या आधारावर राज्यकारभार करण्यास जनतेचा पाठिंबा असेल तरच त्याला मंत्री होतां येईल."

यावर दुसरा असा एक प्रश्न विचारण्यांत आला कीं, "अहिंसानिष्ठ मंत्री असला तर त्याला हिंसा करावी लागली तरी तो ती अगदीं किमान प्रमाणांतच करील. पण ज्यांचा अहिंसेवर विश्वास नाहीं ते असा संयम पाळणार नाहींत, हें खरें नाहीं काय?" यावर गांधींनीं उत्तर दिलें, "हा तुमचा शुद्ध भ्रम आहे. जे आज हिंसेचा उपयोग करीत आहेत ते सर्व असाच दावा करीत असतात. हिटलर सुद्धां असेंच म्हणेल. जनरल डायर याचा हाउस ऑफ लॉर्ड्सनें शूर म्हणून जो मोठा सन्मान केला तोही लोकांचा अत्याचार वाढूं नये यासाठींच त्यानें हिंसा केली या दृष्टीनेंच केला होता. सोव्हियेट रशियाची सुद्धां अशीच निष्ठा आहे कीं, आपण जी हिंसा करतो ती केवळ संक्रमणकालीं असून त्यानंतर हिंसाहीन समाजव्यवस्था निर्माण होणार आहे. आमचे आचार व विचार असेच असतील तर आमचा संघ बंद करून प्रत्येकानें आपआपल्या विकासाचा मार्ग सुधारावा हेंच ठीक." यानंतर किशोरलालभाई म्हणाले, "अशी एक सूचना करण्यांत येत आहे कीं, जे विधायक कार्य करीत आहेत तेवढ्यांनाच संघाचे सभासद करून घ्यावे." यावर गांधी म्हणाले, "ही सूचना चांगली आहे. आपण संघाचें असें रूपांतर करूं शकूं आणि नंतर आपला आपल्या शक्तीनुसार आत्मोद्धार करण्यास प्रत्येकास मुभा देऊं. आत्मशुद्धीवांचून अहिंसा आचरणें शक्य नाहीं म्हणून आपण एक आत्मशुद्धि करणारा संघ बनूं या. पण असें करण्यास वस्तुतः संस्थेची आवश्यकता नाहीं म्हणून आपण प्रत्येकानें आपापल्या मार्गानें जाऊन आपल्या अडचणींस तोंड देण्याचा आणि आपणांपुढें निर्माण होणाऱ्या प्रश्नांस उत्तरें शोधून काढण्याचा प्रयत्न करूं या आणि आपली कितपत प्रगति होती ती पाहूं. दोन वर्षांपूर्वी हुदलीस मीं असा सल्ला दिला कीं, संघाच्या सभासदांनीं निवडणुकीस सहाय्य करावें. आजच्या परिस्थितींत मी हा सल्ला

देऊं शकत नाहीं. वस्तुतः आज असा काळ येत आहे कीं, ज्यांचा शूराच्या अहिंसेवर विश्वास आहे त्यांनीं मी १९३४ सालीं राष्ट्रसभेंतून निवृत्त झालों त्याप्रमाणें राष्ट्रसभेंतून निवृत्त व्हावें." यावर असा प्रश्न उपस्थित करण्यांत आला कीं, "सामान्य जनतेच्या अंतःकरणांत क्रोध, द्वेष, दुष्टबुद्धि हे विकार असतांना तिच्याकडून अहिंसेचें आचरण कसें काय होईल? अगदीं क्षुल्लक गोष्टीसाठीं सुद्धां सामान्य लोक एकमेकांशीं लढतांना आपण पाहतों." यावर गांधी म्हणाले, "ते तसें करतात आणि तरीही सर्वांच्या हिताचा प्रश्न उपस्थित झाल्यास त्यांना अहिंसेचें आचरण करतां येतें असें मला वाटतें. ज्या हजारों स्त्रियांनीं बेकायदा मीठ गोळा केलें त्यांच्या अंतःकरणांत कोणा व्यक्तीविषयीं दुष्ट बुद्धि होती असें तुम्हांस वाटतें काय? त्यांना एवढेंच माहीत होतें कीं, कॉंग्रेसनें किंवा गांधींनीं आपणांस कांहीं गोष्टी करावयास सांगितल्या आहेत. आणि त्या त्या गोष्टी निष्ठेनें आणि आशामय वृत्तीनें करीत असत. माझ्या मताप्रमाणें अहिंसेचें पूर्ण निदर्शन चम्पारण्यांत झालें. शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांविरुद्ध जे हजारों शेतकरी बंड करून तेथें उठले त्यांच्या अंतःकरणांत सरकारविषयीं किंवा मळेवाल्यांविषयीं द्वेष होता काय? त्यांच्या बुद्धीला अहिंसेवरील विश्वास कदाचित् समजत नसेल. पृथ्वी गोल आहे हा सिद्धांतही अनेकांच्या बुद्धीला आकलन करतां येत नाहीं. तरीही त्यांची आपल्या नेत्यांवर निष्ठा होती आणि एवढें असलें तरी बस्स आहे. नेत्यांची गोष्ट थोडी भिन्न आहे. त्यांनीं आपली निष्ठा बुद्धिपूर्वक आकलन केलेली असली पाहिजे आणि त्या निष्ठेचे सर्व निष्कर्ष त्यांनीं आचरिले पाहिजेत." "अशीच वृत्ति जगांतील सर्वच देशांतील जनतेची नसते काय?" "असें नाहीं. इतर ठिकाणीं आपल्या देशांतल्याप्रमाणें अहिंसाचरणाची पार्श्वभूमि तयार नाहीं." यावर फिरून प्रश्न करण्यांत आला, "आमच्या जनतेंत जर अहिंसा मुरलेली आहे तर तिला गुलामगिरी कशी प्राप्त झाली?" यावर गांधी म्हणाले, "येथेंच तर मी माझी नवी भर घालणार आहें. जनतेंत आज जी अहिंसा आहे ती दुर्बलांची अहिंसा आहे. तिचें शूराच्या अहिंसेंत

परिवर्तन करावें अशी माझी इच्छा आहे. कदाचित् हें एक माझें स्वप्नच ठरेल पण तसा प्रयत्न करणें हें माझें कर्तव्य आहे."

१९३९ च्या नोव्हेंबर महिन्यांतील हा संवाद आहे. त्यानंतर १९४० च्या फेब्रुवारींत गांधी-सेवा-संघाचें संमेलन बंगालमध्यें मलीकंदा येथें भरलें होतें. तेथें गांधींनीं अहिंसा आणि राजकारण हा प्रश्न पुनः उपस्थित केला आणि आपलें स्पष्ट मत असें दिलें कीं, "ज्यांना अहिंसामय राजकरण करावयाचें आहे त्यांना राष्ट्रसभेच्या कार्यकारिणींत किंवा कायदेमंडळ व स्थानिक स्वराज्य असल्या लोकनियुक्त राजकीय संस्थातून भाग घेतां येणार नाहीं. ज्यांना असलें राजकारण करावयाचें असेल त्यांनीं संघाचें सभासदत्व सोडावें. हुदलीस माझ्या सूचनेवरून जो ठराव संघानें केला तो चुकीचा होता असें अनुभवानें सिद्ध झालें आहे. नकळत का होईना ही चूक झालेली आहे. आतां आपणांस आपल्या उणिवा कळून आल्या आहेत आणि अनुभवानें आपण शहाणे झालों आहोंत. आपण केलेली चूक दुरुस्त केली असतां तिचा दोष जातो. सत्तेच्या राजकारणांत संघाला मुळींच स्थान नाहीं." या वेळीं झालेल्या प्रश्नोत्तरांत गांधींनीं असें स्पष्टीकरण केलें कीं, कोणींही राजकारण सोडून द्यावें असा याचा अर्थ नाहीं. मी येवढेंच म्हणतों कीं, संघाच्या सभासदांनीं कार्यकारी अधिकारावर राहूं नये म्हणजे त्यांच्याविषयीं कटुता निर्माण होणार नाहीं. सरदारांनीं एक संघाचा तरी राजीनामा द्यावा किंवा वर्किंग कमेटीचा तरी राजीनामा द्यावा. सर्वच राजकारण निषिद्ध आहे असा ह्याचा अर्थ आहे असें नाहीं. विधायक कार्य हें सुद्धां देशाच्या राजकारणाचें एक अंगच आहे पण येथें आपण केवळ सत्तेच्या राजकारणाचा विचार करीत आहोंत. अहिंसा आणि सत्ता यांचा एकमेकांशीं संबंध येऊं शकत नाहीं."

अशा प्रकारें निरनिराळ्या चर्चा केल्यानंतर गांधी-सेवा-संघाच्या भावी स्वरूपासंबंधीं असा ठराव करण्यांत आला कीं, गांधी-सेवा-संघाच्या सभासदांनीं राजकीय संस्थांत अधिकारपदें स्वीकारणें अनिष्ट आहे असा अनुभव आला आहे म्हणून अशा संस्थांत जे लोकनियुक्त सभासद अधिकारपदावर आहेत किंवा ज्यांना तसें करण्याची इच्छा आहे त्यांनीं

संघाचे राजीनामे द्यावेत. यानंतर संघाचें यापुढील कार्य विधायक स्वरूपाचें राहील असें या ठरावांत म्हटलें असून अखिल भारतीय चरखा संघ, ग्रामोद्योग संघ, इत्यादि विधायक कार्य करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांना त्यांच्या कार्याचा अहिंसेशीं कसा संबंध आहे तें दाखवून देणें आणि अहिंसादृष्टीनें समाजाच्या निरनिराळ्या व्यवहारांत सुधारणा करण्याचें मार्गसंशोधन करणें हें संघाचें विविध कार्य समजण्यांत यावें, असा आशय व्यक्त करण्यांत आला आहे. या संशोधनकार्यासाठीं नऊ सभासदांचें एक कार्यकारी मंडळ नेमण्यांत आलें. ते नऊ सभासद पुढीलप्रमाणें : श्रीकृष्णदास जाजू (अध्यक्ष आणि विश्वस्त), धोतरे (चिटणीस आणि विश्वस्त), किशोरलाल मश्रुवाला (सभासद आणि विश्वस्त). यानंतर सहा सामान्य सभासद : गोपबंधु चौधरी, अभयदेवजी, सतीशचंद्र दासगुप्त, दिलखुष दिवाणजी, सिताराम पुरुषोत्तम उर्फ अप्पासाहेब पटवर्धन आणि कृष्णदास गांधी एवढेच सभासद संघाला असावे. याशिवाय संघाच्या इतर सर्व सभासदांनीं राजीनामे दिले आहेत असें समजावें. या ठरावासंबंधीं बोलतांना गांधीजी म्हणाले, "असा ठराव करण्यावांचून दुसरें गत्यंतरच नव्हतें. संघापासून आपणांस स्फूर्ति व शक्ति मिळत आहे, असें तुम्हांस वाटत होतें, पण वस्तुस्थिति तशी नव्हती. किशोरलाल मश्रुवाला यांच्यापासून तशी स्फूर्ति व शक्ति तुम्हांस मिळत असे; पण ते संघाचे अध्यक्ष होते म्हणून मिळत होती असें नव्हे. आतां जरी तुम्ही संघाचे सभासद उरलां नाहीं तरीही संघ ज्या ध्येयासाठीं उभा होता, तें ध्येय तुम्हीं आपल्या जीवनांत आचरणांत आणून त्याचें प्रतीक तुम्हीं बनावें. जेव्हां मीं साबरमतीचा सत्याग्रहाश्रम विसर्जित केला तेव्हां मीं तेथील सभासदांना म्हटलें कीं, यापुढें प्रत्येक जण चालता बोलता आश्रमच बना. त्याचप्रमाणें तुमच्यापैकीं प्रत्येकानें आतां गांधी-सेवा-संघाचें जंगम प्रतीक बनलें पाहिजे. आज जें आपण पाऊल टाकलें आहे त्यामुळें आमची शुद्धि होईल, इतकेंच नाहीं तर आपलें बलहि वाढत जाइल. संघाची ही घटना मीं किशोरलाल यांच्याशीं पूर्ण विचार करून बनविली आहे. व्यवहारदृष्टीनें मी आतां संघाचें विसर्जन करीत आहें

तें कदाचित् चूकहि ठरूं शकेल, पण कदाचित् माझें हें कृत्य बरोबरहि असेल आणि मला वाटतें कीं, मी बरोबर आहें. मी आपणांस आश्वासन देतों कीं, आज आपण सत्याच्या संशोधनकार्यांत एक पाऊल पुढें टाकलें आहे." यानंतर गांधी-सेवा-संघाचें काम संपवून गांधीजी शांतिनिकेतनास गेले. तेथें रवींद्रनाथ टागोर यांची गांठ घेतली. या वेळीं रवींद्रनाथ अत्यंत थकलेले होते. तेथील गांठीभेटींचें कार्य झाल्यानंतर रवींद्रनाथांनीं गांधींना सांगितलें कीं, यापुढें शांतिनिकेतनास सहाय्य मिळवून देण्याची जबाबदारी आपण घ्यावी. गांधींनीं तें तत्काळ मान्य केलें. पुढें ते बिहारमध्यें रामगड येथील राष्ट्रसभेच्या अधिवेशनास गेले.

रामगड अधिवेशनापासून वैयक्तिक सत्याग्रहापर्यंत

रामगड येथें मौलाना आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं युद्ध सुरू झाल्यानंतरचें काँग्रेसचें पहिलें अधिवेशन झालें. अधिवेशनाच्या वेळीं एक फार मोठें वादळ होऊन पाऊस भयंकर आला, यामुळें कसें तरी अधिवेशनाचें काम एका दिवसांत संपवून प्रतिनिधींना आपापल्या ठिकाणीं जावें लागलें. मुख्य ठराव युद्धाशीं असहकार हा असून या कामीं सत्याग्रह करण्यापर्यंत मजल न्यावी अशा अर्थाचा होता. गांधींनीं ह्या ठरावावावर भाषण करून आपण सत्याग्रहाचें नेतृत्व स्वीकारण्यास तयार आहोंत असें जाहीर केलें. या सत्याग्रहांत सार्वत्रिक सत्याग्रह सुद्धां करण्याचा आपला विचार आहे असें त्यांनीं सांगितलें; मात्र सर्वांनीं विधायक कार्य करण्याची शिस्त कठोरपणानें पाळली पाहिजे आणि सत्याचें व अहिंसेचें व्रत घेतलें पाहिजे असेंही त्यांनीं सांगितलें. अशा रीतीनें गांधीजींनीं जो स्वातंत्र्याचा सत्याग्रह थांबविला त्याचें पुनर्जीवन आतां सहा वर्षांनंतर करण्यास ते पुढें आले हें पाहून सर्व देशांत एक अपूर्व उत्साहाची लाट एकदम निर्माण झाली. या सत्याग्रहाच्या व असहकाराच्या ठरावानंतर या अधिवेशनाचे वेळीं घडलेली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रीयुत जयप्रकाश नारायण यांनीं गांधीजींच्यामार्फत राष्ट्रसभेपुढें ठेवण्यासाठीं एक समाजवादी ठराव पाठविला होता तो होय. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर त्याची

राज्यघटना समाजवादी तत्त्वास अनुसरून करण्यांत यावी असें म्हटलें असून या स्वराज्यांत कोणत्याही प्रकारचा जमीनदारवर्ग असूं नये. सर्व मोठे कारखाने आणि पेढ्या समाजाच्या मालकीच्या बनाव्यात, कापडासारखे कांहीं धंदे विकेंद्रित स्वरूपांत ग्रामोद्योग बनविण्यांत यावेत, आर्थिक विषमता नष्ट करावी आणि संस्थानेंही नष्ट करावींत असा तपशील ह्या ठरावांत ग्रथित करण्यांत आलेला होता. या ठरावाला गांधीजींचा व्यक्तिशः सर्वसामान्य पाठिंबा होता, फक्त कांहीं मोठीं संस्थानें नष्ट न करतां तेथें लोकनियंत्रित जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें अवश्य होईल म्हणून तेवढा तपशिलाचा भाग वगळून हा सर्व ठराव मान्य आहे असें गांधींनीं जाहीर केलें. या वेळीं जयप्रकाश नारायण यांना अटक झालेली होती आणि ते तुरुंगांत होते. त्यांनीं गांधींच्याकडे हा ठराव राष्ट्रसभेपुढें मांडण्यासाठीं दिला होता आणि राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीनें तो मान्य केला नाहीं तर निदान आपण व्यक्तिशः ठरावास मान्यता दिली तरी माझें समाधान होईल असें त्यांनीं गांधींना कळविलें होतें. राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीनें हा ठराव मान्य केला नाहीं तरीही गांधींनीं पुढें २० एप्रिलच्या 'हरिजन' च्या अंकांत तो सर्व ठराव छापला आणि वरील एक अपवाद सोडून त्याला आपला सर्वसामान्य पाठिंबा आहे असें जाहीर केलें. त्यावर लिहितांना त्यांनीं असेंही जाहीर केलें कीं, मी हिंदुस्थानांत समाजवादी पक्ष स्थापन होण्याच्या फार पूर्वीपासून समाजवादी बनलेलों आहें. दुर्दैवाची गोष्ट आहे कीं, पाश्चात्य देशांतील समाजवादी आपलीं तत्त्वें अमलांत आणण्यासाठीं हिंसेच्या मार्गाचें अवलंबन करतात व तसें करणें अवश्य आहे असें ते समजतात. मला हा त्यांचा मार्ग मान्य नाहीं. जयप्रकाशांचा ठराव मला मान्य आहे. आणि अनत्याचारी असहकाराच्या मार्गानें व अहिंसेनें त्याची स्थापना करणें शक्य आहे असें मला वाटतें. अशा तऱ्हेचे विचार गांधींनीं ह्या ठरावाच्या निमित्तानें प्रकट केले.

रामगड काँग्रेस झाल्यानंतर गांधींनीं विधायक कार्यावर एकसारखा जोर देण्यास सुरवात केली. आणि सर्व काँग्रेस कमिट्या हीं विधायक

लोकसेवेचीं केंद्रें बनलीं पाहिजेत असें जाहीर केलें. या वेळीं त्यांनीं या विधायक लोकसेवेचीं एकंदर तेरा अंगें म्हणून लोकांपुढें मांडलीं. हीं तेरा अंगें अशीं :—(१) हिंदु-मुसलमान व जमातीजमातींचें ऐक्य, (२) अस्पृश्यता-निवारण, (३) मद्यपानबंदी, (४) खादी, (५) इतर ग्रामोद्योग, (६) खेड्यांचें आरोग्य, (७) मूलोद्योगी शिक्षण, (८) प्रौढ शिक्षण, (९) स्त्रियांचा उद्धार, (१०) आरोग्य आणि शरीर-स्वास्थ्य यांचें शिक्षण, (११) राष्ट्रभाषा-प्रचार, (१२) मातृभाषेची भक्ति, (१३) आर्थिक विषमतेचें निवारण. ह्या सर्व मुद्यांसंबंधीं 'हरिजन' च्या १८ ऑगस्टच्या अंकांत गांधींचा एक लेख गुजरातींतून भाषांतर करून छापण्यांत आलेला आहे. ग्रामसंघटनेचा आणि ग्रामोद्योगाचा हा तेरा कलमी कार्यक्रम अमलांत आणणें काँग्रेसच्या स्थानिक समित्यांचें मुख्य कार्य आहे. या सर्व विधायक कार्यांचा आधार आर्थिक समता ह्यावर असला पाहिजे असेंही त्यांनीं त्या लेखांत स्पष्टपणें म्हटलें आहे. या आर्थिक समतेच्या खंबीर पायाच्या अभावीं आपल्या ग्रामसंघटणेची इमारत वाळूच्या ढिसूळ पायावर उभारल्यासारखी होईल असा त्यांनीं इषारा दिलेला आहे. आर्थिक समता याचा अर्थ सर्वांना अगदीं सारखीच भौतिक संपत्ति द्यावी असा नाहीं ; तरीही प्रत्येकास राहण्यास योग्य घर, खाण्यास पुरेसें आणि पौष्टिक अन्न आणि पुरेसें खादीचें वस्त्र हें तरी मिळालें पाहिजे. आज समाजांत जी निष्ठुर आर्थिक विषमता आहे ती तरी शुद्ध अहिंसेच्या मार्गानें नष्ट झालीच पाहिजे. या आर्थिक समतेच्या विषयावर त्यांनीं २५ ऑगस्टच्या 'हरिजन' च्या अंकांत एक स्वतंत्र अग्रलेख प्रसिद्ध केलेला आहे. त्यांत त्यांनीं श्रीमंतांनीं आपल्या शेजाऱ्यापेक्षां अधिक संपत्तीचा उपभोग घेऊं नये आणि आपल्या आवश्यक गरजा भागविण्यास किमान संपत्ति वगळून इतर सर्व संपत्तीचे आपण मालक नसून तिच्यावर समाजाची मालकी आहे आणि आपण केवळ समाजानें नेमलेले निधिधारक आहों अशा वृत्तीनें श्रीमंतांनीं वागावें, असें म्हटलें आहे. या लेखाच्या अखेरीस ते लिहितात कीं, श्रीमंतांनीं आपल्या संपत्तीचे निधिधारक बनावें हें जें आपलें ध्येय

तें कांहीं केल्या श्रीमंत लोक जर आचरणांत आणीतच नाहींत असें सिद्ध झालें तर अखेरीस त्यांच्याशीं गरिबांना अनत्याचारी असहकारानें झगडावें लागल. जर गरीब लोकांनीं श्रीमंत लोकांशीं सहकार्य केलें नाहीं तर धनिकांना धनसंग्रह करणें मुळींच शक्य होणार नाहीं.

अशा रीतीनें महात्मा गांधी हे समाजवादी विचारांशीं अधिकाधिक निकट जात होते, त्याच वेळीं राष्ट्रसभेतील श्रीयुत राजगोपालचारी आणि सरदार वल्लभभाई, पंडित जवाहरलाल नेहरू आणि मौलाना आझाद, ही सर्व मंडळी ब्रिटनला युद्धकार्यांत भौतिक सहाय्य देण्याचें निःसंदिग्ध आश्वासन देऊन राष्ट्राला शिष्टाईनें स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय आणि तात्पुरतें राष्ट्रीय सरकार मिळवतां आल्यास पाहावें म्हणून प्रयत्न करूं लागले होते. ७ जुलै १९४० रोजीं दिल्लीला राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीची सभा झाली आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य दिल्याची घोषणा करून ब्रिटिश सरकारनें जर ताबडतोब हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन केलें तर राष्ट्रसभा युद्धकार्यांत भौतिकदृष्ट्या ब्रिटिशांना सहाय्य करण्यास तयार आहे असा स्पष्ट ठराव मंजूर करण्यांत आला. हा ठराव श्रीयुत राजगोपालाचारी यांनीं बनविला आणि सरदार वल्लभभाई यांनीं त्या ठरावास पाठिंबा दिला. महात्मा गांधींना हा ठराव तत्त्वतः अमान्य होता, आणि ते त्याच्याविरुद्ध होते. कार्यकारिणीनें हा ठराव मंजूर केल्यानंतर त्या ठरावास मान्यता देण्यासाठीं जुलै महिन्याच्या अखेरीस अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक भरली आणि तींत ता. २७ जुलै रोजीं हा ठराव मंजूर करण्यांत आला. या सभेस महात्मा गांधी बुद्धयाच उपस्थित राहिले नव्हते.

अशा भूमिकेवर राष्ट्रसभेचें नेतृत्व करण्यास ते तयार नव्हते. यानंतर ब्रिटिश सरकारनें या ठरावास अनुकूल असा जबाब न देतां केवळ मध्यसरकारच्या कार्यकारी मंडळाची वाढ करण्याचें जाहीर केलें. अर्थात् हा शिष्टाईचा मार्ग सोडून देऊन राष्ट्रसभेला पुनः सत्याग्रहाच्या मार्गाकडे वळावें लागलें आणि सप्टेंबर महिन्याच्या १५ तारखेस मुंबईत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची दुसरी बैठक होऊन महात्मा गांधींनीं तिच्यापुढें सत्याग्रहाचा ठराव मांडिला. या वेळीं गांधींच्या

मनांत सार्वत्रिक सत्याग्रह करण्याचें नव्हतें. त्यांची योजना वैयक्तिक सत्याग्रहाची होती. हिंदुस्थानचा महायुद्धाशीं असहकार आहे. कारण तें युद्ध आमच्या इच्छेविरुद्ध लादण्यांत आलेलें आहे, या राष्ट्रसभेच्या भूमिकेचा प्रचार करण्याचें अनत्याचारी स्वातंत्र्य आम्हांस मिळालें पाहिजे आणि तें स्वातंत्र्य जर सरकारनें आपणांस दिलें नाहीं तर सरकारचीं कायदेशीर बंधनें तोडून हा प्रचार पूर्ण अहिंसेनें पण दृढनिष्ठेनें चालू ठेवला पाहिजे हें गांधींचें त्या वेळचें धोरण होतें. त्यांनीं आपल्या भाषणांत हें धोरण विशद केलें आणि जो सत्याग्रहाचा ठराव सभेपुढें मांडला त्यांत असें नमूद करण्यांत आलें कीं, "काँग्रेसचा अहिंसेच्या धोरणावर व आचरणावर केवळ स्वराज्यप्राप्तीचें साधन एवढाच विश्वास आहे असें नसून स्वतंत्र हिंदुस्थानांतही या तत्त्वाचें आचरण शक्य त्या प्रमाणांत ती करीत राहील अशी या समितीची खात्री झाली आहे. जगांतील घडामोडींनीं असें दाखवून दिलें आहे कीं, पूर्ण शस्त्रसंन्यास आणि राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेसंबंधीं अधिक न्यायाची नवी समाजरचना या गोष्टी घडल्या नाहींत तर सर्व जगाचा नाश होईल आणि त्याला पूर्वीची रानटी अवस्था प्राप्त होईल, म्हणून स्वतंत्र हिंदुस्थान आपलें सर्व वजन जगानें शस्त्रसंन्यास करावा आणि त्याचें मार्गदर्शन आपण करावें या कामीं खर्च करील. प्रभावी शस्त्रसंन्यास आणि राष्ट्राराष्ट्रांतील युद्धांचा अंत करून जगच्छांति स्थापन करणें या गोष्टी युद्धांचीं आणि राष्ट्राराष्ट्रांतील तंट्यांचीं कारणें दूर करण्यावर अवलंबून आहेत. एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावरील प्रभुत्व आणि एका लोकांचें अथवा गटाचें दुसऱ्याकडून होणारें द्रव्यहरण किंवा पिळणूक ह्यांचा अंत करून हीं कारणें दूर केलीं पाहिजेत. हें ध्येय पुढें ठेवून हिंदुस्थान शांततेनें कष्ट करीत राहील आणि याच उद्देशासाठीं हिंदी लोक आपणांस स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा प्राप्त व्हावा असा प्रयत्न करीत आहेत."

या ठरावांतील शब्दरचना थोडीशी व्यर्थी झालेली आहे असें पुढें दिसून आलें. गांधी हे स्वतः या ठरावाचा अर्थ असा करीत कीं, हिंदुस्थान स्वतंत्र झाला तरी राष्ट्रसभा युद्धांत सशस्त्र सहाय्य करणार

नाहीं आणि शस्त्रसंन्यासाचें धोरण जगाला पटवून देण्यासाठीं ती प्रयत्न करीत राहील. राष्ट्रसभेच्या कार्यकारिणींतील सभासद या ठरावाचा असा अर्थ करीत नसत. कारण '—स्वतंत्र हिंदुस्थान अनत्याचारी धोरणाचा शक्य तितका अवलंब करील—' या वाक्याचा अर्थ शस्त्रसंन्यास करणें जोंपर्यंत अव्यवहार्य आहे तोंपर्यंत स्वतंत्र हिंदुस्थानच्या वतीनें राष्ट्रसभेनें शस्त्रयुद्ध करण्यास हरकत नाहीं, असाही त्यांतील शब्दांतून निघूं शकेल. तात्पर्य, शब्दयोजना जरी गांधींना पूर्णपणें पसंत पडण्यासारखी आणि त्यांना अभिप्रेत असणारा अर्थ व्यक्त करणारी अशी असली तरी हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यास राष्ट्रसभेनें शस्त्रयुद्धांशीं शस्त्र घेऊन सहकार्य करण्यास निरुपाय म्हणून हरकत नाहीं असाही अर्थ त्या शब्दांतून कार्यकारिणीच्या सभासदांना काढतां येण्याजोगा होता. एक वर्षानंतर वैयक्तिक सत्याग्रह संपून पुन्हा ब्रिटिश सरकारशीं तडजोड करण्याचा प्रसंग प्राप्त झाला तेव्हां गांधींनीं केलेला अर्थ आपणांस मान्य नाहीं असें राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीनें त्यांना सांगितलें आणि १९४२ च्या वसंत ऋतूंत इंग्लंडाहून शिष्टाई करण्यासाठीं सर स्टॅफर्ड क्रिप्स आले असतां त्यांच्याशीं मौलाना आझाद आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं स्वातंत्र्याचें आश्वासन मिळाल्यास व हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यास तें युद्धसहकार्य करण्यास तयार होईल या भूमिकेनें शिष्टाई केली. गांधींनीं मात्र स्वतः ती भूमिका मुंबईच्या अखिल भारतीय काँग्रेस समितीनें २७ जुलै १९४० रोजीं केलेल्या सत्याग्रहाच्या ठरावाशीं विसंगत आहे असें आपलें मत दिलें. पण त्यांचा हा अर्थ राष्ट्रसभेच्या कार्यकारिणींतील कोणाही गांधीवाद्यानें आपणांस पूर्वीपासून अभिप्रेत होता असें म्हटलें नाहीं. असो. अशा तऱ्हेनें सप्टेंबर १९४० च्या अखेरीस गांधींनीं वैयक्तिक सत्याग्रहाचा ठराव मंजूर करून त्याचें नेतृत्व आपल्या हातीं घेतलें.

यानंतर लगेच गांधींनीं युद्धविरोधी प्रचाराचें अनत्याचारी स्वातंत्र्य काँग्रेसला मिळावें याबद्दल प्रयत्न करण्यासाठीं व्हाइसरॉय लॉर्ड

लिनलिथगो यांची गांठ घेतली. या भेटींत व्हाइसरॉयनें असें सांगितलें कीं, इंग्लंडादि स्वतंत्र देशांत जे शुद्ध अहिंसावादी असतील त्यांच्यावर लढण्याची सक्ती करण्यांत येत नाहीं, पण त्यांना युद्धविरोधी प्रचार करण्याचें स्वातंत्र्य मात्र युद्धकाळांत देण्यांत येत नाहीं. जे केवळ तत्त्वदृष्टीनें अहिंसावादी म्हणून युद्धाच्या विरुद्ध असतील त्यांनीं सर्वच युद्धांना विरोध केला पाहिजे. तुमचें तर म्हणणें असें होतें कीं, युद्ध म्हणून सर्वच युद्धाला विरोध करणारे जे असतील त्याप्रमाणेंच हें साम्राज्यशाही युद्ध आहे म्हणून तत्त्वदृष्टीनें या विशिष्ट युद्धास जे विरोध करीत असतील त्यांनाही युद्धविरोधाचा हक्क सरकारनें दिला पाहिजे. तसेंच जेथें शस्त्रास्त्रें करण्याचे कारखाने वगैरे चालू असतील तेथें जाऊन जरी तुम्ही मुद्दाम युद्धविरोधी प्रचार करणार नसलां तरी सर्वसामान्यतः सभांतून व भाषणांतून हिंदी जनतेनें कोणत्याही प्रकारचें युद्धसहाय्य करूं नये असा प्रचार तुम्हांस करावयाचा आहे आणि सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांना हा हक्क असावा अशी मागणी तुम्ही करीत आहां. युद्ध चालू असतां ह्या प्रचारस्वातंत्र्याचा हक्क सरकार तुम्हांस देऊं शकत नाहीं.

अशा रीतीनें सरकारनें युद्धविरोधी प्रचाराचा कायदेशीर हक्क देण्याचें नाकारलें, तेव्हा गांधींनीं सविनय कायदेभंग करून तो हक्क बजावण्याचें तंत्र स्वीकारलें. मात्र हा हक्क बेजबादारपणें कोणींही वापरूं नये याबद्दल त्यांनीं या वेळीं अत्यंत दक्षता घेतलेली होती. ते स्वतः हा सत्याग्रह करणार नव्हते. जे राष्ट्रसभेचे लोक जबाबदार कामें करणारे आणि समाजांत प्रतिष्ठा पावलेले, चारित्र्यशील असून लोकांच्या विश्वासानें प्रातिनिधिक संस्थांत कामें करीत होते अशा लोकांनीं व जबाबदार लोक-सेवकांनींच हा सत्याग्रह करावा असें एक प्रातिनिधिक सत्याग्रहाचें नवें तंत्र त्यांनीं या वेळीं अवलंबिलें. या सत्याग्रहींचे त्यांनीं दोन वर्ग पाडले : जे शुद्ध अहिंसावादी म्हणून सर्वच युद्धाना विरोध करणारे असतील त्यांचा पहिला वर्ग आणि हें युद्ध साम्राज्यशाही युद्ध आहे म्हणून हिंदुस्थाननें त्यांच्याशीं सहकार्य करूं नये असें म्हणणारे जे असतील त्यांचा दुसरा वर्ग. या दोन वर्गांचे दोन प्रतिनिधि म्हणून

प्रथम अनुक्रमें आचार्य विनोबा भावे आणि पंडित जवाहरलाल नेहरू या दोघांची निवड केली. हे तुरुंगांत गेल्यानंतर इतर अखिल भारतीय कीर्तीचे राष्ट्रसभेचे नेते, तिचे मंत्री, तिचे कायदेमंडळांतील लोकनियुक्त प्रतिनिधि आणि विधायक कार्यांत काम करणारे लोकसेवक असे निवडक लोक घेऊन सुमारें २५,००० लोक सत्याग्रह करून तुरुंगांत घातले. ही चळवळ १९४० च्या अखेरपासून १९४१ च्या अखेरपर्यंत एक वर्षभर चालली. सरकारनें कायदेशीर रीतींनें युद्धविरोधी प्रचाराचा हक्क मान्य केला नाहीं तरी सत्याग्रही लोक तुरुंगाचा मार्ग स्वीकारून आपल्या मतांचा प्रचार अत्यंत मोठ्या प्रमाणावर जनतेमध्यें करूं शकतात याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण होतें. यांत नागरिकत्वाच्या मूलभूत हक्कांपैकीं अनत्याचारी प्रचारस्वातंत्र्याचा हक्क युद्धकालांतही काढून घेण्याचा कोणत्याही सरकारास अधिकार नाहीं असें तत्त्व गोविलेलें होतें. तसेंच लोकांच्या इच्छेविरुद्ध हें युद्ध ब्रिटननें हिंदुस्थानवर सक्तीनें लादलें आहे आणि जनतेचा खरा पाठिंबा त्याला नाहीं हें जगाच्या निदर्शनास आणून देण्याचा आणि जनतेंतील स्वातंत्र्यनिष्ठा व अनत्याचारी त्यागशक्ति यांचें संगोपन करून संवर्धन करण्याचा हा एक सर्वोत्कृष्ट मार्ग होता. पुढें १९४२ सालीं क्रिप्स-शिष्टाई विफल होऊन जेव्हां सार्वत्रिक सत्याग्रहाचा स्वातंत्र्यसंग्राम करण्याचें महात्मा गांधींनीं ठरविलें तेव्हां राष्ट्राचे सर्व पुढारी तुरुंगांत असतांना देखील जनतेनें व राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांनीं जें शौर्य आणि स्वातंत्र्यनिष्ठा प्रकट केली त्यांचें बीजारोपण ह्या वर्षभर चाललेल्या अत्यंत शिस्तीच्या आणि शांततेच्या पंचवीस हजार लोकांनीं केलेल्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या मोहिमेनें केलेलें होतें. हिंदी जनतेंत यामुळें जी तत्त्वनिष्ठा जागृत झाली आणि अहिंसावृत्ति पाळली पाहिजे असें शिक्षण राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांना व जनतेला मिळत गेलें त्यामुळें १९४२ नंतर जें प्रचंड क्रांतिकारक आंदोलन झालें त्यांत जरी गांधींची शुद्ध सत्याग्रही वृत्ति पूर्णपणें टिकूं शकली नाहीं तरीही मनुष्यहिंसाही त्यांत घडली नाहीं. एवढें प्रचंड आंदोलन होऊन इतकी अनत्याचारी वृत्ति स्वातंत्र्याच्या लढ्यात अखेरपर्यंत टिकून राहणें ही गोष्ट

जगाच्या इतिहासांत अपूर्व अशीच गणली पाहिजे आणि तिचें सर्व श्रेय महात्मा गांधींच्या असामान्य नेतृत्वास दिलें पाहिजे. १९४७ च्या १५ ऑगस्टला हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचा जो कायदा ब्रिटिश पार्लमेंटानें त्याच्यापूर्वी एक महिनाभर केला तो कायदा करतांना ब्रिटिश पार्लमेंटच्या अनेक सभासदांनीं महात्मा गांधींच्या कर्तृत्वामुळेंच हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचें स्वरूप अहिंसक राहिलें आणि त्याचा शेवट उभयपक्षाच्या मैत्रींत झाला असा गांधींचा गौरव केला.

१९४१ च्या डिसेंबर महिन्यांत ब्रिटिश सरकारनें वैयक्तिक सत्याग्रह करून तुरुंगांत गेलेल्या युद्धविरोधी सत्याग्रहींना बंधमुक्त करण्याचें धोरण स्वीकारलें. डिसेंबरअखेरीस सर्व पुढारी बाहेर पडून लवकरच ब्रिटिश सरकार त्यांच्याशीं तडजोडीचीं बोलणीं सुरू करणार अशा वार्ता पसरूं लागल्या. पुढारी बंधमुक्त झाल्यावर बार्डोलीस महात्मा गांधींच्या सान्निध्यांत राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीची सभा झाली. या कार्यकारिणींतच मागें उल्लेखिलेला मुंबईच्या सत्याग्रहाच्या ठरावासंबंधींचा मतभेद प्रथम उघडकीस आला. मौलाना आझाद आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं हिंदुस्थानला स्वातंत्र्याचें अभिवचन देऊन ताबडतोब राष्ट्रीय सरकार स्थापन केल्यास आपण ब्रिटिशांशीं युद्धसहकार्य करूं अशा अर्थाचीं भाषणें केलीं. महात्मा गांधींना हीं त्यांचीं भाषणें आवडलीं नाहींत आणि त्यांनीं स्वातंत्र्य मिळालें तरी राष्ट्रसभा स्वतः युद्धसहकार्य करूं शकणार नाहीं असा आग्रह धरिला. पण हें त्यांचें धोरण राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीनें पसंत केलें नाहीं. यानंतर वर्ध्यास अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचें अधिवेशन झालें आणि मौलाना आझाद व पंडित नेहरू यांच्या धोरणास अनुसरून तेथें ठराव झाला. पुढारी सुटले त्याच वेळीं वैयक्तिक सत्याग्रह बंद करण्यांत आला होता आणि त्याचें युद्धविरोधी प्रचाराचें जें कार्य व्हावयाचें तें बरेंचसें होऊन गेलेलें होतें. आतां केवळ मतप्रचाराचेंच कार्य करून स्वस्थ न बसतां आक्रमक कायदेभंग सुरू करण्याचा काळ आलेला होता. पण तसें करण्यापूर्वी अद्याप पुनः एकदां ब्रिटिश

सरकारकडून शिष्टाईचे प्रयत्न व्हावयाचे होते. या वेळीं रशियाविरुद्ध जर्मनीनें युद्ध पुकारिलें होतें. आणि ब्रिटन व रशिया यांची दोस्ती घडवून आणण्यांत सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनीं यश संपादन केलें होतें. पूर्वेकडे जपाननें ब्रिटन-अमेरिकेशीं युद्ध सुरू केलें होतें. आणि चीन हा ब्रिटिश, फ्रेंच व अमेरिका ह्यांचा दोस्त म्हणून लढूं लागला होता. या वेळीं चीनचे अध्यक्ष सेनापति चँक-कै-शेक हे हिंदुस्थानचा स्वातंत्र्याचा हक्क ब्रिटननें मान्य करावा अशी खटपट करीत होते. फेब्रुवारी महिन्यांत ते हिंदुस्थानांत आले आणि पंडित नेहरू व व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांच्या गांठी घेऊन परत आपल्या देशीं गेले. त्यांनीं कलकत्त्यास महात्मा गांधींचीही भेट घेतली. त्यांच्या मध्यस्थीचा उपयोग ब्रिटनवर तडजोड करण्यासाठीं नैतिक दडपण आणण्यांत झाला असला तर त्यांत आश्चर्य नाहीं. इकडे जपान सिंगापूरपर्यंतचा प्रदेश हस्तगत करून हिंदुस्थानकडे मोर्चा वळविण्याचा प्रयत्न करीत होता. अशा वेळीं ब्रिटिश मंत्रिमंडळानें हिंदुस्थानशीं तडजोड घडवून आणण्यासाठीं सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना ब्रिटिश प्रधानमंडळाच्या वतीनें हिंदुस्थानास धाडिलें. मार्च महिन्यांत ते दिल्लींत येऊन दाखल झाले.

क्रिप्स-शिष्टाई आणि १९४२ चें आंदोलन

महात्मा गांधी हे सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या मुलाखतीस जाण्यास मुळींच तयार नव्हते; तथापि ब्रिटिश सरकारला हें माहीत होतें कीं, हिंदी राजकारणामागचो खरी शक्ति सेवाग्रामांत राहणारे महात्मा गांधी हीच आहे. ह्यांनीं प्रथमतः गांधींची मुलाखत घेतली आणि त्यांच्यापुढें इंग्लंडाहून आणलेली आपली योजना ठेविली. महात्मा गांधींनीं पहिल्याच मुलाखतींत त्यांना असें सांगितलें कीं, "तुम्हीं आणलेला हा चेक पुढील तारखेचा आहे. आज त्याला कांहीं किंमत नाहीं." याखेरीज त्यांचे इतरही अनेक आक्षेप या योजनेवर होते. या योजनेंत हिंदुस्थानचा स्वातंत्र्याचा व स्वयंनिर्णयाचा आणि घटनापरिषदेचा हक्क ब्रिटिशांनीं प्रथमच मान्य केला होता. ही एक हिंदी राजकारणाच्या ऐतिहासिक विकासाच्या दृष्टीनें पुढील महत्त्वाची पायरी होती यांत शंका नाहीं. परंतु त्या योजनेंत प्रत्येक

प्रांताला स्वयंनिर्णयाचा हक्क देऊन हिंदुस्थानचे दोनच नव्हे तर अनेक खंड पाडण्यास मुभा ठेविली होती. तसेंच हाच स्वयंनिर्णयाचा हक्क संस्थानिकांनाहि देण्यांत येऊन त्यांच्या प्रजेचा हक्क मात्र मुळींच मान्य केलेला नव्हता. अर्थात् ही योजना हिंदुस्थानचे अनेक तुकडे करणारी आणि संस्थानिकांची सुलतानशाही परकीय सत्तांच्या आश्रयानें चिरंतन करणारी अशी बनूं शकली असती. राष्ट्रसभेला ज्या प्रांतांत बहुमत मिळणें शक्य नव्हतें, ते प्रांत ब्रिटिशाचे हस्तक बनावेत आणि सर्व संस्थानिक ब्रिटिश सत्तेखालीं कायमचे राहावेत असाही परिणाम या योजनेचा झाला असता. शिवाय स्वयंनिर्णयाचा हक्क, ब्रिटिशांनीं राज्यकारभाराच्या सोईसाठीं जे प्रांत बनविले होते त्या प्रांतांना देऊं केला असल्यानें सबंध बंगाल आणि सबंध पंजाब यांचें भवितव्य केवळ मुसलमान जमातीच्या मतानें ठरविलें जाण्याचा धोका होता. असें असलें तरी ब्रिटिशांनीं जर संरक्षणासुद्धां सर्व सत्ता ताबडतोब हंगामी राष्ट्रीय सरकारच्या म्हणजे जबाबदार मंत्रिमंडळाच्या हातीं देण्याचें कबूल केलें असतें आणि त्या मंत्रिमंडळाच्या कारभारांत व्हाइसरॉयच्या नकारहक्काचा उपयोग अविवेकानें करण्यांत येणार नाहीं असें आश्वासन दिलें गेलें असतें तर राष्ट्रसभा या वेळीं तडजोड करण्यास तयार होती; पण तसें आश्वासन देण्यास व्यक्तिशः सर स्टॅफर्ड क्रिप्स तयार होतील अशी आशा प्रथम वाटत असली तरी येथील व्हाइसरॉय आणि ब्रिटिश प्रधानमंडळ यांनीं मागाहून सूचना करून त्यांना तसें आश्वासन न देण्याविषयीं सूचना दिली. यामुळें ही शिष्टाई यशस्वी होणें शक्य नव्हतें व झालीं नाहीं. तथापि या वेळपासून अशी एक गोष्ट सिद्ध झाली कीं, ब्रिटिश सरकार सर्व हिंदुस्थान एकराष्ट्र आहे ही भूमिका गृहीत धरून हिंदुस्थानशीं तडजोड करण्यास तयार होणार नाहीं. राष्ट्रसभेनें या वेळीं आपलें ध्येय अखंड हिंदुस्थान आणि संपूर्ण स्वातंत्र्य हेंच आहे असें जाहीर केलें, तरीही ज्या विभागांना हिंदुस्थानच्या संयुक्त राज्यांत राहण्याची इच्छा नाहीं असें सिद्ध होईल त्यांना हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या राज्यांत राहण्याची सक्ती करणार नाहीं असें आश्वासन देणें राष्ट्रसभेला भाग पडलें. तरीही

हिंदुस्थान आधीं स्वतंत्र झाला नाहीं तोंपर्यंत घटनापरिषद भरणार नाहीं अशीही भूमिका होती. क्रिप्स-शिष्टाई मोडल्यानंतर पुढें काय हा प्रश्न साहजिकच राष्ट्रापुढें येऊन उभा राहिला.

या वेळपर्यंत जपान सिंगापूर घऊन ब्रह्मदेशाकडे चाल करूं लागला होता. ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानचें संरक्षण करूं शकेल असा विश्वास जनतेला आणि पुढाऱ्याना या वेळीं वाटणें कठीण होतें. जपानचें आक्रमण असेंच चालू राहिल्यास ब्रह्मदेश जिंकून बंगालमध्यें प्रवेश करण्यास फारशी अडचण पडणारी नव्हती. उन्हाळा संपून पावसाळा लागणार एवढाच अवधि मध्यंतरीं होता. पावसाळ्याच्या अखेरीस जपानची स्वारी पूर्वेकडून हिंदुस्थानावर होण्याचा धोका दिसूं लागला होता. पश्चिमेकडून रशियाचा पराभव करून जर्मनी कॉकेशस पर्वत ओलांडून इराणांत घुसला तर त्यालाही हिंदुस्थानची पश्चिम सरहद्द गांठणें अवघड नव्हतें. अशा परिस्थितींत हिंदी जनतेचें कर्तव्य काय, हा एक मोठाच प्रश्न अगदीं नव्यानें हिंदुस्थानपुढें येऊन उभा राहिला. पंडित नेहरू व मौलाना आझाद हे लोक या वेळीं केवळ असहकार पुकारून तटस्थ राहावें अशा वृत्तीचे होते. परिस्थिति फार विकट झाल्यास पुनः महिन्या-दीड महिन्यांत ब्रिटिश सरकार नवी शिष्टाई करील आणि आपली मागणी मान्य होईल अशीही आशा त्यांना वाटत होती. इतर पुढारी महात्मा गांधींच्या मनोवृत्तीकडे पाहून आपलें धोरण ठरविणारे होते. गांधी ह्या वेळीं काय करतील ह्यावर देशाचें सर्व भवितव्य अवलंबून होतें. अहिंसादृष्टीनें प्रत्येक प्रश्नाचा विचार करणारा हा असामान्य क्रांतिकारक नेता ह्या वेळीं राष्ट्रास कोणता आदेश देईल याचा कोणासही निश्चित कयास बांधतां येईना. सर्व जनतेचे डोळे त्यांच्याकडे लागून राहिले होते.

महात्मा गांधी हे या वेळीं क्रिप्स-शिष्टाईचा शेवट होईपर्यंत दिल्लीस राहिले नाहींत. त्या योजनेसंबंधीं अनुकूल प्रतिकूल चर्चा करून त्यांनीं तिला आपला विरोधच असल्याचें सांगून ते सेवाग्रामास गेले. क्रिप्स गेल्यानंतर राष्ट्रसभेची कार्यकारिणी संपली आणि महात्मा गांधींच्याकडे तिची सर्व हकीकत कळविण्यांत आली. या वेळपासून गांधींनीं एक

अखेरचा सार्वत्रिक सत्याग्रहाचा स्वातंत्र्यसंग्राम करण्याचा निर्धार केला. क्रिप्स-शिष्टाई विफल झाल्यानंतर राष्ट्रसभेला प्रतिकाराचें हत्यार उपसल्यावांचून स्वस्थ बसणें अशक्य होतें. राष्ट्रसभा ही हिंदी जनतेच्या स्वातंत्र्यनिष्ठेची एक प्रतिमा व प्रतीक बनलेली होती. ही स्वातंत्र्य-निष्ठा महात्मा गांधी, पंडित नेहरूप्रभृति नेत्यांनीं आजपर्यंत प्रबळ बनविली आणि तिला युद्धाशीं असहकार करण्याची प्रेरणा दिली. तिच्या पाठीमागें देशांतील सर्व स्वातंत्र्यनिष्ठ शक्ति एकवटल्या होत्या आणि या शक्ति नष्ट करण्यासाठीं ब्रिटिश सरकार दडपशाहीचें हत्यार परजून तयार होतें. राष्ट्रसभेनें हिंदुस्थानांत वाढीस लागलेल्या आणि क्रांतिकारक स्वरूप धारण करूं लागलेल्या ह्या स्वातंत्र्यप्रेरणेस आक्रमक सत्याग्रहाचें स्वरूप दिलें नसतें तर राष्ट्रसभेच्या निरनिराळ्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना एकएकटें गांठून तुरुंगांत पाठविण्यास ब्रिटिश सरकारनें मागेंपुढें पाहिलें नसतें. युद्धकालांत ज्या पक्षाला युद्ध-विरोधी धोरण पुकारावयाचें असेल त्यानें एक तर युद्ध संपेपर्यंत तुरुंगांत जाऊन बसलें पाहिजे ; नाहीं तर देशांतील राज्यसत्तेला आपलें म्हणणें पटवून सिंहासनावर तरी आरुढ झालें पाहिजे. असें जर त्या पक्षास करतां आलें नाहीं तर तो पक्ष राजकारणाच्या क्षेत्रांतून नामशेष झाल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थानांतील राष्ट्रसभेच्या नेत्यांनीं या वेळीं जर स्वातंत्र्याच्या आक्रमक सत्याग्रहाची चळवळ पुकारली नसती तर त्या पक्षास ब्रिटिश सरकारनें डांबून ठेविलेंच असतें ; पण जनता अशा स्वातंत्र्ययुद्धाचा संदेश न मिळाल्यामुळें परकीयांच्या नव्या आक्रमणास अधिकाधिक अनुकूल बनून त्यांचें स्वागत करण्याची मनोवृत्ति राष्ट्रांत अधिक वाढली असती. ब्रिटिशांविरुद्ध येथील जनतेला इतका असंतोष वाटूं लागला होता कीं, ती ब्रिटिशांच्या सत्तेविरुद्ध लढणाऱ्या कोणत्याही परकीय सत्तेचें स्वागत करण्यास मनांतून तयार झाली असती आणि ही वृत्ति स्वीकारून जर हिंदी जनता एकदां ब्रिटिशांच्या गुलामगिरींतून सुटून दुसऱ्या सत्तेच्या गुलामगिरींत गेली असती तर तिला आपल्या शक्तीनें स्वातंत्र्य मिळविण्याची आकांक्षा केव्हांच धारण करतां आली नसती. ही आपत्ति टाळण्यासाठीं जनतेला स्वातंत्र्य-

संग्रामाचा उठाव करण्याचा संदेश देणें राष्ट्रसभेला आतां अपरिहार्य झालें होतें. अर्थात् महात्मा गांधींना हा लढा अहिंसेनें करावयाचा होता आणि राष्ट्रसभेचें स्वातंत्र्यलढ्याचें साधन सत्याग्रह हेंच एक होतें. इतर साधनांनीं लढा करणें तिला अशक्य होतें आणि सत्याग्रहाचें साधन तिला परिचित होतें. या वेळच्या असामान्य परिस्थितींत सत्याग्रहाचा स्वातंत्र्यसंग्राम करण्यांत कांहीं लोक अत्याचार करण्याचा धोका निर्माण होणार होता हें खरें असलें तरी लोकांतील अनत्याचारी वृत्तीचें संघटन अधिक करीत बसण्याचा तो काळ नव्हता. कारण ज्या राज्ययंत्राच्या छायेखालीं या अनत्याचारी लढ्याची तयारी करण्याचा प्रयत्न आजपर्यंत चालू होता, तें राज्ययंत्र परकीय आक्रमणानें कोसळून पडण्याचा काळ नजीक आला होता. अर्थात् या वेळीं स्वस्थ बसून भावी अनत्याचारी लढ्याची तयारी करणें ही भाषा निरर्थक झाली. अशी तयारी अधिक व्हावी म्हणून महात्मा गांधींनीं पंचवीस वर्षें एकसारखे यत्न केले होते. आणि अनेक लढे करून जनतेला प्रत्यक्ष प्रयोगानें अशा क्रांतीचें शिक्षण देण्याचा उपक्रमही केलेला होता. आतां अखेरचा संग्राम करण्याचा काळ येऊन ठेपला होता. अधिक काळ वाट पाहण्यास संधि नव्हती.

ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन मे १९४२ पासून महात्मा गांधींनीं ब्रिटिश लोकांना या देशांतून तुम्ही ताबडतोब चालते व्हा असा आदेश देण्यास सुरुवात केली. ही मागणी आपण ब्रिटिश लोकांच्या हिताच्या दृष्टीनें आणि दोस्तराष्ट्रांच्या विजयाच्या दृष्टीनेंही करीत आहों अशी महात्मा गांधींची भूमिका होती. या वेळीं चीन आणि रशिया हीं राष्ट्रें इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, यांचीं दोस्तराष्ट्रें म्हणून लढत होतीं. युद्धाचा प्रवेश आशिया खंडांत होऊन त्याच्या वणव्याच्या ज्वाला हिंदुस्थानच्या चारही दिशांस पसरूं लागल्या होत्या. अशा वेळीं हिंदुस्थाननें जर आपलें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं अंतिम बलिदान केलें नाहीं तर त्या देशाची राखरांगोळी झाल्यावांचून राहणार नाहीं. हाही विचार गांधींच्यापुढें होता. सर्व जगभर आणि आपल्या राष्ट्राच्या सभोंवार महायुद्धाचा वणवा पेटून सर्व जुनें जग त्यांत वितळून जात

असतां आपल्या राष्ट्रानें आपल्या उद्धाराचा कोणताही मार्ग न स्वीकारतां केवळ निष्क्रिय राहावें आणि येतील त्या आपत्ति भोगाव्यात ही निर्जीव अवस्था गांधींना असह्य झाली. आपण या वेळीं जगाला स्वातंत्र्य-प्राप्तीचा एक नवा मार्ग दाखवून द्यावा अशी जी त्यांची मनीषा आजन्म तपश्चर्या करून त्यांनीं वाढीस लावली होती ती मनीषा त्याच्या अंतरात्म्याच्या प्रेरणेच्या रूपानें या वेळीं त्यांना प्रतीत होऊं लागली. ही अंतःप्रेरणा केवळ आपल्या एकट्याच्या अंतःकरणांतील ती एक आत्मोद्धाराची प्रेरणा आहे, असें ते मानीत होते. आपल्या अंतःकरणांतील या प्रेरणेचा ध्वनि बाहेर उमटल्यास सर्व हिंदी जनतेची स्वातंत्र्यप्रेरणा जागृत होईल आणि ती जनता आपण पंचवीस वर्षें तिला जो अनत्याचारी असहकाराचा क्रांतिकारक संदेश दिला, तो संदेश अमलांत आणण्यास एकदम खडी होईल, असा त्यांना आत्मविश्वास वाटत होता. तथापि त्यांनीं आपलें हें मत जनतेपुढें मांडण्याआधीं अलाहाबादेस भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या नेत्यांना कळविलें. तेथें त्याची चर्चा झाली. तेथें एक ठराव त्यांच्या मसुद्यांत थोडाफार फरक करून मंजूर करण्यांत आला. त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू गांधींना येऊन भेटले आणि गांधींनीं जें आंदोलन करण्याचें ठरविलें होतें, त्या-संबंधींच्या आपल्या शंका त्यांच्यापुढें मांडल्या. हा विचारविनिमय चालू असतां आपल्या आंदोलनामुळें जगांत चालू असलेल्या महायुद्धावर कोणते परिणाम घडतील, त्यामुळें चीन, रशिया, वगैरे पुरोगामी राष्ट्रांना पराभूत व्हावें लागेल कीं त्यांची शक्ति वाढीस लागेल या गोष्टींचाही खल ह्या दोन नेत्यांनीं केला. अखेरीस आपल्या राष्ट्राच्या आणि जागतिक राजकारणाच्या दोनही दृष्टींनीं आज असें आंदोलन करणें कसें आवश्यक आहे तें गांधींनीं पंडित जवाहरलाल नेहरू यांना पटवून दिलें. तोंपर्यंत जून महिना सुरू झाला. यानंतर गांधींचा निर्धार कायम होऊन राष्ट्रसभेनें त्यास पाठिंबा देण्याचा निर्णय केला.

जुलै महिन्याच्या मध्यास वर्धा येथें राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीची बैठक झाली आणि तींत स्वातंत्र्यसत्याग्रहाचा ठराव मंजूर करण्यांत आला.

आतां फक्त अखिल भारतीय काँग्रेस समितीची त्याला मंजुरी मिळवावयाची राहिली. यासाठीं ७ ऑगस्ट रोजीं मुंबईस तिची बैठक बोलावण्यांत आली. ७ व ८ या दोन तारखांस ही बैठक होऊन स्वातंत्र्यसंग्रामाचा ठराव मंजूर झाला. त्यावर सर्व पुढाऱ्यांचीं भाषणें झालीं. त्यांत महात्मा गांधींचें भाषण अत्यंत तेजस्वी झालें. 'हा स्वातंत्र्याचा अखेरचा संग्राम आहे. आजपासून आपण सर्व स्वतंत्र आहों असें समजून तुम्ही चालूं लागा. तथापि मी व्हाइसरॉयची गांठ घेऊन अद्यापि समेट होतो कीं काय आणि लढ्यावांचून स्वातंत्र्य मिळूं शकतें कीं नाहीं तें पाहणार आहें. तोंपर्यंत केवळ विधायक कार्य करीत राहा. कोणत्याही तऱ्हेचा कायदेभंग करूं नका.' ज्या वेळीं महात्मा गांधी राष्ट्राला आदेश देतील तेव्हा राष्ट्रानें त्यांच्या आदेशास अनुसरून सत्याग्रहसंग्राम करावा असें ठरावांत म्हटलें होतें. जर महात्मा गांधी व इतर पुढारी सरकारनें बंदींत टाकले किंवा त्यांचे आदेश लोकांना मिळूं नयेत अशी परिस्थिति निर्माण झाली तर राष्ट्रांतील प्रत्येक स्वातंत्र्येच्छु व्यक्तीनें आपल्या अंगचें सर्व बल आणि आपलें सर्वस्व या लढ्यांत खर्ची घालावें. केवळ अहिंसेचें बंधन घालून प्रत्येकानें विवेकबुद्धीप्रमाणें सत्याग्रहाचें अनुसरण करावें. अशा परिस्थितींत प्रत्येक मनुष्याचा अंतरात्मा हाच त्याचा मार्गदर्शक नेता होऊं शकतो; अशा तऱ्हेचा या लढ्याचा भाग ठरावांत होता. पण हा भाग ठरावाच्या अगदीं अखेरीस असून ठरावांतील पूर्वभागांत हिंदुस्थानांतून ब्रिटिश साम्राज्यानें आपली सत्ता ताबडतोब काढून घेणें राष्ट्राच्या रक्षणाच्या दृष्टीनें आणि दोस्त राष्ट्रांचे जाहीर हेतु सफल होण्याच्या दृष्टीनें कसें अत्यंत आवश्यक आहे तें माडण्यांत आलें होतें. तसेंच ब्रिटिश राज्यसत्ता निघून गेल्यानंतर येथें एक सर्वपक्षीय हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन होईल, व तें दोस्त राष्ट्रांशीं सहकार्याचा तह करून आपल्या राष्ट्राचें संरक्षण करील व या कामीं शस्त्रबल आणि आत्मबल या दोहोंचाही उपयोग करील असें म्हटलें होतें. तसेंच राष्ट्रसभेला आपल्या हातांत सर्व सत्ता घेण्याची मुळींच इच्छा नाहीं. ह्या देशांत एक स्वयंनिर्णयाच्या व स्वेच्छेच्या आधारावर निर्माण झालेलें संयुक्त

राज्य स्थापन व्हावें अशी राष्ट्रसभेची इच्छा असून ब्रिटिशांच्या निर्याणानंतर जें राष्ट्रीय सरकार स्थापन होईल, त्या हंगामी राष्ट्रीय सरकारच्या छत्राखालीं शक्य तितक्या लवकर एक सार्वत्रिक मताधिकारानें निवडलेली घटनापरिषद भरविण्यांत येईल व तिच्यामध्यें स्वतंत्र हिंदुस्थानची राज्यघटना ठरविली जाईल. या संक्रमण-कालांतील हंगामी राष्ट्रीय सरकारचें अंतिम प्रभुत्व शेतांत व कारखान्यांत खपणाऱ्या शेतकरी, कामकरी जनतेकडेच असावें असेंही राष्ट्रसभेचें मत या ठरावांत नमूद झालेलें आहे.

या ठरावांतील कांहीं मुद्यांचें अधिक स्पष्टीकरण येथें करणें अवश्य आहे. या ठरावानें प्रत्यक्ष लढा पुकारलेला नव्हता. जर आवश्यक असेल आणि शिष्टाईच्या मार्गानें स्वातंत्र्याची प्राप्ति होणें अशक्य आहे असें गांधीजींना आढळून आलें तर त्यांच्या आज्ञेनें हा लढा पुकारला जावयाचा होता. त्याचा सर्व कार्यक्रम पुढें महात्मा गांधी ठरविणार होते. तो त्यांत नमूद केलेला नाहीं. या ठरावानें केवळ लढा सुरू करण्याचे अधिकार महात्मा गांधींना देण्यांत आलेले होते. हा लढा अहिंसेनें होईल, हें मात्र त्यांत निःसंदिग्धपणें घोषित करण्यांत आलेलें होतें महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं होणारा लढा हा अहिंसकच असला पाहिजे ह्याबद्दल कोणाही काँग्रेस कार्यकर्त्यास यत्किंचितही संशय नव्हता आणि हिंसक तंत्र स्वीकारून त्याला सशस्त्र क्रांतीचें स्वरूप आपणांस ताबडतोब देतां येईल असाही पण कोणा काँग्रेसजनास भ्रम नव्हता. मात्र हा लढा ब्रिटिश सत्ता नष्ट होईपर्यंत अखेरपर्यंत चालावयाचा आणि त्यांत आतां केवळ तुरुंगांत जाण्याचाच प्रसंग नसून प्राण देण्याचा आणि आपलें सर्वस्व गमावण्याचा प्रसंग आहे, याची मात्र स्पष्ट जाणीव निरनिराळ्या पुढाऱ्यांनीं आपल्या भाषणांनीं जनतेला करून दिली होती. याच्यापलीकडे त्या लढ्याचा कोणताही कार्यक्रम जनतेपुढें ठेवलेला नव्हता.

या लढ्यामध्यें राष्ट्रीय हंगामी सरकार आणि घटनापरिषद यांचा जो उल्लेख आहे, तो उल्लेख सर्व हिंदुस्थानांतून ब्रिटिशांची साम्राज्यसत्ता निघून गेल्यानंतर बनविण्यांत येणाऱ्या हंगामी राष्ट्रीय सरकारचा

आणि त्याच्या छत्राखालीं भरणाऱ्या घटनापरिषदेचा आहे. पुढें हा लढा अखेरपर्यंत लढविला जाणें अशक्य झालें आणि त्यामुळें ब्रिटिश साम्राज्याची सत्ता या देशांत कायम असतांना त्यांनीं ठरविलेल्या योजनेप्रमाणें एक हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन झालें, आणि त्यांनीं ठराविलेल्या नियमास अनुसरून व घटनेस अनुसरून घटनापरिषद भरविली गेली. या दोनही गोष्टी ४२ च्या वरील ठरावांत नमूद केलेल्या राष्ट्रीय सरकार व घटनापरिषद यांहून भिन्न स्वरूपाच्या व भिन्न परिस्थितींत घडलेल्या अशा आहेत. ब्रिटिशांना बाहेर काढल्यानंतर भरणाऱ्या घटनापरिषदेचें व राष्ट्रीय सरकारचें स्वरूप वरील घटनापरिषदेस व राष्ट्रीय सरकारास प्राप्त होणें शक्य नव्हतें. महायुद्ध संपल्यानंतर जी घटनापरिषद भरली गेली ती मुस्लिम लीगच्या दुराग्रहानें मोडून जावी अशीच तिची घटना होती आणि जें हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन झालें त्याला मुस्लिम लीगचें प्रांतिक मंत्रिमंडळ ज्या प्रांतावर राज्य करीत होतें तेथील अल्पसंख्याकांच्या कत्तली थांबविण्याचें लष्करी सामर्थ्य नव्हतें. यामुळें देशाची फाळणी मान्य केल्यावांचून हिंदुस्थानला स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय हे हक्क पदरांत पाडून घेणें लढ्यावांचून अशक्य होतें. १९४२ चा लढा पूर्णपणें यशस्वी झाला नाहीं. यामुळें या सर्व आपत्ति भोगणें राष्ट्राला पुढें अपरिहार्य झालें. राष्ट्रसभेच्या नेत्यांनीं फाळणीला निरुपाय म्हणून मान्यता दिली. गांधींना अखेरपर्यंत ही मान्यता देणें पटलें नाहीं. परंतु राष्ट्रसभेच्या नेत्यांनीं ज्या योजनेला मान्यता दिलेली आहे ती योजना फेटाळून लावून ताबडतोब क्रांतीचा दुसरा प्रयत्न करण्याची ताकद आपल्या अंगीं व राष्ट्राच्या अंगींही आज दिसत नाहीं म्हणून राष्ट्रसभेच्या नेत्यांच्या या निर्णयाविरुद्ध राष्ट्रानें बंड करूं नये असा सल्ला त्यांनीं १९४७ च्या जूनमध्यें भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमेटीस दिला. या पुढील गोष्टी आहेत. येथें त्यांचा उल्लेख करण्याचें कारण एवढेंच कीं, पुढें भरलेली घटनापरिषद आणि पुढें निर्माण झालेलें राष्ट्रीय सरकार यांचें स्वरूप १९४२ सालीं सत्याग्रहसंग्रामाच्या लढ्यांत ज्या राष्ट्रीय सरकारचा व घटनापरिषदेचा उल्लेख आहे त्याहून भिन्न असें होतें हें वाचकांच्या लक्षांत यावें.

वरील ठरावांत जें राष्ट्रीय हंगामी सरकार कल्पिण्यांत आलेलें आहे त्याची अंतिम सत्ता शेतकरी-कामकरी वर्गाच्या हातीं असावी असा एक फार महत्त्वाचा उल्लेख या ठरावांत करण्यांत आलेला आहे. याच ठरावाच्या आधारें राष्ट्रीय सभेच्या स्वराज्याचा अर्थ शेतकरी-कामकरी राज्य असा करण्यांत आला पाहिजे असें या वेळपासून तिचे कार्यकर्ते व नेते म्हणूं लागले. अर्थात् केवळ राजकीय क्रांति एवढेंच तिचें ध्येय आतां उरलें नाहीं; तर राजकीय क्रांतीच्या आधारें किंवा तिच्याबरोबर सामाजिक व आर्थिक क्रांतिही करणें हें राष्ट्रसभेचें ध्येय आहे असें या वेळपासून म्हणतां येऊं लागलें. या बाबतींत राष्ट्रसभेंतील समाजवादी नेत्यांचे विचार व धोरण स्पष्ट असून महात्मा गांधी अहिंसापालनाची शर्त त्यांच्यावर लादून त्यांना सामान्यतः पाठिंबा देत असत.

वरील ठराव ता. ८ ऑगस्ट रोजीं रात्रीं अखिल भारतीय काँग्रेस समितींत प्रचंड बहुमतानें पास झाला आणि दुसरा दिवस उगवण्याच्यापूर्वी ब्रिटिश सरकारनें राष्ट्रसभेचे सर्व राष्ट्रीय, प्रांतिक आणि स्थानिक पुढारी एकदम उचलून तुरुंगांत घातले. एकदोन दिवसांच्या आंत कमींत कमी पंचवीस हजार राजबंदी सर्व देशांत एकदम तुरुंगांत घातल्यामुळें साहजिकच सर्व देशभर कायदेभंगाची एकदम लाट उसळली. जनता, आपले पुढारी आपणांपासून सरकारनें निष्कारण हिरावून नेले हें पाहून क्रोधानें आणि संतापानें बेभान झाली आणि राष्ट्रसभेच्या 'चलेजाव' या घोषणेचे ध्वनी खेड्यांपाड्यांतून सर्वत्र घुमूं लागले. हजारों तरुण कार्यकर्ते देशभर हिंडून खेड्यापाड्यांत राष्ट्रसभेचा सत्याग्रह-संग्रामाचा संदेश फैलावूं लागले आणि ब्रिटिश सरकार ही सर्व प्रचंड चळवळ हाणून पाडण्यासाठीं सररहा गोळीबार आणि लाठीमार यांचा अवलंब करूं लागलें. कोठेंही शांततेचें निदर्शन करूं द्यावयाचें नाहीं, सभा भरवूं द्यावयाच्या नाहींत, मिरवणुकी काढल्यास एकदम गोळीबार करून त्या उधळून लावावयाच्या, असा दडपशाहीचा लष्करी कायदा सर्व देशभर नंगानाच घालूं लागला. लोकांना दहशत घालून दडपशाहीच्या वरवंट्याखालीं

राष्ट्रसभा आणि तिनें निर्माण केलेलें राष्ट्रीयत्व ठेंचून काढण्याचा हा एक आसुरी प्रयत्न होता. राष्ट्रसभा म्हणजे तिचे कार्यकर्ते या वेळीं ब्रिटिश सरकारला आपल्या देशांतून कायमचे घालवून देण्याचा हा लढा आहे अशा हिरिरीनें परंतु मनुष्यहत्या न करतां, स्वतःचा प्राण देण्यासही न भितां, स्वातंत्र्यनिष्ठेनें इंग्रजांशीं निःशस्त्र असताही लढूं लागले.

या लढ्यांत भूमिगत राहून राष्ट्रसभेचा संदेश देशभर फैलावणें आणि निदर्शनांचे कार्यक्रम अमलांत आणणें, दळणवळणाचीं साधनें बंद पाडून राज्यकारभारांत अडथळे निर्माण करणें, पोलिस चौक्यांवर हल्ले करून त्या जाळून टाकणें, असे अनेक प्रकार करण्यांत येऊं लागले. हे सर्व प्रकार सत्याग्रही तंत्रांत बसणारे नव्हते, तथापि त्या वेळीं बाहेर जो प्रक्षोभ निर्माण झाला होता त्याला प्रकट तोंड पाडण्याचा तो एक प्रयत्न होता. या प्रयत्नामागें त्याला एक दिशा दाखवून देणारीं गुप्त-मंडळें होतीं आणि त्यांच्या संघटणेचें जाळें देशभर पसरलें होतें. या सर्व गोष्टी राष्ट्रसभेच्या भक्तांनीं आपल्या बुद्धीनें व स्वतःच्या जबाबदारीवर चालविलेल्या होत्या. महात्मा गांधींचा कोणताही कार्यक्रम अधिकृत स्वरूपांत त्यांना मिळालेला नव्हता. ते आपल्या बुद्धीप्रमाणें आणि वृत्तीप्रमाणें परंतु एकत्र विचार करून जनतेच्या या प्रक्षोभक आंदोलनाला कांहीं दिशा लावीत होते. राष्ट्रसभेचे हे कार्यकर्ते भूमिगत राहून एक प्रकारचा निःशस्त्र लढा ब्रिटिशांशीं खेळत होते आणि सामान्य जनतेचें चित्त त्यांनीं आपल्याकडे ओढून घेतलेलें होतें. मनुष्याची हिंसा करावयाची नाहीं एवढें एकच बंधन स्वीकारून ते जनतेंत क्रांतीची भावना जागृत ठेवीत होते आणि त्यांच्या या प्रयत्नामुळें देशांतील जनता ब्रिटिशांशीं चाललेला गनिमी काव्याचा लढा पाहून भूमिगतांना भरपूर सहानुभूति दाखवीत होती व सहाय्यही देत होती. यांत जे विध्वंसाचे व अत्याचाराचे प्रकार कांहीं ठिकाणीं झाले, ते सरकारनें केलेल्या अनन्वित दडपशाहीचें व राक्षसी अत्याचारांचें फल होतें. ब्रिटिश सरकार आणि हिंदी जनता यांच्यांतील हा झगडा ऑगस्टपासून जानेवारीपर्यंत बऱ्याच

तीव्र स्वरूपांत चालला होता. अर्थात् पहिल्या दोन महिन्यांत त्याचें जें प्रचंड उग्र स्वरूप होतें तें हळूहळू सौम्य होऊं लागलें. तथापि हा झगडा बंद होण्याचा संभव मुळींच दिसेना. राष्ट्रसभा कधींही, दडपशाही केली तरी, नामशेष होऊं शकत नाहीं आणि जनतेच्या अंतःकरणांत तिनें निर्माण केलेली स्वातंत्र्यनिष्ठा चुरडून टाकण्यांत ब्रिटिश सरकारला यश येणें शक्य नाहीं, एवढी गोष्ट चारपांच महिने झाल्यानंतर कोणासही स्पष्ट दिसून येत होती.

इकडे महात्मा गांधी, त्यांच्या पत्नी सौभाग्यवती कस्तुरबा गांधी, श्रीमती सरोजिनी नायडू आणि महात्मा गांधींचे चिटणीस श्रीयुत महादेवभाई देसाई यांना येरवड्यास आणून आगाखान पॅलेसमध्यें स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें होतें आणि राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीचे सर्व सभासद अहमदनगरच्या किल्ल्यांत बंदींत ठेवण्यांत आले होते. व बरेच दिवस जनतेला कळविण्यांत आलें नाहीं तरीही ही तिची बातमी लोकांनीं पसरविली होतीच. या सर्व पुढाऱ्यांना आणि हजारों कार्यकर्त्यांना सत्याग्रहाचा लढा सुरू होण्यापूर्वी कोणतेंही कारण नसतांना ज्या अर्थी सरकारनें निष्कारण पकडलें त्या अर्थी सरकारनेंच असमर्थनीय अशी दडपशाही करून अत्याचारास प्रवृत्त केलें आहे आणि म्हणून ९ ऑगस्टपासून पुढें लोकांनीं ज्या गोष्टी केल्या त्यांत जे अत्याचाराचे प्रकार झाले किंवा त्यांना जें अनिष्ट वळण लागलें त्या सर्वांची जबाबदारी केवळ ब्रिटिश सरकारवरच आहे आणि म्हणून सरकारनें हें टाकलेलें दडपशाहीचें पाऊल परत घेऊन राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना बंधमुक्त केल्यावांचून आपण या बाबतींत कांहींही न करतां सहा महिनेपर्यंत स्वस्थ बसावें आणि तोंपर्यंत जर सरकारला आपल्या धोरणाचा पश्चात्ताप होऊन त्यांत माघार घेण्याची बुद्धि झाली नाहीं तर आपण आपली बाजू जगापुढें मांडण्याचा कोणताही उपाय नसल्यामुळें प्रायोपवेशन करावें आणि परमेश्वरापुढें आपलें गाऱ्हाणें मांडावें अशा तऱ्हेचे विचार महात्मा गांधींच्या डोक्यांत या वेळीं येत होते. त्यांनीं आगाखान पॅलेसमध्यें गेल्यानंतर चारपांच दिवसांत लॉर्ड लिन्लिथगो यांना एक सविस्तर पत्र लिहून राष्ट्रावर ही आपत्ति ओढवून घेण्याची

जबाबदारी सरकारच्या अविवेकी धोरणावर आहे आणि सरकारनें आपल्या धोरणाचें समर्थन करणारा जो ठराव जाहीर केला आहे तो कसा चुकीचा आहे तें दाखवून दिलेलें होतें.

'आपण सत्याग्रहाच्या ठरावानें केवळ सत्याग्रह सुरू करण्याचा अधिकार घेऊन ठेवलेला होता. प्रत्यक्ष लढा सुरू करण्यापूर्वी आपण व्हाइसरॉयची गांठ घेऊन आपली मागणी त्यांच्यापुढें ठेवणार होतों. शक्यतों लढा न करतां हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सोडवावा असाच आपला हेतु होता. आणि लढा करणें अपरिहार्य झालें तरीही त्यांत लोकांनीं अत्याचार करूं नये याबद्दल शक्य ती सावधगिरी आपण घेणार होतों. पण इतक्या सावधगिरीनें आणि व्यवस्थितपणें हिंदुस्थाननें आपल्या स्वातंत्र्याची चळवळ चालवलेली पाहूनच जणुं काय तुम्हांस चीड आली आणि जर राष्ट्रसभेला अशी शांततेनें चळवळ करण्याची संधि लाभली तर सर्व जगाचें मत तिच्या स्वातंत्र्याच्या मागणीस अनुकूल होऊन आपणांस हिंदुस्थानची राज्यसत्ता सोडावी लागेल अशी भीति ब्रिटिश सरकारला वाटली. या भीतीनें आणि कांहीं झालें तरी हिंदुस्थानवरील सत्ता सोडावयाची नाहीं, मग त्यामुळें दोस्त राष्ट्रांच्या वतीनें चालू असलेल्या युद्धावर कांहींही परिणाम होवो, किंवा चीन, रशिया यांसारख्या दोस्तांना त्याचीं कोणतींही फळें भोगावयास लागोत, अशा अविवेकी दुराग्रहानें सरकारनें राष्ट्रसभेवर एकदम झडप घातली. एवढेंच नाहीं, तर राष्ट्रसभा ही एक एकपक्षीय हुकूमशाही देशावर गाजवूं पाहत आहे आणि हिंदी राष्ट्र स्वतंत्र करावें असा जो ब्रिटिशांचा हेतु त्याच्याही आड तीच येत आहे, असेही आरोप सरकारनें राष्ट्रसभेवर या ठरावांत केले आहेत. राष्ट्रसभेची बदनामी करण्याचे हे जे प्रयत्न ब्रिटिश सरकारनें चालविले आहेत ते सर्व खोटे आहेत. राष्ट्रसभेनें आपल्या हातांत सत्ता मागितलेली नव्हती. हिंदुस्थान स्वतंत्र होत असल्यास मुस्लिम लीग किंवा इतर कोणत्याही पक्षाच्या हातीं सत्ता देऊन ब्रिटिश चालते झाले तरीही आमची त्यास हरकत नाहीं, असें राष्ट्रसभेच्या अध्यक्षांनीं जाहीर केलेलें आहे. ब्रिटिश

साम्राज्य नष्ट करावें हा जो राष्ट्रसभेचा प्रयत्न आहे तो जसा हिंदुस्थानच्या प्रेमानें प्रवृत्त झालेला आहे त्याचप्रमाणें तसें करण्यानें ब्रिटिश जनतेचें आणि मानवजातीचें हित होईल असेंच राष्ट्रसभेचें मत आहे. याविरुद्ध कोणतींही विधानें सरकारनें केलीं असलीं तरी मी असें सांगतों कीं, समग्र हिंदुस्थान आणि जग ह्यांच्या हितांहून भिन्न असें कोणतेंही स्वतःचें हित राष्ट्रसभेच्या डोळ्यांपुढें नाहीं. हिंदुस्थान सरकार असें म्हणतें कीं, हिंदुस्थानचें रक्षण करणें, त्याची युद्ध चालविण्याची शक्ति कायम ठेवणें, त्याचें हितरक्षण आणि हिंदुस्थानांतील निरनिराळ्या हितसंबंधांचें न्याय-बुद्धीनें व समतेनें रक्षण करणें याची जबाबदारी आपणांवर आहे. यासंबंधीं मी एवढेंच म्हणतों कीं, ब्रह्मदेश, सिंगापूर, मलाया या भागांत जे प्रकार चालू आहेत ते लक्षांत घेतां वरील विधान करणें म्हणजे सत्याची चेष्टा करण्यासारखेंच आहे; तसेंच जे पक्ष स्वतः हिंदुस्थान सरकारनेंच निर्माण केले आहेत त्या पक्षांचें व त्यांच्या हितसंबंधांचें आम्ही समतेनें रक्षण करूं असा दावा सरकारनें करावा ही एक दुःखद घटना आहे. चीन आणि रशिया यांच्या स्वातंत्र्याचें रक्षण हा जो दोस्तांचा जाहीर शुद्ध हेतु त्याच्याशीं आमचें हिंदुस्थान सरकारशीं पूर्ण मतैक्य आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांना नाझीवाद हा इतका तिरस्कार्य वाटतो आणि चीन आणि रशिया यांच्यावर त्यांचें इतकें प्रेम जडलेलें आहे कीं, कांहीं काल साम्राज्यशाहीविरुद्ध आपला लढा विसरून जाण्याचाही त्यांनीं प्रयत्न केला. पण जेव्हां त्यांची अशी खात्री झाली कीं, हिंदुस्थान जर स्वतंत्र झाला नाहीं तर चीन आणि रशिया या दोन राष्ट्रांच्या संरक्षणासही धोका येईल, तेव्हां त्यांनीं माझ्या संकल्पित चळवळीस आपला पाठिंबा दिला. आपल्या मित्रास तुरुंगांत ठेवण्यात तुम्हीं खचित चूक केलेली आहे. म्हणून मी असा निष्कर्ष काढतों कीं, सरकारनें काँग्रेसवर जी दडपशाही केली तिचा हेतु दोस्त राष्ट्रांस युद्धसहाय्य करावें हा नसून कसेंही करून आपली हिंदुस्थानवरची सत्ता सोडूं नये एवढाच हेतु सरकारच

आहे. या दुराग्रहामुळेंच राष्ट्रसभेची मागणी धुडकावून तिच्यावर दडपशाहीची झडप घालण्यांत आलेली आहे.'

हें पत्र महात्मा गांधींनीं ता. १४ ऑगस्ट रोजीं आगाखान पॅलेसमधून लिहिलेलें आहे. त्याला ता. २२ ऑगस्ट रोजीं लॉर्ड लिनलिथगो ह्यांनीं एवढेंच उत्तर पाठविलें कीं, तुमचें पत्र वाचून मीं विचार केला. तुम्हीं सरकारवर जी टीका केली ती मला पटत नाहीं व सरकारच्या धोरणाचा फेरविचार करावा असेंही पण वाटत नाहीं.

यानंतर ३१ डिसेंबरपर्यंत कांहीं महत्त्वाचा पत्रव्यवहार झाला नाहीं. ३१ डिसेंबर रोजीं महात्मा गांधींनीं व्हाइसरॉय यांना एक पत्र लिहून आपण आतां फार काळ आपलें म्हणणें जगापुढें मांडल्यावांचून तुरुंगांत स्वस्थ राहूं शकत नाहीं असें कळविलें. "आपल्यावर कोणताहि आरोप कोर्टापुढें सिद्ध करण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकार घेत नाहीं. आपल्याविरुद्ध व राष्ट्रसभेविरुद्ध एकसारखा खोटा प्रचार आणि जनतेवर असह्य जुलूम सरकार करीत आहे. या यातना सहा महिन्यांहून अधिक काळ आपण सहन करणार नाहीं" असें गांधींनीं या पत्रानें व्हाइसरॉयना कळविलें. सहा महिनेपर्यंत आमच्यावरील आरोप खरे आहेत असें आम्हांस पटविण्याची किंवा कोर्टांत सिद्ध करण्याची जबाबदारी जर सरकारनें घेतली नाहीं तर प्रायोपवेशन करून ईश्वराकडे दाद मागण्याचा सत्याग्रही मार्ग अवलंबिणें आपणांस भाग पडेल असें त्यांनीं या पत्रांत लिहिलें होतें. "तुम्हीं जीं पत्रकें काढलीं, राजाजींना जें उत्तर दिलें आणि अमेरी यांनीं माझ्यावर जो हल्ला चढविला त्यावरून माझ्या शुद्ध हेतूसंबंधीं तुम्हांस शंका आली असल्याचें सिद्ध होतें. असें असेल तर तुम्हीं मला बोलावून आपल्या शंकेचें समाधान करावयास हवें होतें. पण माझ्यावर तुमचा इतका राग आहे कीं, चिमूर-प्रकरणासंबंधीं प्रायोपवेशन करून मरूं लागलेल्या माझ्या मित्रास (प्रो. भणसाळी यांना) मी एक जो संदेश पाठविला तोहि तुम्हीं त्यांना पोहोंचूं दिला नाहीं. आणि इतकें असूनहि बाहेर काँग्रेस कार्यकर्ते, ज्यांना तुम्ही अत्याचार म्हणतां, अशीं जीं कृत्यें करीत आहेत यांचा मीं निषेध करावा अशीहि तुमची अपेक्षा आहे. यासंबंधींचा

सेन्सॉर केलेल्या वर्तमानपत्रांतलि बातम्यांहून दुसरा कोणताहि पुरावा माझ्यापुढें नाहीं व या बातम्यांवर माझा विश्वास बसूं शकत नाहीं. ह्याहून अधिक यासंबंधीं मी कांहीं लिहूं इच्छीत नाहीं. १९०६ सालीं दाक्षिण आफ्रिकेंत असतां, मानवी व्यवहारांत हिंसा आणि असत्य यांचा जो फैलाव झालेला आहे तो नष्ट करून अहिंसा व सत्य ह्यांची संस्थापना करण्याची जीवनदीक्षा घ्यावी असा साक्षात्कार मला झाला. त्यानंतरच १९१४ सालीं मी दक्षिण आफ्रिकेंतून या देशांत आलों, हें तुम्हांला माहीतच आहे. सत्याग्रहीं धर्मांत पराभवाला स्थानच नाहीं. तुरुंग हेंही एक ह्या धर्माच्या प्रचाराचें साधन असतें; पण त्याच्याही कांहीं मर्यादा आहेत. तुम्हीं मला ह्या ठिकाणीं ठेवून ज्या सुखसोयी दिलेल्या आहेत त्यांचा उपभोग केवळ मी कर्तव्यबुद्धीनेंच घेत आहें. आणि तें एवढ्याच आशेनें कीं, ज्यांनीं निरपराधी लोकांवर अन्याय केला आहे त्यांना आपली चूक कळून येईल. या घटनेस अधिकांत अधिक सहा महिने व्हावेत असें मीं योजिलें होतें. ही कालमर्यादा आतां संपत आली. यानंतर मला धीर धरणें अशक्य होत आहे. अशा परिस्थितींत प्रायोपवेशनानें बलिदान करणें हा एक मार्ग सत्याग्रही धर्मांत असतो, पण तो केवळ अखेरचा मार्ग आहे. सर्व उपाय थकल्यावांचून त्याचा उपयोग करतां कामा नये. शक्य तर हें दिव्य टाळण्याची माझी इच्छा आहे. हें टाळण्याचा एक उपाय आहे. मी चुकलों आहें अशी माझी आपण खात्री केली तर हें टळूं शकेल. मला तुम्ही आपणांजवळ बोलवूं शकाल किंवा तुमच्या विश्वासांतील माणूस माझ्याकडे पाठवून माझी खात्री करण्याचा प्रयत्न करूं शकाल. जर आपली इच्छा असेल तर याहून अन्यही अनेक मार्ग आपणांस सांपडूं शकतील. आपल्या त्वरित उत्तराची मी अपेक्षा करावी काय? नवें वर्ष आपल्या सर्वांचे विरोध नष्ट करून शांतता स्थापन करो."

यानंतर व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो आणि महात्मा गांधी यांच्या दरम्यान जो बराच पत्रव्यवहार झाला त्यांत व्हाइसरॉयनीं राष्ट्रसभा आणि महात्मा गांधी हेच देशांतील अत्याचारास जबाबदार

आहेत हा आरोप पुनः पुनः केला आणि 'हा आरोप तुम्ही सिद्ध करूं शकणार नाहीं. ८ ऑगस्टनंतर झालेल्या सर्व गोष्टींची जबाबदारी केवळ एकट्या सरकारवरच आहे' हें आपलें म्हणणें गांधींनीं अनेकवार व्हाइसरॉयना कळविलें. ५ फेब्रुवारी १९४३ या तारखेच्या पत्रांत व्हाइसरॉयनीं असा आरोप केलेला आहे कीं, ८ ऑगस्टच्या ठरावांत जें सार्वत्रिक आंदोलन करण्याचें योजिलें होतें त्यांतून अत्याचार निष्पन्न होतील हें तुम्हांस व तुमच्या मित्रांस अपेक्षित होतें. तुम्हीं त्या अत्याचारांकडे दुर्लक्ष करण्याचें ठरविलें होतें आणि पुढें जे अत्याचार घडले त्यांची योजना काँग्रेसचे पुढारी पकडले जाण्याआधीं फार पूर्वीपासून आंखण्यांत आली होती, असा पुरावा उपलब्ध आहे असें म्हटलें होतें. त्यानंतर आपलें काँग्रेसविरोधी म्हणणें सरकारतर्फे १५ सप्टेंबरच्या भाषणांत गृहमंत्र्यांनीं मांडलेलें आहे असा निर्वाळा दिला होता. " त्यानंतर उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून त्या वेळीं आम्हीं जे निष्कर्ष काढले ते बरोबर होते अशी माझी खात्री झाली आहे. विध्वंसाची जी मोहीम अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या गुप्त पत्रकांच्या सहाय्यानें चालविण्यांत आली आहे, तिची भरपूर माहिती मजजवळ आहे. सध्यांसुद्धां काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या सभासदाची एक बायको ह्या गुप्त संघटनेंत महत्त्वाचा भाग घेत आहे आणि बाँबचे अत्याचार व दहशतवादी कृत्यें यांचे बेत आंखण्यांत ही संघटना गुंतलेली आहे. आम्ही या माहितीच्या आधारें कायदेशीर इलाज करीत नाहीं किंवा ती माहिती जाहीर करीत नाहीं यांचें कारण तशी वेळ अद्यापि आलेली नाहीं; पण आपली एवढी खात्री असूं द्या कीं, आम्हीं जे आरोप काँग्रेसवर केलेले आहेत त्यांना आज ना उद्यां जाब द्यावा लागेल; आणि त्या वेळीं शक्य असल्यास तुम्ही आपली बाजू जगास पटवून देऊं शकाल; पण त्यापूर्वीच जर तुम्ही या जगांतून निसटून जाण्याचा प्रयत्न कराल तर जगाचें मत तुमचें म्हणणें ऐकून न घेतां तुमच्याविरुद्ध जाईल."

यानंतर गांधींनीं ता. ७ फेब्रुवारी रोजीं आपला उपोषण करण्याचा बेत कायम करून तसें पत्र लॉर्ड लिनलिथगो यांना लिहिलें. त्यांत त्यांनीं

आपणांवर केलेले आरोप खोटे आहेत आणि जो पुरावा म्हणून समजतां तो निःपक्षपाती न्यायासनापुढें टिकेल किंवा नाहीं अशी शंकाहि तुम्हांस येत नाहीं याबद्दल आश्चर्य प्रकट केलें. होममेंबरचें भाषण हें एक आरोपीविरुद्ध फिर्यादी पक्षाच्या वकिलानें केलेलें भाषण समजतां येईल, पण त्यावरून त्यांनीं केलेले आरोप न्यायकोर्टांत सिद्ध झाले असें मानतां येणार नाहीं याची जाणीव गांधींनीं करून दिली. "तुम्ही ज्याला पुरावा म्हणतां तो मला दाखवा आणि माझी खात्री करा असें मीं म्हटलें तर त्यांत कांहीं वावगें नाहीं. वार्किंग कमेटीच्या सभासदाच्या ज्या पत्नीचा उल्लेख तुम्हीं केलेला आहे, तिच्यावर वाटल्यास खटला भरून कायदेशीर इलाज तुम्ही करूं शकतां ; पण तिनें जें केलें असें तुम्ही म्हणतां तें सुद्धां ९ ऑगस्ट रोजीं सरकारनें जें हिंस्र पशूसारखें अत्याचारी धोरण स्वीकारलें त्यानंतरच केलें असलें पाहिजे" असेंही गांधींनीं याबाबत म्हटलें आहे. सारांश, ९ ऑगस्टनंतरच्या कृत्यांची व घडामोडींची सर्व जबाबदारी अत्याचारी धोरणावर आहे, हें आपलें मत गांधींनीं पुन्हा ठासून सांगितलें. जगाच्या न्यायासनापुढें आपली बाजू मांडण्याची तयारी नसल्यामुळें या जगांतून निसटून जाण्यासाठीं उपोषणाचें दिव्य करीत आहों असा जो ध्वनि गांधींना व्हॉइसरॉय यांच्या पत्रांत आढळला, त्या ध्वनीबद्दल त्यांनीं खेद व्यक्त केला. ता. १० फेब्रुवारीपासून २१ दिवसपर्यंत मीं उपोषण करण्याचें ठरविलें आहे असें त्यांनीं सरकारला कळविलें. अखेरीस त्यांनीं असें स्पष्टीकरण केलें कीं, या उपोषणांत मरून जावें अशी माझी इच्छा नाहीं. माझ्या ताकतीप्रमाणें हें उपोषण करीत आहें, आणि ईश्वराची इच्छा असेल तर यांतून मी निभावून जाईन असें मला वाटतें, असेंही त्यांनीं या पत्रांत म्हटलें होतें. 'आपण उपोषणकाळांत मीठ आणि पाणी नेहमीं घेत असतों. त्यांत आतां लिंबू अथवा त्यासारखें रसाचें फळ यांचा रस घालून घेण्याचें मीं ठरविलें आहे.' याप्रमाणें त्यांनीं उपोषण करण्याचा निर्धार जाहीर केला. आणि याबाबत झालेला आपला सर्व पत्रव्यवहार व त्याला सरकारनें दिलेलीं सर्व उत्तरें हीं प्रसिद्ध करण्याची विनंति केली. सरकारनें या विनंतीस मान देऊन हा सर्व

पत्रव्यवहार गांधींचें उपोषण सुरू होतांच प्रसिद्ध केला. अशा प्रकारें गांधींना व इतर पुढाऱ्यांना बंदींत ठेवून सहा महिने झाल्यानंतर गांधींचें देशाच्या एकंदर परिस्थितीसंबंधींचें काय म्हणणें आहे व त्या परिस्थितीकडे ते कोणत्या दृष्टीनें पाहत आहेत हें जगाला समजून आलें.

या वेळीं दोन गोष्टी सिद्ध झाल्या. त्या म्हणजे गांधींनीं ९ ऑगस्ट-नंतरच्या सर्व घडामोडींची जबाबदारी एकट्या सरकारवर टाकली. ८ ऑगस्ट रोजीं केलेला ठराव गांधींनीं मागें घ्यावा आणि बाहेर काँग्रेसच्या नांवावर जीं कृत्यें चाललीं होतीं त्यांचा निषेध करावा अशी सूचना लॉर्ड लिनलिथगो ह्यांनीं या पत्रव्यवहारांत गांधींना वारंवार केलेली आहे. पण त्याला त्यांनीं एकच उत्तर दिलें. "चळवळ पूर्ण अहिंसावादी आहे हें खरें असलें तरी जोंपर्यंत सरकार करीत असलेल्या कृत्यांचा निषेध करण्यास मी मोकळा नाहीं आणि लोकांचें नेतृत्व करण्याला मला स्वातंत्र्य नाहीं, तोंपर्यंत लोकांनीं बाहेर चालविलेल्या चळवळींचा मी तुरुंगांतून निषेध करूं शकणार नाहीं. पूर्वी अनेकवार लोकांनीं केलेल्या अत्याचारांचा मीं निषेध केलेला आहे आणि त्याबद्दल जाहीरपणें प्रायश्चित्त पण घेतलेलें आहे ; पण या गोष्टी मी तुरुंगाबाहेर होतों व लोकांना योग्य मार्गदर्शन करण्याची मुभा मला होती अशा परिस्थितींतच केलेल्या आहेत. तुरुंगांतून मी कांहीं निर्णय देऊं शकत नाहीं आणि प्रत्यक्ष परिस्थितीचें निरीक्षण केल्याखेरीज कोणाचा निषेधही करूं शकत नाहीं. माझें धोरण चुकत आहे असें तुमचें म्हणणें असेल तर तुम्ही माझी तशी खात्री पटवा म्हणजे मी माझी चूक मान्य करीन. हें माझ्या वैयक्तिक मतासंबंधीं झालें. वर्किंग कमिटीच्या व काँग्रेसच्या वतीनें मीं कांहीं बोलावें अथवा तुम्हांस सूचना कराव्यात असें म्हणणें असेल तर वर्किंग कमेटीची आणि माझी गांठ घालून द्या. यांपैकीं कोणताही मार्ग तुम्हीं अवलंबिला नाहीं तर मला हें उपोषणाचें दिव्य करण्याच्या मार्गाहून अन्य कोणताहि मार्ग उरलेला नाहीं." अशा रीतीनें उपोषणाचा निर्णय गांधींनीं कायम केल्यानंतर सरकारनें त्यांना

असें कळविलें कीं, तुम्ही उपोषण करणार असल्यास तेवढ्या काळापुरतें आम्ही तुम्हांस त्या कामापुरतें म्हणून बंधमुक्त करण्यास तयार आहोंत. पण गांधींनीं याला असें उत्तर दिलें कीं, मला बंधमुक्त झाल्यानंतर नुसतें उपोषण करण्याची कांहींच गरज नाहीं. बाहेर पडल्यानंतर एकंदर परिस्थितीचें निरीक्षण करून लोकांचें मार्गदर्शन करणें हेंच माझें कर्तव्य होईल. अर्थात् उपोषणकालापुरतें व केवळ त्या कामासाठींच मला बंधमुक्त करण्याची सरकारची कल्पना निरर्थक आहे. व मी या सवलतीचा फायदा घेऊं इच्छीत नाहीं. यानंतर त्यांना बंधमुक्त करण्याची कल्पना सोडून देऊन त्या वेळीं त्यांच्या ज्या आप्तेष्ट-मित्रांना त्यांना भेटावयाचें असेल तेवढ्यांना कोणतीहि अट न घालतां भेटण्याची परवानगी देतां येईल, एवढें जाहीर करून सरकार स्वस्थ बसलें.

संकल्पाप्रमाणें गांधीजींनीं हें उपोषणाचें दिव्य मोठ्या मुष्किलीनें पार पाडलें. तारीख २० फेब्रुवारी रोजीं ते अत्यंत क्षीण होऊन त्यांना ग्लानि आली आणि त्यांची अवस्था आसन्नमरण झाली. या वेळीं सर्व जगभर एकच हाहाःकार झाला. सर्वांकडून ब्रिटिश सरकारला गांधींना सोडण्याच्या एकसारख्या तारा जाऊं लागल्या. उपोषणाचा निर्धार जाहीर झाल्याबरोबर डॉ. सप्रू यांनीं दिल्लीमध्यें एक सर्वपक्षीय पुढारी परिषद बोलाविली आणि गांधींना बिनशर्त मुक्त करण्याची मागणी केली. जगातील सर्व भागांत आणि धर्ममंदिरांत गांधींना आयुरारोग्य लाभावें म्हणून प्रार्थना सुरू झाल्या. इंग्लंडांतील बिशपांनींही अशा प्रार्थना केल्या. तथापि गांधींची मुक्तता होऊं शकली नाहीं. लोकनायक अणेप्रभृति हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी मंडळांतील तीन सभासदांनीं गांधींना सोडण्याबद्दल आग्रह धरला व अखेरीस आपल्या जागांचे राजीनामेही दिले. सर्व हिंदी जनता दुःखानें आणि संतापानें प्रक्षुब्ध होऊन गेली. परंतु गांधीजींना ब्रिटिश सरकारनें सोडलें नाहीं. अशा रीतीनें गांधीजींचें हें दिव्य अखेरपर्यंत चालू राहिलें. वर सांगितलेली ग्लानि आल्यानंतर त्यांनीं आपल्या पाण्यांत फळांचा रस थोडा अधिक घालण्यास सुरवात केली. यानंतर फारसा त्रास न होतां तें दिव्य पार

पडलें याबद्दल सर्व जगाला आनंद झाला आणि गांधींजींच्या बंदीखान्याचे दरवाजे लवकरच पुनः बंद करण्यांत आले.

महात्मा गांधींचा उपवास सुरू होण्यापूर्वी गांधींनीं आपल्या पत्रांत लॉर्ड लिनलिथगो यांनीं जे आरोप त्यांच्यावर व राष्ट्रसभेवर केले होते ते खोटे असल्याचें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होताच; पण लॉर्ड लिनलिथगो यांच्या पत्रांत प्रत्यक्षपणें न केलेला असा एक आरोप इंग्लंडांत निरनिराळ्या वृत्तपत्रांतून गांधींच्यावर व राष्ट्रसभेवर या वेळीं करण्यांत येत असे. तो आरोप म्हणजे गांधी व राष्ट्रसभा हे जपानला सामील किंवा अनुकूल आहेत असा होता. वृत्तपत्रांतून व अनेक प्रचारकी व्याख्यानांतून इंग्लंडांत व अमेरिकेंत या वेळीं हा आरोप होत असल्याचें पाहून तो खोडून काढण्यासाठीं महात्मा गांधींच्याजवळ राहणाऱ्या त्यांच्या इंग्रज शिष्या मिस् स्लेड उर्फ मिराबाई यांनीं ता. २४ डिसेंबर १९४२ रोजीं लॉर्ड लिनलिथगो यांना एक पत्र लिहिलें होतें. १९४२ च्या उन्हाळ्यांत त्या ओरिसा प्रांतांत विधायक कार्य करण्यासाठीं म्हणून महात्मा गांधींच्या वतीनें खेड्यापाड्यांतून हिंडत होत्या. या वेळीं ओरिसा प्रांतावर जपानी लोकांची स्वारी होण्याचा संभव होता. या वेळीं अशी स्वारी झाल्यास जनतेनें कोणतें धोरण स्वीकारावें यासंबंधीं महात्मा गांधींचा त्यांच्याशीं पत्रव्यवहार झाला होता. या पत्रव्यहारांत गांधींनीं अहिंसावादी लोकानीं परकीय आक्रमणाविरुद्ध अनत्याचारी असहकारानें एकसारखें झगडत राहिलें पाहिजे, आणि त्यांत मरण प्राप्त झालें तरी शत्रूला शरण जातां उपयोगी नाहीं किंवा त्याच्याशीं सहकार्य करतां उपगोगी नाहीं, असा उपदेश केलेला होता. शत्रूचा जुलूम असह्य झाला तर जनतेनें देशांतर करावें, पण शत्रूपुढें नमूं नये असाच उपदेश तुम्ही करीत राहा अशा अर्थाचीं पत्रें गांधींनीं मिराबाईना लिहिलीं होतीं. या पत्राचा आधार घेऊन त्यांनीं लॉर्ड लिनलिथगो यांना असें लिहून कळविलें कीं, इंग्लंडांत व अमेरिकेंत गांधी व काँग्रेस हे जपानला अनुकूल आहेत असा जो प्रचार चालू आहे, तो अगदीं खोटा आहे अशी माझी खात्री आहे. माझें राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीच्या सभासदांशीं

यासंबंधीं अनेकवार संभाषण झालेलें आहे. त्यावरून त्यांच्याही बाबतींत हा आरोप खोटा असल्याची माझी खात्री झाली आहे. तरी आपण माझें हें पत्र आणि यासोबत महात्मा गांधी आणि मी यांच्या दरम्यान १९४२ च्या उन्हाळ्यांत झालेला पत्रव्यवहार, जो आपल्या अवलोकनासाठीं सोबत जोडला आहे, हें सर्व आपण प्रसिद्ध करावें. लॉर्ड लिनलिथगो यांच्याकडून याबाबत कांहींही उत्तर आलें नाहीं. पुढें हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानांतील दंगलीला काँग्रेस ही जबाबदार आहे हें सिद्ध करण्यासाठीं एक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांतही अलाहाबाद येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीच्या गुप्त झालेल्या चर्चेचीं कच्चीं टांचणें म्हणून सरकारनें जप्त केलेला कांहीं मजकूर छापला होता. त्या मजकुरांत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या तोंडचीं एकदोन वाक्यें अशीं छापण्यांत आलीं होतीं कीं, त्यावरून गांधी हे जपानी लोक इंग्रजांचा पाडाव करतील असें गृहीत धरूनच बोलत असतात, असा निष्कर्ष निघण्यासारखा होता.

हा सर्व प्रकार पाहून गांधींना फार चीड आली. पुढें कांहीं दिवसांनीं श्रीमती सरोजिनीबाई नायडू या आजारी म्हणून सुटून बाहेर आल्या. त्यांनीं हा प्रश्न धसास लावला आणि मध्य सरकारच्या असेंब्लींत व ब्रिटिश पार्लमेंटांत गांधींच्यावर व काँग्रेसवर केलेले हे आरोप खोटे असल्याचा पुरावा हिंदुस्थान सरकारपाशीं असतांना व तो पुरावा जाहीर करण्याची विनंति मिराबाईनीं केली असतां हिंदुस्थान सरकार तसें करीत नाहीं याबद्दल प्रश्न विचारावयास लाविलें. तरीहि हिंदुस्थान सरकारनें वरील पत्रव्यवहार प्रसिद्ध केला नाहीं; परंतु गांधी किंवा काँग्रेस हे जपानला अनुकूल आहेत असा आरोप हिंदुस्थान सरकारनें किंवा ब्रिटिश सरकारनें त्यांच्यावर कधींच केलेला नाहीं एवढा खुलासा मध्य असेंब्लींत व ब्रिटिश पार्लमेंटांत करण्यांत आला. एवढ्यापुरता महात्मा गांधींचा या आक्षेपाबाबत पूर्ण विजय झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. ९ ऑगस्टनंतर जी दंगल हिंदुस्थानांत झाली तिची जबाबदारी काँग्रेसनें पास केलेल्या ठरावावर होती कीं सरकारनें केलेल्या दडपशाहीवर होती, हा प्रश्न तसाच अनिर्णीत

राहिला; तथापि गांधींनीं ह्याबाबत सरकारनें केवळ्याही धमक्या दिल्या तरी आपण तो ठराव मागें घेणार नाहीं आणि बाहेर चाललेल्या चळवळीचा निषेधही करणार नाहीं ही जी ठाम भूमिका एकदां घेतली ती त्यांनीं केव्हांच सोडली नाहीं. अखेरीस सरकारला ह्याही बाबतींत पुढें कांहीं करतां आलें नाहीं, आणि परिस्थिति बदलल्यानंतर राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना बिनशर्त मुक्त करून पुनः त्यांच्याशीं शिष्टाईचें बोलणें करावें लागलें. परंतु तुम्ही शत्रूला सामील आहां, अत्याचारी बंड करण्याचा तुमचा बेत होता आणि हें बंड आमचा शत्रू-कडून पाडाव होणार अशी अपेक्षा धरून तुम्हीं उभारलें होतें अशा तऱ्हेचे आरोप ज्या सरकारनें केले आणि पुढेमागें तुम्हांस या आरोपांस तोंड द्यावें लागेल व ते आरोप सिद्ध करण्याचा भरपूर पुरावा आमच्यापाशीं आहे असें जें सरकार म्हणत होतें त्याला अखेरीस तो पुरावा केव्हांहि सिद्ध करतां आला नाहीं, आणि अशा बंडखोर काँग्रेसशीं अखेरीस ब्रिटिशांना शिष्टाई करून तडजोड करावी लागली. महात्मा गांधींनीं १९४३ च्या फेब्रुवारींत जेव्हां २१ दिवसांचें उपोषण सुरू केलें तेव्हां डॉ. सप्रू यांनीं जी पुढारी-परिषद महात्मा गांधींच्या मुक्ततेची मागणी करण्यासाठीं भरविली होती, त्या परिषदेपुढें भाषण करतांना सप्रू यांनीं असे उद्गार काढले कीं, "महात्मा गांधी हे एक प्रकारचे बंडखोर आहेत हें मला मान्य आहे; परंतु ब्रिटिश लोकांचा इतिहास वाचून माझी अशी खात्री झाली आहे कीं, ते अखेरीस आमच्यासारखे जे नेमस्त आहेत त्यांच्या विनंतीस मान देत नाहींत तर उलट दक्षिण आफ्रिकेतील जनरल स्मट्स् किंवा आयर्लंडांतील डी व्हॅलेरा यांच्यासारखे जे लोक त्यांच्या-विरुद्ध बंड करतात त्यांच्याशींच ब्रिटिश लोक अखेरीस सख्य करतात आणि नेमस्तांना बाजूस सारतात. हाच अनुभव महात्मा गांधींच्या बाबतींतही येईल अशी माझी श्रद्धा आहे." सर तेजबहादूर सप्रू यांनीं काढलेले हे उद्गार अखेरीस खरे ठरले असेंच इतिहासकारास नमूद करावें लागेल.

दोन प्रियजनांचा विरह

महात्मा गांधींना या वेळच्या बंदीवासांत त्यांना अत्यंत प्रिय असणाऱ्या अशा दोन व्यक्तींचा मृत्यु आगाखान पॅलेसमध्यें पहावा लागला. पहिला म्हणजे त्यांना पुत्रवत् प्रिय असलेले त्यांचे अत्यंत हुषार आणि निष्ठावंत चिटणीस श्रीयुत महादेवभाई देसाई यांचा होय. त्यांनां गांधीजींच्याच बरोबर पकडून त्यांच्या सन्निध बंदीवान करून ठेवण्यात आलेलें होतें. आगाखान पॅलेसमध्यें गेल्यानंतर एक आठवड्याच्या आंत ता. १५ ऑगस्ट रोजीं श्रीयुत महादेवभाई देसाई हे सकाळीं एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून निधन पावले. त्यांना कोणताही औषधोपचार करण्यासही अवकाश मिळालाच नाहीं. त्यांत कोणाचाच कांहीं दोष नव्हता. परंतु या त्यांच्या दुःखद निधनानें महात्मा गांधींना अत्यंत विव्हल केलें. त्याच बंगल्यांत त्यांचे अंत्य संस्कार करण्यांत आले. आणि नंतर ही बातमी लोकांना जाहीर करण्यांत आली.

याच बंदीवासांत महात्मा गांधींच्यावर ओढवलेला दुसरा प्रियजनाचा विरह म्हणचे सौभाग्यवती कस्तुरबा गांधी या त्यांच्या प्रियपत्नीचा विरह होय. त्यांचें व गांधींजींचें वय सारखेंच होतें. १९४४ च्या फेब्रुवारी महिन्यांत २२ तारखेस महाशिवरात्रीच्या दिवशीं त्या निधन पावल्या. त्याच्यापूर्वी दोनतीन महिने त्या फार आजारी होत्या. त्यांना औषधोपचार करण्याच्या कामीं बाहेरचे वैद्य व डॉक्टर यांची मदत घ्यावयाची होती. त्याप्रमाणें ती सरकारनें घेण्याची मुभाहि दिली. परंतु या बाबतींत गांधीजींना फार कटकटी कराव्या लागल्या व जितक्या उदारपणानें व संतोषानें ही सर्व व्यवस्था सरकारनें करावयास हवी होती तितकी ती सरकारकडून झाली नाहीं हें पाहून गांधीजींना फार मनस्ताप झाला. अर्थात् कस्तुरबांची स्थिति इतकी खालावली होती कीं, त्या दुखण्यांतून वांचणें जवळजवळ अशक्य होतें. तथापि त्यांचे अंतकालीन क्लेश कमी करणें हें जें नजीकच्या मंडळींचें कर्तव्य त्याबाबत

असे निष्कारण अडथळे उपस्थित झाल्याचें पाहून गांधींना क्लेश होणें साहजिक होतें. निधनानंतर त्यांना आपल्या मुलांच्या हवालीं करण्यांत येऊन त्यांची जाहीर स्मशानयात्रा तरी निघावी किंवा त्यांच्या अंत्य-संस्काराच्या वेळीं आपण सांगूं त्या आप्तेष्टांस व मित्रमंडळीस हजर राहूं द्यावे अशी गांधींनीं विनंति केली. केवळ कौटुंबिक मंडळीसच म्हणजे नातलगासच हजर राहूं देणार असाल तर मी कोणासच येथें बोलावणार नाहीं व ज्यांना येथें येऊं देण्यांत येत असतें त्यांनाही हजर राहूं नये असें सांगेन व जेवढे आम्ही बंदीवान येथें आहों तेवढेच त्यांचा अंत्यविधि करूं असें गांधींनीं सरकारला कळविलें आणि तें बरोबरच होतें. कारण गांधींचें कुटुंब हें केवळ त्यांचे नातलगच अशी वस्तुस्थिति नव्हती. त्यांना नातलगाइतकेच किंबहुना त्यांच्याहूनही अधिक निकटचे असे शेंकडों लोक त्या वेळीं पुण्यांत होते व यांना जर हजर राहतां येत नसेल तर आपल्या मुलांनीं व नातलगांनीं हजर राहण्याची कांहीं गरज नाहीं असें त्यांना वाटलें तर त्यांत नवल नव्हतें. अखेरीस या बाबतींत गांधी सांगतील त्यांना या अंत्यविधीस हजर राहण्याची मुभा देण्यांत आली आणि त्याप्रमाणें पुण्यांतील सर्व पक्षांचे पुढारी व शेंकडों कार्यकर्ते कस्तुरबांचें अंत्यदर्शन घेण्यास आगाखान पॅलेसमध्यें लोटले. या वेळीं गांधींचें व कस्तुरबांचें वय ७५ वर्षें होतें. त्यांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षीं झाला होता. त्यानंतर सुमारें ६०-६२ वर्षें त्यांनीं एकमेकांच्या सहवासांत व एकमेकांशीं अत्यंत एकनिष्ठेनें अशीं काढलीं होतीं. १९०६ सालापासून गांधीजींनीं संपूर्ण ब्रह्मचर्याचा निर्धार करून वानप्रस्थाश्रम स्वीकारला, त्या वेळेपासून आपण दोघें एकमेकांशीं अधिकच निकट आलें आणि कस्तुरबांची खरी योग्यता आपणास कळूं लागली असें ते लिहितात. गांधीजींना या वेळीं लॉर्ड वेव्हेल यांनीं एक पत्र लिहून त्यांत सांत्वनपर असे सहानुभूतीचे शब्द लिहिले होते. त्यास उत्तर देतांना गांधीजींनीं असें लिहिलें आहे कीं, कस्तुरबा यांचा स्वभाव निग्रही होता आणि त्या आपलें म्हणणें कोणासहि भिऊन सोडीत नसत. प्रथम मी त्यांना याबद्दल दुराग्रही

समजून दोष देत असें आणि त्यांच्यावर रागावतहि असें. मीं त्यांना दिलेला हा त्रास त्या माझ्यावरील प्रेमानें सहन करीत; परंतु आपला आग्रह सोडीत नसत. या त्यांच्या स्वभावांतूनच मला सत्याग्रहाची स्फूर्ति मिळाली असें त्यांनीं या पत्रांत लॉर्ड वेव्हेल यांना लिहिलेलें आहे. हें त्यांचें मत त्यांनीं यापूर्वी आपल्या आत्मचरित्रांतहि व्यक्त केलेलें आहे. गांधीजी स्थितप्रज्ञ होते, तथापि त्यांच्याही अंतःकरणांत या वेळीं कालवाकालव होऊन ते विषण्ण झाले आणि अनेक मित्रमंडळींना भेटत असतां त्यांच्या डोळ्यांत अश्रु आले. अशा तऱ्हेनें कस्तुरबांचा अंत्यविधि आगाखान बंगल्यांत झाला. पुढें हा बंगला आगाखानांनीं गांधीजींना दिला व तेथें श्रीयुत महादेवभाई देसाई आणि कस्तुरबा गांधी या दोघांच्या समाधि आज बांधलेल्या आहेत.

बंधमुक्तता आणि कस्तुरबा-स्मारक-निधि

कस्तुरबांच्या निधनानंतर थोड्याच दिवसांत गांधीजींना मलेरियाचा विकार जडला आणि त्यांतून ॲनिमिया होऊं लागला. ते बरेच आजारी झाले. तेव्हां त्यांच्या प्रकृतीबद्दल चिंता वाटूं लागली. या वेळीं लॉर्ड लिनलिथगो हे जाऊन लॉर्ड वेव्हेल व्हाइसरॉय झालेले होते. देशांतील क्रांतिकरक आंदोलन बरेंच मंदावलें होतें. ही बदललेली परिस्थिति लक्षांत घेऊन त्यांनीं गांधींजींची आजारामुळें सुटका करण्याचें ठरविलें, ता. ६ मे १९४४ रोजीं आगाखान पॅलेसमधून त्यांना बिनशर्त मुक्त करण्यांत आलें आणि त्याच्याचसमोर असलेल्या विठ्ठलदास ठाकरसी यांच्या बंगल्यांत त्यांना पोहोंचविण्यांत आलें. त्या वेळीं ते फारच क्षीण झालेले होते आणि त्यांना दीर्घकाळ विश्रांतीची फार आवश्यकता होती. आतां बंधमुक्त झाल्यामुळें एकदम राजकीय परिस्थितीसंबंधीं ते कांहीं तरी मतप्रदर्शन करतील अशी अनेकांची अपेक्षा होती, परंतु एकंदर सर्व परिस्थितीची पाहणी केल्यावांचून आपलें कोणतेंही मत प्रदर्शित करावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें. देशांत सर्वत्र हुकूमशाही राजवट सुरू असून कोणासही भाषणस्वातंत्र्य वा क्रियास्वातंत्र्य उरलेलें नव्हतें. अशा

बिकट परिस्थितींत अनेक देशभक्त भूमिगत राहून आपल्या मतानुसार राष्ट्रसभेची सेवा करीत होते. त्यांचीही बाजू गांधींना समजून घ्यावयाची होती. राष्ट्रसभेचें सर्व प्रमुख नेते अहमदनगरला बंदीवासांत होते आणि इतर अनेक कार्यकर्ते तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर भूमिगत कार्य करणें ही तत्त्वच्युति आहे असा दोष भूमिगतांना देत होते. केवळ विधायक कार्य करावें अशीच आजची पारस्थिति आहे असें त्यांना वाटत होतें. कांहीं लोक कायदेमंडळांत जाण्याचा विचार करीत होते. कांहीं गांधींनीं सत्याग्रहाचा व स्वातंत्र्यसंग्रामाचा केलेला ठराव आतां मागें घ्यावा आणि भूमिगत लोकांच्या चळवळीचा निषेध करावा म्हणजे ब्रिटिश सरकार पुन्हा राष्ट्रसभेशीं तडजोड करील असेंही म्हणत होते. या सर्व निरनिराळ्या मतांचा विचार करून सर्वांचें म्हणणें ऐकून घऊन नंतर गांधीजी आपलें मत प्रकट करणार होते. प्रथम कांहीं दिवस ते केवळ इतरांचें म्हणणें ऐकून घेत असत व आपलें मत कांहींच सांगत नसत. त्यांनीं या वेळीं बऱ्याच दीर्घकाळ मौन ठेविलें होतें.

महिना दीड महिना सर्व परिस्थितीचें निरीक्षण केल्यानंतर आणि सर्व बाजूंच्या कार्यकर्त्यांचें म्हणणें ऐकून घेतल्यानंतर त्यांनीं आपल्या कार्याची दिशा आंखून घेतली. चालू परिस्थितीसंबंधीं त्यांचें निदान असें होतें कीं, आपण ८ ऑगस्ट १९४२ रोजीं सत्याग्रही स्वातंत्र्य-संग्रामाचा जो ठराव राष्ट्रसभच्या अखिल भारतीय समितीकडून मंजूर करून घेतला त्या ठरावांतील अखेरच्या भागांत जें म्हटलें होतें कीं, पुढारी आपले संदेश जनतेला देऊं शकले नाहींत तर प्रत्येक स्वातंत्र्यनिष्ठ व्यक्तीनें आपल्या मनोदेवतेस साक्षी ठेवून स्वतःच्या अंतःप्रेरणेनें स्वातंत्र्याचा झगडा चालू ठेवावा, त्या भागाप्रमाणें पुढें चळवळ झाली. अर्थात् ती सदोष किंवा निर्दोष याबद्दल कोणी कोणाचा निषेध करूं शकत नाहीं. अर्थात् भूमिगत कार्य आणि विध्वंसनाचें तंत्र हें आपल्या स्वतःच्या वृत्तीशीं व निष्ठेशीं विसंगत आहे, हें त्यांनीं आपलें मत कोणाचाही निषेध न करतां जाहीर केलें. आपण त्या स्वातंत्र्यसंग्रामाचें नेतृत्व करूं शकत नाहीं आणि जे लोक भिन्न तंत्रानें कार्य करीत आहेत त्यांच्याविषयीं आपणांस कांहीं बोलावयाचें नाहीं. ज्या दिवशीं आपणांस

सरकारनें बंदींत टाकलें त्याच दिवशीं आपलें नेतृत्व संपलेलें आहे. आतां सरकारनें राष्ट्रसभेच्या नेत्यांना बंधमुक्त केल्यानंतर त्यांनीं राष्ट्रसभेचें कार्य कसें चालवावयाचें त्याचा निर्णय घ्यावा. आज कोणी कोणाचा नेता नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या निष्ठेनुसार देशसेवा करीत राहावें. ज्यांचा आपल्या निष्ठेवर विश्वास असेल त्यांनीं विधायक कार्य करीत राहावें. राष्ट्रसभेचे नेते बाहेर आल्यानंतर ते तिच्या कार्यकर्त्यांना अधिकृत असें नेतृत्व देऊं शकतील. अशा रीतीनें आपली वैयक्तिक भूमिका गांधींनीं स्पष्ट केली. आणि कोणाचाही निषेध न करतां किंवा ८ ऑगस्ट ४२ चा ठराव मागें घेण्याचा यत्किंचितही विचार न करतां ज्यांना विधायक कार्य करावयाचें असेल त्यांनीं त्या कार्यास लागावें असें जाहीर केलें. त्या वेळीं त्यांनीं ब्रिटिश सरकारला एक तडजोडीची सूचना, गिल्डर योजना म्हणून प्रसिद्ध असलेली सुचविली. तसेंच श्रीयुत जिना यांच्याशीं पाकिस्तानबाबत तडजोडीचें बोलणें करण्याचेंही ठरविलें. जून महिन्यांत त्यांनीं श्रीयुत जिना यांच्याशीं तडजोडीचें बोलणें श्रीयुत राजगोपालाचारी यांच्या सूचनेनुसार व त्यांनीं पसंत केलेल्या योजनेनुसार सुरू केलें. हीं बोलणीं मुंबई येथें ता. ९ सप्टेंबरपासून २७ सप्टेंबरपर्यंत चालू होतीं. हिंदु आणि मुसलमान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत या भूमिकेनें बोलणें सुरू केल्या-खेरीज आपण बोलणार नाहीं असा जिनांचा आग्रह होता आणि या भूमिकेवर मी तडजोड करणार नाहीं असा गांधींचा आग्रह होता. यामुळें ही तडजोड घडून येणें शक्य झालें नाहीं. तसेंच मुसलमान-प्रधान अशा कांहीं विभागांत स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार सार्वमतानें एक स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचें ठरलें, तरी तो निर्णय केवळ मुसलमानांच्या सार्वमतानें घेण्यांत येऊं नये तर सर्व धर्मांच्या लोकांचें सार्वमत घेऊन तसा निर्णय करावा. आणि असें स्वतंत्र राज्य झालें तरी परराष्ट्रीय राजकारण, संरक्षण आणि इतर कांहीं अखिल भारतीय स्वरूपाच्या किमान बाबी याबाबत हिंदुस्थानांतील या दोनही राज्यांचें ऐक्य टिकलेंच पाहिजे असा गांधींचा आग्रह होता व तो त्यांनीं केव्हांहि सोडला नाहीं. श्रीयुत जिना यांनीं या गोष्टीसही संमति दिली नाहीं.

त्याचप्रमाणें आपणांस म्हणजे मुसलमानांस सीमा प्रांत, पंजाब, सिंध, बलुचिस्तान आणि बंगाल व आसाम असे सहा प्रांत मिळालेच पाहिजेत असाहि जिनांचा आग्रह होता. अर्थात् कोणत्याही बाबतींत तडजोड होणें अशक्यच होतें. परंतु या बोलण्यामुळें एक फायदा झाला. तो म्हणजे श्रीयुत जिना हे पाकिस्तान मागतात तेव्हां त्यांचें नक्की काय म्हणणें आहे व त्यांची पाकिस्तानची अधिकृत व्याख्या कोणती आहे याबद्दल लोकांना या वेळपर्यंत कोणतीही निश्चित कल्पना जिनांनीं येऊं दिली नव्हती. ही कल्पना आतां श्रीयुत जिना यांनीं अधिकृतपणें गांधींच्यासमोर लेखनिविष्ट करून मांडली. यामुळें राष्ट्रसभा जिनांची मागणी कां मान्य करीत नाहीं आणि ती मागणी मान्य करणें कोणत्याही तत्त्वाप्रमाणें कसें अशक्य आहे, हें जगाच्या निदर्शनास आलें. अर्थात् या वेळीं जर ब्रिटिश सरकारनें मुसलमानांना हिंदुस्थानांतील वरील सहा प्रांत देणें अशक्य आहे व श्रीयुत जिना यांची ही मागणी अन्यायाची आहे असें जाहीर केलें असतें तर मुस्लिम लीग पक्ष या वेळीं खात्रीनें कोसळून पडला असता. परंतु ब्रिटिश सरकारला ही गोष्ट इष्ट नव्हती. जिनांची मागणी अन्यायाची आहे व ती त्यांना देणें आपणांस केव्हांही शक्य होणार नाहीं हें या वेळीं ब्रिटिश मुत्सद्यांना कळलें नाहीं आणि पुढें १९४७ सालीं फाळणी करण्याचा प्रत्यक्ष प्रसंग आला त्याच वेळीं इंग्रजांना ही गोष्ट कळली असें कोणताही विचारी मनुष्य म्हणूं शकणार नाहीं. परंतु राष्ट्रसभेची मागणी मान्य करावयाची नाहीं आणि तिच्याविरुद्ध शक्य त्या शक्ति उठवीत बसावयाचें हें जें ब्रिटिश मुत्सद्यांचें धोरण तें त्यांनीं अखेरपर्यंत सोडलें नाहीं. यामुळें जिना-पक्ष अन्यायाची मागणी करीत आहे, असें सर्व जग म्हणत असतांनाही ब्रिटिशांनीं मुस्लिम लीगला दगा दिला नाहीं आणि अखेरपर्यंत तिचें बळ वाढेल असेंच धोरण त्यांनीं ठेवलें.

सप्टेंबरअखेर पाकिस्तानसंबंधींची हीं तडजोडीचीं बोलणीं फिसकटल्यानंतर महात्मा गांधी पुन्हा मुंबईहून वर्ध्यास गेले. तेथें ता. २ ऑक्टोबर रोजीं त्यांचा पंचाहत्तरावा वाढदिवस साजरा करण्यांत

येऊन कस्तुरबा-स्मारक-निधि या नांवाचा एक, एक कोटी दहा लक्षांचा निधि गांधीजींना अर्पण करण्यांत आला. या निधींतून हिंदुस्थानांतील खेड्यापाड्यांतून स्त्रियांच्या उद्धाराचें आणि सेवेचें विधायक कार्य करावयाचें ठरविण्यांत आलें आणि त्या कार्याची आंखणी गांधीजींनीं आपलें सत्याग्रही तत्त्वज्ञान आणि विधायक लोकसेवा यांच्या तत्त्वास अनुसरून करून दिली. त्याचें एक निधि-धारक-मंडळ ठरविण्यांत येऊन त्या कार्यास सुरवात करण्यांत आली. या वेळेपासून हें कार्य मोठ्या प्रमाणावर ठिकठिकाणीं चालू करण्यांत आलेलें आहे.

—

: : ८ : :

स्वतंत्र हिंदुस्थान-पाकिस्तान आणि हिंदु-मुसलमान ऐक्य

१९४४ च्या मे महिन्यांत महात्मा गांधी बंधमुक्त होऊन बाहेर पडले आणि लवकरच त्यांनीं जनतेच्या राजकारणाचीं सूत्रें हळूहळू आपल्या हातांत घेण्यास सुरवात केली. देशाची या वेळची परिस्थिति अत्यंत बिकट अशी होती. युद्ध चालू होतें. सरकारची दडपशाही आणि जुलूम यांत कोणत्याही प्रकारची कमतरता उरलेली नव्हती. लोकांचीं गाऱ्हाणीं वाढत असून जनतेची आर्थिक परिस्थिति चिंताजनक झालेली होती. चळवळ जवळजवळ संपत आलेली होती. अशा बिकट परिस्थितींत राष्ट्रसभा आणि तिचे प्रमुख पुढारी हे बंदींत होते. लोकांत सरकारविषयीं त्वेष उत्पन्न झालेला होता. सरकारच्या दडपशाहीनें लोकांतील स्वातंत्र्यनिष्ठा आणि राष्ट्रसभेसंबंधींची लोकप्रियता यांना मात्र कोणताही धक्का लागलेला नव्हता. क्रांतिकारक वृत्ति अनत्याचाराच्या बंधनांत राहणें कठीण होतें आणि अहिंसा व गांधीवाद यांच्यावरीलही श्रद्धा डळमळून आतां सशस्त्र क्रांति केल्यावांचून स्वातंत्र्याचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं अशी वृत्ति तरुणांत झपाट्यानें फैलावत होती. महात्मा गांधींना सरकारनें बंधमुक्त केलें असलें तरी त्यांना लोकांना मार्गदर्शन करून कोणतीही उघड चळवळ करणें अशक्य होतें. उघड चळवळीचे सर्व मार्ग सरकारनें रोखून धरले

असल्यामुळें आणि गुप्त चळवळ ही गांधीजींच्या तत्त्वाशीं विसंगत असल्यामुळें एक प्रकारें सरकारनें हतबुद्धच केलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. विधायक कार्यें करण्यासही जे राष्ट्रसभेचे कार्यकर्ते खेडोपाडीं जात त्यांना सरकार काम करूं देत नव्हतें. यामुळें भूमिगत राहून चळवळ करणारे लोक जनतेंत कांहीं तरी चैतन्य ठेवूं शकत असत. तीही गोष्ट गांधीतंत्राप्रमाणें उघड कार्य करणाऱ्यांना या वेळीं करणें कठीण झालें होतें. गांधीजींचे प्रमुख सहकारी आणि राष्ट्रसभेचे महत्त्वाचे नेते सर्व तुरुंगांत अडकविलेले होते.

अशा परिस्थितींत समाधान मानण्यास एकच जागा होती कीं, इतकी अनन्वित दंडपशाही झाली असतां देखील लोकांतील स्वातंत्र्यनिष्ठा व क्रान्तिवृत्ति या नष्ट झाल्या नव्हत्या. सरकार आपल्याला जुलमी धोरणानें व अरेरावी वृत्तीनें आपल्याविरुद्ध पसरलेली द्वेषभावना जागृत ठेवीत होतें व तिला अधिकच चेतवीत होतें. देशाच्या एकंदर परिस्थितीचें अवलोकन केलें असतां जनता हताश झाली आहे असें मुळींच वाटत नव्हतें. फक्त जनतेची क्रान्तिनिष्ठा आतां अनत्याचारांचें बंधन पाळून प्रकट होऊं शकत नव्हती. गांधीजींच्या तत्त्वाप्रमाणें पाहिल्यास तिला आतां विकृत स्वरूप प्राप्त होऊं लागलें होतें. यांतून ब्रिटिश लोकांशीं तडजोड होऊन कांहीं मार्ग निघाला नाहीं तर गांधीजींना पुन्हा तुरुंगांत जाण्यावांचून गत्यंतर उरलें नव्हतें. आपला स्वातंत्र्यसंग्रामाचा ठराव मागें घेऊन सत्याग्रहाचें तत्त्व सोडून द्यावें, असा या वेळीं सरकारचा गांधीजींना निरनिराळ्या प्रकारें आग्रह चालू होता; परंतु अशा रीतीनें तत्त्वभ्रष्ट होण्यास गांधीजी केव्हांही तयार नव्हते. पुन्हा तुरुंगांत जाऊन बसण्यापेक्षां ते एखादा दीर्घकालीन उपवास करतील अशीही भीति कांहीं लोकांना वाटत होती. आपल्या अनुयायांना या वेळीं ते स्वतःचा असा कोणताही कार्यक्रम न सांगतां ज्यानें त्यानें आपल्या मनोदेवतेस स्मरून परिस्थितींतून मार्ग काढावा असें सांगत. ९ ऑगस्ट १९४४ या वेळीं एक सत्याग्रही क्रांतिदिन साजरा करावा अशी लोकांची इच्छा होती. गांधीजींनाही फार मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह करण्याचा काळ आतां उरलेला नाहीं असें वाटत

असलें तरी सत्याग्रह प्रतीकरूपानें तरी जिवंत ठेवला पाहिजे असें त्यांचें मत होतें. त्याप्रमाणें त्यांनीं सर्व हिंदुस्थानांत कोणतेंही कायदेभंगाचें निदर्शन न करतां केवळ मुंबईस कांहीं लोकांनीं प्रतीकात्मक सत्याग्रह करून हा क्रांतिदिन साजरा करावा आणि तो सत्याग्रह शुद्ध सत्याग्रही तंत्राप्रमाणें उघडपणें व सरकारला आगाऊ नोटीस देऊन करावा, अशी सूचना केली आणि त्याप्रमाणें ९ ऑगस्ट रोजीं असा एक प्रतीकात्मक सत्याग्रह एका तुकडीनें केला. या तुकडीला सरकारनें पकडून ठेवून दुसऱ्या दिवशीं सोडून दिलें. एवढ्या या प्रतीकात्मक सत्याग्रहानें सरकारला कांहीं धक्का बसला असें नाहीं; परंतु एकदां पेटविलेली सत्याग्रह-क्रांतीची ज्योत आम्ही विझवूं देणार नाहीं एवढी राष्ट्राची निष्ठा या प्रतीक सत्याग्रहामुळें पुन्हा एकदां प्रकट झाली आणि महात्मा गांधी सत्याग्रह-संग्राम कायमचा सोडून देतील अथवा ८ ऑगस्ट १९४२ चा ठराव मागें घेतील अशी ज्यांना आशा होती त्यांची पूर्ण निराशा हा सल्ला देऊन महात्मा गांधींनीं केली. हें गांधीजींचें धोरण जनतेलाही उत्साहजनक वाटलें. आणि तिची क्रांतिनिष्ठा जिवंत राहिली.

गांधीजी देशकालपरिस्थिति पाहून आपल्या लढ्याचें तंत्र, प्रकार आणि प्रमाण कमीअधिक करतात, त्यांत बदल करतात, एखादे वेळीं लढा स्थगित करतात, परंतु लढ्याचें तत्त्व केव्हांच सोडून देत नाहींत आंणि तत्त्वभ्रष्ट होऊन प्रतिपक्षाला शरण जात नाहींत याचा प्रत्यय जनतेला पुन्हा एकदां आला. गांधीजी हे चिकाटी आणि व्यवहारदक्ष सेनापति होते. तसेच ते त्या प्रसंगीं तत्त्वनिष्ठेसाठीं प्राण पणास लावून हुतात्मापद स्वीकारण्यासही तयार होते. तत्त्वनिष्ठा आणि व्यवहारदक्षता या दोनही वृत्ति त्यांच्यांत आत्यंतिक प्रमाणांत विकास पावलेल्या होत्या आणि म्हणूनच ते दीर्घकालपर्यंत राष्ट्राचें राजकीय नेतृत्व करूं शकले. आपल्या तत्त्वनिष्ठेस बाद न आणतां व्यवहारदक्ष राहून वाटेल त्या परिस्थितींतून देशाच्या प्रगतीचा मार्ग कसा काढावा हें तें अचूकपणें शोधून काढीत आणि एका मार्गानें जाऊन प्रगति होऊं शकत नाहीं असा अनुभव येतांच पुन्हा माघार घेऊन दुसऱ्या दिशेनें प्रगतीचा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न करीत.

प्रयोग करणें, त्यांत येणारें यशापयश शांतवृत्तीनें व समत्वबुद्धीनें स्वीकारणें आणि मंद असो अथवा तीव्र वेगानें असो, देशाची प्रगति एकसारखी होत राहील असे उपाय चिकाटीनें सतत करीत राहणें हें त्यांचें जीवनरहस्य होतें. परिस्थितीचें वास्तव स्वरूप त्यांना यथार्थ आकलन करतां येत असे. आणि परिस्थितीच्या फेरबदलास अनुसरून ते आपलें धोरण बदलीत असत. परंतु कोणत्याही परिस्थितींत आपण असलों तरी आपली आणि त्या परिस्थितीची प्रगति करण्यासाठीं ते झटत असत. ही प्रगति कोणत्या दिशेनें करावयाची तें समजण्यासाठीं मानवाच्या आदर्श स्वरूपाचें होकायंत्र त्यांच्या डोळ्यांपुढें नित्य असे. हा आदर्श आपल्यापुढें ठेवून त्या दिशेनें वास्तव परिस्थितींतून आपला मार्ग काढीत राहणें यालाच वास्तववादी आदर्शनिष्ठा (practical idealism) असे ते म्हणत. केवळ आपण व्यक्तिशः आदर्शनिष्ठ राहून प्रतिकूल परिस्थितीचा कोणताही विचार न करितां आपलें जीवित समर्पण करून त्यांतच त्यांचें साफल्य मानणें अशा प्रकारची केवळ व्यक्तिनिष्ठ हुतात्मावृत्ति त्यांच्यापाशीं नव्हती. परिस्थितीशीं जिव्हाळ्याचा संबंध नित्य कायम ठेवून आपल्याबरोबर आपल्या परिस्थितीशीं बदलत राहून स्वतःच्या उद्धाराबरोबर समाजाचा व जगाचा उद्धार साधणें हा त्यांचा स्वभाव होता. या स्वभावास अनुसरून ते आत्मोद्धार आणि सामाजिक उद्धार करण्यासाठीं वाटेल तो त्याग करण्यास आणि वाटेल तो धोका पत्करण्यास तयार असत; परंतु हा त्याग करतांना व धोका पत्करतांना आपण आपल्या मागून समाजासही ओढून नेत आहों किंवा नाहीं हेंही ते पाहत असत. कारण आपलें व्यक्तिमत्त्व त्यांनीं समाजाच्या उद्धारास वाहिलेलें होतें. यामुळें सामाजिक उद्धार हें त्यांच्या सर्व वर्तनाचें व धोरणाचें गमक होतें. ज्या ज्या वेळीं त्यांना असें दिसून आलें कीं, आपण आपल्याबरोबर आपल्या समाजास बरोबर घेऊन जाऊं शकत नाहीं तेव्हां ते आपल्या प्रगतीचा वेग मंद करीत असत आणि ज्या वेळीं आपल्या अंतःकरणांतील क्रान्तिवृत्तीची प्रेरणा सभोंवारच्या समाजांत जोरानें फैलावत व उसळत जात आहे असा त्यांना अनुभव येई तेव्हां ते

त्या क्रांतीच्या लाटेवर आरूढ होऊन समाजाला आपल्या मागून येऊन वाटेल तें साहस करण्यास प्रवृत्त करीत असत. आजचा काळ क्रांतीची गति मंद होण्याचा होता. या परिस्थितीचें आकलन करून त्यांनीं राष्ट्रांत निष्प्रभ कायदेभंगाचें वातावरण फैलावूं न देतां केवळ प्रतीकरूपानें त्याचें तत्त्व संरक्षून ठेवण्याचें ठरविलें. तरीही तें तत्त्व मात्र त्यांनीं सोडून दिलें नाहीं, यांतच त्यांची वास्तववादी आदर्श-निष्ठा दिसून येते.

यानंतर त्यांनीं २८ ऑक्टोबर १९४४ रोजीं काँग्रेसजनांना आजच्या परिस्थितींत केवळ विधायक कार्य करीत राहण्याचा त्यांनीं आदेश दिला. देशांत अत्याचाराचें वातावरण निर्माण होऊं नये आणि सरकारनें हळूहळू जुलमी वटहुकुमांचें राज्य मागें घेऊन राष्ट्रसभेशीं सन्मान्य तडजोड करण्यास पुढें यावें असा प्रयत्न त्या वेळीं श्रीयुत भुलाभाई देसाईप्रभृति राष्ट्रसभेचे मध्य असेंब्लींतील पुढारी करीत होते. या प्रयत्नास गांधीजींची मूक संमति होती. तथापि अधिकृत दृष्टीनें याबाबत कोणताही सल्ला ते देऊं इच्छीत नव्हते. राष्ट्रसभेचे पुढारी बंधमुक्त झाल्यावांचून राष्ट्राच्या वतीनें कोणतीही तडजोड करण्याचा कोणासही अधिकार नाहीं अशी त्यांची भूमिका होती. या वेळीं श्रीयुत भुलाभाई देसाई यांनीं लॉर्ड वेव्हेल यांच्याशीं बोलणें करून कांहीं योजना ब्रिटिश सरकारपुढें ठेविली होती. ही योजना घेऊन लॉर्ड वेव्हेल थोड्याच दिवसांनीं विलायतेस जाऊन आले. आणि त्यांनीं येथें आल्यानंतर आपली योजना जाहीर करून तिचा विचार करण्यासाठीं म्हणून १९४५ च्या जून महिन्यांत राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीला बंध-मुक्त केलें आणि २५ जून रोजीं सिमला येथें राष्ट्रसभा आणि मुस्लिम लीग या पक्षांना बोलावून एक हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याचें जाहीर केलें. असें राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यास मी आपला नकार-हक्क वापरून त्याच्या नित्याच्या कारभारांत अयोग्य ढवळाढवळ करणार नाहीं असें आश्वासनही त्यांनीं दिलें. १९४२ सालीं सर स्टॅफर्ड क्रिप्स हे शिष्टाईस आले असतां ज्या प्रकारचें आश्वासन देण्यास ब्रिटिश सरकार तयार नव्हतें तसें आश्वासन देऊन पूर्वीच्या शिष्टाईचा तुटलेला

धागा सांधून घेऊन पुढें प्रगति करण्याचा हा एक उपाय होता. या दृष्टीनें महात्मा गांधी व राष्ट्रसभेचे बंधमुक्त पुढारी यांनीं सिमला परिषदेला हजर राहून राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यांत आपणांस यश येतें किंवा नाहीं तें पाहावें असें ठरविलें आणि राष्ट्रसभेचे पुढारी व महात्मा गांधी हे सिमल्यास जाऊन हजर झाले. या वेव्हेल योजनेंत व्हाइसरॉयच्या नकार-हक्कासंबंधींचें आश्वासन ही एक प्रगतिकारक गोष्ट असली तरी राष्ट्रसभेचे राष्ट्रीय सरकारांतील प्रातिनिधि केवळ हिंदु असावेत आणि राष्ट्रसभेच्या पक्षांतील कोणताही राष्ट्रीय मुसलमान राष्ट्रीय सरकारांत असूं नये असा आग्रह होता. हा आग्रह अखेरपर्यंत ब्रिटिश सरकारनें सोडला नाहीं आणि म्हणूनच या वेळींही ही तडजोड मोडून गेली. यानंतर पुन्हा एक पेंचप्रसंग निर्माण झाला ; तथापि आतां राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांनीं बंधमुक्त झाल्याबरोबर कायदेभंग अधिकृतरीत्या बंद केला आणि विधायक कार्यें करून राष्ट्राची शक्ति संघटित करण्याचा आदेश दिला. हळूहळू प्रांतिक स्वराज्य सरकारें स्थापन होऊन आपलें कार्य करूं लागलीं आणि या राष्ट्रीय प्रांतिक सरकारांच्या अमदानीखालीं राष्ट्रसभेला प्रचारस्वातंत्र्य आणि संघटनास्वातंत्र्य यांची प्राप्ति होऊन पुन्हा कायदेशीर मार्गानें चळवळ सुरू झाली.

यानंतर १९४६ मध्यें नवीन स्थापन झालेल्या इंग्लंडांतील समाजवादी मंत्रिमंडळानें एक तीन मंत्र्यांचें शिष्टमंडळ पुनः हिंदुस्थानांत पाठविलें आणि तडजोडीचा आणखी एक प्रयत्न सुरू झाला. या तडजोडींतून १९४६ च्या मे महिन्यांत एक घटनापरिषदेची व हंगामी राष्ट्रीय मंत्रिमंडळाची योजनाही तयार झाली. त्याप्रमाणें घटनापरिषद भरण्याचें ठरलें, तरीही या घटनापरिषदेच्या कार्यपद्धतीसंबंधीं व राष्ट्रीय हंगामी मंत्रिमंडळाच्या घटनेसंबंधीं पुन्हा मुस्लिम लीग पक्षानें वाद सुरू केला. जोंपर्यंत घटनापरिषदेच्या कार्यपद्धतीचें स्वरूप आपण म्हणतों त्याप्रमाणें ठरविण्यांत येत नाहीं, तोंपर्यंत आपण घटनापरिषदेवर बहिष्कार घालूं आणि हंगामी मंत्रिमंडळांतही जाणार नाहीं असें भांडण मुस्लिम लीगनें पुन्हा सुरू केलें. याही वेळीं ब्रिटिश मंत्रिमंडळानें मुस्लिम लीगचें म्हणणें अन्यायाचें आहे असें म्हणून

तिला गप्प बसविलें नाहीं. याचें कारण राष्ट्रसभेला एक नित्य प्रतिस्पर्धी असला पाहिजे अशी ब्रिटिश मंत्रिमंडळाची किंवा ब्रिटनमधील इतर पक्षांतील अनेक पुढाऱ्यांची वृत्ति व इच्छा होती. पुढें कांहीं दिवस लॉर्ड वेव्हेल यांनीं पंडित नेहरू यांच्या पंतप्रधानत्वाखालीं मुस्लिम लीगचा असहकार असतांनाही एक राष्ट्रीय सरकार स्थापन केलें, हें पाहतांच थोड्या वेळानें मुस्लिम लीग राष्ट्रीय मंत्रिमंडळांत शिरली आणि तेथें राहून आंतून प्रत्येक गोष्टीस अडथळा करावयाचा आणि ज्या प्रांतांत मुस्लिम लीगचें मंत्रिमंडळ असेल तेथें सरकारचें सहाय्य व अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळवून दंगे व हिंदूंच्या कत्तली करावयाच्या असें राक्षसी धोरण अमलांत आणण्यास सुरुवात केली.

ज्या प्रांतांत राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें होतीं त्या प्रांतांतील अल्पसंख्याकांच्याविरुद्ध असे अन्याय राष्ट्रसभेनें होऊं दिले असते तर देशांत शांततारक्षण करणें शक्य नसल्यामुळें सर्व प्रांतांतील व मध्यवर्ती प्रातिनिधिक सरकारें गुंडाळून ठेवून सर्वत्र लष्करशाही अमल सुरू करणें लॉर्ड वेव्हेल यांना या वेळीं अगदीं शक्य होतें. अर्थात् राष्ट्रसभेला ही गोष्ट नको असली तरी मुस्लिम लीगला ती घडण्यांत वाईट असें कांहीं वाटत नव्हतें. इंग्लिशांची सत्ता नष्ट करण्याची धडपड केवळ राष्ट्रसभेलाच करावयाची होती, आणि तिची ही धडपड यशस्वी झाली तर देशांतील कांहीं भागांवर आपलें राज्य व्हावें एवढीच मुस्लिम लीगची इच्छा होती. राष्ट्रसभेला चुरडून टाकून सर्व देशांत पुन्हा ब्रिटिशांची अनियंत्रित सत्ता स्थापन झाली तर तिच्याविरुद्ध झगडण्याची मुस्लिम लीगला इच्छा नव्हती व गरजही वाटत नव्हती. ब्रिटिशांना सर्व हिंदुस्थानांत केवळ एकट्या राष्ट्रसभेची सत्ता स्थापन व्हावी हें अनिष्ट वाटत होतें. मात्र हें अनिष्ट टाळण्यासाठीं हिंदुस्थानचे अगदीं स्वतंत्र असे दोन तुकडे करावेत किंवा नाहीं याबद्दल त्यांच्यांत मतभेद होता. शक्य तर संरक्षण आणि परराष्ट्रीय राजकारण व दळणवळण येवढ्यापुरतें ऐक्य राहावें आणि इतर बाबतींत कांहीं प्रांत हिंदूंचे व कांहीं प्रांत मुसलमानांचे असे बनून त्यांचा अंतर्गत लढा

चालू राहिल्यास तो त्यांना हवा होता. आणि हिंदुस्थान स्वतंत्र होणारच, तर त्याचे दोन किंवा अधिक खंड व्हावेत हीच कांहीं ब्रिटिशांची इच्छा होती. याबद्दल त्यांच्यांत अनेक मतभेद असले तरी त्यांच्यापैकीं कोणाही मुत्सद्यास सर्व हिंदुस्थानवर राष्ट्रसभेची हुकमत चालावी हें इष्ट वाटत नव्हतें. राष्ट्रसभा ही हिंदुस्थानांतील अनेक पक्षांपैकीं एक पक्ष आहे असें भांडण त्यांनीं १९३० सालापासून आतांपर्यंत चालविलें होतें. राष्ट्रसभेनें आपली शक्ति वाढवून आठ प्रांत आपल्या ताब्यांत घेतले होते. दोन प्रांत, मुसलमानांच्या मतांत इंग्रजांचीं मतें घालून इंग्रजांनीं मुस्लिम लीग मंत्रिमंडळाच्या हातांत ठेविले होते. हे दोन प्रांत म्हणजे बंगाल आणि सिंध हे होत. तिसरा प्रांत पंजाब. येथें हिंदु-मुसलमान व शीख असा तिरंगी लढा लाविल्यामुळें तेथें राष्ट्रीय सभा आपलें प्रभुत्व स्थापन करूं शकली नव्हती. वस्तुतः हें इंग्रजांचेंच सर्व कारस्थान होतें. बंगाल व सिंध प्रांतांतील मुस्लिम लीगचीं मंत्रिमंडळें उघडपणें इंग्रजांच्या मतानें टिकवून धरण्यांत आलीं होतीं. आणि पंजाब प्रांतांत मुसलमानांप्रमाणें शीखांनाही स्वतंत्र मतदारसंघ देऊन त्या प्रांतांत राष्ट्रीय मंत्रिमंडळ केव्हांच स्थापन होऊं नये अशी व्यवस्था करण्यांत आली होती. अखेरीस या तिरंगी लढ्यांतून अधिकांत अधिक दंगली व रक्तपात या दुर्दैवी पंजाब प्रांतांतच घडून आल्या.

पंजाब प्रांत हा विद्येंत मागासलेला आणि लष्करांत पुढारलेला होता. तेथील हिंदु-मुसलमान व शीख हे सर्वच लोक लष्करी वृत्तीचे होते. आणि या लष्करी प्रांतांत राष्ट्रीय वृत्ति निर्माण होऊं नये यासाठीं स्वतंत्र मतदारसंघ स्थापन करून तेथील जनतेला जमातवादाचें शिक्षण देण्यांत आलेलें होतें. अशी या पंजाब प्रांताची करुण कहाणी आहे. सीमा प्रांत हा लढाऊ पठाणांचा प्रांत आहे; तथापि त्यांत राहणारे लोक प्रामुख्यानें एकाच धर्माचे असल्यामुळें इंग्रजांचें हें भेदनीतीचें राजकारण फैलावलें नाहीं आणि तो प्रांत मुसलमानप्रधान असूनही राष्ट्रसभेनें काबीज केलेला होता. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतां मुस्लिम लीगचें राज्य ज्या ठिकाणीं होतें तेथेंही

तें खरें इंग्रजांचेंच होतें हें दिसून येईल. राष्ट्रसभा हीच एकंदर हिंदुस्थानची खरी प्रतिनिधि आहे हें अनेक प्रसंगीं सिद्ध झालेलें होतें, परंतु कांहीं भाग तरी मुस्लिम लीगच्या ताब्यांत द्यावा आणि राष्ट्रसभेला एक प्रतिस्पर्धी परत कायम ठेवावा ही ब्रिटिशनीति होती.

या नीतीवर राष्ट्रसभेला एकच उपाय योजण्यासारखा होता. तो म्हणजे ब्रिटिश सत्ता या देशांतून नष्ट होईपर्यंत हिंदुस्थानची राज्य-घटना बनविणारी घटनापरिषद भरवायचीच नाहीं. आधीं आपलें सर्व सामर्थ्य एकवटून ब्रिटिश सत्ता या देशांतून नामशेष करावयाची व मगच घटनापरिषद भरवावयाची हा प्रयत्न १९४२ सालीं केला; पण तो तितक्या प्रमाणांत यशस्वी झाला नाहीं. आतां शिष्टाईच्या मार्गानें व इंग्रजाशीं तडजोड करून स्वातंत्र्य संपादन करण्याचा व त्यांचें राज्य असतांना घटनापरिषद भरवून नवी राज्य-घटना तयार करण्याचा नामुष्कीचा प्रसंग राष्ट्रसभेवर आलेला होता. ही नामुष्की आहे म्हणून स्वस्थ बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं असा विचार करून राष्ट्रसभेनें हा शिष्टाईचा मार्ग स्वीकारलेला होता. अर्थात् या मार्गाचें अवलंबन करीत असतां इंग्रजांनीं मुस्लिम लीगला दिलेलीं अभिवचनें त्यांनीं परत घ्यावींत आणि आपलें लष्करी सामर्थ्य राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळाच्या हातीं देऊन दंगेखोर व आडदांड मुस्लिम लीग पक्षाला ठेचून टाकण्यास इंग्रजांनीं सहाय्य करावें ही गोष्ट न्यायाची असली तरी ते तसें करतील अशी अपेक्षा करणें योग्य नव्हतें. या बाबतींत इंग्रज कितीही उदार नि न्यायी झाले तरी स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार कांहीं भागांत मुसल-मानांचें स्वतंत्र राज्य करण्यास राष्ट्रसभेनें संमति दिल्यावांचून ते हिंदुस्थानला विशिष्ट कालांत स्वातंत्र्य देण्याची घोषणा करणें शक्य नव्हतें. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांनीं अखेरीस पंजाब व बंगाल या प्रांतांची फाळणी करून त्यांतील मुसलमानेतर असा पंजाब व बंगाल विभाग हिंदी राज्यांत समाविष्ट करून सीमा प्रांत, पंजाब, सिंध, बलुचिस्तान आणि पूर्व बंगाल व आसामांतील सिल्हेट जिल्हा या विभागांत एक पाकिस्तान नांवाचें

लोकशाही राज्य स्थापन करण्यास संमति देण्याचें ठरविलें. ब्रिटिशांनीं या पायावर तडजोड करण्याचें मान्य केलें आणि सर्व हिंदुस्थान म्हणजे हिंदी संघराज्य, पाकिस्तान आणि हिंदी संस्थानें हा सर्व भाग पूर्ण स्वतंत्र करून आपली साम्राज्यसत्ता त्यांतून ताबडतोब काढून घेण्याचें आश्वासन दिलें. हें आश्वासन मिळून ३ जून १९४७ रोजीं राष्ट्रसभा, मुस्लिम लीग आणि ब्रिटिश सरकार यांच्या दरम्यान एक तडजोड झाली. ही तडजोड पंधरा ऑगस्ट १९४७ रोजीं अमलांत यावयाची असें ठरलें आणि त्याच्यापूर्वी एक महिना ब्रिटिश पार्लमेंटांत सर्व हिंदुस्थानांतून ब्रिटिश साम्राज्यानें आपली सत्ता १५ ऑगस्ट १९४७ पासून काढून घ्यावी आणि हिंदी संघराज्य व पाकिस्तान येथें दोन हंगामी राष्ट्रीय सरकारें स्थापन करून त्याच्या हातीं तीं देऊन टाकावींत असा ब्रिटिश पार्लमेंटांत कायदा पास करण्यांत आला.

राष्ट्रसभेनें म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई प्रभृति राष्ट्रसभेच्या मंत्र्यांनीं एक अपरिहार्य घटना म्हणून हिंदुस्थानच्या फाळणीस अखेरीस १९४७ च्या जूनमध्यें मान्यता देण्याचें ठरविलें; तथापि व्यक्तिशः महात्मा गांधी हे या फाळणीस अखेरपर्यंत विरोधी होते. राष्ट्रसभेंतील समाजवादी पक्ष हाही अशी फाळणी करण्यास विरुद्ध होता. १९४७ च्या मे महिन्यांत लॉर्ड मौंटबॅटन हे हिंदुस्थानांतून आपल्या योजनेस पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार पटेल यांची कच्ची संमति घेऊन विलायतेस गेलेले होते. महात्मा गांधी यांनीं २५ मे रोजीं एक पत्रक काढून फाळणीच्या योजनेस आपला विरोध प्रकट केला होता. राष्ट्रसभेंतील समाजवादी पुढारी महात्मा गांधींच्या या विरोधास पाठिंबा देत होते. ता. २ जून १९४७ रोजीं पुन्हा महात्मा गांधींना अखंड हिंदुस्थानच्या मागणीचाच पुरस्कार केला. परंतु महात्मा गांधी व समाजवादी पुढारी यांच्या या विरोधास यश येण्याचा संभव नव्हता. राष्ट्रसभेचे प्रमुख मंत्री आणि कार्यकारिणी यांना व्यवहारदृष्ट्या आतां फाळणी करण्यावांचून आपली म्हणजे जनतेची आलेली कोंडी फुटूं शकत नाहीं असें वाटत होतें.

या वेळीं जर फाळणीस संमति दिली नाहीं तर सर्व देशभर दंगल माजेल आणि सर्वांचाच नाश होण्याचा धोका उत्पन्न होईल. यापूर्वी १९४८ च्या जून अखेरीपर्यंत ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानांतून काढून घेऊं अशी घोषणा १९४७ च्या फेब्रुवारी महिन्यांत ब्रिटिश मंत्र्यांनीं केलेली होती. पण ही घोषणा करण्यापूर्वी जर मुस्लिम लीगचें समाधान न होतां, तिनें आपला घटनापरिषदेवरील बहिष्कार कायम ठेवला तर राष्ट्रसभा, एखाद्या विभागांतील लोकमत हिंदी संघराज्यांत राहण्यास विरुद्ध असेल तर त्या विभागांतील लोकांना सक्तीनें आपल्या राज्यांत डांबून ठेवणार नाहीं, असें राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांनीं जाहीर केलें होतें. अर्थात् अखेरीस हिंदुस्थानच्या कांहीं भागांत जर मुसलमान लोकांना स्वतंत्र राज्य स्थापण्याची इच्छा असेल तर तिला राष्ट्रसभा हिंदी संघराज्यांत राहण्याची सक्ती करणार नाहीं, असा याचा अर्थ होता. लोकशाही आणि स्वयंनिर्णय या तत्त्वांनुसार असें करण्यावांचून गत्यंतर नाहीं हें राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना मान्य करणें भाग होतें व ब्रिटिश मुत्सद्दी या गोष्टीस मान्यता दिल्यावांचून विशिष्ट तारखेच्या आंत आपलें साम्राज्य हिंदुस्थानांतून काढून घेऊं असें अभिवचन देण्यास तयार नव्हते. राष्ट्रसभेनें स्वयंनिर्णयाचें हें तत्त्व मुसलमान-प्रधान विभागास लावण्याचें मान्य केल्यानंतरच ब्रिटिश मुत्सद्यांनीं जून १९४८ मध्यें आपली सत्ता सर्व हिंदुस्थानांतून काढून घेण्याचें घोषित केलें होतें. इतकेंच नाहीं तर या घोषणेंतसुद्धां आपण आपली सत्ता काढून घेतांना ती सत्ता वाटल्यास एका मध्यवर्ती सरकारच्या हातीं देऊं अथवा वाटल्यास दोन मध्यवर्ती सरकारांत विभागून देऊं किंवा वाटल्यास ती प्रांतिक सरकारांनाच देऊन टाकूं, असेंही त्यांनीं म्हटलें होतें. अर्थात् जर ३ जून १९४७ रोजीं लॉर्ड मौंटबॅटन यांनीं राष्ट्रसभेपुढें मांडलेली फाळणीची योजना तिनें फेटाळून लावली असती तर एक वर्षानंतर म्हणजे १९४८ च्या जून महिन्याच्या अखेरीस ब्रिटिश निघून जातांना एकाच मध्यसरकारच्या हातीं ते आपलें सार्वभौमत्व देतील, असें मानण्यास कोणताही आधार नव्हता. याच्याउलट जर आपण लॉर्ड मौंटबॅटन याची योजना फेटाळून लावली

तर एक वर्षभर सर्व देशभर दंगल माजेल, ती दंगल शमविण्यास राष्ट्रसभेच्या हातीं लष्करी सामर्थ्य असणार नाहीं आणि ब्रिटिश-सरकार येथून जातांना देशाचे किती व कसे विभाग पाडून जातील याचा कोणासही अंदाज लागणें शक्य नव्हतें. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन सर्व देशाची राखरांगोळी होण्यापेक्षां फाळणीस आपण संमति द्यावी असें राष्ट्रसभेच्या नेत्यांनीं ठरविलें. राष्ट्रसभेच्या नेत्यांशीं महात्मा गांधींचे अखेरपर्यंत या बाबतींत मतैक्य झालें नाहीं. तरीही राष्ट्रसभेनें म्हणजे तिच्या कार्यकारिणीनें व अखेरीस अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनें लॉर्ड माँटबॅटन यांच्या फाळणीच्या योजनेस संमति दिली. या विषयासंबंधीं स्वतः महात्मा गांधी आणि राष्ट्रसभेचे नेते यांच्यांतील मतभेदांसंबंधीं ता. २७ जुलै १९४७ च्या हरिजनांत पुढील मजकूर आला आहे :—

"Talking to some friends on this subject, he (Mahatma Gandhi) said that the leaders had agreed to the partition as the last resort. They did not feel that they had made a mistake. Rather than let the whole country go to the dogs, they agreed to the partition hoping to give the country a much needed rest. He felt differantly. He had said that he would rather let the whole country be reduced to ashes than yield an inch to violence. But non-violence was his creed. It was not so with the congress. The congress had accepted non-violence as a policy."

या उताऱ्यांत गांधी म्हणतात कीं, राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांनीं अगदीं निरुपाय होऊनच फाळणीला मान्यता दिली. आपण चुकलों आहों असें त्यांना वाटत नाहीं. सर्व देश नष्ट होऊं देण्यापेक्षां फाळणीला मान्यता देऊन त्याला आज आवश्यक असणारी शांतता कांहीं काल लाभूं द्यावी म्हणून आम्हीं हें केलें असें

ते समजतात. मी स्वतः या मताचा नाहीं. अहिंसा हा माझा धर्म असल्यामुळें अत्याचाराच्या भीतीनें देशाचा एक इंचही विभाग तोडून देण्यापेक्षां सर्व देशाची राखरांगोळी झाली तरी मी तसें करण्यास मान्यता देणार नाहीं. परंतु माझें अहिंसा हें व्रत असल्यामुळें माझी ही वृत्ति आहे. राष्ट्रसभेचें अहिंसा हें केवळ धोरण आहे ; तो तिचा धर्म नव्हे. म्हणून तिनें ही फाळणी मान्य केलेली आहे. ज्या वेळीं राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीनें ३ जूनची फाळणीची योजना मान्य केली तेव्हां गांधींनीं असें पाहिलें कीं, आतां ही गोष्ट अपरिहार्य आहे आणि त्यांनीं हिंदी जनतेला असा सल्ला दिला कीं, राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांनीं मान्यता दिलेली ही योजना फेटाळून राष्ट्रसभे-विरुद्ध बंड करण्यास अथवा तिच्या आजच्या नेत्यांविरुद्ध बंड करण्यास राष्ट्रानें तयार होऊं नये, असा उपदेश राष्ट्राला करण्यांत गांधीजींची दृष्टि कोणती असावी ?

त्यांची याबाबत दृष्टि पुढीलप्रमाणें असावी असें आम्हांस वाटतें : पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि मौलाना आझाद हे राष्ट्रसभेचे नेते जनतेच्या विश्वासास आज पात्र आहेत. त्यांच्याविरुद्ध बंड करून ताबडतोब क्रांति यशस्वी करणें आपणांस शक्य नाहीं आणि जे समाजवादी पुढारी या निर्णयाविरुद्ध बंड करावें म्हणत होते त्यांनाही तें शक्य नव्हतें. तात्काळ क्रांति करण्याचा प्रयत्न केल्यास ती क्रांति अहिंसेच्या बंधनांत राहणें अशक्य होतें. आणि हिंसक क्रांति करण्यासीं ते सहकार्य देऊं शकत नव्हते. अशी हिंसक क्रांति करण्याची ताकत दुसऱ्या कोणापाशीं आहे असेंही त्यांना वाटत नव्हतें. म्हणून आतां आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं जो निर्णय घेतला आहे, तो फेटाळून लावून ताबडतोब क्रांति करण्याचा प्रयत्न कोणीही करूं नये. तशी ताकत आज आपल्यापाशींही नाहीं, हें त्यांनीं अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या वेळीं उघडपणें बोलून दाखविलें. अर्थात् ही फाळणीची योजना मान्य करण्यावांचून राष्ट्राला दुसरा कोणताही मार्ग उरला नव्हता आणि तें टाळण्याचें सामर्थ्य देशांतील कोणत्याही पक्षापाशीं किंवा पुढारी व्यक्तीपाशीं नव्हतें.

हिंदु-मुसलमान ऐक्य आणि द्विराष्ट्रवाद

हिंदी राष्ट्रवाद हा हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यावर उभारला गेला पाहिजे हें महात्मा गांधींचें तत्त्व केवळ त्यांचेंच नसून राष्ट्रसभा स्थापन झाल्यापासून तिच्या सर्व नेत्यांनीं हें तत्त्व मान्य केलेलें होतें. ब्रिटिश लोक प्रथमतः हेंच तत्त्व मान्य करून हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्व निर्माण होऊं शकेल, असें म्हणत असत. परंतु असें म्हणतांना त्यांच्या अन्तःकरणांत अशीही एक भावना होती कीं, हें तत्त्व हिंदुस्थानांतील हिंदूंना व मुसलमानांना पटण्यास अनेक शतकें लागतील. हे दोनही लोक आपल्यापेक्षां हीन संस्कृतीचे आहेत. या मागासलेल्या लोकांवर आपण शेंदोनशें वर्षें निश्चितपणें राज्य करूं शकूं. यानंतर जर यांच्यामध्यें आधुनिक राष्ट्रीयत्व आणि लोकशाही या भावना बद्धमूल झाल्या तर मात्र आपणांस त्यांच्यावर राज्य करतां येणार नाहीं. राष्ट्रसभा स्थापन झाल्यानंतर असें दिसूं लागलें कीं, या चळवळींत हिंदु-मुसलमान एक होत आहेत. तेव्हां त्यांनीं मुसलमानांना राष्ट्रसभेपासून अलिप्त ठेवण्याचें एक तंत्र शोधून काढलें. राष्ट्रसभा ज्या लोकशाहीची मागणी करीत आहे ती लोकशाही या देशांत स्थापन झाल्यास येथें केवळ हिंदूंचेंच राज्य होईल अशी भीति त्यांनीं मुसलमान जनतेंत व पुढाऱ्यांत फैलाविण्यास सुरुवात केली. राष्ट्रसभेची चळवळ ही हिंदुराज्याची चळवळ आहे आणि म्हणून मुसलमानांनीं तिला पाठिंबा देऊं नये असा पक्ष त्यांनीं सर सय्यद अहमद यांच्या नेतृत्वाखालीं निर्माण केला. यामुळें १८९३ पासून हिंदु-मुसलमानांचे दंगे या देशांत निर्माण होऊं लागले. तरीही पुणें-मुंबईसारख्या दक्षिण हिंदुस्थानांतील विभागांत मुसलमान फारच अल्पसंख्य असल्यानें राष्ट्रसभेची चळवळ जोरास लागून लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखालीं महाराष्ट्रांत राष्ट्रसभेचें नेतृत्व राष्ट्रीय जहाल पक्षाकडे जाऊं लागलें. केवळ मुसलमानांना राष्ट्रसभेपासून अलग करण्यानें महाराष्ट्रांतील टिळकांची राष्ट्रीय चळवळ कमकुवत होण्याचा फारसा संभव नव्हता, हें पाहून महाराष्ट्रांत व मद्रास इलाख्यांत त्यांनीं राष्ट्रीय सभा ही ब्राह्मणांची सभा आहे आणि म्हणून ब्राह्मणेतर जनतेनें तिच्यांत जाऊं

नये असा उपदेश करावयास प्रारंभ केला. १९०८ सालीं लोकमान्य टिळकांना तुरुंगात घातल्यानंतर लॉर्ड सिडनेहॅम् आणि कोल्हापूरचे शाहु छत्रपति या दोघांच्या प्रयत्नानें ब्राह्मणेतर पक्षाचें राजकारण हळू-हळू सुरू झालें. अशा रीतीनें मुस्लिम लीग ही अराष्ट्रीय मुसलमानांची राजकीय संस्था आणि ब्राह्मणेतर पक्ष हा अराष्ट्रीय ब्राह्मणेतरांचा राजकीय पक्ष अशी परिस्थिति १९२० सालीं महात्मा गांधी पुढारी झाले त्या वेळीं इंग्रजांनीं निर्माण केली होती. गांधींच्या चळवळीमुळें ब्राह्मणेतर राष्ट्रीय पक्ष निर्माण झाला आणि त्यानें अराष्ट्रीय ब्राह्मणेतर पक्षास नेस्तनाबूत केलें. त्याचप्रमाणें गांधींनीं मुसलमानांत एक राष्ट्रीय पक्ष निर्माण केला आणि मुस्लिम लीगच्या अराष्ट्रीय मुस्लिम पक्षास प्रतिस्पर्धी शक्ति निर्माण केली. परंतु मुसलमानांना विभक्त मतदार संघ प्रथमपासूनच दिल्यामुळें या कामीं अराष्ट्रीय मुस्लिम लीगचा पाडाव करण्यांत गांधींनीं निर्माण केलेल्या राष्ट्रीय मुसलमान पक्षास यश येऊं शकलें नाहीं.

बॅ. जिना यांनीं मुसलमानांना राष्ट्रीय सभेंतून फोडून काढण्यासाठीं द्विराष्ट्रवादाचा प्रचार करण्यास सुरुवात केली आणि १९४० सालीं राष्ट्रीय सभा ब्रिटिशांविरुद्ध सत्याग्रहाच्या लढ्यांत गुंतली असतां ब्रिटिशांच्या सहाय्यानें आणि मुसलमानांच्या धर्मवेडानें पाकिस्तानचें ध्येय मुसलमान जनतेंत फैलावण्यासाठीं अत्याचारी मार्गाचा अवलंब करण्यास सुरुवात केली. मुसलमानांच्या या अत्याचारी धोरणास अत्याचारानें उत्तर देणें हें राष्ट्रीय सभेला किंवा हिंदुमहासभेसही इच्छा असती तरीही करणें अशक्य होतें. देशांतील प्रस्थापित राज-सत्तेचा आश्रय करून जो पक्ष अत्याचाराचा अवलंब करतो व त्या अत्याचारी मार्गांनीं इतरांना दहशत दाखवून राजसत्तेच्या लागूल-चालनानें आपलें साध्य प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करतो त्याचा पाडाव सशस्त्र मार्गानें करणें ही गोष्ट राष्ट्रसभेसारखी जी राष्ट्रीय संस्था देशातील प्रस्थापित राजसत्तेला उखडून लावण्याचा प्रयत्न करीत असते तिला केव्हांही शक्य नसतें. हा विवेक राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांनीं प्रथम-

पासून अखेरपर्यंत ठेवला होता. महात्मा गांधींची आत्यंतिक अहिंसा-निष्ठा आणि त्यांचा अहिंसाधर्माचा उपदेश याच्याशीं राष्ट्रसभेच्या या विवेकी धोरणाचा फारसा संबंध नाहीं. तो असला तरी इतकाच आहे कीं, राष्ट्रसभेचें अंतिम नेतृत्व या काळांत महात्मा गांधींच्याच हातीं असल्यामुळें आणि ते एक स्थितप्रज्ञ अहिंसानिष्ठ नेते असल्यामुळें मुस्लिम लीगला पुढें करून ब्रिटिश मुत्सद्यांनीं राष्ट्रसभेला चिडवून तत्त्वभ्रष्ट करण्याचे जे अनेक प्रयत्न केले आणि कित्येक वेळां काहीं आमिषें दाखवून तुम्ही केवळ हिंदूंचे प्रतिनिधि आहां असें कबूल करा असा मोह उत्पन्न करण्याचे प्रयत्न केले ते ब्रिटिशांचे सर्व प्रयत्न महात्मा गांधींच्या उपदेशामुळें व सल्ल्यामुळें त्यांनीं यशस्वी होऊं दिले नाहींत. राष्ट्रसभा गांधींच्याप्रमाणें संपूर्ण अहिंसानिष्ठ केव्हांच बनली नाहीं. तथापि गांधींच्यामुळें ती केव्हांही तत्त्वभ्रष्ट व विवेकभ्रष्टही बनली नाहीं. मुस्लिम लीगनें आणि तिच्या पाठीमागें असणाऱ्या ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनीं राष्ट्रसभेला चीड आणण्याचे, दहशत घालण्याचे आणि मोह पाडण्याचे गेल्या तीस वर्षांत इतके प्रचंड प्रयत्न केले कीं, महात्मा गांधींसारखा अहिंसानिष्ठ स्थितप्रज्ञ नेता तिला लाभला नसता तर ती सभा केवळ हिंदूंची हिंदुराष्ट्रवादी संस्था बनण्याचा फार धोका होता.

पंडित मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय, लोकनायक अणे आणि केळकर प्रभृति इतर महाराष्ट्रीय पुढारी या काळांत हिंदुसभावादी बनले. हिंदुसभा राष्ट्रसभेच्या विरोधी धोरण स्वीकारूनही मुस्लिम लीगच्या राजकारणास कोणताही यशस्वी विरोध करूं शकली नाहीं आणि देशाची फाळणीही टाळूं शकली नाहीं. यावरून तिचें राजकारण हिंदुस्थानच्या परिस्थितींत अव्यवहार्य असल्याचें पूर्णपणें सिद्ध झालें आहे. राष्ट्रसभेचें राजकारण तिच्या मानानें पूर्णपणें यशस्वी झालें असेंही म्हणतां येईल. तिनें अखेरीस देशाच्या फाळणीस मान्यता दिली तरी ती मान्यता केवळ लोकशाही आणि स्वयंनिर्णय या तत्त्वांनुसारच दिली व हिंदुस्थानच्या सर्व विभागांतून ब्रिटिशांचें सार्वभौमत्व पूर्णपणें नष्ट करण्याची प्रतिज्ञा

पूर्ण केली. पाकिस्तानसुद्धां सर्व हिंदुस्थानास तिनें परकीय सत्तेच्या अमलांतून मुक्त केलें असून या सर्व देशास संपूर्ण स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय आणि लोकशाही राज्य यांची प्राप्ति करून दिली. बॅरिस्टर जिना यांचा द्विराष्ट्रवाद तिनें केव्हांही मान्य केला नाहीं आणि उलट हिंदी संघराज्य आणि पाकिस्तान या दोनही राज्यांची घटना हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याच्या तत्त्वावरच बनविण्यांत आली पाहिजे हें तत्त्व अखेरीस मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांसही मान्य करावें लागलें. हिंदी संघराज्यांतील मुसलमानांना जमातवादी राजकारण सोडावयास लावलें आणि ब्रिटिशांनीं निर्माण केलेले स्वतंत्र मतदारसंघ, ब्रिटिशांना काढून लावून कायदेशीर व मुसलमानांच्याही संमतीनें काढून टाकले. असें असलें तरी मुस्लिम लीगनें द्विराष्ट्रवादी, अत्याचारी, धर्मवेडी भावना मुसलमान जनतेमध्यें फैलावली ती पाकिस्तानांतून अद्यापि नष्ट झालेली नाहीं. ब्रिटिशांनीं निर्माण केलेल्या राक्षसी शक्तीचा तो अवशेष आहे. ती राक्षसी शक्ति पूर्णपणें नष्ट करण्यांत महात्मा गांधींना किंवा राष्ट्रसभेला अद्यापि यश आलेलें नाहीं हें कबूल करणें भाग आहे. फाळणी मान्य केल्यानंतरसुद्धां ब्रिटिशांच्या धोरणानें आणि आश्रयानें पाकिस्तानी मुसलमानी जनतेंत निर्माण झालेली ही राक्षसी शक्ति आणि तिची प्रतिक्रिया म्हणून हिंदी संघराज्यांत जागृत होणारा प्रतिगामी हिंदुराष्ट्रवाद यांना शांत करणें, आणि दोनही राज्यांतील अल्पसंख्याकांचें हितरक्षण व संरक्षण योग्यप्रकारें होईल अशी परिस्थिति निर्माण करणें याच कामांत महात्मा गांधी १९४६ च्या डिसेंबरपासून तों १९४८ च्या जानेवारीच्या ३० तारखेस त्यांचा वध होईपर्यंतच्या काळांत अहोरात्र गुंतलेले होते आणि या प्रयत्नांतच अखेरीस त्यांना आपलें बलिदान करावें लागलें. या बलिदानामुळें हिंदी संघराज्यात निर्माण होऊं लागलेला हिंदुराष्ट्रवादाचा भस्मासुर शांत झाला आहे आणि हिंदी संघराज्यांतून जमातवादी राजकारण कायमचें नष्ट होत चाललें आहे.

फाळणी टाळण्याचे निर्वाणीचे अहिंसक प्रयत्न

हिंदु आणि मुसलमान हीं दोन राष्ट्रें आहेत आणि तीं एका राज्यांत केव्हांही सुखानें नांदणें शक्य नाहीं असा दुराग्रह धरून मुस्लिम लीगनें अज्ञानी मुसलमान जनतेला राष्ट्रसमेविरुद्ध प्रक्षुब्ध केलें. लीगनें मुसलमान जनतेंत फैलावलेली ही भावना अनेक शतकांच्या ऐतिहासिक परंपरेंतील कांहीं स्मृति जागृत करून फैलावण्याचा प्रयत्न चालविला होता. हिंदी राजकारणाच्या इतिहासांत हिंदुस्थानचें सार्वभौमत्व मुसलमानांकडे असावें कीं हिंदूंकडे असावें हा लढा अनेक शतकें चालू होता. हिंदु आणि मुसलमान हा धर्मभेद विसरून लोकशाहीच्या पायावर एकराष्ट्रीयत्व निर्माण करण्याचा प्रयत्न हा चाळीस-पन्नास वर्षांहून अधिक जुना नव्हता. अर्थात् हिंदु आणि मुसलमान हे दोन धर्म परस्परांशीं विरोधी आहेत ही भ्रामक व अनर्थावह भावना नष्ट करण्याचे प्रयत्न कबीर, नानक यांच्या वेळेपासून हिंदुस्थानांत सुरू होते. कबीर आणि नानक सामान्य जनतेंतील भक्तिभावनेचे आणि संतप्रवृत्तीचे प्रतिनिधि होते. हिंदुस्थानांतील सामान्य जनता खेड्यापाड्यांत पसरलेली असून तेथील हिंदु आणि मुसलमान शतकानुशतकें एकमेकांशीं सलोख्यानें व प्रेमानें वागत होते. प्रत्येकाचा धर्म भिन्न असला तरी सर्व धर्मांचें रहस्य एकच आहे ही गोष्ट त्यांच्या अनुभवांना पटत होती. धर्म ही सदाचार शिकविणारी, अंतःकरण शुद्ध करणारी, जीवनाची निष्ठा असून शेजाऱ्याशीं प्रेमानें वागावें, कोणावर अन्याय करूं नये, इतरांना पीडा देऊं नये आणि शक्य तर परोपकारबुद्धीनें जनतेची सेवा करावी अशी सर्व धर्मांची शिकवण आहे. हा सामान्य जनतेचा समज कबीर-नानकादि साधुसंतांनीं वाढविला होता. राम आणि रहिम किंवा कृष्ण आणि करिम हे एकच आहेत आणि आपल्या अंतःकरणांतील सत्प्रवृत्ति होच त्या अंतरात्म्याची मूर्ति आहे अशी यांची शिकवण होती. हिंदुस्थानांतील जनतेमध्यें व्यापक प्रमाणांत पसरलेल्या या संतांच्या भक्तिमार्गांतून निर्माण झालेला भागवत धर्म हा हिंदु-मुसलमान या धर्मांतील भेदांच्या पलीकडे गेला होता. ख्रिस्ती शकाच्या चौदाव्या शतकापासून सोळाव्या

शतकापर्यंत हिंदुस्थानांत होऊन गेलेल्या अनेक साधुसंतांनीं या व्यापक विश्वधर्माची दीक्षा जनतेला देण्याचा प्रयत्न केला होता.

पण हा संतांचा भागवतधर्म हिंदुस्थानांतील राजकारणांत आपला प्रभाव फारसा पाडूं शकला नाहीं. याचें कारण हिंदुस्थानांत या काळांत जें राजकारण चालू होतें त्या राजकारणांत संतांना जसें कोणतेंही स्थान नव्हतें तसेंच सामान्य जनतेलाही फारसें स्थान नव्हतें. त्या वेळचें राजकारण हें सरंजामदार व राजे-महाराजे किंवा नबाब-बादशहा यांच्या हातीं एकवटलेलें होतें. तें राजकारण सत्ताभिलाषी आणि लढाऊ आक्रमक वृत्तीचें होतें. केवळ शस्त्राच्या व लष्कराच्या बळावर सर्व हिंदुस्थानांत एकछत्री मुसलमानांची राजवट स्थापन करण्याचा प्रयत्न या वेळीं अनेक मुसलमान, सुलतान व बादशाह करीत असत. १६ व्या शतकाच्या प्रारंभीं उत्तर हिंदुस्थानांत निरनिराळ्या राजानीं आणि सुलतानांनीं आपापसांत लढून दिल्लीची सुलतानशाही दुर्बल करून मोडकळीस आणली होती. या दंगलीचा फायदा घेऊन बाबर, हुमायून आणि अकबर यांनीं उत्तर हिंदुस्थानांत मोगल साम्राज्य स्थापन केलें. अकबरानें हें मोगल साम्राज्य सुस्थिर आणि चिरंतन करण्यासाठीं राजकीय धोरण या दृष्टीनें हिंदु-मुसलमानांचें ऐक्य करण्याचा प्रयत्न केला. हिंदु-मुसलमानांचा धर्मभेद हिंदुस्थानांत सुस्थिर, सार्वभौम सत्ता स्थापन करण्याच्या आड येत आहे असा त्याला अनुभव आला आणि या देशांत केवळ हिंदूंचें किंवा मुसलमानांचें सार्वभौमत्व टिकणार नाहीं हें ओळखून त्यानें सर्व धर्मांचें रहस्य व तत्त्व ग्रथित करणारा असा दीने इलाही या नांवाचा एक विश्वधर्म उपदेशिण्याचा प्रयत्न केला. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, शीख या सर्व धर्मांचें रहस्य एकच आहे या आधारावर त्यानें सर्व हिंदुस्थान एकछत्री अमलाखालीं आणण्याचा प्रयत्न चालविला. आणि त्याचा हा प्रयत्न सामान्यतः औरंगजेब बादशहाच्या काळापर्यंत बराचसा यशस्वी झाला. औरंगजेबानें पुन्हा केवळ मुसलमानांच्या धर्मास जवळ करून मुसलमान आणि मुसलमानेतर यांचा झगडा निर्माण केला आणि त्याचा मरणकाल येण्यापूर्वीच त्याला दिसून आलें कीं, आपला हा

प्रयत्न विफल झाला असून मोगल साम्राज्य लवकरच नष्ट होणार आहे. त्याच्या काळांतच मराठे, रजपूत आणि शीख यांनीं मोगल साम्राज्याविरुद्ध बंडें केलीं, आणि त्याच्या मृत्यूनंतर पन्नास वर्षांच्या आंत मराठ्यांनीं मोगल साम्राज्य आपल्या ताब्यांत घेतलें तरीही त्यांना हिंदुस्थानचें एकछत्री राज्य स्थापन करतां आलें नाहीं आणि ब्रिटिशांनीं हिंदु व मुसलमान या दोघांचाही पाडाव करून आपलें साम्राज्य १९ व्या शतकांत स्थापन केलें. सतराव्या व अठराव्या शतकांत राजे-बादशहांचें आणि सरदार-जहागिदारांचें हें जें राजकारण झालें त्यांत सामान्य जनतेच्या हक्कांचा आणि सामान्य जनतेंत फैलावलेल्या संतांच्या विश्वव्यापक धर्माचा कोणताही प्रभाव पडला नाहीं. हिंदुस्थानच्या राजकारणांत सतराव्या व अठराव्या शतकांत लोकशाहीला कोणतेंही स्थान नव्हतें.

१९ व्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रसभेनें लोकशाहीचें राजकारण हिंदुस्थानांत प्रथमच निर्माण केलें. आणि लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांनीं हें राजकारण सामान्य जनतेंत फैलावून जनतेच्या शक्तीचा प्रभाव ब्रिटिशांच्या सत्तेवर पाडण्याचा पहिलाच प्रयत्न केला. महात्मा गांधींनीं जनतेच्या अंतःकरणांत साधुसंतांनीं निर्माण केलेल्या विश्वधर्माच्या आधारावर हिंदु-मुसलमान ऐक्याची भावना वाढवून आपल्या सत्याग्रही क्रांतीस हिंदु-मुसलमानांचा आणि स्पृश्यास्पृश्य हिंदु-जमातीचा पाठिंबा मिळण्याचा आटोकाट प्रयत्न केला. तथापि हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याच्या प्रयत्नांत त्यांना यावें तसें यश आलें नाहीं आणि ब्रिटिश सरकारला राष्ट्रसभेविरुद्ध मुस्लिम लीगचें पाठबळ मिळत जाऊन राष्ट्रसभेला फाळणी मान्य करण्यास भाग पाडतां आलें.

१९४६ च्या ऑगस्टपासून मुस्लिम लीगनें सिंध आणि बंगाल या प्रांतांत आपल्या मंत्रिमंडळाच्या छायेचा आधार घेऊन हिंदु-मुसलमानांचे दंगे करण्यास सुरुवात केली. या दंग्यास पहिलें भीषण स्वरूप कलकत्त्यांत प्राप्त झालें. कलकत्त्यांतील दंगे थोडेसे थांबतात तोंच पूर्व बंगालमध्यें नौखाली येथें त्याहूनही भयंकर स्वरूपांत हिंदूंच्या कत्तली झाल्या. डिसेंबरपर्यंत या दंग्यांना एकसारखा ऊत येत गेला. आणि

हे दंगे सर्व देशभर पसरण्याचा धोका निर्माण झाला. बंगाल आणि सिंध या प्रांतांत जे दंगे झाले त्यांचा सूड म्हणून बिहार प्रांतांत हिंदु लोकांनीं मुसलमानांच्या कत्तलीस प्रारंभ केला. महात्मा गांधी डिसेंबर महिन्यांत कलकत्त्याकडे गेले आणि २६ डिसेंबरपासून पूर्व बंगालांतील खेड्यांत पायीं फिरून खेड्यांतील मुसलमान जनतेंत आपल्या मतांचा प्रचार करण्याचें व्रत त्यांनीं अंगीकारलें. जानेवारी ७ पासून त्यांनीं खेडेगावांतून शांततास्थापनेचा उपदेश करण्यासाठीं कांहीं थोडे निष्ठावंत अनुयायी बरोबर घेऊन शांतियात्रेस सुरुवात केली. या वेळीं बिहारमध्येंही दंगल सुरू झालेली होती. पण बिहारमध्यें राष्ट्रसभेचें मंत्रिमंडळ असल्यामुळें त्यानें मध्यसरकारच्या लष्करास बोलावून आणून पंडित नेहरूप्रभृतींच्या सहाय्यानें लवकरच शांतता प्रस्थापित केली. बंगालमध्यें मुस्लिम लीगचें मंत्रिमंडळ या कामीं अडथळा करूं लागलें आणि लॉर्ड वेव्हेल हे तो अडथळा दूर करण्यास धजेनात किंवा तयार होईनात. अशा परिस्थितींत गांधीजींनीं सुरू केलेली शांतियात्रा एवढा एकच उपाय करून पाहण्याजोगा होता. गांधीजींना अहिंसेच्या दृष्टीनें लष्करी सामर्थ्यानें स्थापन होणारी शांतता टिकाऊ होईल असें वाटत नव्हतें. तथापि आपला हा निर्वाणीचा शांततासंस्थापनेचा प्रयत्न त्या भीषण परिस्थितींत तात्कालिक यशप्राप्ति करून देईलच अशीही त्यांना खात्री नव्हती. अहिंसेवरील त्यांची निष्ठा यत्किंचितही ढळलेली नव्हती. परंतु जनतेच्या अंतःकरणांतील आणि विशेषतः राष्ट्रसभेविरुद्ध वाटेल ते खोटे आरोप करून प्रक्षुब्ध करण्यांत आलेल्या मुसलमान जनतेच्या भावना आपणांस ताबडतोब शांत करतां येतील किंवा नाहीं आणि त्यांच्या अंतःकरणांतील सुप्त परमेश्वर जागृत करून तेथील अल्पसंख्य हिंदूंचें रक्षण करण्यास त्या मुसलमानांचें मन आपण निश्चितपणें वळवूं शकूं किंवा नाहीं यासंबंधीं त्यांना तितका आत्मविश्वास वाटत नव्हता, पण ही गोष्ट तात्काळ घडली नाहीं, तरीही या मार्गानेंच हा प्रश्न अखेरीस सुटूं शकेल आणि थोड्याफार विलंबानें का होईना आपण तो सोडवूं शकूं याबद्दलही त्यांना शंका नव्हती. अहिंसेच्या मार्गा-

वांचून हिंदु-मुसलमानांचें ऐक्य घडविण्याचा दुसरा कोणताही उपाय खरा नाहीं. हिंदु आणि मुसलमान यांचें कायमचें ऐक्य झाल्यावांचून हिंदुस्थान अखंड राहूं शकत नाहीं आणि हें कायमचें ऐक्य घडवून आणावयाचें तर हिंदु आणि मुसलमान जनतेला सर्व धर्म एक आहेत हें केवळ बुद्धीनेंच नव्हे तर अंतःकरणानें पटलें पाहिजे. कोणतेंही मत केवळ बुद्धीस पटण्यापेक्षां तें अंतःकरणास जाऊन भिडावें यावर गांधीजींचा सर्वांत अधिक भर असे. हिंदु-मुसलमान जनतेच्या अंतःकरणांत शेंकडों वर्षांच्या सहवासामुळें सर्व धर्मांचें अद्वैत हें ठसलेलें आहे आणि तें आपण पुनः जागृत करूं शकूं, याबद्दल त्यांना शंका नव्हती. हें भिन्न धर्मांतील अद्वैत तात्काल जागृत करण्याचा उपाय कोणता योजावा याचें संशोधन ते करीत होते. जनतेच्या अंतःकरणाला आपल्या सेवेनें आणि प्रेमानें स्पर्श करणें हेंच या मार्गाचें सर्वसामान्य स्वरूप असलें तरी तें जनतेचें अंतःकरण एकदम धक्का देऊन कसें उचंबळवून आणावें असा त्यांच्यापुढें प्रश्न होता. त्यांची वृत्ति या वेळीं हिंदु-मुसलमानांना एकमेकांविरुद्ध वाटूं लागलेल्या द्वेषामुळें आणि परस्परांच्या भीतीमुळें व्यथित झालेली होती; आणि ही व्यथा दूर करण्यास अगदीं खेड्यांतील झोंपडींत राहणाऱ्या सामान्य जनतेला शुद्ध माणुसकीचें ज्ञान करून देणें आणि त्या जनतेच्या अंतःकरणांतील सत्प्रवृत्तींचा प्रभाव पाडून, द्वेष आणि दहशत यांच्या सहाय्यानें आपलें प्रतिगामी राजकारण यशस्वी करूं पाहणाऱ्या पुढाऱ्यांच्या विरुद्ध एक जनतेचें लोकशाही राजकारण निर्माण करण्याचा ते यत्न करीत होते. जानेवारी आणि फेब्रुवारी हे दोन महिने ते पूर्व बंगालमध्यें हिंडत होते. ही त्यांची शांतियात्रा चालू असतांना बिहारमध्यें परिस्थिति बरीच भीषण होत चालली होती. म्हणून मार्चच्या प्रारंभीं तें बंगाल-मधून बिहारचें निरीक्षण करण्यासाठीं पाटण्यास गेले.

मार्च महिना त्यांनीं बिहारमध्यें परिस्थितीचें निरीक्षण करण्यासाठीं काढला. तेथील हिंदु जनतेला आपली वृत्ति व धोरण समजून दिलें. हें कार्य बरेंचसें यशस्वी झाल्यानंतर मार्चअखेरीस ता. ३० रोजीं लॉर्ड मौंटबॅटन यांनीं गांधींना दिल्लीस बोलावून घेतलें. तेथें १२–१३

दिवस राहून पुनः १३ एप्रिल रोजीं गांधीजी बिहारला परत गेले. त्या वेळीं त्यांनीं पुनः खेड्यांतील दौऱ्यास प्रारंभ केला; पण ३० एप्रिल रोजीं पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं गांधींना पुन्हा दिल्लीस बोलावून घेतलें. आणखी एक आठवड्यानें म्हणजे ता. ८ मे रोजीं आतां गांधीजी बंगालमध्यें सुरू असलेलें आपलें पूर्वीचें कार्य पुन्हा अंगावर घेण्यासाठीं ताबडतोब दिल्लीहून कलकत्त्यास गेले. तेथें कांहीं दिवस राहून कार्यास प्रारंभ करतात तोंच त्यांना पुनः राजकीय कार्यासाठीं दिल्लीस जाणें भाग पडलें. २५ मेपासून ते ९ ऑगस्ट-पर्यंत त्यांना राजकीय वाटाघाटीसाठीं दिल्लीस राहणें भाग पडलें. या काळांत ३ जूनची फाळणीची योजना राष्ट्रसभेनें मान्य केली आणि १५ ऑगस्टपासून हिंदुस्थानचीं हिंदी संघराज्य आणि पाकिस्तान अशीं दोन स्वतंत्र सार्वभौम राज्यें स्थापन करण्याचें ठरलें. एक फाळणी-कमिशन नेमण्यांत आलें. आणि १५ ऑगस्टपर्यंत हें फाळणीचें काम पुरें करून हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याचें जाहीर व्हावें असेंहि ठरलें. महात्मा गांधींनीं या फाळणीसंबंधीं कोणतें धोरण व वृत्ति स्वीकारली होती तें मागील परिच्छेदांत सांगितलेंच आहे. देशाची फाळणी करण्यास संमति देण्यांत राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांची चूक झालेली आहे असें त्यांना वाटत असलें तरी आतां त्याबद्दल पुढाऱ्यांना दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें त्यांनीं ओळखिलें होतें. फाळणी अपरिहार्य म्हणून स्वीकारण्यांत आली तरी त्या फाळणीमुळें निर्माण होणारीं अरिष्टें कमी करणें आणि दोनहि राज्यांत हिंदु-मुसलमानांचें ऐक्य प्रस्थापित करून अल्पसंख्याकांना सुरक्षित करणें हेंच त्यांनीं यानंतर आपलें आद्य कर्तव्य ठरविलें. यासाठीं १५ ऑगस्ट रोजीं दिल्लींत आणि कराचींत जे स्वातंत्र्योत्सव साजरे करण्यांत येणार होते, त्या स्वातंत्र्योत्सवांत भाग घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. फाळणी-कमिशननें ह्या फाळणीच्या मर्यादा घालून दिल्या तरी देशांत दंगे होतील अशी भीति त्यांना वाटत होती. विशेषतः कलकत्ता शहर जर पश्चिम बंगालला देण्यांत आलें तर कलकत्ता शहर सोडून जातांना आम्ही त्या शहराची राख-रांगोळी करूं अशीं उघड भाषणें कांहीं मुसलमान पुढारी करीत होते.

तसेंच पूर्व बंगालांतही कलकत्ता शहर आपणांस मिळालें नाहीं याबद्दल पुन्हा दंगे उसळण्याची भीति होती. यासाठीं गांधीजींनीं दिल्ली सोडून कलकत्त्यास जाण्याचें आणि तेथें शांतता प्रस्थापित करण्याचें काम आपल्या अंगावर घेतलें. कलकत्त्यास जाण्यापूर्वी त्यांना काश्मीरच्या प्रश्नाकडे थोडें लक्ष देणें भाग होतें व त्यासाठीं आचार्य कृपलानी व पंडित नेहरू यांच्या सल्ल्यास अनुसरून ते काश्मीरकडे जाणार होते, पण यापुढें दिल्लीस वास्तव्य करण्याची व खंडित हिंदुस्थानच्या स्वातंत्र्योत्सवांत भाग घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. गांधीजी काश्मिरास जाऊन आले आणि तेथील राजानें व दिवाणानें शेख अबदुल्लांच्या प्रजापरिषदेवर बंदी घालून त्यांच्याविरुद्ध जी दडपशाही सुरू केली होती ती दडपशाही बंद करून अबदुल्ला यांची सुटका करावी आणि काश्मीरचा प्रश्न लोकशाहीच्या तत्त्वानुसार सार्वमतानें सोडविण्यापूर्वी तेथें जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी असा सल्ला त्यांनीं तेथील राजास दिला. यानंतर ते कलकत्त्यास जाण्यास निघाले. ता. ९ ऑगस्ट रोजीं दिल्लीहून कलकत्त्यास जाण्यास निघतांना त्यांनीं असें जाहीर केलें कीं, यापुढील माझें आयुष्य मी पाकिस्तानांत घालविणार आहें.

कलकत्त्यास गेल्यानंतर त्यांनीं नौखालीस जाण्यापूर्वी कलकत्त्यांतच शांततास्थापनेसाठीं कांहीं दिवस राहणें आपणांस आवश्यक आहे हें ओळखलें; म्हणून ते १५ ऑगस्ट रोजीं कलकत्त्यांतच राहिले आणि तेथें निर्माण झालेलें दंग्याचें वातावरण शांत करून त्यांनीं तेथें शांततेचें वातावरण निर्माण केलें; तरीही त्यानंतर थोड्याच दिवसांनीं कलकत्त्यांत पुन्हा दंगे सुरू झाले, हें पाहून महात्मा गांधींनीं ता. १ सप्टेंबर रोजीं हे दंगे शांत होईपर्यंत उपोषण करण्याचा निर्धार जाहीर केला. कलकत्त्यांतील हिंदु लोक या वेळीं गांधीजींच्यावर फार चिडलेले होते. आणि एकदां तर त्यांच्या वसतिस्थानावर हल्ला करून त्यांना मारण्याचाही प्रयत्न कांहीं गुंडांनीं केला पण गांधीजींनीं उपवास सुरू केल्यानंतर तीन दिवसांच्या आंत कलकत्त्यांत शांतता प्रस्थापित झाली आणि ता. ४ सप्टेंबर रोजीं पूर्ण

शांतता झाल्याचें पाहून हिंदु-मुसलमान जमातींच्या पुढाऱ्यांनीं शांतता प्रस्थापिण्याची हमी दिल्यानंतर गांधींनीं हा उपवास सोडला. यानंतर आतां त्यांना पंजाबकडे चालू असलेली दंगल शांत करण्याची कामगिरी अंगावर घेणें भाग पडलें. म्हणून पूर्वीच्या संकल्पानुसार पूर्व बंगालांत जाण्याचें त्यांनीं रहीत केलें. कारण आतां बंगालच्या बाजूस शांतता स्थापन झालेली होती आणि दंग्याची खरी आग पंजाब प्रांतांत पेटलेली होती.

दिल्लींतील भीषण परिस्थिति

ता. ७ सप्टेंबर रोजीं महात्मा गांधी कलकत्त्यांतून दिल्लीस जाण्यास निघाले आणि तेथून पुढें पूर्व पंजाबांत शांतता प्रस्थापित करून पाकिस्तानांतील पश्चिम पंजाब अथवा सीमा प्रांत या भागांत जाऊन आपली शांतियात्रा सुरू करण्याचा त्यांचा मानस होता; पण हा मानस पुढें केव्हांच सिद्ध होणारा नव्हता. कलकत्त्याहून निघून ते दिल्लीस पोहोंचले त्या वेळीं दिल्लींत फारच भीषण अत्याचार चालू होते. दिल्लीच्या रस्त्यांत एकसारख्या दंगली आणि मुसलमानांच्या कत्तली चालू होत्या. पश्चिम पंजाबांतून निर्वासित होऊन पळून आलेले, हिंदु आणि शीख सर्व दिल्लींत घुसलेले होते. आणि दिल्लींतील मुसलमानांना हाकलून देऊन दिल्लींत एकही मुसलमान शिल्लक ठेवूं नये अशी घोषणा ते करीत होते. पूर्व पंजाब आणि पश्चिम पंजाब या दोनही विभागांत भयंकर कत्तली चालू होत्या. या कत्तली करण्यांत सरकारी पोलिस आणि लष्करी खात्यांतील लोक भाग घेत होते. ब्रिटिश सरकारनें विभक्त मतदारसंघ दिल्यामुळें जनतेचें जेवढें नुकसान झालें त्याहूनही किती तरी पट अधिक नुकसान त्यांनीं आपल्या लष्करांत व पोलिसांत जातीय भावना धारण करणाऱ्या लोकांचा भरणा केल्यामुळें झालेलें आहे याचा प्रत्यक्ष अनुभव या वेळीं येत होता. पोलिस आणि त्यांतील अधिकारी व नोकर जर जातीय भावनेनें पछाडले गेले तर सरकारनें जातिभेदातीत राज्यकारभार चालवावा आणि अल्पसंख्याकांचे असे कितीही हुकूम काढले तरी त्यांची अमलबजावणी होऊं शकत नाहीं, याचें दृश्य

या वेळीं प्रत्यक्ष दिल्ली शहरांतच दिसत होतें. दिल्लींतलि लष्कर आणि पोलिस हे या वेळीं हिंदु आणि शीख यांनीं तेथील अल्पसंख्य मुसलमानांवर जे हल्ले चालविले होते ते थांबवीत नव्हते आणि तेथील रस्त्यात चालू असलेल्या अत्याचारांना आळा घालून अल्पसंख्याकांचें रक्षण करण्याचें आपलें कर्तव्य पार पाडीत नव्हते. यामुळें या राजधानीच्या शहरांत अराजक माजल्यासारखें दिसत होतें. दिल्लीच्या आसपास बंडाळी उपस्थित झाली होती. आसपासचे हिंदु व शीख संस्थानिक ही बंडाळी माजविणाऱ्या दंगेखोरांचीं आश्रय-स्थानें बनलीं होतीं. या बंडाळीपुढें नुकतेंच स्थापन झालेलें पंडित नेहरू यांचें राष्ट्रीय सरकार गडगडून पडतें कीं काय असा धोका निर्माण झाला होता. जनता बेभान झालेली होती, आणि लष्करी व पोलिस अधिकारी जातिनिष्ठ बनून जनतेला आंवरून धरण्याचें आपलें कर्तव्य करीनातसे झाले होते. ही सर्व दंगल, बंडाळी व अराजक शांत करून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या राष्ट्रीय सरकारास पाठिंबा देणें हेंच आपलें कर्तव्य आहे. आणि कोणताही भीषण प्रसंग प्राप्त झाला तरी राष्ट्रीय सरकारनें जाहीर केलेलें जातिधर्म-भेदातीत लोकशाहीचें धोरण आम्ही सोडून देणार नाहीं व तसें सोडून देण्यापासून आपलें हित होणार नसून घात होणार आहे ही वृत्ति पाकिस्तानांतील हिंदूंवर व शीखांवर झालेले व होणारे घोर अत्या-चार ऐकून बेभान झालेल्या सामान्य जनतेला पटवून देण्याचें काम महात्मा गांधींसारख्या लोकोत्तर विभूतीवांचून होणें अशक्य होतें. पाकिस्तानांतील सरकार लोकशाहीचें ध्येय जाहीर करून आणि अल्प-संख्याकांच्या हितरक्षणाची जाहीर हमी देऊनही तीं अभिवचनें पार पाडीत नाहीं तर हिंदी संघराज्याला आपण हिंदुराष्ट्र कां बनूं नये असा सवालही दिल्लींतील प्रक्षुब्ध जनता करीत होती. आणि जाति-निष्ठ बनलेल्या अविवेकी अधिकाऱ्यांना व सरकारी नोकरांना हा सवाल योग्य वाटत होता. पण हिंदी संघराज्याच्या सत्त्वपरीक्षेची हीच खरी वेळ होती. आणि या सत्त्वपरीक्षेंत यशस्वी होण्यास लागणारी निष्ठा निर्माण करण्यास महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू

हे दोनच पुढारी समर्थ होते. महात्मा गांधींनीं दिल्लींत पाय ठेवल्यापासून त्यांच्यापुढें हाच एक प्रश्न येऊन उभा राहिला. यानंतरचा सर्व काळ त्यांनीं दिल्लींत शांततास्थापन करण्याच्या कामांतच घालविला. सप्टेंबरपासून जानेवारी ३० पर्यंत त्यांना दिल्ली सोडणें शक्य झालें नाहीं; तथापि या काळांत त्यांनीं आपली धर्मभेदातीत राष्ट्रीय वृत्ति दिल्लींतील जनतेला पटवून दिली, आणि पंडित नेहरूंच्या राष्ट्रीय सरकारवर आलेलीं अनेक गंडांतरें नाहींशीं करून त्यांचें सरकार खंबीर केलें.

दिल्लींत रामराज्याचा प्रयत्न

आणि महात्मा गांधींचें बलिदान

ता. ७ सप्टेंबर रोजीं कलकत्त्याहून निघून ते ९ सप्टेंबर १९४७ रोजीं दिल्लीस येऊन पोहोंचले. या वेळपासून सुमारें ४॥ महिने त्यांना दिल्ली सोडून दुसरीकडे जातां आलें नाहीं. ३ जून १९४७ रोजीं महात्मा गांधींच्या सल्ल्याविरुद्ध राष्ट्रसभेनें देशाच्या फाळणीची योजना मान्य केली होती. अशी मान्यता दिल्यानें सर्व देशभर पसरणारें हिंदु-मुसलमान दंग्यांचें वातावरण शांत होईल, आणि देशाला अत्यंत आवश्यक असणारी शांततेची विश्रांति लाभूं शकेल अशी राष्ट्रसभेच्या नेत्यांची अपेक्षा होती. ब्रिटिश मुत्सद्यांनीं मुस्लिम लीगकडून पाकिस्तान हें राज्य लोकशाहीच्या व स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार स्थापन होत आहे हें मान्य करवून घेतलें होतें, आणि मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांनीं १५ ऑगस्ट रोजीं पाकिस्तानांतील अल्पसंख्याकांचें रक्षण करण्याची जबाबदारी जाहीरपणें घोषित केली होती. पाकिस्तानच्या घटनापरिषदेचे अध्यक्ष या नात्यानें श्रीयुत जिना यांनीं केलेल्या भाषणांत अल्पसंख्याक जमातींना पुढीलप्रमाणें जाहीर आश्वासन दिलें होतें.

"तुम्ही जर पूर्वीच्या गोष्टी विसरून पूर्वस्मृति गाडून टाकून सहकार्याच्या वृत्तीनें वावरूं लागलां तर तुम्ही कोणत्याही जमातीचे असा, तुमचा वर्ण, जात अथवा धर्म कोणताही असो, तुमच्यांपैकीं प्रत्येक जण

हा या राज्याचा समान हक्क, समान सवलती आणि समाजकर्तव्ये धारण करणारा या राज्याचा घटक बनेल. तुम्हांस आपल्या देवळांत जाण्याचें आणि उपासनेच्या स्थळीं जाण्याचें पाकिस्तानच्या राज्यांत पूर्ण स्वातंत्र्य असेल. तुमचा धर्म, तुमची जात अथवा तुमची निष्ठा कोणतीही असली तरी, सरकारला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. कोणत्याहि प्रकारचा भेदभाव न करतां आम्ही या राज्याची स्थापना करीत आहों. या राज्यांत जमातीजमातींत, जातीजातींत वा निष्ठे-निष्ठेंत भेद केला जाणार नाहीं. आम्ही ज्या मूलभूत तत्त्वावर हें राज्य उभारीत आहों, तें तत्त्व असें आहे कीं, आपण सर्व एकाच राज्याचे राष्ट्रिक असून समान राष्ट्रिक आहोंत. आपल्यापुढें हेंच ध्येय आपण ठेवूं या, म्हणजे कालक्रमानुसार एका राष्ट्राचे घटक या राजकीय अर्थानें हिंदु हे हिंदु आणि मुसलमान हे मुसलमान असे उरणार नाहींत. अर्थात् धार्मिक अर्थानें ते तसे उरतील. ती ज्याची त्याची वैयक्तिक निष्ठा आहे." *

---

* "If you work in a spirit of co-operation, forgetting the past and having buried the hatchet I will say that every one of you, no matter to what community you belong, no matter what is your colour, caste or creed, is first, second and last a citizen of this state with equal rights, privileges and obligations. You are free to go to your temples and to your places of worship in the state of Pakistan, while you may belong to one religion or caste or creed that has nothing to do with the business of the state. We are starting the state with no discrimination, no distinction between one community and another, between caste or crred. We are starting with this fundamental principle that we

अशा रीतीनें पाकिस्तान आणि हिंदी संघराज्य अशीं दोनही राज्यें जातिधर्मभेदातीत वृत्तीनें व घटनेनें चालवावयाचीं असें आश्वासन हिंदी संघराज्य आणि पाकिस्तान या दोनही राज्यांच्या वतीनें राष्ट्रसभा आणि मुस्लिम लीग यांच्या पुढाऱ्यांनीं एकमेकांस व ब्रिटिशांस दिलें. आणि ब्रिटिशांनीं त्याच आधारावर ही फाळणीची योजना मान्य केली. ब्रिटिश मुत्सद्दी म्हणजे या वेळचें ब्रिटिश सरकार आणि हिंदी राष्ट्रसभेचे पुढारी यांनीं या आश्वासनाच्या आधारावर व तें आश्वासन पाळलें जाईल व तें तसें पाळलें गेल्यास हिंदुस्थानचा प्रश्न समाधानकारक सुटूं शकेल, या आशेनेंच मुस्लिम लीगची फाळणीची मागणी मान्य केली होती. तथापि मुस्लिम लीगकडून आणि पाकिस्तानकडून हें आश्वासन पाळलें जाण्याच्या मार्गांत फार मोठ्या अडचणी होत्या. या अडचणी ही योजना मान्य होण्याच्या पूर्वी ब्रिटिश मुत्सद्यांनीं व त्यांच्या आश्रयानें वाढलेल्या मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांनीं जीं राजकारणें सुमारें दहा वर्षें केलीं त्या राजकारणांतून निर्माण झालेल्या होत्या. मुस्लिम लीगचें सर्व राजकारण संकुचित धर्मनिष्ठ राष्ट्रवादावर आणि माथेफिरू धर्मनिष्ठेवर उभारिलेलें होतें. आणि ब्रिटिश मुत्सद्यांनीं या राजकारणाची जोपासना करण्यासाठीं मुसलमानांना हिंदूंवर अत्याचार करूनही सुरक्षित राहतां येतें अशी अनेक वर्षें शिकवण दिलेली होती. अशा साधनांनीं जें पाकिस्तान निर्माण झालें तें पाकिस्तान राष्ट्र एकदम धर्मभेदातीत वृत्ति धारण करून

---

are all citizens and equal citizens of one State. We should keep that in front of us as our ideal, and you will find that in course of time Hindus will cease to be Hindus and Muslims will cease to be Muslims, not in the religious sense because that is the personal faith of each individual, but in the political sense as the citizens of the Nation."

अल्पसंख्याकांना संरक्षण व अभय देऊं शकेल, ही गोष्ट कोणासही संभवनीय वाटत नव्हती. हीन साधनांनीं मिळविलेलें साध्य श्रेष्ठ असूंच शकत नाहीं असा एक नवा दृष्टिकोन महात्मा गांधींनीं राजकारणी मुत्सद्यांना देण्याचा प्रयत्न चालविला होता. ब्रिटिश मुत्सद्यांना व मुस्लिम लीगच्या मुत्सद्यांना हा दृष्टिकोन मुळींच पटलेला नव्हता आणि या दोन मुत्सद्यांच्या हीन प्रयत्नांनीं निर्माण झालेलें पाकिस्तान एकदम धर्मभेदातीत वृत्तीचें लोकशाही राष्ट्र बनण्याचा संभव नव्हता. असें असलें तरी फाळणीवांचून गत्यंतरच नव्हतें म्हणून हिंदी राष्ट्रसभेनें तिला मान्यता दिली. हिंदी राष्ट्रसभेनें आपलें सर्व राजकारण धर्मभेदजातिभेदातीत वृत्तीनें चालविलेलें असल्यामुळें आणि तिच्या पुढाऱ्यांमध्यें लोकशाहीची निष्ठा महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या असामान्य नेत्यांनीं एकसारखी वृद्धिंगत करून आपल्या अनुयायांस अनत्याचारी मार्गावर ठेवण्यांत बरेंच यश संपादन केलें होतें. यामुळें हिंदी संघराज्यांत आपण जातिधर्मभेदातीत राष्ट्रीयत्व आणि लोकशाही-वरील निष्ठा कायम ठेवूं असा त्यांना आत्मविश्वास वाटत होता. परंतु पाकिस्तान दिल्यामुळें हिंदी संघराज्यांत हिंदुराष्ट्रवाद आणि शिखीस्थान या धर्मविशिष्ट राष्ट्रभावना अधिक जोरानें उसळून येऊं लागल्या. बंगाल आणि पंजाब या प्रांतांची फाळणी मुसलमान आणि शीख अशा दोघांनाही त्वेष आणणारी वाटत होती. तसेंच पंजाबच्या फाळणीनें शीख लोकांचा प्रवेश दुभंगला गेल्यामुळें शीख लोक बेभान झाले होते. बंगाल व पंजाब येथील दंग्यामुळें हिंदु लोकांतही हिंदुराष्ट्रवाद अधिक प्रबळ बनूं लागला होता. तथापि हिंदुराष्ट्रवाद किंवा शिखीस्थान या भावना हिंदी संघराज्याला तारक बनणाऱ्या नसून मारकच बनणार होत्या. विवेकदृष्टीनें विचार करणाऱ्यांना हें निर्विवाद मान्य करावें लागत होतें कीं, पाकिस्तानांत कांहीं घडलें तरी हिंदी संघराज्य प्रबल बनल्यावांचून त्याचें निराकरण करणें कोणासही शक्य नाहीं, आणि हिंदी संघराज्य प्रबल बनण्यास त्याला हिंदुराष्ट्र बनविण्याचा विचार हा विघातक ठरणार आहे. हा विवेकी विचार जेव्हां जनतेचें अंतःकरण भावनेच्या प्रक्षोभानें अविवेकी बनलेलें नसेल त्या वेळीं प्रभावी ठरूं

शकेल. परंतु फाळणीनंतर घडलेल्या भयंकर अत्याचारामुळें जनता प्रक्षुब्ध झालेली होती. अशा प्रक्षुब्ध अवस्थेंत जनतेचा जातिधर्मभेदातीत राष्ट्रीय तत्त्वावर आणि लोकशाही राज्यावर असणारा विश्वास ढळूं लागला होता. आपण आपल्या राज्यांतील अल्पसंख्याकांचें रक्षण करावें हें आपलें कर्तव्य असलें तरी जेव्हां एखाद्या अल्पसंख्य जमातींतील सर्वच लोक राष्ट्रद्रोही आहेत अशी भावना पसरूं लागते तेव्हां त्या अल्पसंख्य जमातीचें रक्षण करण्याचें कर्तव्य बाजूस राहून तिला राष्ट्रद्रोही म्हणून शासन करावें ही वृत्ति फैलावूं लागते. ही दृष्टि या वेळीं इतकी फैलावूं लागली होती कीं, त्या दृष्टीला राष्ट्रीय मुसलमान हेही देशद्रोही दिसूं लागले. अशा परिस्थितींत मुसलमान जमातीचें रक्षण करून जातिधर्मभेदातीत लोकशाही स्थापन करणें हेंच आपलें नैतिक कर्तव्य असून तें कर्तव्य पार पाडण्यानेंच आपल्या राष्ट्राचें राजकीय हितही होणार आहे, हा विचार कितीही सयुक्तिक वाटला तरी तो आपल्या वर्तनावर प्रभावी होणें कठीण जातें. अशी एक विलक्षण परिस्थिति फाळणीनंतर निर्माण झाली.

या वेळीं महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारखे लोकशाहीवर व धर्मातीत राष्ट्रीयत्वावर असामान्य निष्ठा असणारे पुढारी जर हिंदी संघराज्यास लाभले नसते, तर हें संघराज्य जमातवादी राष्ट्रीय अहंकाराला बळी पडून तें नामशेष झालें असतें. हिंदी संघराज्य हें हिंदुराष्ट्र बनून पाकिस्तानशीं लढूं लागतें तर सर्व हिंदुस्थान पुनः पारतंत्र्यांत जाण्यास वेळ लागला नसता. अद्यापिही जर ही वृत्ति हिंदी संघराज्यांत बळावली तर त्याचा नाश होण्यास विलंब लागणार नाहीं. म्हणून हिंदी संघराज्य हें केवळ हिंदूंचें आहे आणि येथें मुसलमानांस समानतेनें व स्वातंत्र्यानें वावरण्याचा हक्क नाहीं या वृत्तीस महात्मा गांधी हे सैतानी वृत्ति असें म्हणूं लागले. आपल्या अंतःकरणांत आज परमेश्वर पदभ्रष्ट झाला असून त्याच्या सिंहासनावर सैतान बसूं लागला आहे, असा इषारा महात्मा गांधींनीं या वेळीं हिंदी संघराज्यांतील जनतेला आणि राज्य-

कर्त्यांना दिला. कांहीं झालें तरी हिंदी संघराज्य हें परमेश्वरी साम्राज्य बनलें पाहिजे; आणि आपल्या अंतःकरणाच्या सिंहासनावर चढूं लागलेल्या या जमातवादी धार्मिक राष्ट्रवादास तेथून पदभ्रष्ट केलें पाहिजे, हें गांधींनीं ओळखिलें. हें तत्त्व प्रथमतः दिल्लींत तरी सुदृढपणें प्रस्थापित झालें पाहिजे. आणि दिल्लींतील मुसलमान जनतेला अभयदान मिळून त्यांचे हक्क, त्यांचें जीवित, त्यांची मालमत्ता आणि त्यांचीं धर्मस्थानें यांना शाश्वति निर्माण झाली पाहिजे असा त्यांनीं आग्रह धरला. कलकत्त्याहून दिल्लीस पोहोंचल्याबरोबर दुसऱ्याच दिवशीं त्यांनीं सर्व दिल्लींतून सुमारें चाळीस मैल हिंडून परिस्थितीचें प्रत्यक्ष निरीक्षण केलें तेव्हां त्यांना दिसून आलें कीं, दिल्लींत मुसलमानांना अभय उरलेलें नाहीं. पाकिस्तानांतून आलेल्या हिंदु व शीख निर्वासितांनीं दिल्लींतून मुसलमानांना हाकलून देण्याचे प्रयत्न चालविले आहेत. त्यांच्या मशिदी काढून घेण्यांत येऊन तेथें निर्वासित घुसलेले आहेत, आणि मुसलमानांना दिल्लींतून हिंडणें-फिरणेंही धोक्याचें झालेलें आहे. ही परिस्थिति आटोक्यांत आणून हिंदु-मुसलमान निर्वासितांची सोय लावणें दिल्लींतील सरकारचें पहिलें कर्तव्य होतें. पूर्व पंजाब आणि संयुक्त प्रांत यांतील खेड्यांत असणारे मुसलमान निर्वासित होऊन दिल्लींत आश्रयार्थ आलेले होते. पण त्यांना तेथें आसरा मिळणें अशक्य झालेलें होतें. गांधीजींनीं हें दृश्य पाहिलें तेव्हां त्यांचें अंतःकरण विदीर्ण झालें आणि प्रथम दिल्लींत तरी शांतता प्रस्थापित करून तेथें हिंदु-मुसलमान-शीख यांचें ऐक्य स्थापन केल्यावांचून व धर्मातीत लोकशाही राष्ट्रवादावर अढळ निष्ठा हिंदी संघराज्याच्या या राजधानींत निर्माण केल्यावांचून आपण दुसरीकडे कोठेंही जाऊं शकत नाहीं असें त्यांनीं ठरविलें. भावी रामराज्याचा पाया प्रथमतः दिल्लींतच घातला गेला पाहिजे. यासाठीं पंडित नेहरू यांचं राष्ट्रीय सरकार सुस्थिर बनलें पाहिजे. या राष्ट्रीय सरकारांत पं. नेहरूंच्या बरोबर सरदार वल्लभभाई, आणि मौलाना आझाद या राष्ट्रीय पुढाऱ्यांनाही जनतेनें हार्दिक निष्ठा दाखविली पाहिजे. सरदार वल्लभभाई हे मुसलमानांचे शत्रु आहेत आणि मौ. आझाद हे हिंदूंचे शत्रु आहेत ही

जनतेंत फैलावणारी वृत्ति नष्ट करून नेहरू, आझाद आणि सरदार या तिघांचेंहि खरें राष्ट्रीय सरकार खंबीर होईल तेव्हांच हिंदी संघराज्य सुरक्षित व सुस्थिर बनेल आणि ध्येयाच्या दृष्टीनें त्याची प्रगति होत राहील, ही निष्ठा या राजधानीच्या शहरीं निर्माण करण्यासाठीं गांधींनीं आपले प्राण हातांत घेऊन ते ध्येयदेवतेला समर्पण करण्यास काढून ठेविले.

अखेरचें उपोषण

दिल्ली ही युधिष्ठिर-कालापासून हिंदुस्थानची राजधानी म्हणून प्रसिद्ध झाली. पांडवांचें इंद्रप्रस्थ हें दिल्ली नगरच होय. पण इन्द्रप्रस्थ ही जशी धर्मराजाची राजधानी म्हणून प्रसिद्ध आहे तशीच कुरुक्षेत्राची रणभूमि तिच्यानजीक आहे, याहि दृष्टीनें हिंदुस्थानच्या इतिहासांत दिल्लीचें ऐतिहासिक महत्त्व वर्णिलेलें आहे. कौरव-पांडवांच्या युद्धापासून तों मराठे आणि गिलचे यांच्यामधील पानिपताच्या युद्धापर्यंत अनेक क्रांतिकारक महत्त्वाच्या लढाया दिल्लीच्या आसपास झालेल्या आहेत. शहाजहानचें मयूरासन दिल्लीसच होतें आणि नादिरशहानें हें मयूरासन इराणांत नेलें. पेशव्यांनीं आणि शिंदे-होळकरांनीं मोंगल बादशहाचें संरक्षण करण्याच्या मिषानें अनेक युद्धें करून दिल्लीवर आपली सत्ता स्थापन करण्याचा आणि तेथील सत्तेच्या प्रभुत्वाखालीं अखिल हिंदुस्थानावर एक सार्वभौम सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न १८ व्या शतकाच्या अखेरीस केला. हा त्यांचा प्रयत्न विफल होऊन पुण्याचे पेशवे आणि दिल्लीचे बादशहा दोघेहि १९ व्या शतकाच्या प्रारंभीं ब्रिटिशांचे ताबेदार बनले. तरीही ब्रिटिशांनीं आपली राजधानी कलकत्त्याहून दिल्लीस नेली नाहीं. सर्व हिंदुस्थानची सत्ता ब्रिटिशांच्या हातीं आल्यानंतर सुमारें १०० वर्षांनीं म्हणजे १९११ सालीं ब्रिटिशांनीं दिल्लीस आपली राजधानी नेली. ही राजधानी दिल्लीस नेली त्याच वेळीं मुसलमानांना विभक्त मतदारसंघ देऊन हिंदु-मुसलमानांच्या कलागति लावून तेथें आपली सत्ता सुस्थिर करण्याचा डाव त्यांनीं टाकिला. बंगाल प्रांतांत राष्ट्रीय भावना आणि लोकशाही यांची वाढ होऊन कलकत्त्याची राजधानी डळमळूं लागली, तेव्हां बंगालची फाळणी

करून तिला स्थैर्य आणण्याचा प्रयत्न लॉर्ड कर्झन यांनीं केला. बंगालचो फाळणी करण्यांत पूर्व बंगाल हा प्रांत मुसलमानांना तोडून देण्याचा डाव होता. या वेळेपासून हिंदी राष्ट्रवादास दुभंगण्याच्या कामीं मुसलमानांच्या धर्मभावनेचा उपयोग करण्यास ब्रिटिश मुत्सद्यांनीं सुरुवात केली. परंतु ही बंगालची फाळणी हिंदुस्थानांत जोरास लागलेल्या राष्ट्रीयत्वाच्या दडपणामुळें रद्द करणें त्यांना भाग पडलें; तेव्हां ही फाळणी रद्द करतांना मुसलमानांना विभक्त मतदारीचें अभिवचन देऊन सर्व देशाच्या फाळणीचें बीज रोवण्यांत आलें. अखेरीस या बीजांतून पाकिस्तान जन्मास आलें. आणि पाकिस्तानातील धर्मनिष्ठ राष्ट्रवादाची प्रतिक्रिया हिंदुराष्ट्रवादाच्या रूपानें हिंदी संघराज्यांतही बळावूं लागली.

हा हिंदुराष्ट्रवादाचा सैतान कायमचा गाडून टाकल्याखेरीज हिंदी संघराज्य आतां सुस्थिर आणि खंबीर बनणें शक्य नव्हतें. सप्टेंबर महिन्यांत दिल्लीतील राष्ट्रीय सरकारविरुद्ध जें प्रचंड वादळ निर्माण झालें होतें, त्या वादळाची प्रेरणा हिंदु आणि शीख यांच्या धर्मनिष्ठ जमातवादी राष्ट्रीय भावनेंतून मिळालेली होती. राष्ट्रसभेनें जी धर्मातीत लोकशाहीची राष्ट्रीय भावना हिंदी जनतेंत निर्माण केली होती ती नष्ट करून हिंदी संघराज्य हें हिंदुराष्ट्र बनवावें आणि पाकिस्तानच्या मुसलमान राष्ट्रास आव्हान देऊन दिल्लीनजीकच्या कुरुक्षेत्रावर चौथें पानिपत युद्ध करावें असा व्यूह या वेळीं कांहीं प्रतिगामी शक्तींनीं रचिला होता. ही एक क्षणिक उद्वेगाची व अविवेकाचीच लाट होती. पण एकंदर जनतेच्या दृष्टीनें जरी या भावनेचें वर्णन क्षणिक उद्वेग आणि अविवेक या शब्दांनीं करितां आलें तरी हिंदुस्थानांत गेल्या आठ-दहा वर्षांत या अविवेकी हिंदुराष्ट्रवादाची पद्धतशीर उठावणी करणारा एक सांप्रदाय निर्माण झालेला होता आणि माथेफिरू तरुणाच्या धाडसी कृत्यांनीं हें अविवेकी राजकारण ब्रिटिश साम्राज्याचा अस्त झाल्यानंतर नवें लोकशाही राष्ट्र पूर्णपणें येण्यापर्यंतच्या संधिकालांत आपणांस यशस्वी करतां येईल, असा भ्रम कांहींना झाला होता. ब्रिटिशांच्या नोकरीच्या गुलामगिरींत सर्व जन्म घालविलेल्या राष्ट्रीयत्वविहीन अधिकाऱ्यांना

आणि ब्रिटिशांच्या सार्वभौमत्वाखालीं लाजीरवाणें जिणें कंठिलेल्या संस्थानिकांना हें अविवेकी राजकारण या वेळीं व्यवहार्य वाटूं लागलें होतें. राष्ट्रसभेचें राजकारण लोकशाहीकडून समाजवादाकडे झुकूं लागल्याचें पाहून ज्या धनिकांना त्याची दहशत वाटूं लागली होती, त्यांना हें हिंदुराष्ट्रवादाचें अविवेकी राजकारण आकर्षक वाटूं लागलें होतें. या सर्वांच्या सहाय्यानें आणि जनतेंत पसरलेल्या क्षणिक उद्वेगानें व प्रक्षोभानें दिल्लीची राजधानी एखाद्या भूकंपानें डळमळावी त्याप्रमाणें सप्टेंबर महिन्यांत डळमळूं लागली होती. महात्मा गांधींना हें अशुभ चिन्ह पाहून हें वादळ शांत करण्यासाठीं आपलें बलिदान करावें लागलें तरी हरकत नाहीं, पण तें शांत झालेंच पाहिजे, अशी अंतःप्रेरणा होऊं लागली. त्यांच्या आणि पंडित जवाहरलाल यांच्या संयुक्त प्रयत्नांनीं आणि राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या शस्त्रबळानें हें वादळ आटोक्यांत आलें. त्याचें बाह्य रुद्र स्वरूप नाहींसें झालें. पोलिस आणि लष्कर यांचा अमल डळमळूं लागला होता, तो पूर्ववत् चालू लागला. लोकांना पुन्हा आपल्या ध्येयांचें स्मरण होऊं लागलें आणि हिंदी संघराज्याचें भवितव्य हिंदुराष्ट्रभावना सोडून देण्यानेंच सुरक्षित होणार आहे हा विवेक जनतेच्या अंतःकरणांत पुनः जागृत होऊं लागला. तरीही ही केवळ बाह्य शांतता आहे आणि अंतःकरणांतील वादळ अद्यापि शांत झालेलें नाहीं अशी गांधींना भीति वाटत होती. जानेवारी महिना सुरू झाला तरीही दिल्लींतील मुसलमानांची भीति नष्ट झाली नाहीं, हें पाहून गांधीजींनीं मुसलमानांना निदान दिल्लींत तरी अभय प्राप्त व्हावें म्हणून एक बेमुदत उपोषण करण्याचा निर्धार केला.

ता. १२ जानेवारी रोजीं महात्मा गांधींनीं आपल्या प्रार्थनेच्या वेळीं आपल्या उपोषणाचा हा निर्धार जनतेला जाहीर केला. या वेळीं हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्या दरम्यान काश्मीर-प्रकरणाबाबत सुरू झालेलें भांडण अगदीं निकरावर येऊन त्याची तक्रार "युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन" पुढें म्हणजे नव्या राष्ट्रसंघापुढें मांडण्यासाठीं हिंदुस्थानचे व पाकिस्तानचे वकील अमेरिकेला गेले होते. अगदीं निकरावर आलेलें हें भांडण हातघाईस आल्यामुळें काश्मीरच्या रक्षणा-

साठीं पाकिस्तानबरोबर युद्ध उद्भवण्याचा संभव या वेळीं उघड दिसत होता. हिंदी संघराज्यानें काश्मीरच्या रक्षणासाठीं अखेरपर्यंत लढत राहावें असाच महात्मा गांधींचा आग्रह होता. अशा युद्धास आपला पूर्ण पाठिंबा आहे हें त्यांनीं जाहीर केलें होतें. काश्मीरचें टोळीवाल्या आक्रमकांपासून संरक्षण करण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या युद्धांत हिंदी संघराज्याच्या सैन्याचा चुराडा झाला तरीही त्या युद्धांतून माघार घेतां कामा नये; कारण तें युद्ध दुर्बलांच्या संरक्षणाचें कर्तव्य करण्यासाठीं हिंदी संघराज्यानें केलें असें ठरणार होतें; पण हें युद्ध सुरू करतांना व करण्यापूर्वी हिंदी संघराज्य खंबीर बनलें पाहिजे. हिंदी संघराज्य हें हिंदूंचें राष्ट्र बनलें तर काश्मीरच्या युद्धांत त्याला यश येण्याचा यत्किंचितही संभव नव्हता. इतकेंच नाहीं तर या काश्मीरच्या प्रकरणांतून निर्माण होणाऱ्या पाकिस्तानबरोबरच्या युद्धाच्या वेळीं हिंदी संघराज्य हिंदुराष्ट्र बनल्यास त्याला अंतर्गत भय फार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होऊन त्याचा विनाश होण्यास फार काल लागला नसता. हें सर्व भावी अरिष्ट टाळण्याचा एकच उपाय हा होता कीं, हिंदी संघराज्यांतील मुसलमानांना ताबडतोब अभय देऊन त्यांची राजनिष्ठा खंबीर करणें. या दृष्टीनें महात्मा गांधींनीं निदान दिल्लींत तरी मुसलमानांना अभय मिळावें अशी परिस्थिति निर्माण होईपर्यंत आपण आपलें उपोषण चालू ठेवूं असें ता. १२ जानेवारी रोजीं सायंकाळीं जाहीर केलें. या वेळीं काढलेल्या निवेदनांत ते म्हणतात, "मी जेव्हां गेल्या सप्टेंबरच्या ९ तारखेस कलकत्त्याहून दिल्लीस आलों, तेव्हां माझा बेत येथून पुढें पश्चिम पंजाबांत जाण्याचा होता, पण असें घडावें ही भवितव्यता नव्हती. या वेळीं नेहमींची आनंदी दिल्ली मृतांची नगरी बनली होती. मी जेव्हां आगगाडींतून खालीं उतरलों त्या वेळीं प्रत्येकाच्या मुखावर मला उद्विग्नता दिसून आली. ज्यांच्या मुखावरील विनोद आणि हास्य कधींही मावळत नाहीं ते सरदार देखील याला अपवाद नव्हते मला या दृश्याचें कारण माहीत नव्हतें. मला उतरून घेण्यास ते स्टेशनवर आले होते. संघराज्याच्या राजधानींत माजलेल्या दंगलीची दुःखद वार्ता त्यांनीं मला उतरतांक्षणींच दिली. लगेच मला दिसून

आलें कीं, मी दिल्लींतच राहिलें पाहिजे आणि या प्रकरणाचा सोक्ष-मोक्ष करून घेतला पाहिजे. लष्करी आणि पोलिस अधिकारी यांच्या तत्परतेनें वरकरणीं शांतता आज झालेली आहे. पण अंतःकरणांत वादळ उठलेलें आहे, त्याचा स्फोट कोणत्याही क्षणीं होऊं शकेल. या स्थितीस मी माझ्या कर्तव्याची पूर्तता मानूं शकत नाहीं. मृत्यु हा माझा एक असामान्य सखा आहे आणि ऐहिक कर्तव्याच्या पूर्ततेसाठींच मी त्याच्यापासून दूर राहिलेलें आहे. जी कर्तव्यपूर्ति मला त्याच्यापासून दूर ठेवूं शकेल त्या कर्तव्यपूर्तीचें स्वरूप असलें बेगडी असतां कामा नये. हिंदु, शीख आणि मुसलमान यांच्यामधील हार्दिक स्नेहभावाची तळमळ मला लागलेली आहे. परवां-परवांपर्यंत त्यांच्यामध्यें ही स्नेहभावना जागृत होती, पण आज ती अस्तित्वांत नाहीं. ही अवस्था राष्ट्रभक्त म्हणवून घेणाऱ्या कोणाही हिंदी मनुष्यास समाधानानें सहन करणें शक्य नाहीं. मला जरी या उपोषणासंबंधींचा आंतरिक आदेश अनेकवार ऐकूं येत होता तरी कदाचित् हा परमेश्वरी आदेश नसून सैतानी आदेश असूं शकेल, म्हणजे माझ्या दुर्बलतेंतून निर्माण होणारी ही अंतःप्रेरणा असेल असें मानून मीं या आदेशाकडे आजपर्यंत लक्ष दिलें नाहीं. हताश झाल्याची जाणीव मला केव्हांही होत नाहीं. सत्याग्रह्यानें तसें केव्हांही होतां कामा नये. स्वतःच्या किंवा इतरांच्या हातांतील तलवारीऐवजीं निरुपायाच्या वेळीं उपसण्याचें सत्याग्रहीचें हत्यार म्हणजे उपोषण होय. हाच त्याचा निर्वाणीचा उपाय असतो. माझे मुसलमान मित्र माझ्याकडे येऊन जेव्हां विचारतात कीं, आम्हीं आतां काय करावें ? तेव्हां त्यांना कोणतेंही उत्तर मला देतां येत नाहीं. माझी ही निर्वीर्य अवस्था अलीकडे माझें अंतःकरण तोडीत आहे. मीं उपोषण सुरू केलें तर ही व्यथा ताबडतोब दूर होईल. गेले तीन दिवस मी याचा विचार करीत आहें. अखेरीस हा अंतिम निर्णय एखाद्या ज्योतीप्रमाणें मला एकदम दिसला आणि मला त्यामुळें शांति वाटूं लागली. मनुष्य जर शुद्ध असेल तर त्याच्यापाशीं त्याच्या प्राणाहून बहुमोल अशी कोणतीही समर्पण करण्यासारखी वस्तु असूं शकत नाहीं. मी हें जें पाऊल टाकीत आहें तें

टाकण्यास लागणारी शुद्धता माझ्यापाशीं आहे व असावी अशी मी आशा करतों व तशी मी प्रार्थना करतों. उद्यांचें जेवण झाल्यानंतर या उपोषणास प्रारंभ होईल. त्याची मुदत अनिश्चित आहे. या उपोषणकालांत मी पाणी घेईन आणि त्यांत मीठ व लिंबू घालीन अथवा न घालीन. जर माझी अशी खात्री झाली कीं, सर्व जमातींमध्यें अंतःकरणाची स्नेहभावना बाह्य दडपणानें नव्हे तर कर्तव्यबुद्धि जागृत झाल्यानें पुनः निर्माण झाली आहे, तर त्यानंतर मी हा उपवास संपवीन.

"हिंदुस्थानचा दर्जा आणि इभ्रत आज डळमळत असून आशियाच्या अंतःकरणावरील त्याचें सार्वभौमत्व, तसेंच जगांतील त्याचें स्थानही आज भ्रष्ट होऊं लागलें आहे. माझी अशी श्रद्धा आहे कीं, जर हिंदुस्थाननें आपला आत्मा गमविला तर आजच्या दुःखी, भुकेलेल्या आणि वादळांत सांपडलेल्या जगाची आशा नष्ट होईल. ही आशा धारण केल्याबद्दल मला स्वतःबद्दल अभिमान वाटतो. माझ्या कोणाही मित्रानें किंवा मला कोणी शत्रु असेल, तर त्यानें माझ्यावर रोष करूं नये. मानवी मनाचा उद्धार करण्याचें एक साधन या दृष्टीनें उपवासावर अनेक मित्रांची श्रद्धा नाहीं. त्यांनीं माझ्याविषयीं सहिष्णुता धारण करावी आणि स्वतःला जें क्रियास्वातंत्र्य असावें असें त्यांना वाटतें तें स्वातंत्र्य मलाही द्यावें. याबाबत परमेश्वर हाच एक माझा सर्वश्रेष्ठ सल्लागार आहे. दुसऱ्या कोणाचाही सल्ला न घेतां त्याच्याच सल्ल्यानें आपण हा निर्णय घ्यावा असें मला वाटलें. यांत माझी चूक झाली असेल आणि ती जर मला आढळून येईल तर ती उच्च स्वरानें जाहीर करण्यास आणि चुकीनें टाकलेलें माझें पाऊल मागें घेण्यास मी केव्हांही कचरणार नाहीं. पण असें आढळण्याचा फारच थोडा संभव आहे. हा जर माझ्या अंतरात्म्याचा आदेश असेल तर आणि तो तसा आहे असें मी म्हणतों, तर तो विफल होणार नाहीं. माझ्याशीं कोणीं कांहीं युक्तिवाद करूं नये आणि माझ्या कृतीला अपरिहार्य म्हणून अनुमोदन द्यावें अशी मी विनंति करतों.

"परंतु हें उपोषण लवकर संपो, उशिरां संपो, अथवा तें मुळींच न संपो. कांहीं झालें तरी आज ज्याला अरिष्ट म्हणतां येईल, अशी जी अवस्था प्राप्त झाली आहे तिच्यावर उपाय योजतांना अंतःकरण कोणत्याहि प्रकारें मृदु बनवितां कामा नये. मीं यापूर्वी केलेल्या उपोषणापैकीं कांहीं उपोषणांसंबंधीं टीकाकारांनीं अशी टीका केलेली आहे कीं, हे उपवास सक्ती करणारे होते, आणि त्यांनीं असेंही म्हटलें आहे कीं, केवळ गुणावरूनच निर्णय घेतला गेला असता तर आणि माझ्या उपोषणाचें दडपण नसतें, तर त्या त्या वेळचे निर्णय माझ्याविरुद्ध गेले असते. पण जेव्हां हेतु उघडपणें शुद्ध असतो, तेव्हां विरुद्ध निर्णयाला तरी किती किंमत द्यावी? शुद्ध उपोषण हें कर्तव्याप्रमाणेंच बाह्यफळाची अपेक्षां करीत नाहीं. मी कोणत्याही बाह्यफळाच्या आशेनें हें दिव्य करीत नाहीं. तें केल्यावांचून मला राहवत नाहीं म्हणूनच तें मी करीत आहे. म्हणून मी सर्वांस अशी विनंति करतों कीं, त्यांनीं माझ्या हेतूचें निर्विकारमनानें संशोधन करावें आणि जर आवश्यक असेल तर मला शांतपणानें मरूं द्यावें. ही शांतता मला निश्चित लाभेल. हिंदु धर्म, शीख धर्म आणि इस्लाम धर्म यांचा डोळ्यांदेखत होणारा विनाश पाहत निष्क्रियत्वानें स्वस्थ बसण्यापेक्षां मृत्यु आला तर तो मला वैभवशाली मोक्षच वाटेल. जर पाकिस्ताननें आपल्या राज्यांतील निरनिराळ्या धर्माच्या लोकांना समान दर्जा आणि जीवितवित्ताची शाश्वति दिली नाहीं आणि त्याचेंच अनुकरण हिंदुस्थाननें केलें तर हा सर्वांचा विनाश निश्चित आहे. फरक इतकाच कीं, हिंदुस्थानच्या दोनही विभागांतील इस्लाम धर्म नष्ट झाला, तरीही तो बाहेरच्या जगांत ठिकाण धरून राहूं शकेल. पण हिंदु धर्म आणि शीख धर्म यांना हिंदुस्थानच्या बाहेर जगच नाहीं. ज्यांचा माझ्याशीं मतभेद असेल त्यांनीं मला कितीही निष्ठुर प्रतिकार केला तरी मी त्यांचा सन्मानच करीन. माझ्या उपोषणामुळें मनोदेवता जिवंत होऊं द्या. ती मरूं देऊं नका. आपल्या प्रिय हिंदभूमींत जी कीड निर्माण होऊं लागली आहे, तिचा क्षणभर विचार करा, म्हणजे ज्याच्या अंगीं हें कर्तव्याचें पाऊल सुखानें टाकण्याइतकें सामर्थ्य आणि बहुधा तितकीच शुद्धता आहे, असा हिंदभूमीचा

एक तरी नम्र पुत्र पुढें येत आहे, याबद्दल तुम्हांस आनंद वाटेल. त्याच्या अंगीं जर हे गुण नसतील तर तो एक धरणीभार आहे व तिच्यावरून तो जितक्या लवकर नाहींसा होईल आणि त्याच्या भारापासून हिंदी वातावरण शुद्ध होईल तितकें त्याचें व त्याच्याशीं संबंध असणाऱ्या इतरांचें हितच होईल, म्हणून मी माझ्या सर्व मित्रांना विनंति करतो कीं, त्यांनीं बिर्ला हाउसकडे धांवत येऊन मला परावृत्त करण्याचे प्रयत्न करूं नयेत आणि माझ्याविषयीं चिंताही बाळगूं नये. माझी काळजी परमेश्वर करीत आहे. माझ्या मित्रांनीं आपल्या अंतःकरणाचें संशोधन करावें; कारण ही आपल्या सर्वांच्याच सत्त्वपरीक्षेची वेळ आहे. जे या वेळीं आपल्या कर्तव्याच्या ठिकाणीं उभे राहून तें पूर्वीपेक्षां अधिक तत्परतेनें व चांगल्या प्रकारें पार पाडतील तेच माझ्या कार्याला व मला सर्व प्रकारें सहाय्य करतील. उपोषण ही एक आत्मशुद्धीची क्रिया आहे."

वरील निवेदनांत सांगितल्याप्रमाणें महात्मा गांधींनीं ता. १३ पासून आपलें उपोषण सुरू केलें. या वेळीं देशाला एकदम आत्यंतिक चिंतेनें ग्रासिलें. आजपर्यंतच्या अनेक उपोषणांतून महात्मा गांधींचे प्राण बचावले होते, पण त्या सर्वांहून हा प्रसंग फार वेगळा होता. पूर्वीच्या प्रत्येक उपोषणाच्या वेळीं त्याला एक कालमर्यादा तरी असे, किंवा विशिष्ट अटी तरी असत. पण या वेळीं अशा विशिष्ट अटी किंवा विशिष्ट मुदत गांधीजींनीं आपल्या उपोषणास घातलेली नव्हती. देशांतील जातीय दंगलीचें वातावरण या वेळीं बरकरणीं शांत झालेलें दिसत होतें. केवळ प्रत्येक जमातीच्या अंतःकरणांत जमातवादी राक्षस बळावत होता. हा राक्षस कायमचा शांत करण्याचा उपाय कोणासच सुचत नव्हता आणि विशिष्ट गोष्टी केल्यानें तो कायमचा शांत होईल अशीही हमी कोणी देऊं शकत नव्हतें. अशा परिस्थितींत गांधीजींचे प्राण वांचविण्याचा निश्चित उपाय कोणास दिसत नव्हता. पण त्याबरोबर हेंही खरें होतें कीं, गांधीजींचीही अशीच इच्छा होती कीं, जनतेचें लक्ष आपले प्राण वांचविण्याकडे लागूं नये तर, हिंदु-मुसलमान ऐक्य घडवून आणण्याकडे लागावें.

पण महात्मा गांधींनीं जें प्रायोपवेशन सुरू केलें होतें, तें पाहिल्यानंतर जनतेला स्वस्थ बसणें अशक्य होतें. आपल्या अंतःसंशोधनाबरोबरच हिंदु-मुसलमान ऐक्याला मूर्त स्वरूप देण्याचे प्रत्यक्ष प्रयत्न जनतेनें व राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं सुरू केले. जनतेनें हिंदु-मुसलमान-शीख यांच्या भिरवणुकी दिल्लीच्या रस्त्यांतून काढण्यास सुरवात केली. दिल्लींत मुसलमान समाजाला आम्ही राहूं देणार नाहीं आणि हिंदी संघराज्य हें हिंदूंचें राष्ट्र आहे या वृत्ति मावळूं लागल्या आणि हिंदु-मुसलमान-शीख या सर्वांनीं प्रेमानें व समानतेनें एकत्र नांदण्याचें कर्तव्य जनतेच्या भावनेला पटूं लागलें. जनतेच्या अंतःकरणांत शिरूं लागलेला सैतान पुनः शांत होऊं लागला. हिंदी संघराज्यांतील हिंदूंना व शीखांना जसें अल्पसंख्याकांचें रक्षण करणें व त्यांना समानतेनें वागविणें आपलें कर्तव्य आहे असें वाटत होतें, तसें पाकिस्तानांतील मुसलमानांनाही तेथील अल्पसंख्याकांचें संरक्षण करणें आपलें कर्तव्य असल्याचें मान्य करावें लागत होतें. हे दोनही राज्यांतील प्रश्न एकमेकांवर अवलंबून होते. यामध्यें दुसऱ्या राज्यांत घडणाऱ्या घटनांचे परिणाम पहिल्या राज्यावर झाल्याखेरीज राहणारे नव्हते. महात्मा गांधींनीं या उपवासकाळांत असें स्पष्टीकरण केलें कीं, माझा हा उपवास कोणत्याही एका विशिष्ट जमातीविरुद्ध नाहीं किंवा व्यक्तीविरुद्धही नाहीं. हिंदी संघराज्य आणि पाकिस्तान या दोनही राज्यांतील सरकारांनीं आणि बहुसंख्य जमातींनीं अल्पसंख्याकांचें रक्षण करण्याचें आपलें कर्तव्य, एकनिष्ठेनें पार पाडूं लागावें, यासाठीं मी हा उपवास करीत आहें. जे हिंदु व शीख लोक संघराज्याला हिंदुराष्ट्र बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि जे पाकिस्तानांतील मुसलमान लोक पाकिस्तानला केवळ मुसलमान जमातीचें राष्ट्र बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्या दोघांच्याही विरुद्ध माझा उपवास आहे. दोनहि देशांतील सरकारांना व जनतेला आपल्या राज्यांतील अल्पसंख्याकांचें संरक्षण करण्याची सद्बुद्धि व्हावी आणि ही सद्बुद्धि दोनही राज्यांत प्रभावी व्हावी यासाठीं मी आपलें बलिदान करीत आहें. तथापि हिंदी संघराज्य, निदान ह्या संघराज्याची राजधानी जी

दिल्ली, त्या राजधानीच्या शहरांत तरी ही बुद्धि व भावना प्रभावी झाल्याचा पुरावा मला दिसेल तर मी माझें उपोषण थांबवीन.

हें उपोषण मंगळवार ता. १३ पासून सुरू झालेलें होतें. शुक्रवारपासून म्हणजे उपोषणाच्या चौथ्या दिवसापासून, तें उपोषण थांबविण्यासाठीं आपणास काय करितां येईल यासंबंधींचे विचार सरकार आणि जनता यांना सुचूं लागले. शुक्रवारीं संघराज्याचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं आपल्या मंत्रिमंडळाच्या वतीनें अशी घोषणा केली कीं, आमच्या सरकारनें पाकिस्तानचे ५५ कोटी रुपये अडकवून ठेविलेले आहेत, ते हिंदु आणि मुसलमान या दोन जमातींत आणि पाकिस्तान व संघराज्य या दोन राज्यांतील संबंध सलोख्याचे व्हावेत, आणि दोघांच्या भांडणांतील हा वादग्रस्त मुद्दा आमच्या औदार्यानें निकालात निघावा, म्हणून आमच्या सरकारनें हें पाकिस्तानचें देणें आतां अडवून न ठेवितां देऊन टाकण्याचें ठरविलें आहे. हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींतील रोख शिलकीपैकीं ५५ कोटी रुपये पाकिस्तानला देण्याचें ठरलें होतें. ते देण्यास आम्ही वचनबद्ध आहोंत. परंतु काश्मीर-प्रकरणांत पाकिस्तान सरकारनें आमच्याशीं वैर केल्यामुळें आणि आम्हीं दिलेल्या पैशांचा उपयोग आमच्याविरुद्ध युद्ध करण्याच्या कामीं होण्याचा धोका असल्यामुळें आम्हीं ही रक्कम अडवून ठेविलेली होती. आणि तसें करण्याचा आम्हांला आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीनें पूर्ण अधिकारही होता व आहे. हा अधिकार गाजविण्यांत आम्हीं चूक केलेली आहे असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. तथापि आम्हीं आज हिंदुस्थान व पाकिस्तान आणि हिंदु-मुसलमान जमाती यांच्यामध्यें कायमचा सलोखा निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहोंत. महात्मा गांधींनीं दोघांचीही सद्बुद्धि जागृत करण्यासाठीं आपल्या प्राणांचें बलिदान करण्याचेंही जाहीर केलें आहे. अशा वेळीं संघराज्य सरकार आपला हा कायदेशीर हक्क बाजूस ठेवून प्रतिपक्षाची वृत्ति लक्षांत न घेतां ती पालटावी आणि त्या ठिकाणीं सद्वृत्ति व सद्भावना जागृत व्हावी या बुद्धीनें ही अडवून ठेविलेली रक्कम पाकिस्तानला देण्याचें जाहीर करीत आहों. मात्र काश्मीर-प्रकरणांत आम्हीं जें त्या

संस्थानच्या संरक्षणाचें धोरण कर्तव्यबुद्धीनें स्वीकारलें आहे त्या धोरणांत अथवा कर्तव्यनिष्ठेंत आम्ही फरक करणार आहों अथवा काश्मीरच्या संरक्षणाची जबाबदारी अंगाबाहेर टाकून तेथील जनतेला अथवा तेथील लोकशाही सरकारला आम्ही अंतर देणार आहोंत, असा आमच्या या कृतीपासून कोणींही निष्कर्ष काढूं नये. दोन राज्यांतील आणि जमातींतील चालू कटकटी निकालांत निघाव्या आणि कायमचा सलोखा लवकरच निर्माण व्हावा यासाठीं पाकिस्तानच्या सरकारच्या वृत्तींत पालट घडवून आणण्याचें एक सद्भावनेचें साधन म्हणून आम्ही हा निर्णय गांधीजींच्या वृत्तीस अनुसरून घेत आहों.

हा संघराज्याच्या सरकारचा निर्णय अनेकांना त्या वेळीं योग्य वाटला नाहीं. तथापि सामान्यतः विचारी लोक व हिंदी संघराज्याचें पार्लमेंट यांना हा निर्णय त्या परिस्थितींत फिरवून घेण्याची इच्छा नव्हती. गांधींनीं ह्या निर्णयानंतर आपलें उपोषण सोडावें असाही कांहींनीं प्रयत्न केला. पण त्यांना तें पटलें नाहीं. शनिवार ता. १७ रोजीं मौ. आझाद यांनीं महात्मा गांधीजींशीं चर्चा करून उपोषण-समाप्ति करण्यापूर्वी सात अटी दिल्लींतील निरनिराळ्या जमातींच्या पुढाऱ्यांनीं पूर्ण करण्याचें आश्वासन दिल्यास, गांधींजी आपलें उपोषण समाप्त करतील अशी आशा प्रकट केली. या सात अटी पुढीलप्रमाणें होत—(१) दिल्लींतील ११७ मशिदी मुसलमानांच्या कब्जांतून काढून घेऊन त्यांचा अंशतः विध्वंस करण्यांत आलेला होता. या सर्व मशिदी पुनः मुसलमान समाजाला देऊन त्यांचा उपयोग प्रार्थनास्थान या दृष्टीनें पुनः सुरू व्हावा. (२) मुसलमान समाजावर इतरांनीं जो बहिष्कार टाकलेला आहे तो काढून घेण्यांत यावा. (३) ज्या विभागांतून मुसलमान लोक निर्वासित झाले होते त्या दिल्लीच्या विभागांत मुसलमानांना पुन्हा जाऊन राहतां येईल अशी परिस्थिति निर्माण करण्याची हमी त्यांना देण्यांत यावी. या तीन अटींशिवाय आणखी चार अटी पुढीलप्रमाणें होत्या : (४) दिल्लींतील मुसलमान विभागावर यापुढें नवें आक्रमण होऊं नये. (५) सर्व हिंदी संघ-राज्यांत प्रवास करणाऱ्या मुसलमानाना सुरक्षितपणें प्रवास करतां

येईल अशी शाश्वती निर्माण करावी. (६) दिल्लीशेजारीं ख्वाजा बखत्यार खाजी ही यात्रा लौकरच होणार आहे. या यात्रेच्या प्रसंगीं मुसलमानांना निर्भयपणें यात्रेस जातां यावें. (७) पाकिस्तानांत निर्वासित होऊन गेलेल्या मुसलमानांना पुन्हा हिंदी संघराज्यांत येऊन राहतां येईल अशी परिस्थिति निर्माण करावी.

ता. १८ सोमवार रोजीं महात्मा गांधींना दिल्लींतील जबाबदार पुढाऱ्यांनीं अशा प्रकारचें आश्वासन दिलें आणि बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं एक शांतता-समिति स्थापन करण्यांत येऊन तिच्या नेतृत्वाखालीं या अटी अमलांत आणण्याची खटपट करूं अशी प्रतिज्ञा समितीनें गांधीजींच्या पुढें केली. तेव्हां महात्मा गांधींनीं आपलें उपोषण सोडण्याचें कबूल केलें आणि हा त्यांचा निर्णय सर्व देशभर व जगभर पोहोंचविण्यांत आला. गांधीजींनीं ज्या वेळीं हें आपलें उपोषण सोडलें त्या वेळीं हिंदु-मुसलमान ऐक्याचें आणि अल्पसंख्याकांच्या रक्षणाचें तत्त्व आम्हांस मान्य आहे व तशी शक्य ती खटपट आम्ही करूं, अशा अर्थाचे संदेश दिल्लींतील पाकिस्तान सरकारचे व निजाम सरकारचे जे वकील, त्यांनीं गांधीजींना आपल्या सरकारच्या वतीनें दिले. हा उपोषणसमाप्तीचा विधि झाला तेव्हां बाबू राजेंद्रप्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे हिंदुस्थानांतील वकील जाहिद हुसेन व निजामचे वकील नबाब इतैन यारजंग हे हजर होते. याशिवाय इतर हिंदु-मुसलमान पुढारी हेही तेथें जमलेले होते. या सर्वांनीं गांधीजींना आपल्या सरकारच्या वतीनें व अनुयायांच्या वतीनें उपोषणसमाप्ति करण्याची विनंति केली. आणि त्यानंतर गांधीजींनीं ता. १८ जानेवारी रोजीं तें उपोषण मोसंब्याचा रस घेऊन सोडलें. या वेळीं सर्व देशभर आनंदी आनंद झाला आणि मोठमोठ्या शहरांतून हिंदु-मुसलमान ऐक्याच्या मिरवणुकी काढून आपलें राज्य, त्यांतील कोणत्याही एका जमातीचें नसून तें त्यांत राहणाऱ्या सर्व जमातींचें जातिधर्मभेदातीत लोकशाही राष्ट्र आहे या भावनेची व निष्ठेची अनेक निदर्शनें झालीं. गांधीजी हे आतां पूर्ण आशावादी बनले. निराशेचा अंधःकार दूर होऊन त्यांना आशेचा प्रकाश सर्वत्र

फैलावूं लागल्याचा अनुभव येऊं लागला. दिल्लींतील दंगलीमुळें उठलेलें वादळ शांत होऊन देशावर काळोख पाडणारे ढग वितळूं लागल्याचें त्यांना दिसूं लागलें. आपलें रामराज्य आतां जवळ येऊं लागलें हें पाहून त्यांना आनंद होऊं लागला. जनतेच्या अंतःकरणांतील दुहीचा राक्षस घायाळ होऊन खालीं पडला आणि त्या सिंहासनावर रामाची स्थापना होणार अशीं शुभचिन्हें त्यांना दिसूं लागलीं. कौरव-पांडवांच्या काळापासून सुरू झालेलें कलियुग नष्ट होऊन कुरुक्षेत्राजवळची रक्तलांछित इंद्रप्रस्थ राजधानी रामचंद्राची अयोध्या बनणार अशी आशा त्यांना वाटूं लागली. या आशेच्या व आनंदाच्या भरांत त्यांनीं असे उत्साहपूर्ण उद्गार काढले कीं, आतां माझ्या पूर्व संकल्पाप्रमाणें परमेश्वरानें मनुष्याला जी सव्वाशें वर्षांची आयुर्मर्यादा दिलेली आहे, ती सर्व आयुर्मर्यादा मला लाभेल आणि या काळांत मी रामराज्याची संस्थापना करण्याचे माझे प्रयत्न यशस्वी करूं शकेन.

तथापि हें परमेश्वरी साम्राज्य इतक्यां जवळ येत असल्याचें पाहून कांहींच्या अंतःकरणांतील सैतान संतप्त झाला. गांधीजींचे रामराज्याची संस्थापना करण्याचे हे प्रयत्न चुकीचे आहेत आणि असे प्रयत्न करणारी ही व्यक्ति नष्ट झाल्यावांचून खऱ्या हिंदु धर्माचें रक्षण होणार नाहीं आणि हिंदु समाजावर व धर्मावर येणारीं अरिष्टें अंत पावणार नाहींत अशी विकृत भावना कांहींच्या अंतःकरणांत जागृत होऊं लागली. गांधीजींना दिसणारा हिंदु-मुसलमान समाजांच्या ऐक्याचा प्रकाश या दुर्दैवी जीवांना दिसत नव्हता. दुष्टांना साधुवृत्तीनें जिंकतां येतें ही गांधीजींची निष्ठा त्यांना हिंदुत्वरक्षणाच्या आड येत आहे असें वाटूं लागलें. गांधीजींच्या अंतःकरणांतील शक्ति ही एक सैतानी शक्ति आहे अशी आत्मवंचना त्यांनीं करून घेतली होती. गांधीजींची आत्मप्रेरणा आपल्या हिंदुराष्ट्राला नामशेष करीत आहे असा भ्रम त्यांना वाटूं लागला. गांधीजींच्यासंबंधीं ही विकृत दुष्टभावना कांहीं माथेफिरू तरुणांच्यामध्यें अनेकांनीं अनेक वर्षें पेरून व जोपासून ठेविली होती. अध्यात्मदृष्टीनें विचार करतां असें म्हणावें लागतें कीं, हा एक अज्ञानरूप सैतानाचा खेळ होता. त्याला रामराज्याचा हेवा

वाटत होता. गांधीजींचा वध करून हिंदुराष्ट्र निर्भय आणि सुरक्षित होऊं शकेल, असें वेड माथेफिरू तरुणांपैकीं कांहींना लागलें आणि त्यांनीं गांधीजींचा वध करण्याचा प्रयत्न चालू ठेविला. ता. १८ जानेवारी रोजीं गांधीजींनीं आपलें उपोषण समाप्त केलें आणि ता. २० जानेवारी १९४८ रोजीं एका माथेफिरू तरुणानें गांधीजींच्या अंगावर प्रार्थनेच्या वेळीं बॉंब टाकण्याचा प्रयत्न केला. सुदैवानें हा प्रयत्न अयशस्वी झाला आणि त्या तरुणाला तेथल्या तेथें पकडण्यांत आलें. पण एवढ्यानें हा सैतान शांत झाला नव्हता. यानंतर ता. ३० जानेवारी १९४८ या दिवशीं सायंकाळीं ५ वाजतां गांधीजींचा वध करण्याचा कट व बेत भौतिकदृष्ट्या यशस्वी होऊन गांधीजी प्रार्थनेच्या वेळीं आपल्या प्रार्थनास्थळीं येऊन पोहोंचतात, तोंच त्यांच्यावर एका तरुणानें पिस्तुल झाडून तीन गोळ्या मारल्या आणि त्या गोळ्या लागून गांधी रामराम म्हणत आपला देह धरणीवर टाकून अंतर्धान पावले. पांच वाजून पांच मिनिटांनीं त्यांना गोळ्या घालण्याचा हा प्रयोग घडला आणि त्यानंतर अर्ध्या तासाच्या आंत ५ वाजून ४० मिनिटांनीं त्यांचें प्राणोत्क्रमण झाल्याची वार्ता जगाला अधिकृतपणें निवेदन करण्याचा दारुण प्रसंग हिंदी संघराज्याचे पंतप्रधान आणि गांधीजींनीं पुत्रवत् प्रेमानें वाढविलेले व आपले राजकीय वारस म्हणून जाहीर केलेले पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर आला. या वेळपर्यंत बिर्ला हाउसजवळील त्यांच्या प्रार्थनास्थळाच्या आसपास लक्षावधि लोक ही दारुण वार्ता ऐकण्यास जमा झालेले होते. पंडित नेहरूंच्या तोंडून बाहेर पडलेली ही वार्ता ऐकून सर्व जनतेला धक्का बसला आणि त्याच वेळीं आकाशवाणीनें जगाचें हृदय विदारण करणारी आणि सर्व जगाला दुःखाच्या सागरांत लोटून देणारी वार्ता सर्व जगभर पसरली. मानवतेला गांधीजींच्या जीवनामुळें दिसूं लागलेला प्रकाश एका क्षणांत लोप पावून सर्वत्र अंधार पसरल्याचा अनुभव जेथें जेथें ही वार्ता पसरली व ज्यानीं ज्यानीं ती श्रवण केली तेथें तेथें त्यांना त्यांना येऊं लागला. पन्नास वर्षांची तपश्चर्या आणि हजारों वर्षें भारतीय संस्कृतींत निर्माण झालेलें आत्मतेज या वेळीं एकदम लोप पावलें, असाच अनुभव प्रत्येकास येऊं लागला.

अखेरचा दिवस, अखेरचे संस्कार आणि अखेरचा सन्मान

शुक्रवार ता. ३० जानेवारी १९४८ हा गांधीजींच्या ऐहिक जीवनाचा अखेरचा दिवस ठरला. या दिवशीं त्यांनीं उठल्यापासून अखेरपर्यंत कोणकोणतीं कामें केलीं याची माहिती झाली म्हणजे त्या वेळच्या त्यांच्या एकंदर जीवनासंबंधीं आपणांस बरीच कल्पना येऊं शकते. या दिवशीं पहांटे ३॥ वाजतां ते उठले. हाच त्यांचा नेहमीं पहांटे उठण्याचा काळ असे. उठल्यानंतर पहिलें काम म्हणजे परमेश्वराची प्रार्थना. ही प्रार्थना झाल्यानंतर थोडें काम करून ते कांहीं काळ पडून विश्रांति घेत आणि नंतर सुमारें आठ वाजतां अंगाला मालीश करून घेत असत. हें मालीश झाल्यानंतर त्यांनीं आदल्या दिवशीं तयार करून ठेवलेलें राष्ट्रसभेच्या घटनेचें भावी स्वरूप कसें असावें, ह्यासंबंधींचा आपला मसुदा तपासून त्याला अखेरचें स्वरूप दिलें. राष्ट्रसभेची घटना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बदलण्याची आवश्यकता आहे, हें लक्षांत घेऊन तिच्या घटनेंत कोणकोणते फेरफार करावेत याचा विचार राष्ट्रसभेचे पुढारी बरेच दिवस करीत होते. १९४५-४६ सालापासून राष्ट्रसभेचे पुढारी बंधमुक्त होऊन तुरुंगाबाहेर आल्यापासून राष्ट्रसभेच्या ध्येयांत, धोरणांत व घटनेंत आमूलाग्र फरक करण्याची आवश्यकता अनेकांना भासूं लागली होती. आणि तशा सुधारणा करण्यासाठीं एक कमिटीही नेमलेली होती. परंतु या कमिटीचें काम पुरें होऊन तिनें सूचना केल्या तरी राष्ट्रसभेनें त्यांचा अखेरचा निर्णय केलेला नव्हता. अशी अनिर्णीत स्थिति १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत राहून देश स्वतंत्र झाल्याचें दृश्य सर्वांनीं पाहिलें. यानंतर आतां राष्ट्रसभेचें स्वरूप कसें असावें आणि तिचें ध्येय, धोरण व कार्यक्रम कोणते असावे, यासंबंधीं फार काळ अनिर्णीत अवस्था ठेवणें युक्त नव्हतें. तरीही महात्मा गांधी आणि राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीचे प्रमुख सभासद यांच्या दरम्यान कांहीं बाबतींत मूलभूत मतभेद होत

राहिल्यामुळें हे प्रश्न अखेरपर्यंत निकालांत निघाले नाहींत. या बाबतींत गांधीजींचें मत राष्ट्रसभेच्या भावी स्वरूपासंबंधीं निश्चित होतें व तें त्यांनीं ता. २९ व ३० रोजीं केलेल्या या मसुद्यांत स्पष्टपणें मांडलेलें आहे. राष्ट्रसभेच्या भावी घटनेसंबंधींचा हा महात्मा गांधींचा मसुदा आतां अधिकृतपणें प्रसिद्ध झाला असून तो पुढीलप्रमाणें आहे. हा मसुदा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या पुढें मांडण्यांत यावयाच्या एका ठरावाच्या रूपानें गांधीजींनीं तयार केलेला आहे. या ठरावाचा गोषवारा थोडक्यांत पुढें दिला आहे.

राष्ट्रसभेची भावी घटना

" हिंदुस्थान दोन राज्यांत दुभंगला गेलेला असला तरी राष्ट्रसभेनें योजिलेल्या साधनांच्या साहाय्यानें त्याला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झालेलें आहे. राष्ट्रसभेचा आजचा आकार आणि तिचें स्वरूप म्हणजे मतप्रचाराचें एक साधन आणि पार्लमेंटरी कामाचें एक यंत्र या दृष्टीनें तिची आतां उपयुक्तता राहिलेली नाहीं. हिंदुस्थानांतील शहरें आणि मोठीं गावें यांच्याहून भिन्न अशीं जीं सात लक्ष खेडीं त्यांना सामाजिक, नैतिक आणि आर्थिक स्वातंत्र्य या अर्थाचें स्वातंत्र्य अद्यापि हिंदुस्थानला मिळवावयाचें आहे. हिंदुस्थान लोकशाहीच्या ध्येयाकडे प्रगति करीत असतां लष्करी शक्तीवर मुलकी शक्तीचें प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा लढा घडणें अपरिहार्य आहे. निरनिराळे राजकीय पक्ष आणि जमातनिष्ठ संस्था यांच्याशीं होणाऱ्या विघातक स्पर्धेपासून ही संस्था अलिप्त ठेविली पाहिजे. या आणि यासारख्या कारणांसाठीं अखिल भारतीय काँग्रेस समिति असा ठराव करीत आहे कीं, आजची काँग्रेस-संघटना विलीन करावी आणि तिचा एका लोकसेवक संघामध्यें विकास करावा. या लोकसेवक संघाचे नियम पुढीलप्रमाणें असावेत व त्या संघास प्रसंगानुसार त्यांत फेरबदल करण्याची सत्ता असावी :

" कोणत्याही पांच प्रौढ स्त्रीपुरुषांस एक घटकपंचायत स्थापन करतां यावी. अशा तऱ्हेच्या एकमेकांशेजारच्या दोन पंचायतींना एक संघ स्थापून आपण निवडलेल्या एका पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं काम

करतां यावें. अशा १०० (घटक) पंचायती झाल्या म्हणजे पहिल्या थराचे ५० पुढारी होतील. या ५० पुढाऱ्यांनीं एक दुसऱ्या थरावरचा आपला पुढारी निवडावा. अशाच प्रकारें लोकनियुक्त पुढाऱ्यांच्या श्रेणी असाव्यात. अशा प्रकारच्या पंचायती सर्व हिंदुस्थानभर पसरून त्यांनीं आपापले दुसऱ्या श्रेणीचे पुढारी निवडून सर्व हिंदुस्थानभर आपलें जाळें पसरावें. हे दुसऱ्या श्रेणीचेही पुढारी आपापल्या क्षेत्रातील लोकांची सेवा करीत राहून समुच्चयरूपानें सर्व हिंदुस्थानची सेवा करतील. या दुसऱ्या श्रेणींतील पुढारी जेव्हां त्यांना तशी गरज भासेल तेव्हां एक अखिल भारतीय प्रमुख निवडतील आणि तो प्रमुख त्याला इच्छा असेल तोंपर्यंत सर्व घटकांवर नियंत्रण करून त्यांना आदेश देईल.

"आज देशाचे प्रांत आणि जिल्हे हे बदलत असल्यामुळें या लोकसेवकांच्या गटांची प्रांतवार व जिल्हावार विभागणी केलेली नाहीं आणि जे गट अस्तित्वांत आले असतील त्यांच्याकडे सर्व हिंदुस्थानच्या सेवेचें कार्य देण्यांत आलेलें आहे. हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हा जो सेवकांचा संघ आहे त्याची सर्व सत्ता व अधिकार ते सेवक आपल्या मालकाची म्हणजे अखिल हिंदुस्थानची जी सेवा करतील त्या सेवेंतूनच त्यांना प्राप्त होईल.

(१) या संघाचा प्रत्येक सेवक खादीधारी असावा. त्यानें अखिल भारतीय चरखा-संघानें शिफारस केलेली अथवा स्वतः कातलेली खादी वापरावी आणि तो मद्यपी असूं नये. जर तो हिंदु असेल तर त्यानें कोणत्याही स्वरूपाची अथवा प्रकारची अस्पृश्यता आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनांत पाळूं नये. जमाती-जमातींमधील ऐक्याच्या ध्येयावर त्याचा विश्वास असला पाहिजे. सर्वच धर्मांबद्दल त्याला समान आदर वाटत असला पाहिजे आणि वंशनिष्ठा अथवा स्त्री-पुरुषभेद असा कोणताही भेदभाव न करतां सर्वांना समानदर्जा व समान संधि प्राप्त व्हावी यावरही त्याची श्रद्धा असली पाहिजे.

(२) आपल्या कार्यक्षेत्रांतील प्रत्येक ग्रामवासीयाशीं त्यानें वैयक्तिक संबंध निर्माण केले पाहिजेत.

(३) खेड्यांतील कार्यकर्त्यांची नोंद ठेवणें, त्यांना शिक्षण देणें आणि त्यांचा आपल्यांत समावेश करून घेणें हें त्यांचें कर्तव्य असलें पाहिजे.

(४) आपण करीत असलेल्या दैनंदिन कार्याची नोंद त्यानें ठेवली पाहिजे.

(५) शेती आणि हस्तव्यवसाय यांच्या सहाय्यानें खेडीं स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनावींत अशी ग्रामसंघटना त्यानें करीत राहिलें पाहिजे.

(६) रोगनिवारण आणि आरोग्यशास्त्र यांचें खेड्यांतील लोकांना शिक्षण देऊन त्याचें स्वास्थ्य बिघडूं नये व त्यांना रोग होऊं नयेत, याबद्दल त्यानें ज्ञानप्रसार करावा.

(७) 'नई तालीम' या शिक्षणक्रमाच्या धोरणास अनुसरून हिंदुस्थान तालीम संघानें जें शिक्षणकार्य सुरू केलें आहे त्या शिक्षण-कार्याची संघटना खेड्यांतील लोकांत त्यानें करावी. हें शिक्षण जन्मा-पासून मृत्यूपर्यंतचें असावें.

(८) कायद्यानें ज्यांना मताधिकार दिलेला आहे त्यांचीं नांवें मतदारांच्या यादींत नोंदलेलीं आहेत किंवा नाहींत हें पाहून तीं सर्व नोंदलीं जातील अशी खटपट त्यानें करावी.

(९) मताधिकार मिळविण्यासाठीं जर कांहीं गुण कायद्यानें ठर-विले असतील तर ते गुण आपल्या अंगीं आणण्याची पात्रता ज्यांच्या-पाशीं नसेल त्यांना ती पात्रता प्राप्त होईल अशी खटपट त्यानें करावी.

(१०) वरील उद्देशासाठीं आणि त्यांत वेळोवेळीं जी नवीन भर घालण्यांत येईल त्या उद्देशासाठीं संघाच्या नियमांना धरून आपली पात्रता वाढविण्याचा प्रयत्न करून त्यानें आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावण्याचा अधिकार आपल्या अंगीं आणावा.

" अखिल भारतीय चरखा संघ, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ, हिंदुस्थानी तालिमी संघ, हरिजन-सेवक संघ आणि गो-सेवक संघ या संस्था या संघाला (लोकसेवक संघाला) जोडण्यांत याव्यात.

" आपल्या कार्यासाठीं आणि दीक्षा सफल करण्यासाठीं संघानें खेड्यांतील जनता आणि इतर लोक यांच्यापासून निधि जमवावा. हा

निधि जमवितांना गरिबांच्यापासून मिळणाऱ्या पैशावरच विशेष भर द्यावा."

महात्मा गांधींनीं राष्ट्रसभेची सध्यांची घटना मोडून टाकून अथवा तिचें विसर्जन करून तिला सत्तेच्या संपादनाच्या स्पर्धेपासून अलिप्त ठेवावें आणि तिचें रूपांतर लोकसेवक संघात करावें, ही मूलभूत कल्पना आधारास घेऊन ही घटना सुचविलेली आहे. सत्तेचें राजकारण आणि सेवेचें राजकारण असे जर राजकारणाचे भेद केले, तर राष्ट्रसभेनें सत्तासंपादनाचें राजकारण सोडून द्यावें आणि लोकसेवेच्या कार्यांत करावें लागणारें अपरिहार्य राजकारण तेवढेंच करावें, असा या सूचनांमागील मुख्य हेतु आहे असें आम्हांस वाटतें. हें लोकसेवेचें राजकारण पक्षातीत असूं शकतें. उदाहणार्थ, लोकशाहीची राज्यघटणा कायम राहावी आणि मूलभूत राष्ट्रीय हक्कांना राजसत्तेनें धक्का पोहोंचवूं नये. हें राजकारण पक्षातीत असूं शकतें. राष्ट्रीय हक्कांवर गदा आणणारे व लोकशाही राज्यसंस्थेला भ्रष्ट करणारे जुलमी कायदे कोणत्याही पक्षाच्या सरकारनें केले तरी, त्या कायद्यांचा निषेध करणें अथवा निरुपाय झाल्यास त्या कायद्यांचा सविनय भंग करणें हें राजकारणही पक्षातीत असेंच असूं शकतें. सत्याग्रही राजकारण हें अशाच प्रकारचें राजसत्तेच्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचें राजकारण असतें. प्रजाधर्मांतील राजकारणांत या राजकारणाचा समावेश होत असून तें राजकारण सेवेच्या भांडवलावर चाललेलें असतें. सत्तेचें संपादन हें या राजकारणाचें ध्येय असूं शकत नाहीं. सत्ताधाऱ्यांनीं केलेल्या अन्यायांचा प्रतिकार व प्रतिबंध येवढेंच हें राजकारण असून जेव्हां सत्ताधारी राज्यकर्ते उन्मत्त व जुलमी बनतील तेव्हां प्रजेचें आत्मबल संघटित बनून त्यांच्याशीं अनत्याचारी असहकार करूं लागेल तर या सत्याग्रही राजकारणास अशा अवस्थेंत क्रांतिकारक स्वरूप प्राप्त होईल. असा क्रांतिकाल प्राप्त होऊन देशांतील राज्ययंत्र आमूलाग्र पालटून गेलें तरीही या सत्याग्रही लोकसेवकांनीं आपल्या हातीं सत्ता घेण्याचा विचार करतां कामा नये. सेवेच्या तपश्चर्येनें लोकांचा विश्वास संपादन करावा. त्यांच्या विश्वासानें मिळणारा निधि पुनः लोकसेवेच्या

कार्यांत खर्च करावा ; आणि लोकांतील सत्यनिष्ठा आणि अहिंसावृत्ति वाढवून त्यांना सहकारी जीवन स्वावलंबनानें व्यतीत करण्याचें शिक्षण देत राहावें, एवढेंच या सत्याग्रही राजकारणाचें स्वरूप असलें पाहिजे. देशांतील राजसत्ता हातीं घेऊन राजदंडानें लोकांना धाक दाखवावयाचा आणि राजसत्तेच्या प्रसादाचें आमिष निर्माण करून त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करावयाचा हा राजकारणाचा भाग सत्याग्रही राजकारणांत बसूं शकत नाहीं. धाक दाखवून आणि लोभ निर्माण करून लोकांतील दुष्टांचें पारिपत्य आणि साधूंचें रक्षण करणारा राजधर्म हा आजच्या अवस्थेंत समाजाला आवश्यक वाटत असला तरी त्यामुळें लोकांतील भय आणि लोभ या वृत्तींना चालना दिली जाते आणि अखेरीस राजकारणांत व राज्यसंस्थेंत सत्तेचा लोभ, स्पर्धा आणि दहशतवाद यांचा प्रवेश होतो. म्हणून राष्ट्रसभेनें निदान यापुढें तरी हें सत्तास्पर्धेचें राजकारण करूं नये आणि केवळ लोकसेवेचेंच राजकारण करावें, असा गांधीजींचा वरील सूचना करण्यांत आशय दिसून येतो. त्याचप्रमाणें या लोकसेवक संघाच्या कार्यासाठीं जो निधि जमवावयाचा तो खेड्यांतील गरीब जनतेकडून जमविण्यावरच भर द्यावा असें सांगण्यांत हा लोकवसेवक संघ धनिकांच्या पैशावर पोसला जाणारा धनिकांचा आश्रित संघ बनूं नये अशी दृष्टि असावी असें वाटतें. तसेंच गरिबांनीं या संघास द्रव्यसहाय्य केलें म्हणजे या लोकसेवक संघाची सेवा गरीब जनतेला हवी असून ती मान्य आहे असेंही सिद्ध होतें. राजसत्तेचा व धनिकांचा आश्रय घेऊन लोकसेवेचें व्रत आचरणारे संघ तत्त्वभ्रष्ट होण्याचा धोका असतो म्हणूनच संघास लागणाऱ्या या निधीसंबंधीं वरील सूचना गांधीजींनीं केली असावी असें दिसतें.

राष्ट्रीय मंत्रिमंडळांत एकी ठेवा

राष्ट्रसभेच्या घटनेसंबंधीं हा मसुदा तयार केल्यानंतर मद्रास इलाख्यांतील अन्नधान्यदुष्काळांतील प्रश्न कसा सोडवावा यासंबंधीं त्यांनीं कांहीं सूचना केल्या. त्यांत केळीं, भुईमूग, नारळी, ताड, कंदमुळें, वगैरेंची

योग्य निपज करून अन्नाची टंचाई भरून काढतां येईल अशा तऱ्हेचे त्यांचे विचार त्यांनीं प्रकट केले. यानंतर त्यांनीं कांहीं काल बंगाली लेखनाचा अभ्यास केला. नौखालींत गेल्यापासून बंगाली लेखन करण्याचा अभ्यास ते नित्य नियमानें करीत असत. हा अभ्यास झाल्यानंतर त्यांचें भोजन झालें. त्यांचें भोजन म्हणजे शेळींचें दूध, उकडलेल्या व कच्च्या पालेभाज्या, संत्रीं, लिंबू, आल्याचें चाटण एवढेंच होतें. यानंतर नौखालीस गेलेल्या लोकांनीं तेथेंच राहून आपलें कर्तव्य करीत राहिलें पाहिजे आणि त्या कर्तव्यासाठीं प्राण द्यावा लागला तरी त्यांत आनंद मानून अखेरपर्यंत तेथेंच लोकसेवा करीत राहिलें पाहिजे अशा सूचना त्यांनीं या कामीं कार्यकर्त्यांना दिल्या. यानंतर वामकुक्षी घेऊन ते उठले, तेव्हां श्री. सुधीर घोष हे त्यांच्या मुलाखतीस आले. या मुलाखतींत अनेक गोष्टींची चर्चा झाली. त्याचबरोबर राष्ट्रीय मंत्रिमंडळांतील पंतप्रधान पं. नेहरू आणि स. वल्लभभाई यांच्यामध्यें मतभेद उपस्थित झाले असून त्यांच्यांत फूट पाडण्याचा प्रयत्न कांहीं लोक करीत आहेत, अशी बातमी 'लंडन टाइम्स' नें छापली होती त्यासंबंधीं त्यांनीं चर्चा केली. कांहीं झालें तरी या वेळीं राष्ट्रीय मंत्रिमंडळांत फूट पडतां कामा नये, असें त्यांनीं आपलें मत व्यक्त केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. यानंतर दिल्लींतील कांहीं मौलाना त्यांच्या भेटीस आले. आपण दुसऱ्या दिवशीं सेवाग्रामास जाणार आहों असें गांधीजींनीं त्यांना सांगितलें. आणि तसें जाण्यास आपली हरकत नाहीं असें त्या मौलाना मंडळींनीं गांधीजींना सांगितलें. शेट जम्नादास बजाज यांची श्राद्धतिथि ता. १४ फेब्रुवारी रोजीं होणार आहे ती करून मी बहुधा परत दिल्लीस येईन असें गांधीजी त्यांच्यापाशीं म्हणाले. अर्थात् ईश्वरानें याहून दुसरें कांहीं घडूं दिलें नाहीं तरच आपण ठरल्या दिवशीं येऊं असेंही ते उद्गारले.

अंत !

कांहीं वेळानें म्हणजे ४॥ वाजतां त्यांनीं आपलें संध्याकाळचें जेवण घेतलें. या वेळीं सरदार पटेल हे त्यांच्या मुलाखतीस आले आणि

त्यांचें त्यांच्याशीं बराच वेळ बोलणें झालें. सरदारांच्यापाशींही मंत्रिमंडळांतील एकीसंबंधानें पुष्कळ बोलणें झालें. कांहीं झालें तरी या वेळीं मंत्रिमंडळांत फूट पडतां कामा नये असा त्यांनीं इषारा दिला. आणि प्रार्थनेनंतर पंडितजी आपणांस भेटणार आहेत त्या वेळीं आपण त्यांना यासंबंधीं पुनः बोलूं असेंही ते म्हणाले. ही फूट पडूं नये यासाठीं अवश्यं झालें तर दिल्ली इतक्यांत सोडणारही नाहीं असेंही ते बोलले. हें बोलणें संपेपर्यंत गांधीजींची प्रार्थनेची वेळ होऊन गेली आणि ते प्रार्थनेच्या स्थळीं जावयास ते निघाले. प्रार्थनेच्या ठिकाणीं ते पोहोंचतांच त्यांनीं लोकांना नमस्कार करण्यासाठीं आपले हात जोडले. इतक्यांत उजव्या बाजूनें गर्दीतून मार्ग काढीत व रेटारेटी करीत कोणीतरी पुढें आला. त्यानें गांधीजींना नमस्कार करून "आज तुम्हांला प्रार्थनेला थोडा उशीर झाला" असे शब्द उच्चारिले. "होय, झाला खराच" असें ते म्हणताहेत तोंच त्या इसमानें त्यांच्यावर आपल्या पिस्तुलांतून तीन गोळ्या झाडल्या. पहिली गोळी पोटाच्या उजव्या बाजूस, दुसरी छातीच्या मध्यावर व तिसरी छातीच्या उजव्या बाजूस लागली. पहिल्या दोन गोळ्या पाठींतून बाहेर पडल्या. आणि तिसरी फुप्फुसांत अडकून राहिली. पहिली गोळी लागतांक्षणींच गांधींचें उजवें पाऊल पुढें होतें तें तसेंच थबकून राहिलें. दुसरी गोळी लागली तरी ते दोन्ही पायांवर उभे होते आणि तिसरी लागल्यावर मात्र ते "राम, राम" म्हणत भूमीवर कोसळले. त्याबरोबर सर्वत्र आरडाओरड सुरू झाली. आणि डॉक्टर मंडळी जमूं लागली. बिर्ला हाउसच्या माळ्यानें पिस्तुल मारणाऱ्या मारेकऱ्याला पकडलें. गांधीजींना घरामध्यें नेण्यांत येऊन एक चमचाभर मध आणि कढत पाणी त्यांच्या तोंडांत घालण्यांत आलें. पण तें त्यांच्या पोटांत गेलें नाहीं. त्यांचें प्राणोत्क्रमण झालेलें होतें. लवकरच डॉक्टर मंडळी येऊन गांधीजींचा प्राण त्यांच्या देहास सोडून गेल्याचें दुःखद वर्तमान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मुखानें बाहेर जमलेल्या लक्षावधि जनसमुदायास सांगण्यांत आलें. सरदार पटेल, बाबू राजेंद्रप्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, इत्यादि सर्व पुढारी व हिंदुस्थानचे मंत्री गांधीजींच्या जवळ बसून शोक करूं लागले.

गव्हर्नर जनरल लॉर्ड मौंटबॅटन हे तेथें आले आणि त्यांनीं सर्वांचा शोक आवरून पंडित जवाहरलाल नेहरू व मौलानासाहेब यांच्याशीं विचारविनिमय करून पुढील अंत्यविधीची व्यवस्था करण्याच्या योजनेस ते लागले. गांधीजींचें शरीर मसाल्यांत घालून तसेंच कांहीं दिवस ठेवावें अशी एक कल्पना या वेळीं निघाली होती. परंतु तसें करणें गांधीजींच्या स्वतःच्या मताशीं व भावनेशीं विसंगत असल्यामुळें ती कल्पना तात्काळ रहित करण्यांत आली. बाहेर जमलेल्या जनतेला गांधीजींचें अखेरचें दर्शन लाभावें म्हणून त्यांचें शरीर बिर्ला भवनाच्या वरच्या मजल्यावर सर्वांस दिसेल अशा ठिकाणीं ठेवण्यांत आलें.

जगाला धक्का बसला

रात्रीं ८॥ वाजतां पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार पटेल यांनीं रेडिओवर भाषण करून गांधीजींच्या अकल्पिक निधनासंबंधीं आपला अनावर शोक प्रकट केला. पंडितजी आपल्या भाषणांत म्हणाले, "मित्र हो, आपल्या जीवनांतील प्रकाश आज नाहींसा झाला असून सभोंवार काळाकुट्ट अंधार पसरलेला आहे." पण लगेच ते म्हणाले, "नाहीं, हा प्रकाश नष्ट होणें शक्य नाहीं. मानवाला ह्या ज्योतीचा प्रकाश यापुढें शेंकडों वर्षें मिळत राहील." ही दुःखद वार्ता या वेळीं सर्व जगभर पसरत गेली. जिकडे तिकडे शोक आणि सुस्कारे यांचे नाद ऐकूं येऊं लागले. गांधीजींच्या खोलींत रात्रभर भगवद्गीतेचे व शिरोमणिसाहेब या शीख धर्मग्रंथाचें पठण चालू होतें.

दुसरे दिवशीं गांधीजींची स्मशानयात्रा काढण्यांत आली, त्या वेळीं त्यांचें शव फुलांनीं आच्छादून तें एका लष्करी गाडीवर ठेवण्यांत आलें आणि ती लष्करी गाडी दोऱ्या लावून लष्कराकडून ओढून नेण्यांत यावी असें ठरलें. या मिरवणुकीस सर्व दिल्ली शहर आणि हिंदुस्थानच्या सर्व भागांतील राष्ट्रीय पुढारी लोटले होते. ही मिरवणूक सकाळीं ११ वाजतां निघाली आणि ५ तासांत यमुनेच्या राजघाटावर येऊन दाखल झाली. या मिरवणुकीची लांबी सुमारें सहा मैल असावी असें

म्हणतात. या मिरवणुकींत गांधीजींच्या चार पुत्रांपैकीं पहिले ज्येष्ठ हिरालाल आणि दुसरे मणिलाल हे हजर नव्हते. तिसरे रामदास व शेवटचे देवदास हे गांधीजींच्या रथाबरोबर चालत होते. ही यात्रा चालू असतां गांधीजींच्या शरीरावर विमानांतून पुष्पवृष्टि करण्यांत येत होती आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या घरांतून गांधीजींचें दर्शन घेण्यासाठीं जमलेले लोक त्यांच्या नांवाचा एकसारखा जयजयकार करीत होते. यमुनेच्या राजघाटावर एक सीमेंटचा मोठा चौथरा करण्यांत येऊन त्यावर चंदनाची चिता रचण्यांत आली होती आणि तेथें गांधीजींचे तिसरे चिरंजीव रामदास यांच्या हस्तें चितेला अग्नि देण्यांत आला. या ठिकाणीं या वेळीं कमींत कमी दहा लक्ष लोक जमले होते. आणि त्यांच्या तोंडून एकदम् "महात्मा गांधी अमर हो गये" असे उद्‌गार निघाले आणि गांधीजींच्या जयजयकारांत यमुनेच्या तीरावर लोटलेला तो प्रचंड जनसमुदाय दुःखी अंतःकरणानें आपापल्या घरीं निघून गेला.

यानंतर सर्व हिंदुस्थानांत चौदा दिवसपर्यंत अधिकृत शोककाल म्हणून पाळण्यांत आला. आणि चौदाव्या दिवशीं गांधीजींच्या अस्थींचें विसर्जन प्रयाग क्षेत्रांत मोठ्या समारंभानें करण्यांत आलें. या वेळीं पंडित नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद हे प्रयागास गेलेले होते. त्यांच्या रक्षेचें विसर्जन अशाच प्रकारें प्रत्येक प्रांतांत आणि हिंदुस्थानातील सर्व धर्मतीर्थांच्या ठिकाणीं करण्यांत आलें. गंगायमुनेपासून कावेरीपर्यंत सर्व प्रसिद्ध नद्यांच्या पाण्यामध्यें गांधीजींच्या चिताभस्माचें विसर्जन करण्याचा समारंभ हिंदुस्थानांतील कोट्यवधि लोकांनीं या दिवशीं पार पाडला आणि आपल्या अंतःकरणांतील त्यांच्यासंबंधींच्या पवित्र व पूज्य भावना प्रकट केल्या.

सर्व हिंदुस्थानभर लोकांनीं सभा-मिरवणुकी काढून आपला शोक प्रकट केला. आणि या शोकाच्या निमित्तानें हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे आणि त्याच्या अंतःकरणांतील ध्येयें महात्मा गांधींच्या जीवनांत प्रकट झालेलीं होतीं हें पुनः एकदां जगाच्या निदर्शनास आणून दिलें. हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोनहि राज्यांत गांधीजींच्या निधनाचा

शोक प्रकट करण्यांत आलेला होता. आणि सर्व जगांतील सरकारांनीं आणि लोकनेत्यांनीं गांधीजींच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्याच्या निमित्तानें त्यांच्यासंबंधींची आपली पूज्य भावना प्रकट केली आणि हिंदी राष्ट्रासंबंधीं आपली सदिच्छा व्यक्त केली. हिंदुस्थान सरकारनें एक शोकाचा ठराव करून गांधीजींच्या गुणांचें वर्णन केलें आणि त्यांनीं ज्या साधनांनीं आपला देश स्वतंत्र केला त्या साधनांमागील तत्त्वांवर आपली दृढ निष्ठा आहे आणि त्यांनीं आपल्या राष्ट्रास जीं तत्त्वें शिकविलीं त्यांचें अनुकरण आम्ही शक्य तितकें करूं असें आश्वासन जनतेला दिलें. त्या वेळीं सर्व देशांतून हिंदुस्थान सरकारकडे गांधीजींच्यासंबंधीं शोकप्रदर्शक संदेश आले. आणि त्यांत हिंदी राष्ट्राचें व जनतेचें सांत्वन करण्याचा प्रयत्न झाला. असे शेंकडों संदेश या वेळीं एकसारखे हिंदुस्थानांत येत होते. त्यांपैकीं कांहीं येथें दिल्यास त्यावरून इतरांची कल्पना येऊं शकेल.

इंग्लंडचे राजे यांनीं लॉर्ड मौंटबॅटन यांना जो संदेश पाठविला त्यांत पुढील शब्द होते.

"श्रीयुत गांधींच्या निधनाच्या वार्तेनें आम्हांस व आमच्या राणीसाहेबांस जोराचा धक्का बसला. या घटनेमुळें हिंदी जनतेचें आणि सर्व मानवजातीचें न भरून येणारें असें जें नुकसान झालेलें आहे, त्याबद्दल आम्हांस अंतःकरणपूर्वक सहानुभूति वाटून खेद होत आहे हें आपण हिंदी जनतेस कळवावें."

ब्रिटिश सरकारनें गांधीजींच्या दुःखासंबंधीं पुढीलप्रमाणें एक ठराव प्रसिद्ध केला:—

"महात्मा गांधींच्या निधनाची शोकदायक वार्ता ऐकून या सरकारास जोराचा धक्का बसला आहे. आपल्या देशाच्या इतिहासांत त्यांच्याइतका महत्त्वाचा भाग कोणत्याही मानवी व्यक्तीनें आजपर्यंत घेतलेला नाहीं. त्यांच्या दीर्घकालीन जीवनांत त्यांनीं सतत शांतता-रक्षणाचेच प्रयत्न केले आणि अत्याचारांचा निषेध केला. जीवनांतील सर्व अंगांत व्यवहार करणाऱ्या सहस्रावधि लोकांना आणि जगांतील प्रत्येक देशांत वावरणाऱ्या असंख्य जनतेला त्यांच्या निधनापासून

होणारी हानि जाणवेल. त्यांचें नैतिक आणि आध्यात्मिक नेतृत्व हें आजच्या दुःखी आणि कष्टी युगाला स्फूर्तिदायक असें एक उदाहरण होतें. या आपत्तीच्या वेळीं हिंदुस्थानच्या महान् दुःखांत ब्रिटिश राष्ट्र हें सहभागी होईल. त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या कांहीं काळांत त्यांनीं निरनिराळ्या जमातींतील कटुभावना आवरून धरून सर्व हिंदी लोकांनीं आपल्या समान हितासाठीं सहकार्य करूं लागावें याबद्दल आपलें शांतिमय नेतृत्व प्रभावी करण्यांत यश संपादन केलें. ब्रिटिश सरकारला अशी अंतःकरणपूर्वक आशा वाटते कीं, त्यांचें उदाहरण पुढें चालू ठेवून इतर लोकहि वागतील आणि त्यांच्या नैतिक शक्तीचा प्रभाव लोकांना शांततेच्या मार्गावर प्रगति करण्यास उपयोगी पडेल."

यानंतर इंग्लंडांतील पंतप्रधान मि. ॲटली व मंत्रिमंडळांतील इतर प्रमुख मंत्री यांनीं वैयक्तिक शोकाचे सांत्वनपर संदेशही हिंदुस्थानास पाठविले होते. असे संदेश पाठविणारांत त्यांना राजकारणांत अत्यंत जोरानें विरोध करणारे भारतमंत्री मि. ॲमेरी आणि विन्स्टन चर्चिल यांचेहि संदेश आले होते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा-समितीचे अध्यक्ष यांनीं आपल्या समितीच्या वतीनें जाहीर केलें कीं, "गांधीजींनीं जगाला एक मोठा धडा दिलेला आहे. त्यांनीं अनेक प्रसंगीं उदार ध्येयांवरील आपली जी अविचल निष्ठा प्रकट केली तशी अविचल निष्ठा फारच थोड्यांनीं प्रकट केलेली आहे. या ध्येयांचा विजय व्हावा म्हणून त्यांनीं आपलें जीवन होमून घेतलें. सुरक्षा-समितीच्या वतीनें मी हिंदी प्रतिनिधींना आणि त्यांच्या सरकारास व सर्व राष्ट्रांस असें कळवितों कीं, आम्हांस एका माथेफिरू व्यक्तीच्या कृत्याबद्दल दुःख वाटत असून हिंदुस्थानसंबंधीं अत्यंत सहानुभूति वाटत आहे." यानंतर सुरक्षा-समितीच्या सभासदांनीं एक मिनिट उभे राहून गांधीजींसंबंधींचा आपला आदर व्यक्त केला. आणि बैठक तीन दिवस तहकूब केली.

जगाचे शोकोद्गार

अशा प्रकारचे शोकाचे व सहानुभूतीचे संदेश चीन, रशिया, तुर्कस्तान, इराण, अफगाणिस्तान, अमेरिका, इंडोनेशिया, इत्यादि जगांतील सर्व राष्ट्रांतून, सरकारांकडून व निरनिराळ्या लोकसेवक संस्थांतून या वेळीं आले. जगांतील सर्व राष्ट्रांतील सरकारांनीं जिच्यासंबंधीं इतका आदर प्रदर्शित केला, जिच्या जीवनासंबंधीं इतकी पूज्य भावना प्रकट केली आणि जिच्या निधनासंबंधीं इतका शोक व्यक्त केला अशी विभूति आजपर्यंत झाली नाहीं असें म्हटल्यास त्यांत यत्किंचितहि अतिशयोक्ति होणार नाहीं.

हिंदुस्थानांतील सर्व धर्मांच्या, जातींच्या आणि प्रांतांच्या लोकांना जसा गांधीजींच्या निधनामुळें शोक झाला तसाच शोक जगांतील प्रत्येक राष्ट्रांतील व धर्मांतील लोकांना झाला. जगांतील सर्व राष्ट्रांची प्रतिनिधीभूत म्हणून जी संयुक्त राष्ट्रसंघ ही संस्था अस्तित्वांत येत आहे तिनें गांधीजींच्या शोकाचें निदर्शन म्हणून आपलें निशाण खालीं ओढलें. जगांतील राज्यकर्त्या व्यक्तींच्या निधनाहून इतर कोणत्याही व्यक्तींच्या निधनानिमित्त अशा प्रकारचें निदर्शन संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्थेनें आजपर्यंत केलेलें नाहीं. तसेंच ज्या ब्रिटिश साम्राज्याशीं म. गांधींनीं निरनिराळ्या स्वरूपांत सुमारें ५० वर्षें राजकीय लढा केला त्या ब्रिटिश राष्ट्राच्या सरकारनें गांधीजींचा या प्रसंगीं खुल्या दिलानें आणि अंतःकरणपूर्वक सन्मान कला. याखेरीज चीन, रशिया, तुर्कस्तान, इ. आशियांतील व युरोपांतील लहानमोठ्या राष्ट्रांनीं त्यांचा दुखवटा आपापल्यापरी व्यक्त करून दाखविला. या सर्व निदर्शनामुळें जसा गांधीजींचा असामान्य गौरव झाला तसाच तो हिंदुस्थानचा आणि हिंदी संस्कृतीचाही गौरव झाला हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हिंदी संस्कृतीचें परमश्रेष्ठ स्वरूप गांधीजींच्या रूपानें जगाच्या निदर्शनास आलें आणि त्याचें दर्शन घेऊन सर्व जगांतील सरकारनीं आणि जनतेनें त्यांच्यापुढें आपली मान प्रेमानें, आदरानें आणि पवित्र भावनेनें लवविली. सुमारें सव्वाशें वर्षें ब्रिटिश साम्राज्याच्या पायाखालीं तुडविले

गेलेलें हिंदी राष्ट्र हें आज स्वतंत्र होऊन जगाच्या अग्रस्थानीं मिरवूं लागलें आणि त्याची संस्कृति मानव संस्कृतीचें नेतृत्व करण्यास समर्थ आहे असा आत्मविश्वास, गांधीजींच्या निधनाच्या निमित्तानें सर्व जगाच्या अंतःकरणांत जी शोकाची ऊर्मि उसळली आणि त्या शोकाच्या निमित्तानें जगांतील जनतेचें लक्ष गांधीजींच्या जीवन-चरित्राकडे वेधलें गेलें त्यावरून हिंदी अंतःकरणांत, पुनः जागृत झाला. म्हणूनच गांधीजींचें जीवित नष्ट करूं पाहणारा मारेकरी हा वेडा ठरला आणि त्यांच्या देहाचा विनाश करून गांधीजींच्या जीवनसंदेशाचा विनाश करण्याची आशा वेडेपणाची आहे हें प्रत्यक्ष प्रयोगानें सिद्ध झालें. मराठींतील एका कवीनें म्हटल्याप्रमाणें

"मरणांत खरोखर जग जगतें"

हें तत्त्व गांधीजींच्या निधनानंतर जगाच्या निदर्शनास आलें आणि ज्या विचारसांप्रदायाचें वेड डोक्यांत शिरल्यामुळें गांधीजींचा खून करण्यांत आला तो विचार सांप्रदाय या वधामुळें कायमचा अंत पावला आणि गांधीजी अमर झाले.

: : ९ : :

हिंदी राष्ट्रसभेचें राजकारण आणि महात्मा गांधींचें नेतृत्व

"The Congress has been national from its very birth in 1885. It has never represented a party, but by it have been represented all parties and all Indians. Of course, it is open to this great national organisation any day to commit suicide by becoming a party machine. The calamity may overtake it if God's wrath descends upon it. Nevertheless, many will be praying that such a misfortune may not befall it."

'Harijan', August 3, 1947
Mahatma Gandhi.

"Though split into two, India has attained political independence through means devised by the Indian National Congress. The Congress in its present shape and form, that is as a propoganda vehicle and parliamentary machine has outlived its use. India has still to attain social, moral

and economic independence in terms of its 7,00,000 villages as distinguished from its cities and towns. The struggle for the ascesdency of civil over military power is bound to take place in India's progress towards its democratic goal. It must be kept out of unhealthy competition with political parties, and communal bodies. For these and other similar reasons the A. I. C. C. resolves to disband the existing Congress organisation and flower into a Loka Sevak Sangh under the following rules with power to alter them as occasion may demand."

Mahatma Gandhi's suggestions with regard to future Congress Constitution handed over to the Congress secretary Acharya Jugal Kishore on the fateful forenoon of Jan. 30, 1948.

मागील प्रकरणाच्या अखेरीपर्यंत म. गांधींच्या जीवनाची कथा संक्षिप्तरूपानें सांगितली. आतां या व पुढील प्रकरणांत त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा आणि जीवनतत्त्वज्ञानाचा थोडक्यांत विचार करून गांधीजींच्या जीवनाचें रहस्य उलगडण्याचा आणि तें मराठी वाचकांपुढें मांडण्याचा शक्य तो प्रयत्न करावयाचा आहे. या प्रकरणांत म. गांधींनीं जें राजकारण केलें त्याचें स्वरूप आणि त्या राजकारणामागील तात्त्विक पार्श्वभूमि यांचा विचार करावयाचा आहे. आणि पुढील प्रकरणांत त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि त्यांची धर्मनिष्ठा यांचा विचार करावयाचा आहे. म. गांधींच्या राजकारणाचा विचार करतांना त्यांनीं १९२० पासून १९४८ च्या जानेवारी महिन्यापर्यंत राष्ट्रसभेचें जें राजकीय नेतृत्व केलें त्याचाच प्रामुख्यानें विचार करावा लागणार आहे. राष्ट्रसभा ही संस्था स. १८८५ सालीं स्थापन झाली, त्यानंतर १८९५ सालापासून ते १९२० सालापर्यंत म्हणजे सुमारें २५ वर्षें तिच्या पोटांत

एक प्रागतिक व दुसरा राष्ट्रीय असे दोन राजकीय सांप्रदाय एकमेकांशीं झगडत असल्याचें दिसतें. हा प्रागतिक विरुद्ध राष्ट्रीय पक्षांचा लढा १८९५ पासून १९१५ पर्यंत राष्ट्रीय पक्षास प्रतिकूल आणि प्रागतिक पक्षास अनुकूल असाच घडत गेला. १९१५ नंतर १९२० पर्यंतच्या काळांत राष्ट्रीय पक्षानें राष्ट्रसभा आपल्या हातीं घेतली आणि प्रागतिक पक्ष १९१७ सालापासून तिच्यांतून बाहेर पडला. १९२० सालीं राष्ट्रीय पक्षाच्या हातातील राष्ट्रसभा म. गांधींचें नेतृत्व मान्य करून त्यांच्या हातीं गेली. या वेळीं राष्ट्रसभा ही राष्ट्रवादी बनली होती आणि तिला निःशस्त्र क्रांतिकारक संस्थेचें स्वरूप देण्याचा प्रयत्न तिचें त्या वेळीं नेतृत्व करणारे पुढारी लोकमान्य टिळक आणि देशबंधु दास हे करीत होते. प्रागतिकांच्या केवळ कायदेशीर व सनदशीर राजकारणाच्या पुढें गेल्यावांचून राष्ट्रसभेला आपलें स्वराज्याचें ध्येय गांठतां येणार नाहीं हा विचार राष्ट्रसभेंत १९०५ सालापासून वाढूं लागला होता. त्या वेळीं या विचाराचे पुरस्कर्ते लोकमान्य टिळक, बाबू बिपिनचंद्र पाल आणि लाला लजपत राय हे तीन पुढारी होते. या तिघांनाही हिंदुस्थानच्या स्वराज्याचा प्रश्न सोडविण्यास सशस्त्र क्रांतीचा मार्ग उपयोगी पडणार नाहीं, ही गोष्ट १९०५-६ सालापर्यंत पटलेली होती. तसेंच प्रागतिकांचें राजकारण हेंहि दुबळें असल्यामुळें आपला प्रश्न सोडविण्यास असमर्थ आहे असें त्यांना दिसून आलें होतें. अशा परिस्थितींत निःशस्त्र क्रांतीचा मार्ग चोखाळल्यावांचून आपणांस गत्यंतर नाहीं हें वरील तीनही राष्ट्रीय पुढाऱ्यांस स्पष्ट दिसत होतें. या निःशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा निर्देश ते बहिष्कार-योग या नांवानें करीत असत. या बहिष्कार-योगाच्या स्वरूपाचें त्यांच्या बुद्धीला जें आकलन झालेलें होतें तें व्यक्त करण्यासाठीं हे पुढारी निशस्त्र प्रतिकार, अडवणूक आणि सरकारवरील बहिष्कार अशा शब्दांचा उपयोग करीत असत. १९०७ सालीं लोकमान्य टिळकांनीं या बहिष्कार-योगाचें विवेचन कलकत्त्यास केलेल्या टेनेट्स ऑफ दी न्यू पार्टी या सुप्रसिद्ध भाषणांत पुढीलप्रमाणें केलेलें आहे.

"आपल्या हातीं शस्त्रें नाहींत आणि शस्त्रांची आम्हांस गरजही नाहीं. त्यांच्यापेक्षां अधिक प्रबल असें एक राजकीय शस्त्र बहिष्काराच्या स्वरूपाचें आमच्यापाशीं आहे. एक गोष्ट आम्हीं पाहिली आहे आणि ती म्हणजे हा सर्व राज्यकारभार मूठभर इंग्रज लोक आमच्याच सहाय्यानें चालवीत असतात. आम्ही सर्व खालच्या नोकऱ्यांत आहों. सर्व राज्यकारभार आमच्या मदतीनें चालत असला तरी आमच्यांतील परस्परांशीं सहकार्य करण्याच्या शक्तीबद्दल ते आम्हांस अज्ञानांत ठेवीत असतात. कारण या शक्तीचा उपयोग करून जें सरकार वस्तुतः आज आमच्याच हातीं आहे तें काबीज करून आम्हांस चालवितां येईल. सर्व नियंत्रण आपल्या हातीं घेण्याचा हा प्रश्न आहे. माझ्या घराची किल्ली माझ्या हातांत मला हवी. केवळ एखाद्या दुसऱ्या परकीयाला घरांतून बाहेर काढण्याचा हा पश्न नाहीं. स्वराज्य हें आमचें ध्येय आहे. राज्यकारभाराच्या यंत्रावर आम्हांस ताबा हवा आहे. केवळ कारकून म्हणून राहण्याची आमची इच्छा नाहीं. आज आम्ही केवळ कारकून, परकीय सरकारच्या हातांतील बाहुलीं आहोंत. आमच्यावर जुलूम करण्याचीं साधनें आम्ही बनलों आहों. तें सरकार आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें आमच्यावर राज्य करीत नाहीं, परंतु ही गोष्ट आम्हांस कळूं नये आणि आम्हीं अज्ञानी राहावें असे उपाय योजून तें सरकार राज्य करीत असतें. प्रो. सीले यांचें असेंच मत आहे. प्रत्येक इंग्रजाला हें माहीत आहे कीं, ते या देशांत केवळ मूठभर आहेत आणि म्हणून तुम्ही दुर्बल आहां आणि ते प्रबल आहेत, असा भ्रम तुम्हांमध्यें पसरविणें हा त्यांच्यापैकीं प्रत्येकाचा धंदा आहे. हेंच त्यांचें राजकारण. आम्हीं आजपर्यंत या धोरणाला बळी पडलों. नव्या पक्षाचें तुम्हांस असें सांगणें आहे कीं, तुमचें भवितव्य पूर्णपणें तुमच्याच हातीं आहे. जर स्वतंत्र होण्याची तुमची इच्छा असेल तर तुम्ही स्वतंत्र होऊं शकाल. जर स्वतंत्र होण्याची तुम्हांस इच्छा नसेल तर खालीं पडाल व तसेच अखेरपर्यंत पडून रहाल.

"तुम्ही इतके आहांत कीं, तुम्हांस शस्त्रांची गरज पडणार नाहीं. शस्त्रांचा प्रतिकार तुम्हांस अशक्य असला तरी स्वार्थत्याग आणि

संयम यांचा आश्रय करून या परकीय सरकारला आपल्यावर राज्य करण्यास सहाय्य न करण्याइतकें बलही तुमच्यापाशीं नाहीं काय? हाच बहिष्कार होय आणि बहिष्कार हें राजकीय शस्त्र आहे असें जेव्हां आम्ही म्हणतों तेव्हां त्याचा हाच अर्थ असतो. त्यांना करवसुलीस आणि शांततारक्षणास मदत करणार नाहीं, सरहद्दीच्या पलीकडे किंवा हिंदुस्थानच्या बाहेर हिंदी रक्तानें आणि पैशानें युद्धें चालविण्यास आम्ही सहाय्य करणार नाहीं. न्यायदानासही आम्ही सहाय्य करणार नाहीं. आम्ही आमचीं न्यायासनें स्थापन करूं आणि योग्य वेळ आली म्हणजे आम्ही करहि देणार नाहीं, हें तुम्हांस आपल्या संघटित प्रयत्नांनीं करणें शक्य आहे काय? जर असेल तर तुम्ही उद्यांपासून स्वतंत्रच आहांत."

१९०७ सालीं बहिष्कार-योगाचें हें विवेचन केल्यानंतर त्याच सालीं राष्ट्रसभा सुरत येथील अधिवेशनांत दुभंगली, आणि हा बहिष्कारवादी राष्ट्रीय पक्ष तिच्यांतून बाहेर पडला. यानंतर १९०८ ते १४ पर्यंत लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगांत होते, ते सुटून आल्यानंतर पुनः राष्ट्रसभेंत यावेत या उद्देशानें नामदार गोखले यांनीं १९१४ सालीं टिळकांशीं समेटाचीं बोलणीं केलीं. परंतु आम्ही सरकारवरील बहिष्काराचें आपलें तत्त्व कायमचें सोडून देण्यास तयार नाहीं आणि प्रागतिक राष्ट्रसभेचें ध्येय व धोरण मान्य करून आम्ही तिच्यांत शिरलों तरी आमच्या पक्षाचें बहुमत केल्यानंतर आम्ही आमच्या धोरणावर राष्ट्रसभेला खेंचून आणूं असें टिळकांनीं गोखले यांना सांगितलें. यामुळें गोखले यांनीं समेटाचें हें बोलणें एक वर्षभर लांबणीस टाकावें असें पत्र राष्ट्रसभेचे १९१४ सालचे अध्यक्ष भूपेंद्रनाथ बसू याना लिहिलें. यानंतर १९१५ सालीं नामदार गोखले आणि सर फिरोजशहा मेहता हे दोनहि प्रागतिक पुढारी निधन पावले आणि त्या सालीं डिसेंबर महिन्यांत राष्ट्रसभेनें समेटाचा ठराव मंजूर केला. १९१६ पासून, लोकमान्य टिळक व त्यांचा राष्ट्रीय पक्ष राष्ट्रसभेंत शिरला आणि त्याचें बहुमत होतां क्षणींच प्रागतिक पक्ष १९१८ सालापासून राष्ट्रसभा सोडून बाहेर पडला. यानंतर १९२० सालीं

लोकमान्य टिळक हे निधन पावून राष्ट्रसभेचें नेतृत्व महात्मा गांधींच्याकडे जाईपर्यंत तिचें नेतृत्व लोकमान्य टिळकांच्याकडेच होतें. १९१८ सालीं श्रीमती अवंतिकाबाई गोखले यांनीं महात्मा गांधींचें चरित्र लिहिलें त्याला लोकमान्य टिळकांनीं प्रस्तावना लिहिली. या प्रस्तावनेंत त्यांनीं गांधीजींनीं शोधून काढलेल्या साधनाचा निःशस्त्र प्रतिकार व अडवणूक या शब्दांनीं उल्लेख केला असून अनेक क्लेश सोसून महात्मा गांधींनीं आपल्या तपश्चर्येनें व आत्मबलानें तें आतां शास्त्रपूत बनविलें असें म्हटलें आहे. यानंतर त्यांनीं अनेकवार गांधीजींच्या सत्याग्रहासंबंधीं असेच प्रशंसेचे उद्गार काढले असून आपल्या राष्ट्रीय पक्षानें त्यांना शक्य तें सहाय्य करावें असें म्हटलें आहे. रौलेट अॅक्टाविरुद्ध जी सत्याग्रहाची मोहीम महात्मा गांधींनीं हिंदुस्थानांत केली ती चालू असतां लोकमान्य टिळक विलायतेंत होते तरीही त्यांनीं मुंबईचे त्यांचे एक शिष्य डॉ. साठये यांना पत्र लिहून महात्मा गांधींना सहाय्य करणें हें आपलें कर्तव्य आहे आणि आजच्या परिस्थितींत तेच कांहीं तरी करूं शकतील हें ओळखून त्यांना आपण पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे असें कळविलें. यानंतर विलायतेहून परत आल्यानंतर थोड्याच दिवसांत अमृतसर काँग्रेस झाली आणि त्यानंतर लोकमान्य टिळक १ ऑगस्ट १९२० रोजीं निधन पावले. या वेळीं महात्मा गांधींनीं आपल्या अनत्याचारी असहकाराची घोषणा केलेली होती आणि त्याच वर्षी सप्टेंबर महिन्यांत गांधीजींचा अनत्याचारी असहकाराचा ठराव कलकत्त्यास भरलेल्या जादा अधिवेशनांत प्रचंड बहुमतानें मंजूर झाला. या वेळपासून महात्मा गांधी हे राष्ट्रसभेचे नेते बनले.

अशा अवस्थेंत राष्ट्रसभा असतां गांधीजींनीं तिचें नेतृत्व स्वीकारून १९२९ च्या डिसेंबर महिन्यांत तिचें पूर्वीचें ध्येय बदलून "शांततेच्या व न्याय्य साधनांनीं स्वराज्यसंपादन" असें तिचें नवें ध्येय जाहीर केलें. या वेळपासून गांधीजींनीं तिला सत्याग्रही दीक्षा देण्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्न पूर्णपणें यशस्वी झाला नाहीं. गांधीजींनीं निधनापूर्वी थोडेच तास राष्ट्रसभेची नवी घटना कशी असावी, या-

संबंधीं जो एक मसुदा राष्ट्रसभेच्या चिटणिसाकडे दिला, त्यांतील तत्त्व-दृष्ट्या महत्त्वाचा भाग या प्रकरणाच्या शिरोभागीं दिलेला आहे, त्यांत गांधीजींनीं प्रथमच जें विधान केलें आहे तें असें: "Though split into two, India has attained political indenpendence through means devised by the Indian National Congress." म्हणजे हिंदुस्थान आज द्विखंड बनला असला तरी तो राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाला आहे. आणि हें राजकीय स्वातंत्र्य त्याला राष्ट्रसभेनें शोधून काढलेल्या साधनांनीं (Through means devised by the Indian National Congress) प्राप्त झालें, असें म्हटलें आहे. यांत राष्ट्रसभेनें योजिलेलीं साधनेंहीं तिनेंच शोधून काढलेलीं आहेत, असें गांधीजी म्हणतात. त्यांत एक महत्त्वाचा मुद्दा आहे. या साधनांचें वर्णन ते सत्याग्रह अथवा सत्य व अहिंसा या शब्दांनीं करीत नाहींत आणि तिनें योजिलेलीं साधनें आपण स्वतः शोधून काढलीं असेंही महात्मा गांधी म्हणत नाहींत. आपल्या सत्याग्रही साधनाचा सर्वस्वीं स्वीकार तिला करतां आला नाहीं आणि म्हणून तिनें सत्याग्रही तत्त्वज्ञान व साधनें यांचा शक्य तितका उपयोग करून स्वतःचीं साधनें बनविलीं. आणि त्या साधनांनीं द्विखंड हिंदुस्थानचें राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें असें त्यांना दिग्दर्शित करावयाचें आहे. या शब्दरचनेवरून असें म्हणतां येईल कीं, राष्ट्र-सभेनें सत्याग्रहानें स्वराज्य मिळविलें असें म्हणण्याची गांधीजींची इच्छा नव्हती. राष्ट्रसभा ही निःशस्त्र क्रांतिवादी बनली, तिनें सरकारची अडवणूक केली आणि सरकारवर बहिष्कार घालण्याचा प्रयोग करून आजचें स्वातंत्र्य मिळविलें असें म्हणतां येईल. आमच्या मतें लोक-मान्य टिळकांचा बहिष्कार-योग आणि महात्मा गांधींचा अनत्याचारी असहकार योग यांत जर मनोवृत्तीचा भेद केला तर राष्ट्रसभेनें ज्या साधनांचा उपयोग करून देशाला स्वतंत्र केलें, तीं साधनें बहिष्कार-योगांतच बसूं शकतील. प्रतिपक्षासंबंधींची पूर्ण अद्वेषाची, किंबहुना प्रतिपक्षाच्या उद्धाराची प्रेमभावना धारण करणें हा जर सत्याग्रह-निष्ठेचा आधार मानिला तर ही निष्ठा राष्ट्रसभेनें आत्मसात् केली

नाहीं असें म्हणणें भाग आहे. गांधीजींनीं तिच्यापुढें सुमारें तीस वर्षें तो आदर्श ठेविला तरीहि अद्यापि तिनें तो आत्मसात् केलेला नाहीं. टिळकांचा बहिष्कार-योग आणि महात्मा गांधींचा सत्याग्रह यांचें वरकरणी स्वरूप एकच असलें तरी महात्मा गांधी सत्यनिष्ठा आणि अहिंसा-वृत्ति यांबद्दल जितका आग्रह धरीत असत तितका आग्रह टिळक धरीत नव्हते. परिणामदृष्टीनें विचार केल्यास सत्यनिष्ठेच्या व अहिंसेच्या दृष्टीनें राष्ट्रसभेच्या राजकारणाची पातळी टिळकांच्या बहिष्कार-योगाच्या पलीकडे फारशी गेलेली नाहीं. तरीही हा बहिष्कार-योग राष्ट्रसभेला आचरण्याचें जें सामर्थ्य लाभलें तें सामर्थ्य तिच्या अंगीं येण्यास आणि तिचें प्रतिपक्षाच्या अत्याचारी हल्ल्यापासून संरक्षण होऊन तिच्या सामर्थ्याचें संवर्धन होण्यास महात्मा गांधींच्या सत्याग्रही निष्ठेचा अत्यंत उपयोग झालेला आहे. महात्मा गांधी यांच्यासारखे शुद्ध सत्याग्रही नेते तिला लाभले, म्हणूनच तिला टिळकांचा बहिष्कार-योग तरी मूर्त स्वरूपास आणतां आला आणि ब्रिटिश साम्राज्यसरकारची यशस्वी अडवणूक करून त्याच्याकडून अखिल हिंदुस्थानला म्हणजे त्याच्या दोनही विभागांना संपूर्ण स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय आणि लोकशाही हे हक्क मिळवून देतां आले. या दृष्टीनें विचार केल्यास गांधीयुगांत राष्ट्रसभेनें जें राजकारण प्रत्यक्ष आचरिलें तें टिळकांच्या बहिष्कार-योगाचेंच राजकारण होतें व त्या साधनानें टिळकांचें ध्येय तिनें आज हस्तगत करून हिंदुस्थान दुभंगला असला तरी त्याच्या सर्व विभागांतून ब्रिटिश सत्तेला आपला पाय काढून घ्यावयास लाविलें आहे. गांधीयुगांतील राष्ट्रसभेच्या राजकारणाचें राष्ट्रीय स्वरूप अशा प्रकारें निवेदन करतां येईल असें आम्हांस वाटतें. तिच्या राजकारणांतील गांधीयुग आज संपलें असून आज नेहरूयुग सुरू झालें आहे. लोकमान्य टिळकांनीं मृत्यूपूर्वी राष्ट्रसभेत राजकीय दृष्ट्या यापुढें गांधीयुग सुरू होईल हें ओळखिलें होतें. आणि गांधींनींही आपल्यानंतर राष्ट्रसभेत नेहरूयुग सुरू होईल हें आपल्या बुद्धीनें आकलन केलें होतें; असें असलें तरी त्यांची राष्ट्रसभेच्या भावी स्वरूपासंबंधींची योजना अद्यापि

तरी राष्ट्रसभेनें आत्मसात् केली आहे किंवा तिला तसें करतां आलें आहे, असें आम्ही म्हणूं शकत नाहीं.

राष्ट्रसभेचें भवितव्य

राष्ट्रसभेची सध्यांची घटना विसर्जन करावी आणि तिचें एका लोक-सेवक संघांत रूपांतर करावें या त्यांच्या कल्पनेचा आतां थोडा-अधिक विचार आपण केला पाहिजे. राष्ट्रसभा जेव्हां स्थापन झाली तेव्हां हिंदुस्थानांत जो राज्यकारभार चालू होता त्यांत लोकांना आपले प्रतिनिधि निवडण्यास व राज्यकारभारावर नियंत्रण चालविण्यास मुळींच अवसर नव्हता. कायदेमंडळांत त्या वेळीं लोकनियुक्त सभासदही नव्हते. अशा वेळीं राष्ट्रसभा लोकांचीं गाऱ्हाणीं अनियंत्रित सत्ताधारी राज्यकर्त्यांपुढें मांडण्यासाठीं स्थापन झाली. ही राष्ट्रसभा देशांतील सर्व लोकांची प्रतिनिधि सभा व्हावी अशी त्या वेळची कल्पना होती. राष्ट्रसभा हें एक हिंदी लोकांचें पार्लमेंटच आहे असेंही त्या वेळीं कांहीं लोक म्हणत असत. राष्ट्रसभा हा जनतेंतील अनेक पक्षांपैकीं एक पक्ष न बनतां जनतेच्या वतीनें राजकारण करूं पाहणारी परंतु सर्व पक्षांचा समावेश करणारी अशी ती एक राष्ट्रीय संस्था असावी अशी त्या वेळीं कांहींची कल्पना होती. ती वर्षभर सतत काम करणारी संस्था नव्हती. वर्षांतून एकदां जमून राष्ट्रीय प्रश्नासंबंधीं लोकांचें मत व्यक्त करणारी ही संस्था हळूहळू जनतेंत जागृति व प्रचार करणारी संस्था बनूं लागली. राज्यकारभारांतील विशिष्ट प्रश्नांवर मत व्यक्त करणें, त्यांत सुधारणा सुचविणें, याचबरोबर देशांतील राज्ययंत्रावर लोकांच्या प्रतिनिधींचा ताबा सुरू व्हावा अशी मागणी ती करीत असे. या मागणीला १९०५ नंतर स्वराज्याच्या मागणीचें स्वरूप प्राप्त झालें आणि पुढें ही मागणी मिळेपर्यंत सरकारशीं सतत झगडा चालविणारी परंतु हा झगडा कायदेशीर चळवळीच्या रूपानें चालविणारी ही संस्था बनूं लागली. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार हीं राष्ट्रसभेचीं स्वराज्य-प्राप्तीचीं तीन साधनें म्हणून पुढें करण्यांत आलीं आणि तेव्हांपासून राष्ट्रसभेला एक विधायक कार्यक्रम असावा ही कल्पना पुढें आली; पण

ही विधायक कार्यक्रमाची कल्पना गांधीयुगापूर्वी मुळींच अमलात आली नव्हती. तिला गांधीयुगांत विधायक कार्याचें अंग जोडण्यांत आलें. हिंदु-मुसलमान ऐक्य, अस्पृश्यता-निवारण, खादी, ग्रामोद्योग, इत्यादि विधायक लोकसेवेचीं कार्यें राष्ट्रसभेच्या कार्याचें एक प्रमुख अंग बनलें पाहिजे असा महात्मा गांधींचा आग्रह होता. १९२० सालापासून महात्मा गांधींनीं राष्ट्रसभेंत जें नवें युग सुरू केलें त्या युगांत हें विधायक लोकसेवेचें अंग आणि सत्याग्रह या द्विविध कार्यक्रमांना गांधींनीं जोरांत चालना दिली.

टिळकांच्या वेळीं वर्षभर चळवळ करणारी संस्था असें स्वरूप तिला प्राप्त व्हावें असाच प्रयत्न होत होता. आतां ती एक जनतेची विधायक लोकसेवा करणारी संस्था बनावी आणि तिच्या शाखा खेडोपाडीं पसराव्यात ही कल्पना गांधींनीं पुढें मांडली. तथापि या विधायक कार्यासाठीं त्यांनीं हळूहळू अखिल भारतीय चरखा-संघ, हरिजन-सेवक-संघ, ग्रामोद्योग संघ, हिंदुस्थानी तालीमी संघ, गो-सेवा-संघ, इत्यादि निराळ्या संस्था राष्ट्रसभेच्या विधायक कार्यासाठीं स्थापन केल्या. राष्ट्रसभेचें नित्याचें कार्य लोकजागृति करणें, प्रचार करणें, निवडणुकी लढविणें आणि कायदेमंडळांत जाऊन जनतेच्या वतीनें परकीय सरकारशीं झगडा करणें, असेंच बराच काळ राहिलें. म. गांधींना हें प्रातिनिधिक संस्थांतील अडवणुकीचें राजकारण प्रत्यक्ष राष्ट्रसभेनें आपल्या नांवानें करूं नये असेंच वाटत होतें. हें कार्य राष्ट्रसभेनें अंगावर घेतलें म्हणजे तिला देशांतील राज्ययंत्र आपल्या ताब्यांत घेऊं इच्छिणाऱ्या अनेक पक्षांपैकीं एक पक्ष असें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य होतें. प्रथम कांहीं काळ त्यांनीं राष्ट्रसभेनें अनत्याचारी असहकाराचा अवलंब करून कायदेमंडळावर बहिष्कार घालावा असाच उपदेश केला. या उपदेशास अनुसरून १९२० पासून २३ पर्यंत राष्ट्रसभेनें हें धोरण स्वीकारिलें. परंतु १९२३ सालापासून तिच्यामध्यें एक स्वराज्यपक्ष स्थापन होऊन त्यानें स्वतःच्या नांवानें कायदेमंडळांतील अडवणुकीचें कार्य सुरू केलें. या वेळीं म. गांधी तुरुंगांत होते. त्यानंतर १९२४ सालीं ते सुटून आले आणि त्यांनीं १९३० सालापर्यंत स्वतःस विधायक

कार्याची संघटना करण्यास वाहून घेतलें व पं. मोतिलाल नेहरू यांच्याकडे स्वराज्यपक्षाचें राजकारण सोंपविलें. राष्ट्रसभेच्या सामान्य कार्यकर्त्यांनीं विधायक लोकसेवेचें कार्य सतत वर्षभर करीत राहावें आणि स्वराज्यपक्षाचा कौन्सिलांतील अडवणुकीचा व घटनाभंगाचा प्रयोग संपल्यानंतर तो सत्याग्रह करण्यासाठीं बाहेर पडेल तोंपर्यंत विधायक कार्याच्या रूपानें जनतेची संघटना राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांनीं मजबूत करावी आणि योग्य वेळीं दोनही पक्षांनीं प्रत्यक्ष प्रतिकाराचा अहिंसक लढा सुरू करावा असें धोरण त्यांनीं १९२४ पासून १९३० पर्यंतच्या काळांत राष्ट्रसभेला लावून दिलें.

१९३० सालानंतर १९३४ सालापर्यंत स्वातंत्र्यसंग्रामाच्या दोन मोहिमा झाल्या. या काळांत सत्याग्रह चालू होता आणि राष्ट्रसभेनें कायदेमंडळावर बहिष्कार घातलेला होता. १९३५ सालापासून राष्ट्रसभेनें कायदेमंडळावरील बहिष्कार काढून घेऊन स्वतःच्या नांवानें निवडणुकी लढविण्याचें धोरण स्वीकारलें. १९३७ पासून १९३९ पर्यंत राष्ट्रसभेनें प्रांतिक स्वराज्य आपल्या ताब्यांत घेऊन आठ प्रांतांत स्वतःच्या नांवानें राज्यकारभार सुरू केला. या वेळीं देशांतील अनेक पक्षांपैकीं एक पक्ष असें स्वरूप तिला प्राप्त झालें असें म्हणतां येईल. तरीही हा प्रांतिक स्वराज्याचा कारभार यशस्वी रीतीनें चालविणें हें तिचें खरें ध्येय नसून १९३५ सालची राज्यघटना मोडून पुनः सत्याग्रहाचा संग्राम करावयाचा आणि देशाला स्वातंत्र्य आणि स्वयंनिर्णय हे हक्क प्राप्त करून घ्यावयाचे हें तिचें ध्येय होतें. या ध्येयाच्या प्राप्तीचें एक साधन म्हणूनच तिनें हीं प्रांतिक स्वराज्यें काबीज करण्याचा प्रयत्न केला होता. सर्व स्वातंत्र्यवादी पक्षाचा तिला या कामीं पाठिंबा होता. असें असल्यामुळें ती राष्ट्राच्या वतीनें स्वातंत्र्याचा झगडा करणारी एक राष्ट्रीय संस्था आहे हें तिचें स्वरूप नष्ट झालें नव्हतें. तसेंच तिच्यामध्यें तिचें ध्येय मान्य असणाऱ्या व्यक्तींना तिच्या ध्येयास व शिस्तीस धरून आपले पोटपक्ष स्थापन करण्याची मुभा ठेविलेली होती. यामुळें राष्ट्रीय सभा हा एक पक्ष नसून ती स्वातंत्र्याचा झगडा चालविणारी राष्ट्रीय संस्था आहे हें तिचें स्वरूप

कायम होतें. तिचे टीकाकार तिला जरी एकपक्षीय संस्था अथवा एकपक्षीय अनियंत्रित सत्ता स्थापूं इच्छिणारी संस्था असें म्हणत असत, तथापि तिला तसें स्वरूप देऊं नये व तिच्यांत पोटपक्ष स्थापन करण्यास मुभा असावी अशी घटना महात्मा गांधींनीं अखेरपर्यंत आग्रहपूर्वक कायम ठेविली. १९३५ सालापासून तिच्यामध्यें एक समाजवादी पक्ष स्थापन होऊन तो वाढत गेला. १९४२ च्या लढ्यांत या पक्षाच्या लोकांनीं बरेंच महत्त्वाचें काम केलें. यानंतर १९४५ सालीं राष्ट्रसभेचे पुढारी सुटून आल्यापासून अनेकांनीं समाजवादी पुढाऱ्यांना आपला पक्ष विसर्जन करण्याचा अथवा राष्ट्रसभा सोडून बाहेर जाण्याचा उपदेश करण्यास आरंभ केला, परंतु महात्मा गांधींनीं राष्ट्रसभेला असें एकपक्षीय होऊं देऊं नये असेंच आपलें धोरण शेवटपर्यंत ठेविलें. राष्ट्रसभेंत या वेळीं नवे समाजवादी पुढारी आणि जुने पुढारी यांच्यांत मतभेद होऊं लागले होते. या दोन पक्षांत एकजूट रहावी आणि जुन्यानव्यांच्या मिलाफानें राष्ट्रसभेचें कार्य पुढें चालावें अशी त्यांची इच्छा होती. १९४६ सालीं पंडित जवाहरलाल नेहरू यांना महात्मा गांधींनीं अध्यक्षपद दिलें आणि पंडितजींनीं आपल्या कार्यकारिणींत नव्या लोकांचा अधिक भरणा केला. पंडितजींचें हें धोरण जुन्या लोकांना पसंत पडलें नाहीं. तेव्हां गांधीजींनीं त्यासंबंधीं आपलें मत १४ जुलै १९४६ च्या 'हरिजन' च्या अंकांत पुढीलप्रमाणें विशद केलें :

"To those, to whom the change may give cause for mis-givings, I would say that Pandit Javaharlal Nehru himself makes a fine and stable bridge between the old and the new, assisted as he will be by some of the oldest members of the old team. No one need therefore entertain any fear of a break with the past. A healthy circulation is as necessary for the body-politic as for the individual.

पंडित नेहरू हे जुन्या आणि नव्या पुढाऱ्यांचा सांधा जुळवून देतील आणि जुन्या-नव्याची सांखळी न तोडतां राष्ट्रसभेमध्यें नवी शक्ति सामावून घेतील आणि राष्ट्राचा रथ पुढें नेतील अशी या वेळीं महात्मा गांधींची कल्पना असल्याचें स्पष्ट होतें.

दुर्दैवानें यानंतर पंडित जहाहरलाल नेहरू हे हंगामी राष्ट्रीय सरकारचे पंतप्रधान बनले आणि त्यांनीं राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, तरीही समाजवादी पक्ष कार्यकारिणीमध्यें ठेवावा असेंच धोरण आंखण्यांत आलें होतें आणि साथी जयप्रकाश नारायण हेही या वेळीं कार्यकारिणींत सामील झाले. या वेळीं आचार्य कृपलानी हे राष्ट्रसभेचे अध्यक्ष झाले आणि त्यांनीं पंडित नेहरू यांची कार्यकारिणी बदलून घेऊन नवी कार्यकारिणी बनविली आणि तींत जुन्या पक्षाचें बहुमत करून घेतलें. पुढें जेव्हां १९४७ च्या अखेरीस आचार्य कृपलानी यांनीं राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, तेव्हां आचार्य नरेंद्र देव किंबहुना साथी जयप्रकाश यांना राष्ट्रसभेचें अध्यक्षपद द्यावें असा सल्ला पंडित जवाहरलाल नेहरू व महात्मा गांधी यांनीं राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीला दिला. परंतु हा सल्ला राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीला पसंत पडला नाहीं आणि जुन्या चाकोरींतून जाणारी राष्ट्रसभा हळूहळू नव्या समाजवादी दिशेनें चालू लागावी असें जें महात्मा गांधींना वाटत होतें तें घडून येण्याचा संभव दुरावला. यापूर्वी राष्ट्रसभा ही एकपक्षसंस्था बनविण्याचा विचार तिचे कांहीं पुढारी करीत होते. या त्या पुढाऱ्यांच्या विचारास उद्देशूनच महात्मा गांधींनीं राष्ट्रसभा ही जर एकपक्षसंस्था बनली किंवा तिचें रूपांतर घडून तिला पक्षयंत्राचें स्वरूप प्राप्त झालें तर ती त्या संस्थेची आत्महत्याच होईल, असे जळजळीत उद्‌गार ३ ऑगस्ट १९४७ च्या 'हरिजनां'त त्यांनीं काढले. हाच उतारा आम्हीं या प्रकरणाच्या मथळ्यावर दिलेला आहे. त्यावरून राष्ट्रसभेला राज्ययंत्र काबीज करणाऱ्या एकपक्षसंस्थेचें स्वरूप प्राप्त होऊं नये याबद्दल त्यांचा किती आग्रह होता तें बरोबर दिसून येतें.

महात्मा गांधींनीं राष्ट्रसभेच्या भावी स्वरूपासंबंधीं जे विचार

प्रकट केले ते या उताऱ्याच्या खालीं आम्हीं दिलेले आहेत. त्यांत राष्ट्रसभेची आजची संघटना पूर्णपणें विसर्जन करावी व तिला एक लोक-सेवक संघाचें स्वरूप द्यावें असें महात्मा गांधींनीं सुचविलें आहे. आतां राष्ट्र स्वतंत्र झालें, परकीय सत्तेपासून राष्ट्राची मुक्तता करून या देशांत लोकशाही राज्याची स्थापना करण्यांत राष्ट्रसभा यशस्वी झाली. यापुढें निवडणुकी लढवून देशांतील लोकशाही राज्य आपल्या ताब्यांत घेणारे निरनिराळे पक्ष अस्तित्वांत येतील. अशा निरनिराळ्या पक्षांपैकीं आपलाच एक पक्ष सर्व राष्ट्राचा प्रतिनिधि आहे असें राष्ट्रसभेला म्हणतां येणार नाहीं. ती असा मिथ्या दावा करून जर इतर पक्षांशीं सत्तासंपादनासाठीं स्पर्धा करूं लागली तर तिला कांहीं काळ त्या कामीं यश आलें तरी तिची आत्महत्याच होईल असें गांधींजींचें मत होतें. लोकशाही राज्यांत अनेक पक्ष निर्माण होतात आणि ते लोकांचीं मतें मिळवून बहुमतानें निवडून येण्याचा व देशावर राज्य करण्याचा प्रयत्न करीत असतात. असा प्रयत्न राष्ट्रसभेनेंही आपल्या नांवानें सुरू केल्यास त्यांत तिला यश आलें तरी तीं तिची आत्महत्याच ठरेल असें महात्मा गांधींचें म्हणणें होतें. म्हणून राष्ट्रसभेनें या सत्तास्पर्धेच्या राजकारणापासून अलिप्त राहावें आणि केवळ विधायक लोकसेवा करीत राहून पक्षातीत राजकारण सत्याग्रह निष्ठेनें करीत राहावें अशीच त्यांची कल्पना दिसते. राष्ट्रसभेचें असें लोक सेवक संघांत रूपांतर झाल्यास तिला सर्वच राजकारणापासून दूर राहावें लागेल ही कल्पना चुकीची आहे. लोकशाही राज्ययंत्र यशस्वी रीतीनें चालावयाचें तर जनतेमध्यें एक पक्षातीत राजकारण करणारा लोक-सेवक संघ सत्याग्रही निष्ठेनें सतत कार्य करीत राहील तर हें राज्ययंत्र अधिकाधिक शुद्ध आणि सुस्थिर बनत जाईल. राज्ययंत्राची सत्ता आपल्या हातीं न घेतां जनतेला आपल्या राष्ट्रीय हक्कांची सतत जाणीव करून देऊन त्यासाठीं दक्ष राहाण्यास शिकविणारे आणि केवळ सेवाबलानें जनतेचें मार्गदर्शन करण्याचा अधिकार आणूं पाहणारे लोकसेवक जर खेडोपाडीं पसरले तर त्यांच्या लोकसेवेनें, त्यागानें आणि राजकीय जागृतीनें जनता आपल्या मूलभूत राष्ट्रीय हक्कांसंबंधीं दक्ष राहील आणि कोणत्याही

पक्षाच्या मंत्र्यांनीं या मूलभूत राष्ट्रीय हक्कांवर गदा आणली अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारें लोकशाही राज्ययंत्रास धक्का लाविला तर या जुलमाचा प्रतिकार अवश्य तर सत्याग्रहानें करण्याचेंही सामर्थ्य जनतेच्या अंगीं असा लोक-सेवक संघ सतत कायम ठेवूं शकेल. मात्र या लोक-सेवक संघानें सत्तासंपादनाच्या स्पर्धामय पक्षनिष्ठ राजकारणापासून अलिप्त राहिलें पाहिजे, असा म. गांधींचा विचार दिसतो. राष्ट्रसभेंतील ज्यांना पक्षीय राजकारण करावयाचें असेल त्यांनीं स्वतःच्या नेतृत्वाखालीं आपापल्या राजकीय मतानुसार निरनिराळे पक्ष स्थापन करावे. परंतु खुद्द राष्ट्रसभेनें यापुढें या पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहावें आणि त्यांपैकीं कोणत्याही पक्षास आपणास कायमचें बांधून घेऊं नये. लोकशाहीच्या संरक्षणास, संवर्धनास आणि तिच्या शुद्धीकरणास अशा पक्षातीत राजकारण करणाऱ्या लोक-सेवक संघाची आवश्यकता असून हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर राष्ट्रसभेनें आपलें रूपान्तर अशा लोक-सेवक संघांत करावें अशी गांधींचीही कल्पना आहे.

ही कल्पना गांधींनीं नव्यानेंच व्यक्त केलेली नाहीं. १९३१ सालीं गांधी-आयर्विन करार झाला त्या वेळीं ही कल्पना त्यांनीं पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यापुढें मांडिली होती आणि १९२४ सालीं पंडित मोतीलाल नेहरू व देशबंधु चित्तरंजन दास यांनीं स्वराज्यपक्ष स्थापन केला, त्या वेळीं त्यांस विरोध करतांनाही त्यांच्या डोक्यांत हीच कल्पना होती. गांधी-आयर्विन कराराच्या वेळीं सिमल्यास असतांना आपणांपुढें गांधींनीं वरील कल्पना मांडली असें पंडित नेहरू लिहितात. "या वेळीं आम्हीं भूतकालीन, वर्तमानकालीन विशेषतः भविष्यकालीन पुष्कळ गोष्टींसंबंधीं बोलत असूं. काँग्रेसच्या भवितव्यासंबंधीं त्यांची कल्पना त्यांनीं एकदां माझ्यापुढें मांडिली तेव्हां मी आश्चर्यचकितच झालों, हें मला बरोबर आठवतें. माझी अशी कल्पना होती कीं, स्वातंत्र्य मिळालें कीं काँग्रेस आपोआपच नाहींशी होईल. त्यांना असें वाटत होतें कीं, काँग्रेस कायम टिकावी, पण ती एका शर्तीवर कायम रहावी. ती शर्त अशी कीं, तिच्या कोणत्याही सभासदानें सरकारांत नोकरी धरूं नये. आणि ज्याला असें अधिकारपद

स्वीकारावयाचें असेल, त्यानें तिच्या सभासदत्वाचा राजीनामा द्यावा. त्यांनीं ही कल्पना त्या वेळीं कशी विशद केली हें मला आतां आठवत नाहीं. पण या विचारसरणीच्या बुडाशीं अशी कल्पना आहे कीं, काँग्रेस ही पूर्ण अनासक्त, अलिप्त आणि स्वतःचा स्वार्थ न ठेवणारी बनेल, तर सरकारच्या अमलबजावणीच्या अंगावर व त्याच्या इतर सर्व अंगांवर तिचा प्रचंड नैतिक प्रभाव चालू शकेल आणि त्यामुळें राज्ययंत्र योग्य मार्गानेंच चालत राहील. त्यापासून तें भ्रष्ट होणार नाहीं.

"ही कल्पना आकलन करण्यास मला बरीच कठीण भासते आणि या मार्गांत असंख्य अडचणी उभ्या असल्याचें दिसतें. मला असें वाटतें कीं, अशी संघटना अस्तित्वांत आली तरीही ती कांहीं हित-संबंधी वर्गांच्या हातीं जाण्याचा धोका दिसतो. पण व्यवहार्यतेचा हा मुद्दा थोडा दृष्टीआड केल्यास त्यांच्या विचारांची पार्श्वभूमि कळूं शकते. कांहीं विशिष्ट मतांस अनुसरून समाजाची घटना बनविण्याच्या दृष्टीनें राज्ययंत्र ताब्यांत घेण्यासाठीं पक्ष स्थापन करणाऱ्या आधुनिक विचारांशीं अगदीं विरोधी अशी ही कल्पना आहे. आजचे पक्ष मि. टॉनी यांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें 'अधिकांत अधिक गाढवांना अधिकांत अधिक गाजरें वांटण्यासाठीं असे निर्माण झालेले असतात." [1]

1 "We talked of many matters, of the past, of the present, and especially of the future. I remember how he surprised me with one of his ideas about the future of the congress. I had imagined that the congress as such, would automatically cease to exist with the coming of freedom. He thought that the congress should continue, but on one condition that it passed a self-denying ordinance, laying it down that none of its members could accept a paid job under the State and if any one wanted such a post of authority in the State, he would have to leave the congress. I do not at present remember how he worked this out, but the whole idea underlying it was

मि० टॉनी यांच्या शब्दांत बोलावयाचें तर अधिकांत अधिक गाढवांना अधिकांत अधिक गाजरें वाटणाऱ्या पक्षाचें स्वरूप राष्ट्रसभेला प्राप्त होऊं नये आणि पक्षातीत राहून निःस्वार्थबुद्धीनें आणि निःपक्षपाती भावनेनें लोकसेवा करणाऱ्या लोकसेवक संघाचें स्वरूप राष्ट्रसभेला प्राप्त व्हावें, ही गांधीजींची मनीषा जर आपण समजून घेतली, तर त्यांनीं राष्ट्रसभेच्या भवितव्यासंबंधीं आंखलेली योजना किती समर्पक आणि महत्त्वाची आहे त्याची योग्य कल्पना आपणांस येऊं शकेल. राष्ट्रीय सभा ही खरोखर राष्ट्रीयच राहावी आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही तिनें नष्ट होऊं नये हें गांधीजींचें मत आज पुष्कळांना पटत आहे, पण सत्तास्पर्धेच्या क्षेत्रांतून आपलें अंग काढून घेऊन तिचें लोकसेवक संघांत रूपांतर व्हावें हें त्यांचें मत अद्यापि लोकांना बरोबर आकलन होऊं शकत नाहीं.

---

that the congress by its detachment and having no axe to grind, could exercise tremendous moral pressure on the Executive as well on other departments of the government, and thus keep them on the right track.

"Now this is an extraordinary idea which I find it difficult to grasp and innumerable difficulties present themselves. It seems to me that such an assembly if it could be concieved, would be exploited by some vested interest. But practicality apart, it does help one to understand a little the background of Gandhiji's thought. It is the very opposite of the modern idea of a party which is built up to seize ths State power in order to refashion the political and economic structure according to certain preconcieved ideas; or that kind of party, found often enough nowadays whose function seems to be (to quote Mr. R. H. Tawny) to offer the largest possible number of carrots to the largest number of donkeys." P. 251–2.)

गांधीजींनीं सत्ताहीन व पक्षातीत राहून लोकसेवा व सत्याग्रही राजकारण करणाऱ्या लोकसेवक संघाची जी कल्पना राष्ट्रसभेपुढें ठेविली आहे, ती त्यांनीं लोकशाही राज्यमीमांसेंत व राज्यघटनेंत टाकिलेली एक महत्त्वाची भर आहे सामान्य जनतेचें आत्मबल जागृत, संघटित व प्रभावी बनल्यावांचून प्रजेचें खरें प्रभुत्व प्रस्थापित होणार नाहीं. लोकशाही राज्य आपल्या ताब्यांत घेऊन समाजांत सत्तेच्या जोरावर क्रांति घडवून आणणें अथवा क्रांतिकारक पक्षांना ठेचून काढून भांडवलशाहीसारख्या प्रतिगामी समाजघटना चिरंजीव करण्याचा प्रयत्न करणें, हे दोनही मार्ग अखेरीस प्रजेवर लष्करी पक्षसत्ता स्थापन करीत असतात. पहिल्या पक्षास यश आल्यास कम्यूनिस्ट पक्षाची लष्करशाही स्थापन होते व दुसरा पक्ष यशस्वी झाल्यास फॅसिस्ट पक्षाची हुकूमशाही निर्माण होते. या दोनही आपत्ति टाळण्यास एकच मार्ग गांधींना दिसत होता व तो म्हणजे राष्ट्रसभेनें सत्ता व संपत्ति यांच्यापासून अलिप्त राहून पक्षातीत वृत्तीनें लोकसेवा करणारा व निःपक्षपाती राजकारण करणारा एक सत्याग्रही लोकसेवक संघ स्थापन करावा अथवा स्वतःचें त्यांत रूपान्तर करून घ्यावें. असें तिनें केलें तर प्रजेचें राजनैतिक प्रभुत्व कायम राहून कोणत्याही पक्षाची हुकूमशाही तिच्यावर लादली जाणार नाहीं. मुलकी सत्तेवर लष्करी सत्तेचें आक्रमण टाळण्याचा लढा जिंकिल्यावांचून लोकशाही राज्य स्थापन होणार नाहीं, तें टिकणार नाहीं, आणि प्रजेचें प्रभुत्व प्रभावी होणार नाहीं. फॅसिझम आणि कम्यूनिझम् हे दोनही सांप्रदाय प्रजेच्या मुलकी सत्तेवर लष्करी सत्तेचें प्रभुत्व स्थापन करीत असतात. ही आपत्ति टाळावयाची तर राष्ट्रसभेनें लोकशाही राज्य टिकवून धरणाऱ्या आणि राष्ट्रिकांच्या मूलभूत हक्कांसाठीं झगडणाऱ्या सत्याग्रही लोकसेवक संघाचें स्वरूप धारण करावें हाच दादाभाई, रानडे, टिळक गोखले आणि गांधी यांची राष्ट्रसभा जिवंत ठेवण्याचा व तिचें वैभव वाढविण्याचा खरा मार्ग आहे. हा मार्ग न स्वीकारतां ती जर एका पक्षाचें निवडणूक-यंत्र बनली तर ती तिची आत्महत्याच होणार नाहीं काय ?

अशा प्रकारें महात्मा गांधींनीं राष्ट्रसभेचें नेतृत्व सुमारें तीस वर्षें करून तिला केवळ मतप्रदर्शनाचें व मतप्रचाराचें यंत्र असें जें स्वरूप प्राप्त झालें होतें, तें बदललें. तिला सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या व सर्व वर्गांच्या वतीनें परकीयांशीं लढणारी निःशस्त्र प्रतिकारी राष्ट्रीय संस्था बनवून राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवून दिलें आणि त्यानंतर तिनें विधायक लोकसेवेनें जनतेचें आत्मबल जागृत, संघटित व प्रभावी बनविण्यासाठीं सत्तास्पर्धेच्या राजकारणांतून मुक्त होऊन लोकशाही राज्यांतील सर्व पक्षांना आधारभूत व प्रजेच्या प्रभुत्वाला पोषक, साहाय्यक आणि मार्गदर्शक असें सत्याग्रही राजकारण करावें, आणि प्रजाधर्माचा इतका विकास करावा कीं, प्रजेवर कोणत्याही पक्षास आपली हुकूमशाही अथवा लष्करशाही गाजवितां येऊं नये असा अखेरचा संदेश या थोर राष्ट्रीय संस्थेला दिला. हें थोर कार्य त्यांना करतां आलें याचें कारण कोणत्याही राज्यांतील अन्यायाचें निवारण करण्याचें एक नवें साधन त्यांनीं शोधून काढिलें आणि हिंदी राष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त होण्याच्या कामीं या साधनाचा उपयोग कसा करावा हें त्यांनीं दाखवून दिलें. सशस्त्र क्रांति व्यवहारतः अशक्य आहे आणि सनदशीर राजकारण व्यवहारतः निष्फळ आहे, हें ओळखणाऱ्या सर्व विचारवंत भारतीय नेत्यांना निःशस्त्र क्रांतीवांचून आपणांस तरणोपाय नाहीं हें बुद्धिदृष्ट्या पटलें होतें, पण या निःशस्त्र क्रांतीच्या मार्गावरून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रीय सभेला महात्मा गांधींनीं सत्याग्रही दृष्टि, सत्याग्रही वृत्ति आणि सत्याग्रही नेतृत्व यांचा लाभ घडविला नसता तर तिच्या अंगीं इतका दीर्घकाल याच एका मार्गानें निष्ठेनें, चिकाटीनें आणि धैर्यानें जाण्याचें सामर्थ्य येऊं शकलें नसतें. त्या आपल्या साधनावर अविचल श्रद्धा होती, "एषः पंथाः एतत्कर्म।" याच मार्गानें चला, हीं कामें करा, म्हणजे मी तुम्हांला तुमच्या ध्येयाची प्राप्ति करून देतों, अशी आत्मविश्वासाची वाणी बोलत, ते १९१५ जानेवारीस हिंदुस्थानांत आले आणि १९४८ सालच्या जानेवारीच्या ३० तारखेस त्यांचा घोर वध होईपर्यंत राष्ट्रसभेचें नेतृत्व करून तिला

राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून देऊन आणि पुढील कार्याचें मार्गदर्शन करून, ते आपला देह आणि आपले प्राण आपल्या ध्येयास अर्पण करून अंतर्धान पावले !

साधनशुद्धि आणि आत्मराज्य

महात्मा गांधींनीं हें जें राजकारण केलें, तें एक अपूर्व असें नवेंच राजकारण होतें व त्यामुळें त्याचें स्वरूप पुष्कळ बुद्धिमंतांना यथार्थ आकलन झालें नाहीं. हें नवें राजकारण त्यांना त्यांच्या धर्मनिष्ठ जीवनांतून स्फुरलें. आधुनिक युरोपांत व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, राजकीय लोकसत्ता आणि आर्थिक समाजसत्ता अशीं जीं राजकीय वा सामाजिक ध्येयें गेल्या तीन शतकांत उदय पावलीं, त्या सर्वांहून महात्मा गांधींची सत्याग्रही जीवननिष्ठा भिन्न आहे व ती त्या सर्वांहून श्रेष्ठही आहे. गांधींच्या सत्याग्रही निष्ठेंत व्यक्तिस्वातंत्र्य आहे, तें क्रांतिकारक व्यक्तिस्वातंत्र्यहि आहे, पण त्या व्यक्तिस्वातंत्र्याला स्वार्थापासून, अहंकारापासून आणि स्पर्धेपासून अलिप्त ठेवण्यांत आलें आहे. त्यांत सामाजिक समता, लोकसत्ता व समाजसत्ता यांचाही अंतर्भाव झालेला आहे, पण यांच्या प्राप्तीचें साधन अहिंसक क्रांति हें ठरविण्यांत आलें असल्यानें साधनशुद्धीचा सिद्धान्त त्यांत अंतर्भूत झालेला आहे.

राजकीय क्रांति हेंच आपलें ध्येय अथवा साध्य आहे असें महात्मा गांधींनीं केव्हांच प्रतिपादिलें नाहीं. फ्रेंच क्रांतीचें साध्य लोकशाही हें होतें आणि रशियांतील क्रांतीचें साध्य समाजसत्ता हें होतें, पण या दोनही क्रांतींत सशस्त्र साधनांचा व हिंसेचा उपयोग करण्यांत आल्यामुळें लोकांना खरी लोकशाही व खरा समाजवाद यांची प्राप्ति झाली नाहीं असें गांधीजींना वाटे. आपण जर सत्याग्रहनिष्ठेनें निःशस्त्र क्रांति यशस्वी केली, तर देशांत एकपक्षीय हुकूमशाही स्थापन होणार नाहीं आणि खरी लोकशाही व खरा समाजवाद स्थापन होईल अशी त्यांची श्रद्धा होती. याच बुद्धीनें ते सर्वांगीण अहिंसक क्रांतीचे प्रयत्न करीत असत. या अहिंसक क्रांतीच्या मार्गांत जसे परकीय राज्यकर्ते

आड येतात, तसेंच देशांतील धनिक व शोषक वर्गही आड येत आहेत हें त्यांना उघड दिसत होतें. १९३० सालीं ६ फेब्रुवारीच्या 'यंग इंडिया'च्या अंकांत ते लिहितात :

"The greatest obstacle in the path of non-violence is the presence in our midst of the indigenous interests that have sprung up from the British rule, the interests of monied men, speculators, scrip-holders, land-holders, factory-owners and the like. All these do not always realise that they are living on the blood of the masses, and when they do they become as callous as the British principals whose tools and agents they are. If like the Japanese Samurai they could but realise that they must give up their blood stained gains, the battle is won for non-violence."

म्हणजे आपल्या अहिंसक क्रांतीच्या मार्गांत जसा ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचा विरोध आडवा येतो, तसेंच ब्रिटिश सत्तेच्या आश्रयानें वाढलेले जमीनदार–कारखानदार इत्यादि धनिक वर्ग हे आड येत आहेत. हे सर्व वर्ग जनतेच्या रक्तशोषणावर जगत असून त्याची त्यांना जाणीवही पुष्कळ वेळां नसते, आणि जेव्हां ही जाणीव त्यांना होते तेव्हां ते ब्रिटिशांप्रमाणेंच जनतेच्या हितासंबंधीं बेगुमान बनतात. हे जे ब्रिटिशांचे हस्तक व गुमास्ते आहेत ते जपानमधील सामुराई वर्गाप्रमाणें जर जनतेच्या रक्तानें माखलेला आपला धनसंग्रह सोडून देण्यास तयार होतील तर अहिंसक क्रांतीचा विजय झालाच असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९३० सालीं स्वातंत्र्य-सत्याग्रह पुकारण्याच्या वेळीं त्यांनीं काढलेले हे जळजळीत उद्गार वाचले असतां आपली राजकीय क्रांति ही केवळ राजकीय उरणार नसून तिला सामाजिक व आर्थिक क्रांतीचें स्वरूप येणार आहे याची स्पष्ट जाणीव त्यांना असल्याचें आढळून येईल. १९४२ सालीं स्वातंत्र्याचा अखेरचा संग्राम

सुरू करण्याचे वेळीं तारीख २ ऑगस्टच्या 'हरिजना'च्या अंकांत संस्थानिकांना उद्देशून लिहिलेल्या लेखांत सर्व धनिक व वरिष्ठ वर्गाला उद्देशून त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत :—

"If the 'haves', who are in fact the pillars on which the mighty British power rests, can realise their obvious duty, the British power must yield. It was because I have despaired of response from the pillars, that I have thought of moving the masses on whom the pillars rest."

"देशांतील धनिक वर्ग व सत्ताधारी वर्ग हेच ब्रिटिश साम्राज्याचे आधारस्तंभ आहेत. जर या आधारस्तंभांनीं स्पष्ट दिसणारें आपलें कर्तव्य ओळखलें तर ब्रिटिश सत्ता शरणच येईल. परंतु हे आधारस्तंभ आपल्या हांकेस ओ देतील ही माझी आशा नष्ट झाल्यामुळें मी आतां या आधारस्तंभांखालीं असणारे पाटथर म्हणजे जी सामान्य जनता तिलाच हालवून लढ्यास आवाहन देत आहें." १९४२ सालीं जो लढा त्यांनीं संकल्पित केला होता तो त्यांच्या कल्पनेप्रमाणें जर खेडोपाडीं पसरला असता तर त्यातून शेतकरी वर्ग जमीनदारीच्या जमिनी आपल्या ताब्यांत घेईल आणि कांहीं काल देशांत वर्गयुद्ध व दंगल माजेल, पण ती फार काळ टिकणार नाहीं अशी त्यांची कल्पना असावी असें त्यांनीं लुई फिशर यांना दिलेल्या मुलाखतीवरून दिसून येते. लुई फिशर यांनीं A week with Gandhi या नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत गांधीजींनीं ती कल्पना स्पष्टपणें आपल्यापुढें मांडिली व त्या वेळीं पंडित जवाहरलाल नेहरू हेही हजर होते असें लिहिलें आहे. अशा तऱ्हेचें वर्गयुद्ध होऊं नये म्हणून धनिक-वर्गाला, आपली संपत्ति समाजाला अर्पण करून, समाजाचे केवळ निधिधारक बनूनच तिची व्यवस्था करूं लागावें असा उपदेश ते करीत असत. जर हा उपदेश त्यांनीं मानिला नाहीं तर अखेरीस श्रमिक वर्गाचें संघटन करून त्यांना अनत्याचारी असहकाराच्या मार्गानें एकवर्ग समाज स्थापन करण्याचें शिक्षण दिलें पाहिजे, असेंही त्यांनीं लिहिलें आहे. हा

वर्गलढ्याचा प्रश्न स्वतंत्र हिंदुस्थानांत अधिक निकरावर येणार आहे आणि त्याचें अनत्याचारी उत्तर शोधून काढून अनत्याचारी असहकाराच्या मार्गानें किंवा सत्याग्रही मार्गानें एकवर्ग समाज निर्माण केला नाहीं तर या देशांत राजसत्ता काबीज करणारे राजकीय पक्ष पुढें येऊन ते लोकशाही राज्य आणि सामान्य जनतेचें प्रभुत्व नष्ट करतील व देशांतील मुलकी सत्तेवर लष्करी सत्तेचें आक्रमण होईल अशी भीति गांधींजींना वाटत होती. या भीतीचें निवारण करण्याचा एकच एक मार्ग म्हणून महात्मा गांधींनीं, राष्ट्रसभेनें यापुढें सत्ता-स्पर्धेचें राजकारण सोडून द्यावें आणि आपलें रूपांतर लोकसेवक संघात करून केवळ सत्याग्रही राजकारण चालू ठेवावें, असा उपदेश राष्ट्रसभेला केला. परंतु अद्यापि इतकी सत्याग्रही निष्ठा राष्ट्रसभेंत निर्माण झाली आहे असें वाटत नाहीं.

सत्याग्रही राजकारणाचें वरील स्वरूप जर आपण समजून घेतलें तर राजकारण करूनही सत्याचीं व अहिंसेचीं शुद्ध साधनें मलिन न होऊं देण्याचें त्यांचें ध्येय राजकारणांत कसें व किती प्रमाणांत यशस्वी होणें शक्य आहे याची आपणांस कल्पना येऊं शकते. राज्यसंस्था चालविणारांना समाजरक्षणासाठीं हिंसेचा व कांहीं वेळां असत्या-चरणाचाही उपयोग करावा लागतो. मनुष्याला कसेंही करून स्वतःचे प्राण आणि वित्त यांचें रक्षण व्हावें अशी इच्छा असते. ही इच्छा सफल व्हावी म्हणूनच तो राज्यसंस्थेशीं राजानिष्ठ राहत असतो. स्वतःच्या प्राणावर प्रसंग येऊन बेतला असतां मनुष्य साधनशुद्धीचा सिद्धान्त निष्ठापूर्वक पाळूं शकत नाहीं. ही त्याची दुर्बलता नष्ट करून त्याला जीवित रक्षणाची व वित्तरक्षणाची हमी द्यावी यासाठीं राज्य-संस्था असावी, असें त्याला वाटत असतें. यामुळें राज्यसंस्थेला शस्त्रबलाचा आधार घेण्याचा व त्या आधारानें समाजरक्षण करण्याचा हक्क आहे किंवा तशी तिला सवलत आहे, असें सामान्य मनुष्य समजत असतो. या समाजसंरक्षक राज्यसंस्थेला साधनशुद्धीचा सिद्धान्त सर्वस्वी आचरितां येत नाहीं, असा अनुभव आल्यामुळेंच राजकारणांत सत्याचीं व अहिंसेचीं शुद्ध साधनें वापरून काम भागत

नाहीं असें मत प्रसार पावलेलें आहे. पण गांधीजींनीं जें सत्याग्रही राजकारण केलें तें प्रजेनें आपलें नैतिक बल संघटित करून उन्मार्गगामी राज्यसंस्थेला ताळ्यावर आणून सन्मार्गगामी करण्याचेंच प्रायः असल्यानें त्यांत अनत्याचारी असहकारानें यश मिळविण्यास पुष्कळच अवसर व संधि त्यांना मिळत गेली. म्हणूनच मागें अनेक ठिकाणीं आम्हीं असें म्हटलें आहे कीं, सत्याग्रही राजकारण हें प्रजाधर्मांतील राजकारण असून तें राजधर्मांतील सत्ताधाऱ्यांचें राजकारण नव्हे. राजदंड स्वतःच्या हातीं घेऊन जनतेला धाक व लोभ दाखवून तिचें रक्षण करणें हें त्याचें स्वरूप नसून राजसत्तेनें अन्याय केल्यास कोणत्याही भयास किंवा लोभास वश न होतां राजसत्तेशीं अनत्याचारी असहकार करून त्या राजसत्तेस ताळ्यावर आणणें हें त्याचें साध्य आहे. हें प्रजाधर्माचें राजकारण असेंच वाढत गेलें व जनतेच्या अंगीं शूराची अहिंसा निर्माण झाली, तर असा एक काळ येऊं शकेल कीं, ज्या वेळीं जनतेला आपलें संरक्षण करण्यासाठींही राजदंडाची आवश्यकता वाटणार नाहीं. ही एक मानव समाजाची आदर्श अवस्था असून हिलाच ते आत्मराज्य, रामराज्य किंवा परमेश्वरी राज्य असें नांव देतात. सत्याग्रही राजकारणाचें अंतिम ध्येय हें आत्मराज्यच आहे. त्यांत राजदंडाचा आश्रय करून समाजाचें धाकाच्या व लोभाच्या साहाय्यानें रक्षण करणें हें बसूं शकत नाहीं. म्हणून ज्या ज्या वेळीं राष्ट्रसभेनें राजदंड धारण केला, त्या त्या वेळीं तिला साधनशुद्धीचा सिद्धान्त सोडून द्यावा लागला. अर्थात् सत्याग्रही निष्ठेचा मूल आधारच अशा प्रकारें नष्ट झाल्यामुळें तिला त्या सत्याग्रही दृष्टीनें आपल्या धोरणाचें तात्त्विक समर्थनही करतां आलें नाहीं. १९३७ सालीं महात्मा गांधींनीं गांधी-सेवासंघाच्या सभासदांनीं प्रांतिक स्वराज्याचें नियंत्रण करण्याचें काम करणाऱ्या पार्लमेंटरी बोर्डांत, कायदे-मंडळांत व मंत्रिमंडळांत जावें असा निर्णय दिला होता. पण पुढें दोन वर्षें अनुभव घेतल्यानंतर त्यांनीं आपला हा प्रयोग अयशस्वी झाला असा नवा निर्णय दिला. पुनः १९४५ नंतर राष्ट्रसभेनें जेव्हां अधिकार-स्वीकार केला तेव्हां राष्ट्रसभेनें आतां "सत्य व अहिंसा" किंवा

"शांततेचीं व न्याय्य साधनें" हे शब्दही आपल्या ग्रीदांतून काढून टाकावेत असा उपदेश ते उघडपणें करूं लागले. तात्पर्य, राजदंड हातीं घेऊन राजकारण करणारांना साधनशुद्धीचा सिद्धान्त आचरतां येत नाहीं असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. राष्ट्रसभेला स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही राजदंड हातीं घेऊं इच्छिणाऱ्या राजकीय पक्षाचें स्वरूप प्राप्त होऊं नये व तिनें सत्तास्पर्धेपासून अलिप्त राहून केवळ सेवेचें व आत्मबलाचें राजकारणच करावें, असा त्यांचा आग्रह कां होता त्याचाही आतां उलगडा होऊं शकेल असें वाटतें. प्रजेचें राजनैतिक प्रभुत्व कायम ठेवणें, सर्वसामान्य राष्ट्रिक हक्क अबाधित राखणें आणि खरी लोकशाही प्रभावी करणें, या सर्व दृष्टींनीं राष्ट्रसभेला आज ना उद्यां अशा सत्याग्रही लोक-सेवक संघाचें स्वरूप येईल तरच तिचें पूर्ववैभव तिला प्राप्त होईल व महात्मा गांधींच्या राजकारणाचें चिरंतन स्मारक होऊं शकेल.

प्रजाधर्मांतील अहिंसेचें सापेक्ष स्वरूप

गांधीजी हे सत्याचा व अहिंसेचा निरपेक्ष व निरपवाद आदर्श पुढें ठेवून वर्तन करूं इच्छिणारे मुमुक्षु साधक आणि साक्षात्कारी संत होते. त्यांची सत्यनिष्ठा अविचल होती. आणि अहिंसावृत्ति ही जन्मभर पाळलेल्या निष्ठेनें व व्रतांनीं सुदृढ बनविलेली होती. या सत्याग्रही निष्ठेसाठीं चालविलेला अखंड यज्ञ असेंच त्यांनीं आपलें जीवन बनविलें होतें आणि जी गोष्ट आपण साध्य केली ती सर्व जनतेसही साध्य करणें अगदीं शक्य आहे असें ते मानीत. जनतेला आपल्या अंगच्या या अहिंसावृत्तीचा अथवा आत्मबलाचा साक्षात्कार घडवून देणें हेंच त्यांचें जीवितसाध्य होतें. या जीवितसाध्यास अनुरूप असेंच सत्याग्रही राजकारण त्यांनीं शोधून काढिलें व तें विशिष्ट प्रमाणांत यशस्वीही करून दाखविलें. पण सामान्य जनतेंत प्रकट झालेलें हें आत्मबल विशिष्ट कालींच चमकून गेलें व क्षणभर आपला प्रभाव पाडून पुनः अंतर्धान पावलें, असा अनुभव त्यांनीं चाळीसपन्नास वर्षें जें राजकारण केलें त्यावरून आपणांस दिसून येईल. आत्मबल ही शक्ति सत्यनिष्ठेच्या, निर्विकार प्रेमभावनेच्या आणि

अनासक्त सेवावृत्तीच्या रूपानें प्रत्येक मानवी अंतःकरणांत वसत असते व तोच परमेश्वर, परमात्मा अथवा परब्रह्म होय, हा सत्याग्रही राजकारणाचा मूळ आधार आहे. हें आत्मबल सामाजिक व्यवहारांवर प्रभावी होईल तर समाजधारणेला दंडप्रधान राजसत्तेची आवश्यकताच उरणार नाहीं. पण आज जनतेचें हें आत्मबल सुप्त आहे. यामुळें मनुष्य-समाजाला राजसत्तेचा आधार घेऊन समाजांत शांतता व शाश्वती स्थापन करावी लागते. समाजाचें आंतर व बाह्य शत्रूंपासून रक्षण करणें हें राज्यसंस्थेचें नियोजित ध्येय आहे. या नियोजित ध्येयानुसार पूर्णपणें चालणारी अशी राज्यपद्धति व राज्यसंस्था अद्यापि निर्माण झालेली नाहीं. आजच्या बहुतेक राज्यसंस्था आपल्या या नियोजित व घोषित ध्येयापासून भ्रष्ट झालेल्या दिसतात. "आर्तांचें रक्षण करण्यासाठीं तुमचें शस्त्रबल आहे ; निरपराधी प्राण्यांवर प्रहार करण्या-साठीं तें नाहीं" असा इषारा ऋषि लोक राजांना देत असत. समाजाची धारणा राजांच्या शस्त्रबलानें होते कीं ऋषींच्या आत्म-बलानें होतें, असा प्रश्न केल्यास त्यास एकच एक उत्तर देतां येणार नाहीं. ऋषींचें आत्मबल जर समाजांतील अन्यायवृत्तींना पूर्णपणें जिंकूं शकेल, तर त्या समाजाच्या धारणेला राजांच्या शस्त्रबलाची आवश्यकता पडणारच नाहीं असा सत्याग्रही राजकारणाचा अंतिम सिद्धान्त आहे. पण भूमितींतील व्याख्यांत आढळणारे बिंदु, सरळ रेषा, वर्तुळें या वस्तु जशा बुद्धिगोचर पण अव्यक्तच असतात, तसेंच केवळ आत्मबलावर चालणाऱ्या व राजदंडाचा मुळींच उपयोग न करणाऱ्या सत्याग्रही समाजाचें हें ध्येय अव्यक्तच राहणार आहे. तथापि तें अव्यक्त ध्येय प्रत्येक मानवाच्या अंतःकरणांत आजही वसत आहे व त्याच्या प्रकाशांत आपलें नित्य वर्तन घडत राहावें हीच मानवाच्या धर्मबुद्धीची आकांक्षा आहे. पण या आकांक्षेनुसार चालणारा समाज जसा आज आढळत नाहीं तसा असा आदर्श पूर्ण मानवहि दुर्मिळच असतो. गांधीजी हे एक असा आदर्श आपल्यापुढें ठेवून नित्य वर्तन करणारे पुरुष होते. त्यांनीं ही तपश्चर्या करण्यांत आपल्या जीवनाचीं ५० वर्षें वेंचिलीं आणि हें आत्मराज्याचें ध्येय रामराज्याच्या नांवानें

आजच्या जगापुढें ठेविलें. हें त्यांचें रामराज्य म्हणजे दशरथपुत्राचें ऐतिहासिक राज्य नव्हे, तर त्या ऐतिहासिक रामराज्याच्याही मागें जी मानवी अंतःकरणांतील अमूर्त, अव्यक्त धर्मभावना तत्कालीन आदर्श मानवांना अंतःप्रेरणा देत होती, त्या सनातन, शाश्वत, नित्यनूतन आणि स्वयंविकासी धर्मभावनेनें प्रेरित असें धर्मराज्य गांधींना अभिप्रेत होतें.

नैवं राज्यं न राजासीन्न च दंडो न दांडिकः ।
धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ॥

हा सत्ययुगीन धर्मराज्याचा आदर्श गांधीजींच्या रामराज्य या शब्दानें सूचित केला जातो.

पण या आदर्शापासून खालीं येऊन वास्तववादी दृष्टीनें आपण विचार करूं लागलों, म्हणजे आपणांस आत्मबलाचा व शस्त्रबलाचा उपयोग करणाऱ्या वास्तव समाजाच्या व्यवहारांसंबंधीं बोलतांना सापेक्ष दृष्टीनें या सिद्धान्ताची मांडणी करावी लागते. समाजधारणेच्या कार्मी आत्मबल जितकें अधिक प्रभावी होईल, तितकें त्या समाजाच्या धारणेला राजसत्तेचें शस्त्रबल कमी लागेल. सत्याग्रही नेत्यांचा प्रयत्न समाजांत अधिकांत अधिक आत्मबल निर्माण करणें, हा असावा आणि राजदंड धारण करणाऱ्यांचा प्रयत्न आपल्या शस्त्रबलाचा उपयोग किमान प्रमाणांत करणें, असा असावा. म्हणून सत्याग्रही लोकनेत्यांचें व्यावहारिक ध्येय अधिकांत अधिक शक्य तितकें आत्मबल निर्माण करणें असें सांगतां येतें, तसेंच समाजधारणेला अपरिहार्य असणारें शस्त्रबल किमान किंवा अल्पतम प्रमाणांत योजून समाजधारणा करणें या शब्दांत राजदंडाचें ध्येय सांगतां येतें.

राजदंड उन्मार्गगामी होऊं नये, यासाठींच लोकशाही राज्ययंत्र स्थापण्यांत आलें. लोकशाही राज्यांत निरनिराळे पक्ष जनतेचीं मतें मिळवून अधिकारावर येण्याचा प्रयत्न करीत असतात. जनतेचें मतपरिवर्तन घडवून तिला मान्य होणाऱ्या पक्षाच्या हातीं सत्ता जावी आणि विरोधी पक्षांनाही आपल्या हातीं त्याच मार्गानें सत्ता मिळविण्याचा मार्ग मोकळा ठेवावा अशी योजना लोकशाही राज्यांत केलेली

असते. तरीही अशा राज्यांतील पक्ष सत्तेची लालूच व भीति दाखवून मतें मिळविण्याचा दुरुपयोग करून प्रजास्वातंत्र्य व प्रजेचें प्रभुत्व नष्ट करण्यास प्रवृत्त होतात, असा अनुभव अलीकडे युरोपांत आलेला आहे. या अनुभवाचें कारण भांडवलदार उत्पादन-पद्धति हें एक आहे. युरोपांतील लोकशाही, भांडवलशाहीनें विकृत बनविली. भांडवलदार लोकशाही ही खरी लोकशाही नसून समाजवादी लोकशाही हीच खरी लोकशाही होऊं शकेल हें मत आज राजकीय तत्त्वज्ञांस पटूं लागलें आहे. पण लोकशाही पद्धतीनें समाजवादाचा प्रयोग करण्यांत अद्यापि कोणासही यश आलेलें नाहीं. समाजवादाची स्थापना करण्यांत लोकशाही राज्ययंत्र यशस्वी व्हावयाचें असेल, तर जनतेची एक मोठी संघटना समाजवादी ध्येयाची पण अनत्याचारी वृत्तीची निर्माण झाली पाहिजे. या संघटनेनें भांडवलदार वर्गाविरुद्ध अनत्याचारी असहकार संघटित केला पाहिजे. ही संघटना अर्थात वर्गविशिष्टच होणार. अशा वर्गविशिष्ट कामगारसंघटनेनें अनत्याचारी असहकारानें भांडवलदार उत्पादनपद्धति स्थगित केली, तर समाजवादी लोकशाहि स्थापन करणारी शक्ति निर्माण होऊं शकेल; पण हें कार्य करतांना अत्याचारी वातावरण निर्माण झालें, तर येणारा समाजवाद हा लोकशाही राज्याला मारक ठरेल. म्हणून ही कामगार-संघटना अत्याचारी बनूं नये अशी दक्षता समाजवाद्यांनीं घेतली पाहिजे. तसेंच जे समाजवादी आपली संघटना अनत्याचारी वृत्तीनें व धोरणानें करीत असतील, त्यांना प्रचार व संघटना करण्याचें स्वातंत्र्य लोकशाही राज्यांतील सत्ताधाऱ्यांनीं दिलें पाहिजे. अनत्याचारी प्रचार व संघटना यांचें स्वातंत्र्य हिरावून घेतल्यास समाजवादी क्रांति अनत्याचारी टिकणें कठीण होतें आणि भांडवलदार उत्पादन पद्धति आपल्या आंतरविरोधांनीं कोलमडून पडल्यास सशस्त्र क्रांति करण्यावांचून समाजाला दुसरा मार्गच उरत नाहीं. हा मार्गही निश्चित यशस्वी होणें अगदीं अपवादात्मक परिस्थितीवांचून शक्य होत नाहीं. यामुळें भांडवलदार पद्धति चालू शकत नाहीं, आणि नवी उत्पादन-पद्धति स्थापन होण्यास वाव मिळत नाहीं, असा पेंच निर्माण होऊन

समाजाचें जीवन गुदमरूं लागतें. बाह्य आघातांनीं राज्ययंत्र मोडून पडलें, तर बाहेरचा गुलामगिरी येते व बाहेरचा आघात झाला नाहीं तर आंतील पुरोगामी शक्ति प्रतिगामी राज्ययंत्र मोडून दुसरें उभारूं शकत नसल्यास समाजजीवन गुदमरून मरणाऱ्या माणसाप्रमाणें निष्प्राण बनूं लागतें. अशा समाजाला किंवा राष्ट्राला केव्हां तरी परकीयांची गुलामगिरी करण्यावांचून गत्यंतरच उरत नाहीं.

या सर्व आपत्ति टळण्यास समाजवादी क्रांति करूं पाहणारांनीं कामगारसंघटनेला अनत्याचारी ठेवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यांना तसें करण्याचें स्वातंत्र्य सरकारनें दिलें पाहिजे. हें स्वातंत्र्य नसेल तर केवळ जनतेला मताधिकार दिल्यानें राज्य लोकशाही पद्धतीस धरून चालू आहे असें म्हणतां येणार नाहीं. यासाठीं कामकरी-शेतकरी वर्गाचें शांततेची संघटना करण्याचें स्वातंत्र्य शाबूत ठेवणें हें लोकशाही पद्धतीनें समाजवाद आणू पाहणारांचें आद्य कर्तव्य ठरतें. हें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं जनतेला सत्याग्रह अथवा सविनय कायदेभंग करण्याचें शिक्षण दिलें पाहिजे. महात्मा गांधींच्या राजकारणापासून समाजवाद्यांनीं हा धडा घेतला असून हिंदी समाजवादी पुढारी आज संप व सत्याग्रह या साधनांनीं आपल्या देशांतील लोकशाही राज्याला समाजवादी रूप देण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण आज महात्मा गांधींच्यासारखा असामान्य निष्ठावंत सत्याग्रही नेता नाहीं आणि स्वतः महात्मा गांधींनासुद्धा सरकारनें अत्यंत जालीम अशी दहशतवादी दडपशाही केली, तेव्हां जनतेला सत्याग्रही निष्ठेला चिकटून ठेवण्यांत पूर्ण यश आलें नाहीं. जनतेची क्रांतिनिष्ठा अहिंसक वृत्ति सोडणार नाहीं, असे प्रयत्न समाजवाद्यांनीं केले तरी त्यांचे ते प्रयत्न यशस्वी होण्यास प्रतिपक्षी सत्ताधाऱ्यांनींही विशिष्ट नीति सतत पाळिली पाहिजे. ही नीति सत्ताधारी पाळणार नाहींत तर वाटेल त्या परिस्थितींत जनतेची क्रांतिशक्ति अनत्याचारीच राहील अशी हमी कोणी देऊं शकणार नाहीं व तशी कोणीं दिली तरी ती सफल होणार नाहीं. यासाठीं हिंदुस्थानांत नवीन स्थापन होणाऱ्या लोकशाही राज्यांतील सत्ताधाऱ्यांनीं जनतेच्या क्रांतिशक्तीला अनत्या-

चारी स्वरूप देऊं पाहणाऱ्या समाजवाद्यांना योग्य अवसर दिला पाहिजे आणि समाजवाद्यांनींहि जनतेची क्रांतिशक्ति अनत्याचारी ठेवण्याचे निष्ठापूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. या दोनहि गोष्टी घडतील आणि पंडित जवाहरलाल नेहरू व साथी जयप्रकाश नारायण हे समाजवादी लोकशाही बनवितील अशी आशा वाटते. महात्मा गांधींचें राजकारण हिंदुस्थानांत चिरंजीव होणार किंवा नाहीं, या प्रश्नाचें उत्तर या आशेच्या सफलतेवर अवलंबून आहे.

सक्ती, परिवर्तन आणि क्रांति

सामाजिक व आर्थिक क्रांति समाजावर सक्तीनें लादण्यांत येऊं नये, तर समाजाचें हृदयपरिवर्तन होऊन त्याचा बाह्य आविष्कार म्हणून सामाजिक क्रांति घडून यावी, हेंच लोकशाहीचें रहस्य आहे. समाजाचें हें हृदयपरिवर्तन घडवून आणण्याच्या कामीं दहशतवादाचा उपयोग करणें हा शुद्ध अविवेक आहे आणि अशा अविवेकानें सामाजिक क्रांति केव्हांहि यशस्वी होऊं शकणार नाहीं. या दृष्टीनें दहशतवाद हा क्रांतिकार्याला मारक आहे हें कोणासहि पटण्यासारखें आहे. समाजाचें हृदयपरिवर्तन झाल्यावांचून त्याचें क्रांतिकारक मत-परिवर्तन होऊं शकत नाहीं, ही सत्याग्रहाची भूमिका असून हें क्रांतिकारक मतपरिवर्तन घडण्यास निष्काम सेवा, निःपक्षपाती प्रेम आणि अहिंसक शौर्य, या गुणांचा उत्कर्ष क्रांतिकारकांच्या अंगीं जितका झाला असेल तितकें इष्ट असतें. या गुणांनाच आत्मबल ही संज्ञा देतां येईल. या कामीं सेवा, त्याग आणि आत्मक्लेशाच्या तपश्चर्येचें तेज यांचा उपयोग होत असतो. केवळ बुद्धिबलाचा समाजाचें क्रांतिकारक हृदयपरिवर्तन घडविण्यास फारसा उपयोग होऊं शकत नाहीं. क्रांतिकारक ध्येय अथवा मतें सामान्य जनतेला पुस्तकी विद्येनें किंवा वर्तमानपत्री प्रचारानें अथवा वक्तृत्वपूर्ण भाषणांनीं आधीं आकलन होत नाहींत व तीं बुद्धीनें आकलन झालीं तरी त्यांच्या प्रस्थापनेसाठीं भोगाव्या लागणाऱ्या यातना सहन करण्यास लागणारें धैर्य व चिकाटी जनतेच्या अंगीं येऊं शकत नाहीं. अनेक वर्षांची सेवा, उत्कट

जनताप्रेम आणि निर्भय, शौर्यशाली सत्यनिष्ठा हे गुण अंगीं असणारे क्रांतिकारक आपल्या आत्मबलानें जनतेचें खरें हृदयपरिवर्तन अथवा निष्ठांतर करूं शकतात. येथेंच सत्याग्रही तत्त्वज्ञानानें प्रागतिक राजकीय तत्त्वज्ञानांत महत्त्वाची भर टाकलेली आहे. सत्याग्रही क्रांतिकारक हा केवळ बुद्धिबलाच्या जोरावर जनतेचें निष्ठांतर होईल व ती क्रांति घडवून आणील अशी अपेक्षा करीत नाहीं. तो बुद्धिबलाला आत्मबलाची प्रेरणा देऊन मनुष्यास त्यागाला, शौर्याला आणि औदार्याला प्रवृत्त करूं पाहतो. प्रागतिक लोकशाही ही केवळ बुद्धिबलानें समाजाची प्रगति करूं पाहते व जोंपर्यंत समाजाचें क्रांतिकारक निष्ठांतर करण्याची आवश्यकता निर्माण झाली नाहीं, तोंपर्यंतच हें बुद्धिबल प्रगतीचें कार्य करूं शकतें.

समाजांत सुप्रतिष्ठित झालेल्या परंपरागत निष्ठा बदलून जेव्हां नव्या निर्माण करण्याचा काळ प्राप्त होतो, तेव्हां केवळ बुद्धिबलानें हें कार्य घडूं शकत नाहीं. अशा वेळीं जनतेंत नव्या निष्ठा निर्माण करण्यास आत्मबलाचा उपयोग होतो, हेंच महात्मा गांधींनीं सत्याग्रहाचा प्रयोग करून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. बुद्धीनें जें ध्येय आकलन करतां येतें आणि ज्याची स्थापना झाली असतां सर्वांचें हित होईल असें बुद्धीला पटतें, त्या ध्येयसिद्धीस लागणारा त्याग, शौर्य आणि चिकाटी या आत्मगुणांच्या अभावीं क्रांति अडून बसते. अशा वेळीं समाजांतील वरिष्ठ अथवा पीडित किंवा शोषक वर्ग आणि कनिष्ठ अथवा पीडित किंवा शोषित वर्ग यांच्यामध्यें विरोध व विग्रह निर्माण होतो. या वर्गविग्रहांत कनिष्ठ, पीडित व शोषित वर्गाला आपल्या हक्कांची जाणीव निर्माण करून देऊन नवी समाजरचना करण्याचें नवनिर्मितीचें कार्य करण्यास त्याला प्रवृत्त करणें हें कम्यूनिस्ट क्रांतीचें तंत्र आहे. सत्याग्रही तंत्रानें या वर्गविग्रहाचा प्रश्न सोडवायाचा तर वरिष्ठ वर्गाला आपल्या रक्तलांछित नफ्याचा त्याग करण्यास प्रवृत्त करणें आणि कनिष्ठ वर्गास आपलें शोषण करणाऱ्या उत्पादनपद्धतीशीं अनत्याचारी असहकार करण्यास प्रवृत्त करणें असें द्विविध कार्य केलें गेलें पाहिजे. हें द्विविध कार्य करीत असतां दोनही वर्गांना आपापल्या

कर्तव्यांची जाणीव करून देणारे सत्याग्रही नेते हवेत. सत्याग्रहींनीं स्वतः असंग्रही राहिलें पाहिजे आणि वरिष्ठ वर्गाच्या स्वार्थाशीं झगडत असतां त्या वर्गांतील व्यक्तींविरुद्ध अद्वेषाची भावना टिकविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. स्तेयमूलक संग्रहाला पायबंद घालून तो बंद पाडणारे कायदे करण्यास सरकारला प्रवृत्त केलें पाहिजे, आणि असे कायदे हे न्यायसंस्थापना करणारे असल्यानें वरिष्ठ वर्गालाहि त्यांना मान्यता देण्यास प्रवृत्त केलें पाहिजे. अशा प्रकारें मालक व मजूर हा वर्गभेद नष्ट करून मालक हे समाजाचे सेवक आहेत आणि मजूर हे समाजाच्या संपत्तीचे मालक आहेत, ही भावना वाढवीत नेऊन हा वर्गविग्रह संपवून रक्तपात न करतां एकवर्गसमाजाची स्थापना केली पाहिजे. असे सत्याग्रही नेते स्वतः न्यायनिष्ठ राहिले पाहिजेत, वर्गशोषणाच्या अन्यायाची शास्त्रीय जाणीव त्यांना झालेली असली पाहिजे आणि सर्व समाजाची न्यायबुद्धि जागृत करून तिला या समाजवादी क्रांतीची न्याय्यता त्यांनीं पटवून दिली पाहिजे. अनत्याचारी असहकाराच्या म्हणजे संपाच्या व सत्याग्रहाच्या साधनांनीं समाजाच्या न्यायबुद्धीच्या जागृतीचें हें कार्य केलें गेलें, तर या क्रांतीस निदान लोकशाही राज्यांत तरी हिंसक स्वरूप येण्याचें कारण नाहीं. पण संप, सत्याग्रह किंवा प्रत्यक्ष प्रतिकार या साधनावांचून केवळ सनदशीर युक्तिवादाच्या साधनानें हें सामाजिक हृदयपरिवर्तन घडून येणार नाहीं.

हें सामाजिक हृदयपरिवर्तनाचें कार्य करण्यास लोकशाही राज्यांतील मूलभूत राष्ट्रिक स्वातंत्र्य आणि बहुसंख्य पक्षाच्या हातीं राजदंड असावा ही व्यवस्था, शाबूत राहिली पाहिजे. पण या गोष्टी असतांनाही वर्गविग्रहानें समाज दुभंगला असतां दोन वर्गाचे दोन पक्ष निर्माण होऊन त्यांचा वर्गीय अहंकार जागृत झाला, तर त्या अहंकाराला चेतवून अथवा दहशतीनें दुसऱ्या वर्गाला दडपून टाकून राजदंड काबीज करण्याचे प्रयत्न सुरू झाले, तर या झटापटींत समाजाच्या न्यायबुद्धीचें राज्य नष्ट होण्याचा, एकपक्षीय लष्करशाही स्थापन होण्याचा आणि समाजांतील मुलकी सत्तेवर लष्करी आक्रमण होण्याचा

धोका असतो. तसेंच सत्तासंपादनाच्या नादीं लागलेले वर्गनिष्ठ पक्ष साधनशुद्धीचा सिद्धान्तहि झुगारून दिल्यावांचून राहणार नाहींत. यासाठींच सत्तासंपादनाच्या स्पर्धेंत केव्हांही भाग न घेणारा, जे निरनिराळे पक्ष सत्तासंपादनाचे प्रयत्न करीत असतील, त्यांच्यापैकीं कोणींही मूलभूत राष्ट्रिक स्वातंत्र्य व लोकशाही यांना धक्का लाविल्यास त्याला आपल्या आत्मबलानें त्या कामीं विरोध करणारा आणि विधायक लोकसेवेनें जनतेचें अंतःकरण तिच्यावरील उत्कट प्रेमानें वश करणारा सत्याग्रही वर्ग, अथवा लोकसंघ समाजांत असावा असें महात्मा गांधींचें मत होतें. राष्ट्रसभेनेंच यापुढें हें कार्य अंगीकारावें आणि सत्तास्पर्धेपासून अलिप्त राहून ही सामाजिक क्रांति रक्तहीन बनवावी हीच गांधीजींची अखेरची इच्छा असावी. राष्ट्रसभेच्या जीविताचें खरें साफल्य हेंच नव्हे काय? महात्मा गांधींनीं राष्ट्रसभेचें ३० वर्षें नेतृत्व करून जो हा मार्ग दाखवून दिला, त्या मार्गाचें अनुसरण करूनच ती स्वतः चिरंजीव होईल आणि जगाला शांततामय क्रांतीचा मार्ग दाखवून दिल्याचें श्रेयहि तिलाच लाभेल.

आज ना उद्यां राष्ट्रसभा याच मार्गावर येईल आणि समाजवादी ध्येयाच्या पक्षाला राज्यावर बसवून त्या राज्याला तत्त्वभ्रष्टता प्राप्त होऊं नये आणि त्याला एकपक्षीय लष्करी सत्तेचें स्वरूप प्राप्त होऊं नये, असे प्रयत्न करण्यासाठीं जनतेचें आत्मबल जाग्रत, संघटित व प्रभावी करण्यांत रमून जाईल अशी आम्हांस आशा आहे. असें होईल तेव्हांच राष्ट्रसभेची खरी महती जगाला दिसूं लागेल.

: : १० : :

महात्मा गांधींची धर्मनिष्ठा आणि मुमुक्षुवृत्ति

" Yes, I shall hold that I cannot concieve politics as divorced from religion. Indeed, religion should pervade every one of our actions. Here religion does not mean secterianism. It means a belief in ordered moral government of the universe. It is not less real because it is unseen. This religion transcends Hinduism, Islam, Christianity, etc. It does not supersede them. It harmonizes them and gives them reality. " ' Harijan ', 10-2-40.

महात्मा गांधी हे एक धर्मपुरुष होते आणि ते क्रांतिकारक धर्मपुरुष होते. एकाच वृक्षाला जशा अनेक शाखा असतात, त्याचप्रमाणें एकाच मानवधर्माचे निरानिराळे सांप्रदाय बनलेले असून त्यांनाच हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, शीख, पारशी, बौद्ध, जैन, इत्यादि नांवें प्राप्त झालेलीं आहेत असें त्यांचें मत होतें. सत्य आणि अहिंसा हेंच त्या सर्व धर्मांचें रहस्य असून विश्वाला एक नैतिक नियति आहे या निष्ठेवर या एका विश्वव्यापक मानवधर्माचा सर्व आधार आहे असें ते मानीत. विश्वाची भौतिक नियति शोधून काढणें हें संत, महात्मे व धर्मपुरुष यांचें कार्य असतें. न्यूटननें जसा गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढिला तसाच प्राचीन ऋषींनीं व संत-महात्म्यांनीं सत्याचा,

प्रेमाचा व सेवेचा नियम शोधून काढिला आहे. ही नैतिक विश्व-नियति शोधून काढणें, त्या नियतीच्या आधारें निरनिराळे जीवन-प्रयोग करणें आणि त्या प्रयोगांनीं सिद्ध झालेले सिद्धान्त समाज-घटनेच्या व समाजक्रांतीच्या कामीं उपयोगांत आणणें हाच समाजोद्धाराचा व आत्मोद्धाराचा खरा मार्ग आहे. समाजाच्या सर्व व्यवहारांवर या नैतिक नियतीचें नियंत्रण चालू राहिलें पाहिजे असा जो आग्रह त्यालाच ते सत्याचा आग्रह किंवा धर्मनिष्ठा असें नांव देतात. ही त्यांची धर्मनिष्ठा अत्यंत व्यापक, अनाग्रही, संप्रदायशून्य अशी नैतिक जीवननिष्ठा आहे. या अर्थानें राजकारण आणि धर्म यांची फारकत होऊं नये असा त्यांचा आग्रह होता. पण त्याचबरोबर त्यांचा असाही आग्रह होता कीं, राजकारण हें कोणत्याही विशिष्ट सांप्रदायिक धर्माच्या आधारावर चालतां कामा नये. धर्म ही सर्व-संग्राहक जीवननिष्ठा अथवा सत्यनिष्ठा आहे असा जेव्हां अर्थ असतो, तेव्हांच ती सर्व सामाजिक व्यवहारांना आधारभूत निष्ठा बनावी, हें मत अनेक धर्मांच्या व अनेक मतांच्या लोकांचें एक राष्ट्र बनविण्यास उपयोगी पडूं शकेल; व तशी ती उपयोगी पडूं शकते, हें स्वतः महात्मा गांधींच्या जीवनावरूनच आपल्या पूर्ण लक्षांत येऊं शकतें. 'धर्म' हा शब्द 'सांप्रदायिक धर्म' या अर्थाशीं इतका निगडित झालेला आहे कीं, महात्मा गांधी ज्या व्यापक जीवननिष्ठेच्या अर्थानें तो शब्द योजितात, तो अर्थ लोकांच्या अंतःकरणांत जागृत होत नाहीं आणि त्यामुळें गांधीजींनीं या व्यापक व सर्वसंग्राहक जीवननिष्ठेला धर्मा-व्यतिरिक्त एखादा दुसरा शब्द योजिला असतां तर फार बरें झालें असतें असें कांहीं लोकांचें मत आहे.

उदाहरणार्थ, धर्म म्हटल्याबरोबर हिंदूंच्या अंतःकरणांत हिंदु धर्म आणि मुसलमानांच्या अंतःकरणांत मुसलमान धर्म व ख्रिस्त्यांच्या अंतःकरणांत ख्रिस्ती धर्म असाच अर्थ उदित होतो, पण हे सर्व धर्म एकाच धर्मवृक्षाच्या शाखा आहेत, असा बोध त्यांना सहसा होत नाहीं आणि म्हणून या सर्वव्यापक धर्माला दुसरें एखादें नांव द्यावें,

असें या आक्षेपकांचें म्हणणें आहे. महात्मा गांधींना या आक्षेपकांच्या म्हणण्यांतील तथ्य माहीत नसतें, तर त्यांनीं प्रत्येक वेळीं धर्म हा शब्द योजतांना त्याच्या सर्वसंग्राहक व व्यापक अर्थाचें स्पष्टीकरण केलेंच नसतें. पण आक्षेपकांचें म्हणणें मान्य करूनही त्यांना असें वाटत होतें कीं, सामान्य जनतेच्या अंतःकरणांत धर्मासंबंधीं जी पूज्य व पवित्र भावना नांदत आहे, ती वस्तुतः या व्यापक व सर्वसंग्राहक, संप्रदायरहित जीवननिष्ठेसंबंधींचीच भावना आहे. तिला जागृत करून आपण सर्व धर्मांच्या लोकांत सहिष्णुवृत्ति आणि बंधुभावना जागृत करूं शकूं. जनतेच्या अंतःकरणांतील ही खोल जीवननिष्ठा जागृत करण्यानेंच जनता त्यागास आणि सेवेस तयार होईल, आणि खरें जनतेचें राज्य निर्माण होऊन त्या जनताराज्यास आत्मराज्याचें अथवा रामराज्याचें स्वरूप प्राप्त होऊं शकेल. सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ति या रूपानें प्रत्येक अंतःकरणांत वसत असणाऱ्या परमेश्वरास आवाहन करण्याचें एक साधन त्यांना प्रिय असणाऱ्या धर्माचा व अध्यात्माचा खरा अर्थ त्यांना समजून देणें आणि तो अर्थ आपल्या जीवनांत आचरून दाखविणें हेंच आहे, असा महात्मा गांधींचा या बाबतींतील दृष्टिकोण होता. बुद्धिमंतांच्या आक्षेपनिरसनापेक्षां जनतेच्या अंतःकरणाचा ठाव घेऊन तिची जीवननिष्ठा जागृत करण्यावरच त्यांची सर्व मदार होती. बुद्धिमंत शास्त्रीपंडित अथवा आधुनिक विद्वान् या सर्वांहून त्यांचें लक्ष जनतेच्या अंतःकरणाकडे विशेष होतें. त्यांना असें वाटत होतें कीं, हे नवेजुने शास्त्रीपंडित ज्याला धर्म समजतात, त्याच्याहून जनतेच्या अंतःकरणांत पूज्यत्व पावलेला आणि साधुसंतांनीं आचरून दाखविलेला धर्म भिन्न व श्रेष्ठ आहे, आणि तो धर्म सर्व निरनिराळ्या धर्मांच्या बुडाशीं आहे, याचीही मुग्ध जाणीव जनतेला आहे. निदान हिंदुस्थानांत तरी हा सर्वधर्मसमभाव जनतेच्या अंतःकरणांत खोल रुजलेला आहे व त्याला आपल्या जीवनाचें पाणी घालून आपण पुनः जिवंत करूं शकूं. हा सर्वधर्मसमभाव, ही सहिष्णुवृत्ति व इतर धर्मीयांसंबंधींची बंधुभावना केवळ हिंदूंसच नव्हे तर जे आपणांस परधर्मीय समजतात त्या इस्लाम

धर्मीयांसही आपण ही वृत्ति प्रेमानें, त्यागानें आणि सेवेनें पटवूं शकूं. मौलाना आझाद, खान अब्दुल गफारखान इत्यादि धर्मपंडितांस व धर्मनिष्ठ संतांस जर आपलें हें मत पटलेलें आहे आणि अनेक सत्याग्रह-संग्रामांत जर हिंदूंच्या खांद्यास खांदा लावून मुसलमान लोक सहस्रावधि संख्येनें सामील झालेले आपण पाहिले आहेत, तर मुसलमान जनतेंतील ही व्यापक जीवननिष्ठा धर्माच्या नांवानें आपणांस जागृत कां करतां येणार नाहीं. संतांचें व धर्मपुरुषांचें निःपक्षपाती प्रेमळ अंतःकरण आणि जनतेचें निर्व्याज अंतःकरण या दोहोंनीं धर्माचा जो व्यापक व सर्व-संग्राहक अनाग्रही संप्रदायरहित अर्थ केला आहे, तोच त्याचा खरा अर्थ असून ही पवित्र धर्मनिष्ठा मी प्रभावी बनवूं शकेन असा त्यांना आत्मविश्वास वाटत होता. हा आपला विश्वास श्रीकृष्ण, गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त आणि महंमद पैगंबर यांच्या जीवनांच्या अनुभवसिद्ध आधारावर उभारलेला आहे असें त्यांना वाटत होतें. तथापि धर्म शब्दाचा दुसरा एक संकुचित, आग्रही व संप्रदायनिष्ठ अर्थ आहे व त्या अर्थाचा धर्म राजकारणांत घोटाळे व अनर्थ उत्पन्न करतो हेंही त्यांना माहीत होतें व दिसत होतें. विशेषतः हिंदुराष्ट्रवादी व पाकिस्तानवादी हे या भ्रष्ट अर्थानें धर्माचा उपयोग करीत आहेत, हें त्यांना दिसत होतें. पण त्यासाठीं आपण धर्म हा शब्द सोडून देऊन आपल्या जीवननिष्ठेला दुसरा शब्द योजावा असें त्यांना अखेरपर्यंत वाटलें नाहीं.

दुसऱ्या एका दृष्टीनें विचार केल्यास आपल्या सर्वसंग्राहक व व्यापक, अनाग्रही व संप्रदायरहित जीवननिष्ठेस त्यांनीं धर्मनिष्ठा हेंच नांव कायम ठेवण्याचा आग्रह कां धरला असावा त्याचा उलगडा होऊं शकतो. साधुसंत आणि धर्मसंस्थापक यांनीं आपलाच अर्थ स्वीकारून जनतेला धर्मभावनेचें पावित्र्य व पूज्यत्व पटवून दिलें होतें व जनतेनेंही त्याच वृत्तीनें त्याला पूज्य व पवित्र मानिलें आहे असें त्यांना अंतःकरणपूर्वक वाटत असल्यानें धर्माचा खरा अर्थ हाच आहे अशी त्यांची श्रद्धा होती. असें असतां आपण तो शब्द सोडून देणें

योग्य नाहीं असें त्यांना वाटणें साहजिक आहे. शिवाय आपण तो शब्द सोडून दिला, तर शास्त्रीपंडितांनीं, बुद्धिमंत विद्वानांनीं आणि सत्तालोलुप राजकारण्यांनीं जो भ्रष्ट अर्थ धर्म शब्दावर लादिला आहे, तोच त्याचा खरा अर्थ आहे अशी जनतेची भावना होईल आणि तीं जनता त्या भ्रष्ट धर्मास सोडून न देतां त्यालाच कवटाळून बसेल व तिचा त्यामुळें अधिकच अधःपात होईल, अशीही भीति त्यांना वाटत असावी. जनतेच्या अंतःकरणांत जो शब्द पूज्य व पवित्र स्थान पटकावून बसला आहे आणि ज्याचा खरा अर्थ खरोखरच तितका उच्च व श्रेष्ठ आहे अशी आपली खात्री आहे, त्याचा खरा अर्थ जनतेला पटवून देणें हेंच आपलें कर्तव्य आहे. या दृष्टीनेंच ते आपल्या जीवननिष्ठेस व्यक्त करण्यास दुसरा शब्द न योजितां धर्म हाच शब्द योजीत होते असें आम्हांस वाटतें. या त्यांच्या सर्वसंग्राहक, व्यापक, अनाग्रही व संप्रदायशून्य जीवन-निष्ठेस हळूहळू सत्याग्रही जीवननिष्ठा असें नांव रूढ होईल अशी आमची कल्पना आहे.

सत्याचें त्रिविध क्षेत्र

आतां आपण या सत्याग्रही जीवननिष्ठेचा थोडा अधिक विचार करूं. सत्याग्रही जीवननिष्ठेंत सत्याला प्रथम स्थान दिलेलें असून अहिंसा हें त्या सत्याच्या प्राप्तीचें सर्वश्रेष्ठ साधन असें मानिलें जातें. यासंबंधीं थोडें अधिक विवेचन करणें अवश्य आहे. सत्य म्हणजे काय? जीवनांतील सत्याची प्राप्ति म्हणजे काय? या प्रश्नांचीं उत्तरें अनेकांनीं अनेक प्रकारें दिलेलीं आहेत. आमच्या मतें या प्रश्नांचें रहस्य समजावयाचें तर सत्याचे तीन विभाग किंवा सत्याचीं तीन क्षेत्रें कल्पावीं लागतील. भौतिक ज्ञान हें सत्यसंशोधनाचें पहिलें क्षेत्र, सामाजिक ज्ञान हें त्याचें दुसरें क्षेत्र आणि आत्मिक ज्ञान हें त्याचें तिसरें क्षेत्र होय. आपणांस जें बाह्य विश्व इंद्रियांमार्फत दिसतें अथवा अनुभवितां येतें त्याचें स्वरूप व त्याची घटना कशी आहे? भौतिक शास्त्रज्ञ या भौतिक क्षेत्रांतील सत्यासत्याचा शोध करीत असतात. येथें आपणांस असें दिसतें कीं, या क्षेत्रांत प्रथम आपणांस जें सत्य वाटतें

त्याहून अनेक वेळां खरें सत्य अगदीं भिन्न किंवा तद्विरोधी असतें. उदाहरणार्थ, आपणांस सूर्य पृथ्वीभोंवतीं फिरत असावा असें वाटतें, पण त्यानंतर अधिक खोल विचार करून शास्त्रज्ञ असें म्हणूं लागले कीं, सूर्य पृथ्वीभोंवतीं फिरतो असें आपणांस वाटतें तो आभास असून पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते हें सत्य आहे. याच न्यायानें मृगजळ किंवा इंद्रधनुष्य यांना आपण आभास म्हणतों. मृगजळ किंवा इंद्रधनुष्य यांचें स्वरूप प्रथमतः किंवा वरकरणीं जसें दिसतें तसें तें नाहीं, हें आपणांस अधिक अनुभवानें व अधिक विचारानें कळून येतें. सृष्टीचे व्यापार कसे चालले आहेत हें समजून घेऊन त्यांचे कार्यकारणभाव समजून घेणें, तिच्या घडामोडींचे नियम शोधून काढणें अथवा ते नियम आपल्या बुद्धीनें तयार करणें हें भौतिक शास्त्रांचें कार्य आहे. या भौतिक शास्त्रांच्या वाढीमुळें मनुष्यांना आपलें सामर्थ्य वाढवितां येतें आणि त्या सामर्थ्याचा उपयोग करून आपणांस इष्ट असणारे भोग प्राप्त करून घेतां येतात. तसेंच आपलें आणि आपल्या भोगसंपत्तीचें रक्षण करण्याचीं साधनेंही त्याला भौतिक ज्ञानामुळेंच प्राप्त होऊं शकतात. गेल्या तीनशें वर्षांत मानवाच्या भौतिक ज्ञानांत फारच मोठी भर पडलेली असून ज्ञान हें केवढें मोठें बल आहे त्याची प्रतीति त्याला आलेली आहे.

परंतु भौतिक ज्ञानाच्या वाढीमुळें जें बळ मनुष्याला प्राप्त झालेलें आहे तें बळ कोणत्या कामीं उपयोगांत आणावें याचें ज्ञान मनुष्याला कसें होतें या ज्ञानाचा विचार करतांना सामाजिक व नैतिक शास्त्रांत प्रवेश करावा लागतो. मनुष्याला खरें सुख कसें प्राप्त होईल? खरें सुख कोणतें आणि खोटें सुख कोणतें? मनुष्याचें कर्तव्य काय आणि त्याच्या जीवितांचें ध्येय कोणतें? या प्रश्नाचा विचार नैतिक व सामाजिक शास्त्रांत करावा लागतो. समाजाची घटना कशी असावी, तिच्यांत बदल कसे व कोणत्या साधनांनीं घडत असतात, तिच्यांत घडणाऱ्या बदलांपैकीं चांगले कोणते व वाईट कोणते, या सर्व बदलांना मानवहिताच्या दृष्टीनें अनुकूल कलाटणी देणें कितपत व कसें शक्य आहे, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न सामाजिक व

नैतिक शास्त्रें करीत असतात. या शास्त्रांचा विचार करीत असतां मनुष्याला सत्यासत्यविवेकाप्रमाणें सदसद्विवेकही करावा लागतो. सत्याग्रहनिष्ठेंतही असा सत्यासत्य व सदसद्विवेक करावा लागतो. सत्य या शब्दाचेही सत्य म्हणजे जें चांगलें तें आणि जें शाश्वत तें असे अर्थ होतात. आपली सदसद्विवेकबुद्धि सांगेल त्याप्रमाणें वर्तन करण्याचा प्रयत्न करणें आणि असताचा काया-वाचा-मनानें सर्वथैव त्याग करणें असाच सत्याग्रहनिष्ठेचा मुख्य अर्थ आहे. आपल्या अंतःकरणांत सतासताचा झगडा नित्य चाललेला असतो. सद्वासना, सद्भावना व सद्विचार यांच्याविरुद्ध असद्वासना, असद्भावना आणि असद्विचार यांच्यांतील युद्ध अथवा द्वंद्व अंतःकरणाच्या कुरुक्षेत्रावर नित्य चालू असतें. या कुरुक्षेत्रांतील युद्धांत सत्पक्षाचा असत्पक्षावर विजय झाल्यानंतरच तेथें धर्मराज्य किंवा आत्मराज्य स्थापन होऊं शकतें. आपल्या अंतःकरणांतील या सदसद्वृत्तींतील द्वंद्वाप्रमाणें समाजांतही सत्पक्ष विरुद्ध असत्पक्ष, न्याय विरुद्ध अन्याय, नीति विरुद्ध अनीति असा लढा चालू असतो. या दोन युध्यमान पक्षांपैकीं प्रत्येक पक्ष आपणास सत्पक्षच म्हणवीत असतो आणि आपला विजय होण्यानेंच सर्वांचें हित होईल असें म्हणत असतो. पुष्कळ वेळां तो तसें मानीतही असतो. अशा प्रकारें प्रत्येक पक्षाला आपली बाजू सत्याची व दुसऱ्याची बाजू असत्याची वाटत असते. यामुळें एकाच समाजांतील हे अंतर्गत संघर्ष अथवा दोन अथवा अधिक समाजांतील संघर्ष दोन अथवा अधिक अशा मानीव सत्यासाठीं चालू असल्याचें आपणांस आढळतें. अशा वेळीं सत्याग्रही निष्ठेच्या मनुष्याला या दोन अथवा अधिक मानीव सत्यांपैकीं वास्तविक सत्य कोणतें त्याचा निर्णय स्वतःच्या बुद्धीनें अथवा अंतःकरणवृत्तीनें करावा लागतो. हा निर्णय केल्यानंतर त्या लढणाऱ्या दोन किंवा अधिक पक्षांपैकीं सत्पक्ष कोणता व असत्पक्ष कोणता हें सांगतां येतें. पण येवढें सांगून तो तटस्थ राहून स्वस्थ बसूं शकत नाहीं. असत्पक्षाविरुद्ध आणि सत्पक्षाच्या बाजूनें लढणें हें त्याचें कर्तव्य असतें. पण हा लढा पूर्ण अनत्याचारी

वृत्तीनें व अनत्याचारी साधनांनीं तो चालवूं इच्छितो. यासाठीं महात्मा गांधींनीं अनत्याचारी असहकार आणि सविनय कायदेभंग हीं दोन नैतिक शस्त्रें शोधून काढिलीं आणि भौतिक युद्धाचा एक नैतिक अथवा आध्यात्मिक पर्याय जगाला दाखवून दिला. अंतःकरणांतील व समाजांतील सदसद्वृत्तींतील लढ्यांत सद्वृत्तीचा विजय करण्यासाठीं जन्माच्या अखेरपर्यंत लढत राहावें आणि अखेरीस त्या लढ्यांतच आपल्या जीविताचा होम करून जगांतील असत्प्रवृत्तीचा अंधार दूर करण्यासाठीं संपूर्ण आत्मसमर्पण करावें हीच सत्याग्रही निष्ठा होय. ही निष्ठा जागृत करण्यासाठींच महात्मा गांधींनीं आपलें जीवित वेंचिलें. आजच्या मानवसंस्कृतीवर जीं अरिष्टें एकसारखीं गुदरत आहेत, त्या अरिष्टांतून तिची मुक्तता करण्यास आपल्या या सत्याग्रही निष्ठेचा अवलंब मानवांनीं केला तरच मानवाला आपल्या उद्धाराचा खरा मार्ग आढळेल असा त्यांचा आजच्या मानवाला संदेश आहे.

या सत्याग्रहनिष्ठेचें अधिष्ठान नैतिक व आत्मिक आहे. येथपर्यंत भौतिक, सामाजिक व नैतिक सत्याचा विचार आपण केला. आतां सत्याग्रहनिष्ठेचें आत्मिक अधिष्ठान म्हणजे काय त्याचा थोडा विचार करूं. महात्मा गांधींचें अध्यात्मशास्त्र फार सोपें होतें. भगवद्गीता, धम्मपद, बायबल, कुराण या सर्व धर्मग्रंथांत सांगितलेलें अध्यात्मशास्त्र एकच आहे असें ते मानीत. मानवी अंतःकरणांतील सत्यप्रेरणा हीच त्याची आत्मप्रेरणा होय. या सत्यप्रेरणेशीं जे तादात्म्य पावतात ते आपल्या खऱ्या आत्म्याशीं तादात्म्य पावतात आणि ते सर्व प्रकारच्या आपपर भावांतून, ममत्वांतून आणि अहंकारांतून मुक्त होऊन विश्वात्म्याशीं अथवा विश्वचैतन्याशीं एकरूप होऊन वर्तन करीत असतात असें त्यांचें अध्यात्मशास्त्र होतें. सामान्यतः भगवद्गीतेंतील स्थितप्रज्ञ हा त्यांचा आत्मप्राप्ति झालेल्या मुक्त मानवाचा आदर्श होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्व विश्वांतील सर्व घडामोडी करणारी एकच चिच्छक्ति आहे. ही चिच्छक्तिच परमात्मा, परब्रह्म, परमेश्वर, अल्ला, राम, रहीम, कृष्ण, करीम, या

नांवांनीं ओळखिली जाते. ही शक्ति आपल्या अंतःकरणांत सत्य-निष्ठेच्या रूपानें वसत असते व कार्य करीत असते. मात्र आपण इंद्रिय-वृत्तींच्या व मनोविकारांच्या अधीन होऊन या विश्वचैतन्यापासून दूर जात असतो. आपण विश्वचैतन्याच्या सागरांतील एक बिंदु आहों, त्याचें सर्व सामर्थ्य आपल्यामागें उभें आहे पण आम्ही अहंकारानें व ममत्वानें त्याच्यापासून अलग बनतों. सागरांतील जलबिंदु त्या सागरापासून अलग झाला कीं, त्याची सर्व शक्ति खलास होते. या विश्वान्तर्यामी तेजापासून आपली बुद्धि आपण अहंकारानें अलग बनवितों तेव्हां तिचें तेज अल्प व मंद बनून अखेरीस नष्ट होतें. आपण इंद्रियनिग्रह आणि मनोविजय या साधनांनीं त्या विश्व-चैतन्याच्या शक्तीशीं तादात्म्य पावूं शकतों आणि त्याच्यापासून प्राप्त होणाऱ्या प्रकाशाच्या आधारें जगांत सर्वत्र भरलेल्या स्वार्थाच्या, अहंकाराच्या व अज्ञानाच्या अंधारांतून आपला मार्ग काढूं शकतों असें महात्मा गांधींचें अध्यात्मशास्त्र होतें. विश्वचैतन्याशीं म्हणजेच सत्याशीं किंवा स्वतांशीं तादात्म्य पावण्याचें त्यांचें साधन म्हणजेच अहिंसा किंवा प्रेम होय. जगांतील प्रत्येक वस्तुजातावर, प्रत्येक प्राणिमात्रावर, प्रत्येक मानवावर प्रेम करणें हीच त्यांची अहिंसा होय. सर्वांतर्यामी विश्वचैतन्य हेंच आध्यात्मिक सत्य होय आणि या सत्याशीं तादात्म्य पावण्याचा सर्वश्रेष्ठ मार्ग म्हणजे प्राणिमात्रावर प्रेम करणें हाच होय. असें प्रेम ज्याच्या अंतःकरणांत सदैव वसत असेल, तें केव्हांही इंद्रिय-वृत्तींनीं व मनोविकारांनीं आच्छादिलें जात नसेल, त्याला कर्तव्याचा मार्ग अंतःप्रकाशानें दिसूं लागेल अशी त्यांची निष्ठा होती व ही निष्ठा त्यांनीं अनुभवानें व प्रयोगांनीं पडताळून पाहिली होती. सत्याच्या प्राप्तीचे व अहिंसेच्या साधनाचे जे जे प्रयोग आपण केले, त्या प्रयोगांनीं व त्या अनुभवांनीं आपली ही निष्ठा कसोटीस उतरली असून ती अधिकाधिक बळकटच बनली आहे असें ते सांगत. अर्थात् ही त्यांची निष्ठा म्हणजे अंधश्रद्धा नव्हे, हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे.

बुद्धिस्वातंत्र्य व आत्मप्रामाण्य

सत्याग्रही हा बुद्धिप्रामाण्यवादी असतो कीं नाहीं असा एक वाद कित्येक लोक उपस्थित करीत असतात. त्यासंबंधीं आमचें असें मत आहे कीं, सत्याग्रहीस बुद्धिप्रामाण्यवादी म्हणण्यापेक्षां त्याला आत्मप्रामाण्यवादी असें म्हणणें अधिक योग्य ठरेल. मनुष्याला होणारें ज्ञान त्याच्या बुद्धीनेंच होत असतें हें खरें असलें, तरी ही बुद्धि शुद्ध करण्यासाठीं त्यानें इंद्रियें व मन यांच्यावर विजय प्राप्त करून घ्यावा लागतो असें सत्याग्रही निष्ठेचें तत्त्व आहे. इंद्रियाधीन व विकारवश बुद्धि ही सदसद्विवेक करूं शकत नाहीं म्हणून बुद्धीला शुद्ध, सम आणि शांत स्वरूप प्राप्त करून देण्याचे प्रयत्न सर्वांनीं करीत राहिलें पाहिजे. अशा शुद्ध, सम आणि शांत बुद्धीचे निर्णय हेच प्रमाण मानिले पाहिजेत. पण अशी शुद्ध, सम व शांत बुद्धि प्राप्त होईपर्यंत व्यक्तींनीं आपल्या बुद्धीस प्रमाण न मानितां दुसऱ्याच्या बुद्धीनें चालावें असा याचा अर्थ होत असेल, तर सत्याग्रहनिष्ठा ही एक शब्दप्रामाण्यवादी किंवा ग्रंथप्रामाण्यवादीच निष्ठा बनेल व अशा निष्ठेंतील दास्यवृत्ति सत्याग्रहनिष्ठेतही निर्माण झाल्यावांचून राहणार नाहीं. महात्मा गांधी अशा बौद्धिक दास्यवृत्तीचा सतत निषेध करीत असत. तथापि त्यांच्या कांहीं अनुयायांत ही दास्यवृत्ति वाढलेली दिसून येई. पण हा म. गांधींचा किंवा सत्याग्रहनिष्ठेचा दोष म्हणतां येणार नाहीं. सत्याग्रहनिष्ठेंत कोणतेंही शब्दप्रामाण्य किंवा ग्रंथप्रामाण्य अंतर्भूत होऊं शकत नाहीं किंबहुना तसें तें होईल, तर त्या निष्ठेचें सर्व आधुनिकत्व व क्रांतिकारकत्व नष्ट होऊन ती एक मध्ययुगीन अंधश्रद्धा बनेल व तिला प्रतिगामी व प्रतिक्रांतिकारक स्वरूप आल्यावांचून राहणार नाहीं.

महात्मा गांधी हे प्रत्येकास पूर्ण बुद्धिस्वातंत्र्य द्यावें असें मानीत असत, तसा त्यांचा आग्रह होता. तरीही ते बुद्धीबरोबर अंतःकरणाचाही (head and heart) उल्लेख केल्यावांचून राहत नसत. पुष्कळ वेळां ते बुद्धीपेक्षां अंतःकरणाला अधिक मान द्यावा असेंही म्हणत

असत. यावरून ते बुद्धिप्रामाण्यवादी नसून अंतःकरणप्रामाण्यवादी किंवा भावप्रामाण्यवादी होते, असेंही कांहींना वाटतें. पण तेंही तितकेंसें योग्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं. युरोपीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत व्हॉल्टेअर हा बुद्धिप्रामाण्यवादी व रूसो हा अंतःकरणप्रामाण्यवादी गणिला जातो. रूसोला भाववादी असेंही म्हणतां येईल. रूसोचा भाववाद आणि महात्मा गांधींचा अंतःकरणवाद यांत आम्हांला फरक वाटतो. बुद्धीला विकारवश किंवा भावनावश बनण्यास संधि मिळाल्यास ती बुद्धि भ्रष्ट होते, म्हणून सर्व मनोविकार व इंद्रियप्रेरणा यांच्या दास्यांतून मुक्त बनलेलें शुद्ध अंतःकरण व त्या शुद्ध निर्विकार, निर्मम व निरहंकार अंतःकरणावर अधिष्ठित झालेली बुद्धि हीच आपली खरी मार्गदर्शक होऊं शकते, हें महात्मा गांधींना जगाला शिकवावयाचें होतें. यासाठीं बुद्धीचा निर्णय शुद्ध राहावा म्हणून ते अंतःकरणाच्या शुद्धतेचें महत्त्व वर्णीत असत. अशा शुद्ध अंतःकरणांत आत्मप्रेरणा जागृत होते व तिच्यामुळें बुद्धि प्रज्वलित अथवा तेजस्वी बनते. या दृष्टीनें त्यांच्या अंतःकरणवादाचा रूसोच्या भाववादाशीं घोटाळा करणें योग्य नाहीं. रूसोच्या भाववादांत बुद्धीला विवश अथवा विकारवश बनविण्याचा धोका होता, तसा महात्मा गांधींच्या अंतःकरणवादांत नव्हता. कारण तो अंतःकरणवाद हा वस्तुतः आत्मवाद अथवा आत्मप्रामाण्यवाद आहे, असें आम्हांस वाटतें.

महात्मा गांधी हे जसे अंतःकरणशुद्धतेला महत्त्व देणारे होते, तसेच ते क्रियाप्रवृत्तीला अथवा कर्मप्रवृत्तीलाही महत्त्व देणारे कर्मयोगी होते. अंतःकरणाची शुद्धि झाल्यानें त्याची भावना व्यापक, निर्मम आणि निरहंकार बनते, पण या निरहंकारतेनें व निर्ममतेनें कर्मशून्यता येऊं नये. ज्ञान हें अंतःकरणांत मुरलें पाहिजे आणि तें इंद्रियव्यापारांच्या द्वारांनीं प्रकट होऊन विश्वाची सेवा करण्यांत त्या ज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे. नाहीं तर हें ज्ञान निष्फळ ठरेल. इतकेंच नाहीं, तर तें प्रयोगानें सिद्ध होतें किंवा नाहीं, याचाही अनुभव येणार नाहीं. ज्ञानाची वाढ आणि अज्ञानाचा निरास, या गोष्टी ज्ञानाचे अथवा

सत्याचे प्रयोग करीत राहिल्यानेंच होत असतात. जें ज्ञान अंतःकरणांत मुरलेलें नाहीं तें जमिनींत मुळें न धरलेल्या व झाडावरून तोडून आणून पुरलेल्या फांदीप्रमाणें निर्जीव असतें. तें ज्ञान अंतःकरणांत मुरेल, तरच अंतःप्रवृत्ति जागृत होईल, आणि त्याच्यांतून कर्मप्रेरणाही बळावेल. म्हणून कांहीं लोक ज्ञानाच्या बाबतींत बुद्धीपेक्षां किंवा भावनेपेक्षां कर्मप्रेरणेला अधिक महत्त्व देतात. ज्या ज्ञानामुळें अंतःकरणें थरारून जाऊन उद्दीप्त होतात आणि मनुष्य कर्मप्रवृत्त होतो तेंच ज्ञान खरें असेंही ते म्हणतात. रूसो हा जसा भाववादी म्हणून युरोपांत प्रसिद्ध आहे तसा नीत्शे हा कर्मवादी म्हणून तिकडे प्रसिद्ध आहे. तो ज्ञानापेक्षां कर्मालाच प्राधान्य देतो हें पाहून आमच्या इकडचे कांहीं लोक त्याला भगवद्गीतेंतील कर्मयोगी किंवा त्रिगुणातीत स्थितप्रज्ञ असेंहि मानितात. महात्मा गांधी हे कर्मयोगी होते, तरी ते नीत्शेसारखे आसुरी कर्मयोगी नव्हते. एखाद्या पराक्रमी विभूतीच्या विकासासाठीं सर्वसामान्य मानवाचा आत्मविकास चुरडून टाकावा किंवा सर्वसामान्य जनतेला खरा आत्मविकास करण्याचें सामर्थ्यच नसल्यानें सामान्य जनतेला बुद्धिस्वातंत्र्य देऊं नये, सामाजिक समता स्थापूं नये आणि सामान्य जनतेच्या हितासाठीं तिच्यावर या पराक्रमी विभूतीनें सत्ता गाजवावी, असलीं मतें त्यांना कधींही पटलीं नाहींत. याच्या उलट त्यांचा सामान्य जनतेच्या आत्मबलावर आत्यंतिक विश्वास होता. तिच्यापैकीं प्रत्येकानें स्वतःच्या बुद्धीनें स्वतःचें नेतृत्व करूं लागावें आणि आपल्या अंतःकरणास व शुद्ध बुद्धीस पटतील, तेच नेते स्वीकारून त्यांच्यामागून जाऊन आपला उद्धार करून घ्यावा असा त्यांचा उपदेश असे. त्यांची पराक्रमी विभूतीची कल्पना जनतेवर शस्त्रबलानें सत्ता गाजविणाऱ्या आणि तिला धाकानें व लोभानें वश करून गुलाम बनविणाऱ्या असुराची नसून आपल्या सतत सेवेनें, त्यागानें आणि क्लेशानें तिचें अंतःकरण काबीज करणाऱ्या, तिला क्रियाप्रवण आणि पराक्रमी बनविणाऱ्या लोकसेवकाची होती. दुसऱ्याचें रक्त सांडण्यांत खरा पराक्रम नसून स्वतःच्या रक्ताचा अभिषेक करून जनतेचा अंतरात्मा जागृत करण्यांत

व तिला मुक्त वा स्वतंत्र बनण्यास साहाय्य करण्यांत खरा पराक्रम आहे, अशी त्यांची निष्ठा होती. आपल्या शुद्ध बुद्धीनें व शुद्ध अंतःकरण-वृत्तीनें अशी पराक्रमी कर्मप्रेरणा जागृत झाली, तरच ती शुद्ध बुद्धि व तेंच खरें शुद्ध अंतःकरण असें त्यांचें मत होतें. तात्पर्य, गांधीजींच्या आत्मप्रामाण्यांत बुद्धिस्वातंत्र्य, अंतःकरणशुद्धि आणि आत्मप्रेरणा या सर्व तत्त्वांना स्थान दिलेलें असून ही आत्मप्रेरणा म्हणजेच सत्यनिष्ठा, अहिंसावृत्ति आणि सेवाबुद्धि होय असें मानण्यांत येतें. सत्यनिष्ठेला अग्रस्थान दिल्यामुळें अंधश्रद्धा आणि विकारी, पक्षपाती प्रेम यांना त्यांत स्थान उरत नाहीं. शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य यांचा स्वतःच्या बुद्धीशीं अथवा अंतःकरणवृत्तीशीं विरोध येईल, तेथें स्वतःच्या बुद्धीला व अंतःकरणवृत्तीला साक्षी ठेवून वर्तन करावें असाच ते नेहमीं उपदेश करीत असत.

तसेंच ते कोणत्याही विभूतीस पूर्ण ज्ञान झालेलें आहे किंवा होऊं शकेल, असेंही मानीत नसत. सर्व धर्मांना, धर्मपुरुषांना व धर्मग्रथांना ते पूज्य मानीत असत. व त्यांचा उपयोग आत्मोद्धारासाठीं व जगदुद्धारासाठीं करून घ्यावा, असेंही म्हणत असत. तरीही सर्वच धर्म अपूर्ण आहेत, सर्वच धर्मपुरुष अपूर्ण होते आणि म्हणून धर्मग्रंथांतील ज्ञानहि अपूर्ण आहे, हें ओळखून स्वतःच्या बुद्धीला न पटणारें असें कोणतेंही तत्त्व मान्य करण्याची सक्ती कोणावरही करूं नये व कोणीं तशी सक्ती मानूं नये असेंही ते प्रतिपादीत. आत्मप्रयत्न हेंच अखेरचें प्रामाण्य होय आणि स्वतःचा उद्धार करणारी शक्ति आपला अंतरात्मा हीच होय अशी त्यांची निष्ठा होती.

आत्मोद्धाराच्या तळमळीनें केलेल्या प्रार्थनेला परमेश्वर, परमात्मा अथवा अंतरात्मा वश होतो आणि आत्मोद्धारास लागणारें सामर्थ्य देतो अशी मात्र त्यांची दृढ श्रद्धा होती. या अर्थानें ते ईश्वरवादी होते आणि अशी ईश्वरावर निष्ठा असल्यावांचून मनुष्याला आत्मोद्धारास लागणारें सामर्थ्य प्राप्त होणार नाहीं अशी त्यांची समजूत होती. मात्र हा परमेश्वर प्रत्येकाचा निराळा असूं शकेल, अथवा एकाच परमेश्वराच्या निरनिराळ्या विभूतींची उपासना निरनिराळे लोक करूं

शकतील असेंहि ते म्हणत. आपण सत्यरूपी परमेश्वराचे उपासक असून ही उपासना अहिंसेच्या साधनानें करण्याचेच प्रयोग करीत असतो असें त्यांनीं आत्मकथेच्या प्रस्तावनेंत लिहिलें असून आपलें प्रयोग हे स्वतःच्या दृष्टीनें खरे असले तरी इतरांनीं त्यांना अनुभवावांचून प्रमाण मानूं नये व आपलें शब्दप्रामाण्य कोणींही मानूं नये असा त्यांनीं तेथेंच इषारा दिला आहे.

ईश्वरनिष्ठेचा व्यापक अर्थ

धर्मनिष्ठा याचा त्यांचा अर्थ जसा अत्यंत व्यापक होता तसा ईश्वरनिष्ठा या शब्दाचा व प्रार्थनेचाही अर्थ ते अगदीं व्यापक आणि अनाग्रही वृत्तीनें करीत असत. गौतम बुद्ध आणि महावीर हे परमात्म्याच्या अस्तित्वासंबंधीं अनुक्रमें अज्ञेयवादी व अनीश्वरवादी होते. पण महात्मा गांधी त्यांच्याही जीवननिष्ठेस ईश्वरनिष्ठा असेंच नांव देत. कारण हे तरी अज्ञेयवादी किंवा अनीश्वरवादी कां बनले? तर त्यांच्या अंगच्या सत्यनिष्ठेमुळेंच ना? त्यांच्या अज्ञेयवादामागें किंवा अनीश्वरवादामागें जी सत्यनिष्ठा प्रतीत होते, तीच त्यांची ईश्वरनिष्ठा होय असें महात्मा गांधी म्हणत.

३१ डिसेंबर १९३१ च्या 'यंग इंडियां'त ते लिहितात:—

"मी ईश्वराला सत्य असें कां म्हणतों, असें तुम्ही विचारतां. माझ्या लहानपणीं, विष्णुसहस्रनाम या नांवाचें जें एक स्तोत्र आहे तें मला पाठ म्हणावयास लावीत असत. पण हीं सहस्रनामें एवढींच कांहीं ईश्वराचीं सर्व नांवें नव्हेत. प्राणी जसे असंख्य आहेत तशींच ईश्वराचीं नांवेंहि असंख्य आहेत. म्हणून आपण असेंहि म्हणतों कीं, ईश्वराला नाम नाहीं. तसेंच त्याला अनेक रूपें आहेत म्हणून त्याला रूप नाहीं असेंही आपण म्हणतों.....पुढें मी इस्लामचा अभ्यास करूं लागलों तेव्हां इस्लाम धर्मांतही ईश्वराला अनेक नांवें आहेत असें मला आढळलें. ईश्वर हा प्रेमरूप आहे असें ते म्हणत, त्यांच्याबरोबर तो प्रेम (मय) आहे असेंहि मी म्हणत असें. पण असें करतांनाही माझ्या खोल अंतःकरणांत असें वाटे कीं, ईश्वर हा

ईश्वर असेल, पण तो सर्वांआधीं सत्य आहे. मनुष्य आपलें अंतःकरण शब्दांनीं पूर्णपणें व्यक्त करणें जर शक्य असेल, तर माझा असा निर्णय झाला आहे कीं, माझ्या दृष्टीनें ईश्वर हा सत्यरूप आहे. पण दोन वर्षांपूर्वी मी याच्याहीपुढें एक पाऊल गेलों आणि म्हणूं लागलों कीं, सत्य हाच ईश्वर आहे. ईश्वर सत्य आहे आणि सत्य हाच ईश्वर आहे या दोन विधानांतील सूक्ष्म भेद तुमच्या लक्षांत आलाच असेल. सुमारें पन्नास वर्षें सत्यसंशोधनाचा अविरत प्रयत्न केल्यानंतर मी या निर्णयावर आलों आहें. पन्नास वर्षांपूर्वी मला असें दिसून आलें कीं, सत्यप्राप्तीचा सर्वांत जवळचा मार्ग प्रेमाचाच आहे. पण मला असेंहि दिसून आलें कीं, प्रेम शब्दाचे निदान इंग्लिश भाषेंत तरी अनेक अर्थ आहेत आणि मानवी प्रेम विकारी बनल्यास तें अधोगतीसहि कारण होऊं शकेल. शिवाय मला असेंही आढळून आलें कीं, आहिंसा या अर्थी प्रेमाचे फार थोडे उपासक या जगांत आहेत. पण सत्य या शब्दाचे असे द्विविध अर्थ नाहींत आणि अनीश्वरवादीसुद्धां सत्याची शक्ति किंवा त्याची आवश्यकता केव्हांही नाकारीत नाहींत. सत्यसंशोधनाच्या ध्यासामुळें अनीश्वरवादी हे ईश्वराचें अस्तित्व नाकारण्यासही कचरत नाहींत व त्यांच्या दृष्टीनें तें योग्यच आहे. अशा प्रकारच्या युक्तिवादावरूनच मी या निर्णयास आलों कीं, ईश्वर हा सत्यरूप आहे असें म्हणण्याऐवजीं सत्य हाच ईश्वर आहे असें आपण म्हणावें. चार्लस ब्रॅडलॉ ह्यांचें नांव या कामीं मला आठवतें. ते स्वतःस अनीश्वरवादी म्हणवून घेण्यांत आनंद मानीत.

"परंतु त्यांची जी थोडी मला माहिती आहे तिच्यावरून मी त्यांना कधींही अनीश्वरवादी म्हणणार नाहीं. मी त्यांना ईश्वराला जागणारे (God-fearing) असेंच म्हणेन, पण आपलें हें वर्णन त्यांना मान्य होणार नाहीं हें मला माहीत होतें. मीं जर ईश्वराला जागणारे असें न म्हणतां सत्याला जागणारे गृहस्थ असें त्यांचें वर्णन केलें असतें तर त्यांना आनंद झाला असता. पण सत्य हाच ईश्वर आहे असें म्हणून मीं त्यांचें टीकाशस्त्र त्यांना खालीं ठेवावयास लाविलें असतें व अशा रीतीनें मीं अनेक तरुणांना शस्त्रें खालीं ठेवावयास लाविलें आहे.....

ईश्वराचें कसेंही वर्णन केलें तरी त्या कामीं अनेक अडचणी येतातच. पण मानवी मनाचें सामर्थ्य मर्यादित आहे आणि ज्या वस्तूचें आकलन करणें मानवी शक्तीपलीकडचें आहे त्या वस्तूची अथवा तत्त्वाची व्याख्या करतांना या मर्यादांची अडचण भासणारच. हिंदु तत्त्वज्ञानांत आणखीही एक तत्त्व आहे, तें म्हणजे ईश्वराचें अस्तित्व हेंच काय तें खरें अस्तित्व आहे, त्याच्यावांचून इतर कोणाचेंही अस्तित्व खरें नाहीं. संस्कृतमधील सत्य या शब्दाचा मूळ अर्थ जें सत् म्हणजे अस्तित्वांत आहे तें असाच आहे. या व अशाच इतर कारणासाठीं मी सत्य हाच ईश्वर आहे या निर्णयावर आलों आहें आणि या व्याख्येनेंच मला खरें समाधान लाभतें. जेव्हां तुम्ही सत्यरूपी ईश्वराचा शोध करूं लागतां तेव्हां प्रेम म्हणजे अहिंसा हेंच एक साधन योजणें अपरिहार्य होतें. माझी अशी निष्ठा आहे कीं, अंतिम दृष्टीनें पाहिल्यास साधनें व साध्य हे शब्द समानार्थकच आहेत. या दृष्टीनें ईश्वर म्हणजे प्रेम असें म्हणण्यासही मी कचरणार नाहीं.

"पण सत्य म्हणजे तरी काय?"

"हा प्रश्नही कठीणच आहे. पण माझ्या पुरतें मीं त्याचें उत्तर शोधून काढिलें आहे. आपल्या अंतरांतील ध्वनि जें सांगेल तेंच सत्य होय. निरनिराळ्या लोकांना निरनिराळे किंवा परस्परविरुद्ध सिद्धान्त सत्य असे कां वाटतात, हा प्रश्न तुम्ही विचाराल. मानवी मनाचे व्यापार अनेक माध्यमांतून होत असतात आणि सर्वांच्या मनाचा विकास सारखाच झालेला नसतो, हें लक्षांत घेतल्यास एकास जें सत्य वाटतें, तेंच दुसऱ्यास असत्य असें वाटणें शक्य आहे, असें दिसून येईल. म्हणूनच ज्यांनीं सत्याचे प्रयोग केले आहेत, त्यांनीं असा निर्णय केला आहे कीं, हे प्रयोग करतांना कांहीं शर्ती पाळण्याची आवश्यकता आहे. ज्याप्रमाणें शास्त्रीय प्रयोग करणारांना शास्त्रीय शिक्षणक्रमांतून जाणें आवश्यक असतें, त्याचप्रमाणें आध्यात्मिक क्षेत्रांत प्रयोग करूं इच्छणारांनीं कांटेकोर शिस्तपालनाची पूर्वतयारी करून तो अधिकार प्राप्त करून घ्यावा लागतो. म्हणून आपल्या आंतरध्वनीसंबंधीं बोलण्यापूर्वी प्रत्येकानें आपल्या मर्यादांची जाणीव ठेवणें अवश्य असतें. म्हणूनच

आमचा असा अनुभवसिद्ध विश्वास आहे कीं, ज्यांना सत्यरूप ईश्वराचा शोध स्वतःच्या प्रयत्नांनीं करावयाचा असेल, त्यांनीं अनेक व्रतें पालन करण्याच्या शिस्तींतून गेलें पाहिजे. अहिंसा, दारिद्र्य, असंग्रह अशीं हीं व्रतें आहेत. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह या पांचांचें यमपालन केल्यावांचून तुम्ही असे प्रयोग करण्यास धजूं नये. अशा अनेक शर्ती सांगितलेल्या आहेत, त्या सर्व तुम्हांस येथें निवेदन करण्याची गरज नाहीं. येवढें सांगितलें असतां पुरें आहे कीं, हे प्रयोग केलेल्या लोकांच्या मतें मनोदेवतेचा आवाज ऐकिल्याचा दावा प्रत्येकानें करणें योग्य नाहीं. आज कोणतीही शिस्त पालन करण्याची पूर्वतयारी न करतां सर्वच जण मनोदेवतेच्या आज्ञेप्रमाणें वागण्याचा हक्क सांगूं लागले असल्यानें आधींच गोंधळून गेलेल्या जगांत इतकें असत्य माजलेलें दिसत आहे. तुम्हांस मी अत्यंत नम्रपणें येवढेंच सांगूं शकेन कीं, ज्यांच्यापाशीं भरपूर निरहंकारवृत्ति नसेल, त्यांना सत्याचा शोध लागणें शक्य नाहीं. सत्याच्या सागरावर विहार करण्याची जर तुमची इच्छा असेल, तर तुम्ही स्वतःचा 'अहं' शून्यवत् बनविला पाहिजे." ('यंग इंडिया', ३१-१२-३१)

या बऱ्याच मोठ्या उताऱ्यांत आमच्या मतें पुढील सिद्धान्त ग्रथित झालेले आहेत.

(१) कांहीं निरीश्वरवादी सत्यनिष्ठेमुळेंच आपणांस निरीश्वरवादी म्हणवीत असतात. अशांच्या जीवनांत ही सत्यनिष्ठा प्रतीत होत असेल तर त्यांना ईश्वरनिष्ठच समजलें पाहिजे. म्हणून ईश्वर हा सत्य-स्वरूप आहे, असें म्हणण्याऐवजीं सत्य हाच ईश्वर आहे असें म्हणणें अधिक योग्य आहे. सत्यनिष्ठ पण निरीश्वरवादी लोक हे गांधींच्या मतें ईश्वरनिष्ठच ठरतात, असा याचा अर्थ होतो.

(२) नैतिक सत्य किंवा सामाजिक सत्य म्हणजे न्याय. हा न्याय किंवा सत्य म्हणजे काय? याचें गांधींचें उत्तर असें कीं, प्रत्येकाच्या मनोदेवतेस जो न्याय वाटेल, तेंच सत्य म्हटलें पाहिजे. हा न्याय किंवा हें सामाजिक सत्य हा संशोधनाचा विषय आहे. हें संशोधन करण्याचा हक्क प्रत्येकास आहे आणि या क्षेत्रांत प्रयोग करून जें

सत्य आपणांस प्रतीत झालें असेल, त्याचा प्रयोग करणारांनीं सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह हे पांच यम पाळून आपल्या अंगीं मनोदेवतेचा आंतरनाद ऐकण्याचा अधिकार प्राप्त करून घेतला पाहिजे. हा अधिकार प्राप्त करून न घेतां आज प्रत्येक जण मनोदेवतेच्या आज्ञेप्रमाणें वागण्याचा हक्क बजावीत आहे. म्हणून जगांत असत्याचा फैलाव होऊन गोंधळ माजत आहे. हा गोंधळ कमी व्हावयाचा तर आध्यात्मिक उन्नतीस अवश्य असलेली शिस्त पाळून आपल्या अंगीं मनोदेवतेच्या आज्ञेप्रमाणें वागण्याचा अधिकार प्राप्त करून घेतला पाहिजे.

(३) मनुष्याची बुद्धि निरहंकार बनल्यावांचून त्याला मनोदेवतेचा आदेश ऐकूं येणार नाहीं आणि तसा अधिकार त्याला प्राप्त होणार नाहीं.

प्रार्थनेची व्यापक व्याख्या

महात्मा गांधींनीं ईश्वरनिष्ठा म्हणजे सत्यनिष्ठाच होय, अथवा सत्य हाच ईश्वर होय, अशी व्याख्या करून सत्यानिष्ठ पण निरीश्वरवादी लोकांचा समावेश करण्याइतकी ती व्यापक बनविली होती. तशीच त्यांची प्रार्थनेची व्याख्याही फार व्यापक होती. आपल्या अंतःकरणाची व बुद्धीची शुद्धि करण्यासाठीं जें जें आत्मचिंतन, मनन, ध्यान, इत्यादि मनुष्यें करतील, ती सर्व प्रार्थनाच होय असें ते मानीत. या दृष्टीनें एका बुद्धधर्मी मनुष्याशीं झालेला त्यांचा पुढील संवाद फार महत्त्वाचा आहे.

डॉ. फॅब्री या नांवाचे एक गृहस्थ महात्मा गांधींना १९३९ सालीं अबोताबाद येथें भेटण्यास आले होते. ते प्रो. सिल्व्हन लेव्ही यांचे शिष्य असून स्वतःस बुद्धाचे अनुयायी म्हणवीत असत. त्यांचें महात्मा गांधींशीं प्रार्थनेसंबंधीं संभाषण झालें तें पुढें दिलें आहे.

"ईश्वराचें मन प्रार्थनेनें बदलूं शकेल काय? प्रार्थनेनें त्याचें ज्ञान आपणांस होऊं शकेल काय?"

"मी प्रार्थना करतों, तेव्हां काय करतों, त्याचें यथातथ्य वर्णन करून सांगणें कठीण आहे." गांधीजी म्हणाले, "तरीहि तुमच्या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न मला केला पाहिजे. ईश्वरी मन हें न बदलणारेंच आहे पण तें मन प्रत्येकांत व प्रत्येक वस्तूंत आहे. मग ती वस्तु सजीव असो कीं निर्जीव असो. प्रार्थनेचा अर्थ असा आहे कीं, माझ्या अंतःकरणांतील त्या देवतेचा लाभ करून घेण्याचा मी प्रयत्न करतों. ती देवता माझ्यामध्यें आहे अशी माझ्या बुद्धीची खात्री असूनही तिच्याशीं माझा जिवंत स्पर्श झालेला नसेल. मी जेव्हां स्वराज्यासाठीं किंवा स्वातंत्र्यासाठीं प्रार्थना करतों तेव्हां स्वराज्य मिळविण्याची किंवा तें संपादन करण्याच्या कामीं अधिकांत अधिक त्याग करण्याची शक्ति मला लाभावी अशी प्रार्थना किंवा इच्छा मी करीत असतों. मी असें निष्ठेनें म्हणूं शकतो कीं, अशी शक्ति मला प्रार्थना केल्यानें मिळूं शकते."

"या गोष्टीस प्रार्थना हें नांव देतां येणार नाहीं. प्रार्थना करणें म्हणजे कोणाजवळ तरी एखादी मागणी करणें, विनंति करणें असा अर्थ आहे." डॉ. फॅन्ड्री म्हणाले.

"अलबत. मग तुम्ही असें म्हणूं शकाल कीं, ही मागणी मी माझ्याकडेच करीत असतों. माझा जो अंतरात्मा आहे, खरा परम आत्मा आहे व ज्याच्याशीं मी अद्यापि पूर्ण तादात्म्य पावलों नाहीं, त्याच्यापाशीं मी ही मागणी करीत असतों. म्हणून सर्वव्यापक असा जो परमात्मा त्याच्याशीं तादात्म्य पावण्याची अथवा त्याच्यांत विलीन होण्याची ती अखंड उत्कटता आहे असें तुम्ही तिचें वर्णन करूं शकाल."

"आणि ही शक्ति लाभण्यासाठीं तुम्ही प्रार्थनेचा जुना प्रकारच उपयोगांत आणतां?"

"होय. जन्मभर लागलेली संवय तशीच चालू राहते आणि मी एका माझ्याहून भिन्न अशा शक्तीची आराधना करतों असेंही म्हणतां येईल. या अनंत शक्तीचाच मी एक अंश आहें पण तो इतका क्षुद्र अंश आहे कीं, मी तिच्याहून अलग आहें असेंही मला वाटतें. मीं

बुद्धिदृष्ट्या वरील स्पष्टीकरण जरी तुमच्यापुढें केलें तरी या शक्तीशीं पूर्ण तादात्म्याच्या अभावीं मी तिच्या मानानें इतका क्षुद्र वाटतों कीं, मला कांहींच महत्त्व नाहीं. मी अमुक तमुक करतों, असें म्हणतांच मला माझ्या अपात्रतेची व शून्यत्वाची इतकी जाणीव होऊं लागते कीं, दुसऱ्या कोणीं तरी किंवा दुसऱ्या कोणत्या तरी श्रेष्ठ शक्तीनें मला तें करण्यास साहाय्य केलें पाहिजे."

"टॉल्स्टॉयही असेंच म्हणतो. प्रार्थना म्हणजे आपल्या अंतरात्म्यांत लय पावणें. हें एक पूर्ण ध्यान आहे. मात्र एखादें मूल आपल्या पित्याकडे कांहीं मागणी करतें त्यासारखें स्वरूप या ध्यानाला केव्हां केव्हां चुकीनें प्राप्त होत असतें."

"क्षमा करा!" त्या बौद्ध पंडितांना इशारा देत गांधीजी म्हणाले, "त्याला मी चूक म्हणणार नाहीं. वर आकाशांत कोठें तरी असणाऱ्या परमेश्वराला मी प्रार्थना करतों हेंच अधिक बरोबर आहे. तो माझ्यापासून जितका दूर असेल तितकी माझी त्याच्या भेटीची आर्तताही अधिक असते आणि मी मनानें त्याच्या सन्निध जाऊं शकतों. तुम्हांला माहीतच आहे कीं, मनाचा वेग हा प्रकाशाच्या वेगाहूनही अधिक असतो. म्हणून त्या परमात्म्याच्या व माझ्यामधील अंतर अपरिमेय असलें तरीहि तें अंतर नष्ट होऊं शकतें. तो अत्यंत दूर आहे आणि तरीही तो अत्यंत सन्निधही आहे."

"हा एक श्रद्धेचा विषय बनतो." डॉ. फॅन्री म्हणाले, "पण माझ्यासारख्या लोकाना तीव्र विवेचनशक्तीचा शाप प्राप्त झाला आहे ना. बुद्धानें जें शिकविलें आहे त्याहून अधिक श्रेष्ठ कांहीं आहे अथवा बुद्धाहून अधिक श्रेष्ठ असा कोणी गुरु आहे असें मला वाटत नाहीं. कारण जगांतील सर्व उपदेशकांपैकीं फक्त बुद्धानेंच सांगितलें कीं, "मी जें सांगतों त्यावरही अंधपणें विश्वास ठेवूं नका. कोणताही सिद्धान्त किंवा कोणताही ग्रंथ पूर्ण अचूक आहे असें समजूं नका." माझ्या दृष्टीनें कोणताही ग्रंथ पूर्ण अचूक असा नाहीं मग ते ग्रंथ कितीही स्फूर्तिजन्य असोत, कारण ते सर्व मानवांनींच लिहिलेले आहेत. म्हणून परमेश्वर

नांवाचा कोणी एक महाराजा मोठ्या श्वेतसिंहासनावर बसलेला आहे व तो आमच्या प्रार्थना ऐकत असतो, अशा सगुण ईश्वरावर माझी श्रद्धा बसूंच शकत नाहीं. तुमची प्रार्थना ही याहून भिन्न प्रकारची आहे हें पाहून मला आनंद होतो."

हा संवाद चालू असतां डॉ. फॅब्री एक शुद्ध बुद्धिवादी भूमिका मांडीत होते. ते स्वतः भगवद्गीता आणि धम्मपद या दोनहीं ग्रंथांचे उपासक असून ते ग्रंथ ते नेहमीं आपल्यापाशीं बाळगीत असतात. त्यांचा वरील युक्तिवाद ऐकून गांधीजी त्यांना म्हणाले, "माझी प्रार्थना इतराच्यांहून भिन्न भूमिकेवर केलेली असते, हें तुमचें म्हणणेंही अंशतःच खरें आहे, याची जाणीव मी तुम्हांस करून देऊं इच्छितों. जी एक बौद्धिक निष्ठा मीं तुमच्यापुढें मांडली तीच नेहमीं माझ्या मनांत असते असें नाहीं. एका अदृश्य शक्तीमध्यें विलीन होण्याची तीव्र निष्ठा मात्र माझ्यामध्यें सदैव जागृत असते. या दृष्टीनें एखादी गोष्ट मीं केली असें म्हणण्यापेक्षां ती परमेश्वरानेंच माझ्यासाठीं केली, हें म्हणणें अधिक सयुक्तिक आहे. माझ्या जीवनांत अशा अनेक गोष्टी घडलेल्या आहेत कीं, त्या घडाव्यात अशी मला तीव्र इच्छा होती, परंतु त्या मी केव्हांही घडवूं शकलों नसतों. माझ्या सहकाऱ्यांना मीं असेंही सांगितलें आहे कीं, माझ्या प्रार्थनेमुळेंच त्या घडल्या आहेत. त्या वेळीं माझ्या अंतःकरणांतील दैवी शक्तींत विलीन होण्याच्या माझ्या प्रयत्नामुळें त्या घडल्या आहेत, अशी भाषा मीं वापरलेली नाहीं. मी अगदीं सरळ व सोप्या भाषेंत असें म्हणूं शकतों कीं, परमेश्वरानें मला माझ्या अडचणींतून तरून नेलें आहे."

"पण तें तुमच्या कर्मांचेंच फळ होतें. तुम्ही सज्जन आहां आणि म्हणूनच तुमच्या बाबतींत चांगल्या घटना घडतात." डॉ. फॅब्री यांनीं उत्तर दिलें.

"तरीही हरकत नाहीं. अशा गोष्टी घडाव्यात इतकी सज्जनता माझ्यापाशीं नाहीं.....जरी कर्मांच्या नियतीवर माझा विश्वास आहे तरी मी अनेक गोष्टी करण्याचा प्रयत्न करतों. माझ्या जीवनाचा

प्रत्येक क्षण हा एक अधिक कर्म करण्याचा प्रयत्न आहे. जुन्या कर्माचे दुष्परिणाम नष्ट करून नव्या कर्मांत भर घालणें असा हा यत्न असतो. म्हणून माझ्या भूतकालीन सत्कर्मामुळें मला इष्ट अशा घटना घडतात हें म्हणणें बरोबर नाहीं. पूर्वकर्म लवकरच संपणार असून माझें भवितव्य निर्माण करतांना मला प्रार्थनेचा आश्रय करावा लागतो. केवळ कर्म हें सामर्थ्यही नाहीं. ही आगकाडी पेटवूं या असें मीं म्हटलें तरी मला त्या कामीं बाह्य उपाधींचें साहाय्य न मिळेल तर मला ती पेटवितां येणार नाहीं. ती काडी ओढण्यापूर्वीच कदाचित् माझा हात लुळा पडेल अथवा माझ्यापाशीं एकच काडी असल्यास वाऱ्यानें ती विझूनही जाईल. ही केवळ योगायोगाची गोष्ट आहे कीं तिच्यामागें ईश्वर आहे कीं एक श्रेष्ठ शक्ति आहे? माझे पूर्वज आणि माझीं मुलें बाळें जी भाषा योजतात तीच भाषा या घटनेसंबंधीं योजावी हें मला अधिक पसंत आहे. या बाबतींत मी एखाद्या मुलाहून अधिक श्रेष्ठ नाहीं. ग्रंथपांडित्यानें पुष्कळ मोठी भाषा आपण वापरूं शकूं, पण जेव्हां प्रत्यक्ष एखाद्या संकटाशीं आपली गांठ पडते, तीं आपत्ति आपल्यापुढें येऊन उभी राहते, तेव्हां लहान मुलांच्याप्रमाणें आपण रडूं लागतों आणि प्रार्थना करूं लागतों. अशा वेळीं आमचे बौद्धिक सिद्धान्त अथवा बौद्धिक श्रद्धा आम्हांस समाधान देऊं शकत नाहीं."

"मला हें माहीत आहे कीं, पुष्कळ मोठमोठ्या लोकांना ईश्वरावरील निष्ठेनें अनिर्वचनीय असें समाधान प्राप्त होतें आणि त्यांना शील-संवर्धनाच्या कामीं त्या श्रद्धेचा उपयोग होतो. पण इतर असेही कांहीं महान् आत्मे आहेत कीं, त्यांना या गोष्टीची गरज भासत नाहीं. बुद्ध-धर्मानें जर मला कांहीं शिकविलें असेल तर तें हेंच होय."

"पण बुद्धधर्माची दीक्षा हीच एक फार मोठी प्रार्थना आहे." गांधीजींनीं उत्तर दिलें.

"स्वतःच स्वतःचा उद्धार करावा असें बुद्धानें सांगितलें आहे. त्यानें कधीं प्रार्थना केली नाहीं. तो आत्मचिंतन करीत असे." डॉ. कॅव्ही यांनीं आपलें मत सांगितलें.

"त्याला तुम्ही कांहींही नांव द्या, पण ती वस्तु एकच आहे. बुद्धाच्या मूर्तीकडेच पहा."

"पण या मूर्तिही खऱ्या नाहींत. त्या बुद्धाच्या निधनानंतर ४०० वर्षांनंतर बनविलेल्या आहेत."

"ठीक आहे." गांधीजी म्हणाले, "बुद्धाचा तुम्हांस सांपडलेला इतिहास मला सांगा म्हणजे यावरूनही मी असें सिद्ध करीन कीं, बुद्ध प्रार्थना करीत असे."

यानंतर डॉ. फॅन्री यांनीं विचारलें, "पण ज्या लोकांना प्रार्थना करणें अशक्य वाटतें त्यांचें काय ?"

"नम्र बना—" गांधीजी म्हणाले, "असें मी त्यांना सांगेन. आणि तुमच्या स्वतःच्या विचारांनीं खऱ्या बुद्धीला तुम्ही मर्यादित करूं नका. जर प्रार्थना करण्याइतकी नम्रता त्याच्याजवळ नसती तर लक्षावधि जनतेच्या जीवनावर त्याचा प्रभाव पडूंच शकला नसता. बुद्धीपेक्षां अनंतपटीनें श्रेष्ठ अशी एक शक्ति आहे आणि तिचें प्रभुत्व आमच्यावर आणि नास्तिकावरही चालू आहे. त्यांचा संशयवाद आणि त्यांचें तत्त्वज्ञान हीं त्यांच्या जीवनांतील आपत्कालीं त्यांच्या उपयोगी पडूं शकत नाहींत. अशा प्रसंगीं त्याहून श्रेष्ठ असें कांहीं तरी जें त्यांच्याबाहेर आहे, त्याची त्यांना गरज असते. म्हणून जर माझ्यापुढें कोणीं युक्तिवादाचे कांहीं पेंच उभे केले तर मी त्यांस म्हणतों कीं, जोंपर्यंत तुम्हीं आपणांस शून्यवत् बनविलें नाहीं तोंपर्यंत तुम्हांस ईश्वर या शब्दाचा अर्थ समजूं शकणार नाहीं. तुम्हांस हें समजलें पाहिजे कीं, तुम्ही कितीही मोठे असलां, तुमची बुद्धि केवढीही विशाल असली तरी या विश्वांतील एक कणच तुम्ही आहां. जीवनांतील वस्तूंचें आकलन करण्यास केवळ बुद्धि ही केव्हांही अपुरीच असते. बुद्धीला आकलन न होणारी अशी आध्यात्मिक निष्ठा हीच आपणांस समाधान देऊं शकते. मोठमोठ्या धनिकांवर आपत्ति येतात. पैशानें व ममतेनें मिळणाऱ्या सर्व वस्तु त्यांच्यापाशीं असतात. पण तरीही त्यांना पूर्ण असमाधान असतें. अशा क्षणीं परमेश्वराचें दर्शन आपणांस घडतें. तो आपणां सर्वांचें मार्गदर्शन करीत असतो हीच एक प्रार्थना आहे."

"ज्याला आम्ही आध्यात्मिक सत्याचा अनुभव असें म्हणूं तसाच तुमचा अर्थ दिसतो. हा आत्मानुभव केवळ बौद्धिक विचाराहून श्रेष्ठ आहे." डॉ. फॅन्री म्हणाले, "असा अनुभव मला जीवनांत दोनदां आलेला आहे. पण पुढें तो नष्ट झाला. मला आतां बुद्धाच्या एकदोन वचनांपासूनच खरें समाधान लाभतें. 'सर्व दुःखाचें कारण स्वार्थ हें आहे. भिक्षूनो, हें लक्षांत ठेवा कीं, प्रत्येक वस्तु क्षणभंगुर आहे.' ह्या दोन वचनांचें चिंतन करणें हीच माझी श्रद्धा बनली आहे."

"यालाच मी प्रार्थना म्हणतों." गांधीजींनीं निष्ठापूर्वक विधान केलें.

वरील संवाद वाचिला असतां महात्मा गांधींची ईश्वरनिष्ठेसंबंधीं आणि प्रार्थनेसंबंधीं किती व्यापक कल्पना होती तें आपणांस दिसून येईल. आत्मोद्धार अथवा आत्मोन्नति यासाठीं केलेलें अंतःकरणपूर्वक चिंतन यालाही ते प्रार्थना असेंच नांव देतात. आणि सत्यनिष्ठेसाठीं ईश्वरवादाचा त्याग करून निरीश्वरवादाचा स्वीकार करणाऱ्यांनाही ते ईश्वरनिष्ठच समजतात. गौतम बुद्धाचें ध्यान आणि समाधि यांनाही ते प्रार्थना असेंच नांव देतात. बुद्ध आणि महावीर हे त्यांच्या व्याख्येप्रमाणें ईश्वनिष्ठच होते. तसेंच आधुनिक काळांतील ब्रॅडलॉ किंवा बर्नॉर्ड शॉ यांच्या निष्ठेसही ते धर्मनिष्ठा असेंच नांव देतात. मनुष्याला आत्मानुभव प्राप्त झाला पाहिजे. त्याची प्रज्ञा स्थिर बनली पाहिजे. त्याच्या अंतःकरणांतिल सर्व वासना त्याच्या काबूंत आल्या पाहिजेत. कोणतीही हीन वासना अथवा हीन संकल्प त्याच्या अंतःकरणांत जागृत होतां कामा नये. त्याची बुद्धि सदैव सत्यनिष्ठ म्हणजे न्यायनिष्ठच राहिली पाहिजे आणि त्याची वृत्ति निरहंकार, निर्मळ अशी बनून विश्वशक्तीशीं तो एकरूप बनला पाहिजे. यासाठीं अंतःकरणानें व बुद्धीनें मनुष्य जो यत्न करतो त्या यत्नास महात्मा गांधी हे प्रार्थना असें नांव देतात. आपणच आपला उद्धार केला पाहिजे हें जितकें खरें आहे तितकेंच आपण ज्या शक्तीला "मी" असें म्हणतों ती शक्ति एकंदर विश्वशक्तीचा एक कण किंवा एक बिंदुमात्र आहे, आणि तिच्या पाठीमागें विश्वचैतन्याची सर्व शक्ति उभी आहे हेंही खरें आहे.

आपणांस ती प्राप्त करून घेतां येईल किंबहुना आपला 'मी' या शक्तींत पूर्णपणें विलीन होईल, त्याच वेळीं आपल्या अंगीं विश्वावर प्रेम करण्याचें आणि त्याची सेवा करण्याचें सामर्थ्य निर्माण होईल, ही जी श्रद्धा तीच गांधीजींची जीवननिष्ठा होय. ही केवळ अंधश्रद्धा नसून त्या निष्ठेच्या आधारावर त्यांनीं आपलें सर्व जीवन उभारलेलें होतें, आणि त्या निष्ठेनें ते आपल्या जीवनांतील सर्व प्रयोग करीत होते. हे प्रयोग करीत असतांना त्यांना आपली ही निष्ठा आपल्या अनुभवास उतरत आहे असा प्रत्यक्ष अनुभव येत होता. या अनुभवाचें वर्णन करतांना तें अगदीं बालबुद्धीला आणि सामान्य जनतेला आकलन करतां येईल अशा शब्दांनीं वर्णन ते करीत असत. ईश्वरप्राप्ति, आत्मानुभव, निर्वाणपद अथवा ब्रह्मनिर्वाण अशा अनेक शब्दांनीं हा अनुभव आजपर्यंत हिंदुस्थानांत व्यक्त करण्यांत आलेला आहे. कोणीं या अनुभवास 'सिद्धावस्था' असें नांव देतात. कोणीं त्याचें वर्णन करितांना 'द्वंद्वातीत निस्त्रैगुण्य अवस्था' असें तिला म्हणतात. अशा अनेक शब्दांनीं आणि अनेक दृष्टान्तांनीं या आत्मानुभूतीचें वर्णन केलेलें आपणांस आढळतें. आपण सर्व बालकें आहोंत आणि आपणां सर्वांच्या अंतःकरणांत वसत असणारा अंतर्यामी परमात्मा हा आपला पिता आहे अशा भाषेनें कोणी या अनुभवाचें वर्णन करतो. तर कोणी हें सर्व विश्व हा एक प्रचंड सागर असून त्यांत उठणारे अनंत तरंग हेच त्यांतील जीवात्मे होत असें म्हणून आपल्या सर्वांच्या अंतःकरणांत एकाच चैतन्य-सागराची शक्ति कार्य करीत आहे याचें ज्ञान होणें हाच आत्मानुभव होय असें म्हणतात. एकच आकाश सर्व घटांमध्यें भरलेलें आहे, त्याप्रमाणें एकच विश्वशक्ति सर्व जीवांमध्यें वसत आहे हा अनुभव घेणें आणि निस्वार्थी बनून सर्व प्राणिमात्रांची सेवा करण्यांत आनंद उपभोगतां येणें हाच खरा आत्मानुभव होय असेंही कोणी या अवस्थेचें वर्णन करतात. अशीं अनेकविध वर्णनें अनेक आत्मानुभवी महात्म्यांनीं केलेलीं असलीं तरी त्या सर्वांचा अनुभव मूलतः एकच आहे. त्यांचे केवळ

शब्द भिन्न आहेत असें महात्मा गांधी मानीत असत. त्यांच्या दृष्टीनें आत्मानुभूतीच्या निरनिराळ्या शब्दांत केलेल्या निरनिराळ्या वर्णनांतून जीं अनेक दर्शनें अथवा तत्त्वज्ञानें निघालीं त्यांच्यांतील तार्किक वादविवादांत फारसा तथ्यांश नाहीं. तें एक शब्दजंजाळ आहे. या तार्किक शब्दजंजाळाच्या पलीकडे गेल्यास सर्व धर्मपुरुषांचा आणि महान् पुरुषांचा आत्मानुभव हा एकच असून त्याची प्राप्ति आपणांस करून घेणें हेंच सर्व धर्मांचें रहस्य आहे. वेदान्त, सांख्य, बौद्ध, जैन, इत्यादि सर्व दर्शनें एकाच आत्मानुभूतीच्या आधारावर उभारलेलीं आहेत. फक्त त्या अनुभवाचीं त्यांनीं केलेलीं वर्णनें आपापल्या बुद्धीस अनुसरून भिन्न भिन्न केलेलीं आहेत. शंकराचार्यांनीं हेंच मत पुढील श्लोकांत व्यक्त केलेलें आहे.

"न सांख्यम्, न शैवम्, न तत्पांचरात्रम्, ।
न जैनम्, न मीमांसकादेर्मतम् वा ॥
विशिष्टानुभूत्या विशुद्धात्मकत्वात् ।
तदेकोऽवतिष्ठः शिवः केवलोऽहम् ॥"

असें असलें तरी गौतमबुद्ध आणि महावीर यांच्यासारखे अज्ञेयवादी व निरीश्वरवादी हेही ईश्वरानिष्ठच आहेत हें महात्मा गांधींचें म्हणणें तर्कदृष्टीनें जर बरोबर असेल, तर याच्या उलट बौद्धधर्मी व जैनधर्मी लोक असेंही म्हणूं शकतील कीं, वेदान्तीही हे वस्तुतः अज्ञेयवादी अथवा निरीश्वरवादीच आहेत. म्हणून हा तार्किक युक्तिवाद फारसा समाधानकारक वाटत नाहीं. तथापि या प्रश्नांच्याकडे गांधीजींची पहाण्याची दृष्टि कोणती होती तें लक्षांत येण्यासाठीं वरील विवेचन केलेलें आहे. ईश्वरवाद, निरीश्वरवाद अथवा अज्ञेयवाद या जर जीवनांतील निष्ठा असतील, तर त्यांच्या बुडाशीं असणारा अनुभव कोणत्या शब्दांनीं, सिद्धान्तांनीं किंवा दृष्टान्तांनीं अधिकांत अधिक यथार्ततेनें विशद होऊं शकतो, यासंबंधींचे वाद नेहमीं चालूच राहणार. या वादांपासून तत्त्वज्ञानाच्या विचारांत महत्त्वाची भर पडतच राहील. मात्र हे वाद अखेरीस आत्मानुभूतीचें वर्णन कसें करतां येईल यासंबंधींचे

आहेत हें लक्षांत घेऊन त्या आत्मानुभूतीनें आपण स्वीकारलेल्या सिद्धान्ताचें सत्यत्व पडताळून पाहणें हें आपलें कर्तव्य आहे आणि तें कर्तव्य शुद्ध, सत्यनिष्ठ परंतु अनाग्रही व संप्रदायशून्य दृष्टीनें आपण करीत राहिलें पाहिजे, हा महात्मा गांधींच्या सर्व उपदेशाचा गाभा होता असें म्हणतां येईल.

आज आपण बुद्धिस्वातंत्र्याचे उपासक बनलों आहोंत. बुद्धिप्रामाण्य, अंतःकरणप्रामाण्य या सर्वांहून अखेरीस आत्मप्रामाण्य हेंच श्रेष्ठ आहे, असें गांधीजींचें मत असल्यानें ते या आत्मप्रामाण्यास व आत्मानुभूतीस फार महत्त्व देत असत. आणि त्या आत्मानुभूतीच्या मानानें ईश्वरवाद, निरीश्वरवाद अथवा अज्ञेयवाद हे सर्व वाद सत्यनिष्ठेच्या दृष्टीनें व उच्चार्थानें विचार केल्यास क्षुद्र व केवळ शाब्दिक आहेत असें त्यांचें मत होतें. सत्यनिष्ठ मनुष्य जर अहिंसावादी असेल तर तो त्यांना प्रिय होता, आणि ईश्वरनिष्ठ म्हणविणारा मनुष्य जर ईश्वराच्या नांवानें हिंसावादाचा पुरस्कार करीत असेल तर तें त्यांना केव्हांही प्रिय होणें शक्य नव्हतें. एकदां त्यांना असा प्रश्न विचारण्यांत आला होता कीं, जे निरीश्वरवादी आहेत किंवा ज्यांची धर्मावर श्रद्धा नाहीं त्यांचें मतपरिवर्तन कसें करावें? त्यावर ते म्हणाले, " हें परिवर्तन करण्याचा एकच मार्ग आहे. जो परमेश्वराचा खरा सेवक आहे, तो आपल्या शुद्धतेनें आणि सदाचारानेंच निरीश्वरवाद्याचें मतपरिवर्तन करूं शकेल. ही गोष्ट युक्तिवादानें केव्हांही करतां येणार नाहीं. " ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्यासाठीं असंख्य पुस्तकें लिहिलेलीं आहेत, आणि केवळ युक्तिवादाचा जर प्रभाव पडूं शकला असता तर जगांत आज एकही निरीश्वरवादी उरला नसता. पण वस्तुस्थिति अगदीं याच्या उलट आहे. या विषयावर कितीही वाङ्मयनिर्मिति झाली असली तरी निरीश्वरवाद वाढतच आहे; तथापि पुष्कळ वेळां जो मनुष्य स्वतःस निरीश्वरवादी म्हणवतो तो वस्तुतः तसा नसतो आणि याचा व्युत्क्रम सिद्धान्तही तितकाच खरा आहे. (म्हणजे जे ईश्वरवादी म्हणवतात ते सर्व तसे नसतात.) अनेक वेळां निरीश्वरवादी म्हणतात, " तुम्ही आस्तिक आहां म्हणूनच आम्ही नास्तिक आहोंत. " आणि असें

म्हणण्याचा त्यांना हक्क आहे. कारण स्वतःला आस्तिक म्हणविणारे वस्तुतः पुष्कळ वेळां तसे नसतात. अनेक लोक केवळ तशी रूढि आहे, म्हणून ईश्वराची उपासना करतात किंवा दुसऱ्यांना फसविण्यासाठीं तसें करितात, मग अशा लोकांना निरीश्वरवाद्यांवर प्रभाव कसा पाडतां येईल? म्हणून आस्तिकांनीं हें जाणलें पाहिजे आणि त्यांची अशी श्रद्धा असली पाहिजे कीं, जर आपण खरोखर इश्वरनिष्ठ राहिलों तर आपले शेजारीही सहजवृत्तीनेंच नास्तिक बनणार नाहींत. सर्व जगाची चिंता वाहण्याची जबाबदारी ईश्वरवाद्यांनीं आपणांवर घेऊं नये. निरीश्वरवादी सुद्धां ईश्वराच्या अनुज्ञेमुळेंच निर्माण झालेले आहेत हें आपण विसरूं नये. केवळ ईश्वराचें नांव घेणारे हे ईश्वरनिष्ठ नव्हेत; तर जे त्याच्या इच्छेप्रमाणें वागतात, तेच ईश्वरनिष्ठ होत, ही म्हण किती खरी आहे!" ('Harijan', September, 1940. p. 269)

येथपर्यंत सत्यनिष्ठा आणि ईश्वरनिष्ठा यांच्यासंबंधीं विवेचन केलें. त्याचा थोडक्यांत सारांश असा सांगतां येईल कीं, सामाजिक नीतीच्या व व्यवहाराच्या दृष्टीनें न्यायनिष्ठा हीच सत्यनिष्ठा होय आणि न्याय हें सामाजिक सत्य होय. न्याय आणि अन्याय अथवा सत्य व असत्य यांचा विवेक प्रत्येकानें आपापल्या मनोदेवतेस जागूनच करावयास शिकलें पाहिजे. पण ज्याला मनोदेवतेच्या आज्ञेनुसार वर्तन करण्याचें स्वातंत्र्य उपभोगावयाचें असेल आणि न्यायाचें अथवा सत्याचें संशोधन करण्यासाठीं स्वतः प्रयोग करावयाचे असतील, त्यानें न्याय-संशोधन आणि न्यायसंस्थापना करण्याच्या कामीं अहिंसेच्या साधनाचा उपयोग केला पाहिजे. अहिंसेच्या साधनानें न्यायाचें संशोधन आणि संस्थापना करणें हीच सत्याग्रही जीवननिष्ठा असून ती जीवननिष्ठा ज्यांनीं स्वीकारली त्यांनीं ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह इत्यादि व्रतें स्वीकारून आपली आत्मशुद्धि करीत राहिलें पाहिजे. ही आत्मशुद्धि करण्यासाठीं त्यांनीं समाजसेवाही केली पाहिजे. समाजाचा उद्धार हें आत्मोद्धाराचें साधन त्यांनीं बनविलें पाहिजे. आणि आत्मोद्धाराच्या साधनेवांचून खरी समाजसेवा अथवा समाजाचा उद्धार आपणांस करतां येणार नाहीं, अशी निष्ठा बाळगून

समाजसेवकांनीं आत्मोद्धाराच्या प्रयत्नांत खंड पाडतां कामा नये. अहिंसेनें सत्याचें संशोधन व संस्थापना करणें ही दीक्षा घेऊन लोकसेवेचें कार्य करणाऱ्यांना राजसत्तेनें केलेले कायदे, समाजांत असलेल्या रूढि आणि धर्मग्रंथांत सांगितलेलीं बंधनें हीं जेव्हां अन्यायाचीं असल्याचें आढळून येईल, तेव्हां त्यांनीं न्यायासाठीं कायद्यांचा, समतेसाठीं सामाजिक रूढीचा, आणि सत्यासाठीं म्हणजे आत्मप्राप्तीसाठीं धर्मबंधनांचाही भंग करण्यास विनीत भावानें सिद्ध झालें पाहिजे, असें महात्मा गांधींचें मत होतें. अर्थात् या मतानुसार आचरण करणाऱ्यांना प्रसंगीं राजसत्तेशीं असहकार करण्याचें शिक्षण जनतेला देणें भाग पडतें. आणि जनतेवर लादलेले जुलुमाचे कायदे अनत्याचारी वृत्तीनें मोडण्याचें शिक्षणही जनतेस देणें हें त्यांचें कर्तव्य बनतें. हें राजकारण सत्याग्रही निष्ठेत अंतर्भूत झालेलें आहे. जर एखादी राज्यसंस्था जनतेच्या सर्व प्रकारच्या विकासाच्या आड येत असेल तर सार्वत्रिक अनत्याचारी असहकारी आणि सविनय कायदेभंग या साधनांच्या सहाय्यानें ती राजसंस्था लुळी पाडून तिच्यांत राज्यक्रांति घडवून आणणें हेंही सत्याग्रही नेत्यांचें अथवा लोकसेवकांचें अशा प्रसंगीं आद्य कर्तव्य बनत असतें. हाच न्याय सामाजिक, आर्थिक अथवा धार्मिक क्रांतीसही लागू पडतो. यामुळें सत्याग्रहनिष्ठा ही एक क्रांतिकारक शक्ति बनूं शकते. या सिद्धान्ताचा प्रत्यय महात्मा गांधींनीं ब्रिटिश राज्यकर्त्यांना आणि हिंदी जनतेला आणून दिलेला आहे. हा प्रत्यय त्यांच्या निधनानें नष्ट होणार नाहीं. हिंदी जनता आणि तिची सेवा करणारे लोकसेवक हे या सत्याग्रही निष्ठेच्या आत्मप्रत्ययानें जर यापुढें वागत राहतील तर ते जगाला एक सर्वांगीण क्रांतीचें अहिंसक तंत्र दाखवून देऊं शकतील. मात्र त्यांनीं सत्याग्रही निष्ठेचें खरें स्वरूप समजून घेऊन त्या निष्ठेस लागणारीं व्रतें पाळण्याचा निर्धार कायम ठेविला पाहिजे.

अहिंसेचें सामर्थ्य

आतां अहिंसेनें सत्याची संस्थापना करावयाची या निष्ठेपैकीं

अहिंसेचा अर्थ किती खोल आणि व्यापक आहे त्याचा थोडा विचार करूं. सत्याचें अथवा न्यायाचें संशोधन आणि संस्थापन या दोनही कार्यांत अहिंसावृत्तीची अत्यंत आवश्यकता आहे, ही गोष्ट महात्मा गांधींनीं जितक्या खोल अर्थानें जगापुढें मांडिली आहे तितक्या अर्थानें ती त्यांच्यापूर्वी कोणींही मांडलेली नव्हती असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या गोष्टीचा विशेष संबंध राज्यसंस्थेशीं आणि राजकारणाशीं येत असतो. राज्यसंस्था ही न्यायसंस्थापनेचें कार्य करीत असते आणि या न्यायसंस्थापनेच्या कार्यासाठीं राजदंडाचा उपयोग करीत असते. श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें, "परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय" म्हणजे साधूंच्या रक्षणासाठीं, दुष्टांच्या विनाशासाठीं आणि धर्माच्या संस्थापनेसाठीं म्हणजेच न्यायाच्या संस्थापनेसाठीं राजदंडाचा उपयोग करण्यांत यावा असें राज्यशास्त्राचें मत आहे. यांत न्यायसंस्थापना म्हणजे सामाजिक सत्याची संस्थापना हें साध्य असलें तरी साधूंच्या रक्षणार्थ आणि दुष्टांच्या विनाशार्थ दंडशक्तीचा उपयोग करणें हें साधन समर्थनीय मानिलेलें आहे. महात्मा गांधींच्या साधनशुद्धीचा सिद्धान्त येथें लागू पडत नाहीं. दुष्टाची हिंसा करणें हें सत्याच्या अथवा न्यायाच्या संस्थापनेचें साधन होऊं शकत नाहीं, असें गांधीजींचें मत आहे. दुष्टाची हिंसा अथवा त्याचा विनाश न करतां त्याचें हृदय-परिवर्तन करणें हें अहिंसेच्या साधनानें सत्याची संस्थापना करण्याचें स्वरूप आहे. जो हिंसेचें साधन वापरून न्यायाची अथवा सत्याची संस्थापना करूं लागतो तो समाजांत एक प्रकारची शांतता स्थापन करीत असला तरी त्या साधनामुळें दुष्टांच्या हृदयपरिवर्तनाचें कार्य होऊं शकत नाहीं. राजदंडाच्या आश्रयानें न्यायाची संस्थापना करणें हा धाकाचा अथवा दहशतीचा मार्ग आहे. या मार्गाचें अवलंबन करणाऱ्यांना आपण साधनशुद्धीचा सिद्धान्त अवलंबीत आहों असें म्हणतां येत नाहीं. यासंबंधीं ता. ४ नोव्हेंबर १९३९ च्या 'हरिजनां'त म. गांधी आणि गांधी-सेवा-संघाचे कार्यकारी मंडळ यांच्या दरम्यान झालेला राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळाच्या धोरणाबद्दलचा एक संवाद प्रसिद्ध

झाला आहे. त्यांतील पुढील प्रश्नोत्तरें अत्यंत महत्त्वाचीं म्हणून पुढें देत आहें :—

प्रश्न—" पण असें घडणार नाहीं का कीं, मंत्री हा जर अहिंसा-निष्ठ असेल तर तो किमान प्रमाणांतच हिंसा करील आणि जर त्याचा अहिंसेवर विश्वास नसेल तर अशी मर्यादा तो पाळणार नाहीं ?"

उत्तर—" हा विश्वास शुद्ध भ्रमच आहे. जे कोणी आज हिंसेचा उपयोग करीत आहेत ते सर्व असाच दावा करीत असतात. हिटलर-सुद्धां हेंच म्हणे. जनतेचा अत्याचार थांबविण्यासाठींच जनरल डायरनें गोळीबार केला आणि त्याचा लॉर्डांच्या सभेनें वीरपुरुष म्हणून टाळ्या वाजवून सन्मान केला. सोव्हिएट रशियाचासुद्धां असा विश्वास आहे कीं, आपण जें हिंसेचें साधन वापरीत आहों तें केवळ संक्रमण-कालापुरतेंच असून त्यामुळें अनत्याचारी समाजरचना स्थापन होणार आहे. एवढीच जोंपर्यंत आमची विचाराची व आचाराची अवस्था आहे तोंपर्यंत आपला संघ बंद करून ज्याला त्याला अनिर्बंधपणें आत्मविकास करण्याची मोकळीक देणें हेंच योग्य होईल."

यानंतर गांधीजींनीं असें स्पष्टीकरण केलें कीं, " मीं हुदलीच्या संमेलनांत दोन वर्षांपूर्वी (१९३७) संघाच्या सभासदांनीं निवडणुकीस सहाय्य करावें आणि त्यांच्यापैकीं कांहीं श्रेष्ठ व्यक्तींनीं कायदेमंडळात निवडून यावें असा सल्ला दिला तो त्या वेळच्या वातावरणांत दिला. पण तसा सल्ला मी आज देऊं शकत नाहीं. वास्तविक आतां असा काळ येत आहे कीं, ज्या वेळीं तुमच्यापैकीं ज्यांचा शूराच्या अहिंसेवर विश्वास असेल त्यांनीं मीं जशी १९३४ सालीं काँग्रेस सोडिली तशी काँग्रेस सोडावी. "

राष्ट्रसभेनें मंत्रिमंडळावर असतांना शांततारक्षणासाठीं जे गोळीबार केले त्यांस उद्देशूनच वरील संवाद झालेला आहे. त्यावरून दिसून येईल कीं, दुष्टाची हिंसा करून न्यायाची संस्थापना करतों म्हणणाऱ्या राजकारणी मुत्सद्यांचें आणि सैनिकांचें धोरण अथवा त्यांची निष्ठा महात्मा गांधींच्या सत्याग्रही निष्ठेंत बसत नाहीं. राजदंड धारण

करणाऱ्या व्यक्तींचें साध्य शुद्ध असलें तरी त्यांचें साधन अशुद्ध असतें. सत्याग्रहीनिष्ठेत साधनशुद्धीचा सिद्धान्त हा आधारभूत असल्यानें राजदंड हातीं घेऊन त्याच्या आधारें जें राजकारण होत असतें तें राजकारण सत्याग्रही व्यक्तीस करतां येणार नाहीं. सत्याग्रहाचें ध्येय राजदंडाचा आश्रय करणारी राजसंस्था विशिष्ट प्रमाणाबाहेर तत्त्वभ्रष्ट झाली असता तिचा प्रतिकार करून तिला योग्य मार्गावर ठेवणें असा असतो. समाजधारणेला आज राजदंडाची आवश्यकता आहे हें ओळखून सत्याग्रही लोकसेवक अशा राजदंडधारी संस्थेशीं अथवा पक्षाशीं त्याचें धोरण परीक्षून पाहून प्रसंगानुसार सहकार्य करतील अथवा असहकार करतील, परंतु स्वतः राजदंड हातीं घेऊन दुष्टांचाही विनाश करण्यास ते प्रवृत्त होणार नाहींत. सत्याग्रही व्यक्तींनीं स्वतःच्या संरक्षणासाठीं सुद्धां हिंसेचा आश्रय करतां उपयोगी नाहीं. जीवित आणि वित्त यांच्या मोहांतून मुक्त होण्याचा नित्य प्रयत्न त्यांनीं करीत राहिलें पाहिजे. आणि दुष्टावरही प्रेम करून अथवा त्याची कींव करून त्याचें हृदयपरिवर्तन करण्याचें कार्य करीत राहिलें पाहिजे. समाजांत दुष्ट प्रवृत्ति वाढण्याचीं जीं कारणें असतील तीं दूर करण्यासाठीं त्यांनीं झटत राहिलें पाहिजे.

अहिंसा व आर्थिक घटना

समाजांत दुष्ट प्रवृत्ति वाढण्यास वित्ताचा लोभ आणि संग्रहबुद्धि हीं दोन प्रमुख कारणें आहेत. आजची भांडवलशाही आर्थिक घटना व्यक्तीचा लोभ आणि संग्रहबुद्धि यांच्यावर आधारलेली असून आर्थिक व्यवहारांत सत्यासत्याचा विवेक करण्याचें कारण नाहीं आणि आर्थिक व्यवहाराशीं न्यायनीतीचा कांहीं संबंध नाहीं अशी समजूत आज रूढ झालेली आहे. आर्थिक, राजकीय व सामाजिक अशा सर्व व्यवहारांवर धर्माचें नियंत्रण असलें पाहिजे, असें मध्ययुगीन समाजघटनेचें आद्य तत्त्व होतें. हें तत्त्व हिंदु, मुसलमान व ख्रिस्ती या सर्व धर्माच्या समाजांत मध्ययुगांत सर्वमान्य झालेलें होतें. या ठिकाणीं धर्म या शब्दाचा अर्थ विशिष्ट सांप्रदाय असा न करतां सर्व धर्मांना

सामान्य अशी जीं न्यायाचीं व नीतीचीं तत्त्वें तीं, असा केल्यास धर्माधिष्ठित मध्ययुगीन समाज हा आजच्या भांडवलशाही समाजापेक्षां अधिक सुसंस्कृत होता, निदान त्याचें गृहीत तत्त्व अधिक शुद्ध होतें असें म्हणावें लागतें. परंतु असें म्हणतांना धर्म म्हणजे विशिष्ट धर्मसंप्रदाय असा अर्थ मात्र करतां कामा नये. तसेंच ही जी सामाजिक नीति अथवा नीतिबंधनें समाजाच्या सर्व व्यवहारांवर सत्ता गाजविणारीं अशीं असावीं असें आपणास वाटतें तीं नीतिबंधनें समाजाच्या आर्थिक व इतर भौतिक परिस्थितींत घडणारे बदल लक्षांत घेऊन बदलीत गेलें पाहिजे याचीही जाणीव आपण ठेवली पाहिजे. सामाजिक नीतिबंधनांना धर्म ही संज्ञा देण्यानें समाजाच्या सर्व व्यवहारांवर नीतीचें नियंत्रण असावें, असा बोध व्हावयाचा, तर त्याचबरोबर हीं सामाजिक नीतिबंधनें परिस्थित्यनुसार बदलणारीं आणि सर्व धर्म-संप्रदायांना आधारभूत अशीं सामान्य नीतितत्त्वें असलीं पाहिजेत, याचीही जाणीव ठेविली पाहिजे. अर्थात् समाजाच्या आर्थिक घटनेला नैतिक अधिष्ठान असलें पाहिजे आणि आर्थिक व्यवहार करीत असतां व्यक्तीनें न्यायबुद्धीला जागून ते केले पाहिजेत. ही सत्याग्रही दृष्टि महात्मा गांधींनीं स्वीकारल्यामुळें आर्थिक व्यवहारांवर नीतीचें बंधन नसावें आणि प्रत्येक व्यक्तीच्या स्वार्थाला व लोभाला केवळ इतर व्यक्तींच्या स्पर्धेचें व स्वार्थाचें बंधन पडेल तेवढें पुरें आहे, या मतावर आधारलेलें व्यक्तिवादी अर्थशास्त्र आणि भांडवलदारी आर्थिक घटना हीं सैतानी आहेत अथवा अनर्थावह आहेत असें महात्मा गांधींना वाटत असे. व्यक्तिवादी अर्थशास्त्र आणि भांडवलदार आर्थिक घटना यांच्याकडे पाहण्याची ही दृष्टि महात्मा गांधींना रस्किनच्या " Unto this last " (सर्वोदय) या ग्रंथावरून लाभली अथवा तो ग्रंथ वाचल्यानंतर त्यांची ही दृष्टि अधिक साफ होऊन त्यांना आधुनिक भांडवलदार संस्कृतीचें अनर्थावह स्वरूप अधिक विशद झालें. या वेळेपासून त्यांना आर्थिक समता हाच समाजाचा पाया असला पाहिजे असें वाटूं लागलें. शरीरश्रम करून प्रत्येकानें समाजाच्या भौतिक संपत्तींत भर घातली पाहिजे. दुसऱ्याच्या श्रमाचें फल आपण

उपभोगतां कामा नये आणि आपल्या श्रमाचें फलही योग्य गरजेच्या पलीकडे स्वतः उपभोगूं नये व तें समाजास अर्पण करावें. या तीन तत्त्वांवर समाजाची आर्थिक घटना उभारली जावी असा या आर्थिक समतेचा अर्थ आहे. हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत सांगावयाची तर श्रम, अस्तेय, आणि असंग्रह हीं समाजाच्या आर्थिक घटनेचीं आधारभूत तत्त्वें मानिलीं जावींत असें सांगतां येईल. आजची भांडवलदार संस्कृति ही स्तेयमूल आणि संग्रहप्रधान आहे. कामगार-वर्गाच्या श्रमाचें फल त्यांना केवळ पोटास पुरेल इतकें वेतन देऊन कारखानदार-वर्ग केवळ स्वामित्वाच्या हक्कावर उपटीत असतो. आजच्या समाजांत कर्जाचें व्याज, जमिनीचा खंड, आणि कारखानदारीचा नफा असे केवळ स्वामित्वाच्या हक्कांनीं द्रव्यार्जन करण्याचे तीन मार्ग कायदेशीर गणले जातात. आर्थिक समतेच्या दृष्टीनें विचार केल्यास हे मार्ग कायदेशीर असले, तरी ते दुसऱ्याच्या श्रमाचें फल लुबाडणारे असल्यामुळें ती कायदेशीर चोरी आहे असें म्हणावें लागतें. धनोत्पादनाचीं साधनें मोठीं बनल्यामुळें ही कायदेशीर चोरी फार मोठ्या प्रमाणांत चालू झाली आहे आणि या चोरीमुळें जो धनसंग्रह होत आहे त्या धनसंग्रहानें समाजांतील बहुतेक कष्टजीवी व्यक्तींना दारिद्र्य आणि दास्य हीं भोगावीं लागत आहेत. आजच्या समाजांत चालू असलेलें हें स्तेय बंद करण्यास कारखाने, जमिनी व पेढ्या यांच्यावर समाजाचें स्वामित्व प्रस्थापित करणें यावांचून दुसरा मार्ग दिसत नाहीं. म्हणूनच समाजवादाची निर्मिति आज झाली आहे आणि हा समाजवाद सत्याग्रही मार्गानें स्थापन झाल्यास तो आपणांस मान्य आहे असें महात्मा गांधी म्हणत होते. तथापि हा समाजवाद लोकशाही स्वरूपाचा आणि विकेंद्रित आर्थिक घटनेचा असला पाहिजे असाही त्यांचा आग्रह होता. हें घडण्यास एक आर्थिक व सामाजिक क्रांति करावी लागणार आहे आणि या आर्थिक व सामाजिक क्रांतीचें साधन सत्याग्रह हेंच असलें पाहिजे असेंही त्यांचें मत होतें. श्रम, अस्तेय आणि असंग्रह या तीन व्रतांचा सामाजिक व आर्थिक घटनेच्या दृष्टीनें

आज अर्थ केल्यास तिला समाजवादी लोकशाहीचें स्वरूप येईल असें स्थूल मानानें म्हणतां येईल. अशा आर्थिक समतेच्या अभावीं जी लोकशाही स्थापन होते ती लोकशाही समाजांत भांडवलदार पद्धति अस्तित्वांत असेपर्यंत भांडवलदारांच्या प्रभुत्वाखालीं जात असते. अशा भांडवलदार लोकशाहीचें राज्य हें खरें लोकशाही राज्य होऊं शकत नाहीं. कारण भांडवलदार उत्पादनपद्धतींत अंतर्भूत झालेली कायदेशीर चोरी त्यांत चालू असते. या दृष्टीनें विचार केल्यास समाजांतील मोठ्या उत्पादनसाधनांवर आज असलेली खासगी मालकी नाहींशी करून त्यांच्यावर समाजाचें स्वामित्व प्रस्थापित करणें हा एक अस्तेय तत्त्व प्रस्थापित करण्याचा मार्ग आहे असें दिसून येईल. या दृष्टीनें समाजवादाची प्रस्थापना ही अस्तेयाची प्रस्थापना असें म्हणावें लागतें.

असंग्रह आणि अस्तेय या दोहोंत एक फरक आहे. अस्तेय म्हणजे दुसऱ्याच्या श्रमानें निर्माण झालेलें फळ लुबाडून न घेणें. आपला संग्रह वाढविण्याचा स्तेय हा एक मार्ग आहे. परंतु अशी चोरी न करतां आपली संपत्ति स्वतःच्या श्रमानें वाढली तरीही तिचा संग्रह आवश्यक गरजांच्या पलीकडे करूं नये. ही वृत्ति असंग्रह व्रताच्या बुडाशीं आहे. हा भेद लक्षांत घेतल्यास समाजवादाची प्रस्थापना करणें म्हणजे असंग्रहाचें तत्त्व समाजावर लादणें हें म्हणणें बरोबर नाहीं. समाजवाद असंग्रहाचें तत्त्व कायद्यानें लादूं इच्छीत नाहीं ; तर तो केवळ अस्तेयाचें तत्त्वच कायद्यानें लादूं पहात आहे असें म्हणावें लागेल. चोरीनें होणारा संग्रह कायद्यानें थांबवावा यावरच त्याचा मुख्य कटाक्ष आहे. दुसऱ्याच्या श्रमाच्या फळाचा अपहार हा कायद्यानें थांबविणें जितकें शक्य आहे, तितकें स्वतःच्या श्रमाच्या फळांचा संग्रह कायद्यानें थांबवणें शक्य नाहीं, हें समाजवाद्यांनाही समजतें. तसा प्रयत्न केल्यास श्रम करणाऱ्या फलाकांक्षी लोकांना श्रम करण्यास उत्तेजन मिळणार नाहीं, हें लक्षांत घेऊन प्रत्येकास त्याच्या त्याच्या श्रमाच्या प्रमाणाप्रमाणें व प्रकाराप्रमाणें कमीअधिक संग्रह करूं देणें आज आवश्यक आहे, हें व्यवहारदृष्ट्या समाजवाद्यांनीं मान्य केलें आहे. म्हणून समाजवाद म्हणजे असंग्रहाची संस्थापना असें न म्हणतां समाजवाद म्हणजे

अस्तेयाची संस्थापना असेंच म्हणावें लागेल. अर्थात् सत्याग्रहाची दृष्टि याच्याही पुढें गेली असून त्या दृष्टीनें सर्वच संग्रह हें स्तेय आहे असें कांहीं लोक म्हणतात. तसें म्हटल्यास स्तेय आणि संग्रह यांतील भेद नष्टच होईल किंवा कष्टार्जित संग्रह आणि अकष्टार्जित संग्रह असा भेद करतां येणार नाहीं. अकष्टार्जित संग्रह ही चोरी आहे व ती कायद्यानें बंद करणें शक्य आहे. कष्टार्जित संग्रह यालासुद्धां सूक्ष्म अर्थानें चोरी म्हणतां येईल. कारण समाजाच्या सहकार्यावांचून कोणताही संग्रह आपणांस करतां येत नाहीं व तो टिकवितां येत नाहीं. परंतु व्यवहारदृष्ट्या व कायद्याच्या दृष्टीनें संग्रहाचे कष्टार्जित व अकष्टार्जित असे भाग करणें आज आवश्यक असून अकष्टार्जित संग्रहाचे म्हणजे चोरीचे जे कायदेशीर मार्ग आज उपलब्ध आहेत ते कायद्यानें बंद करावेत आणि कष्टार्जित संग्रहाच्याबाबत हृदयपरिवर्तनाचा मार्ग स्वीकारावा असें धोरण समाजवादांत अभिप्रेत आहे. चोरीच्याबाबत चोराच्या हृदयपरिवर्तनावर कोणतीही राज्यसंस्था विसंबून राहात नाहीं. त्याचप्रमाणें दुसऱ्याच्या श्रमांचें फल लुबाडून जो धनसंग्रह भांडवलदार-पद्धतींत घडत आहे तो कायद्यानें बंद पाडण्याचे कामीं धनिक वर्गाचें हृदय-परिवर्तन करण्यासाठीं सत्ताधाऱ्यांनीं विलंब लावणें म्हणजे सामाजिक स्तेयाचें संरक्षण करणेंच होय अशी समाजवादी दृष्टि आहे. महात्मा गांधी धनिकांचेंही हृदयपरिवर्तन करावें असें म्हणत असलें तरी या धनिकवर्गानें आपला धनसंग्रह समाजाला अर्पण केला पाहिजे व तो त्यानें न केल्यास त्या उत्पादनपद्धतीविरुद्ध अनत्याचारी असहकारानें व सत्याग्रही निष्ठेनें शेतकरी कामकरी वर्गाला मालक वर्गाशीं झगडावें लागेल असेंही त्यांनीं म्हटलें आहे. या मार्गानें समाजाची आर्थिक घटना जेव्हां श्रम, अस्तेय आणि असंग्रह या तत्त्वांवर उभारली जाईल तेव्हांच खरा अहिंसक समाज आणि खरी अहिंसक लोकशाही निर्माण होईल असें गांधींचें मत होतें. अहिंसाधिष्ठित लोकशाही (Democracy based on non-voilence) या महात्मा गांधींच्या शब्दांचा अर्थ इतका व्यापक आहे. ही अहिंसक आर्थिक घटना निर्माण होईपर्यंत लोकशाही राज्यांत खरी न्यायसंस्थापना होणार नाहीं. आर्थिक

घटनेंतील ही अहिंसक क्रांति हें न्यायसंस्थापनेचें खरें साधन असून ती क्रांति सत्याग्रही मार्गानें घडवून आणणें म्हणजेच अहिंसेच्या साधनानें सत्याची उपासना करणें होय. महात्मा गांधींच्या व्यापक धर्मनिष्ठेंत अथवा सत्याग्रही जीवननिष्ठेंत जशी राष्ट्रीय लोकशाहीची राजकीय क्रांति अंतर्भूत झालेली होती, तशीच त्या निष्ठेंत वरील सामाजिक व आर्थिक क्रांतिही अंतर्भूत झालेली आहे. ही क्रांति करण्यासाठींच महात्मा गांधींनीं राष्ट्रसभा यापुढें सत्याग्रही लोकसेवक संस्था बनावी असें म्हटलें होतें. अर्थात् तसें तिला बनावयाचें तर तिनें आपल्या हातीं राजदंड घेण्यासाठीं निर्माण झालेल्या पक्षोपपक्षांच्या स्पर्धेपासून अलिप्त राहिलें पाहिजे; कारण राजदंड हातीं घेऊन त्या संस्थेस आपली सत्याग्रही निष्ठा टिकविता येणार नाहीं.

भांडवलशाही, लोकशाही व अहिंसा

राजदंड हातीं घेऊन समाजधारणा व समाजरक्षण करणाऱ्यांना शस्त्रबलाचें अथवा हिंसेचें साधन वापरणें अपरिहार्य असतें, हें लक्षांत घेतल्यास साधनशुद्धतेचा सिद्धान्त राजसत्तेला लागू पडत नाहीं असें वर म्हटलें, तरी हा राजदंड कायदेशीरपणेंच वापरला जावा, हे कायदे लोकमतानुसार बनविले जावेत. सर्व पक्षांस व व्यक्तींस आपापल्या मतांस लोकांचें मत अनुकूल करून घेण्याची मुभा असावी आणि ज्या पक्षास बहुमताचा पाठिंबा मिळेल त्या पक्षाच्या हातीं राजसत्ता जावी अशी पद्धति लोकशाही राज्यांत असते. यामुळें लोकशाही राज्यांत राजदंडामार्फत होणारी हिंसा किमान प्रमाणांत होण्याचा संभव असतो हें खरें आहे, तरी जोंपर्यंत भांडवलदारीमुळें होणारें स्तेय आणि स्तेयमूलक संग्रह राजदंडानें बंद पाडलेला नाहीं, तोंपर्यंत समाजांतील हिंसा कमी करण्याचें कर्तव्य त्या राजसत्तेनें केलें नाहीं असें म्हणावें लागतें. जी राजसत्ता हें भांडवलदारीचें स्तेय थांबवूं शकत नाहीं, ती स्वतः हिंसा कमी करीत असली, तरी भांडवलदारांनीं चालविलेली हिंसा चालू देते हें लक्षांत घेतल्यास तिला किमान हिंसक म्हणतां येणार नाहीं. शिवाय भांडवलदारांचें स्तेय आणि संग्रह चालू

देणारी भांडवलदार लोकशाही ही शेतकरी-कामकरी-वर्गाची स्वयंप्रेरित राजनिष्ठा संपादूं शकत नाहीं. तिला राजनिष्ठा संपादन करण्यासाठीं असत्याचा प्रचार करावा लागतो आणि सत्याचा प्रचार करणारांना व स्वतःवर होणाऱ्या भांडवलदारी अन्यायांविरुद्ध भांडणाऱ्या कामगारांना दडपून टाकावें लागतें. भांडवलदार लोकशाही राज्यानें असें धोरण स्वीकारिलें कीं तिचें लोकशाही स्वरूप नष्ट होऊन तिला एकपक्षीय अनियंत्रित स्वरूप प्राप्त होतें. फॅसिझम ही भांडवलदार उत्पादनपद्धति टिकवून धरूं पाहणारी अनियंत्रित एकपक्षसत्ता आहे तर याच्याविरुद्ध कम्युनिझम ही भांडवलदार पद्धति मोडण्यासाठीं स्थापन झालेली एकपक्ष अनियंत्रित सत्ता आहे. जोंपर्यंत भांडवलदार उत्पादनपद्धति कायम आहे तोंपर्यंत लोकशाही राज्य स्थापन झालें तरी कामगार आणि भांडवलदार यांच्यांत चालू असलेल्या वर्गकलहामुळें तें लोकशाही राज्य सुस्थिर बनूं शकत नाहीं आणि त्याचें रूपांतर कोणत्या तरी स्वरूपाच्या अनियंत्रित एकपक्षसत्तेंत होऊं लागतें असा याचा अर्थ आहे. भांडवलदार उत्पादनपद्धति व आर्थिक घटना हीं नष्ट करूं पाहणारा कम्युनिस्ट पक्ष आणि ती उत्पादनपद्धति टिकवून धरूं पाहणारा फॅसिस्ट पक्ष यांचा लढा निर्माण होऊन ज्या पक्षाच्या हातीं राजसत्ता जाईल तो पक्ष लोकशाही राज्य मोडून टाकून आपली हुकूमशाही स्थापन करतो. याचा अर्थ द्विवर्ग समाजरचना आणि लोकशाही राज्यपद्धति या दोन गोष्टी एकत्र नादूं शकत नाहींत असा होतो. एक तर या लोकशाही राज्यानें भांडवलदार उत्पादनपद्धति व द्विवर्ग समाजरचना मोडून एकवर्गसमाजाची व समाजवादाची स्थापना केली पाहिजे किंवा द्विवर्ग समाजरचना कायम टिकवूं पाहणाऱ्यांनीं लोकशाही राज्य मोडून टाकलें पाहिजे असा हा पेंच आहे. हा पेंच उलगडण्यापूर्वी एकवर्गसमाज हें आपलें ध्येय आहे कीं, द्विवर्गसमाज हें आपलें ध्येय आहे याचा निर्णय केला पाहिजे. तसेंच द्विवर्गसमाज यापुढें चालू शकेल कीं नाहीं याचाही विचार केला पाहिजे. आज आर्थिकदृष्ट्या विचार केल्यास द्विवर्गसमाज चालणें अशक्य झालेलें आहे; आणि म्हणून एकवर्गसमाज स्थापन करण्यावांचून गत्यंतरच नाहीं. लोकशाही

मोडून केवळ अनियंत्रित पक्षसत्तेच्या जोरावर द्विवर्गसमाज स्थापन करण्याचा प्रयोग हिटलर आणि मुसोलिनी यांनीं केला पण तो प्रयोग आतां अपयशी ठरलेला आहे. तेव्हां व्यवहारदृष्टीनें एकवर्गसमाज-स्थापना केल्यावांचून समाजाची धारणा होणें अशक्य बनलें आहे असें म्हणतां येईल. हा एकवर्गसमाज स्थापन करतांना लोकशाही राज्य टिकवून तें साध्य गांठावयाचें, कीं तें लोकशाही राज्य मोडून तें ध्येय गांठावयाचें एवढाच प्रश्न उरलेला आहे.

महात्मा गांधी यांनीं लोकशाही राज्यांत पक्षातीत राजकारण करणारी एक सत्याग्रही लोकसेवक संस्था स्थापन करावी असा विचार जगापुढें मांडला आहे. त्याचबरोबर द्विवर्गसमाजरचना ही अहिंसेशीं विसंगत असून एकवर्गसमाज हेंच अहिंसक समाजाचें स्वरूप आहे, असेंही सांगितलें आहे. वर वर्णिल्याप्रमाणें लोकशाही राज्यांत द्विवर्ग भांडवलशाही आर्थिक घटना कायम असेपर्यंत कम्युनिझम् व फॅसिझम् अशा प्रवृत्तींचे पक्ष निर्माण होणें अपरिहार्य दिसतें. या दोनही पक्षांची प्रवृत्ति लोकशाहीला मारक आहे. या अथवा अशा प्रवृत्तींच्या दोन किंवा अधिक पक्षांव्यतिरिक्त एक लोकसेवक संस्था स्थापन होऊन तिनें जनतेमध्यें पक्षातीत राजकारण करण्याची व लोकशाही राज्य शाबूत ठेवण्याची वृत्ति निर्माण केली तर लोकशाही टिकून एकवर्ग-समाज स्थापन करण्याचा मार्ग सांपडूं शकेल. या पक्षातीत राजकारण करणाऱ्या लोकसेवक संस्थेनें जनतेची शक्ति संघटित करून लोकशाही राज्य आणि एकवर्गसमाज हींच आपलीं ध्येयें असें जाहीर केलें तर लोकशाही पद्धतीनें समाजवादाची स्थापना करणारा पक्ष अधिकारावर येऊन तो स्तेयमूल व संग्रहप्रधान भांडवलदारपद्धति मोडून एकवर्ग-समाज स्थापन करूं शकेल. त्यानें असें केलें तरी तो आपली अनियंत्रित सत्ता जनतेवर लादूं शकणार नाहीं. कारण जनतेचें आत्मबल संघटित करणारी सत्याग्रही संस्था त्याला तसें करूं देणार नाहीं. अशा प्रकारें लोकशाही राज्यांत जर एक लोकसेवक सत्याग्रही संस्था स्थापन झाली आणि तिनें प्रजेचें प्रभुत्व कायम टिकविलें तर समाजवादी क्रांति करून लोकशाही राज्यपद्धति टिकविणें शक्य आहे.

असें तात्त्विक दृष्टीनें मान्य करावें लागेल. सत्याग्रही अधिष्ठान निर्माण करून लोकशाहीला समाजवादी स्वरूप देणें आणि लोकशाही राज्ययंत्रांतील राजदंडाचा उपयोग, भांडवलशाही आर्थिक घटना नष्ट करून एकवर्गसमाज स्थापन करण्याच्या कामीं करणें, या दोनही गोष्टी घडून आल्यास समाजवादी लोकशाहीचें ध्येय मूर्त स्वरूपास येईल. महात्मा गांधींनीं सर्वोदय समाजाचें जें ध्येय आपल्यापुढें ठेविलें आहे त्याची ही पूर्वावस्था होय. युरोप खंडांत लोकशाही समाजवादाचें ध्येय निर्माण झालेलें आहे पण तें ध्येय मूर्त स्वरूपास आणण्यास सत्याग्रही लोकसेवक संघाची व पक्षातीत राहून सत्ताविरहित राजकारणाची आवश्यकता आहे हें महात्मा गांधींनीं आपणांस दाखवून दिलेलें आहे. आजच्या समाजघटनाशास्त्रांत त्यांनीं ही एक मौलिक भर घातलेली आहे असें राज्यशास्त्रज्ञांस व समाजशास्त्रज्ञांस मान्य करावें लागतें.

समाजघटना व आजचा युगधर्म

धर्म या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. त्या अनेक अर्थांपैकीं आत्मप्राप्तीचें साधन आणि समाजधारणा करणारी सामाजिक घटना व नीति हे दोन फार महत्त्वाचे अर्थ आहेत. या दोहोंपैकीं आत्मप्राप्तीचें साधन या दृष्टीनें महात्मा गांधींनीं सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य किंवा ज्ञान, प्रेम व सेवा हीं तीन तत्त्वें जगापुढें सर्व धर्मांचें शाश्वत अथवा सनातन रहस्य म्हणून मांडलीं. समाजघटना व सामाजिक नीति या अर्थांचा धर्म हा परिस्थित्यनुसार बदलणारा असला तरी त्याच्या बुडाशींही ज्ञान, प्रेम आणि सेवा अथवा सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य या तत्त्वांचें अधिष्ठान असलें पाहिजे. या दृष्टीनें समाजाच्या आर्थिक घटनेच्या बुडाशीं श्रम, अस्तेय आणि असंग्रह हीं तीन तत्त्वें असावींत आणि आर्थिक समता हें समाजघटनेचें ध्येय असावें असें महात्मा गांधींनीं दाखवून दिलें. आज जी उत्पादनपद्धति निर्माण झाली आहे, ती उत्पादनपद्धति आणि उत्पादनाचीं भौतिक साधनें यांचा विचार केल्यास आजचें समाजधारणाशास्त्र लोकशाही समाजवाद हें आपलें

सामाजिक ध्येय असावें असें म्हणतें. अशा रीतीनें समाजधारणेच्या दृष्टीनें लोकशाही समाजवाद हा आजचा युगधर्म आहे असें म्हणतां येईल आणि सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य, इत्यादि साधनांनीं आत्मप्राप्ति करून घेणें हें सनातन मानवधर्माचें रहस्य आहे असें म्हणतां येईल. सत्याग्रही निष्ठा हा मानवाचा सनातन धर्म आणि लोकशाही समाजवाद हा त्याचा आजचा युगधर्म हें ज्ञान महात्मा गांधींच्या सत्याग्रही जीवनापासून जगाला झालेलें आहे अथवा होऊं शकेल असें आमचें मत आहे.

हिंदूंच्या प्राचीन धर्माच्या दृष्टीनें वर्णाश्रमसंस्था हा समाजधारणा-धर्म होता. महात्मा गांधी हे वर्णाश्रमधर्माचे अभिमानी होते. म्हणून ते एकवर्गसमाज अथवा लोकशाही समाजवादास मान्यता देणार नाहींत अशी कांहींची कल्पना होती. परंतु ही कल्पना खरी ठरली नाहीं. महात्मा गांधींनीं लोकशाही समाजवादास मान्यता देऊन एकवर्गसमाजाचें ध्येय सत्याच्या, अहिंसेच्या, दृष्टीनें मान्य केलें. ब्राह्मणापासून अस्पृश्य गणिलेल्या हरिजनापर्यंत सर्वांचा रोटीबेटी-व्यवहार होण्यास हरकत नसावी किंवहुना तसा तो होऊं लागावा हाच आजचा धर्म आहे असें त्यांनीं निःसंदिग्धपणें जाहीर केलें. प्राचीन वर्णाश्रमधर्मासंबंधीं त्यांना अभिमान वाटत असला तरी आज आपण त्या वर्णाश्रमधर्माच्या नांवानें जातिसंस्था अथवा जातिभेद कायम ठेवणें हें समर्थनीय होऊं शकत नाहीं, असें त्यांचें स्पष्ट मत होतें. १९३९ सालीं 'गांधी-सेवा-संघा'ची बैठक झाली तेव्हां त्या वेळीं प्राचीन वर्णसंस्थेसंबंधीं महात्मा गांधींनीं पुढीलप्रमाणें आपले विचार एका सभासदाच्या प्रश्नास उत्तर देतांना मांडले. ते म्हणाले :—

"आज सद्यःस्थितीच्या दृष्टीनें वर्णसंस्थेचा विचार करण्याची गरज नाहीं. कारण आज आपल्या समाजांत केवळ शूद्र हाच एक वर्ण उरलेला आहे किंवा हरिजन हाच तो वर्ण होय असेंहि तुम्हांस म्हणतां येईल. आपण जर आपणां सर्वांस शूद्रच मानूं लागलों तर वर्णसंस्थेंत उच्चनीच भावनेची जी भेसळ आम्हीं केलेली आहे ती आपोआपच नष्ट होत आहे. एक वर्ण दुसऱ्या वर्णास कमी लेखूं शकत नाहीं आणि

हा असत्य वर्णभेद नष्ट होतो. आजच्या वस्तुस्थितीस अनुरूप असेंही हें तत्त्व आहे. केवळ जीवनधारणेपुरतें धन घेऊन अध्ययन आणि अध्यापन यांतच समाधान मानणारा खरा ब्राह्मण आज कोठें आहे? आपल्या देशासाठीं अथवा मानवबंधूंसाठीं आपलें जीवित समर्पित करण्यांत आनंद मानणारा क्षत्रिय आज कोठें आहे? राष्ट्राच्या संपत्तींत भर टाकण्यांत आणि गरिबांच्या हितासाठीं आपल्या संपत्तीचा विनियोग करण्यांत अभिमान बाळगणारा वैश्य आज कोठें आहे? गरीब बिचाऱ्या शूद्रासंबंधीं बोलावयाचें तर तो आज एखाद्या भारवाहक पशूप्रमाणें कष्टांत आणि दास्यांत रुतलेला आहे. तो जी समाजाची सेवा करीत आहे त्यांत त्याला आनंद नाहीं. म्हणून आज आपल्या प्रवृत्तीप्रमाणें व स्वभावाप्रमाणें आपले धंदे करूं या. आपल्या किमान गरजांच्या प्रमाणांत धनार्जन करूं या आणि स्वतःस ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादि नामें धारण करण्याची चिंता सोडून देऊं या. असें आपण केलें तर समाजवाद, कम्युनिझम, गांधीवाद, इत्यादि वादांमुळें आज जी कटुता निर्माण होत आहे ती नाहींशी होईल." ('Harijan', June 3, 1939.)

याच बैठकींत धनिकांनीं स्वतःस आपल्या धनाचे मालक न समजतां आपण समाजानें नेमलेले निधिधारक आहोंत आणि आपल्या धनसंग्रहाचें स्वामित्व समाजाकडे आहे हें जें गांधींचें तत्त्व त्यासंबंधीं पुढील प्रश्नोत्तरें झालीं.

"निधिधारकाचा सिद्धान्त–" एक सभासद म्हणाले, "हा माझ्या बुद्धीस आकलनच होऊं शकत नाहीं. त्याचा अर्थ आपण थोडक्यांत विशद करूं शकाल काय?"

यावर उत्तर देतांना गांधीजी म्हणाले, "हा सिद्धान्त दोनचार मिनिटांत कसा विशद करतां येईल? दोनचार मिनिटांतच काय पण दोनचार तासांतही तो विशद करतां येणार नाहीं. समजा कीं, मला कांहीं मार्गानें उद्योग करून अथवा वारशानें बरीचशी संपत्ति मिळाली. तर ही सर्व संपत्ति माझी स्वतःची नाहीं, ही जाणीव मला असली

पाहिजे. सन्मानानें जगण्यास जेवढी संपत्ति लागेल तेवढीच माझी संपत्ति होय. हेंच माझें सन्मानाचें जीवन इतर लक्षावधि जनतेच्या जीवनराहणीहून अधिक श्रीमंतीचें असतां कामा नये. याहून अधिक अशी जी संपत्ति असेल ती सर्व समाजाच्या मालकीची आहे आणि तिचा विनियोग समाजासाठींच मीं केला पाहिजे. जेव्हां जमीनदार आणि राजेरजवाडे यांच्या संपत्तीसंबंधीं समाजवाद्यांनीं आपला सिद्धान्त मांडला तेव्हांच मीं हा सिद्धान्त मांडलेला आहे. हे वर्ग नाहींसे करावे अशी समाजवाद्यांची इच्छा आहे. या वर्गांनीं स्वतः लोभ सोडावा आणि वित्ताचें आत्मीयत्व सोडून जे कष्टजीवी वर्ग आहेत, त्यांच्यासारखें स्वेच्छेनें बनावें अशी माझी इच्छा आहे. कामगारांनाही ही जाणीव झाली पाहिजे कीं, श्रमशक्तिरूप जी संपत्ति आपल्यापाशीं आहे त्या संपत्तीचे आपण जितके मालक आहोंत तितका मालकी हक्क धनिक व्यक्तीला आपल्या धनावर नाहीं. या व्याख्येप्रमाणें खरे निधिधारक किती व्यक्ति बनूं शकतील हा प्रश्न येथें गैरलागू आहे. हा सिद्धान्त जर खरा असेल तर त्याप्रमाणें अनेक लोक वागतात किंवा एकच व्यक्ति वागते हा मुद्दा महत्त्वाचा नाहीं. हा आपल्या निष्ठेचा प्रश्न आहे. जर तुम्ही अहिंसेचें तत्त्व मान्य करीत असाल तर या तत्त्वाप्रमाणें आचरण करण्याचा प्रयत्न करणें तुम्हांस भाग आहे. मग त्यांत यश येवो अगर अपयश येवो. हा सिद्धान्त बुद्धीनें आकलन करण्याच्यापलीकडे आहे असें त्यांत कांहीं नाहीं. तो आचरणांत आणणें कठीण आहे असें तुम्हास म्हणतां येईल." ('Harijan', June 3, 1939).

वर दिलेलीं दोनही विषयांवरील प्रश्नोत्तरें वाचिलीं असतां सर्व प्रकारचा जातिभेद, वर्णभेद आणि वर्गभेद नष्ट करून एकवर्गसमाज-रचनेचें ध्येय अमलांत आणण्याचा प्रयत्न करणें हेंच सर्व निष्ठावंत सत्याग्रहींचें आजचें कर्तव्य आहे, असें महात्मा गांधींचें मत असल्याचें दिसून येतें.

मग महात्मा गांधी हे वर्णाश्रमधर्माचे अभिमानी होते या

म्हणण्याचा अर्थ काय? आमच्या मतें त्या म्हणण्याचा अर्थ पुढील-प्रमाणें आहे :—

वर्णाश्रमधर्माची रचना मुख्यतः दोन तत्त्वांवर करावी असा मूळचा उद्देश होता. निदान गांधीजींना तसें वाटत होतें. प्रत्येक व्यक्तीनें आपल्या गुणकर्मास अनुसरून समाजांतील कोणतें तरी उपयुक्त कार्य कर्तव्यबुद्धीनें करावें. हें कार्य करीत असतां व्यक्तिस्वार्थाची बुद्धि धारण न करतां समाजसेवेची बुद्धि स्वीकारावी. आणि या सेवेला समाजानें जें फल ठरविलें असेल तें फल मिळाल्यानंतर आपल्या जीवनास आवश्यक तेवढाच भाग घेऊन उरलेला भाग समाजास अर्पण करावा. तसेंच आपल्या गुणकर्मास अनुसरून कोणतेंही कार्य आपण केलें तरी तें जर समाजाला उपयोगी असेल तर त्याचा सामाजिक दर्जा इतर कोणत्याही कामाइतकाच मानण्यांत यावा. समाजाला उपयुक्त अशीं जीं कामें असतील त्यांचे श्रमविभागाच्या तत्त्वानुसार कितीहि प्रकार असले तरी त्या कामामुळें तें करणाऱ्यांचा सामाजिक दर्जा उच्च अथवा नीच मानिला जाऊं नये. तात्पर्य, महात्मा गांधींच्या मताप्रमाणें जातीजातींतील अथवा वर्णावर्णांतील उच्च-नीच भावना हें वर्णाश्रम-धर्माचें रहस्य नव्हे. त्यांच्या वर्णाश्रमधर्माच्या कल्पनेंत, सामाजिक विषमतेस मुळींच स्थान नव्हतें. समाजांत रूढ असलेल्या श्रमविभागा-नुसार जीं कामें अस्तित्वांत असतील त्यांपैकीं कोणतेंही कार्य आपण आपल्या गुणानुसार स्वीकारलें तरी त्याची सामाजिक योग्यता सारखीच आहे आणि हें काम आपण व्यक्तिस्वार्थाच्या दृष्टीनें न करतां समाज-सेवेच्या कर्तव्यबुद्धीनें करीत राहिलों आणि फलाविषयीं पूर्ण अनासक्ति धारण केली तर आपण लोकसंग्रह आणि आत्मप्राप्ति हीं दोनही ध्येयें एकाच वेळीं प्राप्त करून घेऊं शकूं. ही निष्ठा समाजांत निर्माण करणें हा वर्णाश्रमधर्माचा मूळचा उद्देश अथवा त्याचें आदर्श स्वरूप होतें असें गांधीजी मानीत. या आदर्शांत अंतर्भूत होणारीं तत्त्वें निष्काम समाजसेवा आणि सामाजिक समता अशीं सांगतां येतील. आजची भांडवलदार संस्कृति लोभावर व स्पर्धेवर उभारलेली आहे. आणि लोभ व स्पर्धा हाच तिनें आपला आदर्श ठेविला आहे. हा आदर्श अनर्थावह

असून निष्काम सेवा आणि सामाजिक समता हा आदर्श आपल्यापुढें ठेवावा असें गांधींचें मत होतें. आजच्या संस्कृतींत आर्थिक व राजकीय व्यवहारांना नैतिक बंधन नाहीं वा अध्यात्मिक अधिष्ठान नाहीं. वर्णाश्रमधर्मसंस्था स्थापन करणाऱ्यांनीं सर्व प्रकारच्या सामाजिक व्यवहारांना नैतिक बंधनें असलीं पाहिजेत आणि आध्यात्मिक अधिष्ठान असलें पाहिजे हें ओळखिलें होतें असें गांधींचें मत होतें. आणि म्हणूनच ते स्वतःस वर्णाश्रमधर्माचे अभिमानी म्हणवीत. परंतु त्याचा अर्थ आजच्या समाजांत आपण पुन्हा तशाच प्रकारचे चार वर्ण स्थापन करावे आणि विशेषतः त्या वर्णांत सामाजिक विषमता निर्माण करावी असा होऊं शकत नाहीं. आपल्या मतांचा असा विपर्यास होऊं नये म्हणून त्यांनीं या विषयासंबंधीं अनेकवार खुलासे केले आहेत आणि सर्व प्रकारचे जातिभेद, वर्णभेद व वर्गभेद नाहींसे करून आज आपण एकवर्गसमाजच स्थापन केला पाहिजे असेंही वारंवार जाहीर केलें आहे. सत्य व अहिंसा यांना मूर्ताकार द्यावयाचा तर समाजवादच स्थापन झाला पाहिजे असेंही ते म्हणत. (Truth and non-violence must incarnate themselves into socialism.). वर्णाश्रमधर्मांतील सामाजिक व्यवहारांवर नैतिक बंधनें ठेवण्याची आवश्यकता आणि समाजधारणेला आध्यात्मिक अधिष्ठान निर्माण करण्याची गरज लक्षांत घेऊनच महात्मा गांधींनीं आजच्या परिस्थितीस अनुरूप अशा लोकशाही समाजवादाचा पुरस्कार समाजधारणेच्या दृष्टीनें करून समाजवाद हाच आजचा युगधर्म होय असा निर्णय आपल्या बुद्धीनें दिला होता. या उदाहरणावरून वर्णाश्रमधर्माचा अभिमानी हा आज लोकशाही समाजवादाचा व एकवर्गसमाजरचनेचा पुरस्कर्ता कसा बनूं शकतो तें दिसून येईल.

सनातन क्रांतिकारक

महात्मा गांधी हे स्वतःस सनातनी हिंदु म्हणवीत असत, आणि तरीही ते क्रांतिकारक होते. धर्माला एक सनातन अंग आहे आणि

एक परिवर्तनी अंग आहे. सत्याग्रह ह्या शब्दानें जसा धर्माच्या सनातन अंगाचा बोध होतो, तसाच त्याच्या क्रांतिकारक अंगाचाही बोध होतो. श्रीकृष्ण, गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर यांनीं एकाच सनातन धर्माचा अथवा धर्मरहस्याचा उपदेश केला, असें जसें म्हणतां येतें तसेंच असेंही म्हणतां येतें कीं, त्यांनीं आपापल्या काळीं रूढ असलेल्या धर्मांत व समाजांत क्रांति केलेली आहे. ही क्रांति करीत असतांना त्यांनीं आपण अगदींच नवीं तत्त्वें स्थापण्यासाठीं क्रांति करीत आहों अशी भूमिका न स्वीकारतां पूर्वी जीं सनातन व श्रेष्ठ तत्त्वें रूढ होतीं, यांच्यापासून समाज ढळला असल्यानें त्या श्रेष्ठ तत्त्वांचा उद्धारच आपण करीत आहों अशी भूमिका स्वीकारिली होती. उदाहरणार्थ, श्रीकृष्ण भगवद्गीतेंत म्हणतो कीं, मी जो योग (अर्जुनाला) तुला सांगत आहे तो पूर्वीचाच आहे पण त्याचा आज नाश झाला आहे व मी तो पुनः सांगत आहें. गौतम बुद्ध सुद्धां आपण जी सामाजिक क्रांति करीत आहों ती नव्या तत्त्वासाठीं नसून जुन्याच तत्त्वासाठीं आहे असें म्हणत होता. तरीही त्यानें वेदप्रामाण्य, जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य, उपनिषदांतील आत्मवाद या सर्वांवर आघात केला आणि समाजांत व धर्मांत क्रांति केली. येशू ख्रिस्त असें म्हणत असे कीं, पूर्वीच्या धर्मपुरुषांनीं जें केलें तें नष्ट करण्यासाठीं मी जन्मास आलों नसून त्याची पूर्तता करण्यासाठींच मी जन्मास आलों आहें. महंमद पैगंबरानेंही पूर्वीच्या सर्व धर्मपुरुषांच्या कार्याची मी पूर्तता करीत आहें अशी भूमिका स्वीकारली होती. महात्मा गांधींची भूमिकाही अशीच होती. मानवी जीवनांत कांहीं शाश्वत मूल्यें व निष्ठा आहेत. या शाश्वत मूल्यांना व निष्ठांना मानवाचा सनातन धर्म अथवा जीवननिष्ठा असें म्हणतां येईल. ही जीवननिष्ठा शाश्वत व सनातन असली तरी तिचें ज्ञान वाढतें आहे. ज्याला आत्मानुभूति, स्थितप्रज्ञता, अंतःशांति, निर्वाण, मोक्ष असें म्हणतात त्याची प्राप्ति करून घेणें, अ पलें सत्यस्वरूप जाणून घेणें हा मानवाचा एक सनातन धर्म असून अशा आत्मानुभवी मनुष्याची अंतःकरणवृत्ति प्रेममय होतें आणि त्याचे सर्व इंद्रियव्यापार भूतहितपर घडतात असा

इतिहास आहे. अशा शुद्ध अंतःकरणाच्या व भूतसेवापरायण मनुष्याची शुद्धबुद्धिही स्वभावतः सत्यनिष्ठ अथवा न्यायनिष्ठ बनते. असे लोक समाजाच्या घटनेंत क्रांति करण्यास जेव्हां प्रवृत्त होतात तेव्हां त्या समाजाची घटना न्यायनिष्ठ उरलेली नसून अन्यायनिष्ठ बनलेली असते. त्या घटनेमुळें मानवी जीवनाच्या विकासास अडथळा होत असतो. ज्ञान, प्रेम आणि सेवा यांची वाढ होण्याचें थांबून अज्ञान, स्वार्थ, परपीडा यांची वाढ होत असते. म्हणून सनातन मानवधर्मांच्या वाढीसाठींच ही क्रांति समाजघटनेंत करावी लागते.

सनातन मानवधर्म शाश्वत आहे याचा अर्थ त्या मानवधर्माचें मानवाला झालेलें ज्ञान सनातन आहे असा अर्थ नाहीं. इतर विषयांतील ज्ञानाप्रमाणें या विषयांतलि ज्ञानही वाढतें आहे. कोणाही धर्मपुरुषाला जें ज्ञान असतें तें पूर्ण नसतें. अर्थात् कोणत्याही धर्मग्रंथांतील मानवाच्या या सनातन धर्माचें अथवा जीवननिष्ठेचें ज्ञान पूर्ण नाहीं. प्रत्येक नवा धर्मपुरुष या सनातन जीवननिष्ठेच्या ज्ञानांत भरही घालीत असतो. महात्मा गांधींनीं या सनातन जीवननिष्ठेस सत्याग्रहनिष्ठेचें स्वरूप दिलें तेव्हांही त्यांनीं त्या ज्ञानांत कांहीं भर घातलेलीच आहे. भगवद्गीता, धम्मपद, बायबल व कुराण यांत वर्णिलेली मानवी जीवननिष्ठा एकच आहे आणि सत्याची अहिंसेनें उपासना करणें हाच सर्वश्रेष्ठ मानवधर्म आहे असें सांगतांना त्यांनीं आमच्या अध्यात्मशास्त्रांतही कांहीं भर टाकिलेली आहे. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य हीं तत्त्वें सनातन असलीं तरी त्यांच्या उपासकांनीं आजच्या समाजांत क्रांति करून लोकशाही समाजवादाची स्थापना करण्यास साहाय्य केलें पाहिजे आणि ही क्रांति अनत्याचारी असहकार व सविनय आज्ञाभंग या मार्गांनीं करून दाखवितां येईल. ही निष्ठा आचरत करतांना त्यांनीं श्रीकृष्ण व गौतमबुद्ध किंवा येशू ख्रिस्त व महंमद पैगंबर यांच्या आध्यात्मिक सिद्धान्तांत भर घातली आहे असें भावी इतिहासकारांस दिसून येईल. सर्व धर्मांचें अंतरंग एकच आहे हें ओळखून सर्व धर्मांबद्दल पूज्यभाव धारण केला पाहिजे, सत्य हाच परमेश्वर आहे, अहिंसा हेंच सत्यसंस्थापनेचें सर्वश्रेष्ठ साधन

आहे. तथापि भ्याडपणापेक्षां हिंसाही पुरवली इत्यादि अनेक सिद्धान्तांच्या पुरस्कारानें गांधीजींनीं अध्यात्मशास्त्राला एक नवें स्वरूप दिलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सनातन मानिलेल्या अध्यात्मशास्त्राची जर ही स्थिति तर नैतिक व सामाजिक शास्त्रांतही सत्याग्रहानें एक नवी दृष्टि मानवाला प्राप्त करून दिली आहे असें म्हणण्यास कोणता प्रत्यवाय आहे ?

महात्मा गांधींनीं भगवद्गीतेच्या अर्थांतही नवी भर घातलेली आहे. " मामनुस्मर युध्य च " म्हणजे ईश्वराला अथवा अंतरात्म्याला स्मरून युद्ध कर हा उपदेश अमलांत आणितांना त्यांनीं " युद्ध " शब्दाचा अर्थ वाढवून सत्याग्रह हा एक युद्धाचाच प्रकार आहे असें दाखवून दिलें. दुष्टाची हिंसा आणि साधूंचें रक्षण याच्यापुढें जाऊन दुष्टाच्या दुष्टपणाचा नाश करा, पण दुष्टाचा नाश करूं नका असा गीतेचा अर्थ आपल्या प्रवृत्तीस अनुसरून शोधून काढिला. भगवद्गीतेनें जसा यज्ञ शब्दाचा अर्थ वाढवून ज्ञानयज्ञ असा अर्थ केला, तसाच सशस्त्र युद्ध याचा अर्थ वाढवून त्या शब्दाच्या अर्थात् अहिंसक युद्ध हेंही बसूं शकतें हें दाखवून दिलें. समाजधारणेला दुष्टांचें निर्दालन करणाऱ्या राजधर्माची आवश्यकता आहे हें श्रीकृष्ण व महंमद पैगंबर यांनीं स्वतः आचरून दाखविलें. येवढ्यानें खरी समाजधारणा होत नाहीं हें ओळखून गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त प्रभृतींनीं निरपेक्ष सत्यनिष्ठेचा व अहिंसेचा उपदेश आचरून दाखविला, पण त्यांनाही राजधर्मातील अपरिहार्य हिंसा कशी नष्ट करीत न्यावी याचा मार्ग समाजाला दाखवून देतां आला नाहीं. तो मार्ग सत्याग्रहाच्या रूपानें महात्मा गांधींनीं दाखवून दिला आणि ब्राह्मणांच्या, श्रमणांच्या वा यतींच्या अहिंसेला राजकीय क्रांतीचें स्वरूप देतां येईल व जनतेच्या आत्मबलाचा प्रभाव पाडून तिला सर्व प्रकारच्या राजकीय दास्यांतून मुक्त करून दंडहीन समाजाच्या दिशेनें जाण्याचा मार्ग चोखाळतां येईल हें दाखवून दिलें. पक्षातीत राजकारण करणाऱ्या लोकसेवक सत्याग्रही वर्गाची कल्पना जगापुढें मांडून त्यांनीं राज्यशास्त्र, समाजशास्त्र, व नीतिशास्त्र यांची वाढ केलेली आहे.

हिंदु संस्कृतीच्या दृष्टीनें विचार केल्यास या संस्कृतींतील अध्यात्माला त्यांनीं अनासक्त कर्मयोगी बनविलें असें म्हणतां येईल. त्यांच्यापूर्वी अनेकांनीं असा प्रयत्न केला होता, पण सत्याग्रही राजकारण नव्यानेंच निर्माण करून त्यांनीं हिंदूंच्या परंपरागत राजकीय कर्मयोगांत भर घातली आणि त्याला क्रांतिकारक बनविलें. अहिंसानिष्ठ यतिवर्गाला सामाजिक, धार्मिक व राजकीय क्रांतीचा मार्ग दाखवून या मार्गानें गेल्यानेंच सत्ययुगाची प्राप्ति होईल व मानवाला आत्मराज्य स्थापितां येईल, असा विश्वास निर्माण केला.

परंपरागत हिंदु धर्मांत वा हिंदु संस्कृतींत आपण ही एक क्रांति करीत आहों याची जाणीव त्यांना झाली होती. हिंदु संस्कृति ही एक प्रकारें अत्यंत सहिष्णु अशी संस्कृति आहे. तशीच ती विचार-स्वातंत्र्याची पुरस्कर्ती संस्कृति आहे. अनीश्वरवाद, अज्ञेयवाद, अनेकान्तवाद इत्यादि अनेक वादांना तिनें अध्यात्मक्षेत्रांत स्थान दिलेलें आहे. अध्यात्म हें एक अनुभवगोचर शास्त्र आहे आणि त्यांत अनुभव व अनुमान या दोन साधनांच्या आधारें मानवी बुद्धीला स्वैर संचार करण्याचें स्वातंत्र्य हिंदु संस्कृतीनें भरपूर दिलेलें आहे. या तिच्या औदार्यामुळेंच हिंदुस्थान ही अनेक धर्मांच्या लोकांची मातृभूमि बनूं शकली. आज ज्याला हिंदु धर्म म्हणतात, तो प्राचीन काळीं मानव-धर्म या नांवानेंच प्रसिद्ध होता आणि सर्वधर्मसमत्वाच्या उदार धोरणावरच त्याची उभारणी झाली होती. सत्यनिष्ठा आणि अहिंसा-वृत्ति याहून दुसऱ्या कोणत्याही सिद्धान्तासंबंधीं त्याचा आग्रह नव्हता. सर्व मानवांनीं एकमेकांशीं सत्यनिष्ठेनें आणि अहिंसावृत्तीनें वागावें, न्यायाची संस्थापना करावी आणि परस्परांनीं परस्परांची सेवा करावी, प्रत्येकानें समाजाच्या ज्ञानांत व धनांत भर घालावी आणि कोणीं कोणास पीडा न देतां आपापल्या निष्ठेप्रमाणें आपापला उद्धार करावा, असा हा मानवधर्म होता. पण हळूहळू त्याची ही सहिष्णु, सत्यनिष्ठ आणि प्रेमळ अहिंसावृत्ति लोप पावली. उपनिषदें, भगवद्गीता, पातंजल-योग यांत आढळणारी ही शास्त्रीय संशोधनाची सत्यनिष्ठा नष्ट होऊन वेदप्रामाण्याची, ग्रंथप्रामाण्याची, शाब्दिक ज्ञानाची आणि जड-

कर्मठपणाची वृत्ति बळावली. पावित्र्याची भावना भ्रष्ट व विकृत बनून स्पृश्यास्पृश्य भावना व उच्चनीच वृत्ति बळावून जातिभेद व वर्णभेद यांतून विषमतेचा व वर्णाभिमानाचा विषवृक्ष फोफावूं लागला. वेद-प्रामाण्याच्या आग्रहाला बळी पडून गौतमबुद्ध आणि महावीर यांना दूर लोटण्यांत आलें आणि सत्याच्या, समतेच्या व अहिंसेच्या तत्कालीन मर्यादांना सनातन मानण्याची जडबुद्धि सर्व समाजांत फैलावूं लागली.

सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ति हे केवळ संन्याशांचे धर्म आहेत असें मानण्यांत येऊन इतर समाजाच्या सर्व व्यवहारांत असत्य, विषमता, जडता, दास्य या वृत्तींना प्रभुत्व मिळूं लागलें. व्यापक मानवधर्माला प्रथम संकुचित वैदिक धर्माचें व नंतर हिंदु धर्माचें स्वरूप प्राप्त झालें. स्त्रीशूद्रांचें अज्ञान व दास्य हें सनातन बनविण्यांत आलें आणि विश्वचैतन्याशीं तादात्म्य पावून नवनिर्मिति करण्यांत आनंद मानणारे मानवधर्माचे उपासक दगडाधोंड्यांची पूजा करून आणि बकऱ्या-मेंढ्यांना बळी देऊन देवदेवतांना संतुष्ट करण्याचा हिंसक धर्म आचरूं लागले. अव्यक्त, अक्षर, निराकार, निर्गुण परमात्म्याचे उपासक निरनिराळ्या देवदेवतांच्या भक्तीच्या नांवानें एकमेकांशीं भांडूं लागले. सत्यनिष्ठा, स्वातंत्र्यभावना आणि समतावृत्ति यांच्यावरील त्यांचा विश्वास उडाला. बुद्ध व महावीर यांना दूर लोटून जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याला, जातिभेदाला, वर्णाभिमानाला, विषमतेला व दास्याला त्यांनीं अंध-श्रद्धेनें कवटाळलें. समाजघटनेंत समतेला स्थान देणें हा त्यांना अधर्म वाटूं लागला. समाजधारणेला अहिंसेची व सत्यनिष्ठेची गरज आहे याची त्यांची जाणीव बुझून गेली आणि परंपरागत रूढींचा, प्राचीन धर्मबंधनांचा आणि जुलमी राजाशांचा भंग करूनही सत्याची व न्यायाची संस्थापना करण्यासाठीं लढण्याची वृत्ति नष्ट झाली. गौतमाची क्रांतिकारक वृत्ति पुनः हिंदु धर्मांत व हिंदु संस्कृतींत निर्माण झाली नाहीं. शास्त्रीय ज्ञान, सामाजिक समता आणि पराक्रमी सदाचार यांत ही संस्कृति मागें पडली.

हिंदुत्वाचीं दोन स्वरूपें

इ. स. १९४२-४३ सालीं आगाखान भुवनांत राजबंदी म्हणून तुरुंगांत असतांना महात्मा गांधींनीं हिंदु धर्म हा अहिंसेचा पुरस्कर्ता आहे, या विषयांवर एक प्रबंध लिहिण्यास सुरुवात केली. पण तो प्रबंध त्यांना समाधानकारक रीतीनें पुरा करतां आला नाहीं. या-संबंधीं ते म्हणतात, "हिंदुस्थान हा अहिंसेचा पुरस्कर्ता आहे यावर एक प्रबंध लिहावयास मी बसलों, पण तो लिहीत असतांना मला तो अपुराच ठेवावा लागला. हिंदुत्वाला दोन स्वरूपें आहेत. हिंदुत्वाचें ऐतिहासिक स्वरूप हें त्यांचें एक स्वरूप असून त्यांत अस्पृश्यता, दगडा-धोंड्यांची अंध उपासना, पशुयज्ञ इत्यादींना स्थान आहे. भगवद्गीता उपनिषदें, पातंजल योगसूत्रें या ग्रंथांत व्यक्त होणारें हिंदुत्वाचें स्वरूप भिन्न असून तें अहिंसेचें प्रतीक आहे. सर्व विश्वाची, अद्वैत आणि अव्यक्त, अक्षर, निराकार अशा परमात्म्याची शुद्ध उपासना असें त्याचें शुद्ध स्वरूप आहे. हिंदु धर्माचें मुख्य वैभव अहिंसा हें आहे असें मला वाटतें. तर आमचे लोक अहिंसा हा केवळ संन्यासी धर्म आहे असें म्हणून त्या तत्त्वाला बगल देतात. हें मत मला पटत नाहीं. अहिंसा हा एक जीवनाचा मार्ग आहे आणि या मार्गाचें दर्शन हिंदुस्थाननें जगाला करावयाचें आहे असा माझा विश्वास आहे. आज मी कोठें उभा आहें? ही अहिंसा माझ्या वैयक्तिक जीवनांत प्रतिबिंबित झालेली आहे काय? जर असेल तर परस्पर द्वेष आणि असत्य यांचें जें विषारी वातावरण सर्वत्र फैलावलें आहे, तें वितळून गेलेंच पाहिजे. माझ्या सर्व सहकाऱ्यां-पासून दूर एकटाच जाऊन केवळ स्वतःच्या आधारावर मी उभा राहिलों तरच मला माझी दिशा दिसूं लागेल आणि परमेश्वरावरील माझ्या निष्ठेची कसोटी लागेल."

देशांत सर्वत्र फैलावणारे हिंदु-मुसलमानांचे दंगे शांत करण्यासाठीं जेव्हां महात्मा गांधी नौखालीकडे पायीं शांतियात्रेस निघाले, त्या वेळीं त्यांनीं वरील उद्गार कांहीं सहकाऱ्यापाशीं काढिले. सेवाग्रामांतील

आपल्या आश्रमीय मंडळींना त्यांनीं या सुमारास पुढीलप्रमाणें लिहून आपलें अंतःकरण खुलें केलें :—

"मी आश्रमाकडे लवकर परत येईन अशी आशा तुम्ही धरूं नका. कदाचित् मी तिकडे केव्हांच परत येणार नाहीं. माझ्या सहकाऱ्यांसंबंधीं हाच न्याय लागू आहे. जें प्रचंड कार्य आमच्यापुढें उभें आहे, त्याला अतिमानवशक्तीची आवश्यकता आहे. माझ्या जीवननिष्ठेची ही सत्त्व-परीक्षा आहे. माझ्या बुद्धीला गोचर झालेला सत्याग्रह हें केवळ दुर्बलाचें शस्त्र आहे कीं तें खरोखर सामर्थ्यवंताचें शस्त्र आहे ? तें सामर्थ्यवंताचें शस्त्र आहे हें मला अनुभवितां तरी आलें पाहिजे किंवा तो अनुभव घेण्यासाठीं मला माझें प्राणार्पण तरी केलें पाहिजे. मात्र सत्यसंशोधनार्थ मी हिंडत आहें. या संशोधनासाठीं मी या उध्वस्त खेड्यांत येऊन स्वतःस गाडून घेतलें आहे. जशी परमेश्वराची इच्छा असेल तसें होईल."

अहिंसा हें शूराचें शस्त्र आहे, या सिद्धान्ताचें विस्मरण हिंदु धर्माला झालें होतें. हिंदु धर्मानें ज्या वेळीं बुद्ध व महावीर यांना दूर लोटलें, त्या वेळपासून हिंदु संस्कृतींतील सत्याच्या अनिर्बंध संशोधनाची आणि अहिंसेवरील निष्ठेची वृत्ति मावळली होती. हिंदु धर्म हा इतर धर्मांहून भिन्न धर्म आहे अशा अहंकारानें हिंदूंना पछाडलें होतें. हा अहंकार म्हणजे एक प्रकारें परकीय व परधर्मीय आक्रमक जेत्यांच्या भीतीचाच एक विकृत परिणाम होता. कांहींनीं ही विकृति हीच हिंदु धर्माची मूळ प्रकृति समजून इतर धर्मीयांच्या द्वेषावर हिंदुराष्ट्राची इमारत उभारण्याचा चंग बांधला होता. ब्रिटिशांसारखे कपटपटु राजकारणी, परकीय राज्यकर्ते, मुसलमानांत धर्मवेड पसरविण्यास पूर्ण मुभा देऊन हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यांत आपला पक्ष सामर्थ्यवान् करीत होते. हिंदी राष्ट्राच्या वतीनें परकीय साम्राज्यशाहीशीं झगडणारी राष्ट्रसभा आणि तिला नामशेष करूं पाहणारे भेदपटु ब्रिटिश मुत्सद्दी यांच्या झगड्यांत पाकिस्तानवादी मुस्लिम लीग पक्षानें मुसलमानांच्या धर्मभावना चेतवून आपलें दुराग्रही राजकारण अंशतः यशस्वी केल्याचा देखावा दिसत होता. देशाची फाळणी मंजूर झाल्यानंतर ज्या भयंकर कत्तलींची

आपत्ति हिंदु, मुसलमान व शीख या जमातींवर कोसळली तिच्यामुळें बेभान झालेल्या हिंदु जनतेला अथवा तिच्यांतील कांहीं लोकांना हिंदुराष्ट्र स्थापण्याचा मोह पडूं लागला. हा मोह दूर सारून एक जातिधर्मभेदातीत राष्ट्र निदान हिंदी संघराज्यांत तरी निर्माण झालें पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या राष्ट्रसभेच्या पाठीमागें महात्मा गांधींची अध्यात्मनिष्ठ करुण मूर्ति उभी होती. आपल्या आध्यात्मिक धर्मनिष्ठेला संकुचित हिंदु-राष्ट्राचें विकृत स्वरूप प्राप्त झाल्यास पाकिस्तान व हिंदुस्थान या दोनही राज्यांचा सर्वनाश ओढवणार आहे हें सर्व बुद्धिवंतांना दिसत होतें, परंतु देशावर कोसळलेल्या असामान्य आपत्तीच्या काळीं आपल्या बुद्धीस पटलेलें जातिधर्मभेदातीत लोकशाही राष्ट्राचें ध्येय अंतःकरणांत स्थिर ठेवून त्यासाठीं येईल तो लोकापवाद सहन करण्याची आणि प्रक्षुब्ध वृत्तीच्या लोकांचा रोष आपणावर ओढवून घेऊन त्याला स्थैर्यानें आणि अहिंसक उदारवृत्तीनें तोंड देऊन आमरण झगडण्याची शूराची अहिंसा महात्मा गांधींनीं या वेळीं प्रकट केली नसती, आणि त्यांचें आदर्श जीवन हिंदी संघराज्याच्या पाठीमागें मूर्त स्वरूपांत उभें नसतें, तर या हिंदी संघराज्याला हिंदुराष्ट्राचें जमातवादी स्वरूप देऊन आम्हीं लोकशाहीच्या अन् व्यापक मानव-धर्माच्या उच्च ध्येयापासून ढळण्यास फारसा अवकाश नव्हता. ही एक आधुनिक भारताच्या इतिहासांतील महान् आपत्ति ठरली असती. महात्मा गांधींनीं या वेळीं आमची आधुनिक राष्ट्रीय भावना, लोकशाही वृत्ति आणि सामाजिक व आर्थिक क्रांतिनिष्ठा जागृत ठेविली नसती तर आम्हीही पाकिस्तानवादी मुसलमानांच्याप्रमाणें माथेफिरू व धर्मवेडे बनून आधुनिक युगांतून मध्ययुगीन ध्येयाकडे ढळूं लागलों असतों. पण महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शुद्ध तत्त्वनिष्ठेमुळें आणि गांधीजींच्या शूराच्या अहिंसावृत्तीमुळें आम्ही या आमच्या ध्येयाला खंबीरपणें चिकटून राहिलों. अखेरीस गांधीजींनीं असें पटवून दिलें कीं, हिंदुत्वाचा खरा अभिमान ज्याला असेल त्यानें हिंदी संघराज्याला संकुचित हिंदुराज्याचें स्वरूप देतां कामा नये.

राज्यसंस्था ही हिंदु, मुसलमान, शीख इत्यादि सांप्रदायिक, संकुचित धर्मभेदापासून आणि संकुचित धर्मनिष्ठेपासून आलिप्त अशीच असली पाहिजे. सर्व धर्मांना समान असा जो मानवाचा नीतिधर्म त्याचेंच पालन करून त्याचेंच शिक्षण आपल्या जनतेला दिलें पाहिजे. हिंदी संघराज्यांतील सरकारनें आपल्या शिक्षणसंस्थांतून जें शिक्षण द्यावयाचें त्यांत धर्मशिक्षणाला स्थान देऊं नये असें त्यांनीं २३ मार्च १९४७ च्या 'हरिजनां'त आपलें स्पष्ट मत दिलेलें आहे. यासंबंधीं ते लिहितात : "I do not believe that the state can concern itself or cope with religions education. I believe that religious education must be the sole concern of religious associations. Do not mix up religion and ethics. I believe that fundamental ethics is common to all religions, teaching a fundamental ethics is undoubtably a function of the State. By religion I have not in mind fundamental ethics, but what goes by the name of denomination alism. We have suffered enough from state aided religion and a state church."

या उताऱ्यांत महात्मा गांधींनीं सर्व धर्मांना समान अशीं नीतितत्त्वें हीं राज्यसंस्थेला आधारभूत समजून त्यांच्या अधिष्ठानावर राज्याची उभारणी करावी, परंतु त्या सर्व धर्मांना समान असणाऱ्या व्यापक नीतितत्त्वांना हिंदु, मुसलमान, शीख इत्यादि सांप्रदायिक धर्मांचें संकुचित स्वरूप देऊन अशा धर्मांच्या आधारावर राज्याची उभारणी करूं नये व राज्यसंस्थेनें धर्मशिक्षण देण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊं नये असें स्पष्टपणें जाहीर केलें आहे. यावरून महात्मा गांधी जेव्हां धर्मनिष्ठेनें राजकारण करावें असें म्हणतात, तेव्हां त्यांच्या मनांतील आशय हिंदु-मुसलमानादि संकुचित, धार्मिक-सांप्रदायाच्या आधारावर राज्यसंस्था उभारावी असा नसतो व नव्हता हें उघड होतें. त्यांचें धर्मनिष्ठ राजकारण हें विश्वव्यापक सत्याग्रही

जीवननिष्ठेवर उभारलेलें नीतिनिष्ठ राजकारण होतें. या सत्याग्रही निष्ठेची प्रेरणा आपणांस हिंदु धर्मांतून झाली असल्यामुळें आपण जी सत्याग्रही निष्ठा संप्रदायशून्य व अनाग्रह वृत्तीनें सर्व धर्मीयांच्या अंतःकरणांत निर्माण करीत आहों, तें खऱ्या मानवधर्माचें भावी स्वरूप आहे, असें त्यांना वाटत होतें. मानव संस्कृतीला जें आध्यात्मिक अधिष्ठान निर्माण करणें आवश्यक आहे तें आध्यात्मिक अधिष्ठान सत्याग्रहाच्या रूपानें निर्माण करीत आहोंत. हें आध्यात्मिक अधिष्ठान निर्माण करून आपण आजच्या मानवसंस्कृतींत आवश्यक असणारी एक क्रांति घडवून आणणार आहोंत. या क्रांतीची पूर्वतयारी हिंदी राष्ट्र करीत आहे आणि ही पूर्वतयारी करीत असतांना सत्याग्रहाच्या रूपानें हिंदी संस्कृति ही आपलें प्राचीन वैभव आणि खरें अंतरंग जगाला प्रकट करीत आहे. या भारतीय संस्कृतींत आतां हिंदुत्वाच्या संकुचित भावनेला यत्किंचितही अवकाश मिळणार नाहीं. तिनें आतां आपलें उदार निष्ठास्वरूप प्रकट केलें आहे. ती हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, शीख, पारशी असा धर्मभेद जाणत नाहीं. तिला श्रीकृष्ण व गौतमबुद्ध, येशू व महंमद पैगंबर हे सर्व सारखेच पूज्य आहेत. आधुनिक युरोपांत निर्माण झालेलीं सामाजिक समतेचीं, लोकशाहीचीं, व्यक्तिस्वातंत्र्याचीं, आणि समाजवादाचीं ध्येयें हिंदी संस्कृतीनें तावूनसुलाखून घेऊन तीं आपल्या अध्यात्मिक वृत्तीनें आत्मसात् केलेलीं आहेत. या ध्येयांचा समन्वय आध्यात्मिक वृत्तीनें करतां येणें शक्य आहे आणि लोकशाहीला समाजवादाचें स्वरूप देऊन सत्यसंशोधन आणि समाजसेवा यांसाठीं लागणारें व्यक्तिस्वातंत्र्य व बुद्धिस्वातंत्र्य कायम ठेवतां येतें हें जगाला दाखवून देण्याचें सामर्थ्य भारतीय संस्कृतीला प्राप्त झालें आहे. अशा आत्मविश्वासानें महात्मा गांधी नुकत्याच स्थापन झालेल्या लोकशाहीला खऱ्या लोकराज्याचें व अखेरीस रामराज्याचें वा आत्मराज्याचें स्वरूप मी प्राप्त करून देईन अशी आत्मश्रद्धेची भाषा बोलूं लागले होते. परंतु त्यांचें हें आत्मतेज व त्यांची ती अलौकिक आत्मश्रद्धा कांहीं संकुचित वृत्तीच्या हिंदुत्वनिष्ठ म्हणविणाऱ्यांना असह्य झाली आणि त्यांनीं त्यांच्या देहाचा व प्राणाचा बळी घेतला. परंतु या त्यांच्या

दुष्कृत्यामुळें गांधीजींचें कार्य मेलें नाहीं, तर तें अमर झालें. शूराची अहिंसा प्रकट करून त्यांनीं संकुचित हिंदुत्वनिष्ठेचा अंत केला, आणि आजच्या मानवाची खरी धर्मनिष्ठा कशी असावी आणि आजच्या मानवसंस्कृतीला खरें आध्यात्मिक अधिष्ठान कसें निर्माण करावें, हें जगाला दाखवून आपल्या जीविताचा होम आनंदानें केला.

अशा रीतीनें महात्मा गांधींनीं शूराची अहिंसा प्रकट करून गौतम बुद्धाचा क्रांतिकारक अहिंसावाद आणि येशू ख्रिस्ताचा अराजक अहिंसावाद यांचें तेज हिंदु संस्कृतींत आत्मसात् करून दाखविलें. बुद्ध व महावीर यांना दूर लोटल्यामुळें हिंदुत्वाला प्राप्त झालेलें संकुचित स्वरूप नष्ट करून त्याचें मानवतानिष्ठ विश्वरूप प्रकट केलें. हिंदुत्वांत घडवून आणिलेली ही क्रांति हिंदी संघराज्याचें आध्यात्मिक अधिष्ठान बनेल, तरच मानवतेचें मार्गदर्शन करण्याचें आत्मबल हिंदी संस्कृतींत निर्माण होईल.

● ● ●


REFBK-0007148